KÂVYASANGRAHA. 27.

THE MANTRABHÂGAVATA

OF

MOROPANTA.

(THE GREAT MARÂTHÎ POET OF THE MAHÂRÂSHTRA.)

FIRST HALF.

Chapters 1—9.

EDITED WITH

CRITICAL AND EXPLANATORY NOTES

BY

VÂMAN DÂJÎ OKA,

HEAD MASTER, HIGH SCHOOL, RAIPORE.

PRINTED AND PUBLISHED

BY

TUKÂRÂM JÂVAJÎ,

PROPRIETOR OF JÂVAJÎ DÂDÂJÎ'S "NIRṆAYA-SÂGARA" PRESS.

Bombay.

1896.

Price 1¼ Rupee.

काव्यसंग्रह. २७.

महाराष्ट्रकविवर्यमोरोपंतकृत

मंत्रभागवत.

प्रथम माला.

स्कंध १–९.

रामायणभागवतीं मंत्रोद्धारेंचि रामहरिपूजा ।
संपादी म्हणुनि भिउनि कामादिक देति हे मह रिपू ज्या. ॥

एक जुना कवि.

हा

वामन दाजी ओक,

हेडमास्तर, हायस्कूल, रायपुर.

यांनीं अर्थनिर्णायक, पुराणेतिहासविषयक व अवांतर माहितीच्या टीपा देऊन तयार केला.

तो

मुंबईत जावजी दादाजी यांच्या "निर्णयसागर" छापखान्याचे मालक तुकाराम जावजी यांनीं छापून प्रसिद्ध केला.

१८९६.

किंमत १। रुपया.

हा ग्रंथ

श्री० रा० रा० गणपतिराव हरिहर पटवर्धन

ऊर्फ

बापूसाहेब कुरुंदवाडकर

ह्यांस,

त्यांच्या असामान्य गुणग्राहकत्व, देशभाषेच्या उन्नतीविषयीं
स्पृहणीय कळकळ, अविरत विद्याव्यासंग, काव्यग्रंथरति
व अनुपम सौजन्य ह्या गुणांच्या अभिनंदनार्थ
त्यांच्या अनुज्ञेनें

सादर आणि सप्रेम अर्पण केला आहे.

'काव्यसंग्रह'कार.

प्रस्तावना.

मोरोपंतानें मंत्रभागवतांत एकंदर ३३२ मंत्र साधिले आहेत. ह्या एकंदर मंत्रांचें पंतांनीं माळात्रय कल्पिलें आहे. स्कंध १-९ यांतील मंत्रांची एक माळा. स्कंध १० यांतील मंत्रांची दुसरी माळा व स्कंध ११-१२ यांतील मंत्रांची तिसरी माळा. या तीन माळांपैकीं पहिली माळा स्कंध १-९ यांतील मंत्रांची आज आम्ही आपल्या वाचकांस अर्पण करीत आहों. या माळेंत एकंदर १३८ मंत्र आहेत.

ही माळा तयार करण्याच्या कामीं आम्हांस अनेक विद्वज्जनांचें साह्य झालें यास्तव आम्ही त्या सर्वांचे फार फार आभारी आहों.

या माळेस ग्राहकांकडून आश्रय मिळाल्यास दुसरी आणि तिसरी माळाही योग्य प्रसंगीं ग्राहकांस अर्पिण्याचा आमचा संकल्प आहे तो ईश्वर पूर्ण करो.

'काव्यसंग्रह'कार.

अनुक्रमणिका.

एकंदर ग्रंथसंख्या–१५२९

मोरोपंतकृत

मंत्रभागवत.

मोरोपंतकृत मंत्रभागवत.

उपोद्घात.

(गीतिवृत्त.)

[1]**नं** लिनाक्ष प्रभु [2]लक्ष्मी **न** यनमनोहरपदांबुजध्या **न** । [3]**नं** वघननील [4]चतुर्भुज **न** मिळा जो पुण्यकीर्तिचें स्था **न**. १
[5]**मो** हतमोर्क जगद्गुरु **मो** क्षदपद त्या [6]शिंवीं च नित्य र **मो**, । [7]**मो** दित मन हो, चिंतित [8]**मो** [9]घ नसो, सर्व पाप ताप श **मो**. २
भ व्य हरिहरांचे जे **भ** वभयहर [10]**नां** रदादिगुणलो **भ** । **भ** गवत्तुल्य [11]जगद्धित **भ** क्त नमस्कारिले [12]विमलशो **भ**. ३
ग जमुख विद्यामृतनिधि **ग** णपति; तद्दास [13]तो महाभा **ग** । **ग** तगर्व विघ्न जेणें, **ग** रुडें अत्युग्र ही जसा ना **ग**. ४
[14]**वं** र्ण्यव्रत [15]**वि** धिचे सुत [16]**वं** रशील सदा [17]कुमार [18]शमविभ **व** । **व** त्सल विवेकसागर [19]**वं** शिपति ज्यांची सदुक्ति शमवि [20]भ **व**. ५

---

१. कमलनेत्र. या आरंभींच्या अकरा गीतींत सहा मंत्र साधले आहेत हें चाणाक्ष वाचकांच्या लक्षांत येण्याजोगें आहे. २. लक्ष्मीच्या नेत्रांला आणि मनाला आनंदप्रद आहे ज्याच्या पदांबुजाचें (चरणकमलाचें) ध्यान (चिंतन) असा. ३. नूतन मेघासारखा निळा वर्ण ज्याचा. ४. चार भुजा (बाहु) ज्याला तो. ५. मोह+तमस्+अर्क=अज्ञान+अंधार+सूर्य=अज्ञानरूप अंधकाराचा विध्वंसक सूर्य. ६. शंकराचे ठायीं. ७. आनंदित. ८. इष्ट वस्तु, मनांत धरलेली गोष्ट. ९. व्यर्थ. 'मोघं निरर्थकम्' इत्यमरः; 'मोघो दीने निष्फले च मोघा स्यात्पाटलातरौ' इति हैमः. १०. नारदादि भगवद्भक्तांचे गुणांविषयीं लोभ प्रीति आहे ज्यांस. ११. जगाचे हितकर्ते. १२. निर्मल आहे शोभा ज्यांची ते (भक्त), विमलकांति. १३. गणपतीचा दास भृशुंडी. याची कथा गणेशपुराणादिकांत पहावी. १४. स्तुत्याचार, प्रशंसनीयवृत्ति. १५. ब्रह्मदेवाचे पुत्र. मरीचि, अत्रि, आंगिरस्, पुलस्त्य, पुलह, क्रतु व वसिष्ठ हे ब्रह्मदेवाचे पहिले मानसपुत्र. यांसच 'सप्त ब्रह्माणः' म्हणतात. सनक, सनंदन, सनातन, सनत्कुमार, स्कंद, नारद व रुद्र असे ब्रह्मदेवाचे सात मानसपुत्र दुसऱ्या पर्यायांतील सुप्रसिद्ध आहेत व प्रस्तुत गीतींत पंतांचा याच मंडळीचा निर्देश करण्याचा उद्देश दिसतो. १६. श्रेष्ठस्वभाव. १७. सर्वकाळ तरुण, कधींही वृद्ध जे झाले नाहींत. १८. शम (शांति) आहे विभव (ऐश्वर्य) ज्यांचा ते. १९. योग्यांचे स्वामी. २०. संसार.

ते जस्वी सुरसत्तम ते[1]तीस ख्यात जे भया हरि ते । ते नमिले कर जोडुनि, ते थें येथेंहि बहु दया करि ते. ॥ ६
वा[2]ग्देवीच्या नमितों वा लक मी र[3]म्यपादराजी वा । वा रुनि जडत्व[4] जी दे वा त्सल्यें ज्ञान सादरा जी वा.॥ ७
सु[5] रसिंधु श्रीकाशी सु ज्ञाहि जडाहि सोडितांचि अ[6]सु । सु खदाल्या नमिल्या ज्या सु टका करितीच देति आत्मव[7] सु. ॥ ८
दे व मुकुंदचि तो जरि दे हीं प्रा[8]चेतसादि कवि नां दे । दे श पवित्र करि सदुप दे शें सुयशें प्र[9]मोद कानां दे. ॥ ९
वा ल्मीकि व्यास समचि वा चा ज्यांची स्तवी सदा दे वा । वां[10] क्तनुमनें नमन त्या, वा त्सल्यें हेचि त्या रुचो से वा.॥१०
य श हरिचें ज्यासि रुचे य दुपतिसचि वा[11]हिला जिहीं का[12] य । य द्यपि नि[13]कृष्ट झाल्या य[14] वनहि त्याचेहि वंदितों पा य. ॥११

---

१. देवगण तेहतीस आहेत. ते प्रत्येक हजार युगानंतर उत्पन्न होतात. ८ वसु, ११ रुद्र, १२ आदित्य, १ इंद्र, १ प्रजापति इतके मिळून तेहतीस. यांचीं नांवें निरनिराळ्या सृष्टींच्या वेळीं निरनिराळीं आढळतात. 'सोऽकामयत बहुस्यां प्रजायेय' अशी इच्छा होऊन परमपुरुषानें जी आद्यतम सृष्टि केली त्यावेळीं अष्टवसु म्हणजे १ पृथ्वी, २ अग्नि, ३ वायु, ४ अंतरिक्ष, ५ द्यौ, ६ सूर्य, ७ चंद्र व ८ नक्षत्रें हीं होत; पांच कर्मेंद्रियें, पांच ज्ञानेंद्रियें व एक मन हे ११ आदित्य होत; बारा महिन्यांच्या अधिष्ठात्र्या देवता १२ आदित्य होत; इंद्र म्हणजे पर्जन्य होय व प्रजापति म्हणजे जीव होय. प्रत्येक पर्यायांत या देवगणांचीं नांवें निरनिराळीं आहेत पण संख्येंत मात्र कमी जास्ती कांहीं होत नाहीं
२. बालक. 'बवयोः सावर्ण्यात्' 'वा' हा 'बा' समजावा. ३. रमणीय चरणकमलाला. राजीव=कमल. ४. मूर्खत्व, अज्ञान. ५. देवनदी. ६. प्राण. ७. स्वकीयधन. ८. वाल्मीकादि. ९. आनंद. १०. वाक्+तनु+मनें=वाणी+देह+चित्तें. ११. अर्पिला. १२. देह. १३. नीच. १४. पंतांनीं अनेक यवनभक्तवर्यांस अभिवंदन केलें आहे. या भक्तांचा उल्लेख 'सन्मणिमाले'त आहे.

प्रथम स्कंध.

(गीतिवृत्त.)

न[1] लिनाक्षक्षेत्र [2]श्री**नै**मिष तेथें [3]सदुक्तिपूतातें ।
[4]**शौ**नक [5]परम हित पुसे, सादर बहु गौरवूनि, [6]**सू**तातें. ॥ १
मो ठा सुमुनिप्रेमा म्हणुनि [7]श्री**शु**क गुरूसि [8]तो भावें ।
नमुनि '**श्रीभागवत**' प्रारंभी, ज्यासि विश्व लोभावें. ॥ २
भ गवंताचे वर्णी [9]पुरुषाद्यवतार सार [10]चोवीस, ।
या माळेसि कवि म्हणति, 'मुक्ति न, आम्हांसि तूंचि [11]होवीस.' ॥ ३
ग[12] रुडध्वजांश [13]भगवान् **व्यास द्वा**परयुगांत अवतरला, ।

---

१. नलिनाक्षाचें (कमलाक्ष विष्णूचें) क्षेत्र (स्थान) जें श्रीनैमिषारण्य तेथें. २. नैमिषारण्य हें नांव पडण्याचें कारण असें:—'नैमिशमिति शांतपाठांतरम् । श्रीभागवतात्प्रथमस्कंधे श्रीधरीटीकायां ब्रह्मणा विसृष्टस्य चक्रस्य नेमिः शीर्यते कुंठीभवति यत्र तन्नेमिशम्, नेमिशमेव नैमिशम् । तथा वायवीये 'एतन्मनोमयं चक्रं मया सृष्टं विसृज्यते । यत्रास्य शीर्यते नेमिः स देशस्तपसः श्रुतः ॥ इत्युक्त्वा सूर्यसंकाशं चक्रं दृष्ट्वा मनोमयम् । प्रणिपत्य महादेवं विससर्ज पितामहः ॥ तेऽपि हृष्टतरा विप्राः प्रणम्य जगतां प्रभुम् । प्रययुस्तस्य चक्रस्य यत्र नेमिर्व्यशीर्यत । तद्वनं तेन विख्यातं नैमिशं मुनिपूजितम् ॥' [रघुवंश–स० १९ श्लो० १ हेमाद्रिकृत टीका]. नैमिश=नैमिष. ३. उत्तम भाषणांनीं पवित्र अशा. ४. शुनक मुनीचा पुत्र, भृगुकुलोत्पन्न रुरूचा पौत्र. ५. उत्तम कल्याण. ६. पुराणवक्ता सूतनामा ऋषि. ७. श्रीशुकनामक गुरु (आचार्य) त्याला. व्यासाला घृताचीअप्सरेपासून झालेला पुत्र शुक. हा सूताचा गुरु होय. यानें 'भागवत' परीक्षिति राजाला सांगितलें. ८. तो सूत ऋषि. ९. पुरुषादिक अवतार. १०. या 'चोवीस अवतारांचीं नामें भागवत–स्कंध १ अध्याय २ श्लोक ५-२६ येथें पहा. "चोवीस अवतार भगवंताचे:—नारायण–तपस्यामार्गास्तव. शौनक–ब्रह्मचर्य. नारद–पंचरात्र ग्रंथ. स्वायंभु–युगादि सृष्टि. वराह–हिरण्याक्षवधाकरितां. कपिलमुनि–मातेस सांख्ययोग सांगण्यास. दत्तात्रेय–चोवीस गुरु. ऋषभदेव–परमहंसमार्ग. हंसावतार–ब्रह्महंसउपदेश. हयग्रीव–हयमुख राक्षसास्तव. पृथुराजा–पृथ्वीपालनास्तव. ध्रुव–अचलस्थान. नरसिंह–हिरण्यकश्यपवधाकरितां. मत्स्य–शंखासुरास मारण्याकरितां. कूर्म–मंदराचल धरण्यास. वामन–बळीला छळण्यास. धन्वंतरी–देवांचा वैद्य. मोहिनी–अमृत वांटण्याकरितां; सुंदोपसुंदवधाकरितां. परशुराम–पृथ्वी निःक्षत्री करण्यास. श्रीरामचंद्र–रावणवधाकरितां. श्रीकृष्ण–लीला करण्यास; कंसवधाकरितां. बौद्ध–मौन्यरूप. कलंकी–पुढें यवनांस मारण्यास होईल. व्यास–वेदमर्यादेस्तव." [संख्यावाचककोश–पृ० १२२-१२४.] ११. पाहिजेस. १२. विष्णूचा अंश. १३. 'भगवान्'शब्दाची व्याख्या आढळते तीः—'उत्पत्तिं प्रलयं चैव भूतानामगतिं

य[1]द्ग्रंथसेतुसंश्रित जे[2]न करुनि भ[3]वार्णवासि ल[4]व तरला. ॥ ४
व सतां स[5]रस्वतीच्या तीरीं **व्या**सासि **ना**रदस्वामी ।
भेटे, त्यासि मु[6]नि पुसे, 'सांग मनीं अप्रसन्न कां बा! मी?' ॥ ५
ते प्रार्थना त[7]याची परिसुनि तो मुनि म्हणे, 'तुवां कांहीं ।
प्रा[8]धान्यें श्री**भ**गवन्महिमा अद्यापि वर्णिला नाहीं. ॥ ६
वा खाणावें प्रेमें भ[9]गवद्यश मुनिवरा! तुवां आतां, ।
हृदय प्रसन्न होतें प्रभुचा महिमाचि आदरें गातां. ॥ ७
सु यश न ज[10]यांत **ह**रिचें, चित्रहि गु[11]णभवन कवन तें अशुचीं, ।
त्यांत सुमति नर न रमति पळही, बहु मानिती त[12]या प[13]शु ची. ॥ ८
दे वाचीं ज्यामध्यें नामें सु[14]यशोंकितें प्रतिश्लोकीं ।
अघ नुरवीच अ[15]बद्धहि असतां तो वा[16]ग्विसर्ग या लोकीं. ॥ ९
वा क्यें **भ**गवंताचीं कृ[17]ष्णयशोमृतपरिप्लुतें प्यालों, ।
धा[18]लों, असोनि दा[19]सीसुत मी बा! ब्रह्मपुत्र कीं झालों. ॥ १०
य श तारक हरिचें गा **व्या**सा! येणेंचि शीघ्र निवशील, ।
आहेसचि तूं सर्वश्रुतिशास्त्ररहस्यनिपुण शि[20]वशील. ॥ ११
न यनातें उ[21]न्मीलुनि मु[22]नि जातां, **'भागवत'** शुका **व्या**[23]स ।
विरचुनि पढवी, जैसा आ[24]द्यकवि लवा **कु**शा सु[25]काव्यास. ॥ १२

गतिम् । वेत्ति विद्यामविद्यां च स वाच्यो भगवानिति ॥' (म्हणजे,—सर्व स्थावरजंगमात्मक जगाचा उद्भव आणि नाश हे कसे होतात, जग आलें कोठून, जाणार कोठें, विद्या आणि अविद्या काय आहेत, हें सर्व जो जाणतो त्याला भगवान् म्हणावें.) किंवा सकल ऐश्वर्य, धर्म अथवा वीर्य, कीर्ति, द्रव्य, ज्ञान, वैराग्य हीं सहा भगें ज्यास आहेत तो भगवान्.

१. ज्याच्या ग्रंथरूप सेतूचा आश्रय करणारा. २. संसारसागराला लवाप्रमाणें अल्प करून तरला. ३. संसाररूप सागरास. ४. अणुप्रमाण. ५. सरस्वतीच्या शुद्ध तीरावर व्यास बसले असतां. (अ० ४ श्लो० २७.) ६. व्यास. ७. व्यासाची. ८. मुख्यत्वें. ९. भगवंताचें यश. १०. ज्या कवनांत. ११. गुणांचें घर असें (कवन). १२. हरिगुणविहीन काव्याला. १३. मूर्ख लोक. १४. उत्तम यशानें चिन्हित अशीं, उत्तम यशयुक्त अशीं. १५. शास्त्रनियमांनीं जो बांधलेला नाहीं अशानें देखील. १६. वाणीचा विस्तार. १७. कृष्णकीर्तिरूप अमृतानें आर्द्र. १८. तृप्त झालों. १९. नारद हा पूर्वजन्मीं वेदवेत्त्या मुनीच्या दासीच्या पोटीं उत्पन्न झाला. (अ० ५ श्लो० २३.) २०. मंगलस्वभाव. २१. उघडून. २२. नारदमुनी आपली पूर्वजन्मकथा सविस्तर सांगून जात असतां, नारद व्यासाला उपदेश करून, त्याचा निरोप घेऊन वीणा वाजवीत असतां. २३. व्यास भागवतग्रंथ तयार करून शुकाला पढवितात. (अ० ७ श्लो० ८.) २४. वाल्मीकि. २५. रामायणास.

मो हहि नसतां गावी[1] जीवन्मुक्तींहि संहिता[2] वा! हे, ।
श्रीहरिच्या अत्यद्भुत महिमा ऐसाचि सद्गुणीं आहे. ॥
भ गवद्भक्त शुक कथी ज्यातें प्रायोपविष्ट[3] जो होता ।
त्या जन्म परीक्षिन्नृपरत्नाचें परिस तूंहि सुश्रोता! ॥
गं[4] जपुरपति भीमानें करितां[5] भग्नोरु[6], तत्प्रिया[7] पापी ।
अश्वत्थामा सुप्तद्रुपदसुता[8]पुत्रमस्तकें[9] कापी. ॥
वं[10] त्सांच्या बहु शोकीं कृष्णा बुडतां तिला म्हणे नर[11] तो, ।
'त्या अधम[12]मस्तकीं न्हा, देवि! विलापीं तुझी सुधी न रतो'. ॥
ते जस्वी विजय[11] रथीं चढला रक्षावया प्रतिज्ञा[13] ते, ।
तो हांकी हय म्हणती अजित जयाश्रय[14] जयाप्रति ज्ञाते. ॥
वा जिखुरचक्रनादें समजुनि पाहोनि पार्थरथ दूर ।
द्रौणि रथीं चढुनि पळे, रुद्रभयें करुनियां जसा सूर[15]. ॥
सु[16] प्तशिशुघ्न द्रौणि स्वतुरग थकतांचि न दिसतां त्राता[17] ।
उपसंहार[18] नये तरि योजी ब्रह्मास्त्र[19] शत्रुच्या घाता. ॥

---

१. पढावी. २. भागवती संहिता. (भागवत ग्रंथ.) ३. सर्व संग टाकून विष
पासून इंद्रियें आवरून मरणार्थ वसला तो. ४. दुर्योधन. ५. भीमसेनानें दुर्योधन
गदाघातानें भग्नोरु केलें असतां. (अ० ७ श्लो० १३.) ६. मोडल्या मांड्या ज्याच्या अ
(दुर्योधन.) ७. त्या दुर्योधनाचें प्रिय (हित) करण्यासाठीं. ८. निजलेले जे द्रौपदीचे
त्यांचीं मस्तकें. ९. मुलांच्या. यांचीं नावें:–'प्रतिविंध्यः सुतसोमः श्रुतकीर्तिस्तथाप
नाकुलिस्तु शतानीकः श्रुतसेनश्च वीर्यवान् ॥' [आदिपर्व–अ० ६७ श्लो० २८.] १०. द्रौप
११. अर्जुन. १२. त्या अधम (नीच) अशा अश्वत्थाम्याच्या मस्तकावर बसून तूं पु
मरणनिमित्त स्नान कर. [अश्वत्थाम्याचें मस्तक तोडून येथें घेऊन येतों व त्याजवर तु
बसवून मी स्नान घालतों. अ० ७ श्लो० १६.] १३. कुमारघ्न अश्वत्थाम्याचा शिरच्छेद क
ण्याची प्रतिज्ञा. १४. अर्जुनाश्रय. (अर्जुनसारथी.) १५. सूर्य. ['सूरसूर्यार्यमादित्यद्वादशा
दिवाकराः' इत्यमरः.] रुद्रभयानें (शंकरभयानें) पूर्वीं एकदां सूर्य पळाला होता–अशी क
वामनपुराणांत आहे. शंकराची आराधना करून विद्युन्माली नामक एका राक्षसानें त्या
पासून सौवर्णविमान संपादिलें. या विमानांत बसून तो सूर्याच्या पाठीमागून जात अ
हें सूर्याला कळलें तेव्हां सूर्यानें तें विमान प्रखराग्नीनें वितळवून खालीं पाडलें. आपल
भक्ताचा अपमान सूर्यानें केला म्हणून शंकराला राग आला व तो डोळे लाल करून
र्याच्या पाठीस लागला. त्याच्या भयानें सूर्य पळाला तो श्रीवाराणसीक्षेत्रांत पड
१६. सुप्त+शिशुघ्न=निजलेल्या+मुलांचा घात करणारा. १७. रक्षण करणारा. १८. आ
पणें, प्रत्याहार. १९. पांडवांवर ब्रह्मास्त्र सोडिलें.

[1]**दे** वाज्ञेनें **पार्थ** [2]ब्राह्म ब्रह्मास्त्रवारणा योजी, ।
[3]अस्त्रद्वयतेजोर्दित जन म्हणति, 'न भस्म विश्व हें हो! जी!'॥ २०

वा रुनि अस्त्रयुगातें त्या [4]बाळघ्नासि **पार्थ** तो बांधी ।
प्रभु '[5]मारावाचि' म्हणे, परि धर्म त्यजिल [6]साधुची कां [7]धी? ॥ २१

य द्यपि बंधादि उचित **कृष्णे**ला [8]दैन्य तें पहावेना, ।
'सोडा' म्हणे '[9]गुरुसमचि गुरुसुत, अपमान मज सहावेना.' ॥ २२

'**न** च रक्षावा अधम क्षणहि' असें **भीम**ही [10]म्हणे कोपें, ।
[11]मणि हरुनि तया सोडी [12]**विजय**, नव्हे कर्म तें परा [13]सोपें. ॥ २३

मो हें मृतांसि देउनि [14]जळ, **धृत**राष्ट्रादि मग्न जे शोकीं ।
त्यांचें **युधिष्ठिर** प्रभु करि सांत्वन उचित जें जसें लोकीं. ॥ २४

भ रतकुलप्रवरश्रीधर्मातें **कृष्ण** मग पदीं बसवी, ।
करवी [15]हयमेधत्रय भक्तांचें यश जगत्रयीं वसवी. ॥ २५

ग मन [16]स्वपुरा करितां **हरि**स म्हणे [17]उत्तरा, 'प्रभो! पावें, ।
हा [18]तप्तलोहशर मजवरि येतो अभयदान ओपावें. ॥ २६

व नवन्हि वनासि जसा कीं म्हणतो मृगकुळासि [19]हरि खावें ।
एणें तसें मलाचि न मद्गर्भातें गिळोनि [20]हरिखावें.' ॥ २७

ते जें [21]मयूखसे [22]शर तों पांचां **पां**डवांवरिहि पांच ।
आले [23]व्यालेश्वरसे जे नच म्हणतिल नतासही वांच!' ॥ २८

---

१. श्रीकृष्णाच्या आज्ञेनें. २. अ० ७ श्लो० २९ पहा. ३. दोन ब्रह्मास्त्रांच्या उग्र तेजानें पीडित. ४. अ० ७ श्लो० ३३ पहा. ५. कृष्ण अश्वत्थाम्याचा वध करावा असें अर्जुनाला सांगे. (अ० ७ श्लो० ३५-३९.) ६. धर्मवेत्त्या अर्जुनाची. ७. बुद्धि. ८. यज्ञपशूप्रमाणें दोरीनें बांधून आणलेल्या द्रौणीचें दैन्य. अ० ७ श्लो० ४३ पहा. ९. द्रोणासमान. १०. अध्याय ७ श्लो० ५१ पहा. ११. श्रीकृष्ण, भीम यांचें म्हणणें असें पडलें कीं अश्वत्थाम्याचा वध करावा. वध करावा तर द्रौपदीला वाईट वाटणार, असें हें एक अर्जुनापुढें कोडेंच होतें. तेव्हां त्यानें अश्वत्थाम्याच्या मस्तकांतील मणि काढून त्याला सोडून दिलें. १२. अर्जुन. १३. असें काम करणें हें खरोखर सुलभ नाहीं. या करण्यापासून अर्जुनानें भीम, द्रौपदी व कृष्ण ह्या सर्वांचें प्रिय संपादिलें. १४. जलांजलि, मृतांला उदक दिलें. १५. तीन अश्वमेध. १६. द्वारकेला. १७. अभिमन्युस्त्री, परीक्षित राजाची माता. १८. तापलेल्या लोखंडाचा बाण (द्रौणिप्रेषित शर). [अ० ८ श्लो० १०.] १९. सिंह. २०. संतोषित व्हावें. २१. किरणासारिखे. २२. द्रौणिशर पांडवांवर आले. २३. सर्पश्रेष्ठसे.

वा री **सु**दर्शनेंचि **द्रौ**[1]णिब्रह्मास्त्र समजुनि क्षिप्र ।
पोटीं गर्भहि रक्षी, तो काय प्रभुपुढें बळी विप्र? ॥ २९

सु[2] तसुरतरुतें वर्णी[3], हर्षविली[4], वधुनि पातकी, आल्या[5] ।
दीना धन्या झाली, नच ऐसी करुनि चातकी आ[6] त्या[7]. ॥ ३०

दे[8] आज्ञा न **यु**धिष्ठिर, होउनि सिद्धहि पुन्हा अजित[9] राहे, ।
प्रभुरीति[10] मनीं आणुनि जाणुनि अत्युत्तमा अजि! तरा हे. ॥ ३१

वा ढे युद्धहताप्तज्ञातिसुहृत्स्वजनशोक[11] **ध**र्माचा; ।
कृष्णादिगुरुवचोमृतवर्षेंहि[12] शमे न ताप कर्माचा. ॥ ३२

य श द्यावें **भी**ष्मातें हा सदभिप्राय देवदेवाचा[13]; ।
व्यासादिमुनींद्रांची नच **ध**र्मा बोधलेश[14] दे वाचा. ॥ ३३

न[15] रपति सानुज साच्युत[16] जाय[17] पुसायासि धर्म आज्यातें[18], ।
धर्मज्ञानार्थ करी पहिला तांबूलकाम[19] आ ज्यातें[20]. ॥ ३४

मो ठे मोठे ज्ञाते[21] त्या पुण्यश्लोकपंक्तिला[22] जडले, ।
भीष्मोक्ताखिलधर्मश्रवणें[23] सर्वांसि सांग[24] सव[25] वडले. ॥ ३५

---

१. द्रौणि. २. पुत्र जे पांडव त्यांचा कल्पवृक्ष जो कृष्ण त्यातें. ३. आल्या वर्णी-असा अन्वय. ४. पातकी द्रौणीला मारून हर्षविलेली आल्या. ५. कुंती. ६. तोंड वासून. ७. मेघास. ८. द्वारकेला जाण्याची आज्ञा कृष्णाला धर्मानें दिली नाहीं म्हणून कृष्ण गेला नाहीं. धर्मानें त्याला प्रेमभावानें राहवून घेतलें. (अ० ८ श्लो० ४५.) ९. कृष्ण १०. कृष्णाची रीति. ११. युद्ध+हत+आप्त+ज्ञाति+सुहृद्+स्वजन+शोक=लढाई+मारलेले+स्वकीयजन+कुलबांधव+मित्र+संबंधीजन+विलाप. १२. कृष्णप्रभृति गुरुजनांच्या वचन-सुधेच्या वृष्टीनें. १३. कृष्णाचा. सध्या भीष्म शरपंजरीं पडले असून त्यांचें निर्याण उत्तरायणीं होणार, तेव्हां सर्वांनीं निर्याणोत्सवासाठीं कुरुक्षेत्रीं जमावें व तेथें भीष्माकडून धर्माला उपदेश करवून त्याचा गोत्रजवधनिमित्त शोक दूर करावा असा कृष्णाचा चांगला उद्देश (सदभिप्राय) होता. १४. व्यासप्रभृति मुनींनीं धर्माला उपदेश केला पण त्यांची वाणी धर्मराजाला अल्प बोध करण्यासही समर्थ नव्हती, त्यांचा बोध धर्मराजाचे मनांत ठसला नाहीं. (अ० ८ श्लो० ४६-४७.) १५. धर्मराज. १६. अच्युतासहित. (अच्युत=कृष्ण). १७. कुरुक्षेत्रांत जेथें भीष्म शरपंजरीं पडले होते तेथें धर्मराज सर्व धर्म समजून घेण्यासाठीं गेला. १८. भीष्मातें. १९. तांबूल आहे काम (इच्छा) ज्याचा असा आ; सुपारी खाणें, विडा खाणें ही इच्छा आहे ज्याची असा आ. २०. आजातें. २१. व्यास, धौम्य, भरद्वाज, वसिष्ठ, अत्रि, गृत्समद, असित इत्यादि मुनि. २२. पुण्यश्लोक=पवित्रकीर्ति धर्मराज. २३. भीष्मानें सांगितलेल्या सर्व धर्मांच्या श्रवणानें. २४. सर्वप्रकारें परिपूर्ण. २५. यज्ञ.

भ गवंतातें **गं**गापुत्र प्रेमें स्तवूनि, देहातें ।
योगें सोडी, त्यातें तें [1]साक्षाद्ब्रह्म तोय दे हातें. ॥ ३६

गे[2] जसाव्हयीं पदीं त्या[3] स्थापी[4] **धृ**तराष्ट्र, **के**शवाज्ञा ते, ।
म्हणति, 'न निज[5]प्रजांचा करि डोळा वक्र केश वा[6]' ज्ञाते. ॥ ३७

वँ[7] त्सलवर विभु गेला नि[8]र्जनगरीप्रति पु[9]सोनि **ध**र्मातें; ।
जेंवि उदयगिरिपासुनि विधुं[10] द्याया कुमुदिनीस[11] शर्मातें[12]. ॥ ३८

ते मार्गींचे [13]जनपदजन [14]पदपद्में नमूनि देवाचीं, ।
तरले, 'यशें जयाचीं' गुरु म्हणती, 'ऐक चित्त दे वाचीं[15].' ॥ ३९

वा ढे गर्भ यथास्थित त्यातें प्रभु **उ**त्तरोदरीं रक्षी, ।
तो[16] अस्त्रतेज[17]मथित्या [18]अंगुष्ठसमा गदाधरा लक्षी. ॥ ४०

सु रुचिरतनु जगदीश्वर अस्त्राचें सर्व तेज शमवून, ।
दशमीं मासीं[19] झाला गुप्त प्रभु गर्भदृष्टि रमवून. ॥ ४१

दे[20] दीप्यमानतनु मग शुभसमयीं जन्मला कु[21]मारमणी; ।
वदली असेल, 'दुसरा गु[22]हचि' असें **शं**भुची **उ**मा रमणी. ॥ ४२

---

१. कृष्ण. २. गजपुरीं, हस्तिनापुरीं. यालाच 'हस्तिनापुर' 'नागपुर' अशीं अन्य नांवें आहेत. हें शहर पुरुकुलोत्पन्न हस्तिराजा यानें वसविलें म्हणून यास 'हस्तिनापुर' असें नांव पडलें. दुसरें असेंही आढळतें कीं अत्रिपुत्र सोम हा अरण्यांत फिरत असतां, एका हत्तीला एका विहंगमानें उचलून नेलें असें त्यानें पाहिलें; तेव्हां त्या जागयावर त्यानें एक शहर वसवून त्याला या चमत्कारस्मरणार्थ 'हस्तिनापुर' असें नांव दिलें. हें शहर विद्यमान मिरत शहराच्या पूर्वेस गंगाकांठीं असावें असें विद्वानांचें अनुमान आहे. ३. धर्मास. ४. अध्याय ९ श्लो० ४९ पहा. ५. आपला डोळा प्रजांचा केश वांकडा न करी. ६. अथवा. ७. अतिशय दयाळू, दयाळुश्रेष्ठ. ८. अध्याय १० श्लो० ८ पहा. ९. धर्माचा निरोप घेऊन. १०. चंद्र. ११. कमलिनीस. १२. सुखातें. १३. जनपदांतील (देशांतील) जन (लोक) कुरु, जांगल, पांचाल, शूरसेन, यामुन, कुरुक्षेत्र, सारस्वत इत्यादि देशांतील लोक. (अ० १० श्लो० ३५.) १४. चरणकमलें. १५. गुरु म्हणती:– ज्याचीं यशें ऐक, चित्त दे आणि वाचीं. १६. गर्भ. १७. 'तेजस्'शब्द विशेष प्रचारांत आहे. तथापि 'तेज' असा अकारांत पुल्लिंगी शब्दही आढळतो. त्याचाच प्रस्तुत स्थलीं प्रयोग केलेला आहे. नाहीं तर 'तेजो मथित्या' असा शब्द लिहावा लागता. १८. अश्वत्थाम्याच्या ब्रह्मास्त्रतेजाचें मथन करणाऱ्या अंगुष्ठाएवढ्या मोठ्या गदाधारी पुरुषाला पाही. (अ० १२ श्लो० ८-९.) १९. दहा महिन्यांचा गर्भ झाला तेव्हां गदाधारी अंगुष्ठसम श्रीकृष्ण गुप्त झाला. २०. प्रकाशमान देह. २१. सुतरत्न. २२. कार्तिकस्वामी.

वा द्यें वाजविलीं बहु हर्षें [1]तज्जातकर्म **ध**र्म करी, ।
[2]पौत्रें पावे तैसा जैसा **गं**गाऱ्हदें [3]सुशर्म [4]करी. ॥ ४३
[5]**य** क्षाधिपसा तर्पी नृप [6]भूदेवांसि उचितदानाहीं, ।
[7]अर्थी म्हणती, 'उरली स्वल्पाहि मनांत रुचि' तदा 'नाहीं'. ॥ ४४
न रपतितें तुष्ट [8]द्विज म्हणति, 'नृपा! **वि**ष्णुनें दिला बाळ, ।
हा [9]**वि**ष्णुरातनामा होइल विख्यात [10]सुप्रजापाळ.' ॥ ४५
[11]**मो** दित [12]जातककोविद विप्र कथिति, 'तूं तसाचि हा राया! ।
कंठीं मिरविल राज्यश्री वसुधा सगुणरत्नहारा या. ॥ ४६
भ य न धरिल मरणाचें परिसुनि [13]मुनिपुत्रदत्त[14]शापातें, ।
श्री[15]**शु**ककथितहरियशःश्रवणें पावेल [16]सुपद बापा! तें. ॥ ४७
ग र्भीं जो तो हा कीं अन्य असे पारखी जनीं पाहे, ।
यास्तव तया '[17]परीक्षित्' [18]संज्ञा बा **शौ**नका! मुने! आहे. ॥ ४८
[19]**व** सु जें [20]**म**रुत्तयज्ञीं त्यजिलें होतें असंख्य खाणविलें ।

---

१. धौम्य कृपाचार्य इत्यादि महान् ब्राह्मण बोलावून त्याचें जातक धर्मानें करविलें. [अ० १२ श्लो० १३.] २. पौत्र=नातू. (पुत्रस्य अपत्यं पुमान् पौत्रः.) ३. उत्तम सुख. शर्मन्=सुख (शृणात्यशुभम् शर्मन्.) 'स्यादानन्दथुरानन्दशर्मशातसुखानि च' इत्यमरः. ४. गज गंभीर डोहांत जाऊन जलक्रीडासक्त असतात, अशी हत्तींची प्रसिद्धि आहे. ५. कुबेरासारखा. ६. विप्रांला. ७. तदा (त्या काळीं) अर्थी (याचक विप्र) म्हणतीः— [धनदानें घेऊन तृप्त होऊन याचक म्हणाले] मनांत (आपल्या अंतःकरणांत) स्वल्पाहि रुचि (धन संपादन करण्याची आणखी थोडी देखील इच्छा) उरली नाहीं. असेंच वर्णन पंतांनीं अश्वमेधपर्वांत केलें आहे. पंतकृत अश्वमेधपर्व–अ० ६ गी० ७३-७६ पहा. ८. ब्राह्मण. ९. विष्णुरात आहे नाम ज्याचें असा. [विष्णुना रातः दत्तः विष्णुरातः। अस्त्रानें दग्ध होत होता, परंतु श्रीकृष्णानें कृपा करून रक्षण करून पांडवांला दिला म्हणून 'विष्णुरात' हें नाम अन्वर्थक होय.] १०. उत्तम प्रजापाळक. ११. आनंदित. १२. जातक जाणणारे, ज्ञानी, जातकर्मकुशल. १३. शमीक ऋषीचा पुत्र जो शृंगी त्यानें दिलेल्या शापातें. १४. तक्षक आपल्याला चावेल व त्यापासून मृत्यु प्राप्त होईल अशा शापातें. १५. श्रीशुकाचार्यांनीं सांगितलेल्या कृष्णकीर्तिश्रवणानें. १६. मोक्षपद. १७. परि (सभोंवतीं) ईक्षते (पाहतो) तो परीक्षित्. पूर्वीं माता उत्तरेच्या गर्भांत असतां जी कृष्णमूर्ति पाहिली होती ती ह्याच्या मनांत नेहमीं घोळत असे, तेव्हां कोणी पुरुष भेटला असतां तो 'गर्भांत दिसलेला पुरुष तर नसेलना' असा विचार मनांत येऊन त्याजकडे निरखून पाही म्हणून त्याला 'परीक्षित्' असें नांव पडलें. [अ० १२ श्लो० ३०.] १८. नाम. १९. द्रव्य. २०. मरुत्त राजाच्या यज्ञांत. मरुत्त हा दिष्टकुलोत्पन्न राजा होय. यानें अनेक मोठमोठे यज्ञ केले. याच्या यज्ञांत याला देवाचें साहाय्य होतें.

कृष्णाज्ञेनें [1]भ्राते प्रेषुनि तें हयमखार्थ [2]आणविलें. ॥ ४९
ते णें हयमेधत्रय धर्में संपादिलें यथाविधि, तें ।
प्रेमें समर्पिलें मग [3]जगपाळितया तया दयानिधितें. ॥ ५०
[4]बा सवितें त्यावरि तो देव द्वारावतीस ने संगें, ।
अंगें स्वसख्याचीं कीं निववाया आपुलीं [5]परिष्वंगें. ॥ ५१
सु कवि विदुर [6]मैत्रेयीपासुनि जाणोनि आत्मगति हरिला ।
कृतकृत्य तीर्थयात्रेमध्यें झाला, सुतृप्तिनें वरिला. ॥ ५२
दे दर्शन [7]धृतराष्ट्रप्रमुखाप्तांतें द्रवोनि तो [8]सुकवी, ।
घन जेंवि चातकांचीं, आप्तांचीं नच मुखें [9]भेला [10]सुकवी. ॥ ५३
वा त्सल्य बहु तयाचें वर्णुनि जोडूनि धर्म हातातें ।
बोले, 'निववावा निजकुशलें देऊनि शर्म [11]हीं तातें. ॥ ५४
य दुपतिचें मग, आधीं बा! स्वकुशलवृत्त आयकीव, अगा! ।
साधुसि तसी सुरांच्या साधो! येईल काय [12]कींव [13]अगा?' ॥ ५५
न रपाळाला पुसिलें, तीर्थादि समस्त वृत्त आयकवी, ।
[14]भगवन्निर्याणकथा तो सांगेल स्वयेंचि काय [15]कवी? ॥ ५६
[16]मो हाचा केवळ जो [17]आवास तया नृपा [18]स्वभावास, ।
'बाबा! सत्वर साधा हित', विदुर म्हणे [19]असत्स्वभावास. ॥ ५७
'भ क्षिसि भीमें दिधल्या [20]पिंडांतें, [21]वृत्ति हे [22]कुतरियाची, ।

---

१. चौघां भावांला. २. धर्मानें आणविलें. ३. जगाचें पालनकर्त्या त्या करुणाकरा (कृष्णातें). ४. अर्जुनातें. (अ० १२ श्लो० ३६.) ५. आलिंगनें. ६. विदुर तीर्थयात्रेला गेला असतां त्याची व मैत्रेय मुनीची गांठ पडली, तेव्हां 'आत्मज्ञानाची गति हरि होय' असें त्याला मैत्रेयानें सांगितलें. [अ० १३.] नंतर तो परत हस्तिनापुरास आला. ७. धृतराष्ट्र, युयुत्सु, कृप, कुंती, गांधारी, द्रौपदी, सुभद्रा, उत्तरा इत्यादि आप्तजनांला. ८. विदुर. ९. साधु पुरुष. हा पाद सुभाषितरूप आहे. १०. शुष्क करी. ११. हा धर्मराज तातें (त्वां विदुरें) निववावा—असा अन्वय. १२. दया. १३. कल्पवृक्षास. येथें 'प्रश्नालंकारा'चा आश्रय करून पंतांनीं साधुजनांची योग्यता कल्पवृक्षापेक्षांही श्रेष्ठ आहे असें दर्शविलें आहे. साधूला जशी दया येते तशी सुरांच्या (देवांच्या) अगा (वृक्षा, कल्पवृक्षाला) कींव (दया) येईल काय? अर्थात् येणार नाहीं—असें उत्तर. १४. भगवंताच्या देहत्यागाची कथा. १५. विदुर. [विदुरानें यदुकुलाचा क्षय झाला ही गोष्ट धर्माला कळविली नाहीं. अ० १३ श्लो० १२.] १६. अज्ञानाचा. १७. स्थान. १८. धृतराष्ट्रास. १९. असत्+स्वभावास=दुष्ट+वर्तन, वृत्ति=दुष्ट आहे वर्तणूक ज्याची अशा. २०. अन्नाचे गोळयातें. २१. असेंच वर्णन मूळांत आहे. [अ० १३ श्लो० २२.] २२. श्वानाची.

कीं तूं तो, जो [1]आतर, बहु [2]मानुनि आपुली [3]कुतरि, [4]याची, ॥ ५८
ग[5] र गोड [6]गमे तुज, जें पीयूषचि [7]भैक्ष्य तें [8]सपक, राया ! ।
सत्वर **हि**[9]मालयाप्रति चाल कसा शेवटीं तप कराया.' ॥ ५९

व चनें सत्यें स्वहितें **वि**दुराचीं समजला मनीं [10]अंध, ।
न पुसे निघेचि तोडुनि परमदृढस्नेहरूप तो बंध. ॥ ६०
ते [11]**गां**धारीहि निघे, त्यां दोघां **वि**दुर होय हो [12]यष्टी, ।
[13]आपण होय पथीं बहु, [14]त्यांतें होऊं नदेचि तो कष्टी. ॥ ६१
[15]**बा** पातें मातेतें [16]नृप आला जों सकाळ [17]वंदाया, ।
'न दिसे [18]गुरुत्रय' म्हणे 'हा ! हा ! गेले त्यजूनि मंदा [19]यां.' ॥ ६२
सु कलें मुख **ध**र्माचें म्हणतां शोकेंकरूनि 'हा! हा!' तें, ।
ताडी कपाळ [20]पाळ क्षिति[21]चा खेदा धरूनि हा हातें. ॥ ६३
[22]**दे** वर्षि ये [23]भवाची करिता निःशेष जो [24]हंति, मि[25]रासी ।
[26]ब्रह्मलोकींचा, **ध**र्माच्या [27]नाशी तत्काळ [28]मोहतिमिरासी. ॥ ६४

१. नौकेवरून उतरण्याचें मोल. या भाड्याला 'नोर' किंवा 'नोल' असें खलासी लोक म्हणतात. २. जो आपली कुतरि (फुटकी नौका) बहु मानुनि (उत्तम समजून) आतर (उताराचा पैसा) याची (मागूं लागतो, मागतो) तो कीं तूं (तसा तूं आहेस कीं काय?). ज्या पांडवांसीं दुष्ट वर्तन केलेंस त्यांचें अन्नभक्षण करण्यास तुला शरम कशी वाटत नाहीं?–असें म्हणण्याचें तात्पर्य. ३. कुनौका. ४. याचना करी. ५. विष. ६. राया! (धृतराष्ट्रा!) तुज जें गर (विष) [आहे तें] गोड गमे (गोड वाटतें) [जें] भैक्ष्य पीयूष तेंचि सपक गमे (भक्षण करण्यास योग्य असें जें अमृत तें स्वादहीन वाटतें) भिक्षान्न अमृततुल्य गोड वाटावें आणि शत्रूंनीं चारिलेलें उत्तम अन्न विषाप्रमाणें कडू वाटावें, परंतु तुला तें तसें वाटत नाहीं, असा अधिक्षेप करून धृतराष्ट्रानें तपश्चर्येसाठीं निघून जावें असें सूचविलें आहे. ७. भक्षण करण्यास योग्य असें. ८. रसहीन, स्वादहीन. ९. उदीची दिशेला जा असें मूळांत आहे. १०. धृतराष्ट्र. ११. पतिव्रता सुबलपुत्री. १२. काठी. १३. विदुर स्वतः मार्गांत कष्टी होई (कष्ट सोशी). १४. त्या धृतराष्ट्रगांधारीतें. १५. बापातें. १६. धर्मराज. १७. प्रातःकाळीं सूर्योपासना, नित्य होम, विप्रपूजन इत्यादि कर्में करून धर्म गुरुत्रयाला नमस्कार करण्यासाठीं आला. १८. धृतराष्ट्र, विदुर, गांधारी. १९. मला धर्माला. २०. संरक्षणकर्ता. २१. पृथ्वीचा. २२. देव+ऋषि=सुर+मुनि=नारद. २३. संसाराची. २४. नाश. २५. वतनदार. [मीरास=वतन; हा फारशी शब्द आहे.] २६. ब्रह्मलोकींचा मिराशी. (वतनदार नारद.) २७. उपदेशानें अज्ञान नाशी. २८. भ्रमरूप अंधकारास.

‘[1]**वा** र्धक्यांत तप उचित, **गं**गातीरीं **हि**माचळीं गेला, ।
[2]जाड्यनगाच्या [3]भिदुरें **वि**दुरें बोधुनि [4]सदार [5]तो नेला. ॥ ६५
य मनियमसुतप्तें परि झालींच समाधिनें तिथें [6]हिंवसी, ।
योगेंचि आजिपासुनि सोडिल नृप देह पांचवे दिवसीं. ॥ ६६
[8]**न** रपतिच्या त्या उटजासह सहसा [9]सुरनदीतटीं प्रेता ।
भस्म करिल [10]बा! पाहुनि [11]योगीं [12]योगोद्भुताग्निसीं [13]त्रेतां. ॥ ६७
[14]**भो** ळी तसि **गां**धारी त्या अग्नींत [15]स्वमूर्ति टाकिल ते, ।
साध्वीची [16]सहयात्रा म्हणती, देसील काय [17]नाकिलते! ॥ ६८
भ स्म [18]सुरनदींत **वि**दुर टाकुनि, पुत्रत्व करुनि, कामगती ।
तीर्थें [19]सेवित जाइल, त्यास न सद्गति मिळेल कां मग [20]ती?’ ॥ ६९
ग ति त्या **धृ**तराष्ट्राची सांगुनि बोधूनि **ध**र्मचित्तातें, ।
गेला देवर्षि प्रभु साधूंच्या गात गात [21]वित्तातें. ॥ ७०
व रिले [22]वडिलांहीं कीं सद्योगें सत्तपें बरे लोक, ।
हर्षे सुखाश्रु वर्षे तो साधु **यु**धिष्ठिर त्यजी शोक. ॥ ७१
ते थुनि कितिकां दिवसीं गेला होता [23]कुशस्थळीला जो ।
अर्जुन तद्विरहाला हाला [24]गरें म्हणविता बळी लाजो. ॥ ७२

---

१. वृद्धत्वांत. २. जडत्वरूप पर्वताच्या. ३. वज्रें. [‘स्यात् कुलिशं भिदुरं पविः’ इत्यमरः.] ४. बायकोसह. ५. तो धृतराष्ट्र. ६. थंड. ७. अ० १३ श्लो० ५६ पहा. ८. धृतराष्ट्राच्या प्रेताला. ९. गंगातीरीं. १०. बा! (हे धर्मा!) त्रेता (अग्नित्रय) योगोद्भुताग्निसीं (योगसाधनानें उत्पन्न झालेल्या अलौकिक अग्निशीं) योग पावुनि (संयोग पावून, संयुक्त होऊन) त्या उटजासह (त्या धृतराष्ट्राच्या आश्रमासह) सहसा (त्वरित) नरपतिच्या प्रेता (धृतराष्ट्राच्या शवाला) भस्म करिल. ११. अष्टांगयोगा. १२. योग+उद्भुत+अग्नि. ‘योगोद्भुताग्नि’ असा पाठ असावा, असें समजून पाठांतर केलें आहे. ‘अद्भुत’ शब्दाचा अर्थ नीट व शुद्ध होत नाहीं. योगामुळें उद्भुत (निघालेला, हालवून काढलेला) अग्नि असा अर्थ आहे. छापील प्रतींत ‘योगाद्भुताग्नि’ असा पाठ आहे. १३. अग्नित्रय. (दक्षिणाग्नि, गार्हपत्य, आहवनीय.) १४. लांकडांची जुडी. १५. आपला देह. (अ० १३ श्लो० ५७.) १६. सहगमन. १७. हे कल्पवल्ली! १८. विदुर सुरनदींत (गंगेंत) भस्म टाकुनि (राख टाकुनि) [व] पुत्रत्व करुनि (मुलाचीं=पुत्राचीं जीं कामें=और्ध्वदेहिकादि क्रिया त्या करून) कामगती [असल्यामुळें] (वाटेल तिकडे जाण्यास मोकळा असल्यामुळें) तीर्थें सेवित जाईल. त्यास ती सद्गति न मिळेल कां? अर्थात् त्याला सद्गति मिळेल. १९. तीर्थयात्रा करण्यासाठीं निघून जाईल. २०. सद्गति. २१. द्रव्यातें (कृष्णातें). नारद कृष्णगुण गात तुंबरुसहित स्वर्गास गेला. २२. धृतराष्ट्र गांधारी यांनीं. २३. द्वारकेस. २४. विष.

वा र्ता नकळे कांहीं, दुष्ट [1]व्यवहार आयके पाहे, ।
वा! हे विपरीता क्षिति [2]असतीसी नवनवा गुणा [3]वाहे. ॥ ७३
सु ख न दिसे कोठेंही झाला उद्विग्नचित्त तो [4]राजा, ।
भीमा [5]उत्पात कथी जे [6]स्वास्थ्या म्हणति, 'दूर पोरा! जा.' ॥ ७४
दे वाकडून [7]अर्जुन चिंता करितां युधिष्ठिरें आला. ।
आलापसे विलापहि शिकला विधिगुरुबळें, करुनि [8]आला. ॥ ७५
[9]धा सवितें **धर्म** पुसे, 'पहिलेंसें न [10]भवदास्य वत्सा! हें, ।
वद कारण, तेजस्वी तूं दैन्या न [11]भवदास्यवत् साहें. ॥ ७६
य ज्ञाचें साहित्य न घडलें कीं मळविलें परिभवानें? ।
तूं स्वसम समर्थ असें करुनि [12]समर कळविलें परि [13]भवानें. ॥ ७७
[14]न ष्टश्री [15]नरें नयनें पुसि, आटोपूनि [16]गंहिवरा, हातें, ।
ज्यातें विनवि तसी [17]स्वस्थिति व्हाया, जेंवि महि वराहातें. ॥ ७८
'**मो** घ अरि करि, अमोघ स्वाश्रित हे दीन, घात कैं वारी? ।
गेला' म्हणे 'त्यजुनि तो, जो [18]करुणासिंधु [19]तात कैवारी. ॥ ७९
भ ग्न पथीं [20]गोपांहीं केलों मी [21]तत्परिग्रहत्राणीं, ।

---

१. सर्व व्यवहार कपटी झाला, मित्रत्व कपटानें मिश्रित झालें, आई बाप, स्नेही, भाऊ, नवराबायको यांजमध्यें कलहाग्नि माजला–असा दुष्ट व्यवहार धर्मानें पाहिला. २. जारिणीसारिखी. ३. धारण करी. ४. धर्मराजा. ५. विद्युत्पात, भूकंप, ऊर्वक्षिबाहुस्फुरण, हृदयवेपथु, शिवारुत, सारमेयाराव, अश्वरोदन, उलूककुव्हान, इत्यादि अनेक उत्पात. ६. स्वस्थतेला. ७. द्वारकेहून आला. ८. मुख पसरून (आ करून.) ९. अर्जुनातें. १०. भवत्+आस्य=तुझें+मुख. ११. संसाराच्या दास्याप्रमाणें. चवथा चरण—भव-दास्यवत् दैन्या न साहें=संसाराच्या गुलामगिरीप्रमाणें तूं दैन्या=दीनपणा, सहन करूं नको. म्हणजे संसाराची बेडी, गुलामगिरी जशी मनुष्यानें पतकरूं नये, अंगावर घेऊं नये, त्याच प्रमाणें तूं (अर्जुन) (त्वां अर्जुनानें) हा रडकेपणा धरूं नये. १२. युद्ध, किरातार्जुनीययुद्ध. (मोरोपंत–वनपर्व–अध्याय ३ पृ० २७-३८.) १३. शिवानें. १४. गतलक्ष्मीक. १५. अर्जुन. (कृष्णाच्या विरहाग्नीनें अर्जुनाचें मुखकमल व हृदयांबुज हीं सुकून गेलीं होतीं.) १६. कृष्णविरहजन्य शोका. १७. आपुलें स्थैर्य. १८. अर्जुन म्हणे, 'जो करुणासिंधु, (जो) तात, (जो) कैवारी, (जो) अरि (शत्रु, दुर्योधनादि) मोघ (व्यर्थ, निष्फळ) करि, (जो) स्वाश्रित हे दीन (आम्ही पांडव त्याचे आश्रित जे दुबळे त्यांस, अमोघ (सफळ) करि, तो (कृष्ण) गेला! (निजधामास गेला). [हा] घात कैं (केव्हां, कसा) [कोण] वारी? (=निवारण करी?) कोणाचेंही सामर्थ्य हा घात करण्याचें नाहीं–हा इत्यर्थ. १९. कृष्ण. २०. गवळयांनीं. २१. त्या भगवंताच्या स्त्रियांच्या रक्षणीं.

कळलें [1]भगवदनुग्रह जों पात्र [2]जेया सुखाहि तों प्राणी'. ॥ ८०
ग डबडलाचि [3]तेमें परि नाशी हृदयीं स्मरोनि **गी**[4]ता तें ।
पार्थ [5]भगवदुक्तातें बहु भुलला, हरिण जेंवि गीतातें. ॥ ८१
व दले, '[6]हा! **मा**द्रीसुत, बहु दीनचि **धर्म भी**म गमला, [7]हो! ।
शोकें मरे **पृ**था, कां [8]तद्विस्तर दे न भी मग मला हो? ॥ ८२
ते ज न राहे कांहीं, स्वर्गप्रस्थान [9]नृप मनीं आणी, ।
[10]पाणी भ्राते जोडिति शीघ्र निघाया तसीच ती [11]राणी. ॥ ८३
[12]**वा** रणपुरींत [13]विधिनें **म**थुरेंतहि [14]आपुल्या तदा राजा ।
[15]पौत्रों **अ**निरुद्धाच्या [16]स्थापी, कलि ज्या म्हणे, 'सदारा जा'. ॥ ८४
सु टला वत्स [17]बहुजवें जाया मातेकडे जसा पळतो, ।
[18]निर्जगतितें पावाया **धर्म** विलंब न करी तसा [19]पळे तो. ॥ ८५
दे ह त्यागुनि भगवद्ध्यानें तो पावला महागतिला, ।
[20]तदनुजहि, [21]हरिसखी जी होईल स्वपद कां महाग तिला? ॥ ८६
[22]**वा** रिजबांधवसुत घे भेटि पुन्हा शेवटीं [23]प्रभासाची ।
पावे सुखें [24]निजपदाश्रितशिबिका **ह**रिपदप्रभा [25]साची ॥ ८७
य श वाढवी **परी**क्षित्प्रभु बहु, त्याचा जसा जगीं [26]आजा, ।
नामें **इ**रावती जी [27]उत्तरतनया तिला वरी राजा. ॥ ८८
[28]**नी** यधर्मपरें तेणें केले उत्पन्न पुत्र [29]चवघे ते, ।

---

१. भगवंताची कृपा. २. विजयास, यशास. ३. मोहें. ४. भगवद्गीता. गीतेंतील बोधाची स्फूर्ति अर्जुनाला झाली. (अ० १५ श्लो० ३०.) अर्जुनाला ब्रह्मज्ञान झाल्यामुळें त्याच्या अंतःकरणांतील अविद्यारूप तम समूळ नष्ट झालें. ५. भगवंताच्या भाषणातें. ६. हाय. ७. अहो. ८. त्या शोकाचा विस्तार. ९. धर्म. (अ० १५ श्लो० ३७.) १०. हात. ११. द्रौपदी. १२. हस्तनापुरींत. १३. यथाशास्त्र. १४. आपुल्या पौत्रा. (परीक्षित् राजाला.) १५. नातवा. (वज्राला.) १६. अ० १५ श्लो० ३९ पहा. १७ मोठ्या वेगानें. १८. मोक्षपदातें. १९. पळभर देखील. २०. त्या धर्माचे धाकटे बंधु महागति पावले. २१. द्रौपदी. तिला मोक्षपद महाग दुर्लभ होणार नाहीं. तीही ईश्वराच्या रूपाला प्राप्त झाली. (अ० १५ श्लो० ५०.) २२. सूर्यपुत्र यम त्याचा पुत्र विदुर तो. २३. तीर्थाची. विदुरानें प्रभासक्षेत्रीं देहत्याग केला. २४. स्वकीयपदाश्रितांची पालखी. २५. खरी. २६. अर्जुन. २७. उत्तर नामक राजाची कन्या इरावती. २८. नीति आणि धर्म तत्परायणें. २९. उग्रसेन, जनमेजय, भीमसेन आणि श्रुतसेन.

जनमेजयादि [1]सद्गुणसूक्तिसुधेचीच नित्य चव घेते. ॥ ८९
मो[2]दित केले द्विज सुर [3]हयमेधत्रय करूनि धनदानें, ।
[4]कृपगुरुघन वळतां कां त्या वाढावें विशेष न [5]नदानें? ॥ ९०
भरला कलि राज्यांत [6]व्यक्त असें [7]उत्तरातनय समजे, ।
कीं जन अन्याय करिति होउनियां विषम ते [8]सनय सम जे. ॥ ९१
गंगनमणिसम [9]सुतेजा दिग्विजय तसेचि करि [10]करद [11]परें ते, ।
[12]त्याचा शर [13]आगस्कर न वधुनि अहिचा जसा न [14]रदें परते. ॥ ९२
[15]वसु दे वसुधेवरि बहु [16]निजपूर्वजकृष्णचरितगात्यांतें ।
परिसुनिहि म्हणे पुनरपि नृप तो सुप्रेमभरित गा त्यांतें. ॥ ९३
ते गुरु गाती प्रभुच्या [17]सद्रक्षणसदरिघातलीला जे, ।
ज्यांची श्रुति मति ज्यांत न हरि [18]त्यां विषयांत घातली लाजे. ॥ ९४
वाटेंत नृप विलोकी [19]गोमिथुनां, [20]वृषल जो पदें [21]तांडी ।
[22]त्यांतें [23]धर्मधरा हें जाणुनि तत्ताप तो लया धाडी. ॥ ९५
[24]सुखर असि विकोशें[25] करी समजुनि वृषलासि कलि असें भूप, ।
तो धरि पाय नृपाचे भिउनि प्रकटूनि आपुलें रूप. ॥ ९६
दे प्राणदान सुयशा तो आज्ञापी असें तया कलिला, ।
'[26]मद्विषयांत न राहें करिसि अधर्मानयें प्रजा [27]कलिला.' ॥ ९७

---

१. उत्तम गुणांनीं युक्त जी चांगली वाणीरूप सुधा तीचीच. २. आनंदित. ३. तीन अश्वमेध. ४. कृपाचार्यरूप गुरुघन (आचार्यमेघ) कृपाला पुरोहित करून परीक्षित् राजानें गंगेच्या तीरावर तीन यज्ञ केले. ५. कृपाचार्य हाच परीक्षितीचा गुरु हाच मेघ अनुकूल झाला असतां त्या नदानें (त्या परीक्षित् राजानें) विशेष कां न वाढावें? (अधिक उत्कर्षाप्रत कां पोंचूं नये?) ६. स्पष्ट. ७. परीक्षित्. ८. जे जन सम (व) सनय होते ते विषम होउनियां अन्याय करिति–असा अन्वय. ९. सूर्यासारिखा. १०. करभार देणारे. ११. शत्रु. १२. त्या परीक्षित् राजाचा शर आगस्कर न वधुनि न परते (वधुनि परते–असा भाव). १३. अपराध करणारा. १४. दंत. १५. द्रव्य. १६. आपल्या पूर्वजांचे (पांडवांचे) व कृष्णाचें चरित्र गाणाऱ्या जनांला. १७. साधूंचें रक्षण आणि साधूंचा शत्रु नाशरूप ज्या लीला त्या. १८. ज्या (गुरूंची श्रुति) कान [व] मति (मन) ज्यांत (ज्या विषयांत) हरि न (कृष्णचरित=भगवद्गुणवर्णन असे) त्या विषयांत [ती मति किंवा श्रुति] घातली (असतां) लाजे. १९. धेनुवृषभां. २०. शूद्र. २१. लत्ताप्रहार करी. कलिस्वरूप शूद्र गाय व बैल यांना लाथा मारीत होता असें राजानें पाहिलें तेव्हां त्या कलीचा बंदोबस्त केला. (अ० १६ श्लो० ४.) २२. त्या गोवृषभांला. २३. धर्म आणि पृथ्वी. २४. अतिप्रखर, तीक्ष्ण. २५. तलवारेतें मेणांतून काढी. २६. माझ्या स्थानांत. २७. गढूळ. (निर्मल नव्हेत अशा.)

वा सार्थ द्यूतादिस्थानें दे करुनि आ [१]कलि लपाया ।
मागे म्हणुनि तया तो तेथें देतांचि आकलिल पाया. ॥ ९८
[२]**य** वसवदास्याहि अरिस जरि सहसा शूर सुज्ञजन वधिते, ।
तरि कैसें मेळविते महिंत [३]चिरस्थायि सुयश [४]अनवधि ते? ॥ ९९
न द्वेष क[५]री **क**लिसीं [६]सारग्राही नृपाळ, कीं फळतें ।
द्रुत संकल्पितहि [७]सुकृत, संकल्पितपातकें न मन [८]मळतें. ॥ १००
मो ठ्या [९]मृगयोत्साहें नृप गेला एकदां वनीं [१०]भ्रमला, ।
तेथें **श**मीकमुनिच्या [११]शिरला पुण्याश्रमीं बहु श्रमला. ॥ १०१
[१२]**भ** वितव्यें नृप [१३]सत्कृतिपात्रहि [१४]सत्कारकामही कांहीं ।
सत्कारलव [१५]समाधिस्थितमुनिपासूनि [१६]पावला नाहीं. ॥ १०२
[१७]**ग** तचेतन ग[१८]रधर मुनिकंठीं [१९]घाली नरेंद्र तो चापें, ।
[२०]सत्कारकामभंगें कोपे, 'हें कर्म करविलें पापें.' ॥ १०३

---

१. कली=पाप. [**कलिः** स्त्री कलिकायां ना शूराजकलहे युगे–इति मेदिनी; **कलिर्विभी**-तके शूरे विवादेऽन्त्ययुगे युधि–इति हैमः] कलि आ करुनि लपाया [स्थान] मागे, म्हणुनि तया द्यूतादिस्थानें वासार्थ दे, तेथें पाया देतांचि तो आकलिल. परीक्षितीजवळ कली तोंड पसरून दीन वदनानें लपण्याकरतां जागा मागे. म्हणून त्याला राहण्याकरतां परीक्षितीनें जुवा खेळण्याचीं घरें, दारू विकण्याचीं घरें, वेश्यांचीं घरें, जेथें जुगार, मद्यपान, वेश्यासंग आणि हिंसा असा चतुर्विध अधर्म होतो अशा जागा दिल्या. त्या ठिकाणीं जर कोणी पाय ठेवील तर त्याला तो कली आकलिल=आकडिल=आडकवील. 'डलयोरभेदः' या रीतीनें 'आकडिल' शब्द 'आकलिल' शब्दापासून होतो. कलीकरतां नेमून दिलेल्या जागेंत कोणी पाय ठेविला कीं त्याला कली पछाडल्यावांचून सोडणार नाहीं. [अ० १७ श्लो० २७-३४.] २. यवसवत्+आस्य=यवसयुक्त, गवत धरलेलें+तोंड=ज्याचें मुख यवससहित आहे अशाही, तृण मुखांत धरलेल्या अशाहि. ३. बहुतकाळ राहणारें. ४. बहुत अमर्याद. ५. राजानें कलीचा द्वेष केला नाहीं, कारण कलीमध्यें एक गुण होता, तो हा कीं पुण्यकर्माबद्दल नुसता संकल्प केला तरी त्याबद्दल कलींत फळ मिळतें, परंतु नुसत्या संकल्पित पापामुळें मन भ्रष्ट होत नाहीं, पाप प्रत्यक्ष करावें तेव्हां मन मळतें, पाप केल्याशिवाय पापाचें फळ प्राप्त होत नाहीं. ६. तत्वग्रहण करणारा. ७. पुण्यकर्म. ८. दूषित होतें. (अ० १८ श्लो० ७.) ९. पारध करण्याच्या उत्साहानें. १०. फिरला. ११. या पद्यांत 'ला'ची आवृत्ति वारंवार झाली आहे. १२. पुढें होणार म्हणून. १३. सत्कार करण्यास योग्यहि. १४. सत्कार करून घेण्याचा आहे मनोरथ ज्यास असाहि. १५. समाधिस्थऋषीपासून. १६. शमीक मुनीनें नृप परीक्षितीचा सत्कार केला नाहीं. १७. गतप्राण. १८. सर्प. १९. अध्याय १८ श्लो० ३२ पहा. २०. मनोरथाचे नाशें.

वं[1] सुधाधिप गेल्यावरि शृंगीनामा महर्षिचा बाळ ।
दे शाप[2] म्हणे, 'सप्तम दिवसीं चावेल तक्षक व्याळ.'[3] ॥ १०४

तें[4] जोनिधि तो शृंगी उठवी रोदनरवें[5] शमीकास, ।
पुत्रकृतें तळमळला[6], कीं कसती[7] परहिता शमी[8] कास.[9] ॥ १०५

वां[10] ळासि बोल लावी कीं, असहनता सुकीर्तिला मळवी, ।
जो पश्चात्तप्त[11] नृप, छात्रमुखें[12] शाप तो तया कळवीं. ॥ १०६

सु ख मानी राजा कीं दंडें सरतें समस्तही पाप, ।
ज्या वैराग्यें जोडे हरि झाला हेतु तो तया शाप. ॥ १०७

दे वनदीच्या तीरीं अनशन[13]संकल्प तो करी राजा, ।
जातों म्हणे, 'शरण मीं हरिस, विषाग्नीस तूं शरीरा ! जा.' ॥ १०८

वां[14] डववर कृष्ण[15] घटज[16] राम पराशर वसिष्ठ नारद या ।
भेटों आले अत्रिप्रमुख, जयांच्या मनांत फार दया. ॥ १०९

यँ[17] त्स्पर्शें, शुचि तीर्थें, त्यां तच्चरणांबुजभ्रमर पूजी ।
त्यांहीं मुक्तिपुरीही द्यावी, मग काय[18] ती अमरपू[19] जी ? ॥ ११०

न मुनि म्हणे, 'अधमहि या झालों सदनुग्रहेंचि[20] धन्यतम[21], ।
हरितां गुहागत[22] तुम्ही कवि रविहि न हरिल कोण अन्य तम[23] ? ॥ १११

मो ल तुमचिया या श्रीचरणरजाचें न होय निधि नवही[24], ।

---

१. पृथ्वीपाळ. २. कौशिकी नदीच्या पाण्यानें आचमन करून शमीकपुत्रानें शाप दिला. [श्लो० ३७.] ३. सर्प. ४. तेजाचा समुद्र. ५. रोदनशब्दें. ६. शमीक तळमळला. ७. बांधिती. ८. सहनशील, शमसंपन्न पुरुष, जितेंद्रिय साधु. ९. कासोटा. कास कसणें= कास बांधणें, सिद्ध असणें. १०. बाळासि, शमीकाला. ११. आपल्या अविनयाबद्दल वाईट वाटून पश्चात्ताप झालेला परीक्षित् राजा तया (त्याला). १२. शमीक आपल्या शिष्याच्या मुखानें शापवृत्त कळवी. सातव्या दिवसीं तक्षकापासून मृत्यु येणार हा शाप राजाला अद्याप माहीत नव्हता. १३. उपोषणाचा संकल्प. १४. विप्रश्रेष्ठ. १५. व्यास. १६. अगस्ती. १७. ज्याच्या स्पर्शानें तीर्थें शुद्ध (पावन) होतात त्यां (त्यांला) तच्चरणांबुजभ्रमर (त्यांच्या पादकमलींचा भुंगा–राजा) पूजी. १८. मुक्तिपुरी प्राप्त झाल्यावर अमरपूची (अमरावतीची, देवांच्या नगरीची) काय मातब्बरी राहिली ? १९. देवनगरी. २०. साधूच्या कृपेकरूनचि. २१. अ० १९ श्लो० १३ पहा. २२. गुहेमध्यें जमलेलें. २३. तिमिर, अज्ञान, काळोख. २४. कुबेराचे धनाचे नव निधि आहेत ते:—'महापद्मश्च पद्मश्च शंखो मकरकच्छपौ । मुकुंदकुंदनीलाश्च खर्वश्च निधयो नव' ॥ १ ॥ महापद्म, पद्म, शंख मकर, कच्छप, मुकुंद, कुंद, नील आणि खर्व ह्या नांवाचे हे द्रव्याचे नवनिधि आहेत.

भवदाश्रितकर्मांची सत्य कराया शकेल **वि**धि न वही[1]. । ११२

भ[2] गवद्गतमानस मी[3] हें विदित तुम्हां, सुरापगेला[4], हो[5] ।
सर्प डसो, **ह**रिगुण गा, यांहीं मोक्षा सुराप[6] गेला हो ! ॥ ११३

ग ति भलती हो श्रीमत्**कृ**ष्णयशोमृतनिधींत मज्जन[7] हो[8], ।
सत्संग घडो, मैत्री सर्वत्र, तुम्हां नमोऽस्तु सज्जन हो !' ॥ ११४

वं[9] सुमत्यधिपति ऐसें बोले मग दे स्वराज्य तनयातें[10], ।
सुर पुष्पवृष्टि करिती, म्हणती बहु 'धन्य धन्य' जन यांतें[11]. ॥ ११५

ते मुनि पुन्हा विनविले ऐसें जोडूनि कर, 'अहो ! आर्य ! ।
सांगा विचारुनि मला मरणारा शुद्ध कोणतें कार्य ?' ॥ ११६

वा[12] सरमणिसा तेजें सुरुचिरतर **कृ**ष्णसा दिगंबर[13] तो, ।
शुक ये, त्या पाहुनि, जनदृष्टि म्हणति 'हाचि **शिवें**[14]' परी नर तो.॥ ११७

सु रसार्वभौमसा जो श्री**शुक** आला, तयासि सामोरा ।
जाय समुनि नृप, त्या तो मेघ जसा दृष्ट बहुदिसा[15] मोरां[16]. ॥ ११८

दे वाची तसि त्याची पूजा परमासनीं[17] करी राजा, ।
चित्तीं म्हणे, 'कृतार्थचि[18] झालों, जाणार तरि शरीरा ! जा.' ॥ ११९

वा खाणुनि तद्दर्शनमहिमा[19] निजभाग्यही बहुतरचि[20], तो[21] ।
राजा कार्यार्थ[22] पुसे म्रियमाणश्रेय[23] जो बहुत रचि तो[24]. ॥ १२०

---

१. हिशोबाची चोपडी. २. भगवत्+गत+मानस=श्रीकृष्ण+गेलेलें+मन=ज्याचें मन श्रीकृष्णाच्या ठायीं आहे असा. ३. माझें (परीक्षितीचें) मन परमेश्वर ध्यानांत रत आहे ही गोष्ट तुम्हांस (व्यासपराशरादिकांस) माहीत आहे. तशीच ती गंगेला विदित होवो. साप चावू दे (कीं कांहीं होवो त्याची मला पर्वा नाहीं). हरिगुणांचें गायन करा. (कारण) या गुणगायनानें मद्यपी (देखील) मोक्षास गेला आहे. सुरापान हें पंचमहापातकांपैकीं एक आहे, म्हणून सुराप शब्दाची योजना. मी सुराप (सुरापासारखा निंद्य) असतांही मुक्तिपदाधिकारी झालों. [अ० १९ श्लो० १३-१६.] ४. गंगा तिला. ५. होवो. ६. मद्यपी. ७. स्नान. ८. होऊ. ९. वसुमती+अधिपति=पृथ्वी+पालक=राजा परीक्षित्. १०. जनमेजयाला. ११. परीक्षितीतें. १२. सूर्यासारखा. १३. नग्न. दिक्+अंबर=दिशा+वसन=दिशा आहे वसन ज्याचें तो. १४. महादेव. १५. पुष्कळ दिवसांनीं पाहिलेला. १६. मयूरास. १७. अ० १९ श्लो० २९ पहा. १८. सफलजीवित. १९. अ० १९ श्लो० ३३-३६ पहा. २०. पुष्कळ. २१. राजा. २२. मनुष्य मरणोन्मुख झाला असतां त्यानें या लोकीं काय केलें पाहिजे. २३. मरणाराचें कल्याण. २४. कार्यार्थ.

य[1] दवस्थान गृहिजना गोदोहन[2]मात्रकाळहि न कोठें ।
दिसतें, दयाघना! या **मो**[3]राचें भाग्य या जनीं मोठें. ॥ १२१

द्वितीय स्कंध.

नॄ[4] रवर्यासि **शुक** म्हणे, 'लोकहित प्र[5]श्न हा तुझा, राजा! ।
मिरविति गुणज्ञ कनका काढी सू[6]क्ष्मा जपोनि झा[7]रा ज्या. ॥ १
मो[8] क्षपति श्रो[9]तव्यस्मर्तव्यहि हाचि कीर्ति[10]तव्य जना, ।
त[11]प्त बुध भजति सुयशा **ह**रिच्याचि, न अन्य कीर्तित व्यं[12]जना. ॥ २
भ गवद्व्यासापासुनि '**भागवत**' महापुराण मी पढलों[13], ।
आ[14]क्षिप्तचित्त झालों जरिही नैर्गु[15]ण्यसत्पदीं चँ[16]ढलों. ॥ ३
ग[17] तिसुखकामुक जे जे त्यां त्यां सर्वांसि सु[18]फल **भा**गवतीं, ।
कु[19]जकें कांहीं मिरवी परि कैची त्या सदुपलभा गवतीं? ॥ ४
ब स ऐकत **भा**गवत प्राज्य, असे सप्तदिवस अवधि, रहा, ।

---

१. यद्+अवस्थान=ज्याचें+वसतिस्थान=ज्याचें रहाणें. २. शुकाचें दर्शन होणें फार दुर्लभ आहे, कारण ते गृहस्थाश्रम्यांचे घरीं गोदोहनकालपर्यंत एका धेनूच्या (दूध काढण्यास लागणाऱ्या काळाइतके) देखील कोठें उभे असल्याचें आढळत नाहीं. [अ० १९ श्लो० ३९.] ३. मोरोपंतकवीचें. ४. नृपश्रेष्ठाला (परीक्षितीला). ५. प्रथमस्कंध–गीति १२० पहा. ६. ज्या सूक्ष्मा (अल्पा कनका) झारा (झारेकरी) जपोनि काढी–असा अन्वय. ७. झारेकरी. ८. विष्णु. ९. स्मरण आणि श्रवण करण्यास उचित. १०. कीर्तन (स्तवन) करण्यास योग्य. (अ० १ श्लो० ५.) ११. ताप पावलेले साधुजन हरिच्याच उत्तम यशाचें सेवन करून शांति पावतात; शांति मिळण्यासाठीं (संतापपरिहारासाठीं) ते सुप्रसिद्ध पंख्याचें सेवन करीत नाहींत. १२. पंख्यातें. १३. द्वापार युगाच्या शेवटीं व्यासापासून समजून घेतलें. १४. ओढलें चित्त ज्याचें असा, गृहीतचेता असा. १५. निर्गुणस्वरूप उत्तमपदीं. १६. निर्गुण ब्रह्माचे ठिकाणीं रममाण असलों तरी. १७. गतिकामुक=मोक्षपदाची इच्छा करणारे. मुमुक्षु, संसारांतून सुटण्याची इच्छा करणारे. सुखकामुक=स्वर्गादि नाना सुखोपभोगांची इच्छा करणारे. १८. भागवतपुराणांत उत्तम फळ प्राप्त होतें. १९. अन्वय–त्या (इतरीं) गवतीं सदुपलभा कैंची? तें (गवत) कांहीं फळ मिरवी–परि कुजकें. सदुपलभा=सत्+उपल+भा=उत्तम+दगड–हिरा+कांति=चिंतामणि किंवा परीस अशा दगडांचा प्रभाव भागवतीं आहे, इतरत्र नाहीं, इतर पुराणांचे ठिकाणीं 'भा' नाहीं. म्हणून तीं पुराणें गवत होत. तें गवत कांहीं फळ मिरवी (कांहीं अंशीं फलप्रद होतें) परंतु तें फळ कुजकें होय (नाशवंत होय) आणि भागवतीं मात्र सुफळ (अविनाशी फळ) प्राप्त होतें.

खट्वांग[1]हित मुहूर्तें[2], न म्हणुं अनरस[3] न अनंध[4] अबधिर[5] 'हा'[6] ॥ ५
ते हे सुसंहिता[7] तूं श्रवण करीं, स्वस्थ मी ईचा वदता[9], ।
बा! या सन्मात्रेनें[10] कांहींहि नुरेचि भवगदीं[11] गदता[12]. ॥ ६
बा! अभिमन्युसुता! या **भा**गवतीं चित्तशुद्धिला मूळीं[13] ।
कथिली आहे भगवद्रूपीं[14] गति[14] हेतु, धारणा[15] स्थूळीं[16]. ॥ ७
सु ज्ञा! ते सांगितली स्वहृदयपद्मीं[17] सुधारणा, भूपा! ।
ध्यावें [18]अंगुष्ठमिता प्रभुच्या श्यामा चतुर्भुजा[19] रूपा[20]. ॥ ८
दे हत्याग करावा योगबळें ब्रह्मरंध्र[21] भेदून, ।
प्राणानिलासि[22] सोडुनि मार्ग चळों लेशमात्र नेदून[23]. ॥ ९

---

१. खट्वांग नामक राजा होता. त्याचें आयुष्य एक मुहूर्त मात्र उरलें होतें. तेव्हां सर्वसंगपरित्याग करून अनन्यभावानें नारायणास शरण जाऊन त्यानें मोक्षपद प्राप्त केलें. हा राजा देवदैत्यांचें युद्ध चाललें होतें, तेथें देवांस साहाय्य करण्यासाठीं गेला होता. तेव्हां यानें स्वपराक्रमानें दैत्यांचा पराभव करून देवांस संतुष्ट केलें. त्यांनीं 'इष्ट वर माग' असें राजास सांगितलें. राजानें माझें आयुष्य किती आहे तें सांगा' असें विचारलें. त्याला आपल्या आयुष्याची मर्यादा अत्यल्प आहे असें समजतांच तो देवाची आज्ञा घेऊन मृत्युलोकीं आला व विष्णुपदाला प्राप्त झाला. २. खट्वांगहित मुहूर्तें [होय] (एक मुहूर्त अवकाश होता, तेवढ्या वेळांत खट्वांग राजानें आपलें परमार्थसंबंधीं हित साधिलें) [अतएव] अनरस (अरसिक नव्हे असा जो, प्रेमळ भक्त जो तो 'हा' न म्हणुं) अनंध (डोळस जो) आणि अबधिर (बहिरा नव्हे असा जो तो) 'हा' (हायहाय) असें न म्हणुं. इतके थोडे वेळांत आपण मुक्त होणार नाहीं असें दुःख करण्यास प्रेमळ भक्ताला प्रेमयुक्ताला, डोळसाला आणि अबधिराला कांहीं कारण नाहीं. मात्र प्रेमबुद्धि पाहिजे आणि देह चालता पाहिजे.) ३. प्रीति ठेवणारा. ४. डोळस. ५. बहिरा नव्हे असा. ६. 'हा' न म्हणुं. ७. भागवत. ८. सुसंहितेचा. ९. निरूपणकर्ता, निरूपक, कथक. १०. उत्तम मात्रेनें. ११. भवसागररूप रोगाचे ठायीं. १२. रोगल. (गद=रोग.) १३. प्रारंभीं. १४. ईश्वरस्वरूपाला मिळणें, एकत्र होणें. १५. धारणा=योगाच्या आठ अंगांपैकीं एक. भगवत्स्वरूपीं चित्त स्थिर करणें, धारणेच्या योगानें मन ईश्वरस्वरूपावर नेऊन ठेवितां येतें. एका आसनावर पुष्कळ वेळ बसण्याचा अभ्यास, प्राणायामानें श्वासाचें स्तंभन, विषयत्याग, इंद्रियांचें दमन इत्यादि उपायांच्या साहाय्यानें भगवंताच्या स्थूल स्वरूपावर मन लावणें. १६. स्थूलस्वरूपीं. [अ० १ श्लो० २३-२४.] १७. आपल्या हृदयकमळीं. १८. प्रादेश मात्र. (अ० २ श्लो० ८-१३.) १९. चार भुज आहेत अशा. (शंख, चक्र, कमल व गदा हीं आयुधें प्रत्येक हातांत आहेत अशा.) २०. अ० २ श्लो० १२ पहा. २१. टाळू. (टाळूचा छेद करून.) २२. जीवरूप वायूस. २३. न देऊन.

वा ट श्रुतिनीं स्तविली बहु सद्योमुक्तिची[1] असी बा! हे, ।
वाहे ज्ञानिबहुमता राया! क्रममुक्तिची[2] दुजी आहे. ॥ १०

य[3] मनियम धरुनि दृढ **वि**धि[4] पूर्वी जगदीश्वरासि[5] आराधी, ।
हे मार्गद्वय[6] सांगे प्रभुवर[8] देउनि तयासि सारा धी[7]. ॥ ११

न रवर्या! यज्ञतपोयोग असे मार्ग मुक्तिचे फार, ।
परि बा! **कृ**ष्णीं होतो ज्या मार्गें भक्तियोग तो सार. ॥ १२

मो ठ्या यत्नें **ब्र**ह्मा एकाग्रमनें त्रिवार वेदातें ।
नीट विचारूनि करी निश्चय[9], पाहे न यांत[10] खेदातें. ॥ १३

भ गवच्चरितें सुयशें तीं श्रवणस्मरणकीर्तना उचितें ।
येणें तल्लाभ[11] घडे, यावांचुनि कर्म जें नव्हे शुचि तें. ॥ १४

ग ळतो गर्व हरियशःश्रवणें, अघराशि[12] सर्वही जळतो, ।
पळतो भ्रम, किंबहुना **भ**गवान् येणेंचि सर्वथा वळतो[13].' ॥ १५

---

१. तत्काल मुक्ति प्राप्त होण्याची. (अ० २ श्लो० २०-२१.) २. क्रमें करून मुक्ति प्राप्त होण्याची. (अ० २ श्लो० २३-३१.) ३. 'यमनियमासनप्राणायामप्रत्याहारधारणाध्यानसमाधयोऽष्टावंगानि' ॥ २९ ॥ यम, नियम, आसन, प्राणायाम, प्रत्याहार, धारणा, ध्यान, आणि समाधि (हीं योगाचीं) आठ अंगें. या आठ अंगांच्या स्वरूपाचें थोडें वर्णन केलें पाहिजे. **यम** म्हणजे व्रतें करावयाचीं; **नि**यम म्हणजे चित्ताचें दमन करावयाचें; **आ**सन म्हणजे बसणें; **प्रा**णायाम म्हणजे श्वास उच्छ्वास यांचें संशोधन करावयाचें. विषयावरून इंद्रियें काढून चित्तावर त्यांचा रोख लावावयाचा, याचें नांव **प्र**त्याहार. शरीरापुढें कांहीं एक विषय मांडून त्यावर चित्त बसवायाचें याचें नांव **धा**रणा. त्या विषयाचें आणि चित्ताचें एकच रूप झालें कीं त्याचें नांव **ध्यान**. आपल्या स्वतांच्या चित्ताचें भान सुटलें आणि ज्या विषयाचें ध्यान चाललें आहे तोच विषय दिसूं लागला म्हणजे याचें नांव **स**माधि. यांत यमाचें वर्णन असें:—अहिंसा, सत्य, अस्तेय, ब्रह्मचर्य, आणि अपरिग्रह हे यमाचे अवयव होत. दुसऱ्याचा प्राण न घेणें याचें नांव अहिंसा. या अहिंसेचे जैन लोक अनेक प्रकार मानतात. कटु भाषणानें दुसऱ्याचे जीवास त्रास न देणें हीही अहिंसाच. सत्य भाषण हें प्रसिद्धच आहे. दुसऱ्यानें दिल्यावांचून कांहीं एक घ्यावयाचें नाहीं याचें नांव अस्तेय. ब्रह्मचर्य म्हणजे बद्धकच्छ होऊन स्त्रियांपासून दूर राहणें. अपरिग्रह म्हणजे कोणत्याही वस्तूंचा स्वीकार करावयाचा नाहीं. नियमाचे अवयव असे आहेतः—शुद्धता, संतोष, तप, स्वाध्याय, आणि ईश्वरप्रणिधान (इतके हे) नियम. [षड्दर्शनचिंतनिका—योगदर्शन. पृष्ठ १६५-१६९.] ४. ब्रह्मदेव. ५. विष्णु. ६. सद्योमुक्ति आणि क्रममुक्ति. ७. बुद्धि. ८. श्रेष्ठ. (अ० २ श्लो० ३३.) ९. अ० २ श्लो० ३४ पहा. १०. विचारांत. ११. त्या परमेश्वराची प्राप्ति. १२. पापाचा ढीग. १३. प्रसन्न होतो.

व [1] सुधापाळ म्हणे, 'बा! मायेनें विश्व[2] हें कसें **ह**रि तो।
क[3]रितो **शु**कयोगींद्रा! सांग कसें पाळितो कसें ह[4]रितो? ॥ १६
ते **ब्र**ह्माद्यवतार श्री**ना**रायण मुने! कसे धरितो?।
वद अवतारचरित्रें, ज्यांहीं जीवांसि **अ**ज स[5]मुद्धरितो.' ॥ १७
बा[6] रिजनाभप्रभुतें वंदन अ[7]सकृत् करूनि **शु**क बोले,।
त्या त[8]द्वागमृताच्या पानें नृप मुनिसमाजसह डोले. ॥ १८
'**सु** ख वाटविसि प्रश्नें लोकीं, तूं साधु प[9]रिसता राया!।
बा! अन्य धन्य कोणी न तराया साधुपरिस ताराया. ॥ १९
दे वा! **वि**धितें **ना**रदमुनि नमुनि पुसे असेंचि कीं कर्ता,।
भर्ता या विश्वाचा त[10]च्चित्ता तोचि वाटला हर्ता. ॥ २०
वा[11] रिजयोनि म्हणे, 'बा! कथितों मी तत्व, तूं परिस, मजला।
कर्ता भर्ता ह[12]र्ता म्हणसि कसा? तुज नसे **ह**रि समजला. ॥ २१
य द्यपि त[13]त्वज्ञ न तूं तरि मज वरि तव दयाचि सांगाया।

---

१. परीक्षित्. २. जग. (अ० ४ श्लो० ६.) ३. येथें सृष्टिपालनसंहार या तीन कार्यांचा उल्लेख केला आहे. ४. हरण करितो, संहार करितो, नष्ट करितो. येथें 'कारकदीपक' अलंकार झाला आहे. येथें 'करितो,' 'पाळितो' आणि 'हरितो' या अनेक क्रियांचा संबंध एकाच कर्त्याशीं (हरिशीं) आहे म्हणून हा 'कारकदीपक' अलंकार होय. कर्ता एक असून त्या कर्तृकारकाचा संबंध अनेक क्रियांशीं असतो तेव्हां 'कारकदीपक' अलंकार होतो. याचीं उदाहरणें अनेक आढळतात:—(१) 'पायीं भ्रमली, श्रमली, निजली, भिजली निजाश्रुनीरांनीं' वनपर्व–अ० ४ गीति २७३], (२) 'ज्ञहि अज्ञहि जन तारी नामें कामादि शत्रुही मारी। स्वयशें भवभय वारी करि भक्तमयूरघन दया भारी' ॥ ४६ ॥ [मांत्रारामायण–काव्यसंग्रह–रामायणें भाग १], (३) 'जटायु मूर्च्छित क्षतार्त देखतां गळां पडे, रडे पुसे कथी परंतु मृत्यु सांगतां घडे। दडे मुहूर्त पूर्व शोक यापुढें मनीं जडे, अडेचि धैर्य, तोय दे निघे शुगब्धिचे कडे.' ॥ २२ ॥ [पंचचामररामायण]. याचें लक्षण:–'सकृद्वृत्तिस्तु धर्मस्य प्रकृताप्रकृतात्मनाम्। सैव क्रियासु बह्वीषु कारकस्येति दीपकम् ॥' [काव्यप्रदीप–१० उल्लास १७ कारिका पहा.] ५. वर काढतो. ६. कमलनाभ. ७. वारंवार. ८. त्याचे वाणीरूप सुधेच्या. ९. ऐकणारा, परिश्रवणकर्ता. १०. त्या नारदाच्या मनाला. ११. ब्रह्मदेव. १२. संहार करणारा. १३. तूं यद्यपि तत्वज्ञ न (तूं जरी ज्ञाता नाहींस) तरि (तथापि, या कारणास्तव) तव दयाचि (तुझ्याविषयीं माझ्या अंतःकरणांत राहणारी दया) तत्व सांगाया (तुला खरें तत्व सांगण्याविषयीं, तुला आत्मज्ञानबोध करण्यासाठीं) मज (मला विधीला) वरि (वरीते, स्वीकारते, उद्युक्त करते) तत्व गाया (माझ्या मुखानें तत्व गायिलें जाण्यास, माझ्या मुखानें तत्वोपदेश हो-

कां गाया तत्व न हे[1] हेतु? पहा रोमहर्ष आंगा या. ॥ २२

न[2] ग केवळ कै[3]नकतसें, विश्व[4] सकळ **वा**सुदेव जाणावा, ।

वेदा[5]दि सर्व **ना**[6]रायणपर, सद्बोध हाचि वाणावा. ॥ २३

मो ह मनींचा माझा तद्भजनचि होय हेतु बा! जा[7]या, ।

जीवांच्या विश्रांतिस तत्कीर्ति भवाब्धिसेतु बा[8]जा या. ॥ २४

भ गवंताचे आम्ही अंश, नृपा! **वा**सुदेव तों अंशी, ।

वाणी बोले तेणें बोलविली जेंवि वा[9]दकें वं[10]शी. ॥ २५

ग[11] गनादिस कारण, जो तत्वगुणमदादि, दुभवितात न या ।

निर्मिति तपें प्रजापति, याचा प्रभु तोचि उभविता, तनया! ॥ २६

व[12] त्सर सहस्र उदकीं त[13]त्वगुणोत्पन्न [14]अंड बा! होतें, ।

परमात्मा प्रभु त्यातें चेतवि न, म्हणे 'तसेंचि राहो तें.' ॥ २७

ण्यास) हे (तव दया) हेतु (कारण) न कां? (नाहीं काय?) या आंगा (या माझ्या आंगावर) रोमहर्ष पहा (आनंदाचे योगानें उभारलेला कांटा पहा. माझ्या आंगावरील रोम (केश) हर्षानें (आनंदानें) उभे राहिले आहेत हें पहा. माझ्या रोमहर्षणावरून तुझ्याविषयीं उत्पन्न झालेलें माझ्या अंतःकरणांतील प्रेम, आणि तत्वोपदेश करण्याचें उत्सुकत्व तुला कळेल.)

१. दया. २. अलंकार. ३. कोणताही अलंकार पाहिला तरी तो सुवर्णरूपच होय, कनक ही प्रकृति व नग ही विकृति होय. ४. सकल जग हें वासुदेवाच्या शरीरापासून उत्पन्न झालेलें होय. यास्तव हें सर्व विश्व वासुदेवमय समजावयाचें. ५. वेदशास्त्रादि. ६. सकल वेद इत्यादि यांच्या उत्पत्तीला कारण नारायणच होय. (अ० ५ श्लो० १५.) ७. बा! (पुत्रा नारदा!) माझ्या मनींचा मोह जाया (निघून जाण्यास, नष्ट होण्यास) तद्भजनचि (त्या परमेशाचें भजन हेंच) हेतु (कारण) होय. ८. खाटा. ९. वाजविणाऱ्यानें. १०. पांवा, मुरली. ११. या गगनादिस (आकाशादिक पंचतत्वांस) प्रजापति (ब्रह्मदेव—हा एकच नाहीं म्हणून अनेकवचन) तपें (स्वतःचे तपःप्रभावानें) न निर्मिति (उत्पन्न करूं शकत नाहींत) [अथवा] न दुभवितात. (त्या प्रपंच भूतांचें दोहन करून विश्व उत्पन्न करूं शकत नाहींत) तत्वगुणमदादि (पंचतत्वें, त्रिगुण, आणि मद्+आदि=मी ब्रह्मदेव, यांचा आदि) [आणि] [गगनादिस कारण] जो प्रभु तोचि याचा (या विश्वाचा) उभविता (उभा करणारा—उत्पन्न करणारा—विश्वाचा कर्ता) [असें हे] तनया (पुत्रा! नारदा!) [जाण]. तत्वें पांच आहेत:—पृथ्वी, आप, तेज, आकाश आणि वायु. गुण तीन आहेत:—सत्व, रज आणि तम. १२. वर्षे. १३. पंच महाभूतें आणि सत्वादि तीन गुण यांच्या संयोगानें निर्माण झालेलें (अंड). १४. ब्रह्मांडात्मक शरीर हजारों वर्षे उदकांत अचेतन होतें. (अ० ५ श्लो० ३४.)

ते जें [1]चेतवुनि, तया भेदुनि त्यांतुनि [2]निघे [3]पुरुख, राहो ।
विश्वाकार असाचि, प्रभु चित्तीं आमुचा गुरु खरा हो. ॥ २८
[4]**वाँ**! देव [5]**वि**राडंतर्यामी जो [6]याँचियाचि [7]हाँ, तनया ! ।
[8]नाभिसरोजीं झाला, मग कां जोडील सांग हात न [9]याँ? ॥ २९
सु तरता! यज्ञ [10]परमपुरुषप्रीत्यर्थ शुभ करावा, हें ।
बहुत स्वमनीं होउनि मी संकल्पासि वश बरा वाहें. ॥ ३०
दे वाचे अवयव जे [11]संभार तिहींच करुनि हो! [12]यजन ।
करि हरिचें, कीं [13]याँचा जो न म्हणे तो कधींच 'हाय!' जन. ॥ ३१
[14]**वाँ** हतसें [15]हृदयाब्जीं अत्युत्सुक मी सदैवही [16]हरितें, ।
सत्य [17]वचन संकल्पिक, माझें यश वसति सज्जनीं करितें. ॥ ३२
[18]**यँ** न्नाभिपद्मभव मी [19]वेदतपोमयहि साधुनिहि योगा, ।
नेणें [20]प्रजापतिपतिहि [21]हरितें, दुर्ज्ञेय केवळचि [22]तो, गा! ॥ ३३
न कळे मला [23]तुम्हांला [24]शंभुसहि, कळेल काय अन्यासी? ।

---

१. जीव (परमात्मा) त्या अचेतन अंडाला सचेतन करिता झाला. २. ज्याला अनंत मांड्या, अनंत पाय, अगणित भुज, नेत्र मुखें व मस्तकें आहेत असा परमात्मा (पुरुष). ३. पुरुष. 'पुरुष'शब्दाचा 'पुरुख' असा उच्चारभेद एकदेशीय असून प्रस्तुतस्थळीं यमकासाठीं स्वीकारला आहे. संस्कृतांत जर 'ष' असला तर त्याच्या जागीं 'ख' घालण्याची मराठींत चाल कोठें कोठें आढळते; जसें:–औषध–ओखद. पण उत्तरहिंदुस्थानांत जी हिंदी भाषा बोलतात तींत फार आढळते; जसें:–भाषा–भाखा, वगैरे. ४. वा. ५. विराट देहाला व्यापणारा. (विविधानि राजंते वस्तूनि यत्र स विराट्। ज्यामध्यें नानाप्रकारच्या वस्तु असतात तें, म्हणजे सर्व स्थावरजंगमात्मक सृष्टि ज्यांत भरली आहे तें विराटस्वरूप जाणावें. ६. याच देवाच्या (नाभिसरोजीं). ७. मी (ब्रह्मा). ८. नाभिकमलीं हा मी झालों. ९. ज्याच्या नाभिकमलीं उत्पन्न झाला त्या देवाला हा (मी ब्रह्मदेव) हात कां न जोडील [तें] सांग? अर्थात् हात जोडील= नमस्कार करील. १०. ईश्वराची पूजा करण्यासाठीं. (अ० ६ श्लो० ३२.) परमपुरुष= परमेश्वर. ११. साहित्य-उपकरण. १२. यज्ञ. १३. याचा जो जन (होय) तो कधींच 'हाय' न म्हणे. १४. ध्यान करितो. १५. हृदयकमळीं. १६. देवातें. १७. मी जें बोलतों तें कधींही अन्यथा होत नाहीं. (अ० ६ श्लो० ३३.) १८. ज्याच्या नाभिकमलापासून उत्पन्न झाला असा. १९. मी वेदस्वरूपी आणि तपोरूपी असूनही. २०. मी प्रजापतिपति (प्रजापतींमध्यें श्रेष्ठ असा) असूनही नेणें (जाणत नाहीं.) २१. विष्णूतें. २२. तो विष्णु. २३. हे नारदा! तुला आणि तुझ्या भावांना ईश्वराचें स्वरूप समजत नाहीं. २४. वामदेवाला. (अ० ६ श्लो० ३६.)

त्यां मात्र तत्प्रसादें कळतो, जे [1]शांत साधु सन्यासी. ॥ ३४
मो जिळ कोण प्रभुचे अवतार? तथापि ते न कां गावे? ।
पहिला सहस्रशीर्षा '[2]पुरुष' तुला [3]इतर तेहि सांगावे. ॥ ३५
[4]**भ** व [5]यज्ञ [6]मी, तुम्ही [7]ही हे दक्षादि [8]प्रजेश्वर हि जाण, ।
अवतारचि नाक[9]मनुजतलखगलोकेश हें मनीं आण. ॥ ३६
[10]**ग** रधर चारण विद्याधर राक्षस यक्ष आणि गंधर्व, ।
ऋषि पितृ भूत असुर मृग यांचे जे नाथ **ना**रदा! [11]सर्व. ॥ ३७
[12]**व** र तेज गुण वसे ज्या स्थानीं अवतार तो असें समज, ।
हें युक्तिनेंचि वदलों, [13]साकल्यें शक्ति वर्णनीं न मज. ॥ ३८
ते हे जगदीशाचे कथितों लीलावतार मी आतां, ।
[14]शतजन्मार्जितदुरितक्षय होतो ज्यांसि ऐकतां गातां. ॥ ३९
[15]**वा** रिधिचरकनकाक्षक्षय करि हरि, दे बुडों न [16]वसुधेतें, ।
या [17]यज्ञवराहाची [18]सत्कीर्ति न दे उडों नवसुधेतें. ॥ ४०
सु रपति [19]सुयज्ञ [20]आकूत्युदरज [21]रुचिसुत जगद्वयासि [22]हरी ।

---

१. जितेंद्रिय. २. ईश्वराचा प्रथम अवतार 'पुरुष' होय. [श्लो० ४१.] ३. अन्य अवतार. ४. शंकर. ५. विष्णु. ६. मी, शंकर व विष्णु हे गुणावतार होत. ७. तूं व तुझ्यासारखे भक्तजन. ८. प्रजापति. ९. नाक (स्वर्ग), मनुज (मनुष्य), तल (पाताल), खग (पक्षी) व लोक यांचे ईश (पति–स्वामी) इंद्र, नृपाल, पातालाधिपति, गरुड आणि लोकपाल. १०. गरातें (विषातें) धरणारे सर्प. ११. हे सर्व ईश्वराचे विभूतिस्वरूप होत. १२. श्रेष्ठ तेज आणि उत्तम गुण ज्यामध्यें असतात तो ईश्वराचा अवतार असें समजावें. १३. विस्तारानें. १४. शंभर जन्मांमध्यें केलेल्या पातकांचा नाश. १५. वारिधि+चर+कनकाक्ष+क्षय=सागर+संचारक+हिरण्याक्ष=असुर+नाश=समुद्रामध्यें फिरणाऱ्या हिरण्याक्षाचा नाश. १६. पृथ्वीतें. १७. पृथ्वी रसातलांत गेली होती तेव्हां तिला वर आणण्यासाठीं परमेश्वरानें यज्ञस्वरूप वराहाचा (डुकराचा) अवतार धारण केला व महासागरामध्यें जाऊन तेथें प्रसिद्ध हिरण्याक्ष (कनकाक्ष) नामक दैत्याचे आपल्या दाढेनें तुकडे तुकडे केले, [अ० ७ श्लो० १] व पृथ्वीचा उद्धार केला. याला 'श्रीयज्ञवराह' अवतार म्हणतात. [मोरोपंतकृत अवतारमाला–आर्या १०-१२.] १८. या यज्ञवराहावताराची कीर्ति इतकी थोर (शुचि) कीं तिच्यापुढें नवामृताचें थोरपण (शुचित्व) फिकें पडतें. नव अमृत या कीर्तिपुढें वर मान करूं शकत नाहीं. १९. अवतारविशेष. २०. आकूतीचे उदरापासून झालेला. २१. रुचि नामक प्रजापतीचा मुलगा सुयज्ञ. २२. हरण करी.

स्त्री [1]दक्षिणा [2]सुयामहि [3]तन्नंदन, [4]मनु म्हणे जयासि 'हरी' ॥ ४१
दे [5]व [6]कपिल कर्दमसुत, नव भगिनी ज्यासि, देवहूतिस जो ।
सांख्य ध्यानहि कथि, मन, साधाया [7]तत्प्रसादभूति सजो. ॥ ४२
वा! [8]अत्रिसि 'तुज म्यां मी दिधलों' बोले म्हणोनि जो दत्त, ।
यदुहैहयादि तरले, होउनि ज्याच्या [9]पदार्चनीं यत्त. ॥ ४३
[10]यँ तें म्यां तप करितां सनक सनंदन सनत्कुमार हरी ।
होय सनातनहि प्रभु जो प्रकट कवींत आत्मतत्व करी. ॥ ४४
[11]न र नारायण हे प्रभु, धर्म पिता, माय [12]दक्षजा [13]मूर्ती, ।
ज्यांच्या भजनें होत्ये भक्तांचीं सर्व [14]कामनापूर्ती. ॥ ४५

---

१. या सुयज्ञ नामक विष्णूची स्त्री दक्षिणा. २. सुयाम (सुयम) हा सुयज्ञ+दक्षिणा यांचा पुत्र. ३. त्या सुयज्ञाचा पुत्र. ४. स्वायंभुव मनु हा सुयज्ञाचा मातामह होय. हा आपल्या नातवाला 'हरि'=इंद्र असें म्हणे. सुयज्ञानें इंद्र होऊन जगताचें भय हरण केलें म्हणून त्याला 'हरि' असें नांव त्याच्या मातामहानें दिलें. हा श्रीसुयज्ञावतार होय. ५. ईश. ६. कपिल हा ईश्वराचा तिसरा अवतार होय. हा कर्दम नामक महामुनि आणि देवहूति यांचा पुत्र. याला नऊ बहिणी होत्या. हा सांख्यशास्त्राचा प्रवर्तक असून यानें आपल्या मातेला आत्मज्ञान सांगितलें. आईला आत्मविद्या शिकवून तिला यानें मुक्ति दिली. ७. तिचें प्रसादरूप ऐश्वर्य. ८. अत्रिमुनीच्या मनांत आपल्याला पुत्र व्हावा अशी इच्छा होती म्हणून त्यानें दुष्करतर तप केलें. तेव्हां भगवंत प्रसन्न होऊन त्याला म्हणाले 'वर माग.' 'मला तुमच्या पदप्रसादानें तुमच्यासारखा वत्स प्राप्त व्हावा' असें अत्रीनें सांगितलें. 'हे अत्रे! माझ्या समान कोण आहे, मींच स्वतः तुझ्या पोटीं येतों' असें प्रत्युत्तर देऊन देवानें अत्रिच्या घरीं अवतार धारण केला. याला 'दत्त' असें नांव पडलें. दत्तप्रभु हा चवथा अवतार होय. याच्या पादकमलरजस्पर्शानें यदु हैहय इत्यादि राजे पवित्र झाले व त्यांना भुक्ति आणि मुक्ति प्राप्त झाल्या. [अ० ७ श्लो० ४.] ९. चरणसेवेंत, चरणपूजेंत. १०. हें पांचव्या कुमारावताराचें वर्णन आहे. ब्रह्मदेवानें सृष्टि उत्पन्न करण्यासाठीं तपश्चर्या केली. तेव्हां जगज्जनक जो भगवान् हरि त्यानें सनत्कुमार, सनक, सनंदन, आणि सनातन अशीं चार रूपें धारण केलीं. आत्मज्ञानाचा मार्ग पूर्व कल्पांत नष्ट झाला होता तो भगवंतांनीं ह्या कुमारावतारद्वारा लोकांत प्रकट केला. [अ० ७ श्लो० ५,] हा कुमारावतार साधुसभेचा मंगलतिलक होय. [मोरोपंतकृत अवतारमाला—आर्या २८-३२.] ११. नर आणि नारायण हा ईश्वराचा सहावा अवतार होय. (अ० ७ श्लो० ६.) दक्षाची मूर्ति नामक कन्या ही यांची माता व धर्मऋषि हा पिता होय. १२. दक्षापासून झालेली कन्या मूर्ति. दक्षानें तेरा कन्या धर्म ऋषिला दिल्या होत्या, त्यांतील ही कनिष्ठ होय. १३. दक्षकन्याविशेष. १४. इच्छा.

मो[1] हावयासि ज्यांतें [2]शक्रप्रेषित [3]वराप्सरा नटल्या, ।
[4]झटल्या; [5]उर्वश्यादि स्त्रीरत्नें निर्मितां जिहीं[6] [7]फटल्या. ॥ ४६
[8]**भ** सित करिति तापवि जो [9]काम तया रोषदृष्टिनेंचि पटु, ।
रोष न जाळिति, जाळी, जरि निपटी सुतप, म्हणति 'हूं निपटु.'॥४७

---

१. तपोभंग करून ज्या नरनारायणांस मोहित करण्यासाठीं. २. इंद्रानें पाठविलेल्या. ३. श्रेष्ठ अप्सरा. (देवांगना.) [अप्सरा ह्या समुद्रमंथनकाळीं अप् म्ह० उदक यापासून उत्पन्न झाल्याः— 'अप्सु निर्मथनादेव रसात्तस्माद्वरस्त्रियः । उत्पेतुर्मनुजश्रेष्ठ तस्मादप्सरसोऽभवन् ॥.' ह्या गंधर्वांगना असून स्वर्वेश्या आहेत. ह्या इंद्राच्या दासी असून त्याला कोणाच्या तपाचें भय वाटलें म्हणजे तपोभंग करण्याच्या कामीं मोठ्या कुशल, म्हणून त्याच्या आज्ञेनें ह्याच जावयाच्या आणि कार्यसिद्धि करून परत यावयाच्या. उर्वशी, मेनका, रंभा, घृताची, तिलोत्तमा, सुकेशी, मंजुघोषा इत्यादि प्रमुख सुरवेश्या होत. बाणकवीनें यांचीं चवदा कुळें असल्याविषयींचा उल्लेख 'कादंबरी'ग्रंथांत केला आहे. ४. सजल्या, नटून तयार झाल्या व त्यांनीं यत्नही करून पाहिला. ५. उर्वशी—नरनारायण मुनींच्या ऊरुसमीपस्थ भागापासून (मांड्यांपासून) उत्पन्न झाली म्हणून या स्वर्वेश्येस 'उर्वशी' असें नांव इंद्रानें ठेविलें. हिची कथा पुराणांत वर्णिली आहे तीः—बदरिकाश्रमीं राहून तप करणाऱ्या नरनारायणांचें इंद्रास भय पडलें. तेव्हां त्यांस विघ्न करण्यासाठीं इंद्रानें वसंत, काम आणि देवांगना यांस नित्याप्रमाणें पाठविलें. इंद्राच्या आज्ञेप्रमाणें अप्सरांनीं त्या ऋषींला भुलवून टाकण्याचा पुष्कळ प्रयत्न केला, परंतु ते काष्ठलोष्ठाप्रमाणें अगदीं निर्विकार होते. याप्रमाणें त्या सर्वांचे प्रयत्न निष्फळ झाले. तेथील स्त्रियांचें लावण्य पाहून काम आणि अप्सरा यांस लाज वाटली. तेव्हां त्यांनीं परत स्वर्गास जाण्याचा बेत केला. हें जाणून नरनारायणांनीं 'इंद्रासाठीं आश्रमांतील स्त्रियांपैकीं एकीस घेऊन जा' असें सुचविलें. तेव्हां त्यांनीं ऊरुसमीपस्थ स्त्री पाहिजे अशी इच्छा दर्शविली, ती नरनारायणांनीं आपल्या तपःप्रभावानें पूर्ण करून उर्वशीला त्यांजबरोबर पाठविलें. (भागवत—स्कंध ११ अध्याय ४ पहा.) ६. ज्या नरनारायणांनीं (आपल्या मांडीपासून) जेव्हां उर्वशी इत्यादि स्त्रीरत्नें उत्पन्न केलीं असें पाहिलें, तेव्हां त्या देवांगना फार लाजल्या. नरनारायण ह्यांनीं जें तप केलें त्याचा प्रभाव इतका अलौकिक होता कीं अप्सरा त्याचा भंग करण्यास असमर्थ होत्या. नरनारायणांचें सेवन करणाऱ्या उर्वश्यादि परिचारिकांचें लोकोत्तर लावण्य पाहून स्मरसेना ज्या अप्सरा त्यांस फार लाज वाटली. [अवतारमाला—आर्या ३३-३७.] ७. फटल्या=फसल्याप्रमाणें झाल्या. ८. भस्म. ९. जो काम (मदन) तापवि (तप्त करतो, दुःखसंताप देतो) तया (त्या मदनाला) रोषदृष्टीनें (कोपप्रेक्षणानेंच) पटु (शंकरासारखे पुण्यवान् पुरुष, शहाणे पुरुष) भसित करिति (भस्म करून टाकतात.) [आणि] [जो] रोष (क्रोध) [या पटु पुरुषांना—शंकरासारख्या पुरुषांच्या अंतःकरणांत राहून त्यांस] जाळी (जाळितो, संतप्त करतो, क्रोधाग्नि हृदयांत पेटतो) [तो] रोष (त्या क्रोधाला) न जाळिति. [तसेंच हा रोष त्या ज्ञात्या

ग[1] हनप्रताप तो हा रोष न ज्यांच्या[2] शिरे मनीं स्वच्छीं ।
भीतो बहु दूरुनिही पद ठेवाया, जसा करी[3] कच्छीं[4]. ॥ ४८

व त्सा! मग काम कसा आश्रय त्यांच्या[5] तशा मना करिल? ।
करिलक्षहि[6] हो! देवीहरितें[7] आक्रमुनि काय हो करिल[8]? ॥ ४९

ते जस्वी शिशुहि[9] जनकनिकट[10] दुज्या[11] आइनें उरीं विद्धें[12] ।
शब्दशरांहीं करितां, त्यजि गृह[13] होउनि तपोर्जना[14] सिद्ध. ॥ ५०

बा[15] ळा स्वाराधनपथदर्शक[16] सद्दर्शन[17] प्रथम घडवी, ।
नेउनि सिद्धक्षेत्रीं स्वध्यानीं तत्सुबुद्धिला[18] जडवी. ॥ ५१

सु[19] खमूर्तिदर्शन निजस्तवनीं निपुणत्व पदहि दे वरि तें, ।
जें परमर्षिजनमहित[20], नतकामित[21] दे पडों न देव[22] रितें[23]. ॥ ५२

पुरुषांचें] सुतप (उत्तम तप) जरि निपटी (उपटून टाकितो, नाश करतो) [तरि] [हे पटु पुण्यवान् पुरुष] 'हूं निपटु' (बरें तर, क्रोध आमच्या तपाचा नाश करो) [असें] म्हणति (म्हणतात.) [अ० ७ श्लो० ७.] हूं=अनुमतिसूचक अव्यय. या आर्येत कामापेक्षां क्रोधाचा प्रभाव अधिक आहे असें दाखविलें आहे. कृती (पटु पुण्यवान्) पुरुष कामाग्नीचें शमन करूं शकतात, पण त्यांच्या हातून हृदयांत पेटलेल्या दुःसह क्रोधाग्नीचें शमन होत नाहीं–असा भाव.

१. गहन (निर्भेद्य) प्रताप (पराक्रम) ज्याचा असा रोष. २. ज्या नरनारायणांच्या शुद्ध मनांत. क्रोध हा नरनारायणांच्या मनांत शिरायाला अतिशय भितो, तेव्हां तेथें मदनाचा प्रवेश होणें अशक्य होय. ३. गज. ४. जलप्रायदेशांत. कच्छ=पाणथळीचा देश. ५. त्या नरनारायणांच्या. ६. गजाचें लक्ष, एक लाख हत्ती. ७. देवीच्या सिंहातें, भवानीच्या सिंहातें. ह्या अर्थाला मूळांत आधार नाहीं, हें पंतांच्या कल्पनास्फूर्तीचें दर्शक होय. ८. धांवील. ९. बालक (ध्रुव). १०. बापाच्या समीप (उत्तानपादाच्या समीप). ११. मातेच्या सवतीनें. (या दुसऱ्या मातेचें नांव सुरुचि. ध्रुवाची माता सुनीति आणि सापत्न भ्राता उत्तम.) १२. क्षतयुक्त. १३. गृह सोडून यमुनातीरस्थ मधुवनांत तप करण्यासाठीं गेला. १४. तपातें संपादन करण्याविषयीं. १५. बाळा. १६. आपुलें आराधन करण्याचा मार्ग दाखविणारें. १७. (ईश) सत्+दर्शन=साधु+भेट=नारदमुनीचें दर्शन बाला (मुला ध्रुवाला) घडवी–असा अन्वय. १८. त्या ध्रुवाच्या उत्तम मतीला. १९. सुखकारक जी देवाची तनु तिचें दर्शन. २०. मोठमोठ्या मुनिजनांनीं पूजित. २१. नम्र झालेल्याचें इच्छित. २२. देव (विष्णु) [ध्रुवाला] सुखमूर्तिदर्शन (सुखकारक जी देवाची तनु तिचें दर्शन) दे, निजस्तवनीं निपुणत्व (देवाची स्तुति करण्याचे कामीं कुशलत्व) [दे], वरि (आणखी) जे परमर्षिजनमहित (श्रेष्ठ ऋषिजनासही मान्य) तें पद (स्थान)हि [दे]. सारांश–देव नतका-

दे ता झाला [1]ध्रुवगति देव [2]ध्रुवबालकासि [3]अवतारी, ।

मित (भक्तांचें इष्टमनोगत) रितें पडों न दे (निष्फळ करीत नाहीं, सफळ करतो). विशेष विधान पूर्वी करून त्यापासून हें सामान्य विधान केलें आहे म्हणून या गीतींत 'अर्थांतरन्यास' नामक अलंकार झाला आहे. विशेष गोष्ट सांगून तिला बळकटी आणण्यासाठीं म्हणजे तिचें समर्थन (दृढीकरण) करण्यासाठीं सामान्य गोष्ट सांगितली म्हणजे 'अर्थांतरन्यास' झाला. जसें:—'श्रीसत्यधर्म रक्षाया सोडिली सत्वर क्षिती, । कीं साधुपुत्र ताताचें सर्वस्वें सत्व रक्षिती. ॥' बापाचें वचन पाळण्यासाठीं रामानें राज्य सोडून दिलें तें ठीकच केलें अशी गोष्ट सांगून त्यावरून त्याच्या समर्थनासाठीं 'सत्पुत्र सर्व संपत्तीची हानि पत्करून बापाचें सत्व राखतात' अशी सामान्य गोष्ट (असा सामान्य नियम) सांगितली आहे. केव्हां केव्हां आधीं सामान्य गोष्ट सांगून नंतर तिच्या समर्थनार्थ विशेष गोष्ट सांगितली असते तेव्हांही 'अर्थांतरन्यास' होतो. याचें लक्षण:—सामान्यं वा विशेषो वा तदन्येन समर्थ्यते । यत्र सोऽ**र्थांतरन्यासः** साधर्म्येणेतरेण वा ॥' (काव्यप्रदीप—दशम उल्लास—कारिका ३३; काव्यमाला—पृष्ठ ४१३) या अलंकारांत जें झालें, तें तसेंच व्हावयाचें किंवा व्हावें अथवा करावें, तसें करणें अथवा होणें, हा सामान्य नियम आहे, असें प्रतिपादन केलेलें असतें. या अलंकाराचीं उदाहरणें पंतांच्या काव्यांत विपुल आहेत:–दुर्बुद्धि आवडे मूढा, गाढवा जेविं गाढवी.' [अनुष्टुब्रामायण—श्लो० ४४.] २३. शरण आलेल्या पुरुषांची इच्छा देव सदा सफळ करतो.

१.अढळगती. या ध्रुवपदाची भृग्वादि ऋषि आणि सप्तर्षि फार प्रशंसा करतात. [अ० ७ श्लो० ८.] २. ध्रुव—उत्तानपादराजास त्याच्या सुनीति भार्येपासून झालेला पुत्र. या राजास सुनीति व सुरुचि अशा दोन भार्या होत्या, त्यांत सुनीति ही नावडती होती, त्यामुळें तिचा पुत्र ध्रुव हाही नावडता होता. एकदां याचा सावत्र भाऊ राजाच्या मांडीवर बसला असतां हाही बसण्यास गेला, पण हें सुरुचीला आवडलें नाहीं व तिनें त्याचा धिक्कार केला. तेव्हां हा रडत रडत आपल्या मातेकडे (सुनीतीकडे) गेला व झालेली गोष्ट तिला सांगितली, तेव्हां तिलाही फार वाईट वाटून ती म्हणाली, 'परमेश्वराची आराधना केल्याशिवाय हें ऐश्वर्य कोठून प्राप्त होणार?' तेव्हां त्याला पश्चात्ताप होऊन लागलाच अरण्यांत जाऊं लागला, इतक्यांत मार्गामध्यें ध्रुवाला नारद भेटले. त्यांनीं 'तूं लहान आहेस, परत जा' असें सांगितलें, पण त्यानें ऐकिलें नाहीं. नारदमुनींस याची दया येऊन त्यांनीं यास एक मंत्र व भगवद्ध्यान यांचा उपदेश केला. अल्पकाळांत यास भगवंतांनीं भेट दिली म्हणून याच्या मनांत स्तुति करावी असें वाटलें; पण सामर्थ्य नसल्यामुळें हस्त जोडून उभा राहिला. तेव्हां हें जाणून परमेश्वरानें त्यास सामर्थ्य दिलें, व यानें स्तुति केली. तीवरून परमेश्वर संतुष्ट होऊन 'तूं छत्तीस सहस्र वर्षें पित्याच्या मागें राज्य कर व या स्थानीं परत ये' असा वर दिला. हें सर्व वर्तमान उत्तानपाद राजास कळलें, व तो समारंभपूर्वक सामोरा येऊन ध्रुवास परत नगरास घेऊन गेला, व त्याला राज्याभिषेक करून आपण अरण्यगमन केलें—अशी कथा आहे. (भागवत—स्कंध ४ अ० ८-९.) ३. हा वत्सलावतार होय.

तो भक्तवत्सल प्रभु दीना घडवूनि दास्यलव[1] तारी. ॥ ९३
वा त्सल्य प्रभुचें बहु बा करुणेचा अगाध अर्णव[2] तो, ।
महिमा न सहस्रास्या[3], मज चतुरास्यासि[4] काय वर्णवतो? ॥ ९४
'**य**[5] ज्ञाचा भोक्ता तो मीच' म्हणे धरुनि मद तया **वे**ना ।
द्विजशापहता 'या' हें सामोरे नरक वदत यावेना? ॥ ९५
न रकीं परि जाऊं दे विप्रांहीं प्रार्थिला न **वे**[6]नातें ।
पुँत्र[7]चि होय तशासीं ऐसें नच लावितिल नवें नातें[8]? ॥ ९६
मो क्षप्रदपद तो **पृ**थु यश करि चुकवूनि नरक **वे**नाचें, ।
हें चरित गा निवुनि तूं निववाया देव नर कवे[9]! नाचें. ॥ ९७
भ[10] व्यार्थ त्रिजगाच्या वत्सा! **पृ**थु देव गा! इला [11]दुहिता ।
हे ज्याची घे द्रव्य, क्षीर जसा गोप गाइला [12]दुहिता. ॥ ९८
ग[13] लिताखिलविक्रिययतिपति भगवान् ऋ[14]षभदेव **ना**भिज गा[15]! ।
देव **सु**देवीनंदन म्हणती ज्याची सुकीर्ति '**ना**[16]भि' जगा. ॥ ९९

---

१. दास्याचा लेश. २. सागर. ३. शेषास. ४. चतुर्मुखास. (ब्रह्मदेवाला.) ५. यज्ञाचा भोक्ता तो मीच (आहें) [असें] मद धरुनि (सगर्व होत्साता) [जो वेनराजा] म्हणे– तया द्विजशापहता वेना (त्या ब्राह्मणाच्या शापानें दग्ध झालेल्या वेनराजाला) [वेनराजानें धर्ममार्गाचें उल्लंघन केलें म्हणून त्याला ब्राह्मणांनीं शाप दिला व त्या शापामुळें वेनाचें बल व ऐश्वर्य नष्ट झालें अशी कथा आहे.] 'या' (यावें, यावें, चलावें) हें (असें) वदत (म्हणत) सामोरे नरक यावे ना? (वेनराजाला 'चला चला' असें म्हणत नरक सामोरे आल्यावांचून राहतील काय?) [वेनराजानें धर्मोल्लंघन केलें तेव्हां त्यास नरक सामोरे आले व 'चला' असें म्हणूं लागले–असें तात्पर्य. वेन हा अंगराजाचा पुत्र. हा फार दुष्ट होता म्हणून विप्रांनीं यास शापदग्ध केलें.] ६. विप्रांहीं प्रार्थिला (ब्राह्मणांनीं प्रार्थिलेला असा देव–ईश्वर–प्रभु) वेनातें नरकीं न जाऊं दे–असा अन्वय. ७. विप्रप्रार्थनेस अनुसरून ईश्वरानें वेनाच्या पोटीं पृथु नामक अवतार घेतला. [अ० ७ श्लो० ९.] पृथूनें आपल्या पित्याचें (वेनाचें) नरकवासगमन चुकवून संरक्षण केलें. ८. नातें लावणार नाहीं काय? ९. हे पंडिता. १०. कल्याणार्थ. ११. ही इला (पृथ्वी) ज्याची (ज्या राजाची) दुहिता (कन्या) तो. १२. दोहनकर्ता. १३. गलित आहेत संपूर्ण विकार ज्यांचे अशा संन्याशांचा पति. १४. ऋषभदेव=हा नाभि नामक राजर्षीला मेरुदेवी नामक भार्येच्या पोटीं झालेला पुत्र. हा महान् योगी आणि तत्त्ववेत्ता होता. १५. गा! (अगा!) वत्सा! (नारदा!) गाइला दुहिता गोप (गायीचें दुध काढणारा गवळी) जसा क्षीर (दुध) घे (घेतो) तसा–त्रिजगाच्या भव्यार्थ (प्रजेच्या हितासाठीं) देव पृथु (श्रेष्ठ असा पृथुनामक राजा) हे इला ज्याची दुहिता (ही पृथ्वी ज्याची कन्याच म्हणावयाची) तो द्रव्य घेता झाला. १६. भिऊं नको.

व तें मत्सत्र, तदा प्रकटे प्रभु जेंवि तोक, विश्वास ।
तो पाळी, सोडी हयवदन श्रुतिरूप तो कवि श्वास. ॥ ६०
ते वेद प्रभु रक्षी जे मन्मुखगलित भयदलयकाळीं, ।
भेटे मनुला होउनि मत्स्य करि विहार नदनदीपाळीं. ॥ ६१
वा हे मंदर पृष्ठीं, मथिता क्षीराब्धि होय कच्छप हा, ।
सुखकर नगघर्षण ज्या निजवि, गमे हें चरित्र अच्छ पहा. ॥ ६२
सु यश असुनि जड तेंही, होय सकळलोकपाळ कांसव, दे ।
जो भक्त वरिल दुसरे मळवाया तो कपाळ कां सवदे. ॥ ६३

---

१. मीं (ब्रह्मदेवानें) केलेला यज्ञ (सत्र), माझा यज्ञ. (अ० ७ श्लो० ११.) २. हयग्रीव. ३. वेदरूप. [हयग्रीव श्वासोच्छ्वास करीत असतां याच्या नाकांतून सुंदर वेदवाणी उत्पन्न झाली.] ४. माझ्या मुखापासून गळलेले. ५. भयंकर प्रलयसमयीं, युगाच्या अंतकाळीं. ६. हा मत्स्यावतार वैवस्वत मनूच्या दृष्टीस पडला होता. ७. मत्स्यरूप ईश्वरानें उदकामध्यें आनंदानें विहार केला. [हें मत्स्यावतारचरित्र होय. अवतारमाला—आर्या ५९-६४.] ८. समुद्रीं. ९. पर्वतविशेष. १०. देव व दैत्य यांनीं मिळून अमृतप्राप्तीसाठीं क्षीरसागराचें मंथन केलें तेव्हां देवानें कूर्मरूप धारण केलें. [अ० ७ श्लो० १३.] व पाठीवर मंदरपर्वत धरला. ११. कांसव. १२. पर्वताचें घर्षण (घांसणें.) १३. ज्या देवाला (कच्छपाला) सुखकर नगघर्षण निजवि=पाठीवर पर्वत फिरत असल्यामुळें त्याच्या घर्षणानें कंडूशमन होऊन देवाला निद्रा आली. १४. हें कूर्मावतारचरित. [अवतारमाला—आर्या ६५-६९.] १५. स्वच्छ. १६. [समुद्रमंथनाच्या कामांत] सुयश (उत्तम यश) जड (अप्राप्य) असुनि (असतां) तेंही (तें सुयश सुद्धां) सकललोकपाळ दे (सकलजगत्पालक ईश देता झाला.) [तें देण्यासाठीं सकललोकपाल] कांसव होय (सकल लोकाचा पालक असा प्रभु कूर्मरूपधारी झाला) [भक्तांचे मनोरथ पुरविण्यास समर्थ आणि उद्युक्त असा जर प्रभु आहे तर] जो भक्त (जो पुरुष ईश्वराचा भजक आहे) तो [भक्त.] कपाळ मळवाया (कपाळाला कलंक लावण्यासाठीं, कपाळीं दुःखभोग लिहितील असे) दुसरे सवदे (इतर व्यापार, भक्तिव्यतिरिक्त अन्य व्यापार) कां वरिल? (कां स्वीकारील? तो भक्तीशिवाय अन्य व्यापाराचा अंगीकार करणार नाहीं—असें तात्पर्य. आपल्या कपाळीं दुःखभोग आणतील अशा गोष्टी न करतां भक्त केवळ हरिभक्तीच करील.) भगवद्भक्तीनें सुकृतदुष्कृताचा नाश होतो आणि इतर व्यापारांनीं (कृत्यांनीं) सुकृतदुष्कृतानुसारें प्रारब्धभोग कपाळीं लिहिले जातात. हे इतर व्यापार प्रारब्धभोग कपाळीं लिहून कपाळ मळवितात. तेव्हां जो खरा भगवद्भक्त आहे तो भगवद्भक्तिशिवाय अन्य व्यापार (दुसरे सवदे) करणार नाहीं.

दे वांचें भय हरि[१] हेरि[२], हरि[३]! हरि! हरिरूप[४] उग्र घे, **दि**तिज्या[५]।
प्रभु नखरांहींच[६] चिरी, तिळही न पविप्रहार[७] भेदिति ज्या[८]. ॥ ६४
वारणवर[९] वारिजकर[१०] विनवी धरिला सरांत[११] जो नक्रें[१२]।
त्यातें स्वकरें उद्धरि **ह**रि अरिचें[१३] मुख विदारुनी चक्रें. ॥ ६५

---

१. विष्णु. २. हरण करी. ३. खेदाचें अनुकरण. ४. सिंहरूप. ५. दितिपुत्राला, दैत्याला, हिरण्यकशिपूला. ६. तृतीयेचा 'हीं' हा प्रत्यय बहुतकरून कवितेंत मात्र येतो. ७. वज्रप्रहार. ८. ज्या दितिजाला. [हें तेराव्या नृसिंह नामक अवताराचें वर्णन आहे. अवतारमाला—आर्या ७०-७४.] ९. गजश्रेष्ठ. १०. वारिज (कमळ) आहे करीं (शुंडेंत) ज्याच्या तो. ११. सरोवरामध्यें. [अ० ७ श्लो० १५.] १२. सुसरानें. क्षीरसागरांत त्रिकूट नामक एक पर्वत होता. त्याच्या खालच्या तटावर वरुणाचें ऋतुमत् नामक उद्यान होतें आणि त्यांत एक अत्यंत रमणीय सरोवर होतें. तेथें उन्हानें संतप्त आणि तृषार्त असा एक गजेंद्र आपल्या कळपासह पाणी पिण्यासाठीं आला. तो सरोवरांत प्रवेश करून तेथील पाणी यथेच्छ पिऊन बाहेर येऊं लागला, तों त्याला एका सुसरानें पकडिलें, तेव्हां त्यानें नक्राच्या हातांतून सुटण्याचा होता तेवढा यत्न केला, परंतु मगरमिठी सुटेना. त्याची सुटका करण्यासाठीं इतर गज, गजस्त्रिया, आणि कलभ (गजशावक) यांनींही पुष्कळ प्रयत्न केला, पण नक्रापुढें त्यांचेंही कांहीं चालेना. या उद्योगांत हजार वर्षें गेलीं आणि सर्व उपाय हरले. अखेरीस निरुपाय होऊन गजेंद्रानें हें प्राणसंकट टाळण्यासाठीं ईश्वराचा धांवा केला. (अध्याय ३ श्लोक २-२९.) 'मी ग्राहापासून मुक्त होऊन टाळण्याची इच्छा करीत नाहीं, तर अज्ञानमोक्षाची इच्छा करतों' इत्यादि स्तोत्र ऐकून प्रसन्न होऊन श्रीभगवान् हरि प्रकट झाला. त्याला पाहतांच 'हे नारायण! अखिलगुरो! भगवन्! नमस्ते' असें दीनवाणीनें बोलून गजेंद्रानें सोंडेनें एक कमळ उपटून भक्तिभावानें त्याच्या प्रीत्यर्थ वर आकाशांत फेंकून दिलें. तेव्हां त्या पीडिताला पाहून विष्णूला दया आली. त्यानें एकदम गरुडावरून उतरून सग्राह गजेंद्राला सरोवराच्या बाहेर काढून, चक्रानें नक्राचें तोंड कापून त्यास सोडविलें. (अ० ३ श्लो० ३३.) हा नक्र म्हणजे देवल ऋषीच्या शापानें नक्र झालेला हूहू नामक गंधर्व होय. यानें ईशस्तव केला तेव्हां हा शापमुक्त होऊन गंधर्वलोकास परत गेला. गजेंद्र हा पूर्वींचा द्रविडदेशाचा इंद्रद्युम्न नामक राजा होय. हा विष्णुव्रतपरायण असून मलयाचलावर तपश्चर्या करीत असतां, तेथें एकदां सशिष्य अगस्त्यमुनि आला. त्याचा यानें ध्यानस्थ असल्यामुळें प्रत्युत्थानादि आदरसत्कार केला नाहीं. तेव्हां मुनीला राग आला. 'हा असाधु दुरात्मा विप्रांचा अपमान करणारा गजासारखा स्तब्धमति आहे. तेव्हां हा गज होवो' असा त्यानें शाप दिला. (अ० ४ श्लो० १०.) परंतु मुनीची प्रार्थना केली तेव्हां त्यानें 'विष्णु तुझा उद्धार करील,' असा उच्छाप देऊन समाधान केलें नंतर इंद्रद्युम्न हा आत्मस्मृतिविनाशिनी अशा कुंजरयोनींत जन्म पावला. पुढें भगवत्स्पर्शानें अज्ञानबंधमुक्त होऊन भगवद्रूप झाला. (अ० ४ श्लो० ६.) अशी कथा आहे. [भागवत—स्कंध ८ अध्याय २-४.] १३. नक्राचें.

य ज्ञांत त्रि[1]पदक्षिति मागुनि मग **वा**मन च्छळी [2]बळिला, ।
प्रभु **ब**ळिनेंचि, बहुमतें प्रभुनें **ब**ळि भक्तराज न च्छळिला. ॥ ६६
न म्रास [3]तुजहि सांगे [4]हंस प्रभु [5]भक्तियोग [6]ओळोन ।
[7]भागवतहि हें मिळतें बा! [8]हरिजनपदरजांत लोळोन. ॥ ६७
मो डुनि [9]कुपथ, सुपथ [10]मनुरूप **मु**कुंद प्रवर्तवी, तनया! ।
तेजश्चक्रें रक्षी सनयाचि [11]जना, वधूनि [12]वीतनया. ॥ ६८
भ गवान् [13]धन्वंतरि **ह**रि [14]परिहरि [15]अत्युग्र रोग, ओ[16]खद या ।
प्रभुचें नामचि, देती याची मातेपरीस तो[17]ख दया. ॥ ६९
ग र्वी [18]ब्रह्मद्रोही क्षत्रिय खळ एकवीसदा [19]खपवी, ।
या [20]**श्री**भृगुरामाच्या परशुसि करितो प्रणाम लाख [21]पवी. ॥ ७०

---

१. तीन पदें भूमि. २. प्रऱ्हादाचा पौत्र बळी यानें दैत्यकुलगुरु शुक्राचार्य यांच्या साहाय्यानें विश्वजिन्नामक याग करून इंद्राचें पद बळकाविलें. तें त्यास परत देण्यासाठीं श्रीविष्णूनीं वामनरूप धारण केलें आणि बटुवेषानें बळीपासून यज्ञ करीत असतां त्रिपादभूमिदानाचें उदक स्वहस्तीं घेतलें. बळीनें उदक सोडतांच वामनानें विराटरूप धारण करून एका पावलांत पृथ्वी आणि दुसऱ्या पावलांत आकाश व्यापून, तिसरें पाऊल बळीच्या मस्तकीं दिलें आणि त्यास पाताळीं लोटिलें. ही कथा श्रीमद्भागवताच्या आठव्या स्कंधांत अध्याय १६-२३ यांत वर्णिली आहे. ३. शरण आलेल्या तुला (नारदाला). ४. हंसावतारी. ५. भक्तियोगाचा उपदेश. ६. वळून. (ओळणें=वळणें, प्रसन्नतेनें वळणें.) ७. भागवत—भागवत नामक ज्ञानमार्ग, आत्मतत्त्व प्रत्यक्ष करून देणारें ज्ञान. [अ० ७ श्लो० १९.] भगवान् हंसप्रभु भागवत नामक आत्मतत्त्वप्रकाशक ज्ञान स्वभक्तांला उपदेशद्वारा देता झाला. [अवतारमाला—गीति ८५-८८.] ८. भगवद्भक्तांची जी पदधूळी त्यांत. ९. दुष्ट मार्ग. हें मन्वंतरावताराचें वर्णन आहे. १०. मनुवंशधर. ११. साधुजनांला. १२. गेला नय ज्याचा त्याला, अनयमार्गवर्ती जनाला. १३. हा अठरावा अवतार. १४. निवारी, नष्ट करी, आयुर्वेद प्रवर्तित करून लोकांच्या भयंकर रोगांचा नाश करतो. १५. फार भयंकर. १६. या प्रभूचें नामचि [अत्युग्र रोगावर] ओखद [होय]—असा अन्वय. याच्या नामस्मरणानेंच महान् महान् रोगांचें हरण होतें. [अवतारमाला—आर्या ९३-९७.] १७. संतोष. १८. ब्राह्मणांचे द्वेषी. १९. उत्पाटन करी, नाश करी. २०. हें श्रीपरशुरामावताराचें वर्णन होय. परशुराम हा जमदग्नीचा पुत्र. याच्या कामधेनूचें हरण बलात्कारानें सहस्रार्जुनानें केलें, तेव्हां पित्याच्या आज्ञेवरून परशुरामानें माहिष्मती नगरीस जाऊन सहस्रार्जुनाचा पराभव केला, या योगानें त्याचे पुत्र फार चवताळले व त्यांनीं जमदग्नीचा शिरच्छेद केला. ही जमदग्निवधाची गोष्ट रेणुकेनें परशुरामास कळविली. तेव्हां पृथ्वीवर कंटकाप्रमाणें वाढलेल्या क्षत्रियांचा नाश परशु-

व[1] सुधापतिपति भगवान् [2]गुर्वर्थत्यक्तराज्यपदकाम ।
राम [3]स्वाश्रितकल्पद्रुम ज्याचें पापतापहर नाम. ॥ ७१
ते [4]**कुंभकर्णद**शमुखमुख राक्षस परम उग्र [5]जगदहित, ।
[6]तद्वधचरितयशोलव होय [7]भवमहागदघ्न [8]अगद हित. ॥ ७२
वा [9]रिधिमाजि महाद्भुत त्यावांचुनि करिल कोण बा! सेतु? ।
वानर सहाय मुक्तिस [10]अत्याश्चर्य प्रताप हा हेतु[11]. ॥ ७३
सु[12] दुजा, **व** वर्ण [13]आधीं, मग **दे**व, सुता! [14]जयाचिया [15]नामीं ।
तत्सुतयश जें सुगतिस्तव वरुनि, असें तयाचिया नामीं. ॥ ७४

रामानें आपल्या परशूच्या योगानें एकवीस वेळां केला–अशी कथा आहे. [हा ब्रह्मदेवाचा व नारदाचा संवाद ज्यासमयीं झाला त्यासमयीं धन्वंतरी व परशुराम असे दोन अवतार चालू होते. वराह नरहरी इत्यादि अवतार झाले होते व रामकृष्णादि अवतार व्हावयाचे होते.] २१. वज्र. पवी परशुला लाख प्रणाम करतो=इंद्राचें आयुध जामदग्न्याच्या आयुधापुढें आपलें हीनबलत्व कबूल करून लोटांगण घालतें. परशूचें श्रेष्ठत्व वज्र मान्य करतें–असा भावार्थ.

१. पृथ्वीपति जे राजे त्यांचा पति. २. गुरू+अर्थ+त्यक्त+राज्यपद+काम=पिता दशरथ+साठीं+टाकला+राजसिंहासन+इच्छा=बापाच्या करितां ज्यानें राज्याची इच्छा धरिली नाहीं असा. ३. आपल्या आश्रितांचा कल्पवृक्ष. ४. कुंभकर्णरावणप्रमुख. ५. विश्वशत्रु. ६. रावणवधचरितरूप कीर्तीचा लव तो. ७. भव+महा+गद+घ्न=संसार+मोठा+रोग+नाशक=संसारमहारोगनाशक. ८. औषध. ९. सागरामध्यें. १०. अति आश्चर्यरूप. ११. ज्याचा प्रताप हा मुक्तीस हेतु होय–असा अन्वय. गीति ७१, ७२ व ७३ यांत इक्ष्वाकुवंशोद्भव रामाचें वर्णन आहे. [अध्याय ७ श्लोक २३, २५.] १२. पहिला वर्ण 'व' आणि दुसरा वर्ण 'सु' ज्याच्या नामास आहेत असा जो देव म्हणजे वसुदेव त्याच्या पुत्राच्या (कृष्णाच्या). १३. 'वसुदेव' असा शब्द साधून मंत्राक्षरही साधावें यास्तव इतका खटाटोप **पं**तांनीं केला आहे. 'वसुदेव' या शब्दावरील कोटीप्रमाणें अन्य शब्दांवर केलेल्या कोट्या **पं**तांच्या काव्यांत क्वचित् आढळतात:—(१) 'आधीं **भ** या वर्णापुढें यावे **रत** स्यापी असें' (सूरारामायण), (२) 'यन्नामीं आधि **त्रि** प्रांतीं **टा** हा **ज**कार त्यांमध्यें' (दिव्यरामायण), (३) '**ण** पुढें मागें **रा** ज्या, तो राय कपीस भेटला वानी' (मात्रारामायण), (४) 'सुमृदु सुमंत्रीहि म्हणुनि त्यांशि म्हणे नामगा नसावी **त्री**' (वनपर्व–अध्याय १३), (५) **स्वाया मित्रा** तीचे दोघे तज्जन्में धन्यला तो घे' (सौम्यारामायण), (६) 'यन्नामीं **लक्ष्मा**च्या अंतीं **ण** प्रेमानें घ्यावा संतीं' (सौम्यारामायण), (७) 'होतें आंगीं **भट**पण त्याचा आला उमाप तिटकारा । त्यांतचि मला दुसरिया देता झाला उमापति **ट**कारा ॥' (अनुशासनपर्व–अध्याय ६ गीति ३२), (८) 'दवडाया दीनांचीं दुःखें सर्वस्व वेचिती संत । संतप्ता निववी घन वन शृंगारीं **य**कारवान् संत ॥' (नामरसायन ६४), (९) 'प्र-

दे व श्रीबळराम प्रभु [1]असुरजनाद्रिकदनकर पवि तो ।
बा ! [2]तत्प्रताप [3]सन्मुख शोभवितो दुष्ट वदन करपवितो. ॥ ७५
वा सव [4]पर्वतभेत्ता तो प्रभु तैसाचि [6]शत्रुमदभेत्ता, ।
[7]खळधेनुकप्रलंब[8]द्विविदेल्वलबल्वलादिवधवेत्ता. ॥ ७६
[9]**यं** दुकुलकमलद्युमणि श्रीकृष्णप्रभुहि मज्जनक थानीं ।
स्वयशीं मन मुल [10]लांविल, [11]करिल फिकें अमृतमज्जन कथानीं. ॥ ७७

थमचि सुगल मथी त्या; ज्याच्या नामांत **या** पुढें ये **तु**.' (द्वितीय स्तोत्ररामायण–गीति ५६ उत्तरार्ध), (१०) '**य** प्रथम बंधु जीचा देह अशी भेटली पथीं रामा । ते प्रेमें अनुलेपन देउनि दे तोष माधवा रामा ॥' (मंत्रभागवत–दशमस्कंध, गीति ५१७). यासारखीं थोडीं बहुत स्थळें **पं**तांच्या काव्याचें पर्यालोचन केलें असतां आढळणार आहेत. वृत्तसुखार्थ असा खटाटोप करणें कांहीं ठिकाणीं भाग पडलें आहे आणि कांहीं ठिकाणीं तो मुद्दाम केला आहे ही गोष्ट विसरतां कामा नये. १४. सुता! (हे बाला नारदा!) जयाचिया नामीं (ज्याच्या नांवाच्या ठायीं) आधीं **व** वर्ण, दुजा **सु** (वर्ण), मग **दे**व (ज्याच्या नांवांत प्रथम वर्ण व, दुसरा वर्ण सु, नंतर देव अशीं अक्षरें आहेत असा जो वसुदेव) तत्सुतयश (त्याच्या पुत्राचें–कृष्णाचें यश) जें (त्याच्या पुत्राचें जें यश तें) वरुनि (स्वीकारून, गाऊन) सुगतिस्तव (सुगति–उत्तम गति–मुक्ति प्राप्त व्हावी या कारणास्तव) तयाचिया (त्याच्या–त्या कृष्णाच्या) नामीं (नामस्मरणीं, नामग्रहणीं, नामामृतीं) असें (रहा, वस, रममाण हो.) येथें उत्तरार्धांतील 'नाम' हा शब्द 'नामस्मरण' या अर्थीं योजिला आहे असें समजलें पाहिजे. १५. नांवाचे ठायीं.

१. दैत्यांच्या समुदायाचा नाशकर्ता. असुर+जन+अद्रि+कदनकर=दैत्य+समुदाय+पर्वत+नाशकर=दैत्यसमुदायरूप पर्वताचा नाशकर्ता. (पवि=वज्र.) २. त्या बलरामाचा पराक्रम. ३. साधुवदन. ४. इंद्र. ५. पर्वताचें भेदन करणारा. [इंद्र आपल्या वज्रानें पर्वतांचा नाश करतो अशी प्रसिद्धि आहे.] ६. शत्रूचा नाश करणारा. ७. एक सुप्रसिद्ध असुर. ८. द्विविद नामक वानर. [अ० ७ श्लो० ३४.] ९. यदुवंश कमलाचा सूर्य. १०. येथें 'लाविल' 'करिल' 'हरिल' 'मोहिल' इत्यादि भविष्य कालाचीं रूपें योजिलीं आहेत, त्याचें कारण हा श्रीकृष्णावतार पुढें व्हावयाचा होता हें होय. ११. [ब्रह्मदेव नारदास म्हणतोः–हे नारदा!] [जसें] मुल (लहान बालक) थानीं (स्तनीं, मातेच्या स्तनीं) मन [लावितें]=लहान बाळ दुग्धप्राशनांत जसें गढून जातें [तसें] मज्जनक (माझा–ब्रह्मदेवाचा बाप, कृष्ण हा विष्णूचा अवतार यास्तव विधीचा पिता) यदुकुलकमलद्युमणि (यदुवंशकमलाचा दिनकर) श्रीकृष्ण प्रभुहि मन स्वयशीं लाविल (भगवान् श्रीकृष्ण आपल्या भक्ताचें मन निजयशांत मग्न करील, श्रीकृष्णयशोमृतग्रहणांत भक्ताचें मन गढून जाईल असें करील). अमृतमज्जन (अमृताचें स्नान) [तो श्रीकृष्ण प्रभु] कथानीं फिकें करिल=कथामृताचे गोडीनें अमृतस्नानही फिकें (हलकें, कमी मोलाचें) करील; श्रीकृष्णकथामृतापुढें खरें अमृत फिकें पडेल–असा अन्वयार्थ.

न व नव निरुपम चरित प्रकट करिल, हरिल भूमितापातें, ।
[1]श्रीमूर्ति निरखि त्याचें नच एकहि चळवळेल बा! [2]पातें. ॥ ७८

मो हिल [3]महातपोधन योगी ज्ञानीहि बाललीलाहीं, ।
पीतिल नेत्रें त्या स्वश्रीला स्वजनार्थ चाललीला हीं. ॥ ७९

भ रुनि विष स्तन पाजी जी त्याही [4]पूतनेसि तारील, ।
मथिल [5]तृणावर्तादिक जे, त्यांचें जन्ममरण [6]सारील. ॥ ८०

ग गनीं उचलुनि ने त्या [7]असुरासि गळा पिळूनि पाडील, ।
उपडिल [8]गुरु अर्जुनतरु [9]शकट पडेसें पदेंचि ताडील. ॥ ८१

[10]**वँ** क अघ मारिल, दंडिल [11]कालिय, [12]दवपावकासि भक्षील, ।
उचलुनि **गो**वर्धन नग [13]वृष्टिप्रलयीं व्रजासि रक्षील. ॥ ८२

ते ते गोपवधूंचे संकल्प प्रभु [14]अशेष पुरवील, ।
खल [15]शंखचूड [16]केशी **वृ**षभासुर जे तयां न उरवील. ॥ ८३

[17]**वाँ** रणवर्य [18]कुवलयापीड मथिल, [19]मल्ल कंस खपवील, ।
[20]उंजरुनि [21]कुब्जेसि, तिच्या रूपें भाग्यें **र**तीस लपवील. ॥ ८४

सु ख [22]गुरुला [23]गुरुपुत्रानयनें देउनि उदंड निववील, ।
किंबहुना [24]अहिविषहत शिशुसे श्रित मोहनिहत जिववील. ॥ ८५

---

१. भगवंताची मूर्ति. २. नेत्रछद, पापणी. जो श्रीकृष्णभक्त असेल त्याचा नाश होणार नाहीं—असा भाव. ३. मोठें आहे तपोरूप धन ज्यांचें असे (योगी). ४. बृहद्दशम—पूर्वार्ध—अध्याय ६ काव्यसंग्रहग्रंथमाला पृ० १६-१९ पहा. ५. तृणावर्ताच्या वधाची कथा बृहद्दशमाच्या ७ व्या अध्यायांत आहे. यानेंच कृष्णाला वर उचलून नेलें होतें. ६. चुकवील. ७. मोठे. ८. यमलार्जुन नामक वृक्ष. [मंत्रभागवत—दशमस्कंध—आर्या १८१-१८२.] ९. गाडा. शक्नोति भारं वोढुं जीवयितुं वा इति शकटः । शकट=शकटासुर. १०. बक. ११. क्षेमेंद्रप्रणीत 'दशावतारचरित'—कृष्णावतार—श्लोक ४४-५० पहा. १२. अरण्यसंबंधी अग्नीला. १३. इंद्रानें केलेल्या जलवृष्टीच्या प्रलयीं. १४. सकल (सफल करील). १५. अवतारमाला—आर्या २३३-२४२ पहा. १६. कृष्णावतार—श्लोक ९५-१०० पहा. १७. गजांत श्रेष्ठ. १८. गजविशेष. कंसाचा गज. [दशावतारचरित—कृष्णावतार—श्लोक १८१-१८२.] १९. चाणूरादि मल्ल. २०. सरळ करून. २१. कुब्जा ही कंसाची दासी. ही वांकडी होती ती कृष्णकृपेनें सरळ झाली. [मंत्रभागवत—स्कं० १० गी० ५१७-५२०.] २२. सांदीपनि. २३. सांदीपनाच्या पुत्राच्या आणण्यानें. २४. सापाच्या विषानें मारलेले.

दे शीं देशीं निजजन चातक त्यांवरि यशोब्द[1] वर्षविल, ।
देवद्विजारि[2] रडविल, धर्मनयपर स्वभक्त हर्षविल, ॥ ८६

वा हिन्यधिपशतांचें[3] हनन परस्पर रणांत करवील, ।
सुगतिसुकीर्तीकरवीं समरहतस्वाहितांसि[4] वरवील. ॥ ८७

य श गात्यां श्रोत्यांतें परिपाळाया जगांत वसवील,[5] ।
अंतीं संतीं स्तविल्या श्रीवैकुंठीं[6] तयांसि बसवील. ॥ ८८

न ष्टायु नष्टमति जे त्यांला द्याया निका मह[7] व्यास[8] ।
प्रभु आपण होइल कीं दीनत्राणीं निकाम[9] हव्यास[10]. ॥ ८९

मो हाया असुर,[11] श्रुतिनिष्ठा[12] त्यांची समूळ उडवाया ।
मयरचितालक्षितगतिपुरसंश्रित ते सुरारि बुडवाया, ॥ ९०

भ र्ता साधुजनांचा कल्पुनि पाखंड वेष, हा शुद्ध ।
मार्ग म्हणेल, श्रुतिमत दूषिल, म्हणतील बुध तया 'बुद्ध.' ॥ ९१

ग[13] रुडस्थ प्रभु कलिच्या अंतीं होईल कल्कि[14] या नावें, ।

---

१. यशस्+अब्द=कीर्तिरूप मेघ. २. देव+द्विज+अरि=सुर+विप्र+शत्रु. ३. सेनाधिपतींचीं शतें त्यांचें. ४. समर+हत+स्व+अहितांसि=रण+मारलेले+निज+शत्रूंला. ५. यशातें जगांत ठेवील. ६. अ० ७ श्लो० ३१ पहा. ७. उत्सव. ८. सत्यवतीसुत. [हें बेविसाव्या व्यासावताराचें वर्णन आहे. अवतारमाला–आर्या २७०-२७४.] नष्टायु (ज्याचें आयुष्य नष्ट झालें आहे—कमी झालें आहे) नष्टमति (ज्याची बुद्धि नष्ट (कमी) झाली आहे) त्यांला (त्या लोकांना) निका मह (केवळ उत्सव) द्याया (देण्यासाठीं) प्रभु (श्रीविष्णु) आपण (स्वतः) व्यास (सत्यवतीपुत्र) होईल, कीं (कारण कीं) [त्याला] दीनत्राणीं (निराश्रिताचें रक्षण करण्याचे कामीं) हव्यास (इच्छानिकाम) (उत्कट) [आहे.] ९. अत्यंत, अतिशयित. [अ० ७ श्लो० ३६.] १०. ध्यास. ११. असुरांच्या (दैत्यांच्या) बुद्धीला मोह (भ्रम) पडावा म्हणून. १२. श्रुतिनिष्ठा (वेदाविषयीं त्या असुरांची भक्ति) समूल (मूळासह) उपडाया (उपटून टाकण्यासाठीं) [आणि] मयरचित+अलक्षित+गति+पुर+संश्रित=मयनामक असुरनिर्मित+लक्षांत न आलेली+गमनरीति+नगर+आश्रित=जें मयासुरानें निर्माण केलेलें (पुर) व ज्याची गति कोणाच्या लक्षांत यावयाची नाहीं अशा पुराचा (नगराचा) आश्रय (केलेले) जे सुरारि (देवशत्रु, दैत्य) त्यांना बुडविण्यासाठीं साधुजनांचा भर्ता (सज्जनपालक असा प्रभु) पाखंड वेष कल्पुनि (रचून) 'हा मार्ग शुद्ध' [असें] म्हणेल [आणि] श्रुतिमत दूषील (वेदप्रतिपादित मार्गाची निंदा करील), तया (त्याला) बुध (ज्ञानी ज्ञाते जन) बुद्ध [असें] म्हणतील—असा अन्वयार्थ. येथें गीति ९०-९१ यांचें युग्मक आहे. [पाखंडधर्माचा पुष्कळ प्रसार करील.] १३. गरुडावर बसलेला. १४. अवतारमाला—आर्या २८३-२९० पहा.

त्यासि [1]सकलपाखंडध्वांतदिवाकर असेंचि [2]वानावें. ॥ ९२

व दलों संक्षेपें हें, क्षितिचे [3]परमाणु गणिल, परि अंत ।
प्रभुवीर्याचा कोणा [4]लागेना, गणुनि भागले संत. ॥ ९३

ते मात्र [5]सुधी जाणति 'माया' इतुकेंचि, जे **अ**जा भजले, ।
[6]मज लेख[7]ज्येष्ठापरि भक्तिप्रेमें सजोनिही सजले. ॥ ९४

[8]**वा** ! त्या [9]परमेशाच्या जाणें मीं दास योगमायेतें ।
कीं भगवान् [10]**भ**व इतुकें ज्ञान भजे जो सदैव त्या येतें. ॥ ९५

सु ज्ञ **प्र**ऱ्हादादिक झाले प्रभुला भजोनि बहु तरते, ।
हेंहि ज्ञान सुदुर्लभ शब्दज्ञानें सजोनि बहुतर ते. ॥ ९६

[11]**दे** वाद्यें मज कथिलें 'श्री**भा**गवत,' स्वयेंचि [12]तुजला हें ।
संक्षेपें म्यांहि, [13]नता कवण गुरु म्हणेल 'न हित गुज लाहें?' ॥ ९७

वा नारदा! सुपात्रीं अर्पुनियां तूं करीं विपुल [14]यातें, ।
होइल हें [15]जीवांचा जो काम प्रमुख त्या रिपु लयातें. ॥ ९८

य द्यपि हे श्री**भ**गवल्लीला [16]मायाश्रया, तथापि कवी ।
ईतें गाउनि तरतो, [17]सुज्ञान मनांत **ह**रिकथा पिकवी.' ॥ ९९

---

१. सर्व पाखंडरूप अंधकाराचा नाशक दिवाकर (सूर्य). २. म्हणावें. ३. कोणी हुशार मनुष्य पृथ्वीच्या परमाणूंची गणना करील. ४. अ० ७ श्लो० ४० पहा. ५. सुधी जे निष्कपट बुद्धीनें व अनन्यभावानें ईश्वरचरणाचा आश्रय करतात व ज्यांवर ईश्वर कृपा करतो ते बुधजन. ६. मज लेखज्येष्ठापरि (लेखज्येष्ठ=देवांत वडील जो मी ब्रह्मदेव त्या माझ्यासारखे जे कोणी) भक्तिप्रेमे सजोनिहि (भक्ति आणि प्रेम यांनीं युक्त होऊन) सजले (ईश्वरास भजण्यास तयार झाले, सिद्ध झाले) [आणि] अजा (ईश्वराला) भजले ते सुधी (ज्ञानी) मात्र 'माया' इतुकेंचि जाणती (त्यांस मायेचा अंत कळत नाहीं, ते हा सर्व प्रकार मायेचा आहे असें समजतात, ज्यापेक्षां ज्यास्त त्यांस कांहीं कळत नाहीं). ७. देवश्रेष्ठापरि. लेख=देव. ८. बा. ९. परम+ईश–त्याच्या. १०. शंकर. (अ० ७ श्लो० ४३.) ११. परमेश्वरानें. १२. तुजला हें (श्रीभागवत) संक्षेपें म्यांहि [कथिलें]–असा अन्वय. [श्लो० ५१.] १३. शरणागताला. नम्राला. 'हित गुज न लाहें' [असें] नता कवण गुरु म्हणेल–असा अन्वय. १४. या श्रीभागवताचा विस्तार कर. १५. जीवाचा जो प्रमुख रिपु (मुख्य शत्रु) काम त्या लयातें (त्याच्या नाशाकारणें) हें (हें भागवतज्ञान) होईल (उपयुक्त होईल, याचा उपयोग होईल). १६. जरी ही भगवंताची लीला मायाश्रय करणारी आहे तरी जो मनुष्य हिचें गायन करतो तो मोहित न होतां तरून जातो. १७. हरिकथा मनामध्यें सुज्ञान (उत्तम ज्ञान, आत्मज्ञान, ब्रह्मज्ञान) पिकवी (उत्पन्न क-

'**न**[1] लिनप्रभवापासुनि [2]मुनि, [3]मुनिपासुनि सुपात्र [4]सुरसा जें ।
तें मज सांगुनि [5]तूंहि स्वयशें, तो जेंवि भूमिसुर, साजें. ॥ १००
मो[6] क्षामरवृक्षाच्या भागवता! [7]आलवालवलयातें ।
सांगा, तुम्हीं मजकडे तापाच्या चालवा लवलयातें.' ॥ १०१
भ गवान् श्रीशुक सांगे, 'ज्या पद्मीं [8]आत्मभव [9]तदाधारा ।
[10]शोधुनि विधि चिंता करि, अमृताची लाधला तदा धारा. ॥ १०२
ग गनीं निकटचि '[11]तपतप' ऐसी [12]सुखहेतु आयके वाणी, ।
[13]जाणों [14]चातक पसरी मुख, सोडी त्यांत मेघ तो पाणी. ॥ १०३
[15]**व** सला त्याचि [16]सरोजीं निश्चळ कोंडूनि तो [17]कवि श्वास, ।

रिते)=हरिकीर्तनाच्या योगानें मनुष्याला आत्मज्ञानाचा लाभ होतो, मुक्तिमार्ग प्राप्त होतो–असा मथितार्थ.

१. ब्रह्मदेवापासून. (अ० ८.) हें राजाचें भाषण आहे. २. नारद. ३. नारदापासून. ४. उत्तम रसाला (अमृताला) सुपात्र (योग्य) असें जें (भागवतज्ञान) तें मला (राजाला) सांगुनि तूंहि भूमिसुर (तूं ब्राह्मण–शुक) स्वयशें (आपल्या यशानें) साजें (शोभायमान हो.) ५. तूं. (शुक.) ६. मोक्षरूप अमरवृक्ष (कल्पवृक्ष) त्याच्या. ७. वृक्षाला पाणी रहाण्याकरितां जें अळें बांधितात त्याचें मंडळ त्यातें. ८. आपली उत्पत्ति. ९. त्या कमळाच्या आश्रयास. १०. ज्या कमलांत आपला जन्म झाला त्या कमलाला आधार कोण याचा शोध करून ब्रह्मदेव चिंता करूं लागला, तेव्हां तो ब्रह्मदेव अमृताची धारा (अमृतरूप ज्ञानाचा लाभ) लाधला (पावला). ११. अ० ९ श्लो० ६ पहा. १२. सुखाला कारण अशी. १३. हें 'उत्प्रेक्षा' नामक अलंकाराचें उदाहरण आहे. १४. पक्षीविशेष. १५. राहिला. १६. कमलांत. [सरोज हा शब्द योगरूढ आहे. 'सरोज' याचा अवयवार्थ 'सरांत झालेलें' असा आहे आणि रूढ किंवा प्रसिद्ध अर्थ 'कमल' असा आहे, आणि कमल सरोवरांत होतें म्हणून तो शब्द 'कमल' या अर्थी 'योगरूढ' आहे. "शब्दाचे सामान्य तीन विभाग करतात. **रूढशब्द, यौगिकशब्द, योगरूढशब्द.** जे शब्द प्रकृति व प्रत्यय यांच्या संयोगानें झाले नसतात, तर जे स्वतःसिद्ध असून संकेतानें म्हणजे रूढीनें त्या त्या अर्थाचा बोध करितात त्यांस रूढ शब्द म्हणतात. जसें घोडा, बैल, झाड इत्यादि. रूढशब्दांसच सिद्धशब्द असेंही कधीं कधीं म्हणतात. ज्या शब्दांचा अर्थ त्याच्या अवयवांच्या अर्थाच्या जुळणीनें उत्पन्न होतो, त्या शब्दांस यौगिक शब्द म्हणतात. जसें प्राणी, सुहृद्, लोहार (लोहकार) इत्यादि. आतां कितीएक शब्द असे आढळतात कीं, त्यांचा यौगिक अर्थ फार व्यापक असतो. परंतु त्यांचा प्रयोग तसा व्यापक न होतां कांहीं विवक्षित व्यक्तींवर मात्र होतो. असल्या प्रकारच्या शब्दांस योगरूढ शब्द म्हणतात. जसें तुरंग, दंति, करणी, कुंभार इत्यादि. या ठिकाणीं तुरंग शब्दाचा अवयवार्थ म्हटला म्हणजे 'तुरं' म्हणजे लवकर व 'ग' म्हणजे जाणारा, असा

त्या [1]गीचा तन्मन धरि मातेचा जेंवि तोकें[2] विश्वास. ॥ १०४

ते उग्र तपश्चर्या [3]दिव्यसहस्राब्द तो [4]करी रमला, ।
बहुधा तेंव्हां [5]नेणे [6]द्रुहिण असे कीं नसे शरीर मला. ॥ १०५

वा सु असा जो देव[7] प्रभु तो वैकुंठ आपुला लोक ।
दावी [8]चतुरास्याला, [9]जेथें भ्रम ताप भय नसे शोक. ॥ १०६

सुं[10] रुचिर [11]भगवद्रूपचि केवळ वैकुंठलोक तो बा! गा! ।
भगवद्रूपचि जेथें [12]पुरुष सकळ शोभती, [13]महाभागा! ॥ १०७

असल्यामुळें 'तुरंग' शब्दाचा एकंदर अर्थ 'लवकर चालणारा' असा होतो; व लवकर चालणारे प्राणी पुष्कळ असतां हा शब्द केवळ घोड्यांस लावण्याची रूढि आहे. याकरतां या शब्दास योगरूढ म्हणावें. तसेंच 'दंति' शब्दाचा यौगिक अर्थ म्हटला म्हणजे ज्यास दांत आहेत असा होतो. परंतु तो शब्द केवळ हत्तींसच लावतात. 'करणी' शब्दाचा अर्थ करण्याचें साधन असा व्यापक आहे. तरी गवंड्याच्या एका विखणावरच त्याचा प्रयोग होतो. त्याचप्रमाणें 'कुंभार' शब्दानें कुंभकरणाचा सामान्येंकरून बोध होत असतां रूढींत तो शब्द एका विवक्षित जातीच्या मनुष्यास मात्र लावतात. याचप्रमाणें + + + 'हिमालय' व 'चक्रपाणी' हे शब्द योगरूढ आहेत असें समजावें. यौगिक शब्द व योगरूढ शब्द यांसच कधीं कधीं साधितशब्द म्हणतात." [कै० वा० कृष्णशास्त्री चिपळूणकरकृत मराठी व्याकरणावर निबंध—पृ० ४८-४९.] १७. ब्रह्मदेव.

१. वाणीचा, आकाशवाणीचा. २. बालक. ३. देवांचीं हजार वर्षें. ४. तो ब्रह्मदेव देवांचीं हजार वर्षेंपर्यंत दिव्य तप करी. ५. न जाणे. ६. ब्रह्मदेव. [द्रुह्यति दुष्टेभ्यः=द्रुहिणः । द्रुह जिघांसायाम् । 'ब्रह्मात्मभूः स्याद्द्रुहिणो द्रुघणश्च पितामहः' इति भागुरिः ।] ७. वासुदेव. ८. ब्रह्मदेवाला. [ब्रह्मदेवानें ईश्वराची आराधना केली तेंव्हां त्यानें त्याला आपला लोक दाखविला. अ० ९ श्लो० ९.] ९. ज्या लोकीं भ्रम (मोह,) ताप (क्लेश) भय [व] शोक (दुःख) नसे. १०. फार सुंदर. ११. भगवंताच्या रूपासारखा. १२. वैकुंठांतील पुरुषांचें वर्णन **'श्रीमद्भागवतां'**त सविस्तर केलें आहे तें असें:— "त्या लोकांत रजोगुण, तमोगुण, किंवा दोहोंनीं भिन्न सत्वगुण मुळींच नाहीं. शुद्ध सत्वगुण मात्र आहे. तेथें कालाचा प्रभाव मुळींच चालत नाहीं. माया देखील तेथें नाहीं. मग दुसरे रागलोभादि विकार नसतील हें काय सांगितलें पाहिजे? त्या लोकांमध्यें भगवद्भक्त मात्र आहेत; व ते देव आणि दैत्य या उभयतांनाही मान्य व पूज्य आहेत. सर्वांचा वर्ण श्याम असून तेजस्वी आहे. सर्वांचे डोळे कमलाप्रमाणें असून वस्त्रें पिवळ्या रंगाचीं आहेत, व कांति उत्तम आहे. सर्व मंडळी सुकुमार असून प्रत्येकाला चार चार बाहू आहेत. त्यांच्या आंगावर चकचकीत उत्तम उत्तम रत्नजडीत पदकांचे अलंकार आहेत. मूळचे तेजस्वी असून अंगावर अलंकार असल्यामुळें ते फार शोभत आहेत. पोंवळें, वैदूर्य (लसण्या) आणि कमल ह्यांप्रमाणें त्यांचें तेज आहे. त्यांच्या कुंडलांचा, किरीटांचा आणि

दे खे **वि**धि त्या लोकीं **श्री**तें[1] **श्री**जानितेंहि[2] तो, भावें ।
वंदी ज्याच्या[3] दासें होउनि बहु तत्समान शोभावें. ॥ १०८
वा[4] रिजनाभ म्हणे[5], 'म्यां तुज हा **वै**कुंठलोक दाखविला, ।
उपदेशुनि करउनि तप शुचि मूर्त ब्रह्मरसचि चाखविला[6]. ॥ १०९
य त्तेंहि मत्प्रसादावांचुनि दुर्लभ **वि**धे! पराला हें ।
माग मज प्रणताच्या[7] सुरतरुला[8], वांछिता[9] वरा लाहें[10].' ॥ ११०
न[11] लिनप्रभव म्हणे, 'मज निज[12] तत्वज्ञानदान[13] ओपावें[14], ।
येणें बद्ध न होइन करितां सृष्टि, प्रसन्न हो, पावें[15].' ॥ १११
[16]**मो** क्षपदप्रद भगवान् **वि**धिस म्हणे[17], 'घे ससाधन[18] ज्ञान ।
माझें गुह्य परम[19] जें काय रहस्यांसमेत[20] विज्ञान[21]. ॥ ११२
भ गवान् सर्गाआधीं[22] मध्यें अंतींहि एक मीच असें[23], ।

माळांचा प्रकाश सभोंवती पडत आहे. अभ्रांच्या ओळी जिकडे तिकडे आल्या असून आकाशामध्यें विजा चमकूं लागल्या म्हणजे तें जसें शोभतें त्याप्रमाणें, विष्णुलोकांत जिकडे तिकडे मोठमोठ्या साधूंच्या तेजस्वी विमानांच्या ओळी लागल्या असून मधून मधून भोंवतालीं उत्तम स्त्रिया फिरत असल्यामुळें त्यांच्या कांतीनें तो लोक फारच शोभत होता." [अ० ९ श्लो० १०-१२.] १३. हे दैवशालिन्! हे सुभग!

१. लक्ष्मीतें. २. श्रीः जाया यस्य सः श्रीजानिः लक्ष्मीपति विष्णु. [जानकी जाया यस्य सः जानकीजानिः; युवती जाया यस्य सः युवजानिः. 'जाया'शब्दाला बहुव्रीहि समासांत 'जानि' असा आदेश, 'जायाया निङ्' (पाणिनि ५।४।१३४) या सूत्रानें होतो.] ३. ज्या श्रीजानीच्या दासें (भक्तानें) तत्समान होउनि (त्या श्रीजानिसमान होऊन) बहु शोभावें. ४. विष्णु. ५. ब्रह्मदेव प्रजा उत्पन्न करण्यास योग्य आहे असें जाणून व त्याच्या हाताला स्पर्श करून प्रसन्न होऊन भगवान् विष्णु म्हणाला. [अ० ९ श्लो० १७-१९.] ६. खाविवला. ७. नम्राच्या. ८. कल्पवक्षाला. ९. अभीष्ट. [हे ब्रह्मदेवा! तुझ्या इच्छेस येईल तो वर मजपासून मागून घे–असा भाव.] १०. घे. ११. कमलोद्भव (ब्रह्मा). नलिना (कमलापासून) आहे प्रभव (जन्म) ज्याचा तो (ब्रह्मदेव). १२. स्वकीय. १३. आपल्या रूपाचें खरें ज्ञान ही देणगी. [हे ईशा! आपण रूपरहित आहां, तरी आपण विश्वरचनेसाठीं सूक्ष्म आणि स्थूल अशीं रूपें धारण करतां, त्यांचें ज्ञान मला व्हावें. अ० ९ श्लो० २४-२५.] १४. द्यावें. १५. कृपा करीं. १६. मोक्षस्थान देणारा. (विष्णु.) १७. अध्याय ९ श्लो० ३०-३६ पहा. १८. साधनसह. १९. माझ्याविषयींचें अतिगुप्त वेदादिग्रंथांत सांगितलेलें जें ज्ञान तें. २०. रहस्यांबरोबर. २१. अनुभवज्ञान, सृष्टिविषयक नानाप्रकारचें ज्ञान. शास्त्रोक्त ज्ञान. २२. सृष्टीच्या पूर्वीं मी होतों. २३. आहें.

बा! स्थूल [1]सूक्ष्म कारण नव्हतें कांहींच, तत्व जाण [2]असें. ॥ ११३

[3]**गं** गनीं [4]चंद्रद्वयसें नसतां ये प्रत्यया, [5]अधिष्ठानीं ।
असुनिहि राहुपरि नये जें तूं [6]मायाच तें असें मानीं. ॥ ११४

[7]**वं** सुधादि पंच भूतें शिरलींहि, न भौतिकांत तीं शिरलीं, ।
[8]शिरलों तेंवि न शिरलों मी त्यांत न यांत, किति [9]वचें जिरलीं.॥ ११५

ते ल जळीं जेंवि तसें [10]जिज्ञासुमनीं स्वतत्व हें पसरे, ।
जें काय [11]अन्वयव्यतिरेकांहीं सिद्ध त्यांत तूं वस रे! ॥ ११६

वा क्य मनीं हेंचि [12]'धरीं बळकट, मोहास न कवि कल्पांत ।
पावसिल तसाचि न तूं स्वगुरुवचनमीन बकविकल्पांत.' ॥ ११७

---

१. स्थूल सूक्ष्म अथवा या दोहोंला कारण जी प्रकृति तें सर्व माझ्याहून भिन्न नव्हतें. २. याप्रकारें. ३. ज्याप्रमाणें आकाशांत एक चंद्र असून दोन चंद्र आहेत असा [पित्तादि विकारामुळें] एखाद्या मनुष्याला भास होतो त्याप्रमाणें. ४. दोन चंद्रांप्रमाणें. ५. आधाररूप ब्रह्मीं. अधिष्ठानीं राहु असूनिहि परि [प्रत्यया] नये= ग्रहमालेमध्यें राहु हा ग्रह असूनही तो [कृष्णवर्ण असल्यामुळें] प्रत्ययास येत नाहीं, दिसत नाहीं. ६. त्याप्रमाणें आत्मा सच्चिदानंदरूप असतांही त्या रूपाचा ज्यामुळें अनुभव येत नाहीं ती ईश्वराची माया होय असें समज. [अ० ९ श्लो० ३३.] ७. पृथ्वी, उदक, तेज (अग्नि), वायु आणि आकाश हीं पांच महाभूतें हीं भौतिकांत (आपल्या लहान मोठ्या कार्यांत, उच्चनीच देहांत) शिरलीं (प्रविष्ट झालीं आहेत) [कारण तीं त्या कार्यांत सांपडतात, पण] तीं न शिरलीं=तीं पंचमहाभूतें कार्यामध्यें वास्तविकपणें प्रविष्ट झालीं नाहींत [कारण तीं कार्य होण्याच्या अगोदरच कारणरूपानें तेथें आहेत.] ८. त्याप्रमाणें मी जगामध्यें शिरलों (प्रवेश केला) असें दिसतें [कारण जगांत मी सर्वत्र सांपडतों] [पण वास्तविक पाहिलें असतां] मी जगांत शिरलोंच नाहीं. [कारण जगद्रूप कार्य होण्यापूर्वींच कारणरूपानें मी आहें, मी सर्व जगताचें उपादानकारण आहें.] ९. वाक्यें. १०. जाणण्याविषयीं इच्छा करणाऱ्याच्या मनीं. ११. आत्मा सर्वांस कारण असल्यामुळें त्याचा सर्व कार्यांत अन्वय आहे, आणि आत्मा कारणरूपानें कार्याहून भिन्न असल्यामुळें त्याचा कार्यांत व्यतिरेक आहे, अशा अन्वयव्यतिरेकांनीं सिद्ध झालेलें जें आत्मस्वरूप त्यांत तूं रहा. १२. ब्रह्मदेवाला भगवान् म्हणतात:–[हे विधे!] हेंचि वाक्य मनीं बळकट धरीं (माझें उपदेशवचन मनांत पक्कें धरून ठेव) [मग] तूं कवि (ज्ञाता) स्वगुरुवचनमीन (निजगुरुवाक्यरूप उदकांत असणारा मासा असा) कल्पांत मोहास न पावसिल, तसाचि बकविकल्पांत (मत्स्यभक्षक जो बगळा तत्स्वरूप जो विकल्प त्यांत=निराळी सृष्टि उत्पन्न करण्याच्या प्रसंगीं) [मोहास न पावसिल=कल्पांतील विविधसृष्टि उत्पन्न करीत असतां तुला मोह (अहंकार) कधींही उत्पन्न होणार नाहीं.] [अ० ९ श्लो० ३६.]

सु खवुनि **वि**धिला झाला तो गुप्त [1]महाविभूतिवल्लभ, या ।
जो भगवदुक्ति जि[2]वती धरिल न पावेल बाळ [3]वल्लभया ॥ ११८
दे [4]**ना**रदास **वि**धि मग '[5]**भागवत**' द्रवुनि जेंवि दाय, [6]करीं ।
हें बहुधन ज्या काळा दुष्काळा तो म्हणेल 'हाय!' करीं.' ॥ ११९
[7]वाँ सव्यात्मजमुनिला दे[8]वर्षि [9]**स**रस्वतीतटीं बोधी, ।
[10]मी [11]तुजला कथितों, 'या **श्रीभागवतें** तुझी सुखी हो [12]धी.' ॥ १२०
[13]यँ ज्ञरत मुनिवर पुसे तो त्या [14]हरिकीर्तिसिंधुभंगातें ।
श्रीमन्**मै**त्रेयमुदिरकवि**विदुर**[15]**म**यूरतीर्थ सांगा तें. ॥ १२१

---

१. तो महाभूतिवल्लभ (महाभूतींचा पति, सकलसंपदैश्वर्यांचा स्वामी भगवान् ईश्वर) विधिला (ब्रह्मदेवाला) सुखवुनि (उपदेशामृतानें संतुष्ट करून) गुप्त झाला (ब्रह्मदेवाच्या देखत ईश्वरानें आपलें रूप गुप्त केलें, अंतर्धान पावला) या भगवदुक्ति जीवती (या ईश्वरोपदेशवचनरूप कंठभूषणास) जो बाल (जो भगवद्भक्त मूल) धरिल (धारण करील) [तो बाल] वल्भया (वाला इतक्याही भयाला) न पावेल (पावणार नाहीं.) [अ० ९ श्लो० ३७.] २. मुलांचे गळ्यांतील अलंकार. ३. वाला इतक्या भयाला. ४. मग (ईश्वर गुप्त झाल्यावर) विधि (ब्रह्मदेव) द्रवुनि (कृपायुक्त होऊन) नारदास भागवत दे (ब्रह्मदेव नारदाच्या सुस्वभावानें व नम्रतेनें संतुष्ट होऊन ईश्वरानें सांगितलेलें भागवत नामक पुराण तें नारदाला सांगता झाला. अ० ९ श्लो० ४५.) जेंवि दाय (जसें काय हें दाय होय, बापापासून वारसाच्या नात्यानें मुलास मिळणारें जें द्रव्य त्याला 'दाय' म्हणतात.) हें बहु धन ज्या करीं [असेल] हें भागवतरूप विपुल धन ज्याच्या हातीं असेल) तो [भगवद्भक्त] काळा दुष्काळा 'हाय करीं' [असें] म्हणेल=तो काळरूप दुष्काळाला हाय हाय कर असें म्हणेल, तो काळा कधींही हार जाणार नाहीं. ५. भागवत नांवाचें पुराण. ६. हातीं. ७. वसु कन्या जी (सत्यवती) तिचा पुत्र व्यास त्याला. ८. नारद. [नारदानें व्यासाला श्रीभागवत सरस्वतीच्या तीरावर सांगितलें. अ० ९ श्लो० ४४.] ९. सरस्वती नदीचा खरा ठिकाण लागत नाहीं. कित्येकांच्या मतीं ती पंजाबांत होती, कित्येकांच्या मतीं ती वायव्यप्रांतांत असून प्रयागास (अलाहाबादेस) गुप्तरूपानें गंगायमुनेस मिळते, व कित्येकांचे मतीं अमदाबादेच्या उत्तरेस सिद्धपूर (गायकवाडाचें गांव) म्हणून जें क्षेत्र आहे तेथें असणारी नदी जी सरस्वती तीच यज्ञभूमीजवळील सरस्वती होय. या सिद्धपुरासच मातृगया किंवा कपिलगया म्हणतात. कित्येकांचे मतीं सरस्वती हा शब्द सामान्यनाम असून त्याचा अर्थ कोणतीही एक नदी असा समजावा असें आहे. एकंदरींत सरस्वती नामोच्चारानें स्थाननिर्देश नीट होत नाहीं. १०. शुकाचार्य. ११. राजाला. (परीक्षित राजाला.) १२. बुद्धि. १३. यज्ञरत (यागक्रियानिमग्न) मुनिवर (सुप्रख्यात शौनक मुनि) त्या (सुप्रसिद्ध अशा) ह-

तृतीय स्कंध.

न मुनि [1]नृप **शु**कासि म्हणे, 'प्रेमें हा [2]संत्समाज डोलावा, ।
मैत्रेय **वि**दुर यांचा जो सुखसंवाद तोचि बोलावा.' ॥ १

[3]**मो** दाश्रूद्गमकर्ता वक्त्यांचा परमगुरु **शु**कस्वामी ।
[4]अभिमन्युसुतासि म्हणे, 'ऐक, तुला तेंचि सांगतों, बा! मी. ॥ २

[5]**भ** क्तानुजपुत्रांतें खलतनयांच्या मिळोनि कुमतातें ।
[6]करवी भस्म [7]जतुगृहीं. न करि जगीं [8]साधुवाद घुमता तें. ॥ ३

[9]**ग** र्हित परम सभेंतहि वारीना [10]सत्स्नुषालकाकर्ष, ।
पांडुसुतांचें कपटें हरितां [11]सर्वस्व जो धरी हर्ष. ॥ ४

व नवास करुनि, मागे सत्यरत [12]अजातशत्रु **ध**र्म, तरी ।
द्यावें [13]तें देईना, [14]अवलंबी [15]भग्न पापकर्म [16]तरी. ॥ ५

ते न [17]अमृतधारा पी प्रभुवाक् जी **वि**धिमुखा निर्काम मता, ।

रिकीर्तिसिंधुभंगातें (हरिलीला यशोरूप समुद्रांतील तरंग जो सूत त्यातें) पुसे (विचारी):— श्रीमन्मैत्रेयमुदिर (श्रीमान् मैत्रेय मुनि हा मेघ) [व] कविविदुरमयूर (ज्ञाता विदुर हाच मोर) [यांचें, मैत्रेय आणि विदुर यांचें] तें तीर्थ (तीर्थचरित) सांगा (कळवा, निवेदन करा) [भगवद्भक्त विदुर बंधूला सोडून पृथ्वीवर तीर्थयात्रा करीत असतां मैत्रेय व विदुर यांचा अध्यात्मज्ञानपर मोठा संवाद झाला व ज्ञानी मैत्रेयानें भक्त विदुराला तत्वोपदेश केला. तें तीर्थचरित आम्हाला सांगा असें शौनक मुनीनें सूताला म्हटलें. मैत्रेय मुनि हा मुदिर (मेघ) आणि त्या मेघावर प्रीति करणारा ज्ञाता विदुर हाच मयूर (मोर) यांचा तीर्थ (वेदांतविषयक संवाद, उपदेशपर संवाद). 'तीर्थ' शब्द पुल्लिंगी आणि नपुंसकलिंगी असून त्याचा अर्थ वेदांतविषय, तत्वोपदेश असा आढळतो.] १४. हरिकीर्तिरूप समुद्राच्या लहरीतें. (सूतातें.) १५. मह्यां रौतीति मयूरः. (मोर.)

१. परीक्षित् राजा. २. साधूंचा समुदाय. ३. हर्षाश्रूंची उत्पत्ति करणारा. ४. अभिमन्यूच्या पुत्राला. (परीक्षित राजाला.) ५. साधुबंधु पांडु त्याच्या पुत्रातें. ६. धृतराष्ट्र करवी—असा अन्वय. ७. लाक्षागृहीं. ८. जेणेंकरून साधुवाद (धन्यवाद, स्तव) घुमता तें धृतराष्ट्रानें केलें नाहीं. ९. निंदित. १०. सत्+स्नुषा+अलक+आकर्ष=सती+सून+केश+ओढणें=साध्वी स्नुषेच्या केशांचें ओढणें. [स्कंध ३ अध्याय १ श्लो० ७.] ११. सर्व+स्व=सकल+धन, राज्यसंपदा. १२. ज्याला शत्रु झाला नाहीं असा. (युधिष्ठिर.) १३. राज्यार्धभाग [अ० १ श्लो० ८.] १४. स्वीकारी, आश्रय धरी. १५. फुटलेली. १६. पापकर्मरूप नौका. १७. जी (प्रभुवाक्=कृष्णाची वाणी) विधिमुखा (ब्रह्मदेवप्रमुख देवाला अथवा विधीच्या मुखाला) नितांत (अत्यंत) मता (मान्य, पूज्य) [होती व जी] अमृतधारा (सुधेची धारा होय) ते (ती प्रभुवाक्) न पी (न स्वीकारी). धृतराष्ट्रानें कौरवसभेंत कृष्णानें

अवमानिला करी जो दीनीं द्याया सुखा नि[1]का ममता. ॥ ६

वा खाणिति [2]जीस बहु ज्ञाते ती **वि**दुर नी[3]ति [4]आयकवी, ।
कळवी अनयाचारें होणार अनर्थ [5]आप्तराय कवी. ॥ ७

‘**सु**[6] त साधु **ध**र्म यातें दे [7]दाय,’ म्हणे, ‘करीं न [8]अपरा धी, ।
समजुनि दृष्टि न झांकीं, **भी**माचा नच उरेल [9]अपराधी. ॥ ८

दे व **अ**जित **कृ**ष्णप्रभु **पा**र्थाचा तो पित्यापरि सहाय, ।
याचा प्रताप लावित आलाचि म्हणावया अरिस ‘हाय !’ ॥ ९

वां[10] ळीं [11]यां; हा दोषचि सुत, [12]सद्द्वेष्टा; करीं [13]कुलहितातें, ।
धर्मासि [14]सुरपदाधिक सामें प्रेमें दिलें फुलहि [15]तातें.’ ॥ १०

य[16] म **ध**र्मराज कीं तो हित धर्मन्याय बोलिला, परि [17]तें ।
मंत्रश्रवण पिशाचा, **पा**र्थाच्या तेंवि तापवी अरितें. ॥ ११

न[18] ष्टायुश्रीकीर्ति श्रे[19]ष्ठद्वेष्टा **सु**योधन क्रूर ।

सामार्थ केलेलें अमृतमधुर भाषण स्वीकारलें नाहीं. दीनीं (दीनजनाला, अनाथ जनांला) सुखा द्याया (सुख देण्यासाठीं) जो (जो श्रीकृष्ण) निका ममता करी (निवळ प्रेम करी) [तो प्रभु कृष्ण धृतराष्ट्रानें त्याची मसलत न स्वीकारून] अवमानिला (त्याचा अपमान केला). १८. अत्यंत.

१. निखालस. २. ज्या नीतीला. ३. अध्याय १ श्लो० १० पहा. ४. हें पंतांचें ठरींव यमक आहे. ५. आप्तांत (मित्रांत) राय (श्रेष्ठ) असा कवि (पंडित विदुर). ६. हें विदुराचें धृतराष्ट्राला बोधपर भाषण आहे. ७. पितृद्रव्य राज्यार्ध. ८. इतर विचार करूं नको. ९. ज्यानें भीमाचा अपराध केला आहे तो जीवंत राहणार नाहीं. [धर्मराज क्षमी आणि सहनशील म्हणून तो दुर्योधनाचे सर्व अपराध पोटांत घालील व क्षमा करील, पण भीम फार रागीट, तो अन्यायाचरण कधींही सोसावयाचा नाहीं.] १०. दूर करीं. ११. या अमंगल दुर्योधनाला सोडून दे. [अ० १ श्लो० १३.] १२. सत्+द्वेष्टा= साधु+शत्रु=साधूंचा द्वेष करणारा सुत (दुर्योधन). १३. कुलकल्याणातें. १४. देवश्रेष्ठाहून श्रेष्ठ. १५. धर्माला बापानें (त्वां धृतराष्ट्रानें) प्रेमानें आणि सख्यानें फूल जरी दिलें तरी तें सुरपदाहून श्रेष्ठ आहे. १६. विदुर हा साक्षात् यमधर्माचा अवतार होय. हा मांडव्य ऋषीच्या शापानें पृथ्वीवर शूद्रयोनींत जन्मास आला. हा शाप शतवर्षात्मककालपरिमित होता. [आदिपर्व–अध्याय १०७-१०८.] [काव्यसंग्रहग्रंथमाला–मोरोपंत–आदिपर्व–अध्याय १५ गीति ५९-७१ पृष्ठ ९६.] ‘मांडव्याच्या शापें झाला दासीकुमार यमधर्म । विदुर असें नाम तया ठेवुनि गांगेय दे सुबहु शर्म ॥’ इत्यादि गीति पहा. १७. बोलणें. १८. ज्याचीं आयु, लक्ष्मी आणि यश हीं कमी झालीं तो. १९. साधुजनद्वेषी.

क्रोधें म्हणे, '[1]पुरांतुनि दवडा [2]दासीसुतासि या दूर.' ॥ १२

मो र [3]उलूकानें कीं धिक्कारावा, [4]मराळ काकानें ।

धिक्कारिला [5]कवि [6]खळें [7]तें ऐकावें न साधुच्या कानें. ॥ १३

[8]भ गवद्भक्त न [9]कोपे, तो बहु मानी मनांत मायेतें; ।

इतरांच्या जाळाया [10]भरतें सुकृताधना [11]तमा येतें. ॥ १४

ग जपुर सोडी राजद्वारींच [12]करूनि [13]आयुधन्यास, ।

[14]तीर्थें करी, न बहुमत धर्माहुनि वित्त आयु [15]धन्यास. ॥ १५

व सुधेवरि [16]तीर्थपदस्थानें तीर्थें पहात तो सुकवी ।

---

१. हस्तिनापुरांतून. २. दासीचा मुलगा विदुर याला. [विचित्रवीर्याच्या दोघी स्त्रियांची दासी हिच्याठायीं कृष्णद्वैपायन व्यासापासून विदुर झाला म्हणून त्याला 'दासीसुत' असें म्हटलें आहे. अ० १ श्लो० १५.] ३. घुवडानें. [उलूक=घुवड. 'उलूके तु वायसाराति-पेचकौ' इत्यमरः । 'उलूकः पुंसि काकाराविंद्रे भारतयोधिनि' इति मेदिनी.] ४. हंस. ५. विदुर. ६. दुष्ट दुर्योधनानें. ७. दुर्योधन दुःशासन कर्ण शकुनि यांचें मर्मभेदक भाषण. [श्लो० १६.] ८. विदुर. ९. भगवद्भक्त (भगवंताचा–श्रीकृष्णाचा–भक्त विदुर) न कोपे (क्रोधयुक्त झाला नाहीं) तो (विदुर) मनांत मायेतें (मोहपाशांतें) बहु मानी (माया फार कठिण प्रबल आणि दुस्त्याज्य आहे असें त्या विदुरानें मनांत जाणून खळ जो दुर्योधन त्याजवर कोप केला नाहीं.) इतरांच्या (अभक्तांच्या, भक्तांहून अन्य जनांच्या) सुकृता धना (सुकृतरूप संपदेला, पुण्यरूप संपत्तीला) जाळाया (भस्म कराया, नाश करण्यासाठीं) तमा (तमोगुणाला, अज्ञानरूप कोपाला) भरतें (भरती, वाढ) येतें. [जे भक्त आहेत त्यांचें अंतःकरण नेहमीं प्रकाशित असतें, त्यांत तमोगुणाचा प्रवेश होऊं शकत नाहीं, भक्तांच्या अंतःकरणांत अज्ञान क्रोध इत्यादि तमोगुण प्रवेश करूं शकत नाहींत. पण जे अभक्त आहेत त्यांच्या मात्र अंतःकरणांत तमोगुण शिरतात. विदुर मोठा भगवद्भक्त होता, म्हणून तो दुर्योधनावर रागें भरला नाहीं यांत आश्चर्य नाहीं. ही गोष्ट (कोपाभाव) भक्तांच्या स्वभावास अनुरूपच आहे.] १०. वृद्धि. ११. अज्ञाना. १२. आपल्या आयुधाचा (शस्त्राचा, चापाचा) न्यास (ठेवणें) करून, आपलें धनुष्य राजद्वारापाशीं ठेवून [आपण पांडवांकडे जाऊन मिळूं व युद्ध करूं अशी शंका धृतराष्ट्राला न यावी म्हणून विदुरानें शस्त्रन्यास केला.] १३. धनुष्य ठेवणें. १४. तीर्थयात्रा करीत चालला. १५. जो धन्य (श्लाघ्यचरित) आहे त्याला वित्त (धन) आणि आयु (जीवित) [हें] धर्माहुनि (पुण्याचरणाहून) बहुमत (अधिक मान्य) न (वाटत नाहीं). १६. तीर्थ+स्थानें=तीर्थ आहे ज्याच्या पदीं (चरणीं) त्या देवाचीं विष्णूचीं स्थानें (पवित्र स्थळें).

पावे [1]प्रभास, ऐके [2]क्षयवार्ता जनमुखें [3]जिला चुकवी. ॥ १६
ते थुनि **स**रस्वतीचीं [4]तीर्थें सेवीत जाय तो [5]धीर, ।
[6]स्वजनालक्षित पावे बहुकाळें **विदुर** [7]रविसुतातीर. ॥ १७
[8]बा र्हस्पत्य महामति **उद्धव** मंत्री [9]जगन्निवासाचा, ।
भेटे **विदुरा**, वाटे योगी [10]दत्तचि तया **शि**वा साचा. ॥ १८
[11]सु हृदांचें त्यासि पुसे तेव्हां सुखवृत्त विस्तरें [12]क्षत्ता, ।
पार्थांचें [13]त्यांचेंही, [14]यद्रीति बसे उरीं जसी लत्ता. ॥ १९
[15]दे वाचें सेवटिल [16]प्रेमळभक्तासि वृत्त नच कथवे, ।
अप्रिय वदतां देती [17]दुःखाचे सज्जनास [18]वंचक [19]थवे. ॥ २०
बा ष्प गळां बहु दाटे, फाटे उर सांगतां, तथापि कसा ।
न वदेल? [20]विस्वर वदे [21]स्ववसंतवियोगविषकथा [22]पिकसा. ॥ २१
'**[23]य** दुनाथें श्रीकृष्णें करुनि निमित्त [24]द्विजातिशापातें ।
संहरिलें जाणुनि भूभर शेष स्वकुळ सर्व, बापा! तें. ॥ २२
[25]न र्मींच [26]कलि [27]प्रकटे, अस्ता जातां रवि, **प्र**भासाची ।

---

१. प्रभास=द्वारकेजवळील तीर्थाला. २. कौरवांच्या नाशाची बातमी (कौरवांचा कलहाग्नीनें नाश झाला अशी वार्ता). ३. जी वार्ता कानीं न पडावी म्हणून यत्न करीत होता ती. ४. त्रित, मनु, पृथु, अग्नि इत्यादि अकरा तीर्थें. [अ० १ श्लो० २२.] ५. सत्वसंपन्न (विदुर). ६. आप्तजनांनीं अलक्षित असा. ७. यमुनेचें तट. ८. बृहस्पतीच्या नीतिशास्त्रांत प्रवीण असा. ९. कृष्णाचा. १०. दत्तात्रेय. ११. मित्रांचें. पुढील श्लोकांत बंधु, सुहृद्, मित्र आणि सखा यांचा स्पष्टार्थ दर्शविला आहे. 'अत्यागसहनो बंधुः सदैवानुमतः सुहृत् । एकक्रियं भवेन्मित्रं समप्राणः सखा मतः ॥' इति रघुवंशे पंचमसर्गे ५७ श्लोकस्य टीकायाम्.] भगवंताचे आश्रित जे कौरव व यादव त्यांजबद्दल कुशल प्रश्न विचारी. १२. विदुर. १३. दुर्योधनादिकांचेंहि. १४. ज्या दुर्योधनादिकांची रीति (आचरण). १५. कृष्णाचें. १६. उद्धवाला. १७. हें अर्ध सुभाषितरूप आहे. १८. भय. १९. समूह, जमाव. २०. शब्दरहित. २१. आपल्या वसंताचा वियोग हेंच विष त्याची कथा. २२. कोकिळसा. २३. हें उद्धवाचें विदुरापाशीं झालेलें भाषण आहे. २४. मुनींच्या शापातें. [यादव भोज यांच्या मुलांला 'तुमचा कुलक्षय होईल' असा मुनींनीं शाप दिला होता. अ० २ श्लो० २४.] २५. क्रीडेंत, खेळांत. २६. कलह, कज्जा. २७. यादव व भोज हे प्रभासास आले व तेथें वारुणी प्राशन करून वरळूं लागले, व सूर्य अस्तास जात असतां, त्यांनीं परस्पर कलह करून आपला नाश करून घेतला. (अ० ४ श्लो० २.)

महि शवमयीच झाली, कां करिल प्रभु न विप्रभा साची? ॥ २३

मो दक लाडू द्यावा बाळा, मज दे स्वतत्वबोधा त्या, ।
तों ये **व्यास**सुहृत्सख **मैत्रेय**हि, मान्य होय तो **धा**ल्या. ॥ २४

भ क्तासि मला आज्ञा केली जाया निघोनि बदरीतें ।
जातों, परि वाटे सुख देइल मणिसानुचीहि न दरी तें.' ॥ २५

गं हिवरुनि म्हणे क्षत्ता, 'सांग मला तत्व तूं भगवदुक्त, ।
भगवान् तसेचि भगवद्भक्तहि करिति स्वकिंकरां मुक्त.' ॥ २६

वं सु जो पूर्वभवींचा तो उद्धव तेधवां म्हणे, '**विदुरा**! ।

---

१. पृथ्वी. [हा शब्द 'मही' असा दीर्घ आढळतो, पण ऱ्हस्व ही आहे. 'वीचिः पंक्तिर्महिः केलिरित्याद्या ऱ्हस्वदीर्घयोः' इति वाचस्पतिः.] २. प्रेतपूर्णा. [शव+मयी=प्रेत+प्रचुर. 'मय' या प्रत्ययाचें 'मयी' हे स्त्रीलिंगी रूप होय.] ३. विप्रांची (द्विजांची, मुनिजनांची) भा (तेजस्विता) प्रभु (कृष्ण) साची (खरी) कां न करील? मुनिजनांचा शाप कृष्ण खरा कां करणार नाहीं? येथें **प्रश्नालंकार** आहे. ४. खरी. ५. कृष्ण दे. ६. आत्मज्ञानोपदेशातें. ७. व्यासाचा अत्यंत मित्र (मैत्रेय). ८. मैत्रेय मुनि भ्रमण करीत सहजगत्या तेथें प्राप्त झाला. ९. 'तूं बदरिकाश्रमास जा' अशी मला (उद्धवालाच) कृष्णानें द्वारकेंत असतांच आज्ञा केली होती. [अ० ४ श्लो० १२.] १०. बदरिकाश्रमातें. ११. प्रभूच्या प्रिय बदरिकाश्रमास मीं जाण्याचा बेत केला आहे, परि (पण) वाटे (असें वाटतें कीं) तें सुख (भगवत्सांनिध्यसुख) मणिसानुचीहि दरी (मेरुपर्वताची गुहा देखील) न देईल (देणार नाहीं) भगवत्सांनिध्यांत जसें सुख प्राप्त झालें तसें सुख मेरुपर्वतगुहेंतही मिळणार नाहीं असें वाटतें. मग बदरिकाश्रम तें सुख कोठून देणार? हिमालयावरील बदरी मला सुखप्रद होणार नाहीं--असें तात्पर्य. येथें उत्तरार्धांत **व्यतिरेक** नामक अलंकार झाला आहे. १२. मेरूचीहि. [मणि+सानु=रत्न+शिखर=रत्नांनीं आच्छादित आहेत शिखरें ज्याचीं असा मेरुपर्वत.] १३. गुहा. १४. कौरवांच्या वधाच्या वार्तेनें दुःखित होऊन. १५. विदुर. १६. आत्मज्ञानोपदेश. १७. श्रीकृष्णप्रतिपादित. १८. आपल्या सेवकांला. किं करोमि कुर्यां वा इति स्वामिनं पृच्छति इति किंकरः । अथवा कुत्सितं करोति इति. 'काय करूं महाराज' असें विचारणारा सेवादक्ष चाकर याला किंकर म्हणावें. किंवा जो काम नीट करीत नाहीं, कारण चाकरच तो, म्हणूनही त्याला किंकर म्हणावें. १९. मुक्ति देतात. यांत भगवद्भक्त हे भगवंतासमान आहेत असें सांगून विदुरानें उद्धवाची थोरवी गाइली आहे. २०. उद्धव हा पूर्वजन्मीं वसु होता. [अ० ४ श्लो० ११.] २१. पूर्व+भव=मागील+जन्म=मागल्या जन्माचा.

हें मैत्रेया कथिलें, त्वत्स्मृति झाली भवाद्रिच्या भिदुरा. ॥ २७

तें णेंचि तुला प्रभुच्या आज्ञेनें सर्व तत्व सांगावें, ।

मिळतां सुब्राह्मण गुरु, इतरातें गुरु म्हणोनि कां गावें?' ॥ २८

---

१. तुला आत्मज्ञान सांगावें अशी कृष्णानें मैत्रेयाला आज्ञा केली आहे. हें (तुला स्वात्मरहःप्रकाशक ज्ञान सांगणें हें) मैत्रेया (मैत्रेय मुनीला) कथिलें (कृष्णानें आज्ञापिलें आहे). २. तुझें (विदुराचें) स्मरण. ३. भव+अद्रिच्या=संसार+पर्वताच्या (भिदुरा=वज्राला) संसाराद्रिचें छेदन करणारा जो कृष्ण त्याला, हे विदुरा! तुझी आठवण झाली होती. (एवढ्यावरून साक्षात् भगवंतानेंच तुला तत्त्वोपदेश केल्यासारखें आहे. (अ० ४ श्लो० २६.) 'भवाद्रिच्या भिदुरा' असें पर्यायानें श्रीकृष्णाला अनुलक्षून म्हटलें आहे म्हणून हा **'पर्यायोक्त'** अलंकार होय. याचें लक्षणः—(१) 'ध्वनिताभिधानं पर्यायोक्तिः' असें **'काव्यानुशासन'** नामक अलंकारग्रंथांत आहे. [काव्यमाला ४३, काव्यानुशासन–पृ० ३६.] (२) 'गम्यस्यापि भंग्यन्तरेणाभिधानं पर्यायोक्तम्' [काव्यमाला ३५, अलंकारसर्वस्वम्–पृ० १११.] (३) 'प्रकारान्तरमाश्रित्य तद्विवक्षितवस्तुनः । सुचारु कथनं यत्र पर्यायोक्तं तदिष्यते. ॥' [मंदारमरंदचंपू–व्यंग्यबिंदु १० श्लो० १०८.] **मोरोपंतांच्या** कवितेंत या अलंकाराचीं शेंकडों उदाहरणें आढळतातः—(१) हाय! कवी तोहि म्हणे ज्याच्या मातेसि शंभुसायक वी. ॥ [आदिपर्व–अध्याय २३ गीति ३६], (२) अवतरला उतराया जो दुःसह दुष्टभार महिवरला । अहिवरलास्यपट्ट प्रभु करुणोक्तें द्वारकेंत गहिवरला. ॥ [सभापर्व–अ० ५ गी० ८०.] (३) (केलेंचि धन्य दर्शनदानें येऊनि कानना, मातें, । अजि! देवेश! निवावे बहु हे सेवूनि कान नामातें. ॥ [वनपर्व–अ० १३ गी० ५५.] (४) त्वद्वंधूंचीं झालीं युगपत शून्योत्सवें महागेहें. ॥ [विराटपर्व–अ० १ गी० १७८] (५) जेणें किरातरूपी प्रभुसीं केला प्रसिद्ध बाढ कली । तो मजकडे स्वपादें कांचनमय पादपीठ बा! ढकली. ॥ [उद्योगपर्व–अ० ५ गी० ६] (६) ब्रह्मांड भस्म व्हावें ज्याच्या दररक्तचक्षुच्या पातें । तो तूं आंगें मारूं पाहसी मज दावुनि प्रतापातें. ॥ [भीष्मपर्व–अ० १० गी० १०२] (७) ज्याच्या श्रीपददास्यें पावे तोखा सदा रमा जाया । हरि तो मना नराचा होउनि तो खासदार माझा या. ॥ [द्रोणपर्व–अ० १० गी० ४४] (८) योगीश्वरसा साक्षात् जो पाहे सर्व संजय ज्ञानी । तो ये पुरासि चिंतित जें गावें पादकंज यज्ञांनीं. ॥ [द्रोणपर्व–अ० १ गी० २] (९) नेतें भवाब्धिच्या जें धात्यासि पलीकडील कांठीं तें । श्रीमुख रागें पाहे ती घालुनि भोंवयांत गांठींतें. ॥ [हरिवंश–अध्याय २६ गी० ३८] (१०) बा! त्वत्प्रताप हरितो तम सर्वहि जेंवि नाथ दिवसाचा. ॥ [ब्रह्मोत्तरखंड–अ० २ गी० २८]. ४. वज्रा. ५. त्या मैत्रेयानें. ६. उत्तम विप्र. (मैत्रेय.) ७. गुरु=अंधकारनिरोधक. 'शब्दगुस्त्वंधकारश्च रुशब्दस्तु निरोधकः । अंधकारनिरोधत्वाद्गुरुशब्दो निगद्यते ॥' [सौरपुराण–अध्याय ६८ श्लो० १०.] ८. हें प्रश्नालंकाराचें उदाहरण आहे. यासच **'काव्यार्थापत्ति'** म्हणतां येईल.

वा ट हिताची दावुनीं **उद्धव** गेला स्वयें [1]बदरिकेला, ।
जेथें [2]**नरना**रायण; भस्म जिहीं सर्वही [3]सदरि केला. ॥ २९

[4]**सु** रतटिनीतीरीं तो भेटे जावूनि **विदुर** [5]**मि**त्राजा, ।
स्मरुनि क्षण क्षण मनीं कांपे [6]मोहाद्रिभिदुरमित्रा [7]ज्या. ॥ ३०

[8]**द** शिक केला वंदुनि **विदुरें मै**त्रेय मुनि, तयाला जें ।
श्रोतव्य तें पुसे तो, ज्याची आइस म्हणे दया '[9]लाजें.' ॥ ३१

[10]**बा** डवर्य म्हणे, 'बा! **विदुरा**! तूं धन्य [11]कीं तुझें स्मरण ।
[12]त्रिजगद्गुरुनें केलें, [13]ज्याचे [14]स्मरल्यासि तारिती चरण. ॥ ३२

---

१. अध्याय ४ श्लो० २७ पहा. २. नरनारायण [होते]. ३. सत्+अरि=साधु+शत्रु. ४. गंगातटीं. सुर+तटिनी+तीरीं=देव+नदी+तटीं. [अ० ४ श्लो० ३६.] ५. मैत्रेया. ६. मोह+अद्रि+भिदुर+मित्रा=भ्रम, अज्ञान+पर्वत+वज्र+स्नेही=अज्ञानपर्वताचा नाश करणाऱ्या वज्राच्या स्नेह्याला (कृष्णाला). येथें 'पर्यायोक्त' अलंकार आहे. २७ व्या गीतीवरील टीप पहा. ७. श्रीकृष्णा. ८. गुरु. ९. ज्या मैत्रेयाची दया आईला 'लाजें' असें म्हणे=ज्या मैत्रेयाची दया मातेच्या दयेहून जास्त होती. हें 'अतिशयोक्ति' नामक अलंकाराचें उदाहरण समजावें. १०. ब्राह्मणश्रेष्ठ. वाडव=ब्राह्मण. ['द्विजात्यग्रजन्मभूदेववाडवाः । विप्रश्च ब्राह्मणः' इत्यमरः.] ११. कारण कीं, अशासाठीं कीं. १२. तीन जगतांच्या गुरूनें. (पित्यानें, प्रभु विष्णुनें. अ० ४ श्लो० ३२ अ० ५ श्लो० २१ पहा. भगवंतानें विदुराचें स्मरण केलें यावरून भगवंताची मर्जी त्याजवर होती हें स्पष्ट आहे.) १३. ज्याचे चरण (पाद) स्मरल्यास (स्मरण करणाऱ्यास) तारिती (भवपाशमुक्त करतात). १४. यांत 'स्मरणालंकार' झाला आहे. स्मारक पदार्थ पाहून पूर्वानुभूत पदार्थांची स्मृति झाली म्हणजे '**स्मरणालंकार**' समजावा. यांत 'स्मरणें' धातूचा किंवा तदर्थक धातूचा प्रयोग अवश्य असतो. याचीं उदाहरणें:—(१) अलिपुंज देखतां मज सीतेचे केश लक्ष्मणा! **स्मरती**; । तत्कबरीसम हे शिखि पिच्छकलाप स्वमानसीं भरती. ॥ (मंत्ररामायण–किष्किंधाकांड–गीति ४.), (२) बहु रक्त दिसे, खेळुनि होय जसा काय बा! गुलालातें; । पळतां कर्ण **स्मरलें** भिउनि पळे पोर बागुलालातें. ॥ (द्रोणपर्व–अध्याय १२ गीति ८३), (३) अरिहरिपासुनि सुटतां करि करि भूपति पलायन त्वरित, । **स्मरलें** सुरांसि तेव्हां कालयवनभीत शौरिचें चरित. ॥ (कर्णपर्व–अध्याय ३१ गीति ४३), (४) पार्थाचा धैर्य न दे रिपुदमनीं त्या तदा शर थिराया; । तेव्हां मज **आठवला** वालिवधख्यात दाशरथिराया. ॥ (कर्णपर्व–अध्याय ३६ गीति ४५). (५) मातें कमल म्हणालें विलोकितां **स्मरति** युवतिच्या सुभुजा । प्रणय क्रोधें मजला बद्ध करायासि सर्वथा विभु जा. ॥ [मंत्ररामायण–किष्किंधाकांड–गीति ३.] (६) धांवति अन्योन्यावरि ते दोघे **आठवूनि** अपकार । जाणों ते मदमत्त क्रोधोद्धत दंपतीच अपकार. ॥ [कर्णपर्व–अध्याय

य श बहु **पू**रुकुळाचें, घेता झालासि [1]ज्यांत जन्मास, ।
तूं **वै**ष्णवांत, मासांमाजि जसा [2]मार्गशीर्ष सन्मास. ॥ ३३
[3]**न** ळ नृप नृपांत, तैसा तूं [4]पुण्यश्लोक लोकपाळांत, ।
दिससी नरांत नरसा, दिसला प्रभु जेंवि बाळ बाळांत. ॥ ३४
[5]**मो** क्षसुसाधन कथितों, [6]श्री**सं**कर्षण [7]**स**नत्कुमारा जें ।
सांगे, [8]कुमार सांगुनि जेणें **सां**ख्यायना म्हणे 'साजें.' ॥ ३५
भ क्ता **प**राशराला विनयें नमितांचि [9]पादराजीवा ।
[10]श्री**सां**ख्यायन सांगे करुनि दया त्याहि सादरा [11]**जी**वा. ॥ ३६
[12]**ग** रकंठसाचि [13]गुरुवर सर्वज्ञ **प**राशर स्वयें बा! जें ।
सांगे '[14]**भा**गवत' मला श्रवण करुनि तेंचि तूं यशें साजें. ॥ ३७
[15]**व** र हा देउनि **वि**दुरा! व्हाया अत्यंत निर्मला दृष्टी ।

४५।२], (७) दिव्यमणिकनकखचित द्युमणिप्रभ तें किरीट रागानें । भस्म क्षणांत केलें **आठवुनी** पूर्व वैर नागानें. ॥ [कर्णपर्व–अध्याय ४७।७८.]

१. ज्या पूरुकुळांत. २. 'मासानां मार्गशीर्षोऽहमृतूनां कुसुमाकरः' (भगवद्गीता–अध्याय १० श्लोक ३५). याचें तात्पर्यः–मासांमध्यें मी मार्गशीर्ष मास, ऋतूंमध्यें मी वसंत. ३. नलराजा सुप्रख्यात आहे. नलदमयंतीकथानकावर संस्कृतांत काव्यें चंपू इत्यादि अनेक मान्य ग्रंथ आहेत. याची कथा वनपर्वांत आहे. [मोरोपंत–वनपर्व–अध्याय ४, काव्यसंग्रहग्रंथमाला–पृ० ३८-७३]. ४.पुण्यकारक यश ज्याचें असा. पवित्र आहे श्लोक (कीर्ति) ज्याचा तो–विमलयशा. पुण्यश्लोक हें नळाचें प्रसिद्ध नांव आहेः–'पुण्यश्लोको नलो राजा पुण्यश्लोको युधिष्ठिरः । पुण्यश्लोका च वैदेही पुण्यश्लोको जनार्दनः ॥' ५. येथें पंतांनीं अ० ५-६-७ यांतील मजकूर अजीवाद गाळला आहे. मोक्षाचें उत्तम साधन=भागवतज्ञान. ६. आदिदेव भगवान् शेष. [अ० ८ श्लो० ३.] ७. सनत्कुमार मुनीला जें (भागवतज्ञान) शेषानें सांगितलें तें मी तुला (विदुराला) सांगतों. ८. कुमार (सनत्कुमार) [जें भागवतज्ञान सांख्यायनाला सांगून] जेणें (त्या भागवतज्ञानानें) 'साजें' (शोभा पाव, अलंकृत हो-[असें] सांख्यायना म्हणे. [अ० ८ श्लो० ७.] ९. चरणकमला. [राजीव=कमल.] १०. सांख्यायन=एक ब्रह्मर्षि. हा सनकादि कुमारांचा शिष्य आणि परमहंसधर्मप्रवर्तक (पारमहंसमुख्य) होता. याला भागवतज्ञान सनत्कुमारांनीं सांगितलें व यानें हें एका प्रसंगीं पराशराला आणि बृहस्पतीला सांगितलें. [अ० ८ श्लो० ८.] ११. बृहस्पतीला. १२. शिवसाचि. १३. पराशर हा मैत्रेयाचा गुरु, याला वर मिळाल्यामुळें हा पुराणप्रवक्ता झाला. १४. आद्यपुराण. १५. हा वर (भागवतश्रवण करून शोभा पाव असा वर) विदुराला देउनि [त्याची] अत्यंत निर्मला दृष्टी व्हाया (त्या विदुराची दृष्टि निर्मळ होण्यासाठीं) [मैत्रेय त्याला] ब्रह्मा भगवद्वरें जशी (ज्या अनुक्रमानें) सृष्टी करी [तशी यथातथ्य] सविस्तर सांगे. [स्कंध ३

सांगे सविस्तर, करी ब्रह्मा [1]भगवद्वरें जसी सृष्टी. ॥ ३८
ते सृष्टि वाढवाया विधिचें रूप [2]द्विधा [3]मिथुन झालें, ।
स्वायंभुव [4]मनु पुरुष, स्त्री [5]शतरूपा, [6]जयां सुयश आलें. ॥ ३९
वा[7]! त्या सुत [8]प्रियव्रत [9]मनुला उत्तानपाद तो दुसरा, ।
[10]आकूति देवहूति प्रसूति, नलिनी सुता जशा [10]सुसरा. ॥ ४०
सु त विधिचे [11]रुचि कर्दम दक्ष, तयां दे तिघां तिघी कन्या, ।
प्रसवोनि यशें झाल्या सर्वाहि त्रिभुवनांत त्या [12]धन्या. ॥ ४१
[13]**दे** वश्रेष्ठासि मनु प्रार्थी कीं, 'स्थान सृष्टिला धरणी, ।
तीच [14]महांबुनिमग्ना, [15]यत्न करावा प्रभो! [16]तदुद्धरणीं.' ॥ ४२
[17]**वा** रिजयोनि [18]विचारी, यत्न न [19]सुचतां, मनीं म्हणे, 'हा मी ।
[20]सर्गी योजित [21]आहें, जेणें कर्तव्य तो करो स्वामी.' ॥ ४३
[22]**थे** तचित्तेंद्रिय होतां विधि, [23]तन्नासाबिळांतुनि [24]क्षिप्रें ।
[25]किटिशिशु निघे गुहेंतुनि; बा! जैसा [26]वालखिल्य सद्विप्र. ॥ ४४

अध्याय ८ श्लो० १० अध्याय १२ श्लो० ५० यांतील कथाभाग पंतांनीं या एका गीतींत समाविष्ट केला आहे.]

१. अध्याय ९ श्लो० ४३ पहा. यांत या भगवद्वराचा उल्लेख आहे. २. विधीच्या शरीराचे दोन भाग झाले. [अ०१२ श्लो०५१.] ३. त्या दोन भागांपासून एक मिथुन (जोडपें) उत्पन्न झालें. [अ० १२ श्लो० ५२.] ४. हा सर्व जगताचा अधिपति. ५. ही स्वायंभुव मनुची महिषी होय. ६. ह्या स्त्रीपुरुषांला कुल वृद्धिंगत झाल्यामुळें मोठें नांव मिळालें. ७. बा! ८. प्रियव्रत आणि उत्तानपाद हे मनूचे दोन पुत्र होत. ९. मनूची मुलगी. १०. उत्तम सरोवराला जशा नलिनी (कमलिनी). ११. आकूति रुचि ऋषीला, देवहूति कर्दमाला व प्रसूति दक्षाला. १२. हें पंतांचें ठरींव यमक आहे. [अहल्यास्तुति–(मोरोपंत–स्फुटप्रकरणें–भाग १) गीति २ यांतही हेंच यमक आहे.] १३. ब्रह्मदेवाला. [माझ्या प्रजांनीं व मी कोठें रहावें तें स्थान दाखवा–असें मनु विधीला म्हणाला. अ०१३ श्लो० १४.] १४. मोठ्या उदकांत बुडालेली. १५. अध्याय १३ श्लो० १५ पहा. १६. बुडालेली धरणी मुक्त करण्याविषयीं. १७. ब्रह्मदेव. १८. पृथ्वीला वर कशी काढावी म्हणून वारिजयोनि (कमलोद्भव विधि) पुष्कळवेळ विचार करीत होता. १९. त्याला काय उपाय करावा हें सूचलें नाहीं तेव्हां तो मनीं (आपल्याशींच) म्हणे (म्हणाला). २०. उत्पत्ति करण्याविषयीं. २१. मी सृष्टि करण्याच्या कामीं गुंतलों आहें, यास्तव ज्यानें जें केलें पाहिजे तें तो स्वामी (ईश्वर–विष्णु) अवश्य करो. ईश्वरानें या गोष्टीबद्दल योग्य उपायाची योजना करावी. २२. नियमित आहेत चित्त आणि सर्व इंद्रियें ज्याणें असा. २३. ब्रह्मदेवाच्या नाकपुडींतून. २४. त्वरित. २५. वराहशिशु, डुकराचें पिलूं. २६. वालखिल्य नामक उत्तम द्विज.

न व्हता अंगुष्ठाहुनि अधिक, गजसमान तो क्षणें वाढे, ।
तन्नाद उग्र, परि हितकर सेविति देव मुनि, जसे काढे. ॥ ४५
मो ठा हर्ष विधिमनीं प्रभु वाढवि, जेंवि आपला काय, ।
शिरला जळीं गज शिरे जैसा उष्णांत तापला काय? ॥ ४६
भ गवान् दंष्ट्राग्रें भू स्वखुरांहीं पाथ तें विदारुनि घे, ।
प्रभु जेंवि वारि लंघुनि न स्वाहानाथ तेंवि दारु निघे. ॥ ४७
ग दिवर दैत्य तदंशांत प्रकटे, जो करुनि खळखळ विरोधी ।

---

१. हत्तीसारखा मोठा झाला. [अ० १३ श्लो० १९.] २. त्या डुकराचा शब्द, त्या डुकराची गर्जना. ३. काढे=कषाय. हेंच यमक अश्वमेधपर्व–अध्याय १ गीति ६८ यांत आहे. ४. वराहशिशुरूप प्रभु. याच्या गर्जनेनें ब्रह्मदेवाला व सनत्कुमारांला फार संतोष झाला. ५. देह. ६. उन्हांत तापलेला गज जसा काय उदकांत शिरतो तसा वराह जळांत शिरला. [अ० १३ श्लोक २६.] ७. यज्ञवराहरूपी भगवान्. ८. दाढीच्या टोंकानें. ९. उदक. १०. धरी, उद्धरी. [पाण्यांत बुडालेल्या पृथ्वीला आपल्या दाढेनें उचलून आदिवराह वर आला. अ० १३ श्लो० ३१.] ११. अग्नि. स्वाहानाथ (अग्नि) काष्टांतून वेगानें बाहेर निघतो त्यापेक्षांही अधिक तीव्र अशा वेगानें प्रभु उदकांतून (वारि लंघुनी) निघे. १२. काष्ट. १३. गदा धारण करणारांत श्रेष्ठ. 'गदिवर' हें विशेषण साभिप्राय आहे म्हणून हा '**परिकर**' अलंकार होय. हिरण्याक्ष दैत्य आपल्या हातांत गदा घेऊन यज्ञवराहाच्या आंगावर आला असा म्हणण्याचा अभिप्राय आहे. जेथें विशेषण सहेतुक अथवा साभिप्राय असतें तेथें '**परिकर**' नामक अलंकार होतो. याचें लक्षण:–(१) 'विशेषणसाभिप्रायत्वं परिकरः' [काव्यमाला ३५, अलंकारसर्वस्व–पृ० ९४], (२) 'साभिप्रायविशेषणैरुक्तिः परिकरः' [काव्यमाला ४३, काव्यानुशासन–पृ० ४२], (३) 'विशेषणैर्यत्साकूतैरुक्तिः परिकरस्तु यः' [काव्यमाला २४, काव्यप्रदीप–पृ० ४३३], (४) 'विशेषणानां साभिप्रायत्वं परिकरः' [काव्यमाला १२, रसगंगाधर–पृ० ४८३]. या अलंकाराचीं उदाहरणें:—(१) मी अबला भीरु कसी साहों त्या गाधितनय तेजातें? । भ्यालासि असा दुःसह मानुनियां तूंहि सुरपते! ज्यातें. ॥ [आदिपर्व अ० ११ गी० २२] (२) 'मी बाहुकसूत' असें सांग, रहा तत्समीप सेवकसा, । या व्यसनीं सेव्य नव्हे रविवंशज तो मनुष्य देव कसा? ॥ [वनपर्व–अ० ४ गी० ६८.] (३) कीं पतित पति त्यागुनि विश्वशरण्याकडे रडत वाटे । आली जी लंकाश्री तीचा तो सांजनाश्रु पथ वाटे.॥ [वनपर्व अ० १२ गी० १४],(४) होतें सद्धर्मांच्या कासेला लागतां सदा शिव, हो! । येतों, वसा, प्रसन्न प्रभु मृत्युंजय तुम्हां सदाशिव हो. ॥ [वनपर्व–अ० १३ गी० २७], (५) साधु म्हणति, हा होय द्रोणप्रियशिष्य, होय हरदास, । होय अजितसख, म्हणतिल घन 'गुरुजी' या शरप्रकरदास. ॥ [विराटपर्व–अ० ६ गी० २५.] (६) रथचक्र उद्धरूं दे श्रुतिशास्त्रज्ञा महारथा कुळजा, । साधु न हाणिति अरिला पाहति अधृतायुध व्यथाकुळ ज्या. ॥ [कर्णपर्व–अ० ४८ गी० ६५], (७) त्यजि राज्यातें,

प्रभुसि, महि सोडवावी हें चित्तीं धरुनि, खळ खळवि [1]रोधी. ॥ ४८

वधुनि तया ये त्याच्या घनरक्तें सर्व [2]वेंदन [3]खरबटुनी ।

[4]अवगाहिलें सुकविनीं सुयश, जसें [5]सुगुरुसदनसर बटुनीं. ॥ ४९

ते ब्रह्मादि मुनिवर [6]स्तविति [7]मखवराहमूर्ति हर्षानें, ।

बहु निववीले यशानें जैसे अतितप्त अमृतवर्षानें. ॥ ५०

[8]**वा**! कोण दैत्य? [9]कारण वैराचें काय? हें पुसे [10]क्षत्ता, ।

[11]सच्छिष्यप्रिय करणें हें मात्र सुकार्य [12]त्या जसें दत्ता. ॥ ५१

'[13]**सु**दती [14]दिति [15]कामार्ता गांठी [16]संध्येंत **क**श्यपा, पतिचें ।

दावपरिवृता जेंवि जग अरण्यातें, । शरणागत तो बहुमत झाला त्या विश्वशरण्यातें. ॥ [पंचशतीरामायण—साकी ३०७, काव्यसंग्रहग्रंथमाला—रामायणें—भाग ३, पृष्ठ ६८.] १४. हिरण्याक्ष. १५. तशांत (तशा प्रसंगीं, पृथ्वीसमुद्धरणसमयीं) विरोधी (वैरी, प्रतिस्पर्धी) गदिवर (गदायुद्धविशारद) दैत्य (हिरण्याक्ष नामक दितिपुत्र) प्रकटे (प्रकट झाला) जो खळ (दुष्ट दैत्य) खळखळ (मोठा कोलाहल करून) मही सोडवावी हें चित्तीं धरुनि (यज्ञवराहापासून पृथ्वी हिसकावून घ्यावी असें मनांत आणून) प्रभुसि (प्रभुला) खळवि (खोळंबवी, कांहीं काळपर्यंत थांबवी) [आणि] रोधी (अडवी, आडवा आला.) खळवणें=खळविणें=थांबवणें, तहकूब करणें.

१. कोंडी. २. हिरण्याक्षाच्या रक्तानें आदिवराहाचें मुख भरून गेलें होतें. [अ० १३ श्लो० ३२.] ३. बरबटून. ४. प्रवेशिलें. ५. चांगल्या गुरूचें सदन तेंच तळें हें. ६. ही स्तुति अध्याय १३ श्लो० ३४-४५ यांत आहे. ७. यज्ञवराहमूर्ति. ८. वा! ९. दैत्य व आदिवराह यांच्या वैराचें कारण काय? वराहाचा आणि हिरण्याक्षाचा युद्धप्रसंग कोणत्या कारणानें झाला? [अ० १४ श्लो० ३.] १०. विदुर. ११. उत्तम शिष्यांचें कल्याण करणें. १२. त्या मैत्रेयाला. १३. चांगले दंत जीचे अशी. १४. दिति ही दक्षाची कन्या. हिचें लग्न मरीचि नामक प्रजापतीच्या कश्यप नामक मुलाशीं झालें होतें. १५. मदनेंकरून पीडित. १६. संध्याकाळीं फुटक्या तिनीसांजा. [दितीला अकालीं कामवासना झाली, ती पुरविण्याबद्दल तिनें कश्यपाची प्रार्थना केली. या समयीं सूर्य अस्तास चालला असून कश्यपमुनी होमशाळेमध्यें होम देत बसले होते. तेव्हां दिती त्याला म्हणाली, 'आमच्या पित्यानें आपल्या १३ मुली तुमच्या स्वभावाशीं त्यांचें जमेल असें जाणून प्रजावृद्धि व्हावी या हेतूनें तुम्हाला अर्पण केल्या. तुम्ही कांहींना अपत्यें दिलीं व कांहींना दिलीं नाहींत; असा दुजाभाव ठेवणें तुम्हाला योग्य नाहीं. माझी प्रार्थना व्यर्थ होणार नाहीं असें जाणून मी आल्यें आहें.' हें दितीचें भाषण ऐकून कश्यपमुनींनीं संध्याकाळची राक्षसीवेळ टाळावी म्हणून तिला सामोपचारानें पुष्कळ सांगून पाहिलें. पण ती कांहींकेल्या ऐकेना. अखेरीस तिला भीतीही घा-

चालों न देचि मत, करि मन तै[1]शाचेंहि वश्य पाप तिचें. ॥ ९२
दे वै[2]रभीता मग ती पतिला प्रार्थी [3]स्वगर्भ रक्षाया, ।
कश्यप म्हणे, '[4]सुतद्वय होइल, लोका करील [5]रक्षा या. ॥ ९३
वा रिल [6]लोकोपद्रव वि[7]श्वेश्वर तव सुतांसि मारील.' ।
तों दिति म्हणे, '[8]सुनाभें वधिल प्रभु तरि खळांहि [9]तारील.' ॥ ९४
यं[10] मिवर म्हणे, 'प्रिये! तूं [11]अनुतापविचारविष्णुबहुमान ।
रुद्रीं वरींहि आदर करिसी, कल्याण हेंचि बहु मान. ॥ ९५
नं[12] तिनुतिभाजन सज्जन होइल तुज एक पौत्र[13] सति! [14]जाये! ।

तली. 'तूं दोन घटका दम धर, ही राक्षसी वेळ टळूं दे, या वेळेस शंकराचीं भूतें पिशाचें जिकडेतिकडे फिरत असतात तर तूं जरा थांब' असें अनेकवार सांगून पाहिलें; पण ती वाटेवर आली नाहीं. निरुपायामुळें त्याला तिचें म्हणणें कबूल करावें लागलें. कश्यपानें तिला सांगितलें कीं, 'तुझ्या दुष्ट पुत्रांचा विष्णु संहार करील व तुझा एक नातु परम भगवद्भक्त होईल.' हें ऐकून दितीला थोडेंसें दुःखांत समाधान वाटलें. अध्याय १४.]

१. त्या दितीच्या पापानें तशा मुनिवराचेंही मन वश केलें. २. शंकर हा कश्यपाचा साडू होय. कश्यपाचा आणि शंकराचा सासरा दक्षप्रजापति होय. एका सासऱ्याचे जांवई एकमेकांस भावांप्रमाणें समजतात, तेव्हां शंकर हा कश्यपाचा भाऊ आणि म्हणूनच दितीचा दीर समजला पाहिजे. आपण मोठें पाप केलें असें दितीला वाटलें व ती लज्जित झाली. अ-योग्य समयीं एकांत केला हा जगताचा रक्षक जो शंकर त्याचा आपण मोठा अपराध केला असें दितीला वाटलें. शंकर आपल्या गर्भाचा वध करील असेंही तिला भय पडलें. [अ० १४ श्लो० ३३.] ३. शंकरानें गर्भाचा घात करूं नये म्हणून तिनें कश्यपाची प्रार्थना केली. ४. तुला दोन पुत्र होतील व ते या लोकांला त्रास वारंवार देतील. [अ० १४ श्लो० ३८.] ५. राख. ६. लोक+उपद्रव=लोकांचा त्रास. ७. तुझे मुलगे निरपराध जनांना व साधूंला त्रास देऊं लागले म्हणजे विश्वेश्वर (जगन्नायक विष्णु) त्या सुतांचा वध करील. [अ० १४ श्लो० ४०.] ८. चक्रें. ९. विष्णूच्या हातून जे मरण पावतात ते तरतात आणि जे विप्रशापदग्ध होतात ते नरकास जातात या समजुतीला अनुसरून हें वर्णन आहे. १०. योगिश्रेष्ठ. (कश्यप.) ११. अनुताप=केलेल्या अपराधाबद्दल पश्चात्ताप; विचार=यो-ग्यायोग्य गोष्टींचा विचार; विष्णु बहुमान=भगवान् विष्णूचा मोठा सन्मान ठेवणें; रुद्रीं वरींहि आदर=रुद्र (शंकर) आणि वर (पति कश्यप मी) या आम्हां दोघांविषयीं पूज्यबुद्धि हें सर्व तूं करिल्येस, हेंचि (ह्या पांच गोष्टी) बहु कल्याण (फार श्रेयस्कर) मान (समज) या पांच गोष्टींच्या योगानें तुझें मोठें कल्याण होईल. १२. नमस्कार आणि स्तुति यांचें पात्र. १३. पुत्राचा पुत्र=पौत्र (नातु, प्रल्हाद). हिरण्यकशिपूस कयाधूपासून झालेल्या चार पुत्रांतील ज्येष्ठ. हा जन्मतःच भगवन्निष्ठ परमभक्त होता. जंभासुराची कन्या कयाधु ही याची जननी. १४. भार्ये! पति पुत्ररूपानें जायेच्या ठिकाणीं उत्पन्न होतो, यास्तव

आलिंगना उभारुनि सर्व भुज, म्हणेल विश्वपति ज्या 'ये.' ॥ ५६
मो द प्रपूर्व[1] चित्तीं, देहीं रोमांच तत्क्षणीं दाटे, ।
या प्रियभविष्यकथनें[2] **दि**तिला 'धन्या' स्वयें असें वाटे. ॥ ५७
भ य लोकविनाशाचें[3], शतवर्षें **दि**ति तसाचि गर्भ[4] धरी, ।
दाटे दिशांत बहु तम[5], न विधु[6] न वन्हि न रवि प्रकाश करी. ॥ ५८
गँ[7] डबडले सुर, गेले सत्याच्या[8] नायका[9] पुसायातें, ।
'लयदहनतेज[10] धुमतें, भस्म करिल काय कापुसा या[11] तें?' ॥ ५९
वँ[12] नरुहज म्हणे, 'मानस[13] मत्पुत्र सनत्कुमारसुख[14] चवघे ।
श्रीवैकुंठा[15] गेले, उत्साहेंकरुनि एकदा अवघे. ॥ ६०

जाया म्हणजे पुत्राची माता ही त्याचीच माता होते, पुत्र आणि पिता हे अभेदरूप आहेत–हा भावार्थ. ['पतिर्जायां प्रविशति गर्भो भूत्वेह मातरम् । तस्यां पुनर्नवो भूत्वा दशमे मासि जायते । तज्जाया **जाया** भवति यदस्यां जायते पुनः ॥' इति श्रुतिः.]

१. 'प्र' पूर्वी ज्याच्या असा मोद म्हणजे प्रमोद तो. ही पंताची शब्दकोटी लक्षांत ठेविली पाहिजे. २. पौत्र सज्जन व साधुभगवद्भक्त होईल या कथनानें. ३. लोकविनाशाचें भय [होतें म्हणून] दिति शतवर्षें तसाचि गर्भ धरी–असा अन्वय. ४. लोकविनाशाचें भय लांबणीवर पडावें म्हणून दितीनें (कश्यपवीर्योत्पन्न) गर्भ आपल्या उदरांत शंभर वर्षें धारण केला. [अ० १५ श्लो० १.] ५. अंधकार. ६. गर्भाच्या तेजामुळें चंद्र, सूर्य आणि अग्नि यांचा प्रकाश नाहींसा झाला. ७. अंधकारामुळें इंद्रादि लोकपालांचे पराक्रम कुंठित झाले व देवांस दिशांचा उमज न पडल्या कारणानें अतिशयित त्रास झाला. ८. सत्यलोकाच्या. ९. विधात्या. 'सत्याच्या नायका' हें 'पर्यायोक्त' होय. १०. लय+दहन+तेज=प्रलयकाल+अग्नि+प्रताप=प्रलयकालीन अग्नीचें तेज. ११. या जगद्रूप कापसाला. १२. वनरुह+ज=कमल+जन्मलेला=कमलोद्भव (ब्रह्मदेव.) [वन=उदक; रुह=वाढलेलें=पाण्यांत रुजलेलें व वाढलेलें कमल.] १३. मनापासून उत्पन्न झालेले. १४. सुख=प्रमुख. [सुख=प्रमुख, मुख्य. 'मुखं तु वदने मुख्ये ताम्रे छद्मनि ना पुमान्' इति भागुरिः.] १५. वैकुंठाचें वर्णन भागवत स्कंध ३ अध्याय १५ यांत केलें आहे तें असें:–वैकुंठांत रहाणाऱ्या सगळ्या लोकांचीं रूपें विष्णूसारखीं होतीं. ते निष्काम धर्माचरण करून विष्णूची आराधना करीत. तेथें रहाणारा पुराणगुरु भगवान् विष्णु हा सत्वगुणमय असून वेदांतैक्यवेद्य होता. तो तेथें भक्तांना सुख देण्याकरितांच रहात असे. तेथें नैःश्रेयस नामक उद्यान असून त्यांतील वृक्षांस सगळ्या ऋतूंतील फळांची आणि पुष्पांची शोभा सारखी प्राप्त झाली होती. त्या उद्यानांत विष्णूचे पापहारक भक्त विमानांत बसून आपल्या स्वामीचें चरित्र गात असतात. उदकामध्यें फुललेल्या फुलांचा मकरंदयुक्त सुवास सुटला असतो. तेथें अत्युत्तम विषयसुख मिळण्यासारखें असतें, परंतु ईश्वरभजननिमग्न भक्त त्या सुखाची पर्वाच करीत नाहींत.

ते म्हणति, 'पहावाचि प्रभुवर[1] सद्वारपाळ[2] कांहीं[3] हो[4], ।
तों वारिले[5] **जयवि**जय[6] जे त्या तद्वारपाळकांहीं[7] हो ! ॥ ६१
वारण[8] होतां, येतां तद्वेत्र[9] समोर, विप्रं[10] तापातें ।
पावति, शापिति[11], दाविति, ते जरिहि तमोरवि प्रतापातें. ॥ ६२
सु[12] गतिभ्रंशकरपरमखरशापत्रस्त **जयवि**जय पाय ।
धरुनि, तयां भगवत्स्मृतिवर[13] मागति, इतर[14] पतितहित काय ? ॥ ६३
देव प्रभु समजुनि[15] ये **श्री**सह[16] धावुनि पदाति, सरि[17] याची ।

---

१. विष्णु. २. सत्+वार+पाल=साधु+समूह+पालक=साधु समूहाचा रक्षक. ३. कांहीं-ही होवो, कसाही प्रसंग गुदरो. ४. होऊं. ५. हे चवघे मानसपुत्र सहा चौक्या ओलांडून गेले, पण सातव्या चौकीवर त्यांना द्वारपालांनीं प्रतिबंध केला. [अ० १५ श्लो० ३०.] ६. **जयविजय**–हे दोघे सहोदर बंधु होते. हे ब्राह्मण असून यजन हवन करीत असतां एका प्रसंगीं यांचें यज्ञदक्षिणेनिमित्त भांडण झालें. तेव्हां त्यांनीं रागाच्या आवेशांत एकमेकांस शाप दिले. एक हत्ती झाला व दुसरा नक्र हो-ऊन गंडकी नदींत राहिला. पुढें श्रीविष्णूनें कृपाळू होऊन त्यांस शापनिर्मुक्त केल्यावर ते उभयतां वैकुंठांत विष्णूचे द्वारपाळ होऊन राहिले. पुढें या जयविजयांनीं ब्रह्मदे-वाचे सनकादिक जे मानसपुत्र ते वैकुंठास गेले असतां त्यांस आंत जाण्यास प्रति-बंध केला. तेव्हां त्यांस राग आला, व त्यांनीं 'देवल जाऊन तुम्ही तीन वेळ असुरयो-नींत जन्म घेऊन नंतर पूर्वपद पावाल' असा शाप दिला. या शापानुसार **जय** आणि **वि**जय हे अनुक्रमें **हि**रण्यकशिपु व **हि**रण्याक्ष, **रा**वण व **कुं**भकर्ण, आणि **शि**शुपाळ व **व**क्रदंत असे तीनदां असुर झाले व नंतर पूर्वपद पावले. ७. अहो. ८. निषेध होतां, आंत जाण्यास प्रतिबंध होतांच. ९. त्या जयविजयांची वेतकाठी. १०. चवघे सनत्कुमार. ११. जेथें काम, क्रोध व लोभ हे तीन शत्रु उत्पन्न होतात त्या लोकीं ह्या वैकुंठांतून निघून जा, असा सनत्कुमारांनीं जयविजयांस शाप दिला. [अ० १५ श्लो० ३४.] १२. उत्तम गतीचा नाश करणारा जो अतितीक्ष्ण शाप तेणें त्रासलेले असे. १३. भगवान् विष्णूची स्मृति आम्हांस सदा असावी असा वर जयविजय यांनीं मागितला. [अ० १५ श्लो० ३६.] १४. पतिताचें (पापी जनाचें) हित (कल्याण) इतर (अन्य) काय [आहे ?]. भगवंताचें स्मरण व्हावें यांतच पतिताचें कल्याण आहे, कारण नामस्मरणानेंच पापी जनांचा उद्धार होतो. १५. आपल्या द्वारपालांनीं परमहंस सनत्कुमारांचा अपमान केला हें मनांत समजून श्रीसह (बरोबर लक्ष्मीला घेऊन) पदाति (पादचारी, पायांनीं चालत) [सनत्कुमा-रांस दर्शन देण्यासाठीं] प्रभु देव (विष्णु) ये (आला, येता झाला.) १६. लक्ष्मीसह येण्याचा उद्देश हाच कीं जरी सनत्कुमारमुनि निर्लोभ आणि निष्काम आहेत, तरी त्यांना अमित ऐश्वर्य देऊन द्वारपाळांना त्यांनीं क्षमा करण्यास प्रवृत्त व्हावें. १७. बरोबरी.

ताता मातेहि न ये, मग काय कथा वदा तिसरियांची? ॥ ६४
वा रिद कृष्ण, मयूरचि ते, कीं प्रभु चंद्रमा चकोर मुनी।

---

१. हें काव्यार्थापत्ति नामक अलंकाराचें सुंदर उदाहरण आहे. २. चंद्रदर्शनानें चकोरास आणि मेघगर्जनेनें मयूरास प्रमोद होतो–असा कविसंकेत आहे हें वाचकांस विदित असेलच. हे कविसमय अनेक आहेत, त्यांचा समावेश पुढच्या चार पद्यांत केला आहेः—'मालिन्यं व्योम्नि पापे यशसि धवलता वर्ण्यते हासकीर्त्यो रक्तौ च क्रोधरागौ सरिदुदधिगतं पंकजेंदीवरादि। तोयाधारेऽखिलेऽपि प्रसरति च मरालादिकः पक्षिसंघो ज्योत्स्ना पेया चकोरैर्जलधरसमये मानसं यांति हंसाः ॥,' 'पादाघातादशोकं विकसति बकुलं योषितामास्यमद्यैर्यूनामंगेषु हाराः स्फुटति च हृदयं विप्रयोगस्य तापैः। मौर्वी रोलंबमाला धनुरथ विशिखाः कौसुमाः पुष्पकेतोर्भिन्नं स्यादस्य बाणैर्युवजनहृदयं स्त्रीकटाक्षेण तद्वत् ॥,' 'अह्न्यंभोजं निशायां विकसति कुमुदं चंद्रिका शुक्लपक्षे मेघध्वानेषु नृत्यं भवति च शिखिनां नाप्यशोके फलं स्यात्। न स्याज्जाती वसंते न च कुसुमफले गंधसारद्रुमाणामित्याद्युन्नेयमन्यत्कविसमयगतं सत्कवीनां प्रबंधे ॥.' दुसऱ्या एका पद्यांत या कविसमयांचा समावेश केला आहे तो असाः—'पादाघातादशोकस्तिलककुरबकौ वीक्षणालिङ्गनाभ्यां स्त्रीणां स्पर्शात्प्रियंगुर्विकसति बकुलः सीधुगंडूषसेकात्। मंदारो नर्मवाक्यात्पटुमृदुहसनाच्चंपको वक्त्रवाताच्चूतो गीतान्नमेरुर्विकसति च पुरोनर्तनात्कर्णिकारः ॥.' संस्कृत साहित्यशास्त्रकारांनीं अनेक संकेत मानिले आहेत त्यांस **कविसमय** अथवा **कविसंप्रदाय** असें म्हणतात. ह्या पद्यांतील व इतर कविसमय येथें देतोंः–आकाश आणि पाप यांचें मालिन्य, कीर्ति व हास्य यांचें शुभ्रत्व, क्रोध व प्रीति यांचा रक्तिमा (तांबडेपणा), नदींत आणि सागरांत यथाक्रम पंकज आणि इंदीवर यांची उत्पत्ति, मरालादिक पक्ष्यांचा जलाशयांत संचार, चकोरांचें चंद्रकिरणपान, जलदागमकाळीं हंसांचें मानससरोवराप्रत आगमन, स्त्रीलत्ताप्रहारें अशोकवृक्षाचें फुलणें, तरुण स्त्रियांच्या मद्यगंडूषांनीं बकुलवृक्षाचें फुलणें, विरहसंतापानें तरुणांच्या हृदयावरील हारांचें व हृदयांचें फुटणें, कामाचें चाप आणि बाण कौसुम (पुष्पमय) आणि त्याच्या धनुष्याची दोरी भ्रमरमाला असणें, कामाच्या बाणांनीं आणि स्त्रीकटाक्षांनीं तरुणजनहृदयांचा भेद, दिवसा (सूर्याच्या योगानें) अंभोजांचा आणि रात्री (चंद्राच्या योगानें) कुमुदांचा विकास, शुक्लपक्षांत चंद्राचा प्रकाश, मेघगर्जनेनें मोरांचें नृत्य, अशोकाला फळें न येणें, वसंतांत जाईला फुंल न येणें, गंधसारवृक्षांच्या (चंदनवृक्षांच्या) फलपुष्पांचा अभाव; स्त्रियांच्या पादाघातानें अशोकाचा, कटाक्षप्रेरणानें तिलकवृक्षाचा (तिळव्याचा), आलिंगनानें कुरबकाचा (कोरांटीचा), करस्पर्शानें प्रियंगूचा (वाघांटीचा), मद्यगंडूषसेकानें बकुलाचा, नर्मभाषणानें मंदराचा, मृदुहसितानें चंपकाचा, मुखमारुतानें (तोंडाचा फुंकर घालण्यानें) आम्रवृक्षाचा, सुस्वर गायनानें नमेरुवृक्षाचा (सुरंगीच्या झाडाचा), नृत्यानें कर्णिकाराचा (पांगाऱ्याच्या झाडाचा) पुष्पविकास होणें, हत्तींचें गंडस्थळ, सापाचें मस्तक, शंख, मत्स्य, वराह आणि वेणु यांत मोतीं असणें, चक्रवाकमिथुनांचा सूर्यास्ताबरोबर वियोग आणि सूर्योदयाबरोबर समागम,

म्हणति, 'समाधिहि[1] त्या **श्री**सुखमूर्तिपदांबुजीं नको रमुनी.' ॥ ६५

ये[2] जिती यज्ञेशातें[3] वाग्यज्ञें[4] ते कुमारमुनि सुकवी, ।

या कीर्तिरसीं नतमति मुख न **शिवीं उमा** रमुनि सुकवी[5]. ॥ ६६

न लिनाक्ष[6] म्हणे[7], 'मुनि हो ! तेजें न करुन सुदंड तो कांहीं ।

दासां सह्यचि[8] केलें प्रभुच्या जरि अघ उदंड तोकांहीं[9]. ॥ ६७

मो ठा अपराध ईहीं[10], प्रभुंनीं यां योग्य दंड हा केला, ।

योग्य प्रतिक्रिया[11] हे, नभ दे अनुरूप[12] हाक हाकेला. ॥ ६८

भ जति श्री[13] कीर्ति[14] मला, नित्यजयश्रीहि, यांसि मीं पात्र, ।

भव्यसुधाब्धिब्रह्मण[15]सेवेनें अतिपवित्र हें गात्र. ॥ ६९

इत्यादि अनेक कविसमय प्राचीन ग्रंथांत आढळतात. यांचा प्राकृत कविवर्यांनीं ही आपापल्या काव्यांत प्रसंगानुरूप संनिवेश केला आहे. या कविसंप्रदायांचें सविस्तर वर्णन केशवमिश्रकृत **'अलंकारशेखर'** नामक अलंकारग्रंथाच्या १५ व्या मरीचींत केलें आहे. तें इष्ट असेल तर पहावें. (काव्यमाला–अंक ११० व १११.)

१. समाधीची कांहीं गरज नाहीं, समाधि नको असें सनत्कुमार म्हणूं लागले. श्रीविष्णुचरणकमलीं रमण्यास मिळाल्यावर समाधीची आवश्यकता राहिली नाहीं असें म्हणाले. समाधीच्या योगानें ज्याचें ध्यान केलें जातें तें ब्रह्मच त्यांच्या डोळ्यांसमोर प्राप्त झालें तेव्हां समाधीचें प्रयोजन उरलें नाहीं. २. पूजन करतात. ३. यज्ञेश्वरातें. ४. सनत्कुमारांनीं भगवत्स्तुति केली आहे. [अ० १५ श्लो० ४६-५०.] ५. नतमति (नम्रमनस्क, शरणागत भक्त) या कीर्तिरसीं रमुनि (रममाण होऊन) मुख सुकवी न (आपलें तोंड सुकूं देत नाहीं, आपले मुखाचा प्रफुल्लितपणा उणा होऊं देत नाहीं, ईश्वराचें स्तवन सतत केल्यानें भक्ताचें मुख शुष्क होत नाहीं, तें सदा विकसित असतें.) [जशी] उमा (पार्वती) शिवीं रमुनि (शंकराचे ठिकाणीं रममाण होऊन) (मुख न सुकवी.) भगवंताची कीर्ति गाणारे भक्तजन कधींच दैन्य पावत नाहींत–असा भावार्थ. ६. कमलपत्राक्ष. (श्रीविष्णु.) ७. सनत्कुमारांनीं केलेली स्तुति ऐकून विष्णु म्हणाला. [अ० १६ श्लो० १.] ८. सहन करण्यास योग्यचि. ९. मुलांनीं. १०. या जयविजय नामक माझ्या पार्षदांनीं. ११. प्रतीकार (निराकरण.) १२. योग्य. १३. लक्ष्मी मला क्षणभरही सोडीत नाहीं, ती माझी सदा सेवा करते. (मी तिचा आदर करीत नाहीं तरी ती माझें सेवन करते.) १४. जिच्या योगानें पतित चांडाळ देखील पवित्र होतात अशी कीर्ति माझी दासी आहे. [अ० १६ श्लो० ६-७.] १५. भव्य (कल्याण)+सुधाब्धि (अमृतसागर) [असे जे] ब्राह्मण त्यांच्या सेवनानें हें माझें गात्र (देह) अतिपवित्र झालें आहे. मला जें श्रेष्ठत्व आणि पावित्र्य प्राप्त झालें आहे तें ब्राह्मणसेवनाचें फळ होय.

ग जसा मीं ब्राह्मणपदरेणु[1] शिरीं दानवारि[2] वाहतसें, ।
हा[3] मज दे, न मयूरा[4] हर्षाचें दान वारिवाह[5] तसें. ॥ ७०

व दनीं भरितों ते ते घेती जे साधु विप्रजन[6] घांस, ।
स्व भुंजहि[7] तोडिन मी प्रतिकूळ जरि तुम्हां अशांहि अनघांस[8].' ॥ ७१

ते मुंनि[9] यापरि बहुविध सांत्वनपीयूषमुदिरवर्षानें[10] ।
बहुत निवाले, वदले चातक[11] जलदासि जेविं हर्षानें. ॥ ७२

'**वा**त्सल्यें गौरविसी प्रभुवर! तूं ब्रह्मकुळ अगा! धाल्या! ।
या श्रीमुखांतुनि निवति ज्या सूक्तिसुधापगा[12] अगाधा[13] ल्या. ॥ ७३

सुज्ञ प्रभु तूं यांतें[14] दंडाया, वृत्ति[15] द्यावया, स्वामी, ।
आम्हांही शिक्षाया[16] कीं उद्धत[17] हे अशाहि या धामीं[18].' ॥ ७४

देववर म्हणे, 'जातिल असुरगतिस[19], वर्ततील हे स्वैर,
मुनि हो! पावतिल[20] मला मजसीं अत्युग्र[21] करुनियां वैर.' ॥ ७५

---

१. द्विजांच्या पायांची धूळ. २. दानवांचा (दैत्यांचा) अरि (शत्रु.) ३. पदरेणु. ४. हा (पदरेणु) हर्षाचें दान दे, तसें हर्षाचें [दान] वारिवाह (मेघ) मयूरा (मोराला) न [दे] असा अन्वय. मेघांला पाहून मोरांना आनंद होतो असा कविसमय आहे. 'वर्षास्वेव मयूरस्य नृत्यं रुतंच' [काव्यानुशासन पृ० १०.] ५. मेघ. ६. साधु (सज्जन) आणि विप्र (द्विज) भोजन करतांना जे जे घांस घेतात ते मी आपल्या मुखांत भरून संतोष पावतों, विप्रांनीं भोजन केलें म्हणजे तें मला पोंचतें व मी तृप्त होतों. [अ० १६ श्लो० ८.] ७. श्लोक ६ पहा. ८. अपापांस. ९. सनत्कुमारमुनि. १०. सांत्वनरूप पीयूषाच्या (अमृताच्या) मुदिराच्या (मेघाच्या) वर्षानें (वर्षणानें, वृष्टीनें.) ११. चातक पक्षी जलदाला पाहून आनंद पावतो असा कविसमय आहे. ह्या कविसमयांचें वर्णन मागें दिलें आहे तें पहावें. १२. सु+उक्ति+सुधा+आपगा=उत्तम+भाषण+अमृत+नदी=उत्तम भाषणरूप अमृताच्या नद्या. [आपगा=नदी. 'स्रोतस्वती द्वीपवती स्रवंती निम्नगापगा' इत्यमरः । अपां समूहः आपम्, तेन गच्छतीति आपगा. ॥ 'अपगा' आणि 'आपगा' अशीं दोन रूपें या शब्दाचीं आहेत. विद्यादगारमागारमपगामापगामपि इति द्विरूपकोशः] १३. अतलस्पर्श, खोल. १४.या जयविजयांतें. १५. जीविकासाधन. (श्लो० २५.) १६. शासन करण्यास. १७. दांडगे. (हें आम्ही या प्रत्यक्ष विष्णूच्या मंदिरांत दांडगाई करतों अतएव शासनार्ह आहों.) १८. गृहीं. १९. असुरयोनींत उत्पन्न होतील. २०. माझ्यापाशीं पुनः वैकुंठलोकीं प्राप्त होतील. [अ० १६ श्लो० २६] २१. फार भयंकर.

वाताशन[1] ते आज्ञा मागुनि, जाणोनि हरि, खरा[2] गेले,[3] ।
कीं पावले तसेही दर्शन होतांचि हरिख रंगेले.[4] ॥ ७६

य विरामांसि[5] म्हणे[6] प्रभु, 'जा, शर्म[7] असो तुम्हांसि, भी[8] सोडा, ।
याल पुन्हां, मज संमत[9] हें, कालविलंब यांवया[10] थोडा.' ॥ ७७

न मुनि प्रभुचरणातें, प्रभु[11] गेल्याउपरि, देव[12] ते रडले, ।
दितिच्या उदरीं आले, वैकुंठींहूनि जे असे[13] पडले.[14] ॥ ७८

'**मो**ह तयांच्या[15] तेजें तुमचीं[16] तेजें हरूनि हा केला, ।

---

१. वायु भक्षण करणारे. २. सत्य. ३. परत गेले. ४. रागावले. ५. यकार विरामीं (नामांतीं) ज्यांच्या त्यांस (जयविजयांस) द्वितीयस्कंध–गीति ७४ टीप पहा. ६. अ० १६ श्लो० २९ पहा. ७. कल्याण. ८. तुम्ही कांहीं भय धरूं नका (ब्राह्मणाच्या शापाचा प्रतिकार करण्याचें सामर्थ्य मला आहे, तेव्हां भय धरूं नका.) ९. जें झालें आहे तें मला मान्य (मत) आहे. सनत्कुमारांनीं तुम्हांला (जयविजयांला) शाप दिला ही गोष्ट मला अभीष्ट आहे. या म्हणण्याचा अभिप्राय भागवतटीकाकारांनीं टीकेंत स्पष्ट केला आहे त्याचें तात्पर्य असें:—प्रथमत: सनत्कुमारांना राग येणेंच असंभाव्य; तसेंच भगवंताचे द्वारपाळ ब्राह्मणांना कधींच प्रतिबंध करावयाचे नाहींत; त्याप्रमाणेंच भगवंत आपल्या भक्तांबद्दल इतकें औदासिन्य बाळगतील असेंही संभवत नाहीं, आणखी वैकुंठांत जाणाऱ्या जनांस तर पुनर्जन्म नाहीं; हें सर्व खरें आहे. परंतु भगवंताला जशी सृष्टि उत्पन्न करण्याची इच्छा होते तशीच एकदां युद्ध करण्याचीही झाली. आतां युद्ध करावयाचें म्हणजे सामनेवाला बरोबरीचा हवा लागतो. आणि भगवंताच्या सेवकांशिवाय इतर योद्धा भगवंतापाशीं मुळींच टिकाव धरूं शकणार नाहीं. परंतु सेवक तर कधीं धन्याबरोबर शत्रुत्व संपादन करण्यास उद्युक्त होणार नाहींत, म्हणून या अडचणींतून पार पडण्यासाठीं भगवंतानीं एक युक्ति योजली. सनत्कुमारांना जयविजयांकडून राग आणवावा म्हणजे अर्थातच ते जयविजयांना शाप देतील, आणि अशा रीतीनें त्यांस शत्रु बनवून त्यांशीं युद्धकौतुहल पुरवावें. १०. पूर्वी एकदां मी योगनिद्रा घेत असतां लक्ष्मी आंत येत होती, तेव्हां तिला तुम्हीं, हे जयविजयहो, दारावर प्रतिबंध केला होता, त्या समयीं तिनें रागावून तुम्हांला 'ब्राह्मण शाप देतील' असें म्हटलें होतें, त्याप्रमाणें तुम्हांस हा शाप झाला आहे. तुम्ही माझी विरोधभक्ति कराल आणि तिच्या योगानें ब्रह्महेलनानें तुम्हांस लागलेला दोष नाहींसा होईल व थोडक्याच काळांत तुम्ही माझ्याजवळ परत याल–असें वर्णन मूळांत आहे. [अध्याय १६ श्लोक ३०-३१.] ११. विष्णु. १२. जयविजय. १३. शापेंकरून, शापदग्ध असे. १४. हे दोघे द्वारपाल वैकुंठांतून पडले, तेव्हां लोकांनीं मोठा हाहाकार केला. [अ० १६ श्लो० ३४.] १५. त्या दितिगर्भवासी जयविजयांच्या तेजानें. १६. देवांचीं (तेजें हरून नेलीं).

जा स्वस्थ संकटीं प्रभु देइल, करुणा करूनि, हांकेला.[1]' ॥ ७९

भ त्याच्या आज्ञेनें शतवर्षांतीं **दि**ती यम[2] प्रसवे, ।

झाले बहु उत्पात,[3] स्वास्थ्याला मुनिमनांतही नसवे.[4] ॥ ८०

ग र्भ दुराग्रह अकुलज[5] जनतेचे तेविं वाढती **दि**तिचे, ।

ज्येष्ठ **हि**रण्यकशिपु तदनुजनि[6] **हि**रण्याक्ष कंपद क्षितिचे.[7] ॥ ८१

व श केले ब्रह्मवरें[8] बाहुबळें **क**नककशिपुनें लोक, ।

गदिवर[9]**क**नकाक्षभयें अमर[10] लपाले त्यजूनियां ओकें[11]. ॥ ८२

ते जस्वी **क**नकाक्ष क्रीडे निःशंक अर्णवामाजी,[12] ।

जाणों[13] लहरींस म्हणे:—, 'कीर्तिच वर्णूनि वर्णवा मौजी.' ॥ ८३

---

१. करुणा करूनि प्रभु हाकेला देइल—असा अन्वय. तुमच्या प्रार्थनेला अनुकूल उत्तर देईल. हांक देणें=उत्तर देणें, साहाय्य करणें. [याप्रमाणें ब्रह्मदेवानें दितीच्या गर्भाचें कारण देवांस सांगितलें, व सूर्यचंद्रांचें तेज नष्ट झाल्याचें कारणही देवांस कळलें. नंतर ते सर्व देव परत स्वर्गास गेले.] २. पुत्रद्वय, जुळे मुलगे. ३. पृथ्वीवर, स्वर्गात, आणि आकाशांत उत्पात झाले. भूकंप, पर्वतप्रचालन, दिशाप्रज्वलन, उल्कापात, तडित्पतन, अशनिच्यवन, झंझावात, वृक्षोन्मूलन, वारिराशिगर्जना इत्यादि अनेक उत्पात झाले. [अ० १७ श्लो० ३-१४.] ४. न राहवे. ५. अकुलीन जो जीवसमुदाय त्याचे दुष्ट आग्रह. ६. तद्+अनु+जनि=त्याच्या+मागून+जन्म=त्याचा धाकटा भाऊ. ७. पृथ्वीचे. ८. 'आपल्याला कोठूनही मृत्यु नसावा' असा वर हिरण्यकशिपूनें ब्रह्मदेवापासून मिळविला. ९. येथें 'गदिवर' हें पद साभिप्राय आहे म्हणून हा परिकरालंकार होय. गदापाणि हिरण्याक्षाला पाहून देव घाबरले व लपून बसले. [अ० १७ श्लो० २२.] १०. देव. ११. गृह. १२. समुद्रांत. १३. हा उत्प्रेक्षालंकार जाणावा. जेव्हां उपमेयावर जाणों हें उपमानच आहे अशी संभावना केली असते तेव्हां उत्प्रेक्षानामक अलंकार होतो. (साहित्यदर्पण—का० ६८६—६९२.) जसें—'हा विश्वासराव जणू काय अभिमन्युच आहे असें स्वपक्षीयांनीं म्हटलें.' येथें विश्वासराव अभिमन्युसम नव्हे तर प्रत्यक्ष अभिमन्युच असें म्हटलें म्हणून उत्प्रेक्षा झाली. दुर्योधनास चित्रसेन गंधर्वानें धरून नेलें त्या प्रसंगाची गीति उत्प्रेक्षेचें उदाहरण आहे:—'सानुज, सदार, दुर्जन दुर्योधन खेचरेश्वरें धरिला, । जाणों क्षितिहृदयींचा साक्षात्कांटाचि तो समुद्धरिला. ॥' [वनपर्व—अध्याय ७ गीति ३०]. यांत दुर्योधनाच्या ठायीं कांट्याची संभानवा केली आहे म्हणजे उपमेयावर जाणों हें उपमानच आहे अशी संभावना (आरोप) केली आहे. हा उत्प्रेक्षालंकार जाणावा. याचें लक्षण:—संभावनमथोत्प्रेक्षा प्रकृतस्य परेण यत्.' जेथें प्रकृत उपमेयावर हें उपमानच काय अशी कल्पना (संभावना) केली असते म्हणजे प्रकृतावर अप्रकृताच्या धर्माचा आरोप अनिश्चितपणें केलेला असतो तेथें हा उत्प्रेक्षालंकार होतो. याची योजना करण्यांत 'जाणों' 'जणू काय'

वा[1] रिपति म्हणे[2] त्यातें[3]:–, 'प्रतिवीर[4] महाग दाविना शम हा ।
मज किमपि वा म्हणति कीं गर्वेंचि महागदा विनाश महा. ॥ ८४
सु[5] भट पुरातन[6] पुरुषचि एक, पहा जा तया समरशील ।
तूं, जरि सदय शिवांवरि[7] तरि हटकुनि बा! तयास मरसील.' ॥ ८५
दे वारि दितिज दुर्मद न गणुनि तें वरुणवचन[9] तो परते, ।
प्रभुतें नारद[10] दाविति हित गमती, म्हणति 'भस्म हो' पर[11] ते[12]. ॥ ८६
वा[13] रिचर मृग म्हणे तो, देव म्हणे 'ग्रामसिंह[14]' त्या हांसे, ।
समरीं काळाकरवीं तत्कंठीं[15] देव घालवी फांसे[16]. ॥ ८७

'वाटे' 'भासे' 'कीं' 'जेंवि' 'जणों' अशा शब्दांचा उपयोग करतात. या अलंकाराचे हेतूत्प्रेक्षा, फलोत्प्रेक्षा इत्यादि अनेक भेद आहेत. वनपर्व-अध्याय १२ गीति १०-१५ यांत सेतूवर बाहुत्व अतित्व असे अप्रकृत धर्मांचे सहा आरोप केले आहेत म्हणून त्यांत उत्प्रेक्षालंकार झाला आहे. १४. माझी. प्रासासाठीं कवि कधीं कधीं झच्या स्थानीं एकांशीं सवर्ण जो ज त्याचा आदेश करतात–जसें माझी=माजी, माझें=माजें, माझे=माजे, तुझा=तुजा, इत्यादि. **पं**ताच्या काव्यांत देखील अशीं स्थळें आढळतात. (१) दावाया सैरंध्रीप्रति हें मति वरिल केंवि मुख **माजी** (विराटपर्व–३-५३), (२) सेवुनि वांचेल कसी म्हणल्या गुरुस प्रजा गरा **माजी** (उद्योगपर्व–३-७८), (३) तें न स्मरे न तुमच्या वनवासालाहि चित्त भी **माजें** (उद्योगपर्व–१०-५१), (४) होइल कसा स्वपरिभव सांगा साहित्य होय हें **माजें** (भीष्मपर्व–१-७७), (५) मज जिंकिलें नदीजें न चले बळ यापुढें तिळहि **माजें** (उद्योगपर्व–१३-१७८), पुत्री म्हणोनि नारद मुनि कळविति तेंचि चर सला **माजे** (उद्योगपर्व–१३-१९६), (७) चिंता करीं बहु म्हणे कोण निवारील शाप हा **माजा** (आदिपर्व–२-६), (८) होतों ब्राह्मणसुत मी मन्नाम सहस्रपात् सखा **माजा** (आदिपर्व–३-५०), (९) बा! सांगे मज, नेली कोणिकडे राक्षसीं प्रिया **माजी** (बालमंत्ररामायण–४-१३), (१०) सीतेला अवलोकुनि, झाली हे दृष्टि निर्मला **माजी** (मंत्ररामायण–५-११९).

१. वरुण. [वारि+पति=उदक=स्वामी.] २. हिरण्याक्ष वरुणाच्या विभावरी नामक राजधानीस गेला तेव्हां वरुण त्याला म्हणाला. [अ० १७ श्लो० २६.] 'मला युद्धदान द्या' अशी कनकाक्षानें प्रार्थना केली त्याजवर वरुणानें हें उत्तर दिलें. ३. कनकाक्षातें. ४. प्रतियोद्धा. ५. उत्तम वीर. ६. पुराणपुरुष श्रीविष्णु. ७. भालवांवर. ८. दांडगा. ९. त्या विष्णूला युद्धास बोलावून तूं मरण पावशील हें वरुणवचन. १०. विष्णु कोठें आहे, कोणत्या मार्गानें जाणार–हें सर्व नारदानें कनकाक्षाला सांगितलें. ११. परंतु. १२. नारदमुनि. १३. [अरण्यांत राहणारा] मृग (पशु) वारिचर (पाण्यांत फिरणारा.) १४. श्वान. १५. त्या कनकाक्षाच्या कंठांत. १६. काळाकरवीं फांसे घालवी=यमपाशबद्ध करी, मृत्यूच्या पाशांनीं बांधी.

य ज्ञवराहें दिधला स्वयशोमृतरस नवा असा, राया! ।
कीं ज्यासि रसिक सेवुनि गणति न मोक्षा न वा[1] असारा या[2]. ॥ ८८

न[3] लिनप्रभवात्मभव स्वायंभुवमनु तदीय[4]संतान ।
संता[5] नव्यानवरतहर्षद[6] जैसा तसा न संतान[7]. ॥ ८९

मो दवुनि[8] **ब्रह्मा**नें आज्ञा[9] करितां प्रजा करायाची, ।
कर्दम अयुताब्द सुतप करि, बळ सुगुणव्रजाकरा[10] यांची[11]. ॥ ९०

भ गवान् **स**रस्वतीच्या तीरीं दर्शन **कृ**तीं[12] तया[13] नव[14] दे, ।
'नाहीं'[15] असें कधींही ज्याची शरणागता दया न वदे. ॥ ९१

ग[16] रुडरथ म्हणे[17], 'वत्सा! **म**नु[18] **श**तरूपासमेत[19] येईल, ।
तुज **दे**वहूति कन्या परवां[20], प्रार्थुनि पाय, देईल[21]. ॥ ९२

व[22] ररूपगुणा कन्या होतिल नवभक्तिशा[23], तनय देशम[24] ।

---

१. किंवा. २. संसारा. ३. नलिन+प्रभव=कमळ+उत्पत्तिस्थान=ब्रह्मदेव, त्याचा आत्मभव (पुत्र) जो स्वायंभुव मनु त्याची संतति. [अ० २१ श्लो० ४.] प्रियव्रत व उत्तानपाद हे स्वायंभुव मनूचे दोन पुत्र होत. तसेंच देवहुति, आकूति आणि प्रसूति ह्या त्याच्या तीन कन्या होत. ४. त्या स्वायंभुव मनूची संतति. ५. साधुजनाला. नम्र होऊन जवळ आलेल्या जनास त्याच्या कल्याणाचा मार्ग जो दाखवितो तो 'संत,' अशी 'संत'पदाची उत्तम व्याख्या **पं**तांनीं केली आहे. [भीष्मभक्तिभाग्य–गीति ५१.] ६. नव्य+अनवरत+हर्षद=नूतन निरंतर हर्ष देणारा. ७. कल्पवृक्ष. ['पंचैते देवतरवो मंदारः पारिजातकः। संतानः कल्पवृक्षश्च पुंसि वा हरिचंदनम्॥' इत्यमरः। मंदार, पारिजातक, संतान, कल्पवृक्ष आणि हरिचंदन हे पांच देववृक्ष होत.] ८. हर्षवून. ९. 'प्रजा उत्पन्न कर' अशी आज्ञा ब्रह्मदेवानें कर्दम मुनीला दिली तेव्हां सरस्वतीतीरावर दहा हजार वर्षें तपश्चर्या केली. [अ० २१ श्लो० ६.] १०. सु+गुण+व्रज+आकरा=उत्तम+गुण+समूह+खाणीला=उत्तमगुणसमुदायाची खाण अशा ब्रह्मदेवाला. ११. मागें. (बळ=सामर्थ्य.) १२. कृतयुगीं. १३. ईश्वरानें कर्दमाला दर्शन दिलें. [श्लो० ८.] १४. नूतन. १५. [ज्या भगवंताची] दया (कृपा) शरणागता (शरण आलेल्या जनाला) 'नाहीं' असें (नकार असा शब्द, नकारवाचक शब्द) कधींही न वदे–असा सान्वय अर्थ. १६. विष्णु. १७. कर्दमानें स्तुति केल्यावर [अ० २१ श्लो० ९-२१] भगवंत म्हणाले. १८. सुप्रसिद्ध स्वायंभुव मनु. १९. शतरूपानामक आपल्या स्त्रीसह. २०. वर्तमानदिवसापासून एक दिवस मध्यें टाकून जो तिसरा दिवस त्या दिवशीं. २१. अध्याय २१ श्लो० २७ पहा. २२. वर (श्रेष्ठ) आहेत रूपें व गुण ज्यांचे अशा कन्या. २३. नवविध भक्तिप्रमाणें नऊ कन्या. 'भक्त म्हणतात कीं, देवाची भक्ति नऊ प्रकारची आहे. ती नवविधा भक्ति व ती पूर्वीं कोणीं कोणीं केली त्याविषयीं पुढील दोन श्लोक आढळतात:—'श्रवणं कीर्तनं

होणार[1] मी, प्रपंचा न अधर्मद[2] होउं दे अनयद शम.' ॥ ९३
ते कर्दमकर्णनयन सुखवुनि सुखमूर्ति जाय कामगती[3], ।
मनु देवहूति तनया दे प्रार्थुनि विप्रनायका[4] मग ती. ॥ ९४
वा ळा सोडुनि जातां पडुनि गळां[5] **मनु**हि मुनि[6] म्हणे रँडला[7], ।
जरिहि तिला अनुरूपा[8] दयितासीं योग इच्छिला घडला. ॥ ९५
सु खवी मुनितें सेवा करुनि भवानी[9] जयापरि भवातें[10]; ।
पात्र न झाली, आली जों न धवा[11] नीज, या परिभवातें. ॥ ९६
दे खुनि तीस मुनि म्हणे[12], 'सुविषयसुख सुतनु वाळलीला[13] हो[14], ।
मत्सेवा आवडली ईस, बहु तसी न बाळलीला, हो! ॥ ९७

विष्णोः स्मरणं पादसेवनम् । अर्चनं वंदनं दास्यं सख्यमात्मनिवेदनम् ॥' 'श्रीकांतः श्रवणे परीक्षितिरभूद्वैयासिकी कीर्तने प्रह्लादः स्मरणेंऽघ्रिपद्मभजने लक्ष्मीः पृथुः पूजने । अक्रूरस्त्वभिवंदने कपिपतिर्दास्येऽथ सख्येऽर्जुनः सर्वे स्वात्मनिवेदने बलिरभूत्कैवल्यमेषां पदम् ॥' [ऐतिहासिक गोष्टी आणि उपयुक्त माहिती–भाग २.] २४. दहावा.

१. मीच स्वतः तुझा दहावा पुत्र होईन. मी देवहूतीच्या उदरीं आपल्या अंशरूपानें प्रवेश करून अवतार घेईन. [अ० २१ श्लो० ३२]. २. सदा शम असतां अन्याय अधर्म संसारीं घडों देत नाहीं. ३. स्वेच्छाचारी. ४. कर्दमाला. ५. 'आं' हा प्रत्यय सप्तमीचा असून 'अ'कारान्त किंवा 'आ'कारान्त नामांस लागतो. याचीं अन्य उदाहरणें:– (१) पडुनी **गळां** गहिंवरल्या सीतेच्या कन्यका तशा गमल्या. [मोरोपंत-सीतारामायण], (२) कांसे सोनसळा, दिसे झळफळा, रंगीत माळा **गळां** । भाळीं पीत टिळा, नवीन विपुळा, माळा **गळां** पुष्कळा. ॥ विठ्ठल-विठ्ठलजीवन], (३) जोड दिली दुखवुं नको, **पायां** पडतों बृहन्नडे सोड. ॥ [विराटपर्व–मोरोपंत]. ६. मुनिलक्षण भगवद्गीतेमध्यें सांगितलें आहे:—'दुःखेष्वनुद्विग्नमनाः सुखेषु विगतस्पृहः । वीतरागभयक्रोधः स्थिरधीर्मुनिरुच्यते ॥'. (अ० २ श्लो० ५६.) दुःखामध्यें ज्याचें मन संत्रस्त होत नाहीं, सुखासाठीं जो उचंबळ होत नाहीं, आवड भय क्रोध हीं ज्याचीं निवृत्त झालीं, त्या विवेकी मनुष्याला स्थिरधी मुनि म्हणतात. [सुबोधचंद्रिका.] ७. अध्याय २२ श्लो० २४-२५ पहा. ८. योग्या. ९. भवानी=पार्वती. 'आनी' प्रत्यय लागून भव शर्व मृड इंद्र वरुण रुद्र या शब्दापासून त्यांचें स्त्रीलिंगी रूप साधतात:—भव–भवानी, मृड–मृडानी. १०. महादेवातें. ११. पतीस निद्रा जों न आली तों आपणास आली या अशा परिभवातें पात्र न झाली. परिभव=अपयश, अनादर, असत्कार. १२. तपश्चर्येनें कृश आणि क्षीण झालेल्या देवहूतीला पाहून गहिंवरून सद्गदित वाणीनें कर्दम मुनि तिला म्हणाला. [अ० २३ श्लोक ६-९.] १३. वाळलीला=शुष्क झालेलीला. (प्रासाकरितां 'वाळलीला.') १४. होऊ.

[1]**वा**माक्षि! माग वर, **ह**रिगुरु, किमपि अशक्य **क**र्दमा नाहीं, ।
जितिले न हरिजनांहीं किति [2]हरिहीं जेंवि [3]नर्दमानाहीं?' ॥ ९८

य मनियमवती [4]प्रार्थी पूजाया पुरुष [5]अनव [6]संतानें, ।
'स्वकलत्र शोभवावें त्वां प्रभुनें, जेंवि वन [7]वसंतानें. ॥ ९९

न व [8]रुचिरतर असावें [9]प्रभुसी क्रीडावया [10]अंगार [11]मला, ।
आपण **अ**जितचि, दीनहि [12]सुरसाचि भजुनि जडा [13]अंगा रमला.॥ १००

[14]**मो**कलिल्यें आपण हें स्पष्ट विरक्तिस मनांत वाटावें ।
बहु शांतिच्याहि कंठीं बाष्पें, कल्पूनि विरह, दाटावें.' ॥ १०१

---

१. [हे] वामाक्षि! (वामलोचने! सुंदरनयने!) [वाम+अक्षि=सुंदर+नयन=वाम आहेत अक्षि जिचे ती वामाक्षी=कामिनी.] हे देवहूति! हरिगुरु वर माग (हरीला–विष्णूलाही–गुरु जड) असा वर मागून घे, (जो वर देणें विष्णूलाही जड तो वर मागून घे) [कारण] कर्दमा किमपि अशक्य नाहीं, (मला कर्दम मुनीला कांहींच अशक्य असें नाहीं, या कर्दमऋषीला सर्व कांहीं शक्य आणि आटोक्यांतील आहे.) नर्दमानाहीं (गर्जना करणाऱ्या) हरिहीं (सिंहांनीं) जेंवि (जसे जय मिळवावे) [तेंवि] हरिजनांहीं (हरिभक्तांनीं) किति जितिले न? (किती गोष्टी जिंकून घेतल्या नाहींत? अर्थात् भक्तांनीं अनेक गोष्टींत जय मिळविले आहेत, त्यांस कोणतीच गोष्ट अशक्य नाहीं–असा भावार्थ.) येथें हरिगुरु कर्दमा (हरि–विष्णु–आहे गुरु ज्याचा अशा कर्दमाला) अथवा हरीसारखा गुरु (श्रेष्ठ) अशा कर्दमाला–असाही अन्वयार्थ घेतला तरी चालेल. २. सिंहांनीं. ३. गर्जना करणाऱ्यांनीं. ४. देवहूति प्रार्थना करते. ५. नवीन नव्हे (जुनाट). ६. संततीनें. ७. पंतांनीं वनाला शृंगारणाऱ्या वसंतावर शब्दकोटि केली आहे ती अशीः–'संतप्ता निववी घन, वन शृंगारी **वकारवान् संत.**' [नामरसायन–गी० ६४.] ८. फार रमणीय. ९. तुमच्याशीं. १०. गृह. ११. मला देवहूतीला. १२. देवसाचि. १३. वृक्षा (कल्पवृक्षा). जडा अगा (जड कल्पवृक्षाला) भजुनि (सेवून, कल्पवृक्षाचा आश्रय धरून) दीनही (यःकश्चित् हलका मनुष्यही, क्षुद्र जनही) सुरसाचि (सुरासारखा–देवासारखा–सुर=देव) रमला (रममाण झाला, आनंदित झाला, सुखसमृद्ध झाला) आपण (कर्दम मुनि तर प्रत्यक्ष) अजितचि (विष्णुच, ईश्वरच) [आपणास अशक्य असें कांहीं नाहीं–असा सांगण्याचा भाव. आपल्या कृपेनें मला कांहीं कमी नाहीं.] १४. विषयसुखोपभोगार्थ आपण शांति आणि विरक्ति यांना क्षणभर एकीकडे ठेवावें असें देवहूति कर्दमाला सांगण्याच्या उद्देशानें म्हणतेः–विरक्तिस मनांत हें स्पष्ट वाटावें [कीं] आपण मोकलिल्यें (आपणास कर्दमानें टाकिलें, कर्दमाला आपण विरक्ति–अंतरल्यें) विरह कल्पूनि (वियोगामुळें) शांतिच्याहि कंठीं बाष्पें बहु दाटावें (शांतीचाही गळा भरून यावा, शांतीलाही विरहरूप दुःख द्या.)

[1]भव्य विषय ज्यांत [2]असें [3]संकल्पेंचि क्षणांत [4]तो योगी ।
प्रकटी, कीं निजसेवा सफळा त्या देवहूतिची हो [5]गी. ॥ १०२
ग ति सर्वत्र जयाची, निर्मी प्रभु दिव्यवर वि[6]मानातें, ।
[7]ज्यातें पाहुनि तिळहि स्थळ दे हृदयांत न रवि मानातें. ॥ १०३

---

१. मोठे. २. असें (अगार=विमान, केलिमंदिर). ३. योगाभ्यासप्रभावानें. [अ० २३ श्लो० १२.] ४. तो कर्दम मुनि. ५. वाणी. त्या देवहूतीची वाणी सफळ व्हावी आणि तिनें आपली केलेली सेवा सफळ व्हावी म्हणून तो योगी भव्य केलिमंदिर रची–असा अर्थ. ६. या विमानाचें वर्णन असें आहे:--'तें विमान त्यांत बसणाराच्या इष्ट स्थळाकडे आपोआप गमन करीत असे. तसेंच तें अलौकिक विमान आंत बसणाराचे सर्व हेतु पूर्ण करीत असे. त्यांत सर्व प्रकारचीं रत्नें भरलेलीं होतीं. त्यांतील उपभोगाचें साहित्य उपभोक्त्यांच्या संख्येबरोबर आपोआप वाढत असे. त्यांत जागजागीं रत्नस्तंभ असल्यामुळें त्यास विशेष शोभा आली होती. तसेंच त्यांत अशा कांहीं वस्तु भरलेल्या होत्या कीं त्या पाहिल्याबरोबर पाहणारास अत्यंत विस्मय वाटे. त्या ठिकाणीं सदासर्वकाळ आनंद होई. नानाप्रकारच्या रंगी बेरंगी पताकांनीं त्याला सुशोभित केलें होतें. त्यावर अनेक रंगांच्या फुलांच्या माळा लाविल्या असून त्यांवर भ्रमर मधुर गुंजारव करीत होते. वरून पैठण्या पितांबरादि मौल्यवान वस्त्रें लाविल्यामुळें तर त्याला फारच शोभा आली होती. वरच्या मजल्यावर श्रांत झालेल्यांस विश्रांति घेण्याकरतां ठिकठिकाणीं जागा तयार केल्या होत्या. कोठें पलंग मांडले होते. कोठें बैठकी घातल्या होत्या. ठिकठिकाणीं पंखे टांगून ठेविले होते. जागोजाग अनेक प्रकारच्या रांगोळ्या व चित्रें काढल्यामुळें तें फार शोभायमान दिसत होतें. त्यांत एक भलें मोठें पाचेच्या मण्यांनीं बांधलेलें हिरवें गार मैदान होतें. जागजागीं चौथरे बांधले होते. त्याच्या दारांचे उंबरठे पोंवळ्यांनीं मढविले असल्यामुळें तें सतेज दिसत होतें. दारांच्या फळ्या सुवर्णानें मढविलेल्या होत्या. त्यांचीं शिखरें इंद्रनील मण्यांची असून त्यांवर सुवर्ण कलश ठेवले होते. त्याच्या भिंती हिऱ्यांच्या केलेल्या होत्या. व त्यांवर पद्मराग मण्याचें नकशी काम केलें होतें. म्हणून तिकडे पाहणारास ते त्या विमानाचे डोळेच आहेत कीं काय असा भास होई. त्यांत उंची रंगी बेरंगी छतें लाविलीं असून दारांच्या बाजूस सुवर्णाचे गोळे लाविले होते. त्या विमानावर बसविलेल्या हंसपारव्यादि पक्ष्यांचीं चित्रें इतकीं हुबेहुब साधलीं होतीं कीं तीं पाहून खरोखरीच्या पारव्यादिकांस भ्रम पडे व ते आपलेसारखेच सजीव आहेत असें वाटून ते त्यांच्या जवळ येऊन बसत व शब्द करीत. त्या विमानामध्यें विलासासाठीं पाहिजे त्या बेताचीं अनेक स्थळें निर्माण केलीं होतीं:–क्रीडास्थान, शय्यास्थान, वेशधारणस्थान, घरासमोरचा चौक, कोटाबाहेरील मैदान इत्यादि स्थळें फार सुंदर साधलीं होतीं. तीं पाहिल्यावर कर्दमास सुद्धां आश्चर्य वाटलें.' ७. ज्यातें (ज्या विमानातें) पाहुनि रवि (सूर्य) मानातें तिळहि स्थळ (अभिमानाला, गर्वाला थोडीही जागा) हृदयांत न दे. ज्या विमानाचें गतितेज पाहून सूर्यानें मान खालीं घातली.

व नितेसि[1] म्हणे, 'सुंदरि! या बिंदुसरोवरीं[2] करीं स्नान.'[3] ।
आज्ञा करुनि शिरीं[4] ती मज्जन[5] करि धरुनि पतिपदध्यान. ॥ १०४
ते स्त्री मज्जन करि जों तों आंत सरोवरीं असें पाहे, ।
कन्यासहस्र सुंदर निजसेवोत्सुक[6] सुमंदिरीं आहे. ॥ १०५
वा ला[7] त्या नमुनि म्हणति, 'आम्ही तव किंकरी[8] भजायाच्या, ।
स्वामिनि! आज्ञेवांचुनि पळ सोडुनि पाय हे न जायाच्या.' ॥ १०६
सु पटुपणें[9] परिचर्या[10] करि तिस कन्यासहस्र तें न्हाणी, ।
गाणीं गाय गुणांचीं मुनिराजाची निवावया राणी[11]. ॥ १०७
दे हीं दिव्यालंकृति[12] आवडली[13] तीच नमुनि लेववितीं, ।
आसव[14] पाजुनि पूजुनि दृष्टि[15] उतरुनि स्तवूनि जेववितीं. ॥ १०८
वा टे कांत पहावा तों तत्पार्श्वी सकिंकरी आहे, ।
पाहे अत्याश्चर्य[16] **श्री**पतिभजनें तसीच ती लाहे. ॥ १०९
यँ व अवपूर्व[17] अपूर्व प्रेक्षी पतिचेहि **दे**वहूति सती, ।

---

१. वनिता=स्त्री. २. बिंदुसरोवर=कर्दममुनि भगवंताला शरण आला तेव्हां भगवंताच्या नेत्रांतून अश्रुबिंदु पडले. जेथें हे बिंदु पडले तेथें 'बिंदुसरोवर' उत्पन्न झालें. (अ० २१ श्लो० ३८-३९.) ३. देवहूतीचें शरीर मळकट झालें होतें म्हणून तिला स्नान करायास सांगितलें. तसेंच हें बिंदुसरोवर मनुष्याचे सकल हेतु पूर्ण करणारें होतें. [अ० २३ श्लो० २३.] देवहूतीची शुश्रूषा करण्यास कोणी दासीं नव्हत्या व त्यांची तिला गरज होती. ४. शिरीं आज्ञा करणें=आज्ञा शिरसावंद्य मानणें. ५. स्नान. ६. आपली सेवा करण्याविषयीं उत्सुक असें. ७. बाला, स्त्रिया. ८. दासी. (अ० २३ श्लो० २७.) ९. फार कुशलपणानें. १०. सेवा. ११. देवहूति. १२. उत्तम अलंकार. १३. देवहूतीच्या मनाला आवडणारे उत्कृष्ट अलंकार त्या दासींनीं तिला नमस्कार करून तिच्या आंगावर घातले. [अ० २३ श्लो० २९.] १४. मादक सरबत, अमृतासव. १५. दृष्टि उतरणें=दृष्टिबाधा होऊं नये म्हणून तोडगा करणें; दृष्टि काढणें, ओंवाळून टाकणें. या एकाच आर्येंत दासीजनांच्या सकल उचित कामांचा समावेश पंतांनीं सुरेख केला आहे. १६. अतिआश्चर्य. १७. अवयव अपूर्व प्रेक्षी. १८. मोरोपंतास एखाद्या शब्दावर अपूर्व कोटी रचून शब्दचमत्कार करून दाखविण्याची हौस होती असें दिसून येतें. त्यानें आपल्या काव्यांत असे शब्दचमत्कार कोठें कोठें योजिले आहेत त्यांतील कित्येकांचा समावेश येथें केला आहे:— (१) '**वामाद्यदेव** जाणे त्या अपरिज्ञेयवीर्यजलधीतें.' [मंत्रभागवत–अष्टम स्कंध–गीति ९८], (२) 'स्वैर क्रीडावयाचा रतिनिजमतिचा **दीर्घपूर्व प्रसाद**' [कृष्णविजय–अ० ५५ श्लोक १३], (३) '**वामादिदेव** वेगा धरिल भगीरथ म्हणे अघहि गंगे' [मंत्रभागवत–नवम स्कंध–गी०१२८], (४) 'वाटे सुभटें पुत्रें मेळविला विप्रसेवनीं नव '**ट**' [उद्यो-

तीस[1] भुले कर्दममति वाटे त्याच्याहि योगभूतिस [2]ती. ॥ ११०

न[3] ददद्भुततूर्य असें मुनिनें वरिलें वि[4]मान जें, विदुरा! ।

इतरां तेजांसि म्हणे तें द्यु[5]मणिव्योमयान जेंवि 'दु[6]रा.' ॥ १११

गपर्व–अ० १० गीति ३२], (५) ब्रह्मा नामीं दुसरा योग्य क्षत्रा न जलजनाभा **'ट'** [उद्योगपर्व–अ० १० गीति ३३], (६) 'राधे' यथेष्ट म्हण, परि कर्णा! कर्णासि फार बाधे **'य'** [उद्योगपर्व–अ० ११ गीति ९], (७) 'हे मात्र न ऐकवती; सुखद मला **मनुदु** मिलित **राधेय**' [उद्योगपर्व–अ० ११ गीति १०], (८) बहुधा गुरुसंकोच ग्रासी तन्नामवर्ति **सुसकारा,** । ऐसें ऐकुनि सोडी अहिपतिसा **भीमसेन** सुसकारा. ॥ [सभापर्व–अ० ६ गीति २३], (९) तो **क्षेमपूर्वधन्वा** ज्याच्या सुयशें समस्त बुध धाला [हरिवंश–अ० १ गीति ८८], (१०) लिहिति **रतिस्तुति**पूर्वीं मात्रा देऊनि वा **यकारा** ज्या । [द्रोणपर्व–अ० ५ गी० ६९], (११) पुसतां कसें श्रुत असें आपणचि **'कृपा'** पुढें तरि म्हणा **'ण'** । [द्रोणपर्व–अ० १५-२७], (१२) द्याया त्या दुष्टांच्या जणु **अंतःपूर्वपुर** विलापाला [विराटपर्व–अध्याय १ गीति १६२], (१३) **रा;** मग **ता** आधीं हें नाम जिचें तीस घे जग नयानें [नामांकरामायण–गीति ११४], (१४) **राग अनुपूर्व** भगवद्दास्यीं बहु ज्यासि तो महासुकृति [नामांकरामायण–गीति ९९], (१५) कुलजविरोधें संतत **तापगुण** मनीं अपूर्वता पावे [आदिपर्व–अ० ३६ गीति ७८], (१६) जाणों ते मदमत्त क्रोधोद्धत **दंपतीच** अपकार [कर्णपर्व–अ० ४५ गीति १], (१७) **श्रीपूर्ववत्सवक्षा** दशरथसुत होय, दे जगा तोष [सप्तमस्तोत्ररामायण–गीति १], (१८) **उत् पूर्वसव** जगा दे ब्रह्मसुख म्हणुनि जया म्हणति कवि क [अष्टमस्तोत्ररामायण–गीति १४], (१९) गृहीं भेटला सर्व लोकप्रभू ती सुसंपत्ति नोहे **परापूर्वभूती** [कृष्णविजय–अ० ५६ श्लोक २८], (२०) आम्हां द्यायासि केली असतचि, दिधली तेचि **गोपूर्वविंदा** [कृष्णविजय–अ० ५७ श्लोक ५], [मागें पृष्ठ ३५ टीप १३ पहा.]

१. तीस (त्या देवहूतीला) कर्दममति भुले (कर्दम लुब्ध झाला, कर्दमाचें मन तिच्याविषयीं आसक्त झालें, तिला पाहून कर्दमाला मोह पडला). त्याच्याहि (त्या कर्दमाच्याही) योगभूतिस (योगवैभवाला, योगैश्वर्यास) ती (देवहूति) [भुले] (भुलली) [असें] वाटे. (कर्दमाचा योगप्रभाव पाहून देवहूति चकित होत्साती लुब्ध झाली). २. देवहूति. ३. नदत्+अद्भुत+तूर्य=वाजणारें+आश्चर्यकारक+वाद्य=वाजताहेत फार मंजुळ वाद्यें ज्याचे ठायीं. ४. [हे] विदुरा! नददद्भुततूर्य असें जें विमान मुनिनें (कर्दमानें) वरिलें तें (विमान) इतरां तेजांसि म्हणेः–'दुरा' (दूर व्हा, जवळ येऊं नका, तुमची योग्यता माझ्यापाशीं येण्याची नाहीं) जेंवि (जसें) द्युमणिव्योमयान (द्युमणि+व्योम+यान=सूर्य+आकाश+वाहन, विमान) [इतरां तेजांसि म्हणतें]–असा अन्वयार्थ. ५. सूर्यविमान. ६. दूर सरा.

मो दप्रदें जगीं जीं हिमहेमनगादिकीं बुधा! स्थानें, ।
त्यांत रमविली मुनिनें दयिता तदधरमहासुधास्थानें. ॥ ११२

भ त्यानें स्वस्थानीं पुनरपि रमवूनि आणिली धन्या, ।
वर्षापरि शतवर्षें गेलीं झाल्याहि नव तिला कन्या. ॥ ११३

गँ मनोद्यतहि सतीनें राहविला ग्लानि करुनि तो कांत, ।
दुहितांतें उजवाया, सुतरत्नें व्हावया स्वशोकांत. ॥ ११४

वँ र आठवुनि, तिस कथुनि, **क**र्दमही गर्भही तिला राहे, ।
श्रीमूर्तितें प्रसवुनि न **सु**रभींच्याही गणी खिलारा हे. ॥ ११५

ते व्हां अत्यंतोत्सव जेव्हां प्रभु कर्दमालयीं झाला, ।

---

१. हेमनग=मेरुपर्वत. हिमालय आणि मेरुगिरि यांजवरील गुहांत कर्दमानें कुबेराप्रमाणें क्रीडा केली असें वर्णन आहे. २. कर्दमानें आपल्या भार्येसह वैश्रंभक, सुरसन, नंदन, पुष्पभद्रक, मानस, चैत्ररथ ह्या देवोद्यानांत मोठ्या आनंदानें विहार केला. [अ० २३ श्लो० ४०.] ३. आवडती स्त्री=दयिता. 'ऊढायां देवि दयिते पुमानाह प्रियां प्रति। आर्यपुत्रं च जीवेश नाथ साप्याह वल्लभम् ॥' अशी **सा**गरोक्ति आहे. [रंगनाथकृत टीकान्वित विक्रमोर्वशीयनाटक–पृष्ठ ५५-५६ पहा.] ४. तत्+अधर+महा+सुधा+आस्थानें=तिचा+अधर ओंठ+श्रेष्ठ, उत्तम+अमृत+आस्था आहे ज्याला त्यानें=तिच्या अधरोष्ठसंबंधीं श्रेष्ठ अमृतीं इच्छा ज्याची अशानें. ५. आपल्या आश्रमीं. ६. अ० २३ श्लो० ४४-४५ पहा. ७. गमन करण्यास उद्युक्त असा. ८. विवाह करावयास. सतीनें (देवहूतीनें) ग्लानि करुनि (शोकाकुल होऊन, शोकानें अथवा विलापानें आपली दीनता दाखवून) तो कांत (तो सुप्रसिद्ध कर्दममुनि वल्लभ) गमनोद्यतहि (तपश्चर्येसाठीं निघून जाण्यास उद्युक्त झालेला असाही) दुहितांतें उजवाया (आपल्या नव कन्यांचे विवाह कर्दमानें करावे म्हणून) [आणि] सुतरत्नें (उत्तमपुत्रलाभानें) स्वशोकांत (आपल्या–देवहूतीच्या–दुःखाचा नाश) व्हावया (व्हावा म्हणून) राहविला. ९. वर (तनय दशम होणार मी–असा विष्णुदत्त वर. गीति ९३ पहा.) आठवुनि (स्वतः स्मरून) तिस कथुनि (त्या देवहूतीला सांगून) कर्दमही राहे (कर्दम तपश्चर्येस न जातां तिच्यापाशीं राहिला.) [आणि] तिला गर्भही राहे (देवहूति गरोदर झाली). [येथें राहे ह्या क्रियापदाचा अन्वय कर्दम आणि गर्भ या दोन कर्त्यांकडे आहे म्हणून हें '**क्रि**यादीपक' अलंकाराचें उदाहरण मानावें]. श्रीमूर्तितें (श्रीकपिलमुनीतें) प्रसवुनि हे (ही देवहूति) सुरभिच्याही (कामधेनूच्याही) खिलारा न गणी (पर्वा करीना) [कपिलासारखा पुत्र प्राप्त झाल्यामुळें देवहूतीला अशी अपूर्व धन्यता वाटली.] १०. विष्णु कर्दममुनिवीर्याच्या आश्रयानें देवहूतीच्या उदरीं जन्मास आला. [अ० २४ श्लो० ६.] ११. कर्दमऋषीचे आश्रमांत.

आला [1]पीतचि यश **वि**धि [2]आलापीतचि महासुखें [3]धाला. ॥ ११६
[4]वा खाणी फारच, कीं पाहे **ह**रि तोक विप्र, ज्या पतितें ।
स्मरुनि तरावें, उचितचि, नुतिपद करि तो कवि प्रजापतितें. ॥ ११७
'**सु** टलासि [5]ऋणांपासुनि, कन्यांचे मात्र बा! विवाह करीं, ।
मग जा जाणें जरि तरि, मुक्तिद आहेचि हा **वि**[6]वाह [7]करीं. ॥ ११८
दे कन्या सुवरांतें.' ऐसें सांगोनि [8]पद्मभू [9]गेला, ।
मग कन्यादानोत्सव दयिता बहु मानवे असा केला. ॥ ११९
[10]वां हे **क**ला **म**रीचिस, **अ**नसूया **अ**त्रिलाहि तो अर्पी, ।
श्रद्धाहि **अं**गिऱ्याला, **पु**लहा देऊनि **ग**ति धनें तर्पी. ॥ १२०
य श वाढवी **ह**विर्भू कन्या देउनि **पु**लस्त्यसन्मुनितें, ।
क्रतुस **क्रि**या, **भृ**गुसहि **ख्या**ति, घडे त्या सुकर्म [11]जन्मुनि तें. ॥ १२१

---

१. प्राशन करीत. २. आलाप घेत. ३. तृप्त झाला. विधि (ब्रह्मदेव) मरीचिप्रभृति मुनींसह कर्दमाश्रमीं आला. [अ० २४ श्लो० ९.] ४. [आलाप घेत येणारा ब्रह्मदेव] फारच वाखाणी (कर्दममुनीला फार फार वर्णी) कीं (कारण कीं) [तो ब्रह्मदेव) हरि (विष्णु) तोक विप्र (बाल ब्राह्मण) [असा] पाहे (ब्राह्मणपुत्ररूपधारी विष्णूला कर्दमाश्रमीं पाहता झाला.) ज्या (ज्या बालकाला, कपिलस्वरूप भगवंताला) स्मरूनि पतितें (पापी जनानें) तरावें (ज्याचें स्मरण करून पापी जनानें मुक्तिला जावें) तो कवि (तो ज्ञानसंपन्न पंडित कर्दम मुनि) प्रजापतितें (ब्रह्मदेवातें) नुतिपद (स्तुतिपात्र, कर्दमाची स्तुति करण्यास प्रजापतीनें प्रवृत्त व्हावें असा त्याला) करि, [हें] उचितचि (योग्यच, यांत कांहीं विलक्षण नाहीं). [नुति=स्तुति; पद=स्थान.] ५. पुत्र होतो तेव्हां बाप पितरांच्या ऋणापासून मुक्त होतो या प्राचीन समजूतीस अनुलक्षून ही विधीची उक्ति आहे. 'जायमानो वै ब्राह्मणस्त्रिभिर्ऋणवा जायते ब्रह्मचर्येणर्षिभ्यः यज्ञेन देवेभ्यः प्रजया पितृभ्यः', 'एष वानृणः यः पुत्री यज्वा ब्रह्मचारिवासी' इत्यादि वचनांवरून ऋषींचें ऋण, देवांचें ऋण आणि पितरांचें ऋण अशा तीन ऋणांचा बोध होतो व याच तिन्हीं ऋणांचा उल्लेख वारंवार आढळतो. (रघुवंश–सर्ग ८ श्लोक ३०.) शास्त्राध्ययनानें ऋषींचें, यज्ञानें देवाचें, पुत्रोत्पादनानें पितरांचें ऋण फिटतें असें वर्णन ग्रंथांत आहे. महाभारतांत (आदिपर्व–अध्याय १२०, श्लोक १६-२०) चार ऋणांचा निर्देश घेतला आहे. चवथें ऋण मनुष्यांचें, ते आनृशंस्यानें (दयाळुपणानें) फिटतें. [यज्ञैस्तु देवान्प्रीणाति स्वाध्यायतपसा मुनीन् । पुत्रैः श्राद्धैः पितृंश्चापि आनृशंस्येन मानवान् ॥' अध्याय १२० श्लोक १८ पहा.] ६. वि+वाह=पक्षी (गरुड)+वाहन, ज्याचें वाहन आहे असा विष्णु. ७. हस्तीं. ८. ब्रह्मदेव. ९. अ० २४ श्लो० २० पहा. १०. अ० २४ श्लो० २१-२४ पहा. ११. मनुष्यजन्मास येऊन गृहस्थाश्रम करणाऱ्यास कन्यादान करण्यापलीकडे दुसरें श्रेष्ठ आणि श्रेयस्कर असें सुकर्म

न वरी **अ**रुंधती जी होय **व**सिष्ठा, **शि**वासि कावड ती; ।
जो मुनिराज [1]**अ**थर्वा त्या झाली **शां**ति फार आवडती. ॥ १२२
मो क्षचि [2]मूर्त प्रभु जो, ज्या ठेवी नाम **क**पिल हें **धा**ता, ।
त्यातें आज्ञा मागुनि **क**र्दम गेला निघोनि गा! ताता! ॥ १२३
[3]**भ** जुनि म्हणे ज्या 'निजपशुभावा हो हानि' कामकपिला तें ।
पदयुग धरि विनवी ती, उबगुनि मोहा निकाम, **क**पिलातें. ॥ १२४
ग ति व्हाया मातेला, सारचि, सोडूनि तो असार, वदे, ।
[4]उपदेश सुख तिस जसा न घनाचा चातकिस असा रव दे. ॥ १२५
व दला, [5]पदलाभ सुखें व्हाया, सगुणस्वमूर्तिचें [6]ध्यान, ।
जें [7]हृदयाब्जीं ठसतां ध्याल्या व्हावेंचि निर्मळ ज्ञान. ॥ १२६
ते माय निववली त्या प्रभुनें [8]**सां**ख्याभिधें [9]सुधावर्षें; ।
वर्णी **क**पिलासि [10]म्हणे, 'गेलीं विषयांत तीं [11]मुधा वर्षें. ॥ १२७
वा णी तुझी मला बा! **श**तरूपेहूनि बहु हिता [12]**क**पिला! ।
कपि [13]लाधला अमृतफळ, हा जन हे स्वर्गपूजिता कपिला.' ॥ १२८

नाहीं अशा समजुतीनें हें वर्णन केलेलें आहे. जन्मुनि (या मनुष्यजन्मास येऊन) त्या (कर्दमाला) तें सुकर्म (तें कन्यादानरूप उत्तम कर्म) घडे (घडलें).

१. ऋषिविशेष. २. मूर्तिमान्. ३. कामकपिला (कामधेनु) ज्या (ज्या कपिलमुनिपदयुगाला) भजुनि (सेवून) म्हणे (वदे कीं), 'निजपशुभावा हानि हो' (आपल्या पशुत्वाचा नाश होवो, आपलें पशुरूप नष्ट होवो–हे कपिला! मला या पशुरूप देहापासून मुक्त कर) तें पदयुग (तें कपिलचरणद्वय) ती (देवहूति) धरि (सेवी) [आणि] मोहा निकाम उबगुनि (मोहाला अत्यंत कंटाळून, मोहाचा सर्वस्वी त्याग करून) कपिलातें विनवी (प्रार्थी), [येथें कामधेनूचीही इच्छा परिपूर्ण करण्याचा अधिकार कपिलाचा होता असें सांगून त्याचें श्रेष्ठत्व दर्शविलें आहे.] ४. (कपिलकृत) उपदेश (बोध) तिस (देवहूतीला) जसा सुख दे (आनंद देता झाला) असा घनाचा रव (शब्द) चातकिस (चातकस्त्रीस) न (दे). येथें **व्य**तिरेक नामक अलंकार झाला आहे. ५. ईशपदलाभ. ६. अध्याय २८ यांत ध्यान कसें करावें हें सांगितलें आहे, व त्यांतच योगसाधनानें मोक्ष प्राप्त होतो असें सांगितलें आहे. [अ० २८ श्लो० १२-३४.] ७. हृदय+अब्जीं=हृदयकमळीं. ८. सांख्यसंज्ञक. ज्याची अभिधा (नाम) सांख्य आहे अशा (सुधावर्षें). ९. अमृतवृष्टीनें. कपिलानें सांख्यज्ञान निवेदन करून आपल्या जननीचें सांत्वन केलें. १०. देवहूति म्हणे–असा अन्वय. देवहूतिला आत्मज्ञान प्राप्त झाल्यावर तिनें कपिलाची स्तुति केली. त्या प्रसंगीं ती कपिलाला म्हणाली. (अ० ३३.) ११. व्यर्थ. १२. हे कपिलऋषे! १३. कपि अमृतफळ लाधला. (वानराची योग्यता अमृतफळ मिळण्याची नसतां त्याला तें फळ मिळावें त्याप्रमाणें) हा

सु टका निजमातेची करुनि मग तिला [1]पुसोनि तो गेला, ।
तेव्हां रडेचि ती जरि सुविचार ध्यानयोगही केला. ॥ १२९

दे ह तिचा जो योगें त्यजिला तो होय सिद्धिदा [2]सरिता, ।
न [3]पडेचि शरण गेला प्रभुसि न पावोनि सिद्धि दास रिता. ॥ १३०

वा ! विदुरा ! ज्या स्थानीं सिद्धिप्रति **दे**वहूति ती लाहे, ।
'[4]**सि**द्धपद' असें विश्रुत त्या क्षेत्रा नाम जाहलें आहे. ॥ १३१

[5]**य** ज्ञशताधिकभगवच्चरितसुधासागरींच मज्जन हो, ।
[6]यश अमृत श्रीकपिलप्रभु घन आश्रित **म**यूर सज्जन हो ! ॥ १३२

चतुर्थ स्कंध.

[7]**न** लिनाक्षी [8]**आ**कूति [9]भ्रातृमती तरिहि [10]पुत्रिकाधर्में ।
स्वायंभुव **रु**चिला [11]दे, [12]सुतयुगलब्धें अतृप्त जो शर्में. ॥ १

जन (ही मी देवहूति) हे (ही तुझी बोधामृतवाणी) स्वर्गपूजिता (स्वर्गांत सन्मान्य अशी) कपिला (सकलकामपूरणसमर्थ अशी कामधेनु) लाधला (पावला).

१. आपल्या मातेला संसारपाशमोचनाचा मार्ग सांगून तिचें अनुमोदन घेऊन कपिल गेला. [अ० ३३ श्लो० ११-१२.] २. तिच्या देहाची एक सरिता (नदी) झाली. [श्लो० ३२.] ३. प्रभुसि शरण गेला (गेलेला) दास (सेवक, भक्त) सिद्धि न पावोनि (कार्यसफलता न होऊन) रिता न पडेचि=जो भक्त समर्थ ईश्वराला शरण गेला आहे त्याचे कार्याची सिद्धि न होऊन तो रिकामा (व्यर्थ अपूर्णकाम) पडला आहे, असें कधींही व्हावयाचें नाहीं, त्या शरणागत दासाचे मनोरथ सफळ व्हावयाचेच–असें तात्पर्य. ४. ज्या स्थळीं देवहूतीला योगसिद्धि प्राप्त झाली त्याला 'सिद्धपद' असें नांव पडलें. [श्लो० ३१.] ५. शंभर यज्ञांहून श्रेष्ठ असें जें भगवंताचें चरित्र, त्या चरित्राच्या अमृतसागरांत मज्जन (स्नान) हो (घडो).= भगवच्चरित्रश्रवण सदां घडो. ६. [हे श्रोते हो!] श्रीकपिलप्रभु [हा] घन (मेघ), [त्याचें] यश [हें] अमृत (उदक), [त्याचे] आश्रित (भक्त) [हेच] मयूरसज्जन (मोररूपी साधुजन) हो! ७. नलिन+अक्षि=कमल+नेत्र=कमलनयना. ८. स्वायंभुव मनु+शतरूपा यांची कन्या. ९. भ्रातृ+मत् (मती)=भाऊ+वस्तु बाळगणारा–या अर्थाचा प्रत्यय=सोदरयुक्ता. [आकूतीला प्रियव्रत आणि उत्तानपाद असे दोन भाऊ होते.] १०. पुत्रिकाधर्म=पुत्रिकेचा (कन्येचा) धर्म='अभ्रातृकां प्रदास्यामि तुभ्यं कन्यामलंकृताम् । अस्यां यो जायते पुत्रः स मे पुत्रो भवेदिति ॥.' याचा भावार्थः—ही अलंकृत कन्या मी तुला देतों, हिला भाऊ नाहींत. हिला जो मुलगा होईल तो माझा पुत्र होवो (तो त्वां मला द्यावा)–असा करार करून मुलगी देणें याला **'पुत्रिकाधर्म'** म्हणतात. ११. (जो स्वायंभुव मनु) सुतयुगलब्धें शर्में (दोन मुलांपासून प्राप्त झालेल्या सुखानें) अतृप्त (असंतुष्ट होता, पुष्कळ मुलें आप-

मो[1] दनिधि मिथु[2]न झालें **आ**कूतिस **य**[3]ज्ञ**द**क्षिणा नामें, ।
म[4]नु सुत घे, **रु**[5]चि कन्या, **श्री**[6] त्याचि वरी **ह**रीस तत्कामें. ॥ २
भ जली **म**रीचिस **क**[7]ला, ती **क**[8]श्यप**पू**र्णिमा सुतां व्या[9]ली; ।
अत्रिस्त्री **अ**नसूया माता **वि**[10]धि**ह**रि**ह**रां तिघां झाली. ॥ ३
'**ग**[11]च्छात्मज! सृष्टिं कुरु' ऐसी आज्ञा करी स्वयें **धा**[12]ता, ।
ऋ[13]क्षकुलनगीं राहे शतवर्षें **अ**त्रिमुनि उ[14]भा, ताता! ॥ ४
व र्षें श[15]तें हें, चित्तीं आलों जगदीश जो तया शरण, ।

त्याला असावीं अशी इच्छा धरून) [तो] स्वायंभुव (मनु) रुचिला (रुचि नामक मुनीला) [पाणिग्रहणद्वारा] दे (देता झाला.) १२. सुत+युग+लब्ध=पुत्र+द्वय+प्राप्त=दोन पुत्रांपासून प्राप्त झालेल्या शर्में (सुखानें).

१. आनंदसमुद्र. २. जोडपें. (पुत्र व कन्या.) ३. यज्ञ हा पुत्र व दक्षिणा ही कन्या. यज्ञ हा विष्णूचा अंशावतार आणि दक्षिणा ही लक्ष्मीच्या अंशाचा अवतार होय. ४. स्वायंभुव मनु सुत (पुत्र यज्ञ) [पुत्रिकाधर्मानुसारें] घे (घेता झाला)=मनूनें आपल्या नातवाला (यज्ञ नामक कन्यापुत्रास) आपल्या घरीं नेलें. [अ० १ श्लो० ५.] येथें 'घे' या क्रियेचा अन्वय मनु आणि रुचि या दोन कर्तृवाचक पदांशीं असल्यामुळें हें '**क्रियादीपक**' अलंकाराचें उदाहरण होय. ५. रुचि (मुनि) कन्या (दक्षिणा) घे (रुचि आपल्या घरीं दक्षिणा नामक कन्येला पाळिता झाला). ६. श्री (लक्ष्मीरूपिणी दक्षिणा) त्याच हरीस (त्याच विष्णुरूप यज्ञाला) तत्कामें (त्या यज्ञाच्या प्रेमामुळें, त्या यज्ञाच्या इच्छेनें) वरी (स्वीकारी, दक्षिणेनें यज्ञाशीं विवाह केला). [यज्ञदक्षिणा हीं बहीणभावंडें, पण तीं क्रमानें विष्णुलक्ष्मी यांचे अंशावतार असल्यामुळें त्यांचा विवाह अशास्त्र नाहीं.] ७. मरीचिऋषीची स्त्री व कर्दममुनीची कन्या. [स्कंध ३ गीति ११४.] ८. कलेला कश्यप आणि पूर्णिमा (पूर्णिमन्) असे दोन पुत्र झाले. [अ० १ श्लो० १३.] ९. प्रसवली. १०. विधि (ब्रह्मदेव) हरि (विष्णु) हर (शंकर) हे अनुक्रमें सोम दत्त आणि दुर्वास या रूपानें अनसूयेच्या पोटीं जन्मास आले. या आर्येंत 'सुतां व्याली' आणि 'माता झाली' असे दोन शब्दसमूह एकाच अर्थाचे वाचक योजिले आहेत, ही वर्णनशैली लक्षांत ठेवण्यासारखी आहे. ११. गच्छ+आत्मज+सृष्टिं+कुरु=जा पुत्रा! सृष्टि कर अशी (आज्ञा). अशीं लहान लहान संस्कृत वाक्यें **पं**तांनीं आपल्या 'संस्कृतप्राकृतमिश्रित' काव्यांत अनेक स्थळीं योजिलीं आहेत. (निबंधमाला–अंक ६६ पृष्ठें ३०-३१ पहा.) १२. धाता (ब्रह्मदेव) [अत्रीला] स्वयें (स्वतः) आज्ञा (सृष्टि उत्पन्न करण्याची आज्ञा) करी (करता झाला). [ब्रह्मदेव विष्णु व शंकर यांनीं अत्रीच्या घरीं कां अवतार घेतला हें सांगतात.] १३. ऋक्ष नामक कुलपर्वतीं. १४. एका पायावर उभा राहून होता. १५. जो जगदीश (जगताचा ईश्वर) तया (त्याला) चित्तीं (चित्तानें, मनानें, मनःपूर्वक) शरण आलों; हें

'देवू प्रजा स्वतुल्या मज, ज्याचे स्वर्द्रुचे[१] सखे चरण.' ॥ ५

ते वांछा पुरवाया हरि हर विधि भेटले तैया[२] बापा ! ।

तो चातक ते मुदिरचि[३], धावुनि त्याच्या निवारिती तापा. ॥ ६

वा घरवें मुनि नयनें उघडि, तिघांचेहि तो सुपाय मनीं, ।

स्तवुनि म्हणे, 'प्रभुवर हो! हें स्तवनचि अर्पितों उपायन[४] मी. ॥ ७

सु रवर हो! एकातें ध्यातों, आलां तिघे कसें सांगा ?' ।

ते त्यासि म्हणति, 'आम्ही एकचि, हें तत्त्व नेणसी कां ? गा ! ॥ ८

दे तों पुत्रत्वें तुज हे आम्ही आपणा, प्रजा[५] अन्या ।

अस्मत्तुल्या[६] कैंची ? जे पुत्री त्यांत पूज्य हो धन्या[७] !' ॥ ९

वा[८] त्सल्य असें प्रकटुनि गेले प्रभु; अंश सोम[९] हा विधिचा, ।

हरिचा[१०] दत्त[११], हराचा दुर्वासा[१२] पुत्र त्या तपोनिधिचा. ॥ १०

य श अंगिरा बहु करी, श्रद्धे[१३]पासूनि कन्यका तो घे ।

चवघि सिनी[१४]वालिमुखा तत्सुत[१५]हि उतथ्य[१६] जीव[१७] हे दोघे. ॥ ११

[तप] शतवर्षें [चाललें आहे]; ज्याचे (ज्या जगदीशाचे) चरण (पाद) [हे] स्वर्द्रुचे (कल्पवृक्षाचे) सखे (मित्र), [तो जगदीश] मज (मला–अत्रीला) स्वतुल्या (स्वसमा, आपल्यासारखी) प्रजा (संतति) देवू (देवो) [असा अत्रीनें मनांत संकल्प केला].

१. स्वर्+द्रुचे=स्वर्ग+वृक्षाचे=कल्पवृक्षाचे. [द्रु=वृक्ष.] २. त्या अत्रिमुनीला. [अ० १ श्लो० २०-२१.] ३. मेघचि. [मुदिर=मेघ. 'घनजीमूतमुदिरजलमुग्धूमयोनयः' इत्यमरः। मोदंतेऽनेन मुदिरः। 'मुदिरः कामुके मेघे' इति कोषः.] ४. नजराणा. ['उपायनमुपाग्राह्यमुपहारस्तथोपदा' इत्यमरः.] ५. संतति. ६. अस्मत्+तुल्या=आमच्या सारखी. अन्य संतति कोठें प्राप्त होणार आहे? ७. [हे] धन्या! (भाग्यवान् अत्रे!) जे कोणी पुत्री [सुपुत्रिक] आहेत त्यांत तूं मान्य असा हो. ८. कृपाळुपणा. ९. चंद्र. १०. अध्याय १ श्लोक ३३ पहा. ११. दत्तात्रय. १२. दुर्वास ऋषि. १३. श्रद्धा ही अंगिरा ऋषीची पत्नी. १४. सिनीवाली ही आहे मुख (प्रमुख) ज्यांत त्या. सिनीवाली कुहू, राका आणि अनुमति ह्या श्रद्धेच्या चार मुली होत. सिनीवाली=ज्या अमावस्येला चंद्र दृष्टीस पडतो ती सिनीवाली=चंद्रसहित अवस। कुहू=चंद्ररहित अवस। अनुमति=कमी चंद्राची पुनव। राका=पुऱ्या चंद्राची पुनव। 'कलाहीने **सानुमतिः**, पूर्णे **राका** निशाकरे। अ**मावस्या त्वमावास्या दर्शः सूर्येंदुसंगमः** ॥ १२९ ॥ सा दृष्टेंदुः **सिनीवाली** सा नष्टेंदुकला **कुहूः** । * * ० ॥ १३० ॥ [नामलिंगानुशासने कालवर्ग–पृष्ठ १३.] १५. श्रद्धा आणि अंगिरा यांचे पुत्र. [अ० १ श्लो० ३५.] १६. ऋषिविशेष. १७. बृहस्पति.

न वल [1]प्रजापतींचें सुयश सविस्तर वदेल काय कवी? ।
तें साधु श्रोत्यांतें [2]भक्तजनमुखें **मुकुंद** आयकवी. ॥ १२

मो ठा [3]पुलस्त्यमहिमा, [4]तत्पुत्र **अगस्त्य**, **विश्रवा** दुसरा, ।
[5]त्याची वधू **इडविडा** [6]वी [7]सदपत्या, मही जसी [8]सुसरा. ॥ १३

[9]**भ** गवन्मित्र **कुबेर** ख्यात जगीं तो [10]कुरूत्तमा! आर्या! ।
[11]**रा**वणमुख पुत्र [12]तिघे तीचे जी [13]**के**शिनी दुजी भार्या. ॥ १४

[14]**ग** ति **पुलहाची** भार्या, [15]**क**र्मश्रेष्ठादि पुत्र तिस तीन, ।
[16]षष्टिसहस्र [17]**क्र**तुसुत [18]सुलघु [19]सुगुरु तेंवि अन्य दिसती न. ॥ १५

[20]**व** रगुण **वसिष्ठनंदन विदुरा**! ते [21]**चि**त्रकेतुमुख सात; ।
[22]**चि**त्तिज **द**धीचि, तेणें बहुत [23]अथर्वाख्य सुखविला [24]तात. ॥ १६

ते जस्वी **भृगु**भार्या त्याची जी [25]**ख्या**ति, सुत तिचा **धा**ता, ।
दुसरा पुत्र **वि**धाता, तिसरी **श्री** कन्यका जगन्माता. ॥ १७

वा! **आ**यति **नि**यति सुता त्या दोघां [26]**मेरु**नें दिल्या जाण, ।

---

१. अंगिरस् पुलस्त्य इत्यादि प्रजापतींचें. २. भक्तांच्या तोंडानें. ३. पुलस्त्यमुनीचें माहात्म्य थोर होय. ४. त्या पुलस्त्याचा. [पुलस्त्य आणि हविर्भू यांचा पहिला पुत्र अगस्त्य.] ५. त्या विश्रव्याची पत्नी. ६. प्रसवे. ७. सद्+अपत्या=उत्तम पुत्राला (कुबेराला). अपत्य=न पतंति पितरोऽनेन इति अपत्यम्. ज्याच्यामुळें पितर पतन पावत नाहींत तें अपत्य. यास्काचार्यांनीं या शब्दाची व्युत्पत्ति दोन प्रकारची दिली आहेः–(१) अपत्यं कस्माद् अपततं भवति पितुः सकाशादेत्य पृथगिव ततं भवति, (२) अनेन जातेन सता पिता नरके न पतति वा]. ८. उत्तम सरोवरातें. ९. भगवंताचा स्नेही. १०. कुरुश्रेष्ठा (विदुरा!) ११. रावण आहे मुख (प्रमुख) ज्यांत असे तीन पुत्र. १२. रावण, कुंभकर्ण, बिभीषण. १३. केशिनी ही विश्रव्याची दुसरी भार्या. [श्लो० ३७.] १४. पुलह नामक महामुनीची भार्या गति. १५. कर्मश्रेष्ठ, वरीयान् आणि सहिष्णु असे तीन पुत्र. १६. साठ हजार. १७. क्रतु नामक ऋषीचे पुत्र. १८. अत्यंत लहान. (रूपानें.) १९. अत्यंत मोठे. (तेजानें, कांतीनें.) हे क्रतुसुत वालखिल्य नामक ऋषि होत. (श्लो० ३९.) २०. श्रेष्ठगुण. २१. वसिष्ठ+ऊर्जा यांला चित्रकेतु, सुरोचि, विरजा, मित्र, उल्बण, वसुभृद्यान आणि द्युमान असे सात पुत्र झाले. २२. चित्ति+ज–अथर्वपत्नी+झालेला=अथर्वमुनीला चित्ति नामक भार्येच्या ठायीं झालेला (दधीचि). २३. अथर्वन्+आख्या=अथर्वन्+नाम=अथर्वसंज्ञक. २४. 'तातः पितरि पूज्ये च' इति कोषः. २५. ख्याति ही भृगुभार्या. २६. मेरूनें आयति आणि नियति ह्या आपल्या दोन कन्या भृगूच्या दोन पुत्रांला दिल्या. (श्लो० ४३.)

नंदन [1]**मृ**कंडनामा पहिलीचा, दुसरिचा सुत [2]**प्रा**ण. ॥ १८
सु त होय **मृ**कंडाला तो **मा**र्कंडेय **वि**दुरजी ! जाणा, ।
[3]वेदशिरा या नामें झाला नंदन महायशा **प्रा**णा. ॥ १९
दे वगुणरता ! विदुरा ! **भृ**गुसि करि [4]तिजाहि तुष्ट तो **क**वि रे ! ।
[5]त्या **शु**क्र सुखें फुगवी, कीं पाहुनि तात दुष्ट [6]तोक [7]विरे. ॥ २०
[8]**वा** रिजजभवें **द**क्षें वरिली जी [9]**मा**नवी [10]**प्र**सूति सती, ।
[11]पतिच्या वीर्यें पावे षोडशवरकन्यकाप्रसूतिस ती. ॥ २१
[12]**य** ज्वा **द**क्ष समर्पी तेरा[13] **श्र**द्धादि [14]सत्सुता **ध**र्मा; ।
[15]त्यांतिल [16]**मू**र्ति [17]प्रसवे, समुनिसुर [18]**द्रु**हिण पावला [19]शर्मा. ॥ २२
न र **ना**रायण जे प्रभु करिती निजभक्तकामनापूर्ती, ।
जे संप्रति [20]**कृ**ष्णार्जुन यातें ती प्रसवली सती **मू**र्ती. ॥ २३
मो ठें [21]**स्वा**हेचें ही [22]वैभव, जी **अ**ग्निला दिली **द**क्षें; ।
[23]यत्संतानोपासन साधूंच्या मांडिलें पहा लक्षें. ॥ २४

---

१. धाता+आयति यांचा पुत्र मृकंड होय. २. विधाता+नियति यांचा पुत्र प्राण. ३. श्लो० ४५ पहा. ४. [जो] तिजाहि (तिसराही) भृगुसि (भृगुमुनीला) तुष्ट करि (संतुष्ट करी) तो [त्याचा तिसरा पुत्र] कवि (कवि नामक पुत्र) [होय]. ५. त्या (त्या कविनामक तृतीय पुत्राला) शुक्र (शुक्र नामक पुत्र) सुखें (सुखानें) फुगवी (भरून टाकी)=त्या कविला शुक्र नामक पुत्र झाला व त्यानें आपल्या पित्याला (कवीला) मोठा आनंद दिला. शुक्रासारख्या सुपुत्राला पाहून तात कवि (भृगु) सुखानें फुगून गेला. ६. बालक. दुष्ट तोक (दुराचारी असें बालक) पाहुनि तात (बाप) विरे (विरून जातो). कुसंतानाला पाहून बापाला मनांतल्या मनांत फार दुःख होतें. ७. झुरे. ८. कमलोत्पन्न जो ब्रह्मदेव त्याच्या पुत्रानें (दक्षें याचें विशेषण.) ९. मनुकन्या. १०. नामविशेष. (मनुकन्या.) ११. दक्षाच्या. दक्ष+प्रसूति यांला सोळा सुंदर कन्या झाल्या. [श्लो० ४८.] स्वाहा, स्वधा, सती आणि पुढें सांगितलेल्या तेरा मिळून सोळा कन्या. १२. यज्ञकर्ता. १३. धर्माला दिलेल्या तेरा कन्यांचीं नांवें:–श्रद्धा, मैत्री, दया, शांति, तुष्टि, पुष्टि, क्रिया, उन्नति, बुद्धि, मेधा, तितिक्षा, ऱ्ही आणि मूर्ति. १४. उत्तम कन्या. १५. त्या तेरांतील. १६. नामविशेष. (दक्षकन्या.) १७. मूर्ति [नरनारायण नांवाच्या दोन पुत्रांस] प्रसवे. १८. ब्रह्मदेव. १९. सुखातें. [नरनारायणांच्या जन्मानें मुनि देव व ब्रह्मदेव या सर्वांस अत्यानंद झाला. २०. अ० १ श्लो० ५९ पहा. २१. स्वाहा=दक्षाची कन्या. [दक्षानें १३ कन्या धर्माला दिल्या, एक अग्निला, एक पितरांला व एक शंकराला मिळून १६ कन्या झाल्या.] २२. भाग्य. २३. जीच्या संततीची सेवा. [स्वाहाग्निसंतान=पावक, पवमान आणि शुचि असे तीन पुत्र.]

भ व्य परम जे[1] झाली पात्र पितर[2] वरुनियां **स्व**धा, त्याला[3] ।
वाटे सोळांमध्यें सुखवी अत्यंत हे स्वधात्याला[4]. ॥ २५
गं रिमा[5] तरि मानावा भाग्याचा पंधरांपरिस तीचा, ।
कीं **भ**वहर भर्ता नच इतरां नतकंधरांपरि[6] **स**तीचा. ॥ २६
वं रवी पर[7] वीरा ती संतानसुखासि पावली न **स**ती, ।
तात **शि**वद्वेष्टा जरि नव्हता, मेलीहि मावली[8] नसती. ॥ २७
ते चि कथा तुज कथितों, सांगावेंसेंचि अवसरीं[9] आलें, ।
बा! विश्वस्रजित्यांच्या[10] सत्रीं[11] पूर्वी असें नवल झालें. ॥ २८
[12]**वां** डववरदेवांची भरली होती महा सभा, गाती ।
गंधर्व अप्सराही[13] नाचति, दे बहु महा[14] सभागा[15]! ती. ॥ २९

---

१. दक्षाची कन्या जी स्वधा ती. २. अग्निष्वात्त, बर्हिषद, सौम्य, आज्यप, साग्नि, निरग्नि इत्यादि पितरांची पत्नी दक्षकन्या स्वधा होय. [श्लो० ६३.] ३. दक्षाला. ४. आपल्या पित्याला. ५. श्रेष्ठपणा. पंधरांपरिस (पंधरा बहिणींहून ज्यास्त) तिच्या (सतीच्या) भाग्याच्या (दैवाचा) महिमा (श्रेष्ठपणा) मानावा (मानिला पाहिजे, मानणें उचित आहे) कीं (कारण) सतीचा (सतीनामक जी दक्षकन्या तिचा) भर्ता (नवरा) [जो] भवहर (शंकर) [तो] इतरां नतकंधरांपरि नच. (इतर खालीं मान घातलेल्या पराक्रमहीन पुरुषांसारखा नाहींच. यास्तव पंधरा बहिणीपेक्षां सतीचें भाग्य श्रेष्ठ होय.) [भवहर=संसारनाशक, जन्ममृत्युरूप संसाराचा हर्ता, असाही अर्थ केला तरी चालेल. भव=शिव. हर= शिव. भव आणि हर या शब्दांचे अनेक अर्थ आहेत, पण त्या दोहींचा जो एक अर्थ आहे तो 'शंकर' असा आहे.] ६. नम्र आहे मान ज्यांची त्यांसारखा. ७. पर (परंतु) ती बरवी सती (ती भाग्यशालिनी सती) वीरा संतानसुखासि पावली न (पराक्रमी अशा पुत्रातें प्रसवून सुखी पावली नाहीं, तिला वीरपुत्राचें सुख प्राप्त झालें नाहीं. या जन्मीं तिला कार्तिकेय पुत्र झाला नसून दुसऱ्या जन्मीं झाला हें येथें लक्षांत असावें). [तिचा] तात (बाप दक्षप्रजापति) जरि शिवद्वेष्टा नव्हता (न होता, बनला नसता, जर तिचा बाप शिवाचा वैरी झाला नसता तर) मावली (साध्वी सती) मेलीही नसती (मरण पावली नसती, तिचें मरण चुकलें असतें). [मावली=माता. 'मावली' या शब्दानें एका पक्षीं कारुण्य, वात्सल्य आणि दुसऱ्या पक्षीं पूज्यबुद्धि आणि प्रेमातिशय या गुणांचा बोध होतो. ८. जगन्माता, साध्वी. ९. समयीं. १०. विश्वस्रष्ट्यांच्या, सृष्टि करणाऱ्या प्रजापतींच्या. ११. यज्ञांत. १२. ब्राह्मणश्रेष्ठ आणि देव यांची. १३. देवांगना. अप्सरा ह्या समुद्रमंथनकाळीं अप् म्हणजे उदक यापासून उत्पन्न झाल्याः—'अप्सु निमर्थनादेव रसात्तस्माद्वरस्त्रियः । उत्पेतुर्मनुजश्रेष्ठ तस्मादप्सरसोऽभवन् ॥. 'ह्या गंधर्वांगना असून स्वैरस्या आहेत. ह्या इंद्राच्या दासी असून त्याला कोणाच्या तपाचें भय वाटलें म्हणजे तपोभंग करण्याच्या कामीं मोठ्या कुशल

सु र मुनि सर्वहि उठले येतां दक्षप्रजापति समाजीं, ।
[1]समिति म्हणे जसि म्हणती ध्यावी [2]नमनें [3]प्रजा [4]पतिस माझीं ॥ ३०

दे व ब्राह्मण अग्निहि उठले तैसेचि लोकपति पितर ।
किंबहुना? ते उठले सर्वहि [5]विधिशंभुहूनि जे इतर. ॥ ३१

बा पा विधितें वंदुनि, दक्ष वसे, वक्र [6]विभुकडे पाहे; ।
केलें महेश्वरें न [7]प्रत्युत्थानादि जें न तें साहे. ॥ ३२

[8]**य** द्वा तद्वा वदला प्रकटुनि [9]तो [10]बाळ मोह रागेला, ।
शापुनि [11]निजजनकाळव्याळगरळकाळ मोहरा गेला. ॥ ३३

न सतें कारण कल्पुनि तेव्हांपासूनि आदरि द्रोहा[12], ।
कल्याणफळ तशा त्या तरि यावें कां न बा! [13]दरिद्रोहा? ॥ ३४

म्हणून त्याच्या आज्ञेनें ह्याच जावयाच्या आणि कार्यसिद्धि करून परत यावयाच्या. उर्वशी, मेनका, रंभा, घृताची, तिलोत्तमा, सुकेशी, मंजुघोषा, इत्यादि प्रमुख सुरवेश्या होत. बाणकवीनें यांचीं चवदा कुळें असल्याविषयींचा उल्लेख 'कादंबरी' ग्रंथांत केला आहे. अप्सरा आपल्या नृत्यविलसितानें विजांस लाज आणतात असें त्यांचें वर्णन संस्कृत ग्रंथांतून आढळतें. १४. उत्साहा, तेजा. [महस्=उत्सव; तेज.।'महस्तूत्सवतेजसोः' इत्यमरः ।'मह उत्सवतेजसोः' इति मेदिनी. ।] १५. हे महाभागा विदुरा!

१. सभा. २. दक्षाच्या सत्रासाठीं आलेल्या देवब्राह्मणांची पूजा. ३. जन. ४. प्रजा (रयत) धन्यास (राजाला) माझीं नमनें ध्या म्हणती तसी सभा माझीं नमनें ध्या असें दक्षप्रजापतीला म्हणे—असा भाव. माझें वंदन स्वीकारावें—असें समिति (सभा) दक्षाला म्हणाली. ५. अध्याय २ श्लो० ५ पहा. ६. शंभुकडे. ७. आदरार्थ उठून उभें राहणें इत्यादि. ८. पाहिजे तें, भलभलतें. ९. दक्ष. १०. मूर्ख. तो (दक्ष) बाळ (अज्ञान—शंकरतेज न जाणणारा असा) रागेला (रागें भरलेला, क्रोधाविष्ट होत्साता) मोह प्रकटुनि (आपला मूर्खपणा लोकांस दाखवून) यद्वा तद्वा बदला (हें किंवा तें भलभलतें—कांहींतरी बडबड करिता झाला—मनास वाटेल तें अविचारपूर्वक बोलला,) [आणि] स्वभक्तांच्या कालरूप सर्पांच्या गरलाचा नाश करणारा जो मोहरा (रत्नविशेष—शंकर त्याला) शापुनि गेला (सभेंतून निघून गेला.) [मोहरा=सापाच्या मस्तकांत सांपडणारा मणिविशेष. हा विषापहारक आहे असें समजतात. गरलकाळ मोहरा=विषापहारक मणिविशेष. यद्वा तद्वा= तालतंत नाहीं अशी बडबड, अयुक्तिक, अयथोचित भाषण.] ११. स्वजनांचा जो कालरूप सर्प त्याच्या विषाचा काल (नाश करणारा) असा मणिविशेष (महादेव.) १२. वैरा. १३. दरिद्र+ऊह=निर्धन संकल्पास. नसतें कारण कल्पुनि (कांहीं योग्य कारण नसतां शंकरानें आपला मोठा अपराध केला असें मानून तेव्हांपासूनि (त्या वेळेपासूनि) [तो दक्ष शंकराच्या] द्रोहा आदरि (द्वेषाचा अंगीकार करिता झाला.) तरि (तर मग, असें झालें तेव्हां) तशा त्या दरिद्रोहा (तशा

मो हें [१]भर्गद्वेष्टा होय, [२]बुडे **द**क्ष तो; [३]तैयावरि ती ।
ऐक कथा बा! सत्य प्रभुसचि न सुकीर्ति [४]तोतया वरिती. ॥ ३५

भ र्ता प्रजापतींचा झाला [५]**ब्र**ह्माभिषिक्त तो [६]**द**क्ष, ।
करि [७]**वा**जपेय, [८]गर्वचि संपादी परिभवूनि [९]संल्लक्ष. ॥ ३६

ग र्वें फुगला बहु, मग आरंभी तो [१०]**बृ**हस्पतिसवातें, ।
किति नाम [११]**द**क्ष? [१२]याच्या तों उडवावें **बृ**हस्पतिस वातें. ॥ ३७

व न्ह्यादि [१३]देव पितर ब्रह्मर्षि [१४]सवांत जाहले गोळा, ।
नेल्या [१५]सभर्तृका त्या **द**क्षें एकी उण्या [१६]सुता सोळा. ॥ ३८

प्रकारच्या भिकार संकल्पास, अविचारमूलक दक्षाच्या भिकार प्रयत्नास) कल्याणफळ बा! (अरे विदुरा!) कां न यावें? (दक्षाच्या भिकार प्रयत्नाला सुंदर फळ कां प्राप्त होऊं नये? कुत्सित संकल्पाला सुंदर फळ अवश्य आलें पाहिजे–असें व्याजोक्तिमय उत्तर आहे.) [येथें कल्याणफळ यांत व्याजोक्ति आहे. दरिद्र (भिकार) ऊहाला (संकल्पाला) सुंदर फळ येणें–हें असंभाव्य होय]

१. भर्ग+द्वेष्टा=शिव+द्वेष करणारा. शिवद्वेषी. २. हेंच कल्याणफळ दक्षास प्राप्त झालें! ३. त्यानंतर जी कथा घडली ती. ४. कोणताही पदार्थ वास्तविक नसतां खरोखर जें रचवणें त्याला. तोतया=मी अमुक अमुक आहे असें ढोंग करणारा पुरुष, कूटवेषधारी वंचक, राज्याभियोगी=A pretender to the throne. ५. ब्रह्म+अभिषिक्त= ब्रह्मदेवानें अभिषेक केलेला. ६. ब्रह्मदेवानें सर्व प्रजापतींच्या राज्याचा अधिकार देऊन दक्षाला अभिषेक केला. [अ० ३ श्लो० २.] ७. यज्ञविशेष. [यज्ञांविषयीं बरीच माहिती **रा० दीक्षित** यांच्या **'धर्ममीमांसा'** नामक पुस्तकांत आढळेल. धर्ममीमांसा–भौतिकधर्माचें विवेचन–पृ० ५८-६२.] ८. वाजपेय यज्ञ करून व लक्षमित (अनेक) साधूंचा पराभव करून त्या दक्षाला मोठा गर्व झाला. ९. सत्+लक्ष=साधूचें लक्ष. (लक्षावधि साधु–असा भाव.) १०. बृहस्पति नामक यज्ञास. ११. जो नांवानें मात्र दक्ष (चतुर) परंतु जो खरोखर बुद्धीनें अदक्ष (अचतुर, मूर्ख)–असा लिहिण्याचा भाव. १२. या गर्वाच्या. याच्या वातें (या गर्वाच्या वातानें, या गर्वाच्या अल्प अंशानें, अल्प गर्वानें) बृहस्पतिस (बृहस्पतीसारख्या पंडितोत्तमाला) तों उडवावें (क्षणांत फेंकून द्यावें, क्षणांत लघुत्वाप्रत पोंचवावें). [अल्प गर्वानें जर बृहस्पतीसारखे शहाणे हलकट बनतात तर] किति नाम दक्ष? (जो केवळ नावाचा दक्ष आहे त्याचा पाड काय?) [गर्वानें खरोखर शहाण्यास कोणी विचारित नाहीं अशी लघुता प्राप्त होते, तर जे केवळ नांवाचे शहाणे (दक्ष=चतुर, खरोखर शहाणे नव्हेत) त्यांची काय दुर्दशा व्हावी?] १३. [अग्नीला देवत्व कसें प्राप्त झालें व 'देव'शब्दाच्या अर्थाचा विकास कसा झाला–याविषयीं माहिती **'धर्ममीमांसा'**–भौतिकधर्माचें विवेचन–पृ० ७२-७६ यांत आहे ती अवश्य पहावी.] १४. यज्ञांत. १५. भर्त्यांसह.

ते सववार्ता परिसुनि, विनवी [१]जाया [२]शिवा [३]अनादिसती, ।
तेव्हां जाणों तिस तीं न सुखें जीं [४]प्रभुपदीं जना दिसती. ॥ ३९
'वाटे [५]संवासि आम्हीं जाउनि सुखवुनि जना [६]स्व [७]साजावें, ।
व्हावें जशा [८]सपतिका त्या [९]पूजाभाजन [१०]स्वसा, [११]जावें.' ॥ ४०
[१२]सु रमणि म्हणे, 'परिस हित, [१३]मतिमति! सति! [१४]पतिस म्हण 'नको,' परत, ।
करिलचि तो [१५]मद्द्वेष्टा मत्त [१६]खळ [१७]त्वदवगणन [१८]कोपरत. ॥ ४१
देवि! [१९]स्वजनासत्कृत [२०]संभावित सुजन अपयशें मळतो, ।
आप्तप्राप्त [२१]असह अपमान मरण हेंचि फळ, फळें फळतो.' ॥ ४२
वा यां गेला सत्यप्रिय हित [२२]परमगुरुक्त सदुपदेश, ।
उपदेश [२३]किति? सतीनें त्यजिला [२४]स्वस्वद्रु जो तदुपदेश. ॥ ४३

---

१६. कन्या. दक्षानें आपल्या यज्ञमहोत्सवासाठीं आपल्या घरीं पंधरा मुलींला बोलाविलें होतें. एकीला मात्र बोलाविलें नाहीं.

१. दक्षाच्या घरीं जावयासाठीं. २. शंकराला. (अ० ३ श्लो० ८-१२.) ३. दक्षकन्या. ४. जीं सुखें प्रभुपदीं (शंकरचरणीं) जना (भक्तांला) दिसती (दिसतात) तीं (सुखें) तिस (त्या दक्षकन्येला) तेव्हां (त्या प्रसंगीं) जाणों (जणूं काय) [दिसलीं नाहींत]. म्हणून तिनें पित्याच्या घरीं जाण्याची आज्ञा मागितली. ५. यज्ञाला. ६. स्वीय, स्वकीय, आप्त जनांला. ७. शोभावें. ८. पतिसहवर्तमान. ९. पूजेला पात्र अशा. १०. भगिनी. ११. हें सतीचें भाषण आहे. आपल्या सपतिक भगिनींचा आदर जसा दक्षानें केला तसा तो आपलाही करील अशी सतीची इच्छा होती. १२. देवश्रेष्ठ (महादेव). १३. हे बुद्धिमति सति! हित परिस (माझा हितकारक उपदेश ऐक). १४. मज पतिस नको म्हण. (नको=जाणें न लगे, असें म्हण.) परत=मागें फिर, बापाच्या घरीं जाऊं नको. १५. मत्+द्वेष्टा=माझा द्वेष करणारा. १६. दुष्ट (दक्ष). १७. त्वत्+अवगणन=तुझा अपमान. १८ चंडस्वभाव, कोपनशील. १९. स्वजन+असत्कृत=स्वजनापासून सत्कार न पावलेला. २०. संभावित साधुजनाचा आप्तजनाकडून जर अपमान झाला, तर तो दुःसह होतो. २१. सहन करण्यास कठीण. आप्तप्राप्त (आप्तांपासून प्राप्त झालेला) [जो] असह अपमान (दुःसह अपमान) [त्याचें] मरण हेंचि फळ (परिणाम, शेवट होय). [तो अपमानरूप वृक्ष] फळें (या मरणरूप फळानें) फळतो (फलद्रूप होतो, अन्य फळ प्रसवत नाहीं. या अपमानरूप वृक्षाला मरणरूपच फळ येतें, अन्य फळें येत नाहींत). २२. शंकरकृत उत्तम उपदेश. २३. उपदेशाचीच काय गोष्ट सांगावी? २४. आपला कल्पवृक्ष असा जो. (शंकर) तदुपदेश (त्या शंकराच्या समीपचा प्रदेश) तोही सतीनें सोडिला. तदुपदेश=तत्+उपदेश= त्याचा+समीप प्रांत.

य द्यपि जैशी छाया अवलंबुनि पद सदैव शोभावी, ।
[1]जायचि, अवश्य होतो होणार अनर्थ अर्थ जो [2]भावी. ॥ ४४

न गणुनि [3]पतिस, न चिंतुनि [4]भावी [5]पितृसदनघात, [6]पायांनीं ।
जाय; मन न जाऊं दे अवलंबुनि सदन[7]घातपा [8]यानीं. ॥ ४५

मो डुनि वचन निघाली, न गणुनि [9]अवमानपरिघ [10]रागेली, ।
[11]स्वगणसह [12]सदरिच्या ती अभिमुख [13]पवमानपरि घरा गेली. ॥ ४६

[14]भ गवत्कथित समस्तहि जातांचि [15]प्रत्यया तिच्या आलें, ।
कीं होय तिचें दर्शन दुःसह **शि**[16]वशत्रुलोचनीं [17]आलें. ॥ ४७

[18]ग रळचि गमलें सांत्वन, जें भगिनी माय [19]मावशी करिती, ।
भगवद्द्वेषी यास्तव निंदी, निंदूं नये पिता परि ती. ॥ ४८

व दली तातासि असें कीं, 'तूं [20]**द**क्षा! असाधु कळलास, ।
करुनि **शि**वद्वेषातें झालासि परम [21]अभद्र, [22]मळलास. ॥ ४९

[23]ते पाय सुमंगळ, तुज काय खळशिरोमणीस [24]हातनया? ।
[25]हा! तनया तव [26]मी, हें वपु अघ, लावू **म**हेश [27]हात न [28]या. ॥ ५०

---

१. सती गेली. २. होणारा, पुढें घडून येणारा. ३. शंकराला. ४. होणार. ५. पितृ+सदन+घात=जनकदक्ष+गृह+विनाश. ६. [ती सती] पायांनीं जाय (ती सती वाहनाचा उपयोग न करतां पायांनीं चालत बापाच्या घरीं गेली). यानीं (यानांतून, यानद्वारा, वाहनानें) मन जाऊं न दे (क्रोधाविष्ट झाल्यामुळें तिच्या मनाला वाहनांत बसून जाणें रुचलें नाहीं. तिच्या मनानें यानाचा त्याग केला). सदनघातपा (सद्+अनघ+आतपा=उत्तम+निष्पाप, निर्मल, स्वच्छ, तीव्र+उन्हाला) अवलंबुनि (स्वीकारून, पत्करून). साध्वीचा स्पर्श ज्या आतपाला झाला त्याला सद्+अनघ (उत्तम+पवित्र) असें म्हणतां येईल. ७. उष्णातें. ८. गमनीं. ९. अपमानाचा वेढा. १०. रागावलेली. ११. शंकराच्या अनुचरांसह, मणिमान् मद इत्यादि पार्षद नंदिकेश्वर यांसह. (अ० ४ श्लो० ४.) १२. साधुद्वेषकाच्या. १३. वायूसारखी. १४. शंकरानें सांगितलेलें (अपमानादिक कृत्य). १५. अनुभवास. १६. दक्ष. नयनीं. १७. ओली सुंठ, आलें. १८. विषचि. १९. अध्याय ४ श्लो० ८-१० पहा, २०. अध्याय ४ श्लो० ११-१३ यांत सतीचें भाषण आहे. २१. फार अशुभ. २२. अपवित्र झालास, पापी झालास. २३. ते शंकरपाद. २४. हात+नया=गत+नीति=टाकिली नीति ज्यानें अशा तुला. २५. खेदार्थी अव्यय. येथें 'दामयमक' आहे. २६. हाय! हाय! मी तुझी कन्या! २७. हात लावणें=स्पर्शणें, स्पर्श करणें. २८. या वपुला.

वा चेला द्व्यक्षर[1] **शिव** हें येतां नाम, शमळ[2] ताप[3] सरे,[4] ।
त्या निंदिसि हा! मूढा! ‘शिव शिव’चि म्हणोनि अमळता[5] पसरे. ९१
सु टका पापापासुनि भक्षितपापान्न[6] ओकितां आहे, ।
भवदुत्पन्न[7] तसें हें वपु पाप, त्यजिल मग न कां या[8] हे?’ ॥ ९२
दे वी ऐसें बहुतचि बोलुनि अनिलाग्निधारणा[9] मांडी, ।
हृदयीं **शिव**मूर्ति वरुनि, भस्म करुनि आत्ममूर्तिला[10] सांडी. ॥ ९३
वा! विदुरा! त्या समयीं स्पष्ट मुखें **द**क्ष मात्र न वदे ‘हा!’ ।
मग ती हिमगिरिपासुनि पावे **शि**वदास्यपात्र[11] नव देहा[12]. ॥ ९४
य ज्ञ ध्वंसुनि **द**क्षा रुद्रजटोत्पन्न[13] **वीर**भद्र[14] वधी, ।
दुर्वृत्तांची[15] दंडावांचुनि[16] पावे कधींहि न द्रव धी. ॥ ९५

---

१. दोन अक्षरें ज्यांत असें. अध्याय ४ श्लो० १४ पहा. २. पातक, अशुद्धपणा, मालिन्य. ३. त्रिविधताप. ४. संपे, नष्ट होय. ५. स्वच्छता. ६. भक्षिलेलें अधमाचें अन्न. ७ भवत्+उत्पन्न=तुजपासून झालेलें (हें वपु). ८. ही सती (मी). ९. वायूच्या योगानें अग्नीची धारणा. १०. स्वदेहाला. ११. शिवाचें दास्य करण्याविषयीं योग्य अशा नूतन देहा. १२. ती सती पुढें पार्वती नांवानें पुनर्जन्म पावली. १३. शंकराच्या जटेपासून उत्पन्न झालेला. [अ० ५ श्लो० २.] १४. अध्याय ५ पहा. १५. दुराचारी लोकांची. या अर्धांत **अर्थांतरन्यास** नामक अलंकार आहे. ‘अप्रस्तुतविशेषार्थान्तरन्यसनपूर्वकम् । सामान्यप्रस्तुतस्यार्थान्तरन्यासः समर्थनम् ॥ तादृशां तादृशैरेव संबंधो भुवि शोभते । विषाननपरिष्वङ्गो विषकण्ठस्य भूषणम् ॥ विशेषस्य प्रस्तुतस्य सामान्येन समर्थनम् । द्वितीयोऽर्थान्तरन्यासः क्रियते प्रस्तुतेन चेत् ॥ अस्तमिते खरकिरणे तमसा क्रान्तं जगत्तु बहुशोऽभूत् । निजशत्रोर्हि परोक्षे लोकः सर्वोऽपि वृद्धिमभिनयति ॥ कार्यकारणभावेन प्रस्तुतार्थसमर्थनम् । तृतीयार्थान्तरन्यासं केचिदूचुर्विपश्चितः ॥ भूपाः प्रतापरुद्रस्य नता भवत नोन्नताः । उन्नतान्नमयत्येष नतानुन्नमयत्यपि ॥.’ [काव्यमाला–अंक १११–श्रीकृष्णविरचिता **मन्दारमरन्दचम्पू**–१० व्यंग्यबिंदु–श्लोक १६६-१६७, पृ० १४१-१४२.] १६. “वांचून”=हें मूळचें ‘ऊन’प्रत्ययांत धातुसाधित असून याचा अर्थ ‘राहून’ असा आहे. पण होतां होतां हें शब्दयोगी बनलें आहे; जसें, ‘त्यांजवांचून त्याला घटकाभरही करमत नाहीं;’ ‘मजवांचून तें कोणास माहीत नाहीं.’ इंग्रजी भाषेंतील या अर्थाचे शब्द–except, save,–यांचें असेंच व्याकरणांतर झालें आहे. हीं दोन्हीं मूळचीं आज्ञार्थक क्रियापदें होत; पण होतां होतां अव्ययें होऊन बसलीं. तसेंच संस्कृतांत या अर्थी ‘परित्यज्य,’ ‘त्यक्त्वा,’ ‘विमुच्य,’ ‘हित्वा’ इत्यादि धातुसाधितांचा अव्ययासारखा प्रयोग होतो. असो; तर याचप्रमाणें वरील शब्द जरी आतां अव्ययांतच मोडतो, तरी त्या पंक्तींत तो येणेंप्रमाणें गेला असावाः–‘मजवांचून’ म्हणजे

न[1] लिनभव **न**[2]लिननाभ प्रभु हे दोघे अनर्थ तो भावी[3] ।
जाणुनि[4] आले नव्हते, ज्यांची शांतांत शांति शोभावी[5]. ॥ ९६
मो[6] हचि झाला सर्वां, भ्याले सुर, वृत्त[7] कळविती **वि**[8]धिला; ।
तो त्यांसह कैलासीं[9] जाउन विनवी[10] तया दयानिधिला[11]. ॥ ९७
भ[12] यविकळांतें प्रभु[13] तो तत्काळचि अभय दे, तदा ज्ञात्या[14] ।
प्रार्थिति **द**क्ष उठाया, उठवी होउनि सुधा तदाज्ञा[15] त्या. ॥ ९८
ग[16] रहि गिळीयाचा[17] जो प्रभु, न गिळिल काय तदपराधा[18] त्या? ।
विधिस म्हणे, 'हा ईश्वर नच दंडी, मदचि मदपरा[19], **धा**ल्या !'॥ ९९

'मला सोडून' 'मला टाकून' असा अर्थ. आणि वास्तविक व्याकरणरीत्या पाहिलें असतां पहिलें रूप 'मी वांचून' असें असेलसें दिसतें. 'मी वांचून' हें संस्कृतांतील सति सप्तमी-सारखें किंवा इंग्रजींतील Nominative Absolute यासारखें होय; आणि त्याचा अर्थ 'मी राहिलों असतां' असा समजायाचा." [निबंधमाला–अंक १८ पृ० २८-२९.]

१. ब्रह्मदेव. २. विष्णु. ३. होणारा. ४. अध्याय ६ श्लो० २ पहा. ५. जे अत्यंत शांतस्वभाव होते–असें तात्पर्य. ६. भ्रम पडला. ७. वृत्तांत. ८. ब्रह्मदेवाला. ९. कैलास= शंकराचें प्रियवासस्थान. १०. प्रार्थी. (देवांना व दक्षाला क्षमा कर, यज्ञाचें पुनः संधान कर इत्यादि प्रार्थना, अध्याय ६ पहा.) ११. त्या दयासागर शंकराला. १२. भयपीडित देवांला. १३. शंकर. १४. ज्ञाननिधि शंकराला. १५. तदाज्ञा (त्याची आज्ञा, त्या प्रभु शंकराची आज्ञा) सुधा होउनि (अमृतरूपिणी होऊन, अमृतस्वरूप धरून) त्या (त्या दक्ष-प्रजापतीला) उठवी (सजीव करी)=शंकराची आज्ञा होतांच, दक्ष जीवंत झाला–असा भाव. १६. विषहि. १७. येथें हालाहलविषप्राशनकथा अनुसंधेय आहे. १८. दक्षाच्या त्या अपराधा. हें **काव्यार्थापत्ति**नामक अलंकाराचें उदाहरण आहे. 'कैमुत्येनार्थनिष्पत्तिः काव्यार्थापत्तिरीरिता' [मंदारमरंदचम्पू–१० व्यंग्यबिंदु–पृ० १४०.] या अलंकाराचीं उदाहरणें:—(१) भरवी मृगार्भका, मग तो भरवी कां न नातवा घास?। झाला असा शिशुपणीं बद्ध करी काननांत वाघास. ॥ [आदिपर्व–अ० १२ गी० ५५ पृ० ७७], (२) सेविति आभरण सदा यतिपति, जे परम शांत, नुसतीतें । निरुपम तनु प्रकटितां कां हो! न भुलेल शांतनु सतीतें ॥ [आदिपर्व–अ० १३ गीति ३८ पृ० ८४], (३) तेज न साहति त्याचें गहनीं व्याघ्रादि काननौके तें, । दे लाज विमानातें, मग देतो भीम कां न नौकेतें?॥ [आदिपर्व–अ० २८ गी० ७३ पृ० १४९], (४) तव सेवक मर्यादाविलंघनीं मात्र हो न हे सकती;। प्लवग, तवांघ्रिप्लवगत, तरले भवसिंधु, हा समुद्र किती?' ॥ [रामायणें–भाग १–मंत्ररामायण–युद्धकांड–गीति २० पृ० ८९.] १९. गर्विष्ठास. गर्वच गर्विष्ठास शासन करतो.

व[1] स्ताचें [2]शिर **द**क्षा होय, सखा कां न बोकडा हो तो?[3] ।
[4]भगवत्पराङ्मुखाला कुदशेचा लाभ रोकडा होतो. ॥ ६०
ते सुर **वि**धिसह घेउनि गेले होते **शि**वा [5]सवस्थानीं, ।
[6]ज्याचा सोडावाचि ध्याता जीवांचिया [7]अवस्थानीं. ॥ ६१
वा हुनि चरणीं [8]हस्तक [9]बस्तकमस्तक कुरूप तो **द**क्ष ।
[10]स्मरुनि [11]सतीस गहिंवरे, प्रभुसि म्हणे, '[12]मदपराध बा ! लक्ष. ॥ ६२
सु टलों दंडें पापापासुनि, जरि सत्वगुण तदपि [13]नाकी ।
चुकती, परि करिसि दया तूं नाशुनि [14]मदमहागद **पि**[15]नाकी.' ॥ ६३
दे व **गरु**डरथही ये, होय सकळ खेदपर्वता [16]पवि तो, ।
[17]भक्त मयूर घन **ह**रिच, [18]तदितर **ज**नकादि सर्व ताप वितो. ॥ ६४

---

१. यज्ञपशूचें. (बोकडाचें.) २. दक्षप्रजापतीचें पूर्वीचें मस्तक जळून गेलें म्हणून त्याला बोकडाच्या मुखानें युक्त असें मस्तक घातलें. (अ० ७ श्लो० ३.) ३. तो दक्षबोकडा (बोकडाला, बोकडाचा) सखा (मित्र) कां न हो? (कां होणार नाहीं?) ४. हें अर्ध उत्तम सुभाषित असून 'अर्थान्तरन्यासा'चें उदाहरण आहे. [मागें गीति ५५ उत्तरार्ध टीप पहा.] ५. यज्ञस्थानीं. ६. ज्याचा ध्याता (ज्या शंकराचें ध्यान करणारा, ज्या शंकराची उपासना करणारा भक्त) जीवांचिया (प्राण्यांच्या) अवस्थांनीं जन्ममरणादिक संसारांतील दुःखप्रद अवस्थांनीं, संसारांत जन्ममरणांचा फेरा न सुटणें, सदा अनेक व्याधींची बाधा होणें, ब्रह्मानंद सुखाचा लाभ न होणें इत्यादिक भिन्न अवस्थांनीं) सोडावाचि (निश्चयें करून मुक्त करावा) जो शंकराचें ध्यान करणारा भक्त आहे त्याला संसारक्लेशबाधा घडत नाहीं—असा भाव, कारण ध्यानानें मुक्ति प्राप्त होते. ७. स्थितींनीं. ८. येथें छेकानुप्रास झाला आहे. ९. बोकडाचें मस्तक ज्यास तो. १०. हें **'स्मरणा'**लंकाराचें उदाहरण आहे. ११. पार्वतीस. १२. मत्+अपराध=माझीं पापें, माझे प्रमाद. १३. नाकी=देव, अमर. (नाक=स्वर्गलोक) नाकी=स्वर्गलोकीं राहणारा देव. १४. गर्वरूपरोग. १५. हे पिनाकधारी शंकरा! [शंकराचें धनु पिनाक अथवा अजगव आहे. पिनाक हें आयुध हातांत शंकरानें घेऊन पळालेल्या यज्ञरूप हरिणाचा वध केला या पौराणिक कथेस अनुलक्षून शंकराला पिनाकी हें संबोधन लाविलें आहे. **रघुवंश**—सर्ग ११ श्लोक ४४; **अभिज्ञानशाकुंतल**—अंक १ श्लोक ६ पहा.] १६. वज्र. खेदरूप पर्वताला वज्राप्रमाणें भग्न करणारा तो गरुडरथ विष्णु झाला. 'पवि' हा पर्वतांचा भेद करतो म्हणून त्याला 'भिदुर' अशी संज्ञा आहे. १७. जनकादि सर्व भक्त [हे] मयूर (मोर) [होत] [त्या मयूरांला] हरिच घन (विष्णु हाच घनाप्रमाणें—मेघाप्रमाणें—शांति देणारा, आनंद देणारा होय) तदितर (विष्णूहून इतर देव) ताप (क्लेश) वितो (प्रसवतो). आपल्या जनकादिसकल भक्त मयूरांला मुक्तिरूप जीवन देणारा एक हरिघनच आहे. इतर देवांनीं कृपा केली तरी त्यांच्यापासून मुक्ति प्राप्त व्हावयाची नाहीं,

वा खाणिलें असें हें **'दक्षाध्वरमथनचरित'** शर्वाचें[1], ।
याच्या श्रवणें[2] जातें अघ अश्रुविमोक्ष[3] करित सर्वांचें. ॥ ६५

य श अत्युत्तम आतां परिसा **उत्तानपादराजाचें**, ।
देतें श्रवणद्वारें प्राशन बहु हर्ष सादरा ज्याचें[4]. ॥ ६६

नं यसुनिपुणा[5] **सुनीति**[6] ज्येष्ठा सत्कर्मसादरा[7] आर्या, ।
सुरुचि कनिष्ठा ती बहु त्या **मनुतनुजासि**[8] आवडे भार्या[9]. ॥ ६७

मो हें **सुरुचिसुतातें** अंकीं घे **उत्तमाभिधानातें**[10], ।
बहु लालन[11] करि राजा, कृपण जसा बहु भजे निधानातें[12]. ॥ ६८

भ त्यांजवळचि होती हो! ती जी काय लाडकी **सुरुची**, ।
तो **ध्रुव सुनीतिसुतही** तसि इच्छी प्रीति आपुल्या गुरुची[13]. ॥ ६९

ग वें **सुरुचि** म्हणे, 'रे! राजासन होय योग्य मत्तनया[14], ।
राजसुतहि सांप्रत तूं समुचित[15] भव्यासि[16], जेंवि मत्त[17] न या[18]. ॥ ७०

व त्सा! जरि राजपदीं बैसाया इच्छितोसि तूं, हरितें ।
भज, मत्सुत हो, सफळ प्रभुचें भजनचि मनोरथा करितें.' ॥ ७१

त्यांपासून प्राप्त होणारीं संपत्त्यादिक सुखें अशाश्वत आणि परिणामीं दुःखप्रद होत. या उत्तरार्धाचा अन्य अर्थ येथें देतों:–भक्तमयूराला हरि हाच घनाप्रमाणें आनंददाता आहे. त्याहून तातादिक इतर सकलजन भक्ताला ताप देणारे आहेत, सुख देणारे नाहींत. भक्ताला हरीपासूनच आनंद प्राप्त होतो, जनक (बाप) इत्यादि इतर जनापासून ताप प्राप्त होतो. १८. त्या हरीहून दुसरा.

१. महादेवाचें. २. अध्याय ७ श्लो० ६०-६१ पहा. ३. रडत. ४. ज्याचें प्राशन (ज्या यशाचें प्राशन–सेवन) श्रवणद्वारें (कानाच्या वाटेनें) सादरा (आदरयुक्त पुरुषाला, यशःश्रवणीं आदरबुद्धि ज्याची आहे अशा जनाला, यशःप्राशन करण्याची आवड आहे अशा पुरुषाला) बहु हर्ष देतें. (अत्यंत आनंद देतें) ६६ व्या गीतीपासून उत्तानपादचरितास आरंभ होतो. ५. नीतींत फार निपुण अशी. ६. उत्तानपादाची ज्येष्ठ पत्नी. ७. पुण्यकर्मनिरता. सत्कर्माविषयीं आदरयुक्त अशी. ८. मनुपुत्राला (उत्तानपादाला). अध्याय ८ श्लो०८ पहा. ९. बायको. ['भार्या जायाथ पुंभूम्नि दाराः' इत्यमरः। भ्रियते [स्वकुलं पतिं वा] सा भार्या. सुभाषित असें आहेः–सा भार्या या गृहे दक्षा सा भार्या या प्रजावती । सा भार्या या पतिप्राणा सा भार्या या पतिव्रता॥' हितोपदेश १-१९६.] १०. उत्तम+अभिधानातें=उत्तम+नांवातें=उत्तमनामकातें. ११. लाड, पालनपोषण. १२. द्रव्यातें, ठेव्यातें. १३. बापाची. ४. माझ्या पुत्रास. १५. अध्याय ८ श्लो० ११ पहा. १६. कल्याणास. १७. उन्मत्त पुरुष. १८. नृपासनास.

ते बोल **सुरुचि**चे [1]खरतर हृदयीं [2]लागले जसे बाण, ।
रडत **सुनीति**कडे **ध्रुव** जाय, तिचा जो [3]बहिश्चर प्राण. ॥ ७२

वा र्ता परिसुनि तेही रडली बहु कांपली जसी [4]कदली, ।
[5]पदलीनासि [6]पदप्रद **हरि**च म्हणे, 'बा! खरेंच ती वदली.' ॥ ७३

सु रुचि तसेंचि **सुनीति**हि बोले, [7]सुस्वहितहेतु बोध मनीं ।
ठसला, दीप्त कराया **ध्रु**व बाळ सुतेज होय तो [8]धमनी. ॥ ७४

दे[9]वाराधनकामें तत्काळ निघोनि जाय [10]गां! बाळ; ।
तेजस्वि [11]अपत्य ठळक, वरकड निस्तेज, काय [12]गोबाळ? ॥ ७५

[13]**वा** टे [14]सुरर्षि भेटे दे, जाणुनि निश्चयासि, [15]उपदेश, ।
कुरवाळूनि [16]**म**धुवनीं धाडी **ध्रुव** व्हावयासि [17]सुपदेश. ॥ ७६

य श **हरि**चें गातचि [18]मुनि भेटे **उत्तानपाद**भूपास, ।
'कां व्याकुळ?' म्हणुनि पुसे सांत्वुनि अत्यंतदीनरूपास. ॥ ७७

न मुनि [19]नृप म्हणे, 'रडतों मी [20]अकृप [21]अनादरूनि [22]तोकास.' ।

---

१. प्रखरतर, तीक्ष्णतर. २. सुरुचिवाग्बाण ध्रुवाचे हृदयाला फार टोंचले. (श्लो० १५.) ३. बाहेर संचार करणारा प्राण. 'बहिश्चर प्राण' हें पद **पं**तांचें आवडतें आहे. 'जो द्रोणाचार्यांचा अश्वत्थामा बहिश्चर प्राण' [काव्यसंग्रहग्रंथमाला–आदिपर्व–अ० ९ गी० ५३ पृ० ५२]. ४. केळ. हा कदलीचा दाखला **पं**तांचा आवडता होय. ['परि कांपली बहु भयें हे कुंती जेंवि मारुतें कदली' (शांतिपर्व–अ० १ गी० १८), 'धैर्यें निरोप दे परि कांपे ती मारुतें जशी कदली' (आश्रमवासीपर्व–अ० ६ गी० ६१), 'गोवत्सवधें पावे कंपातें मारुतें जशी कदली' (ब्रह्मोत्तरखंड–अ० ३ गी० ६०), 'त्या वार्तेनें मूर्च्छित पडली सीमंतिनी जशी कदली' (ब्रह्मोत्तरखंड–अ० ८ गी० ३८), 'हें वाक्य त्या सतीतें बहु दुःसह जेंवि वज्र कदलीतें' (सभापर्व–अ० ४ गी० ९२ पृ० ३५), 'परि कांपली सतीची तनु जैसी मंद मारुतें कदली' (विराटपर्व–अ० १ गी० ११९ पृ० २८). अशीं उदाहरणें अन्यत्र ही आहेत.] ५. पदनताला. ६. श्रेष्ठ पद देणारा. ७. आपल्या उत्तम कल्याणाला कारण असा उपदेश. ८. फुंकणी. ९. देवाची पूजा करण्याच्या इच्छेनें. १०. अगा. ११. जें अपत्य तेजस्वी (पराक्रमी, उदारचित्त) तेंच ठळक अपत्य होय. १२. चांगला निवडून जो गदळ राहिला तो. [मोरोपंत–सभापर्व–अ० ५ गी० ६२ पृ० ४४.] १३. मार्गीं. १४. नारद. १५. अध्याय ८ श्लो० ४०-६० पहा. १६. यमुनातीरस्थ उपवनांत. १७. सु+पद+ईश=उत्तम पदाचा धनी. १८. नारदमुनि. (श्लो० ६३.) १९. उत्तानपाद. (अ० ८ श्लो० ६५-६७.) २०. अकरुण, निर्दय. २१. अपमान करून, अनादर करून. २२. बालकास.

मुनि सांगे, 'सुयश करिल [1]सत्पदवीची धरूनि [2]तो कास. ॥ ७८
[3]**मो** ठा महिमा त्याचा, करिल [4]जगत्पति कृपा, नकोचि रडों, ।
सत्वर भेटेल तुला, अतिशोकभरें नृपा! [5]नको चिरडों' ॥ ७९
भ रला **ध्रुव** [6]गुरुदर्शितसद्योगाच्या [7]भरीं असा, राया! ।
कीं सार एक [8]भगवद्ध्यान धरुनि न स्मरे [9]असारा या. ॥ ८०
ग डबडले बहु याच्या [10]प्राणनिरोधें [11]सुरादि चट सारे, ।
विदुरा! प्रपंच होऊं पाहे निश्चेष्ट [12]चित्रपटसा रे! ॥ ८१
व य पांचां वर्षांचें, अतिकोमलकाय नव लहान, [13]पण ।
[14]सामासांतचि मतिचा हरि तो [15]मळ, [16]काय हा लहान [17]पण? ॥ ८२
ते [18]लोकपति [19]प्रभुनें देउनि अभय स्थळासि पाठविले, ।
[20]ज्यांहीं प्राणनिरोधव्याकुळमतिहीं [21]स्वपाद आठविले. ॥ ८३
[22]**वा** तमनोतिगतिकुशळ **गरुड**स्कंधीं चढोनि नाकर्षी ।
हृष्ट कराया प्रभु ये, **ध्रुव**हृदयस्थ स्वमूर्ति आकर्षी. ॥ ८४
सु टतां थान मुखींचें शिशुसा, **ध्रुव** गडबडूनि जों पाहे, ।
तों जो ध्यानीं होता सुखमूर्ति तसाचि तो पुढें आहे. ॥ ८५

---

१. साधुमार्गाची. २. ध्रुव. ३. त्या मुलाचा महिमा मोठा होणारा होता–असा अर्थ. ४. जगन्नाथ, परेश. ५. 'नकोचि रडों–नको चिरडों' हें पंताचें आवडतें यमक आहे. [काव्यसंग्रहग्रंथमाला–मोरोपंत–वनपर्व–अ० २ गी० २२ पृ० १६; आदिपर्व–अ० ९ गी० ३२ पृ० ५६; सभापर्व–अ० ७ गी० ५४ पृ० ६७.] ६. गुरु+दर्शित+सत्+योगाच्या= उपदेशक आचार्य+दाखविलेल्या+उत्तम+योगाच्या=गुरूनें दाखविलेल्या उत्तम योगाच्या भरीं. ७. भरीं भरणें=नादीं लागणें, आसक्त अथवा निमग्न होणें. ८. भगवंताचें ध्यान करण्यासाठीं ध्रुव एका पायावर पर्वताप्रमाणें निश्चळ उभा राहत असे. ९. खोट्या (या संसाराला). १०. प्राणाचा व त्याच्या द्वारांचा निरोध केल्यानें (नाकपुड्या दाबून श्वास कोंडून, विश्वाचें आपल्या स्वरूपीं ऐक्य करून प्राणायाम केल्यामुळें). [श्लोक ८०.] ११.सुरप्रभृति सर्व घाबरून भयकंपित झाले. १२. चित्रितवस्त्रासारखा. १३. परंतु. १४. सहा महिन्यांत. १५. मतिचा (आपल्या बुद्धीचा) मळ (पाप, दुष्ट वासना इत्यादि) तो (ध्रुव) हरि (नाहींसा करी). १६. प्रश्नार्थक अव्यय. १७. प्रतिज्ञा. १८. सर्व लोक लोकपाळांसह (गीति ८१) घाबरून विष्णूला शरण गेले होते. (श्लो० ८०.) त्यांना अभय देऊन विष्णूनें परत पाठविलें. (अ० ८ श्लो० ८२.) १९. विष्णूनें. २०.ज्या लोकपतींनीं स्वपाद (विष्णुपाद). २१. पाद आठवणें=पायांचें स्मरण करणें. हें वर्णन गौरवसूचक आहे. २२. वायु व मन यांला उल्लंघन करणारी जी गति तिजविषयीं कुशल अशा (गरुडाच्या खांद्यावर).

दे वा पाहुनि, हर्षे[1], वर्षे प्रेमाश्रु, आदरें वंदी, ।
स्तुतिरीति कळेना परि वाटे व्हावेंचि **वि**ष्णुचा [2]बंदी. ॥ ८६

वा लमनोरथ पुरवी [3]श्रुतिमयशंखें शिवोनि गल्ल **ह**री, ।
उठवी [4]स्तुतिसूक्ति, जसा [5]अनिल [6]क्षीरार्णवांत [7]सल्लहरी. ॥ ८७

य श करि **ह**रि बाळाचें, त्यासि म्हणे, '[8]सन्मनांत वससील, ।
[9]छत्तिस सहस्र वर्षें राज्य करुनि मत्पदींच बससील.' ॥ ८८

न गरातें **ध्रु**व होउनि सिद्ध, करुनि अतुळ शुद्ध तप, गेला. ।
विदुरा! **ध्रु**वकीर्ति सखी देवांच्या कां न होय [10]अपगेला? ॥ ८९

मो ठा उत्सव नगरीं झाला, मग [11]विषयभोगमत्तातें ।
न [12]सुगति म्हणुनि तप वरुनि दिधलें [13]निजपद तयासि [14]तत्तातें. ॥ ९०

भ वितव्य घडे, वधिला **उ**त्तम मृगयेंत दुष्ट [15]पुण्यजनें, ।
केला **ध्रु**वें बहु [16]परक्षय, [17]दहनक्षय वनीं [18]जसाचि घनें. ॥ ९१

ग जकुळ [19]हरिनें, **ग**रुडें [20]अहिकुळ, [21]परबळ तसें **ध्रु**वें मथिलें, ।
[22]मनुनें [23]पौत्र [24]शमविला, जें [25]भगवद्भक्तयोग्य तें कथिलें. ॥ ९२

---

१. हर्ष पावे. येथें हर्षे, वर्षे, आणि वंदी अशा तीन क्रिया आहेत. यांत कर्ता एक असून त्याचा संबंध (अन्वय) अनेक क्रियांशीं आहे, म्हणून हा **'कारकदीपक'** अलंकार होय. कर्ता एक असून त्या कर्तृकारकाचा संबंध अनेक क्रियांशीं असतो तेव्हां **'कारकदीपक'** अलंकार होतो. [पृष्ठ २३ टीप ४ पहा.] या अलंकाराचीं उदाहरणें:-(१) रचनीचर मधुकर भवकाशकुसुमसंगवंचित भ्रमले, । भ्रमले, मग गुणगंधाकृष्ट प्रभुपादनीरजीं रमले ॥ ८५ ॥ (२) निजशत्रुक्षय करिशिल, मज तरसिल, तारिशील लोकास । सज्जनसह मज्जन तुज होइल सुखसागरीं विशोकास. ॥ १२६ ॥ [मंत्ररामायण-युद्धकांड.] २. स्तुतिपाठक, भाट. ३. वेदमय शंखानें गालाला स्पर्श केला. [अ० ९ श्लो० ४.] ४. स्तुतिरूप उत्तम भाषणें. ५. वायु. ६. क्षीरसागरांत. ७. उत्तम लाट. ८. साधूंच्या मनांत वास करशील= निर्मल साधुजनांचा समागम तुला घडेल. ९. अध्याय ९ श्लो० २२-२५ पहा. १०. गंगेला. ११. विषयभोगानें उन्मत्त झालेल्यास. १२. मुक्ति. १३. आपलें राज्य ध्रुवाला दिलें. (अ० ९ श्लो० ६६-६७.) १४. उत्तानपादानें. १५. यक्षानें. [पुण्यजन='अथ पुण्यजनो यक्षे राक्षसे सज्जनेऽपि च.'] १६. शत्रुनाश. १७. वन्हिशमन, वणव्याचें शमन. १८. ही सुरेख **उपमा** आहे. १९. सिंहानें. २०. सर्पकुळ. २१. शत्रुसैन्य, गुह्यकसैन्य. अलकानगरींत जाऊन अनेक यक्षांचा संहार ध्रुवानें केला. [अ० १० श्लोक ४-११.] २२. मनु हा ध्रुवाचा आजा. २३. नातु. २४. नातवाचा क्रोध शांत करविला. [अ० ११ [illegible]० ६-३५.] २५. क्रोध टाकणें, क्षमा करणें, इत्यादि भगवंताच्या भक्ताला उचि[illegible]

व[1] सुदहि '[2]वैर माग' म्हणे, हरिभक्तिच त्यासि [3]धन्य तो याची, ।
अन्यवराची सुजनीं रुचि, त्याहि [4]स्वर्गीं न अन्यतोयाची. ॥ ९३
ते णें मखक्रियेची [5]पद्धति उपदेशिली जशी संतीं ।
हरिभक्ति साधुसंगति वरिली [6]सुविरक्तिबदरिका [7]अंतीं. ॥ ९४
वा[8] जत गाजत साजत आलें सुविमान, सत्पदीं [9]चढला, ।
कीं प्रथमचि तो गुरुवरदत्तमहामंत्र आदरें पढला. ॥ ९५
सु त [10]उत्कळ [11]सुविरक्त, [12]भ्रमिहि म्हणे, 'या सुखींच वत्स रतो.' ।
मुनिहीं कनिष्ठ जो ध्रुवनंदन केला नृपाळ [10]वत्सर तो. ॥ ९६
दे वब्राह्मणपूजक [13]पंचम वत्सरकुळांत नृप अंग, ।
[14]त्यांला तपासि दवडी [15]मृत्युसुतातनुजवेनखळसंग. ॥ ९७
बा चाळ खळ अधार्मिक [16]शीलाला मृत्युच्याचि अनुसरला, ।
प्रकृति नव्हेचि तयाची [17]बा! जैसी धांव उरगतनु सरला. ॥ ९८
य[18] त्त अधर्मीच म्हणति खळशील कधींहि कवि [19]दुरावेना, ।
श्रमले प्रार्थुनि बोधुनि, [20]मुनि वळविति लेश न विदुरा! वेना. ॥ ९९

---

१. कुबेरहि. [ध्रुव शांत झाल्यावर कुबेर त्याजपाशीं आला व प्रसन्न होऊन म्हणाला.] २. 'तुझ्या मनांत असेल तो वर मजपासून मागून घे' असें कुबेर ध्रुवाला म्हणाला. [अ० १२ श्लो० ७.] ३. तो श्लाघ्यचरित. (ध्रुव.) ४. त्या चातकपक्ष्याचे ठायीं. ५. रीति. ६. उत्तम वैराग्यरूप बदरिकाश्रम. ७. शेवटीं. ८. येथें हें 'अश्वधाटी यमक' आहे. [अलंकारमीमांसा-पृ० ५५.] ९. अध्याय १२ श्लो० ३० पहा. १०. ध्रुवपुत्र. ११. त्यक्तविषयभोग आणि आत्मरत. १२. ध्रुवपत्नी. ही वत्सराची माता आणि उत्कलाची सापत्न माता. १३. पांचवा. (अंग हा वत्सराजाचा पांचवा वंशज होय.) १४. अंगराजा सुशील व साधु होता तरी आपला पुत्र जो वेन त्याच्या दुराचारास कंटाळून घरांतून निघून गेला. १५. मृत्यूची सुता (कन्या) सुनीथा ही अंगराजाची स्त्री आणि वेनराजाची माता. हिचा तनुज (पुत्र) वेन त्याचा दुष्ट समागम. १६. स्वभावाला. १७. बा! (हे विदुरा!) तयाची (त्या वेनराजाची) प्रकृति (स्वभाव, गुण, आचार) सरला (सरळ, नीतियुक्त, साधी, अवक्र) नव्हेचि (उपदेशानें ही सरल, ऋजु, अजिह्म झाली नाहीं) जैसी (ज्याप्रमाणें) उरगतनु (सापाचें शरीर सरळ नसते, वेंटाळें केलेलें असतें अथवा) धांव (सापाची चाल, सापाची चालण्याची गति सरळ नसते). १८. यत्नवान्. १९. दूर होईना. २०. मुनींनीं वेनराजाला उपदेशानें वळविण्याचा यत्न केला, पण तो वळला नाहीं. [अ० १४ श्लो० ७-१२.]

न वळे म्हणुनि ऋषींहीं [1]हुंकारांहींच तो खपविला [2]हो!।
[3]जाणों ते म्हणति, 'महाखलवध ऐकोन तोखें पविला [6]हो.' ॥ १००

मो ठें भूदेवांचें यश कीं जेणें वधू निवेना तें, ।
कर्म करूनि निववितो निजसामर्थ्यें वधूनि **वे**नातें. ॥ १०१

भ लतेंचि करुनि केलें यश ऋषिंनीं तरति कवि जया कथुनी, ।
कीं [10]मूर्त दोष बाहिर काढियला हो! [11]शवोरुतें मथुनी. ॥ १०२

ग जशुंडादंडोपम भुजदंडद्वयहि मग तिहीं मथिलें, ।
वर [12]मिथुन काढिलें हो! तें श्री**ह**रिरूप हें जना कथिलें. ॥ १०३

[13]**व** दले, 'महायशस्वी पुरुष [14]**पृ**थु, स्त्रीस नाम या **अ**र्ची, ।
साक्षाल्लक्ष्मी देवी हे या देवा [15]अनामया [16]अर्ची. ॥ १०४

ते [17]धरणीसुर **पृ**थुला अभिषेचुनि बसविती पदीं विधिनें, ।

---

१. वेनराजा मुनींच्या शापानें गतप्राण झाला. [अ० १३ श्लो० १९, अ० १४ श्लो० १४.] २. अहो! ३. हें **उत्प्रेक्षा**नामक अलंकाराचें उदाहरण आहे. ४. संतोष. ५. वज्राला. ६. होऊ. ७. ब्राह्मणांचें. [पतीचा वध करून त्याच्या साध्वी पत्नीचें समाधान करणें ही गोष्ट अद्भुत होय. परंतु ज्याचें यश मोठें असतें तेच अद्भुत गोष्टी करूं शकतात. भूदेवांनीं (ब्राह्मणांनीं) या प्रसंगीं असें अद्भुत कार्य केलें–त्यांनीं वेनराजाचा वध करून त्याची वधू जी पृथ्वी तिला निवविली (सुखी केली)–असें वर्णन आहे. भूदेवांचें (द्विजांचें) यश मोठें (लोकोत्तर होतें) कीं (कारण कीं) जेणें (ज्या कृत्यानें–पतिवधानें) वधू निवेना (स्त्री समाधान पावणार नाहीं, शांत होणार नाहीं) तें कर्म करूनि (म्हणजे) निजसामर्थ्यें वेनातें वधूनि निववितो (त्या वेनाच्या वधूला–पृथ्वीला संतोष देती–वेनाच्या मरणानें पृथ्वीला सुख झालें.) पृथ्वी ही राजाची पत्नी होय ही गोष्ट संस्कृत वाङ्मयांत सुप्रसिद्ध आहे. ८. पृथ्वी. ९. शांत होईना, खल पीडामुक्त होईना. १०. मूर्तिमान्. ११. प्रेताच्या मांडीतें. ऋषींनीं भलतेंचि करुनि यश केलें! जया (ज्या भलत्याच कृत्याला) कथुनी (ज्या भलत्याच गोष्टीच्या कथनानें–कीर्तनानें) कवि (पंडितजन, साधु) तरति (मुक्तीला जातात.) कीं (भलतेंच कृत्य केलें असें म्हणण्याचें कारण) शवोरुतें (शवाच्या–प्रेताच्या उरुतें–मांड्यांतें) मथुनी (मथन करून) मूर्त (मूर्तिमान् देहधारी) दोष (वेनराजाच्या शरीरांतील पाप–पृथुरूप वत्स) बाहेर (वेनराजाच्या शरीरांतून बाहेर) काढियला. 'दोष' या शब्दाचे दोन अर्थ आहेत:–(१) वत्स, वासरूं (२) विकार, न्यूनता, व्यंग. [राजाचा वध करणें, प्रेताचें मथन करणें, दोष बाहेर काढणें हीं कृत्यें स्तुत्य नव्हेत. अशीं भलतींच कृत्यें मोठ्यांसच शोभतात आणि यशस्कर होतात, इतकेंच नव्हे तर त्या भलत्याच कृत्यांची कीर्ति गाणारेही तरतात–असें येथें सांगितलें आहे. प्रभुलीला दुर्ज्ञेय आणि गहन होय.] १२. जोडा. १३. मुनि वदले–असा अन्वय. १४. आपली कीर्ति प्रथित करणारा म्हणून 'पृथु' असें नांव. [अ० १५ श्लो० ४.] १५. आरोग्यरूपा. १६. अर्चन करी, पूजी. १७. ब्राह्मण. (अ० १५ श्लो० १०-२०.)

त्या नृपतिनें सुखविले लोक सकळ, [1]कृपण जन जसा [2]निधिनें. ॥ १०५
वा तें [3]वाळव्यजनें, [4]दंड **य**में अर्पिला [5]धरापाळा, ।
इंद्रें किरीट दिधलें **ध**र्मेंही धर्मरूपिणी माळा. ॥ १०६
सु [6]रमणि खड्ग, **सु**दर्शन [7]हरि, **वि**धि दे [8]ब्रह्ममय तया कवच, ।
[9]हैमं वरासन **ध**नदहि, बहु विस्तर भीरु [10]मी वदें न [11]वच. ॥ १०७
दे ती आशीराशी प्रेमभरें पूर्ण जे ऋषि तपांनीं, ।
त्याच्या **पृ**थु अतिसादरधी **गं**गेच्या जसा तृषित [12]पानीं. ॥ १०८
वा निति बंदी [13]मागध सूत तयातें भविष्य जाणून, ।
ज्यापाशीं उत्तम जें देती तें वस्तु यास आणून. ॥ १०९
य श धर्मन्यायें जें **पृ**थु मेळविणार तेंचि ते वदले, ।
सत्कविभाषित सत्यचि बा! **वि**दुरा! नच कधींहि तें वदले. ॥ ११०
न रपति शिरीं उडाया लागे जों काय कीर्ति[14]चामर तों, ।
येउनि म्हणति, '[15]प्रभुजी! आम्ही अन्नाविणें प्रजा मरतों.' ॥ १११
मो हरि इतुकेंहि जसें [16]रज दुःसह होय लोचना [17]पृथुला, ।
[18]श्रितदुःख तसें ज्याच्या हृदया सोसेल गुरु कसें [19]**पृ**थुला? ॥ ११२
भ रला रागें भूवरि, चढुनि रथीं, चाप शर धरी राजा, ।
[20]शरणागतावनीं जो म्हणता, 'जातेंसि तरि शरीरा! जा.' ॥ ११३

---

१. अधन, दरिद्री. २. द्रव्यानें. ३. वाळ्याचे पंखे. ४. शासनदंड. ५. नृप पृथुला. (श्लो० १५.) ६. शंकर. ७. विष्णु. ८. वेदमय (कवच). ९. सुवर्णाचें. १०. मी=मोरोपंतकवि. पंतांच्या विस्तारभीरुत्वाचें हें उदाहरण आहे. [निबंधमाला–अंक ५१ पृ० २५-३१ पहा. पंतांनीं आपल्यास ग्रंथविस्तार पसंत नाहीं असे उद्गार अनेक ठिकाणीं स्पष्टपणें काढिले आहेत. ११. वचन. १२. प्राशनीं. १३. अध्याय १५ श्लो० २० पहा. मागध म्हणजे राजाचा स्तुतिपाठक. वेनराजाच्या दक्षिणबाहुमंथनापासून पृथुराजा झाला, त्याचे सूत आणि मागध या नांवाचे दोन स्तुतिपाठक होते. तेव्हांपासून राजाच्या स्तुतिपाठकांस 'सूत' अथवा 'मागध' असें म्हणतात; म्हणजे हीं प्रथमतः विशेषनामें होतीं व कालांतरानें सामान्यनामें झालीं. १४. कीर्तिरूप चंवरी. (चामर=चमर नांवाचे मृग असतात, त्यांच्या शेंपटाच्या चंवऱ्या (चामरें) करतात. यांच्या शेपटांस केसांचा झुबका अथवा गोंडा असतो, तो चंवरी करण्यास फार उपयुक्त असतो.) १५. अध्याय १७ श्लो० ९-११ पहा. १६. धूळ. १७. मोठ्या. १८. आश्रितांचें दुःख. १९. ज्याच्या (ज्या पृथुराजाच्या) हृदया मोहरी इतकेंही अल्प (प्रजेचें) दुःख दुःसह होतसे, त्या पृथुला गुरु (दुःख–मोठें दुःख–प्रजेला झालेलें मोठें दुःख) कसें सोसेल? २०. शरण आलेल्याच्या रक्षणीं.

ग जवजली भू धाकें, गोरूप धरुनि पळावया लागे, ।
मागें **पृथु**हि म्हणे, 'तुज दंडिन शासन कळावयाला गे!' ॥ ११४
व सुधा मृगी, **पृथु** मृगयु[1], वाटे किति ती पळोनि चुकविल या? ।
नेवूं पाहे अनलस तीस, अविद्येसि जेंवि सुकवि लया. ॥ ११५
ते भू सुबहु भ्रमली[2], श्रमली, मग राहिली उभी, 'मातें ।
स्त्रीतें कां वधिसि?' म्हणे विनवी त्या[3] भिउनियां सुभीमातें[4]. ॥ ११६
'**वां** सरुवाहि[5] न पाजी' भूप म्हणे 'खाय यवस[6] आंबोण[7], ।
ती दंडार्हाचि अगे! लावावें मांदळ्यासि[8] कां बोणें[9]? ॥ ११७
सु जल्या अन्नाकरितां त्या आल्या मजकडे प्रजा मिळुन, ।
विधिसृष्टौषधिबीजें[10] दुष्टे! गेलीस तूं कसी गिळुन?' ॥ ११८
दे वातें **भू**मि म्हणे, 'भक्षित होते संदोषधी[11] हो! त्यां[12] ।
म्यां यज्ञार्थचि[13] गिळिल्या, **वि**धिसृष्टा ज्या सदोषधी[14] होत्या. ॥ ११९
वा गवितां उदरीं त्या ओषधि गेल्या जिरोनि[15] बहुकाळें, ।
मत्क्षीर दुहुनि ध्यावें त्वां कल्पुनि वत्स पात्र[16] जनपाळें. ॥ १२०
य त असा आहे, मज तोयें[17] टिकाया करा परि समाना[18], ।
प्रभुजी[19]! कार्यकर अधिक सदुपाया या करा परिस माना.' ॥ १२१
न रपति वत्स करि मनुसि[20] निजपाणिस[21] पात्र[22] होय दुहिता[23], तें ।

---

१. लुब्धक. २. हें '**कारकदीपका**'चें उदाहरण आहे. ३. पृथुराजातें. ४. अतिभयंकरातें. ५. वासरालाही. ६. तृण. ७. गाई इत्यादिकांस खावयास घालितात तें. ८. मोठ्या मृदंगासि. ९. गव्हांची भिजलेली कणिक. १०. ब्रह्मदेवानें उत्पन्न केलेल्या औषधींचीं बीजें. ११. दोषयुक्त बुद्धि ज्यांची ते. १२. यज्ञयाग न करणारे दुष्ट अधम ब्रह्मदेवानें केलेल्या औषधींचा उपभोग घेऊं लागले. [अ० १८ श्लो० ५.] १३. यज्ञादि पुढें चालविण्यास साधन आपल्यापाशीं असावें म्हणून. १४. उत्तम औषधी. १५. क्षीण होऊन गेल्या. १६. दूध काढण्याचें पात्र. १७. इंद्रानें वृष्टि केली असतां उदक माझ्या पाठीवर सर्वत्र राहावें म्हणून मला सारखी करा. [अ० १८ श्लो० ११.] १८. सारखी. १९. प्रभुजी! (हे पृथुराज!) या (गी० १२०-१२१ यांत सांगितलेल्या) सदुपाया (उत्तम उपायाला) करा (करून पहा, हाच सफल होईल). [हा सदुपाय] अधिक कार्यकर [आहे.] (हाच उपाय गीति ११३ यांतील उपायापेक्षां खरोखर अधिक फायदेशीर आहे). [या सदुपाया] परिस (लोखंडाचें सुवर्ण करणारा पाषाण, सकलमनोरथपूरक प्रसार) माना (समजा). २०. मनूला वत्स केलें. २१. आपल्या हातास दोहनपात्र केलें. २२. स्वतः दोहनकर्ता झाला. २३. दोहनकर्ता.

सकलौषधिमय[1] पय भूधेनूचें घे प्रजैकसुहितातें[2]. ॥ १२२

मो ठ्या उत्साहें मग अन्यहि[3] घेती यथेष्ट मोहून, ।

वश केली **पृथु**नें जी **भू** धेनु तिच्या पयासि दोहून. ॥ १२३

भ क्तिमती **भू**देवी श्री**पृथु**नें द्रवुनि[4] मानिली दुहिता[5], ।

केली चापाग्रें मग नग[6] सारुनि चुरुनि ती समा[7] सुहिता. ॥ १२४

ग[8] रिमादिमदें वैन्यें[9] नगरग्रामादिकल्पना[10] नव्या[11], ।

केली तेंव्हांपासुनि पावे अकुतोभय[12] प्रजा भव्या[13]. ॥ १२५

ब हु हर्षें **पृथु** शतहयमखदीक्षा[14] घे, समाप्त नवनवती[15], ।

झालें कौतुक दावी, जी तच्छूद्धासमृद्धि[16] नवनव[17] ती. ॥ १२६

ते मख[18] अत्यद्भुत कीं ज्यांत प्रत्यक्ष **विष्णु**[19] **विधि** शर्व[20], ।

त्या उत्सवांत एका **इंद्रा**वांचूनि हर्षले सर्व. ॥ १२७

वा[21] ह **म**हेंद्रें चरमीं[22] हयमेधीं तस्करें तसा हरिला[23], ।

अत्रि[24] विलोकुनि धाडी **पृथु**पुत्रा सोडवावया हरिला[25]. ॥ १२८

---

१. सकल ओषधिरूप दूध काढून घेता झाला. [अ० १८ श्लो० १२.] २. प्रजांच्याच एका हितातें. ३. ऋषि, देवगण, दैत्यगण, गंधर्व, अप्सरा इत्यादि. [यांनीं आपआपल्यांतील मुख्य व्यक्तीला वत्स करून त्याच्या द्वारानें आपआपल्यास इष्ट असें दुग्ध गोधेनूचें दोहन करून काढून घेतलें. अ० १८ श्लो० २६.] ४. सदय होऊन, दयार्द्र होऊन. ५. कन्या. ६. पर्वत (चुरून टाकून). ७. सारखी. ८. गरिमा सिद्धींचें स्थान. 'अणिमा महिमा चैव गरिमा लघिमा तथा । प्राप्तिः प्राकाम्यमीशित्वं वशित्वं चाष्ट सिद्धयः ॥' बारीक होणें, मोठें होणें ज्याच्या योगानें सिद्ध ब्रह्मांडांत मावत नाहीं, जड होणें, हलकें होणें, करांगुळीच्या टोंकानें चंद्रादिक घेणें, इच्छेचा भंग न होणें, प्रभुत्व, ज्याच्या योगानें स्थावरही आज्ञाधारक होतात, आणि ज्याच्या योगानें सिद्ध जमिनींत सुद्धां बुडी मारून वर निघूं शकतो, ह्याप्रमाणें आठ सिद्धि आहेत, त्यांच्या मदानें. ९. वेनपुत्रानें. १०. गांव, पुर, नगर, दुर्ग, घोष, व्रज, इत्यादि रचना. ११. नूतना. १२. सर्वत्र निर्भय, कोठूनही भय नाहीं अशी. १३. कल्याणातें. १४. शंभर अश्वमेध करण्याची दीक्षा. [ही वेळपर्यंत इंद्रानें मात्र शंभर यज्ञ केले होते व यास्तवच त्याला 'शतक्रतु' ही संज्ञा आहे.] १५. नव्याण्णव. १६. त्या पृथूची भक्तिसंपदा. १७. नवेंनवें. १८. यज्ञ. १९. अध्याय १९ श्लो० ४-५ पहा. २०. महादेव. २१. घोडा. २२. शेवटींच्या. २३. हरण केला. [अ० १९ श्लो० ११.] २४. अश्व घेऊन इंद्र आकाशमार्गानें धांवत चालला आहे असें पाहून अत्रिमुनीनें अश्व सोडविण्यासाठीं पृथूच्या मुलाला पाठविलें. [आपणावर कोणी शस्त्र टाकूं नये व आपलें रक्षण करावें म्हणून इंद्रानें दुसऱ्यास

'**सु**[1] रपति भस्मजटाधर होय' [2]म्हणे **पृथु**कुमार 'हा धर्म' ।
परतुनि ये, **अ**त्रि म्हणे, 'इंद्रचि तो, उचित [3]दस्युवधकर्म.' ॥ १२९
दे वेंद्रावरि गेला **पृ**थुसुत, तों गुप्त होय [4]मघवा जी! ।
[5]विजिताश्व नाम पावे पृथुनंदन आणितांचि मग [6]वाजी. ॥ १३०
[7]**वा** जी पुनरपि, निर्मुनि [8]तम, हरितां, कथुनि आणवी **अ**त्री; ।
[9]हरिस भयप्रद **पृ**थुसुत, अहिस जसा **वि**[10]ष्णुरथ [11]महापत्री. ॥ १३१
य मसम [12]असकृन्निजहयहरणें दीक्षित नरेंद्र तो खवळे, ।
वधितचि होता [9]अरितें, परि द्याया [13]वारित्यांसि तो[14]खें वळे. ॥ १३२
[15]**न** गरिपुसि सिद्ध झाले दहनीं [16]द्विजें [17]तप्तकाय होमाया, ।
सद्धर्मघातकर जो त्याची साधूंसि काय हो! [18]माया? ॥ १३३

श्रम उत्पन्न होईल असा छद्मवेश घेतला होता, त्यामुळें इंद्राचें खरें रूप लोपलें होतें.] २५. अश्वाला. [हरि=अश्व.]

१. इंद्र. २. पृथुपुत्र म्हणालाः–'इंद्राच्या मस्तकावर जटाभार आहे व शरीर भस्मानें आच्छादिलेलें आहे. हा धर्मात्मा आहे.' [अध्याय १९ श्लोक १४.] ३. चोराचा नाश हें कर्म. ४. इंद्र. मघवा='मह्यते मह् पूजायाम् । श्वन्नुक्षन्पूषन् इत्यादिना कनिनि मघवन्निति निपातितः' इति रायमुकुटेन. ५. विजित (जिंकिला) अश्व (घोडा) ज्यानें तो (पृथुपुत्र). [श्लोक १८.] ६. घोडा. ७. [इंद्रानें] तम (अंधकार) निर्मुनि (उत्पन्न करून) पुनरपि (पुनः एकवार) वाजी (घोडा, यज्ञीय अश्व) हरितां (नेला असतां, अश्वाला घेऊन आकाशांतून पळत जात असतां) कथुनि (अत्रिपुत्राला आज्ञा देऊन) अत्रि (अत्रिमुनि) आणवी (अश्वाला परत आणविता झाला). ८. मोह, अंधकार. ९. इंद्राला. १०. गरुड. ११. मोठा पक्षी. (गरुड.) १२. वारंवार केलेलें जें आपल्या घोड्याचें हरण तेणेंकरून. १३. निवारण करणाऱ्या ऋत्विजांला. [अध्याय १९ श्लोक २७.] १४. संतोष. १५. इंद्रासि. १६. ब्राह्मण (सुंदरीवृत्तेन सोदाहरणा द्विजशब्दाऽर्थास् त्रयः–'द्विजराजशिरोमणेर् भिदां द्विजराजध्वजशालिनश् च यः । कलयेन् मनसापि, पात्यतेऽन्तकभृत्यैः खलु तद्द्विजावलिः ॥१॥ इति कोशाऽवतंसः । म्हणजे द्विज विप्र ब्राह्मण त्यांचा राजा चंद्र हा आहे शिरोमणि शिरोभूषण ज्याचें असा महादेव, आणि द्विज अंडजपक्षी त्यांचा राजा गरुड हाच ध्वज चिन्ह त्यानें शाली शोभणारा असा महाविष्णु, ह्या दोघांची भिदा भेद जो कोणी (वैष्णवादि) मनानें सुद्धां करितो, त्याची द्विज दंत दांत त्यांची आवलि पंक्ति बत्तिशी अंतक यम त्याचे भृत्य चाकर ह्यांनीं खरोखर पाडली जाते. म्हणजे हरिहर हे परस्पर एकरूप आहेत, त्यांचा भेद मानूं नये–हें तात्पर्य. [नामलिंगानुशासन–पृ० १०५.] १७. तप्त (संतापलेले) काय (देह) ज्यांचे असे (द्विज). १८. हें प्रश्नालंकाराचें उदाहरण आहे.

मो ठा [1]अनर्थ तो, परि [2]परिहरि [3]हरिनाभिकमलभव, नमुनी, ।
प्रभुची आज्ञा मानिति, कीं ते [4]श्रुतिसंपदमलभवन मुनी. ॥ १३४
भ स्मजटाधर आधीं [5]खट्वांगकपालधर पुन्हा झाला, ।
[6]पाखंड निर्मिलें तें अनुसरले मूढ जीव ते याला. ॥ १३५
‘**[7]गँ** लिताभिमान [8]पुण्यश्लोक खरा, शांति [9]सुरभि मानावी, ।
अनहंकारा साधु ज्ञाता, [10]अज्ञान दुरभिमाना [11]वी.’ ॥ १३६
व र्णुनि [12]सच्छील [13]असें, समजावी **वि**धिहि [14]हरिहि [15]वैन्यातें, ।
आग्रह सोडुनि, जोडुनि [16]हरिसहि [17]करें, [18]पावला न दैन्यातें. ॥ १३७
ते [19]पृथुशक्र [20]स्वांश प्रभुनें स्वकरें धरूनि [21]भेटविले, ।
अभिमान शमविला ज्या वातें दोघे दवाग्नि [22]पेटविले. ॥ १३८
वा त्सल्यें **वि**ष्णु म्हणे, ‘वत्सा ! **वै**न्या ! [23]अभीष्ट वर माग, ।
मी स्वाश्रितसाधूंचे करिता परिपूर्ण [24]काम [25]परमाग.’ ॥ १३९
[26]सु ज्ञशतस्तुतसद्गुण तो मागे [27]भक्तिच कवि वरदा त्या, ।

---

१. इंद्राचें हवन. २. टाळी, निवारी. (इंद्रवध टाळण्यासाठीं ब्रह्मदेव राजाला म्हणालाः— शंभर यज्ञांत तुझा एक यज्ञ जरी कमी आहे तरी तुझी कीर्ति इंद्रापेक्षांही अधिक विस्तृत होईल. जितके यज्ञ केलेस तितके पुरे. अ० १९ श्लो० ३१-३२.) ३. हरि+नाभि+कमल+भव=विष्णु+बेंबी+सरोज+उत्पत्ति, जन्म=विष्णूच्या नाभिकमलापासून उत्पन्न झालेला. (ब्रह्मा.) ४. श्रुति+संपद्+अमल+भवन=वेद+संपत्ति+विमल+सदन=श्रुतीचें शुद्ध मंदिर, वेदसंपत्तीचें शुद्ध गृह (असे मुनी). ५. खट्वांग आणि कपाल हीं आयुधें धारण करणारा. (शिव.) ६. धर्मासारखा दिसणारा अधर्ममार्ग, कुमार्ग, नास्तिकमत. ‘पाशब्देन त्रयीधर्मः पा रक्षण इति स्मृतेः । तं खंडयंति ये तर्कैस्ते **पाखंडा** इति स्मृताः ॥’. [श्रीमच्छंकरदिग्विजयटीका—सर्ग १ श्लो० ३३ पृ० १६.] ७. गलित+अभिमान=नष्ट+गर्व. ८. शुद्धयशस्क. पवित्र आहे श्लोक (कीर्ति) ज्याचा तो—विमलयशा. पुण्यश्लोक हें नळाचें प्रसिद्ध नांव आहेः—‘पुण्यश्लोको नलो राजा पुण्यश्लोको युधिष्ठिरः । पुण्यश्लोका च वैदेही पुण्यश्लोको जनार्दनः ॥’. ९. कामधेनु. १०. मूर्ख. ११. प्रसवे. येथें ‘वी’ हें क्रियापद ‘ज्ञाता साधु अनहंकारा वी’ असें पुनः घेतलें पाहिजे. १२. चांगला स्वभाव. १३. एकशें छत्तीसाव्या आर्येत वर्णिल्याप्रमाणें वर्णन करून. १४. विष्णु. १५. पृथुराजातें. १६. इंद्रासहि. १७. हस्त. १८. पृथु दैन्यातें न पावला. १९. पृथु आणि इंद्र. २०. आपले अंशावतार. २१. भेटवून मित्र केले. २२. कलहास प्रवृत्त केले. २३. वांछित. २४. इच्छा, मनोरथ. २५. परम+अग=श्रेष्ठ+वृक्ष=मोठा वृक्ष, कल्पवृक्ष. २६. शेंकडों सुज्ञांनीं स्तविले उत्तम गुण ज्याचे तो. (पृथु.) २७. तुझ्या कथा पुष्कळ ऐकण्यासाठीं दहा सहस्र कान दे व तुझी भक्ति दे असा वर मागितला. [तो पृथुराजा] स्वासक्ति वहु न दावी (आपली

देवासचि घे, दावी न बहु स्वासक्ति चकवि[1] वरदाला. ॥ १४०
देव विसरला निघतां जैसा पृथु आपणास बा! विसरे, ।
तदुदश्रुदृष्टि[2] म्हणती न उचंबळल्याहि[3] आलि[4] बाविस[5] रे! ॥ १४१
वा[6] सवसखा तया मग भेटोनि सनत्कुमार[7] तद्रुचितें[8] ।
पुरवि सदुपदेशें, जें प्रिय करि येऊनि देवसद्रुचितें[9]. ॥ १४२
यं[10] जुनि यथाविधि[11] यत्नें, प्रभुच्या प्रीत्यर्थ सज्जनां भजुनी, ।
सज्जुनि सुवैराग्यें निजगति पावे, तनु[12] तपोवनीं त्यजुनी. ॥ १४३
न[13] गसानुस्थानीं ती देवी[14] अर्चि स्वयें रची सुचिता[15], ।
उचिता गति सहगमनें[16] पावे, सुर वर्णिती तिची सुचिता[17]. ॥ १४४
मो रें, न वधुनि अहि[18], मणि ध्यावा, तैसेंचि जिणुनियां हरितें[19], ।

आसक्ति–प्रीति–इतर वस्तूंवर बहु आहे असें न दाखवी, त्यानें देवापाशीं दुसरें कांहीं मागितलें नाहीं) देवासचि घे, (देवाचीच प्राप्ति करून घेता झाला–मला देवच पाहिजे, अन्य कांहीं नको असें म्हणाला.) वरदाला (वरदाता जो विष्णु त्याला) चकवि (चकित करी, भुलवी. या राजानें देवप्राप्ति आणि देवभक्ति हाच मात्र वर मागून घेतला हें पाहून आश्चर्यानें विष्णुही चकित झाला.) [अ० २० श्लो० २४.]

१. भुलवी, मोही. २. त्याची रोदनोदकयुक्त दृष्टि. ३. रे! (विदुरा!) उचंबळल्याहि बाविस (जींतून पाण्याचा ओघ आपोआप निघून बाहेर वाहतो अशा विहिरीला देखील, जीमधील पाणी मोठ्या जोरानें बाहेर वाहत आहे अशा विहिरीला) तदुदश्रु दृष्टि (त्या पृथुराजाची उदकपूर्ण दृष्टि, त्या पृथुनृपाची अश्रूदकानें भरलेली दृष्टि) आलि (सखी) न म्हणती (ही आपल्यासमान आहे असें म्हणतीना) अश्रुप्रवाह. विहिरींतून निघणाऱ्या जलप्रवाहापेक्षां मोठा होता, त्या दोहोंचें साम्य नव्हतें. विहीर ही आपल्यास सखी शोभेल असें उदश्रु दृष्टीनें कधींही म्हटलें नसतें. ४. सखी. ५. विहिरीस. ६. इंद्राचा सखा जो पृथु त्याला. ७. सनत्कुमारानें राजाला दर्शन देऊन त्याचे इष्ट मनोरथ परिपूर्ण केले. [अ० २१ श्लो० ८-६३.] ८. तत्+रुचितें=त्याच्या+इच्छेतें, मनोरथातें. ९. देव+सत्+रुचितें=अमर+उत्तम+कांतीतें=देवासारिखें उत्तम तेज ज्याचें असा जो पृथु राजा त्यातें. १०. पूजा करून. ११. यथाशास्त्र. १२. देह. [अ० २३ श्लो० १४-१८.] १३. नग–सानुस्थानीं=[मंदार] पर्वताच्या शिखराचे ठायीं. १४. देवी=राणी. 'देवी' कृताभिषेकायां तेजनीस्पृक्कयोरऽपि' इति हेमचंद्र. १५. उत्तम चिता. [अ० २३ श्लो० २१.] १६. तिनें स्नान करून व यथोचित क्रिया करून अग्नींत प्रवेश केला. [श्लो० २२.] १७. शुद्धता. यमकासाठीं स व श हे सवर्ण समजावे. सुचिता=शुचिता. १८. अहि (सर्प) न वधुनि (न मारतां, त्याचा प्राण न घेतां) मणि (त्या सर्पाच्या मस्तकावरील मणि. हा मणि सापाला फार प्रिय असतो अशी समजूत आहे.) मोरें (मयूरपक्ष्यानें. मयूर हे सर्पनाशक आहेत.)

'अंतर्धान' [1]पृथुतनुज घे, नाम तसेंचि त्या यशें धरि तें. ॥ १४५
भ व्यगुणा त्या **अंतर्धाना** [2]**पृथुभूस** [3]पुत्र जो झाला, ।
नाम **हविर्धान** तया, [4]सत्रीं [5]**श्री** तो त्यजी, तिला भ्याला. ॥ १४६
[6]**ग** द्यांहीं [7]पद्यांहीं ज्याच्या कवि गाति अद्भुता [8]धामा, ।
[9]पुत्र **हविर्धानाचा** विश्वप्रख्यात [10]बर्हिषन्नामा. ॥ १४७
[11]**वं** रशीला त्या झालें नाम **प्रा**चीनबर्हि हें दुसरें, ।
तद्वीर्यें [12]दश सुत [13]बहुरुचिर, जसें [14]पद्म पोषिलें [15]सुसरें. ॥ १४८
ते प्राचेतस त्यां करि तात 'करा सृष्टि' या [16]निदेशातें, ।
गेले आज्ञा घेउनि, तप संपादावया [17]विदेशातें. ॥ १४९
[18]**वा** रिधिसम सुसरोवर जाउनि पश्चिमदिशेंत पाहोनी, ।
[19]गांधर्व राजसुत ते ऐकति तीरीं मुहूर्त राहोनी. ॥ १५०
सु कृती ते [20]रोमांचित झाले जों आयकोनि गांधर्व, ।
तों त्या सरांतुनि निघुनि दुर्लभ [21]दर्शन तयांसि दे [22]शर्व. ॥ १५१
[23]**दे** शिकवर **शिव** [24]योगादेशाख्य स्तोत्र करि, यदा शिकवी, ।

घ्यावा (ग्रहण करावा) तैसेंचि (तशाच प्रकारें) हरितें (इंद्रातें) जिणुनियां (जिंकून) पृथुतनुज (पृथुराजाचा पुत्र विजिताश्व) अंतर्धान (गुप्त होण्याची विद्या, अंतर्हित होण्याची कला) घे (घेता झाला) [आणि] त्या यशें (इंद्रानें नेलेल्या अश्वाला परत आणिला, इंद्रावर जय मिळविला आणि अंतर्धान विद्या संपादिली या यशानें) तें नाम (अंतर्धान हें नांव) तसेंचि (लागलेंच, इंद्रास जिंकिल्यावर थोड्या वेळानेंच) धरि (धारण करी.) १९. इंद्रातें.

१. विजिताश्व. यानें अंतर्धान हें नांव घेतलें. याला इंद्रापासून अंतर्धानगति (गुप्त होण्याची विद्या) मिळाली असल्यामुळें त्याला अंतर्धान असें नांव पडलें. [अ० २४ श्लो० ३.] २. पृथुपुत्रास. ३. विजिताश्वाला नभस्वती नामक पत्नीच्या उदरीं हविर्धान नामक पुत्र झाला. [अ० २४ श्लो० ६.] ४. पुष्कळ दिवस चालणाऱ्या यज्ञांत. ५. ऐश्वर्य. ६. केवळ पदेंच ज्यांमध्यें पुष्कळ अशीं जीं काव्यें त्यांहीं (पंक्तिकवनानें). ७. श्लोकादि कवितांनीं. ८. तेजा. ९. बर्हिषत्. हा कर्मकांड आणि योगाभ्यास ह्यांत निष्णात असून मोठा यज्ञकर्ता होता. १०. बर्हिषत् या नांवाचा. ११. उत्तमस्वभावा. १२. प्राचीनबर्हिला शतद्रुति नामक पत्नीच्या उदरीं 'प्रचेतस' नांवाचे दहा पुत्र झाले [श्लो० १३.] १३. फार सुंदर, अत्यंत तेजःपुंज. १४. कमल. १५. चांगल्या सरोवरानें. यांतील **उपमा** बहु रुचिर आहे. १६. आज्ञेतें. १७. परदेशातें, दूरच्या प्रदेशातें. १८. समुद्रासारिखें. १९. गायन. २०. रोम+अंचित=केश+कंटकित=पुलकित. २१. अ० २४ श्लो० २२-२६ पहा. २२. महादेव. २३. गुरूंत श्रेष्ठ. देशिक+वर=गुरु+श्रेष्ठ. २४. योगादेश आहे आख्या (नाम) ज्यांची तें. [अ० २४ श्लो० ७१.]

'श्री**वि**ष्णुवशीकरणचि' म्हणती अनुभवुनि गुण [१]जयासि कवी. ॥ १९२
[२]**वा** रींत [३]अयुतवर्षें ते **प्रा**चेतस करीत तप वसले; ।
श्री**शि**वकथितस्तोत्रें स्तवित मनीं ध्यात **वि**ष्णुला बसले. ॥ १९३
[४]**थें** ज्ञांच्याहि बहु [५]भरीं भरला **प्रा**चीनबर्हि जो त्यातें ।
श्री**ना**रदमुनि भेटे [६]तत्व न समजोनि बद्ध होत्यातें. ॥ १९४
[७]**ना** रनाथातें सांगे [८]अध्यात्म [९]परोक्षरीतिनें चित्र, ।
कीं तो **भ**गवान् साक्षात् [१०]संसारध्वांतनाशिता [११]मित्र. ॥ १९५
[१२]**मो** ह हराया कथिलें [१३]चित्र [१४]**पु**रंजनचरित्र भूपातें, ।
[१५]त्या [१६]हंसें निज[१७]**मा**नस पावाया त्यजुनि दे[१८]हकूपातें. ॥ १९६
[१९]**भ** वगति समजे, [२०]स्वपदीं सुत ठेवी, ज्यासि गाति [२१]गीर्वाण, ।
[२२]**क**पिलाश्रमीं करुनि तप, पावे **प्रा**चीनबर्हि [२३]गीर्वाण. ॥ १९७
ग रुडध्वज वरद प्रभु भेटे **प्रा**चेतसांसि बहु हर्षें, ।
निववी निजदृष्टिसुधावृष्टीनें लोटतां अयुत वर्षें. ॥ १९८
[२४]**व** रदेश [२५]तयां सांगे, 'पूर्वी होता तपस्विवर [२६]**कं**डू, ।
भिउनि [२७]हरि म्हणे 'त्यातें [२८]**प्र**म्लोचे! तव कटाक्षशर [२९]कंडू. ॥ १९९
ते **प्र**म्लोचा त्यातें मोहुनि मग [३०]**कं**डुवीर्यजा कन्या ।

---

१. ज्या स्तोत्राला. २. उदकांत. ३. दहा सहस्र वर्षें. ४. कर्ममार्गांत फार आसक्त झाला होता. [अ० २५ श्लो० ३.] ५. भरीं भरणें=नादीं लागणें, आसक्त होणें. ६. खरें तत्व न समजल्यामुळें बद्ध होणारा जो प्राचीनबर्हि त्यातें. ७. नारद प्राचीनबर्हि राजाला सांगे. ८. आत्मज्ञान. ९. अप्रत्यक्षपणानें. १०. संसाररूप ध्वांत (अंधकार) नाशिता (नाशकर्ता). ११. सूर्य. १२. अज्ञान, भ्रम. १३. आश्चर्यकारक, अद्भुत. १४. पुरंजनचरित हें एक लांबलचक जीवावर रूपक आहे. पुरंजन म्हणजे शरीरें उत्पन्न करणारा जीव. मूळांत अध्याय २५-२९ यांत ही रूपककथा आहे. १५. त्या प्राचीनबर्हिराजानें. १५. त्या प्राचीनबर्हिरूप हंसानें आपल्या देहरूप कूपातें टाकून निजमानसास पोंचावें म्हणून नारदानें त्याला पुरंजनचरित कथिलें. १७. आपलें मानससरोवर. १८. देहविहिरीतें. १९. संसारगति मनांत आणिली, जाणिली. २०. आपल्या राज्यपदीं. २१. देव. २२. अध्याय २९ श्लो० ८१ पहा. २३. मुक्ति. २४. वरद+ईश=वर देणारा+स्वामी=वर देणारांचा स्वामी. २५. त्या प्राचेतसांला. [अ० ३० श्लो० १२.] २६. नामविशेष. (ऋषी.) २७. इंद्र. २८. नामविशेष. (हे देवांगने.) २९. कंडणें=कांडणें, कुटणें, ठेंचणें. [आपल्या कटाक्षरूप बाणांनीं कुटून टाक, विद्ध कर.] ३०. कंडुमुनीच्या रेतापासून झालेली (कन्या मारीषा) हिला 'वार्क्षी' असें अन्य नाम होतें.

टाकुनि गेली, तेव्हां ती वृक्षांहींच पाळिली धन्या. ॥ १६०
वा त्सल्यें [१]सोम तिला [२]क्षुत्क्षामा पाहतांच कळवळला, ।
[३]त्यजिलें अपत्य पाहुनि, करुणेनें साधुतेसि [४]कळ वळला. ॥ १६१
सु रस अमृत कन्येच्या वदनीं देऊनि [५]देशिनी ओती, ।
'भार्या तुम्हां [६]दहांची माझ्या आज्ञेंकरूनि यां [७]हो ती. ॥ १६२
दे ह सुगुण शुचि तुमचा तैसाचि असे शुचि स्वभाव तिचा, ।
अतिचातुर्यनिधि [८]सती, सुत होइल तो सखा [९]शचीपतिचा.' ॥ १६३
वा णी सफळा केली, स्तवुनि प्रभुतें, [१०]पदांसि लागोनी, ।
वा! घेतली मग तिहीं [११]सर्ववरश्रेष्ठ [१२]भक्ति मागोनी. ॥ १६४
य श गाया [१३]रुचि देउनि [१४]सद्गतिचें [१५]पुसुनि जाय माहेर, ।
मग त्या पुण्य सरांतुनि सिद्ध निघाले दहाहि बाहेर. ॥ १६५
[१६]**न** गनिकरव्याप्त क्षितितळ पाहुनि कोपले [१७]नगांवरि [१८]ते, ।
झाले [१९]स्वमुखभवानिलदहनाहीं भस्म [२०]भूरुहां करिते. ॥ १६६
[२१]**मो** ळ सुका जेंवि [२२]दवें, तरु जळतां तेंवि [२३]रुडनलें ओले, ।
त्यांसि [२४]**वि**धि, 'तुम्हीं पाळक भूप न [२५]उच्छेदकर' असें बोले. ॥ १६७
भ य पावुनि **वि**धिवचनें, तरु देती त्यांसि **मा**रिषा कन्या, ।

---

१. ओषधीचा राजा चंद्र यानें अमृत स्रवणारी तर्जनी त्या कन्येच्या मुखांत घातली. २. क्षुधेनें कृश अशी. ३. त्यजिलें अपत्य पाहुनि (टाकिलेलें असें निराश्रित मूल पाहतांच) करुणेनें (करुणा येऊन) साधुतेसि (साधुभावाकडे, दयाळपणाकडे) कळ (कल, मनाचा कल, मनांचा झोंक) वळला (झाला. मनाचा कल दयेकडे झाला, दयेकडे मन वळलें, मनांत दया आली). [येथें 'ल' आणि 'क' यांत अभेद मानून पंचाक्षरी अंत्ययमक साधण्यासाठीं 'कल' शब्द 'कळ' असा लिहिला आहे. ४. मधुर, मनोहर. ५. देशिनी=तर्जिनी. (आंगठ्याजवळचें बोट.) ६. दहा प्राचेतसबंधूंची. ७. होऊ. ८. मारिषा. ९. शचीचा पति जो इंद्र त्याचा. या सुताचें नांव प्राचेतस दक्ष होतें. १०. पदास लागणें=पायां पडणें, शरण येणें, नमस्कार घालणें. ११. सकळ वरांत श्रेष्ठ जो वर तो. (भक्तिवर.) १२. अ० ३० श्लो० ४३ पहा. १३. आवड, प्रीति, गोडी. १४. मुक्तीचें (माहेर)=विष्णु. येथें **पर्या**-योक्त अलंकार जाणावा. १५. निरोप घेऊन. १६. वृक्षांच्या समुदायें व्याप्त असें पृथ्वी-तळ. १७. वृक्षांवर. १८. प्राचेतस. १९. आपल्या मुखापासून झालेला वायु आणि अग्नी तेणेंकरून. २०. वृक्षांला. २१. तृणविशेष. २२. वणव्यानें. २३. रुष्+अनलें= रोष+अग्नीनें=क्रोधाग्नीनें. २४. पितामहानें त्या क्रोधाविष्ट प्राचेतसांचें सांत्वन केलें. [अ० ३० श्लो० ४६.] २५. विनाश करणारे.

ग[1] ळपतित राज्यभार स्वीकारी स्वगुरुगुरुवचन[2] मानी,[3] ।
साधु प्रियव्रत करिल आग्रह कां? वरिल गुरुवच न मानी[4]. ॥ ४
वं[5] चनकरा पौत्रातें[6] बहु मानुनि विधि निजस्थळा गेला, ।
उपरमला[7] मनु दैवें, गुरुराज्यभरासि[8] सुत[9] उभा[10] केला. ॥ ५
ते जोनिधि प्रियव्रत राजा झाला नृपा! तया भार्या ।
बर्हिष्मती सती, ती बहु निपुणा विश्वकर्मजा[11] आर्या. ॥ ६
वां[12] सरमणिसे तत्सुत दश[13] आग्नीध्रादि, त्यांत जन्म तिवे[14] ।
भगवद्भजनीं वेंचिति[15], विषयांचें नामही न तन्मति[16] वे. ॥ ७
सु त दुसरीचे[17] उत्तम तामस रैवत अशीं तयां नामें, ।
मन्वंतराधिपति ते पुरुषाकृति विष्णुचींच तीं धामें[18]. ॥ ८
दे सुख जनासि बहु तो एकादशअर्बुदाब्द[19] राज्य करी, ।
अर्ध[20] प्रकाशितो रवि यास्तव आपण तसेंचि तेज धरी. ॥ ९
वा[21]! सप्तवार[22] फिरतां झाले हे सिंधु वर्तमान खरें, ।

---

१. गळ्यामध्यें पडलेला. २. स्व+गुरु+गुरु+वचन=निज+पिता+पिता+आज्ञावचन=आपल्या गुरूच्या गुरूचें वचन, आपल्या पितामहाचें वचन. ३. स्वीकारी. ४. अभिमानी. ५. आज्ञानुसारी, आज्ञावचनपालका. ६. नातू जो प्रियव्रत त्यातें. ७. शांत झाला, मरण पावला. ८. गुरु+राज्य–भरासि=मोठें–राज्य+ओझ्याला=राज्याचा मोठा बोजा वाहण्यासाठीं. ९. प्रियव्रत. १०. उत्पन्न केला, सिद्ध केला. ११. विश्वकर्मा नामक प्रजापतीची कन्या. १२. सूर्यासारखे. १३. आग्नीध्र, इध्मनिव्ह, यज्ञबाहु, महावीर, हिरण्यरेता, घृतपृष्ठ, सवन, मेधातिथि, वीतिहोत्र, आणि कवि असे दहा पुत्र. १४. महावीर, सवन आणि कवि हे विरक्त होते. १५. जन्म वेंचणें=आयुष्य घालविणें, काळ घालवून जीवितसाफल्य करणें. १६. त्या तिघांची मति विषयसुखांत रक्त नव्हती. यांनीं दारपरिग्रहण केलें नव्हतें. १७. प्रियव्रताच्या दुसऱ्या स्त्रीचें नांव आढळत नाहीं. १८. स्थानें. १९. अकरा अर्बुदें वर्षें; अर्बुद=दहा कोटि वर्षें. २०. रवि (सूर्य) अर्ध (पृथ्वीचा अर्ध भाग) प्रकाशितो (आपल्या प्रकाशानें उज्वलित करतो) यास्तव (म्हणून अर्थातच अर्धा भाग काळोखांत राहतो, त्या अर्धभागावर प्रकाश पाडण्यासाठीं) आपण (स्वतः प्रियव्रत राजा) तसेंचि तेज धरी (उर्वरित अर्धभाग प्रकाशित करणारें असें तेज धारण करिता झाला. प्रियव्रतानें सूर्यप्रकाशाप्रमाणें आपल्या तेजानें प्रकाश पाडून कोणासच रात्र होऊं दिली नाहीं. असें करण्यासाठीं त्याला सूर्याच्या अनुरोधानें फिरावें लागलें हें उघड आहे.) २१. वा. २२. सातदां. आपल्या एकचक्री रथांत असें सातदां फिरल्यामुळें सात खंदक उत्पन्न झाले, तेच सप्तसमुद्र होत.

तद्रथचक्राग्रें जे या भूमितळांत गर्त[1] मान खरें[2]. ॥ १०
[3]**ये** नामें **क्षा**रोदक इक्षुरसोदक **सु**रोदक **घृ**तोदँ[4], ।
क्षीरोदक आणिक **द**धिमंडोदक सातवाहि **शु**द्धोद. ॥ ११

न वल [5]द्वीपहि झाले [6]ते **जंबू प्लक्ष शा**ल्मली नामें, ।
कुशहि **क्रौं**चहि **शा**कहि **पु**ष्कर हीं सर्व सुप्रजाधामें[7]. ॥ १२
मो ठें पटु [8]प्रतापी [9]**आ**ग्नीध्रप्रमुख [10]वीरमौलिमणी, ।
केले **जं**बूप्रमुखद्वीपांचे ते स्वपुत्र सप्त धणी[11]. ॥ १३
भ व्यगुणा **शु**क्राला दिधली **ऊ**र्जस्वती सुता धन्या[12], ।
बा! जीस **दे**वयानी म्हणती ती सन्मता तिची[13] कन्या. ॥ १४
[14]**ग** रळकटु विषय मानुनि, [15]शवसम **ब**र्हिष्मतीस सोडूनी, ।
पावे **प्रि**यव्रत [16]सुगति [17]**ना**रदमुनिगुरुसि हात जोडूनी. ॥ १५
[18]**व** ध्वर्थी **आ**ग्नीध्र प्रार्थी **वि**धिला करूनि [19]तप भारी, ।
[20] तो [21]**पू**र्वचित्ति [22]यांप्रति धाडुनि दे [23]अप्सरा [24]वैरी नारी. ॥ १६

---

१. खळगे, खंदक. २. तीक्ष्णें. (तद्रथचक्राग्रें या शब्दाचें विशेषण.) ३. ज्या सिंधूचीं नांवें. [अ० १.] ४. उद=उदक=पाणी. 'उदक' शब्दाला उद असा आदेश होतो. ५. द्वीप=बेट. ['द्वीपोऽस्त्रियामंतरीपम्' इत्यमरः। द्विर्गता अंतर्गता वा आपोऽत्र. द्वीप शब्द अस्त्री आहे. द्विप=हत्ती.] ६. रथचक्राच्या धांवेनें केलेले खाडे. ७. सु+प्रजा+धामें=उत्तम+लोक+स्थानें=उत्तम प्रजेचीं वसतिस्थानें. ८. पराक्रमी. ९. आग्नीध्र, इध्मजिव्ह, यज्ञबाहु, हिरण्यरेता, धृतपृष्ठ, मेधातिथि, आणि वीतिहोत्र. १०. शूरशिरोभूषण. ११. स्वामी. (अ० १ श्लो० ३३.) १२. श्लाघ्यजीविता. १३. ऊर्जस्वतीची. १४. गरलकटु=विष+तिखट=विषाप्रमाणें तिखट, असुखकारक. १५. प्रेतासमान. (अ० १ श्लो० ३८.) १६. मुक्ति. १७. नारदमुनीच्या उपदेशाला अनुसरून प्रियव्रतानें सर्वसंगपरित्याग केला. (अ० १ श्लो० ३६.) १८. वधू+अर्थी=पत्नी+इच्छु,=स्त्रीची इच्छा करणारा. (आपल्यास पुत्र व्हावा म्हणून स्त्रीची इच्छा करणारा.) १९. आग्नीध्रानें मंदारपर्वतावर एकाग्रचित्तानें ब्रह्मदेवाची आराधना करून तपश्चर्या केली. २०. विधि. २१. हें अप्सरेचें नांव. २२. आग्नीध्राकडे. २३. अप्सरा ह्या समुद्रमंथनकाळीं अप म्हणजे उदक यापासून उत्पन्न झाल्या:–'अप्सु निमर्थनादेव रसात्तस्माद्वरस्त्रियः। उत्पेतुर्मनुजश्रेष्ठ तस्मादप्सरसोऽभवन् ॥'. ह्या गंधर्वांगना असून स्वर्वेश्या आहेत. ह्या इंद्राच्या दासी असून त्याला कोणाच्या तपाचें भय वाटलें म्हणजे तपोभंग करण्याच्या कामीं मोठ्या कुशल, म्हणून त्याच्या आज्ञेनें ह्याच जावयाच्या आणि कार्यसिद्धि करून परत यावयाच्या. उर्वशी, मेनका, रंभा, घृताची, तिलोत्तमा, सुकेशी, मंजुघोषा, इत्यादि प्रमुख सुरवेश्या होत. बाणकवीनें यांचीं चवदा कुळें असल्याविषयींचा उल्लेख कादंबरी ग्रंथांत केला आहे. अ-

ते अप्सरा विलोकुनि **आग्नीध्र** [1]स्त्रैणमणि जसा भोळा, ।
बोले [2]तीस 'मुनि' म्हणे, त्या [3]रसखंडीमधील हा तोळा. ॥ १७

[4]वा णी **आग्नीध्राची**, जेंवि [5]सुरा, **पूर्वचित्तिला** [6]मोही, ।
बा ! [7]तदधरासवरसें [8]वर्षायुत मोह पावला तोही. ॥ १८

[9]सु त नव झाले **ना**भिप्रमुख तिला, [10]त्यांसि जाय सोडून, ।
[11]ते [12]जंबुद्वीपीं नव [13]वर्षपति [14]पितृप्रसाद जोडून. ॥ १९

दे उनि [15]सवांत [16]दर्शन तारी [17]द्विज संत, कां न [18]नाभि तरे ? ।

प्सरा आपल्या नृत्यविलसितानें विजांस लाज आणतात असें त्याचें वर्णन संस्कृत ग्रंथांतून आढळतें. २४. श्रेष्ठा. (अ० २ श्लो० ३.)

१. स्त्रैण+मणि=बाईलवेडा, स्त्रीलंपट+प्रमुख, शिरोरत्न=अतिशयित स्त्रीविधेय. २. त्या पूर्वचित्ति देवांगनेला 'अहो ! मुनिराज !' असें म्हणाला. [अ० २ श्लो० ६-१६ यांत आग्नीध्राचें भाषण आहे.] ३. त्या आग्नीध्राच्या मधुर भाषणरसाच्या खंडींतील हा थोडासा तोळाभर रस येथें दाखविला आहे. ४. आग्नीध्र ललनानुनयविशारद असून त्याची वाणी रसाळ आणि विदग्ध होती. ५. मद्य. ६. अप्सरेचें मन वळवी. ७. त्या पूर्वचित्तीच्या अधरामृतरूप मद्याच्या रसानें. ८. अनेक वर्षें, हजारों लाखों वर्षें. ९. नाभि, किंपुरुष, हरिवर्ष, इलावृत्त, रम्यक, हिरण्मय, कुरु, भद्राश्व आणि केतुमाल असे पूर्वचित्तीला प्रतिवर्षी एक याप्रमाणें नऊ पुत्र झाले. (अ० २ श्लो० १९-२०.) या नऊ भावांनीं मेरूच्या नऊ कन्यांशीं विवाह केले. त्या मेरुकन्यांचीं नांवें:—मरुदेवी, प्रतिरूपा, उग्रदंष्ट्री, लता, रम्या, श्यामा, नारी, भद्रा आणि देववीति. [अ० २ श्लो० २३.] १०. [ती पूर्वचित्ति] त्यांसि (त्या नऊ पुत्रांला) सोडून [ब्रह्मदेवाच्या सेवेसाठीं त्याच्याजवळ पुनः परत] जाय (गेली). ११. ते नऊ पुत्र. १२. जंबुद्वीपाचे नऊ विभाग करून त्यांत ते नऊ पुत्र राहिले. १३. खंडाचे स्वामी (झाले). १४. बापाची कृपा संपादून. १५. यज्ञांत. १६. [नाभिराजाला मरुदेवीच्या पोटीं पुत्र होईना म्हणून त्यानें यज्ञपुरुषाच्या प्रीत्यर्थ यज्ञ आरंभिला], त्या सवांत (यज्ञांत) [प्रभु] दर्शन देउनि संत द्विज (ऋत्विज, सदस्य, गृहपति इत्यादि साधु ब्राह्मणाला) तारी (तारण करी, संसारमुक्त करी). १७. ('द्विज'शब्दाचे अनेक अर्थ आहेत:—'द्विजः स्याद्ब्राह्मणक्षत्रवैश्यदंतांडजेषु ना' (मेदिनी); म्ह० ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, दांत आणि पक्षी ह्या सर्वांस द्विवार जन्म आहे. 'जन्मना जायते शूद्रः संस्कारैर्द्विज उच्यते,' अथवा 'मातुर्यदग्रे जायंते द्वितीयं मौंजिबंधनात् । ब्राह्मणक्षत्रियविशस्तस्मादेते द्विजाः स्मृताः ॥;' म्ह० ब्राह्मण क्षत्रिय वैश्य यांचें मातेपासून जन्म होऊन पुनः मुंज झाल्यानें दुसरें जन्म होतें म्हणून तें द्विज होतें. दांत, पक्षी, यांचें द्विवार जन्म स्पष्टच आहे.) १८. ज्यास (ज्या नाभिराजाला) प्रभु (स्वतः ईश्वर) सुत (पुत्र झाला) [तो] नाभि कां न तरे ?=नाभिराजा कां तरणार नाहीं ? अवश्य तरेल—असें उत्तर. ज्या (ज्या प्रभुला) स्मरतां (ज्या ऋषभ देवाचें स्मरण केलें असतां) भितरे (भिणारे पुरुष, भित्र्या स्वभावाचे जन) अंतकानना (अंत-

प्रभु सुत ज्यास, न देखति ज्या स्मरतां अंतकानना भितरे. ॥ २०
वा ळे[1] बहु पुष्टि धरी मग, कीं ती अमृत मूर्त सेवी तें, ।
सुख अमृतघन लतेतें प्रभु[2] सुत[3] दे तेंवि **मे**रुदेवीतें. ॥ २१
यँ तिपतिपति[4] **ऋ**षभ प्रभु **ना**भितनय पुण्यकीर्ति तो प्रौज्य[5], ।
प्रथमचि महिस निर्वृवि[6], मग देइल सुख काय न करितां राज्य? ॥ २२
नँ गतनयेसि[7] **शि**व वरी, **ऋ**षभ जयंतीस[8] तेंवि, सुत[9] तीस ।
शत **भ**रतमुख, जयांची[10] पंक्ति हंसे मणिसुरद्रुसुततीस[11]. ॥ २३
मो ठा योगी **भ**रत प्रभु, कविमुख[12] भागवतहि[13] तव धन्य, ।
द्विज[14] एकाशीति, नवति[15] मुख्य[16], कुशावर्त[17] आदि नव अन्य. ॥ २४
भ गवान् **ऋ**षभ ब्रह्मावर्ती[18] पुत्रांसि सूक्ति[19] आयकवी, ।

काच्या=यमाच्या, आनना=मुखाला) न देखति (मृत्यूचें तोंड पाहत नाहींत, जन्ममृत्युमुक्त होतात) [असा] प्रभु ज्यास सुत (पुत्र) [आहे] तो नाभिराजा कां तरणार नाहीं? अवश्य तरेल.

१. [नाभिराजभार्या आणि ऋषभमाता मरुदेवी] वाळे (पुत्रप्राप्तीपूर्वी सुकून गेली होती, दुःखानें शुष्क झाली होती), [ती] मग पुष्टि धरी, (ऋषभदेवानें तिच्या उदरीं जन्म घेतल्यानंतर आनंदाचे सुखातें पावून पुष्ट झाली) कीं (कारण कीं) ती तें (ऋषभरूप) मूर्त (प्रत्यक्ष) अमृत सेवी (अमृतच प्याली). अमृतघन (मेघ) लतेतें (वेलीला) [जेंवी] सुख [दे] तेंवि प्रभुसुत (ऋषभदेव हा पुत्र) मेरुदेवीतें सुख दे. २. प्रभूनें स्वतः मरुदेवीच्या पोटीं अंशावतार घेतला. ३. या सुताचें नांव ऋषभ. (अ० ४ श्लो० २.) ४. ऋषिपतींचा स्वामी. ५. पुष्कळ. ६. संतुष्ट करी, सुख देई. ७. नग+तनयेस=पर्वत, हिमालय+कन्येला=पर्वताच्या मुलीला=पार्वतीला. ८. जयंती=ऋषभाची स्त्री. ९. त्या जयंतीला भरतप्रमुख शंभर पुत्र झाले. भरत हा वडील मुलगा. १०. ज्या मुलांची पंक्ति (माला, रांग) हंसे (खालीं पाहायास लावी, लाजवी). ११. रत्नें व कल्पवृक्ष यांच्या उत्तम विस्तारास. १२. कवि आहे मुख (प्रमुख) ज्यांत असे नव (नऊ मुलगे) धन्य (श्लाघ्यचरित असे) भागवतहि (भगवद्भक्त होते). १३. कवि, हरि, अंतरिक्ष, प्रबुद्ध, पिप्पलायन, द्रुमिल, चमस व करभाजन हे ऋषभाचे नऊ मुलगे भागवत होते. [अ० ४ श्लो० ११-१२.] १४. भरताचे कनिष्ठ बंधु. एकाशीति (एक्यायशीं) द्विज (ब्राह्मण–पित्याची आज्ञा मानण्यासाठीं कर्मठ ब्राह्मण होऊन राहिले.) १५. नव्वद. १६. याप्रमाणें नव्वद मुख्य पुत्र होत. १७. कुशावर्त, इलावर्त, ब्रह्मवर्त, मलय, केतु, भद्रसेन, इंद्रस्पृक्, विदर्भ आणि कीटक हे इतर नऊ भरताचे बंधु होत. १८. सरस्वती आणि दृषद्वती या दोन नद्यांच्या मध्यभागींचा जो देवनिर्मित देश त्याला ब्रह्मावर्त म्हणतात असें मनुस्मृतींत आहे. [मनुस्मृति–अध्याय २ श्लो० १७.] ऋषभ देवानें ब्रह्मावर्ती जमलेल्या सर्व प्रजांच्या समक्ष आपल्या पुत्रांला उपदेश केला. [अ० ४ श्लो० १९.] १९. उत्तम उपदेश. हा उपदेश अध्याय ५ श्लोक १-२७ यांत आहे.

[1]जीतें सेवुनि म्हणती, '[2]देवांची काय [3]अधिक गाय ?' कवी. ॥ २५

ग[4]लदश्रुस्नाता त्या **भ**रता देवूनि [5]राज्य, [6]उर्वरितें, ।
देहें [7]भ्रमे, यश नुरवि [8]ज्याचें [9]मोहा अशाहि [10]उर्वरितें. ॥ २६

व[11]नजनसमवृत्ति **ऋ**षभ योगीश्वर, साम्य [12]शुष्कपर्णा या, ।
[13]यच्चर्या निंदाया कुमतिस सुमतिसहि हेतु वर्णाया. ॥ २७

ते[14]णें त्यजिला मळ जो तद्वातें [15]सुरभि देश दश गांवें, ।
सर्वसुगंधाहुनि बहु बहु [16]ज्याचें [17]सुरसिकेंहि यश [18]गावें. ॥ २८

वात तसाचि भ्रमत भ्रमत प्रभु [19]योगिराज तो जाय, ।
[20]अश्मकवळ धरुनि मुखीं [21]कर्णाटकवनदवीं त्यजी [22]काय. ॥ २९

---

१. जीतें (ज्या सूक्तीला) सेवुनि (ऐकुनी) कवि (पंडितजन) म्हणती (म्हणतात)–देवांची गाय (सुरभि, कामधेनु) [ह्या सूक्तीहून] अधिक [आहे] काय ? [अर्थात् ऋषभाच्या सूक्तीहून कामधेनु अधिक नाहीं–असा भाव.] २. 'देवांची गाय' हें **'पर्यायोक्त'**चें उदाहरण आहे. ह्या अलंकाराला इंग्रजींत Periphrasis असें म्हणतात. ३. हें उत्तरार्ध **'अधिक'** नामक अलंकाराचें उदाहरण होय. ४. गलत्+अश्रुस्नात=स्रवणाऱ्या रोदनोदकानें स्नान केलेला. ५. भरताला राज्याभिषेक करून. ६. शेष राहिलेल्यानें. ७. उर्वरितें देहें भ्रमे=शिल्लक राहिलेली वस्तु देह एवढी मात्र बरोबर घेऊन तो ब्रह्मवर्तातून बाहेर निघून भ्रमे (फिरत असे). [अध्याय ५ श्लो० २८.] ८. ज्याचें (ज्या ऋषभाचें) यश (उत्तम कीर्ति) मोहा अशाहि (मोहासारख्या) उर्वरितें (उरु+अरितें=मोठ्या+शत्रूतें) नुरवि (नाहींसा करी, ऋषभाच्या यशानें मोहासारख्या जबर शत्रूला नष्ट केलें). ९. मोह हा सहा शत्रूंपैकीं एक आहे. १०. उरु+अरि=मोठ्या शत्रूतें. ११. अरण्यांतील जनासारखी वृत्ति (वर्तणूक) ज्याची तो, वनचरवृत्ति. ऋषभानें अजगराचें व्रत स्वीकारलें होतें. (अ० ५ श्लो० ३२.) १२. शुष्कपर्णा (सुकलेल्या पानाला वारा नेईल तिकडे जाणाऱ्या पानाला) या (ऋषभ योगीश्वराचें) साम्य (तुलना) [होय]. वारा नेईल तिकडे जसें शुष्कपर्ण जातें तसें ऋषभाचें देह प्रारब्धरूप वारा जिकडे नेईल तिकडे गेलें. १३. यच्चर्या (ज्या ऋषभाची चर्या, वृत्ति) कुमतिस निंदाया हेतु (कुजनांला निंदा करण्यास कारण) [झाली], सुमतिसहि (सुजनांला) वर्णाया (स्तवाया, स्तुति करण्यास) हेतु (कारण झाली. याच्या आचरणावरून कुजन याची निंदा करीत व सुजन याची स्तुति करीत). १४. त्याच्या विष्ठेला इतका सुवास येत असे कीं तिच्या संसर्गानें वाहणाऱ्या वायूनें दहा योजनें प्रदेश सुगंधानें भरून गेला होता. (अ० ५ श्लो० ३३.) १५. सुगंधयुक्त. १६. ज्या मळाचें (यश). १७. रसिकवर पुरुषानें. १८. स्तवावें. १९. ऋषभ. २०. पाषाणरूप ग्रास. २१. कर्नाटक देशांत कुटक पर्वतावर भ्रमण करीत असतां तेथील अरण्यांत भयंकर वणवा उत्पन्न होऊन त्यांत ऋषभाच्या शरीराचें भस्म झालें. (अ० ६ श्लो० ८.) २२. देह.

सु मति ऋषभचर्येचें जाणुनियां तत्व सर्वही तरला, ।
[1]अर्हन्नृपादि [2]जड जन नरकीं पाखंडकल्पनें भरला. ॥ ३०
दे व **भ**रत जो याचे गुण [3]सुखविश्रामहेतुमंच जनीं, ।
वरि **वि**[4]श्वरूपदुहिता, ती प्रसवे पंच [5]पुत्र **पं**चजनी. ॥ ३१
वा गवुनि सुखें धर्मन्यायपथें स्वप्रजा [6]अवनिपाळ, ।
स्वरत **भ**रत राज्य करी तो वर्षायुतसहस्रमित काळ. ॥ ३२
य[7] ज्ञ यथाविधि करुनि, [8]स्व**सु**मतिमुखनंदनासि [9]भूदाय ।
वांटुनि देवूनि, हरिक्षेत्रीं [10]**पुं**लहाश्रमींचि तो जाय. ॥ ३३
न[11] द्युदकीं [12]स्नान करुनि तीरीं जप करित बैसला होता, ।
[13]हरिरवभीतमृगीच्या पाहे [14]पतिता [15]मृतांबका [16]पोता. ॥ ३४
मो हें त्या **भ**रतानें [17]मृतमातृक [18]बाळ पाळिला [19]सुचिर, ।
[20]शुचिरक्षणार्ह फारचि आवडला पुत्रसाचि तो [21]रुचिर. ॥ ३५
भ रत तयाच्या [22]विरहें तळमळला बहु, म्हणे, 'स्वहरिणा मी ।
हतभाग्य कधीं पाहिन? किंबहुना मृगचि होय [23]परिणामीं.' ॥ ३६

---

१. अर्हत् नामक राजा इत्यादि. २. मूर्ख लोक (ऋषभ देवाच्या आचरणाचें तत्व न जाणणारा जन). ३. सुखानें विश्रांति घेण्याचे मंचक (पलंग). ४. विश्वरूपाची कन्या पंचजनी. (अ० ७ श्लोक १.) ५. यांचीं नांवें:–सुमति, राष्ट्रभृत्, सुदर्शन, आवरण, आणि धूम्रकेतु. ६. भरत राजा. ७. अनेक लहान मोठे याग. ८. आपल्या सुमतिप्रभृति पुत्रांला. ९. पृथ्वीरूप पितृधन. १०. अध्याय ७ श्लो० ८ पहा. ११. नदी+उदकीं. १२. गंडकी अथवा चक्रनदी नामक नदीच्या उदकांत स्नान करून जप करीत नदीतीरीं बसला होता. (अ० ८ श्लो० १-१०.) १३. हरि+रव+भीत+मृगीच्या=सिंह+शब्द+त्रस्त+हरिणीच्या=सिंहाच्या शब्दाला भ्यालेली जी हरिणी तिच्या. १४. गर्भाशयांतून (हरिणीनें एकाएकीं उडी मारल्यामुळें) पडलेल्या (पोता). १५. मृत (मरण पावली) अंबका (माता) ज्याची अशा. १६. बालका. १७. मृत (आहे) माता (आई) ज्याची तो (शावक). उडी मारतांच हरिणी दरींत पडून मरण पावली. (अ० ८ श्लो० ६.) १८. नदींत प्रवाहाबरोबर वाहत जाणारें पाडस. १९. पुष्कळ काळपर्यंत राजानें त्या पाडसाला आपल्या आश्रमांत ठेवून पाळिलें. २०. शुद्ध आणि रक्षण करण्यास योग्य. २१. सुंदर. २२. वियोगानें. एका प्रसंगीं हा मृगशावक दिसेनासा झाला तेव्हां भरतानें फार शोक केला (अ० ८ श्लो० ११-२६) २३. परिणामीं (अखेरीस, अंतकाळीं) किंबहुना (फार काय सांगावें) [मी] मृगचि होय (मृगाच्या रूपानें पुनर्जन्म पावेन).

ग तिविच्युतहि हरिभजक जातिस्मर **भ**रत मृगपणीं झाला, ।
कालंजराहुनि पुन्हा धांवुनि पुलहाश्रमासि तो आला. ॥ ३७
व पु वाळविलें तेथें शुष्कचि तृणपर्ण मात्र भक्षूनी, ।
तीर्थांत सोडिलें, फळ काय तसें पशुशरीर रक्षूनी ? ॥ ३८
ते हरिणतनु त्यजितां पांवे सुब्राह्मणालयीं जनुतें, ।
होती हरिप्रसादें स्मृति चुचकारीत धरुनियां हनुतें. ॥ ३९
वां डववरास पुत्र ज्येष्ठस्त्रीचे स्वतुल्य नव होते, ।
मिथुन कनिष्ठस्त्रीचें, त्यांत पुरुष **भ**रत खाय तो गोते. ॥ ४०
सु त सन्मुनिचा झाला, भ्याला संगासि फार, कीं फसला, ।

---

१. हरिभजनमार्गापासून सुटला असाही. २. हरिभक्त. [मरणसमयीं जो भाव मनांत असतो तोच पुढें दुसऱ्या जन्मीं प्राप्त होतो. या नियमास अनुसरून भरत राजाला हरिणयोनि प्राप्त झाली. मरणाच्या वेळीं राजाच्या मनानें हरिणाचाच अभिनिवेश धरला होता व राजा हरिणासह या लोकाचा त्याग करून गेला, त्याची पूर्वजन्मस्मृति नष्ट झाली नाहीं, असें वर्णन आहे. अ० ८ श्लो० २७-२८.] ३. पूर्वजन्माचें स्मरण करणारा. पूर्वजन्मांतील गोष्टीचें स्मरण असतें असें कित्येक प्राचीन तत्वज्ञांचें म्हणणें आहे:–'तच्चेतसा स्मरति नूनमबोधपूर्वं भावस्थिराणि जननांतरसौहृदानि [अभिज्ञानशाकुंतल–अंक ५ श्लो० २ पृ० १५२], 'मनो हि जन्मांतरसंगतिज्ञम्','जो अन्योन्यसमागमक्रम नरा जन्मांतरींही घडे। त्याचें ज्ञान समस्त इंद्रियगणीं होतें मना रोकडें. ॥' [रघुवंश–सर्ग ७ श्लो० १५.] ४. मृगाचा जन्म प्राप्त झाला त्या स्थितींत. ५. पर्वतविशेष त्याहून, कालंजरनामक पर्वतापासून, (अ० ८ श्लो० ३०.) ६. पुलह ऋषीच्या आश्रमीं पुनः परत आला. ७. [त्या मृगानें] वपु (शरीर) वाळविलें (क्षीण केलें). [या मृगाला आतां कोणाचाही सहवास इष्ट नव्हता, तो एकाकीच फिरे; पानें, गवत व वेली खाऊन निर्वाह चालवून मृत्यूची वाट पाहत होता]. ८. तीर्थोदकांत आकंठ बसून मृगदेहाचा त्याग केला. (अ० ८ श्लो० ३१.) ९. मृगदेह राखून फळ (लाभ) काय? १०. ते हरिणतनु (तो हरिणदेह) त्यजितां (टाकिला असतां) [तो मृगदेहधारी भरत] सुब्राह्मणालयीं (एका उत्तम द्विजाच्या घरीं) जनुतें पावे (जन्मातें पावला, जन्मास आला). [या समयीं एका अंगिर:प्रवरोत्पन्न ब्राह्मणाच्या कनिष्ठ भार्येच्या पोटीं हा मृग जन्मास आला. या द्विजाच्या पहिल्या बायकोस नऊ पुत्र होते, व दुसरीस एक मुलगा व एक मुलगी अशीं दोन अपत्यें होतीं. हा मुलगा महाभगवद्भक्त राजर्षि भरताचा अवतार होय. अ० ९ श्लो० १-२.] ११. जन्मातें. १२. पूर्वजन्मसंस्कारस्मृति. १३. हनवटीतें. १४. ब्राह्मणश्रेष्ठास. १५. बापासारखे मोठे विद्वान्, शांत, सहनशील, विनयसंपन्न असे. १६. मुलगा व मुलगी. १७. गोते खाणें=दुःख, हानि, आपत्ति सोसणें. (जेनूं काम तेने थाय, बिजा करे ते गोता खाय.) १८. उत्तम द्विजाचा. १९. या जन्मामध्यें देखील हा बंधुजनांच्या समागमास विटला होता, कोणाशीं प्रेम ठेविलें तर आपला घात होईल अशी त्याला भीति वाटे. (अ० ९ श्लो० ३.) मनुष्यांच्या संगाला फार भ्याला होता.

वसला [1]नग होउनि '[2]जडभरत' [3]बळें [4]बाळपंक्तिला बसला. ॥ ४१
दे[5] वीचे [6]वर्ण [7]न धरि घोकवितां [8]चारमास [9]चोवीस, ।
तो वीसहि नुच्चारी, भरत [10]म्हणे, 'तूं मनींच होवीस.' ॥ ४२
बा प [11]अलब्धमनोरथ वृद्ध गृहींच त्यजूनि [12]तनु जाय, ।
माय सहगमन [13]करि, तरि न म्हणेचि मुखेंकरूनि [14]जड 'हाय!' ॥ ४३
य त करुनि [15]पढवुनि ते नवहि भ्राते भले बहु श्रमले, ।
जडपण तें सोंग[16] असें, कोणीहि न समजले, जन भ्रमले. ॥ ४४
न [17]म्हणे साधु असाधु स्व पर, [18]करी कर्म [19]भलतसें, खाय, ।
मणि जेंवि [20]रजें [21]त्याचा सुबहुमळें दिव्य झांकला [22]काय. ॥ ४५
[23]**मो** टा परि कोंडाही खाउनि, त्याच्या सुखा नसे तोटा, ।
[24]तो टाकिला निजजनें; सुटला [25]जो संग सर्वथा खोटा. ॥ ४६

---

१. पर्वत किंवा वृक्ष. (पर्वतासारखा वृक्षासारखा अचल असा.) २. भरतानें जडचर्यांगीकार केला म्हणून त्याला 'जडभरत' असें नांव पडलें. ३. बुद्धिपुरःसर. ४. मूर्खपंक्तिला. ५. मंत्रदेवतेचे, गायत्रीचे. ६. अक्षरें. ७. गायत्रीमंत्राचे वर्ण त्याला नीट म्हणतां येत नव्हते ८. चैत्र वैशाख ज्येष्ठ आषाढ असे चार महिने. (अ० ९ श्लो०५.) ९. 'भूः भुवः स्वः महः जनः तपः सत्यं ॐ भूर्भुवः स्वः तत्स प्रचोदयात्' हे चोवीस वर्ण. १०. भरत म्हणे:–हे मंत्रदेवते! तूं मनींच (मनामध्यें, अंतःकरणामध्यें) होवीस (हवी आहेस, असली पाहिजेस.) गायत्रीचा जप तोंडानें करून काय मोठेपणा आहे? तिचा जप अंतःकरणांत केला पाहिजे–असें तात्पर्य. मोठ्यानें बाहेर उच्चार करून दाखविण्यांत कांहीं अर्थ नाहीं. ११. 'पुत्रास पंडित करावें' हा मनोरथ परिपूर्ण झाला नाहीं असा. १२. देह. मरण पावला. १३. धाकटी पत्नी (भरताची माय=माता) सती गेली. (अ० ९ श्लो०७.)१४. जड (भरत)' हाय' असें म्हणाला नाहीं. १५. भरताला शिकवून. १६. हा आपला एक मंदबुद्धि वेडा आहे असें सर्वांस वाटलें, ह्या भरताचें जडपण (मूर्खत्व) हें सोंग आहे असें कोणासही वाटलें नाहीं. १७. [तो भरत] साधु (चांगलें) [किंवा] असाधु (वाईट) [अथवा] स्व (हें माझें) [किंवा] पर (हें दुसऱ्याचें) [असें] न म्हणे (म्हणत नसे). १८. भलतसें कर्म (वेठीला जाणें, मजुरी करणें असें भलभलतें काम) करी (करीत असे) [आणि] [भलतसें] खाय (गोड, आंबट, जाडें भरडें, पेंड, कण्या, कोंडा इत्यादि जें भाऊ देतील तें अन्न खात असे. (अ० ९ श्लो० ९-११.) १९. 'भलतसें' या शब्दाची योजना काकाक्षिगोलकन्यायानें 'खाय' आणि 'कर्म' या दोन पदांकडे करावी. २०. धुळीनें. (अ० ९ श्लो० १०.) २१. त्या जडभरताचा. २२. 'काय' शब्द अस्त्री आहे. काय=देह. या उत्तरार्धात **उपमा**लंकार झाला आहे. २३. [तो जडभरत] मोठा [होता] परि (परंतु) त्याच्या (त्या भरताच्या) सुखा कोंडाही खाउनि (कोंडा देखील खाल्यानें) तोटा नसे–असा अन्वय. २४. तो (जडभरत) निजजनें

[1]**भ** द्रपदपूर्व [2]**का**ळी देवी, तीकारणें [3]वृषळपतिनें, ।
पुरुषपशु मिळविला तो, गेलाचि सुटोनि नि[4]यतिच्या गतिनें. ॥ ४७

ग डबडले [5]तद्रक्षक, त्यांसि नि[6]शीथांत **भ**रत सांपडला, ।
[7]बा! शोधितां [8]कपर्द न घ्यावा सन्मणि पथांत सांपडला? ॥ ४८

व चनें [9]स्वभ्रात्यांच्या होता रक्षीत **भ**रत से[10]तांतें, ।
के[11]ला प्रयत्न पुष्कळ चुकवाया कष्टभर तसे [12]तातें. ॥ ४९

(आप्तजनांनीं, स्वबांधवांनीं) टाकिला (त्यागिला). २५. जो संग (समागम) सर्वथा (सर्वस्वी) खोटा (आत्महितघातक, अनर्थावह, स्वार्थहानिप्रद) [तो] [त्या जडभरताचा] सुटला. (जडभरताला आप्तजनांचा जो हानिप्रद समागम झाला होता तो त्याचा सुटला).

१. 'भद्र'पद पूर्वी जीला अशी काळी म्हणजे भद्रकाळी. २. कोणी एक चोरटा शूद्र राजा आपल्याला संतति व्हावी ह्या हेतूनें पुरुषपशूचा वध करून भद्रकालीला बली देणार होता. त्यानें बली देण्यासाठीं एक पुरुष आणिला होता, परंतु तो सुदैवानें पळून गेला. तेव्हां त्याच्या सेवकांनीं भरताला पकडिलें. त्यासमयीं हा वीरासन घालून शेताची राखण करीत बसला होता. शूद्र राजाच्या चाकरांनीं याला दोरीनें बांधून चंडिकेच्या मंदिरांत नेलें. तेथें याला स्नान घालून बली देण्याची सिद्धता केली. ब्राह्मणाचा वध करण्यास शूद्र राजाचे सेवक प्रवृत्त झाले आहेत असें पाहून भद्रकाली देवीच्या आंगाची अगदीं लाही झाली. तिनें आपल्या शस्त्रानें त्या लोकांचीं मस्तकें तोडिलीं, व महाभगवद्भक्त भरताची सुटका केली—अशी कथा आहे. [अ० ९ श्लो० १२-२०.] ३. शूद्रपतीनें. ४. दैवाच्या. ५. त्या पुरुषाचे पालक (वृषलपतीचे सेवक). ६. मध्यरात्रींत. ७. बा! (अहो!) कपर्द (कवडी) शोधितां (शोधीत असतां, जर) सन्मणि (उत्तम रत्न) पथांत (मार्गांत सांपडला (आढळला, तर तो सन्मणि) न घ्यावा? (घेऊं नये काय? अर्थात् ग्रहण करावा.) येथें अर्थसंदर्भानें कपर्द हा कोणी यःकश्चित् पुरुषपशु आणि सन्मणि भरत असें समजावें. ८. कवडी. ९. आपल्या बंधूंच्या. १०. सेतातें=शेतातें. यमकासाठीं 'श'चा 'स' केला आहे. स श हे सवर्ण समजावे असा नियम आहे. 'रलयोर्डलयोस्तद्वज्जययोर्बवयोरपि । शसयोर्मनयोश्चांते सविसर्गाविसर्गयोः । सबिंदुकाबिंदुकयोः स्यादभेदेन कल्पनम् ॥' [किरातार्जुनीय—सर्ग १५ श्लोक १० घंटापथ टीका], 'रलयोर्डलयोश्चैव शषयोर्बवयोस्तथा । वदंत्येषां च सावर्ण्यमलंकारविदो जनाः ॥.' ११. तसे कष्टभर (त्या प्रकारचे शेत राखावयाचे अशा प्रकारचे काबाडकष्ट) चुकवाया (न व्हावें म्हणून, भरतानें विद्वान् व्हावें व त्याला उदरनिर्वाहासाठीं कुणब्यासारखे काबाडकष्ट करावे लागूं नयेत म्हणून) तातें (त्या भरताच्या बापानें) पुष्कळ प्रयत्न केला. पण तो सर्व विफळ झाला आणि शेत राखण्याच्या कामीं त्याची योजना करावी लागली). १२. तातें (भरताच्या बापानें—ऋषभानें) तसे कष्टभर (शेत राखणें ह्यासारख्या श्रमाचा भार) चुकवाया (आपल्या मुलाच्या—भरताच्या—आंगावर न पडावा म्हणून, त्याला विद्या शिकवून त्याचे काबाडकष्ट दूर करावे म्हणून) पुष्कळ प्रयत्न केला.

ते[1] तस्कर तेथुनि त्या[2] गेले घेउनि, उगाचि[3] हा गेला, ।
वधितां त्या बहु काळी[4] कोपे, नच तिळहि भरत रागेला. ॥ ९०
वा घीण क्षोभावी वधितां स्वसमक्ष जेंवि पेट्याला[5], ।
क्षोभे तसीच काळी अनुगांसह[6] खाय त्याचि बेट्याला. ॥ ९१
सु टला, परि इंक्षुमतीतीरीं[7] विसरे न पळहि जो हरिला[8], ।
भरत रहूगणशिबिकावाहककुळनायकें[9][10] बळें धरिला. ॥ ९२
दे[11] ह बरा धड पाहुनि, शिबिकेला जोडिला बळेंचि खेळें[12], ।
सुजनें[13] कुजनें करिजे जन विमळ समळ जसा जळें चिखलें. ॥ ९३
वा[14] हे स्कंधीं, बाळ न जाणुनि, भलतेंचि जरि वदे काय, ।

---

१. ते चोर. २. जडभरताला. ३. अडथळा न करितां, निमुटपणें. ४. काळी देवीला पुष्कळ राग आला. ५. पेटा=वाघाचा बच्चा=cub of a tiger or lion. ६. सेवकांसह. ७. नदीविशेष तिच्या तीरीं. ८. हरिस्मरण करीत असे. ९. रहूगणाच्या पालखी वाहणाऱ्यांमध्यें श्रेष्ठ जो त्यानें. १०. रहूगण=सिंधुसौवीरपति याच्या पालखीला वाहण्यासाठीं भोयांच्या नायकानें बलात्कारानें या भरताला धरिलें. (अ० १० श्लो०१-२.) ११. भरताचा देह बळकट व पालखी वाहण्यास समर्थ असें पाहून. १२.भोयांच्या दुष्ट नायकानें. १३.येथें **'यथासंख्य'** नामक अलंकार झाला आहे. जेव्हां पदार्थांचें वर्णन ज्या क्रमानें पहिल्यानें झालेलें असतें त्याच क्रमानें त्यांचा संबंध (अन्वय) पुनः दुसऱ्या पदार्थांशीं लागत असला म्हणजे **'यथासंख्य'** अलंकार होतो. सुजनें जन विमल (स्वच्छ) करिजे, कुजनें जन समल करिजे जसा जळें [व] चिखलें जन (यथानुक्रम) विमल समल करिजे असा यांत पूर्व क्रमाशीं जुळणारा दुसरा क्रम आला आहे म्हणून **'यथासंख्य'** अलंकार झाला. 'शत्रूंस, मित्रांस आणि विपत्तीला जिंक, राख आणि पिटाळ' या वाक्यांत शत्रु, मित्र, आणि विपत्ति या शब्दांचा ज्या क्रमानें उल्लेख झाला आहे त्याच क्रमानें जिंक, राख, आणि पिटाळ, या शब्दांशीं त्यांचा संबंध लागला आहे म्हणून हा **'यथासंख्य'** अलंकार झाला. याचीं अन्य उदाहरणें:—(१) जयभीमवधाविषयीं कर्णसुयोधन करोत बकबक रे। कैसे करितील तिमिग्रास दहनमेषभंग बक बकरे ॥ [द्रोणपर्व–अध्याय १२ गीति ९१], (२) कीचकरहित विराट स्पष्ट जसा सर्प नीरदन दीन, । अल्प अनल्प बळें तो तूं संप्रति, जेंवि नीरद नदीन. ॥ [काव्यसंग्रहग्रंथमाला–विराटपर्व–अध्याय २ गीति ३१ पृष्ठ ४९], (३) कर्णखचरार्जुनां कां म्हणति न खद्योतरात्रिकरसविते [काव्यसंग्रहग्रंथमाला–वनपर्व–अध्याय ७ गी० ९५ पृ० ११७.] (४) मानी मनोजशर हार तुरे फुलांचे, कंदर्पकोपवचनें ध्वनि कोकिलांचे । राकाशशी मदनदर्पण भाविलाहे, नेघेंचि तो न परिसे न तयासि पाहे ॥ [रघुनाथपंडित–नलदमयंतीस्वयंवराख्यान.] १४. [पालखी] स्कंधीं (खांद्यावर) [भरत] वाहे (नेत होता). बाळ (अज्ञ बालक–पक्षीं–

स्वसुखामृतें तयातें निववी, सत्पुरुष कां नव्हे माय? ॥ ९४
[१]य द्यपि लंघितया गुरु न फळद, हा त्यासि तरु जसा [२]कपिला, ।
भरतापासुनि पावे तत्व पुसों जाय काय जें [३]कपिला. ॥ ९५
[४]न वळचि [५]भवाटवीतें [६]वर्णुनि तो [७]राय [८]शोधिला **भ**रतें, ।
त्या [९]सच्चंद्रें प्रभुच्या आणुनि थोरा [१०]यशोधिला [११]भरतें. ॥ ९६

मूर्ख मनुष्य) न जाणुनि (अज्ञान वयामुळें–पक्षीं–कमसमजूतीनें) जरि काय (जर कांहीं) भलतेंचि वदे (अयोग्य असें बोलला तर) तयातें (त्या मुलाला–पक्षीं– अज्ञ मनुष्याला) स्वसुखामृतें (आपल्या आनंदरूप अमृतानें–पक्षीं–आत्मानंदरूप जें सुख ज्ञानी पुरुष अनुभवितो त्या अमृतानें) [सत्पुरुष] निववी (मुलास शांतवी,–पक्षीं–मूढ जनांस शांतिसुख देई) [यास्तव] सत्पुरुष (साधुजन) माय (माता) नव्हे काय? अर्थात् सत्पुरुष आणि माय एकरूप होत. सारांश त्या जडभरतानें रहूगणराजावर कोप केला नाहीं, तर दयाच केली.

१. यद्यपि लंघितया (उल्लंघन करणाराला, अवज्ञा करणाराला) गुरु फळद न (फळ देणारा होत नाहीं) [तथापि] तरु (वृक्ष) जसा (ज्याप्रमाणें) कपिला (वानराला–वृक्षोल्लंघन करणाऱ्या वानराला–वृक्षांचा चुराडा करून टाकणाऱ्या वानराला) फळद (फळदायक) [होतो, तसा] हा (भरत) त्यासि (त्या रहूगण राजाला, शिबिका वाहण्यास लावून अवज्ञा करणाऱ्या रहूगण राजाला) [फळद झाला–उपदेशरूप फळ देता झाला.] आपलें उल्लंघन करणाऱ्या वानराला वृक्ष ज्याप्रमाणें आपलीं फळें घेऊं देतात त्याप्रमाणें भरतानें आपली अवज्ञा करणाऱ्या राजाला उपदेशरूप फळ घेऊं दिलें. उत्तरार्धः–जें काय तत्व (ब्रह्मोपदेशतत्व) कपिला (कपिल नामक महामुनीला) पुसों जाय तें तत्त्व तो रहूगणराजा (शिबिका ओढण्यास लावून अवज्ञा केलेल्या अशा) भरतापासून पावे. वृक्षाचें उल्लंघन केलें तरी वृक्षांचें फळ जसें मिळतें, तसें सत्पुरुषाचें उल्लंघन (अवज्ञा) केलें तरी त्यांजपासूनही फलप्राप्ति होते अशी कल्पना करून सत्पुरुषांचा महिमा कवीनें वर्णिला आहे. २. वानराला. ३. कपिल नामक महामुनीला. ४. रहूगण राजा शापास पात्र असतां अनुग्रहास पात्र केला हें आश्चर्यच होय. ५. भव+अटवी=संसाररूप अरण्यातें. ६. संसाररूप अरण्याचें सविस्तर वर्णन करून. ७. तो सिंधुसौवीरनृपति रहूगण. ८. शुद्ध केला, त्याचा अज्ञानमळ क्षालित केला. भरताच्या भाषणानें रहूगणाचा 'मी मोठा राजा' हा गर्व नाहींसा झाला. (अ० १० श्लो० १५.) भरतानें रहूगणाला आत्मज्ञानाचा उपदेश करून त्याचा अज्ञानमळ धुवून टाकला. (अ० १३ श्लो० २४.) ९. त्या साधुजनरूप चंद्रानें (संतांला आनंद देणाऱ्या भरतानें, तो साधुरूप चंद्र जो भरत त्यानें. चंद्र=आल्हाद देणारा जो तो चंद्र असा अर्थ मल्लिनाथांनीं 'रघुवंशा'च्या टीकेंत केला आहेः–'यथा चंदयतीत्याल्हादयतीति चंद्रः इंदुः । चदिधातोरौणादिको रप्रत्ययः' रघुवंश–सर्ग ४ श्लो० १२.) १०. यशःसागराला. ११. समुद्राला जी भरती येते ती. चंद्रदर्शनानें सागराला भरती येते हा सृष्टिचमत्कार सुप्रसिद्ध आहे.

मो[1] क्षपथपथिक केवळ **ऋ**षभ तसा **भ**रतसुत[2] **सु**मति जाला[3], ।
यांच्या[4] वंशीं **ग**य[5] नृप, वर्णिति **ह**रिसमचि सुकविजन ज्याला[6]. ॥ ५७
भ[7] व्य सविस्तर कथिला भूगोल[8] **शु**कें अशेष जाणाया ।
यांच्या[9] ध्यानें हृदयीं सूक्ष्म प्रभुचें स्वरूप बाणाया. ॥ ५८
ग गनीं ध्रुवादि[10] कथिले सूर्यादिग्रहगतिस्थितिज्ञानें, ।
तैसें जनासि बहुमत होय असें कथिल कवि किति ज्ञानें[11]? ॥ ५९
व सुधेवरील **लो**कालोका[12]पर्यंत जे पदार्थ, तथा ।
गगनांत जे तयांची कथिली श्रीमच्छुकेंचि सांग[13] कथा. ॥ ६०
ते जरि पदार्थ इतरें वर्णावे, ग्रंथ बहु न कां वाढे? ।
रसिकहि निरलस सादर[14] साधु सदा स्वस्थ थोडके गाढे. ॥ ६१

---

१. मोक्षमार्गाचा वाटसरू. २. भरताचा पुत्र, याचें नांव सुमति असें होतें. ३. झाला. ४. या सुमतीच्या कुलांत. ५. गय हा मोठा राजर्षि होता. [अ० १५ श्लो० ६-१४.] ६. ज्या गय नृपाला सुकविजन (उत्तम पंडित लोक) हरिसमचि वर्णिती (हा विष्णूसारखा होय अशी स्तुति करतात). ७. फार मोठा. ८. भूगोलाचें मान व स्वरूप निवेदन करावें असें परीक्षित् राजानें विचारल्यावरून शुकानें भूगोलाचें सविस्तर वर्णन केलें आहे. [अ० १६ श्लो० १२.] भूगोलाचें वर्णन अ० १६-२२ यांत आहे, तें इष्ट तर पहावें. ९. या भूगोलरूप भगवंताच्या स्थूल स्वरूपाच्या ध्यानें (ध्यानानें) प्रभुचें (भगवंताचें) सूक्ष्म स्वरूप बाणाया (बाणावें यासाठीं, मनांत ठसावें म्हणून) [भूगोल कथिला]. १०. अध्याय २३ यांत ध्रुवपदवर्णन आहे. ११. ज्ञानें (ज्ञानानें, ज्ञानाच्या योगानें) [शुकानें परीक्षित् राजाला जितकी माहिती सांगितली तितकी माहिती देऊन तिच्या ज्ञानानें] जनासि बहुमत होय असें (सर्व जनास मान्य होईल असें वर्णन, सर्व जनानीं मान डोलवून स्तुति करावी इतकें वर्णन) तैसें (भागवतांत वर्णिलेलें आहे त्याप्रमाणें) कवि (मी मोरोपंत) किति कथिल? (माझ्याच्यानें कसें कथवेल? इतकें विस्तृत वर्णन करण्याची शक्ति मला मोरोपंताला कोठें आहे? सर्व वर्णन करितां येण्याजोगें मला सामर्थ्य नाहीं आणि तसें वर्णन केलें नाहीं—असें तात्पर्य.) १२. लोक (उदय) आणि अलोक (अस्त) या दोन पर्वतांपर्यंत. सप्तमहाद्वीपें आणि सप्तसमुद्र यांस पोटांत घेऊन मेरुपर्वताच्या आसमंतात् बाराकोटि पन्नासलक्ष योजनांवर असणारा वर्तुलाकार महापर्वत. याच्या आंतल्या भागास लोक 'प्रकाश' व बाहेरल्या भागास 'अलोक' (अंधकार—अप्रकाश) असल्यामुळें याला 'लोकालोक' असें नांव पडलें. १३. यथासांग, संपूर्ण, सकल. १४. सादर (आदरपूर्वक श्रवण करणारे) साधु (भाविकजन) [असे] रसिकहि [मिळतील, पण] निरलस (निरालशी) सदा स्वस्थ (शांतचित्त) गाढे (खंबीर, दृढनिश्चयी, सतत श्रवण करणारे) [असे] थोडके [श्रोते] मिळतात म्हणून ग्रंथविस्तार केला नाहीं—असें सांगण्याचें तात्पर्य.

वा नावीं [1]पाताळें सप्त, **ब**ळिश्री [2]अनंत वानावे, ।
[3]परि मंत्रवर्ण अडविति, आदरिले गुरु कसे न मानावे? ॥ ६२

सु[4]ज्ञसमाजसुरसिक श्रीहरिच म्हणेल न लघु [5]पृथु कांहीं, ।
[6]स्वल्पार्थस्कंधांहीं तृप्तचि होईल जेंवि [7]पृथुकांहीं. ॥ ६३

दे वाच्या कीं गाती तद्भक्तांच्या यशास नर कां तें ।
हर्षद सोडुनि वर्णूं तापद जे त्यां कशास [8]नरकांतें? ॥ ६४

वा इट वाटेल म्हणुनि वर्णितसें सर्वनरकरीतीतें, ।
[9]गदर्दुःख वैद्य तैसें नाशिति जें पाप नर करीती तें. ॥ ६५

य मदूत यातना बहु भोगविती उग्र ते नरक सारे, ।
[10]**रा**मसुत **मयूर** म्हणे, 'त्यांच्या श्रवणीं न भी नर कसा? रे!' ॥ ६६

---

१. या सात पाताळांचें वर्णन २४ अध्यायांत पहा. अतळ आणि वितळ यांमध्यें. (पाताळें सात आहेत तीं हीं:–१ अतल, २ वितल, ३ सुतल, ४ तलातल, ५ रसातल, ६ महातल, व ७ पाताल.) २. बळि भगवान् ते. ३. [योग्य वर्णनविस्तारही केव्हां केव्हां करतां आला नाहीं याचें कारण पंत सांगतात.] परि (परंतु) मंत्रवर्ण (नमो भगवते वासुदेवाय–या मंत्रांतील जीं अक्षरें अनुक्रमानें पद्यांत साधावयाचीं तीं अक्षरें) अडविति (ग्रंथविस्तारास अडथळा करतात, साधावयास पाहिजेत तशीं साधितां येत नाहींत.) आदरिले (स्वीकारलेले, योजण्याचा निश्चय केला असे) गुरु कसे न मानावे? (आतां त्यांचा अनादर कसा करावा? मंत्रवर्णांचा त्याग करून पद्यरचना करतां येत नाहीं यास्तव ग्रंथविस्तार केला नाहीं–असा भाव.) ४. बुधसमुदायांतील रसज्ञ. ५. मोठें. ६. अत्यंत थोडा अर्थ (काव्यार्थ) ज्यांत वर्णिला आहे अशा (स्कंधांनीं). ७. पोह्यांनीं. येथें सुदामाच्या पृथुकांवर कविकटाक्ष आहे. (कृष्णविजय–उत्तरार्ध–अ० ८०-८१.) ८. नरकांचें वर्णन २६ व्या अध्यायांत आहे. ९. रोगाचें दुःख. १०. रामचंद्रपंत पराडकरांचा पुत्र मयूर (मोरोपंत). पंतांनीं आपल्या काव्यांत आपल्या मातेच्या आणि पित्याच्या नांवाचा उल्लेख अनेक प्रसंगीं केला आहे. (१) धन्य **श्रीराम** पिता, धन्या **लक्ष्मी** प्रसू जगीं झाली । आली **सत्यवती**ची कीं **भारत**कीर्ति सुतमुखें आली. ॥ [स्वर्गारोहणपर्व–अ० २ गी० ४२], (२) या साधुसंगमुदिरें मुदित **श्रीराम**सुत **मयूर** कृती । नरनारायणविजयग्रंथ करी व्हावया सुखी सुकृती. ॥ [कर्णपर्व–अ० ५० गीति ७५.]

षष्ठ स्कंध.

न रपति[1] म्हणे[2], 'शुकमुने! भ्यालों श्रवणचि करूनि नरकास, ।
वद तरतो[3] कोणाची पाप समुद्रीं धरूनि नर कास[4]?' ॥ १

मो ठें प्रायश्चित्त[5] श्रीशुक सांगे स्वयें नरपतीतें, ।
जेणें[6] पातकबीजें, दहनें[7] जैसीं तृणें करपती तें. ॥ २

भ गवन्नामोच्चारें[8] सकळेंहि अघें[9] सवासनें[10] जळती, ।
मळती न नामधारक[11], पळती यमदूत[12], विघ्नेंही[13] टळती. ॥ ३

ग णपतिस विघ्न तैसे[14] भगवन्नामासि दोष कांपति, तें ।
माहात्म्य ऐकिल्यावरि, गणिजेल यमोग्र[15] शेष कां पतितें? ॥ ४

व र कुलज कान्यकुब्जीं[16] विप्र **अ**जामिळ असे महादोषी[17], ।
दासीपति पितृधर्मस्त्रीनय[18] सोडुनि तिलाचि[19] तो पोषी. ॥ ५

ते दासी केवळ तनु[20] तत्सुत[21] दश तेही केवळ प्राण, ।

---

१. परीक्षित् राजा. २. अ० १ श्लो० १-६ पहा. ३. कोणाचा आश्रय धरून मनुष्य नरकयातना चुकवितो तें सांगा–असा भाव. मनुष्य पापसागरांतून कसा पार पडतो तें निवेदन करा. ४. कास धरणें=आश्रय करणें. ५. देहदंड, चांद्रायणादि प्रायश्चित्त, ज्ञान, धर्मज्ञान. ६. ज्या प्रायश्चित्तानें, ज्या धर्मज्ञानानें. ७. अग्नीनें. (अ० १ श्लो० १४.) ८. भगवंताच्या नामाच्या उच्चारानें. ९. पापें. १०. वासनांसहित. ११. नामधारक (भगवंताच्या नांवाचें स्मरण करणारे पुरुष) मळती न (पापी होत नाहींत). १२. त्या नाम धारकांस पाहून यमदूत पळतात. १३. 'विघ्न' शब्द संस्कृतांत पुल्लिंगात्मक आहे. संस्कृताप्रमाणें नामांच्या लिंगाचा उपयोग केल्याचीं उदाहरणें **पं**तांच्या कवितेंत अनेक आढळतात:–ऐसा स्वप्न विलोकुनि तो श्रीमान् कर्ण जाहला जागा. [वनपर्व–अ० १४ गी० १५ पृ० २१५.] 'प्रौढबोध मराठी व्याकरणां'त ह्याचीं आणखी उदाहरणें दिलीं आहेत. [नियम ७२ पृ० ७.] १४. ही **उपमा** आहे. १५. यम+उग्र. यमासारखा भयंकर तें (नारायणनामाचें) माहात्म्य ऐकिल्यावरि (श्रवण केल्यावर) पतितें (पापी पुरुषानें) यमोग्र (यमासारखा भयंकर) शेष (मृत्यु, अंत) कां गणिजेल? (कां मानिला जाईल? भगवंताचें नाममाहात्म्य ऐकिल्यावर पापी पुरुषाला मृत्यु यमासारखा भयंकर आहे असें कां वाटेल? कधींही वाटणार नाहीं, पापी जनाला नामश्रवणोत्तर मृत्यूचें भय वाटणार नाहीं–असें तात्पर्य.) १६. देशविशेष त्या देशीं. १७. महापापी, अत्यंत दोषी, नष्टसदाचार असा. १८. पिता, धर्म, पत्नी आणि नय (नीति) यांचा त्याग करून. १९. त्या दासीलाच. २०. ती दासी त्या अजामिळाची तनु (देहच होय). २१. तिचे पुत्र. (दहा.)

त्यांचें करि [1]परघातद्यूतस्तेयांदिकें [2]परित्राण. ॥ ६
वा र्धक केवळ आलें, जरि [3]अष्टाशीति लोटलीं वर्षें, ।
दासीच्या पोराचें लालन पालन करी सदा हर्षें. ॥ ७
सु त त्या दासीचे प्रिय, परि [4]निपट लहान दशम जो [5]चरम ।
[6]**नारायण** नाम तया, तो त्या [7]जरठासि आवडे परम. ॥ ८
दे तां, घेतां, पीतां जळ, खातां अन्न, जागतां, निजतां, ।
[8]लुब्धाचें प्रेम धनीं, त्याचें **ना**रायणीं तसें [9]झिजतां. ॥ ९
वा टे त्या वृद्धाला **ना**रायण पुत्र अधिक [10]असुपरिस, ।
प्रिय [11]नव दशम प्रियतर जरठा, कृपणास जेंवि [12]वसु [13]परिस. ॥ १०
य[14] मदूत तिथे आले, कां [15]त्या पाप्या तिहीं न बांधावें? ।
मारी हाक **अ**जामिळ 'येसी **ना**रायणा! न कां? धावें.' ॥ ११
न[16] लिन[17]गदारिदरधर श्री**ह**रिचे दूत धांवले [18]चवघे ।
[19]श्याम [20]चतुर्भुज [21]कुंडलकटकमुकुटमंडितांग ते अवघे. ॥ १२
मो रांहीं सर्प तसे [22]विष्णुभटांहीं **अ**जामिळा [23]झटते ।
चट तेजें [24]भग्नप्रभ केले [25]श्रीदंडपाणिचे [26]भट ते. ॥ १३

---

१. दुसऱ्याचा नाश, जुगार, चोरी इत्यादि उपायांनीं. (अ० १ श्लो० २२-२३.) २. रक्षण. ३. अष्ट (आठ)+अशीति=ऐशीं=अठ्यायशीं. ४. केवळ. ५. शेवटला. ६. अ० १ श्लो० २४-२५ पहा. ७. वृद्धाला. ८. लोभी नराचें. ९. कृश होतां. १०. प्राणाहून अधिक. ११. नऊ पुत्र प्रिय होते, दहावा अधिक प्रिय होतो. १२. धन. १३. पाषाणविशेष. Philosopher's stone. स्पर्शमणि. याच्या स्पर्शानें लोखंडाचें सोनें होतें असें समजतात. १४. यमाचे दूत. (अ० १ श्लो० २८.) १५. त्या पापी अजामिळाला. अजामिळ हा एका विद्वान् अग्निहोत्री ब्राह्मणाचा मुलगा होता. तो एकदां वनांत दर्भ आणण्याकरितां गेला होता. तेथें तो एका सुस्वरूप शूद्रस्त्रीस भूलून भ्रष्ट झाला. याला दहा मुलें झालीं. त्यांत कनिष्ठ नारायण नामक मुलगा याचा परम आवडता होता. मरणसमयीं पुत्राच्या मिषानें 'नारायण' असें ईश्वराचें नाम याच्या मुखीं आलें, तेव्हां विष्णुदूतांनीं यास वैकुंठास नेऊन याचा उद्धार केला—अशी कथा आहे. १६. अ० १ श्लो० ३१. १७. नलिन+गदा+अरि+दर+धर=कमल+गदा+चक्र+शंख+धरणारा=कमल गदा इत्यादिकांतें धारण करणाऱ्या (श्रीहरीचे=श्रीविष्णूचे). १८. चार. (अध्याय १ श्लो० ३१.) १९. कृष्णवर्ण. २०. चार आहेत भुजा ज्यांस असे. २१. कुंडल (कर्णभूषण)+कटक (वलय)+मुकुट+मंडित (भूषित)+अंग (देह) ज्यांचे असे. २२. विष्णूच्या दूतांनीं. २३. बिलगणारे. २४. हीनकांति. (भग्न आहे प्रभा ज्यांची असे.) २५. यमाचे. २६. वीर.

[1]**भ** गवद्भटांसि म्हणती ते, 'आम्हीं **धर्म**राजभट, कां [2]जी ! ।
दे[3]तां निषे[4]धुनि तुम्हीं, देतात [5]श्येन भीति [6]चटकां जी. ॥ १४

ग र्जत धांवुनि आला [7]सुर, कीं [8]उपदेव [9]सिद्ध कळवा जी ! ।
पवन [10]गरुड न तुम्हासम, किति [11]रविचे जरि अगाधबळ [12]वाजी ? ॥ १५

व रवेष तुम्हीं कोण ? [13]द्युति तुमच्या [14]भानुच्या तसी आंगा, ।
या [15]धर्मपालकाच्या दूतांतें कां निषेधितां सांगा ?' ॥ १६

ते [16]प्रभु म्हणती, 'म्हणतां, जरि आपण **धर्म**राज भट सांगा ।
तरि धर्म तो कसा रे ? [17]हूं, याच्या [18]आंतळों नका आंगा. ॥ १७

[19]**बां** डव नेतां कां रे ! ? बोला दंडास योग्य हा कां तें ?' ।
प्रभुभट पुसति असें **यम**दूतांतें हंस जेंवि काकातें. ॥ १८

सु रसत्तमांसि सांगति **यम**भट, 'जो [20]वेदविहित तो धर्म, ।
[21]तद्विपरीत अधर्म, प्राणी तेणें न पावती [22]शर्म. ॥ १९

दे उनि [23]भाक [24]अधर्मा भजला, समजोनि हीनधर्मातें, ।
माता तात उपेक्षुनि, अनुसरला हा [25]कुधी कुकर्मातें. ॥ २०

बा ळा [26]कुलजा [27]भार्या त्यजिली, देऊनि [28]पाठ वेदासी, ।
[29]अष्टाशीत्यब्दवया तरि या स्वप्नांत आठवे दासी. ॥ २१

[30]**य** मवचनास्तव आलों अतिपातकनायका लया [31]न्याया ।
सुज्ञ तुम्हीं कां नसतां [32]पति [33]घातक, नायकाल या न्याया ?' ॥ २२

---

१. विष्णुभटांला. २. अजि. ३. भीति कां देतां? ४. आमचा धिक्कार करून. ५. ससाणा. ६. चिमण्यांला. ७. देव. ८. यक्ष, गंधर्व, किन्नर, गुह्यक इत्यादि उपदेव. ९. अणिमादिगुणोपेत असे सिद्ध. प्राप्ताष्टगुणैश्वर्यधर्म असे साधु पुरुष, देवयोनिविशेष. [अ० १ श्लो० ३४-३५.] १०. वायु किंवा गरुड यांचाही वेग तुमच्या सारखा नाहीं. हें **'असम'** अलंकाराचें उदाहरण होय. ११. सूर्याच्या अश्वांचा तुमच्या पुढें काय पाड आहे? १२. घोडे. १३. कांति. १४. सूर्याच्या. १५. यमाच्या. १६. विष्णुदूत. १७. हा दहशत दाखविणारा शब्द आहे. १८. स्पर्श करूं नका. [अ० १ श्लो० ३८-३९.] १९. ब्राह्मण. २०. वेदप्रणिहित, वेदानें सांगितलेला जो तो धर्म. २१. त्याच्या उलट, वेदानें जें करूं नये असें सांगितलें तें कर्म, अधर्म. २२. सुख. २३. वचन देऊन. २४. शूद्र दासीचें चिंतन करून अधर्मानें वागूं लागला. २५. दुष्टबुद्धी. २६. विप्रकुलांत जन्मलेली. २७. सहधर्मचारिणी स्वभार्या. २८. दुर्लक्ष करून. पाठ देणें=उपेक्षा करणें, अनास्था करणें. २९. अठ्यायशी वर्षें वय ज्याचें असा. ३०. यमाच्या आज्ञेवरून. ३१. न्यावयाला. ३२. यमधर्म. ३३. [आमचा] पति (यम) घातक (दुष्ट,

न[1] यधर्मरहस्यज्ञ प्रभुभट हांसोनि म्हणति, '[2]हरि! हरि! ते ।
[3]कीं हेचि करिति अनय व्यवहारश्रवणदुरितपरिहरिते. ॥ २३

मो ठा अधर्म ऐसा [4]धर्मज्ञांच्या सभेसि शिवतो कीं ।
दंडिति [5]अदंड्य, कैचें करितां तातेंचि घात [6]शिव [7]तोकीं? ॥ २४

भ[8] गवन्नाम [9]सुमंगल [10]चतुरक्षर जपति ज्यासि काय कवी ।
तें **नारायण** ऐसें घे [11]हा आम्हांहि दूर आयकवी. ॥ २५

ग तपातक हा, [12]निष्कृत [13]हरिनामें कोटिजन्मपापांचें ।
गरुडापुढें उराया क्षणही सामर्थ्य काय सापांचें? ॥ २६

वं[14] दना नाम कसें तरि हरिचें येतांचि सर्व पाप [15]हरी, ।
[16]सांकेत्य [17]पारिहास्य [18]स्तोभहि [19]हेलनहि कोटि [20]भव्य करी. ॥ २७

ते[21] [22]शुचि हरिच्या नामें [23]गुरुतल्पग चोरटा [24]सुहृद्द्रोही ।
[25]गोब्राह्मणराजस्त्रीपितृहंता, ज्या नरा [26]सुरा मोही. ॥ २८

अदय, अविचारी) नसतां (नाहीं, यास्तव) तुम्हीं (विष्णुभट) सुज्ञ (विचारशील होत्साते) या न्याया (या आमच्या नीतिव्यवहाराला, या वर सांगितलेल्या कारणाला) कां नायकाल? (कां ऐकणार नाहीं? अर्थात् ऐकाल व मान्य कराल असा—भाव. यमाचें आज्ञावचन आणि आमचें कृत्य न्यायाचें आहे असें तुम्ही सुज्ञ करालच—असा भाव.)

१. नीति आणि धर्म यांचें तत्व जाणणारे, नयधर्मकोविद. २. हर! हर! ३. कीं (कारण) व्यवहारश्रवणदुरितपरिहरिते (व्यवहार श्रवण करून तत्संबंधी जें दुरित (संशय) त्याचा परिहार करणारे, वादी आणि प्रतिवादी यांचें म्हणणें ऐकून त्यांच्या संशयाचा निर्णय करणारे न्यायाधिकारी, वादांतील दोन्ही पक्षांचें म्हणणें ऐकून घेऊन निकाल करणारे धर्माधिकारी) हेचि (हें स्वतःच) अनय (अन्यायाचरण) करिति! हर! हर! काय शोचनीय स्थिति ही! ज्यांनीं न्याय करावयाचा तेच न्यायाधीश अन्याय करूं लागले! ४. धर्म जाणणाऱ्या लोकांच्या. [अ० २ श्लो० १.] ५. दंडाला अयोग्य त्याला. ६. कल्याण. ७. बालकीं. ८. भगवंताचें नाम. ९. पुण्यकारक. १०. ज्यांत चार अक्षरें आहेत असें (नारायण). ११. अजामिळ. १२. परिहार. १३. हरिनामाच्या उच्चारें असंख्य जन्मांतील पापांचा परिहार होतो, यास्तव हा अजामिळ गतपातक (शुद्ध, धौतमल, निष्पाप) होय. १४. तोंडाला. १५. नष्ट करी परिहार करी. १६. पुत्रादिकांस संकेतानें ठेवलेलें. १७. विनोदानें घेतलेलें. १८. गाण्याची पूर्णता होण्याकरितां घेतलेलेंहि. १९. निंदेनें घेतलेलेंहि. [अ० २ श्लो० १४.] २०. कल्याण. २१. ते लोक. २२. पवित्र. २३. गुरुभार्येशीं गमन करणारा. [तल्प=विवाहित स्त्री.] २४. मित्रांचा द्रोह करणारा. २५. गाय, विप्र, राजा, स्त्री, बाप यांचा घात करणारा. २६. मद्य ज्या मनुष्याला मूढ करतें तो सुराप. (मद्यपी.)

वा चेसि नाम येउनि करितें स्वगुण स्मरूनि जें विहित[1]।
न कळुनि खातां ओखद तोखेद[2] होतें करूनि जेंवि हित. ॥ २९

सु टतोचि[3] अघापासुनि, 'हरि' म्हणतां, पावतो शुभा लोकां, ।
पतित स्खलित[4]हि भग्नहि संदष्ट[5]हि तप्त आहत[6]हि हो कां.' ॥ ३०

दे वाचे भट ऐसे बहु वदले सोडवुनि तया[7] गेले, ।
धन्य **अ**जामिळ ज्यास्तव उघडे प्रभुनें स्वनामगुण केले. ॥ ३१

वा दें[8] त्यांच्या झाला बहु पश्चात्तप्त[9] तैं **अ**जामिळ तो, ।
गंगाद्वारीं करि **ह**रिभक्तिच कीं भक्त त्या अजा[10] मिळतो[11]. ॥ ३२

य मदूतांपासुनि बा! सोडविला दीन तो जिहीं भट ते ।
आले, विमान[12] आणुनि, जे **ह**रिसमरूपभूषणें नटते[13]. ॥ ३३

न मुनि तयांसि[14] **अ**जामिळ गंगातीर्थी त्यजूनि कायातें[15], ।
श्रीपतिसमीप गेला सुविमानें, लाभ हा निका यातें. ॥ ३४

मो ठा महिमा प्रभुच्या नामाचा, किति म्हणोनि बोलावा[16]? ।
पावे[17] रूप असें त्या **वि**ष्णुभटांसीं विशंक तोलावा. ॥ ३५

भ गवद्दूतपराजित **य**मदूत स्वानननांसि[18] मळवीती[19] ।
आज्ञाभंग तयाचा[20] झाला तें सर्व वृत्त कळवीती. ॥ ३६

ग हिंवरुनि **य**म म्हणे, 'रे! आम्हां ब्रह्मेंद्रचंद्रभर्गांतें[21] ।
जो शासितसे, ज्याचे गुण नच गणवतिल कोटिगर्गांतें[22]. ॥ ३७

व त्सक! हो! त्या श्रीमद्विष्णुप्रभुचेहि दूत ते, ज्यांचें ।
कार्य हरिजनावन[23] हें प्रभुच्या जे स्थान पूततेजांचें, ॥ ३८

ते प्रभुदूत त्रिजगीं ध्वंसाया सर्वपरमद[24] भ्रमती, ।

---

१. उचित. २. संतोष देणारें. [अ० २ श्लो० १९.] ३. पापमुक्त होतो. ४. अडखळाहि. ५. सर्पादिकांनीं दंशितहि. ६. दुसऱ्यानें ताडन केलेलाहि. ७. अजामिळाला. ८. विष्णुभट व यमभट यांच्या संभाषणानें (संभाषण ऐकून), संवादानें. ९. विरक्त. १०. जन्मरहिता (विष्णूला). ११. प्राप्त होतो, देवांशीं एकरूप होतो. १२. सुवर्णविमान. [अ० २ श्लो० ४२-४३.] १३. नटणारे. १४. त्या विष्णुदूतांला. १५. देहातें. १६. वर्णावा. १७. अजामिळ भगवंताच्या पार्षदाचें स्वरूप पावला. [अ० २ श्लो० ४३.] १८. स्व+आननांसि=निज+मुखांसि. १९. मलिन करतात. २०. यमाचा. २१. ब्रह्मा+इंद्र+चंद्र+भर्ग=ब्रह्मदेव+इंद्र+चंद्र+महादेवातें. २२. गर्ग=यादवांतील वृष्णिकुलाचा उपाध्याय. २३. हरिजन+अवन=भक्त+रक्षण=भगवत् भक्तांचें रक्षण. २४. सर्वांचा मोठा गर्व.

त्यांच्या तेजें जळतिल धरितिल जे गर्व परम [1]दभ्रमती. ॥ ३९

वा[2] णी [3]ज्यांची **श्री**प्रियतमनामा जाहली असेल वही, ।

त्यांतें वक्र पहाया काय तुम्हां तेज? [4]मज नसे लवही. ॥ ४०

सु मति हरिभजक **विधिमनु कपिल** [5]बळिकुमार **शंभु नारद** रे! ।

भीष्म प्रल्हाद जनक शुक [6]मी वारा [7]रहस्यदृष्टि वरे. ॥ ४१

दे वाच्याचि दयेनें अत्यंत रहस्य भागवतधर्म ।

जाणतसों, भट! हो! जन तरती यांहींच पावती [8]शर्म. ॥ ४२

वा[9] हत असतां तुळसी हरिचरणीं मलयपर्वतीं [10]बाहे ।

मजला **अगस्त्य** मुनिवर सांगे अत्यद्भुता कथा बा! हे.' ॥ ४३

य व [11]अंगुष्ठगत करी जरि दुर्गतिपात्रजन तथापि हिता ।

मुखगत हरिनाम तसें प्रकटि **शुक** दयालु या पथा [12]पिहितां. ॥ ४४

न[13] रनाथा! तो [14]**दक्ष प्राचेतस विंध्यपर्वतीं** [15]तपला, ।

[16]अघमर्षणसत्तीर्थी [17]यमनियमातें सदा बरा जपला. ॥ ४५

[18]**मो** रस्थळ हारातें पूजुनि भावें त्रिकाळ विधि[19]दक्ष ।

तो नित्य '[20]हंसगुह्य' स्तोत्रें [21]स्तवि [22]सत्तपोंबुनिधि **दक्ष**. ॥ ४६

भ गवान् [23]दर्शनसद्वर देउनि [24]त्यातें म्हणे, '[25]मदुक्त करीं, ।

---

१. निष्फळबुद्धि, अल्पमति. [दभ्र=अल्प.] २. वाचा. ३. ज्या ईश्वरभक्तांची. ४. मला यमाला सुद्धां त्या ईशभक्तांकडे वांकडें पाहण्याचें सामर्थ्य नाहीं. ५. सनत्कुमार. [अ० ३ श्लो० २०-२१.] ६. यम. ७. भागवत धर्माचें रहस्य (तत्व) जाणणारे. ८. सुख. ९. अगस्त्य हरिपादावर तुळसी वाहत असतां. १०. बोलावी. ११. अंगुष्ठगत (आंगठ्याच्या पेरावर असलेला) यव (यवचिन्ह–सामुद्रिक लक्षणाप्रमाणें) हिता करी (मंगल करतो, कल्याण करतो) जरि दुर्गतिपात्र (जरी वाईट स्थितीस जाण्यास योग्य असा) जन (मनुष्य) असला तरी त्याचें तो यव कल्याण करतो. त्याप्रमाणेंच मुखांतून आलेलें हरिनाम अभागी नराचेंही कल्याण करतो–हा गुप्त मार्ग शुकाचार्यानें सर्वांस प्रकट केला. १२. गुप्ता. १३. शुक म्हणतोः–हे परीक्षित राजा! १४. प्राचीनबर्हीचे पुत्र दश. प्रचेते+वार्क्षीकन्या यांचा पुत्र दक्ष प्राचेतस. १५. संततिवृद्धि व्हावी म्हणून तपश्चर्या केली. [अ० ४ श्लो० २०.] १६. अघमर्षण नामक उत्तम पुण्य तीर्थांत. १७. यम आणि नियम या दोन योगांगांतें. १८. मा+उरस्थळ+हार=लक्ष्मीच्या वक्षस्थळसंबंधी हार जो विष्णु त्यातें. १९. चतुर. २०. 'हंसगुह्य' नामक स्तोत्राच्या योगानें. [अ० ४ श्लो० २१.] २१. ईश्वराला स्तवी. अ० ४ श्लो० २३-३४ यांत ही स्तुति आहे. २२. सत्+तपस्+अंबुनिधि=उत्तम तपाचा समुद्र. २३. दर्शनरूप उत्तम वर. २४. त्या प्राचेतस दक्षातें. २५. माझें वचन.

'[1]पंचजनाची दुहिता सुमति [2]असिक्नी सती [3]प्रजार्थ वरीं.' ॥ ४७
ग रुडध्वजविभुवचनें वरिली दक्षें प्रजार्थ ती देवी, ।
झाले पुत्र [4]अयुत तिस, [5]संज्ञा 'हर्यश्व' हे तयां ठेवी. ॥ ४८
व दला दक्ष तयांतें, 'उत्पन्न करा प्रजा,' असें, [6]राजा ! ।
त्याप्रति तपोर्थ गेले [7]नारायणनामसत्सरा बा ! [8]ज्या. ॥ ४९
ते थें भगवान् नारद भेटे, ज्या सर्व वंदिती संत, ।
त्यांसि म्हणे, 'सृष्टि कसी करितां [9]भूचा न जाणतां अंत ? ॥ ५०
[10]बां लिश हो ! [11]एकपुरुष राष्ट्र, बिल [12]अदृष्टनिर्गमहि कांहीं ।
[13]बहुरूपा स्त्री पुरुषें [14]पुंश्चलिपति तोहि देखिला नाहीं. ॥ ५१
खु त हो ! [15]नदी [16]उभयतोवाहा जी तीहि पाहिली नसतां, ।
तैसेंचि [17]पंचपंचाद्भुतगृह सृष्टयर्थ तप करित बसतां, ॥ ५२
दे वप्रिय ! हो ! नेणा तोही जो हंस [18]चित्रकथ कैसे ? ।
[19]सर्गपटु, [20]भ्रमशील [21]क्षुरपविकृत चक्र नेणते ऐसे. ॥ ५३
बा ळक ! हो ! स्वपित्याचा [22]आदेश [23]स्वानुरूप जो त्यातें ।
[24]नेणुनि [25]सर्ग कसा रे ! रचितां गृह न रचितांचि [26]जोत्यातें ? ॥ ५४
थ तेंहि [27]परांभेद्य [28]श्रीमुनिचे वचनकूट दश सारे ।

---

१. पंचजन नामक प्रजापतीची कन्या असिक्नी हिचा पती म्हणून स्वीकार कर. २. नामविशेष. ३. संतति व्हावी यासाठीं. ४. दहाहजार. ५. नांव. [अ० ५ श्लो० १.] ६. हे परीक्षित नृपा ! ७. नारायण नामक उत्तम सरोवरा. ८. ज्या सत्सरा (उत्तम सरोवराला) नारायणनाम आहे त्याप्रति (त्या सरोवराप्रत) तपोर्थ ते हर्यश्व गेले. ९. तुम्हाला पृथ्वीचा अंत दिसत नाहीं, मग तुम्ही सृष्टि कशी उत्पन्न करणार ? [अ० ५ श्लो० ६.] १० मूर्ख हो ! ११. एक परमात्मा पुरुष (सर्वांतर्यामी) ज्यामध्यें असें विश्वरूप राज्य तें. १२. ज्यांतून बाहेर पडावें कुठून हें समजत नाहीं असें बिळस्वरूपी ब्रह्म तें. १३. अनेक रूपें घेणारी स्त्री आहे. [अ० ५ श्लो० ७.] १४. जारिणीसारखी नानारूपें धरणारी जी अविद्या तिचा पति जो जीव. १५. मायारूपिणी. १६. दोहींकडून जन्ममरणरूपानें वाहणारी. १७. अहंकाराचें पंचविंशति तत्वाचें गृह अंतर्यामी तो. १८. चमत्कारिक कथा सांगणारा हंस. १९. सृष्टि उत्पन्न करणारे कसे होणार ? तुम्ही प्रजा उत्पन्न कशी करणार ? २०. नेहमीं भ्रमण करणारें (चक्र). २१. क्षुर (वस्तरे) आणि पवि (वज्र) यांनीं कृत (निर्मिलेलें चक्र). २२. आज्ञा. २३. आपणास योग्य. २४. पित्याची योग्य आज्ञा न समजून. [अ० ५ श्लो० ९.] २५. उत्पत्ति, सृष्टिव्यापार. २६. घराच्या पायातें. २७. ते सन्मुनि (दक्षपुत्र) हर्यश्व नारदाचे दश वचनकूट समजले, जरी ते वचनकूट इतरांला यत्नें करूनही समजण्याला कठिण (अभेद्य) असे होते. २८. नारदाचें भाषणरूप कोडें.

सुतपःशुद्धसुमति ते सन्मुनि हर्यश्व समजले बा! रे[1]! ॥ ५५
न[2] म्रपणें साधूंचे ज्यांहीं[3] आराधिले सदा चरण, ।
त्यां[4] काय कठिण? घडलें बहु सत्तीर्थी जयां सदाचरण[5]. ॥ ५६
मो क्षेश ब्रह्म[6]मतिहि जीवहि मायाहि[7] अंतरात्माही[8] ।
शास्त्रहि[9] काळ[10] तथा उपदेशदश पदार्थ जाणिले त्यांहीं. ॥ ५७
भ[11] व्यमति समजले ते तत्व मग अनंत[12] पावले शर्म[13], ।
मुनितें[14] वंदुनि गेले, फिरतिल करितिल विमुक्त कां कर्म[15]? ॥ ५८
ग[16] त पुत्रांतें शोची दक्ष, तया ब्रह्मदेव समजावी, ।
गुरुवचनें दुःखस्थिति, रवितेजें तिमिरराशिसम[17] जावी[18]. ॥ ५९
व[19] रगुण सहस्र नंदन[20] निर्मुनि त्यांसहि[21] म्हणे[22], 'करा सृष्टी.' ।
त्यावरिहि तो दयाघन[23] गुरु[24] त्याचि सरोवरीं[25] करी वृष्टी[26]. ॥ ६०

---

१. रे! बा! (परिक्षिति!) सुतपःशुद्धसुमति (उत्तम तपाच्या योगानें शुद्ध झाली आहे उत्तम मति ज्यांची असे) सन्मुनि (उत्तम तपस्वी असे) ते हर्यश्व (ते हर्यश्व नामक दक्षपुत्र) यत्नेंहि (मोठ्या प्रयासानेंही) पराभेद्य (इतरांना अभेद्य, अन्याला अगम्य, मुनि नारदा- वांचून इतरांला किंवा हर्यश्वावांचून इतरांला अगम्य असे) श्रीमुनिचे (श्रीनारदाचे) सारे (सकल) दश (दहा) वचनकूट (गूढ, दुर्बोध दहा पदार्थ, दुर्बोध दहा कोडीं. गीति ५७ पहा.) समजले (जाणते झाले, हर्यश्वांनीं ते दश पदार्थ जाणिले.) २. अ० ५ श्लो० १४-१५. ३. पूजिले. ४. हर्यश्वांला. ५. उत्तम आचरण (पुण्य). ६. जारिणी स्त्री ही बुद्धि होय. [अ० ५ श्लो० १४.] ७. दोहींकडे वाहणारी नदी ही माया होय. [श्लो० १६.] ८. पंचवीस तत्वांना आश्रय देणारें गृह अंतरात्मा होय. ९. हंस म्हणजे शास्त्र होय. [श्लो० १८.] १०. सर्वकाळ फिरणारें चक्र काळ होय. [श्लो० १९.] ११. उदात्तबुद्धि (हर्यश्व). १२. अपरिमित. १३. सुख. १४. श्रीनारदातें. १५. नि- रुपयोगी काम्य कर्म. १६. नारदाच्या उपदेशानें ज्ञान प्राप्त करून जिकडे गेलेला प्राणी पुनः संसारांत परत येत नाहीं त्या मार्गाला गेलेल्या पुत्रांविषयीं दक्षाला दुःख झालें. [अ० ५ श्लो० २४.] १७. अंधकाराच्या ढीगासारखी. १८. नष्ट व्हावी. १९. उत्तमगुणसंपन्न. २०. दक्षानें पुनः पांचजनीच्या उदरीं शबलाश्व नामक सहस्रावधि पुत्र उत्पन्न केले. [श्लो० २४.] २१. त्या शबलाश्वांला. २२. दक्ष म्हणे. २३. कृपामेघ. २४. नारदमुनि. २५. त्या नारा- यणसरोवरावर. [याच सरोवरावर यांच्या पूर्वजांला सिद्धि प्राप्त झाली होती. याच सरो- वरावर शबलाश्व हे तपश्चर्या करूं लागले व तेथें नारदमुनीचें त्यांस दर्शन झालें. श्लो० ३०.] २६. उपदेशामृताची वृष्टि. [पूर्वीप्रमाणें नारदानें ह्या शबलाश्वांलाही पूर्वीचीं कोडीं (गीति ५०-५४) घातलीं व उपदेश करून हर्यश्वांच्या मार्गानें जाण्यास त्यांस प्रवृत्त केलें अ० ५ श्लो० ३२-३३.]

ते शबलाश्वहि गेले वंदुनि [1]मुनितें [2]निजाग्रजपथानें, ।
गुरु करिती ध्याया शिव विनता तोका निजाग्र जप थानें. ॥ ६१

[3]वा र्ता परिसुनि कोपे **द**क्ष, [4]जयाच्या महाजन यशा [5]पी ।
[6]त्या **ना**रदासि, कल्पुनि निजपुत्रोद्धार तो अनय, [7]शापी. ॥ ६२

'**[8]सु** तघातका ! त्रिलोकीं भ्रमसिल, न स्थान पावसिल कांहीं.' ।
[9]शापी असें; तळमळे पुत्रस्मृतिहीं जसाच [10]सिलेंकांहीं. ॥ ६३

दे वर्षि स्वीकारी शापोक्ति, म्हणे सुखें 'तथास्तु' तिला; ।
बहुत रुचे सुकवीच्या श्री**ह**रिजनशांतिची कथा स्तुतिला. ॥ ६४

[11]वां रिजभव समजावी त्यातें जो [12]सुतविनष्टिनें कष्टी, ।
मग **द**क्ष **अ**सिक्नीच्या उदरीं उत्पन्न करि सुतां [13]षष्टी. ॥ ६५

[14]यें त्संततिनें भरले हे लोक तिन्ही, [15]तयांत दश **ध**र्मा, ।
[16]तेरा **क**श्यपमुनिला देउनि, तो **द**क्ष पावला [17]शर्मा. ॥ ६६

[18]न क्षत्राख्या कन्या दे सत्तावीस **द**क्ष [19]**सो**मातें, ।
तो हृदयांत म्हणे, 'या दानें भगवान् प्रसन्न हो मातें.' ॥ ६७

मो दें **भू**तासि दिल्या [20]दोनें, सुमुनि **अं**गिरा तया [21]दोनें, ।
[22]दोनें **कृ**शाश्वा, **ता**र्क्ष्या [23]चार, सुपात्रा म्हणेल कां [24]तो न ? ॥ ६८

---

१. नारदाला. २. आपल्या ज्येष्ठ भावांच्या–हर्यश्वांच्या–मार्गानें. ३. नारदानें आपल्या पुत्रांस बिघडविलें व अयोग्य मार्गी लाविलें ही वार्ता. ४. ज्या नारदाच्या. ५. प्राशी, आदरानें श्रवण करी. ६. निजपुत्रोद्धार (आपल्या पुत्रांचा उद्धार हा) अनय (अन्याय) कल्पुनि (समजून) तो (दक्ष) त्या नारदासि शापी–असा अन्वय. ७. अध्याय ५ श्लोक ३६-४३ यांत दक्ष नारदास जें बोलला त्याचें वर्णन आहे, व ४३ व्या श्लोकांत शापोक्ति आहे. ८. माझ्या पुत्राच्या इहपर अशा दोन्ही लोकांतील सुखाचा नाश करणाऱ्या नारदा! ९. येथें नारदशापकथा संपली. १०. थंडीनें ज्या पोटामध्यें कळा मारतात त्यांहीं. ११. ब्रह्मदेव. १२. पुत्रनाशानें. १३. साठ कन्या. [अ० ६ श्लो० २.] १४. ज्या मुलींच्या संततीनें तिन्ही लोक भरून गेले आहेत. [अ० ६ श्लो० ३.] १५. त्या कन्यांमध्यें दहा कन्या धर्माच्या पत्न्या होत. त्यांचीं नांवें:— भानु, लंबा, ककुब्, जामि, विश्वा, साध्वा, मरुत्वती, वसु, मुहूर्ता व संकल्पा. १६. या तेरांचीं नांवें:—अदिति, दिति, दनु, काष्ठा, अरिष्टा, सुरसा, इला, मुनि, क्रोधवशा, ताम्रा, सुरभि, सरमा व तिमि. ह्याच सुप्रसिद्ध लोकमाता होत. [अ० ६ श्लो० २६.] १७. सुखाला. १८. नक्षत्र आहे आख्या (नाम) ज्यांची. (कृत्तिकादि २७ नक्षत्रें.) १९. चंद्रातें. २०. स्वधा व सती. २१. एकीचें नांव सरूपा, दुसरीचें नांव ऊषा. २२. अर्चिष् व धिषणा. २३. विनता, कद्रू, पतंगी आणि यामिनी अशा चार. [अ० ६ श्लो० २१.] २४. तो (तार्क्ष्य) ह्या चार

भ जन अ[1]शेष नद्यांचें न घडे, परि न विटलाचि [2]मीन मनें, ।
दक्षसुता! हो! करितों मतिहीन अशक्त दीन [3]मी नमनें. ॥ ६९
ग [4]र्वें [5]सुरपति जे[6]व्हां गु[7]रुसि [8]सुधर्मासभेंत [9]अवमानी, ।
साहे न तो, गुरूनीं न सहावा, शाप मान [10]अवमानीं. ॥ ७०
[11]**व** र्जुनि सभेसि गेला [12]गुरु पश्चात्तप्त होय बहु [13]हरि तों ।
'अमलों मदें' म्हणे 'गुरुपदनमुनि स्वापराध [14]परिहरितों.' ॥ ७१
ते व्हां सुरगुरु झाला [15]गुप्त, न उमगेचि म्हणुनि [16]मघवा तें ।
स्वकृत स्मरे, क्षणक्षण कांपे तो दे[17]वतरुचि [18]अघवातें. ॥ ७२
[19]**वा** र्ता ऐकुनि [20]सुररिपु करिती [21]कविगुरुमतें [22]महासमर, ।
झाले भग्न, [23]विधिप्रति वंदुनि, निजवृत्त सांगती अमर. ॥ ७३
सु रपतिस [24]शब्द लावी प्रभु कीं, '[25]गुरुसत्कृतीस चुकलास, ।
मुकलास श्रीस, अहा! शक्रा! वि[26]जलाब्जसाचि [27]सुकलास. ॥ ७४
दे व! तुम्हीं त्वष्ट्याचा सुत [28]सुतपा विश्वरूप विनवा, जा ।
सोसा [29]विप्रियहि किमपि, [30]लघु न म्हणुनि फार तो कवि [31]नवाजा.'॥ ७५

स्वभार्या सुपात्रा होत्या असें कां म्हणणार नाहीं? हा **प्रश्न** अलंकार होय. या भार्यांच्या
ठायीं तार्क्ष्याला उत्तम संतति झाली म्हणून त्या सुपात्र होत–असा भाव.
१. सकल. २. मत्स्य. ३. मी मोरोपंत पराडकर. ४. ऐश्वर्यमदानें. ५. इंद्र. [अ० ७
श्लो० २-३.] ६. 'गर्वें सुरपति न उठुनि' असाही पाठ आहे. ७. अंगिराऋषीचा पुत्र बृह-
स्पति त्याला, आंगिरसाचार्याला. ८. सुधर्मा=देवसभा. 'स्यात्सुधर्मा देवसभा' इत्यमरः.
शोभनो धर्मोऽस्यामिति सुधर्मा. ९. गुरु देवसभेंत आला असतां प्रत्युत्थान देऊन इंद्रानें
सत्कार केला नाहीं. १०. निकृष्टांनीं, नीचांनीं. ११. सोडून. १२. बृहस्पति. १३. इंद्र.
१४. निरसन करतों. १५. आत्ममायेच्या योगानें गुप्त झाला. [अ० ७ श्लो० १६.]
१६. इंद्र. १७. कल्पवृक्ष. हें **रूपक** आहे. १८. पापवायूनें. १९. इंद्राला स्वापराधास्तव पश्चात्ताप
झाला आहे, बृहस्पतीचा पत्ता नाहीं, इंद्र अस्वस्थ आहे इत्यादि वार्ता. २०. दैत्य.
२१. शुक्र आणि बृहस्पती यांच्या अनुमतें. २२. मोठें युद्ध. २३. ब्रह्मदेवाला. [अ० ७
श्लो० १९.] २४. शब्द लावणें=दोष देणें. २५. गुरूच्या सत्कारास. २६. विजल+अब्जसा=
जलशून्य+कमळासारखा=उदकरहित कमलसाचि. २७. शुष्क झालास. २८. उत्तम तप
ज्याचें असा (विश्वरूप). २९. अनिष्ट गोष्ट. [विश्वरूपाचा दैत्यांकडे अधिक ओढा आहे,
पण तेवढें सहन करून त्याची आराधना करा म्हणजे तुमचें कार्य होईल. अ० ७ श्लो०
३५.] ३०. लघु (लहान, हलकट) न म्हणुनि (न म्हणतां, न समजतां) तो कवि (तो वि-
श्वरूप बुध) फार नवाजा (अत्यंत स्तवा, त्याची फार स्तुति करा.) ३१. वाखाणा.

वा[1] सवमुख सुर विधिला नमुनि म्हणति, ‘काम हा पुरो [2]धात्या ! ।
विनवुनि न [3]विश्वरूपा मग करितिल कां [4]महापुरोधा त्या ?’ ॥ ७६
य श [5]गेलें आणुनि दे ‘[6]नारायणवर्म’ तो कथुनि [7]हरिला, ।
त्या [8]विद्येनें [9]परमद शक्रें [10]त्यांचीं बळें मथुनि [11]हरिला. ॥ ७७
न[12] गभित् [13]त्यांसि [14]वधी, [15]सुरहेलन साहेल कां [16]महाभाग ? ।
कीं मातृस्नेहें दे असुरां [17]तत्प्रीतिकाम हा [18]भाग. ॥ ७८
मो डुनि मर्यादेतें, चोरुनि भलतेंचि तो करी [19]कर्म, ।
म्हणुनि वधी ईश्वरही [20]हत्या घे, न बुडवी बळें धर्म. ॥ ७९
भ जला वर्षभरि [21]तिळीं तो भगवान् [22]देवराज सविचार, ।
भूजलतरुस्त्रियांतें [23]हत्येचे दे विभाग [24]कवि चार. ॥ ८०

---

१. इंद्रप्रमुख. २. हे ब्रह्मदेवा ! ३. विश्वरूपा (त्वष्ट्याच्या पुत्राला) विनवुनि (प्रार्थून) मग (नंतर) त्या (विश्वरूपाला) [देव आपला] महापुरोधा (मोठा पुरोहित) कां न करितिल ? (कां करणार नाहींत ? अर्थात् करतील–असा भाव. ‘तूं ब्रह्मज्ञानी ब्राह्मण म्हणून गुरु आहेस, यास्तवच तुला आमचा उपाध्याय होण्याची वरणी देतो, तुझ्या प्रभावानें आम्हाला आपल्या शत्रूंचा पराजय अनायासें करितां येईल’ अशी देवांनीं विश्वरूपाची प्रार्थना केली. अ० ७ श्लो० ३२.] ४. पुरोहित. ५. गेलेलें (यश). ६. नारायणकवचरूप वैष्णवीविद्या. ७. इंद्राला. ८. त्या वैष्णवीविद्येनें. [या विद्येचें अथवा नारायणकवचाचें सविस्तर वर्णन अ० ८ श्लो० ४-३७ यांत आहे.] ९. शत्रूंचा गर्व. १०. त्या दैत्यांचीं सैन्यें. ११. हरण केला. १२. इंद्र. (नगांचा–पर्वतांचा–भेद करणारा.) १३. विश्वरूपासि. १४. शिरच्छेद करी. [देवांच्या उद्देशानें यज्ञ चालला असतां त्यांतील भाग विश्वरुप हा कांहीं तरी उपाय योजून असुरांला देई. मातृप्रेमाच्या पाशानें विश्वरूपाचा ओढा दैत्यांकडे अधिक होता म्हणून तो यज्ञांश दैत्यांला देण्याचें कपट करीत असे पण तें पुढें इंद्राला आढळलें. अ० ८ श्लो० ४.] १५. देवांचा अपमान, धिक्कार. १६. भाग्यशाली (इंद्र). १७. त्या असुरांची प्रीति संपादावी असा काम (इच्छा–मनोरथ) ज्याचा तो (विश्वरूप). १८. यज्ञांतील अन्नाचा अंश. १९. कपटानें यज्ञांश असुरांला देणें. २०. ब्रह्महत्या, विश्वरूपहत्या. [इंद्रानें ब्रह्महत्येचा स्वीकार सादर केला. अ० ९ श्लो० ६.] २१. ब्रह्महत्येला. २२. इंद्र. २३. ब्रह्महत्येचें क्षालन न केल्याबद्दल लोक इंद्राला दोष देऊं लागले तेव्हां त्यानें त्या हत्येचें पाप भूमि, उदक, वृक्ष आणि स्त्रीजाति यांजवर चार भाग करून ठेवून दिलें. [अ० ९ श्लो० ७.] हा पापाचा चतुर्थांश प्रत्येकानें कोणत्या प्रकारानें स्वीकारला ह्याचें वर्णन अ० ९ श्लो० ७-११ यांत आहे, तें इष्ट तर पहावें. वाल्मीकिरामायण–उत्तरकांड–स० ८६ श्लो० १५ पहा. २४. इंद्राचें ब्रह्महत्येचें पाप पृथ्वी, पाणी, वृक्ष व स्त्रिया यांनीं वांटून घेतलें असें वर्णन रामायणांत आहे. वाल्मीकिरामायण–किष्किंधाकांड–सर्ग २४ श्लो० १४.

ग[1] र्हितकर्में करि [2]हरिहनना त्वष्टा कवि प्रयोगातें, ।
निर्मी [3]वृत्रासि, मना [4]क्रुद्धाच्या कर्म कां न [6]यो गा! तें? ॥ ८१
व[7] न्हींतूनि प्रकटे, जेंवि युगांतीं [8]कृतांत, लो[9]कांतें ।
व्यापी वृत्र, सुराचें बळ भिववीना न होयं[10] तो कां तें? ॥ ८२
ते सुर [11]युगपत् शस्त्रें वर्षति मारावयासि वृत्रास, ।
तो तीं गिळी, विलोकुनि तें धरिती सर्व शस्त्रभृत् [12]त्रास. ॥ ८३
[13]वा रिजनाभप्रभुला गेला सुरराज शरण सुरसहित; ।
[14]यद्यश अमृताधिक [15]हृतशरणागतजन्ममरण [16]सुरस हित[17]. ॥ ८४
सु रचातकांसि भेटे [18]करुणाघन, [19]अभयदानवारीतें ।
मागति [20]आनन पसरुनि, तों दे त्यां, अभयदान [21]वारी [22]तें. ॥ ८५
दे व [23]स्तवनें हरिवरि होउनियां सुप्रसन्न वदला हें, ।
‘शक्रा! दधीचि मुनिच्या [24]अस्थिसुशस्त्रें पुन्हां स्वपद लाहें. ॥ ८६
[25]वा हेल शरीर तुम्हां अतिथींस, [26]जडाकडे न पाहेल, ।
आहे लक्ष ब्रह्मीं, [27]अर्थिमनोभंग तो न साहेल.’ ॥ ८७
य श परमाद्भुत [28]मुनिचें कीं निजवदनेंचि वानिलें [29]अजितें, ।
ऐका सर्वसुकविनीं भगवद्यशसेंचि मानिलें अजि! तें. ॥ ८८

---

१. निंदित. २. इंद्राला मारण्यासाठीं. [इंद्रानें विश्वरूपाला मारिलें म्हणून इंद्राचा वध त्वष्ट्याला इष्ट होता.] ३. वृत्रासुराला. [याचें वर्णन अ० ९ श्लो० १२-१८ पहा.] ४. कोपाविष्ट झालेल्या त्वष्ट्याच्या. ५. येवो. ६. हें **प्रश्ना**लंकाराचें उदाहरण आहे. ७. दक्षिणाग्नींतून वृत्र उत्पन्न झाला. [अ० ९ श्लो० १२.] ८. यम. ९. तो वृत्र आपल्या जिभेनें त्रिभुवनास ग्रासून टाकतो असें दिसे. १०. हें **प्रश्ना**लंकाराचें उदाहरण होय. ११. एकदांच. १२. भय. [श्लो० १९-२०.] १३. पुराणपुरुषाला. १४. ज्या विष्णूचें यश. १५. हरण केलीं शरणागताचीं जन्ममरणें ज्यानें असें. १६. मधुर, गोड. १७. कल्याणप्रद, मंगलकारक. १८. हें **रूपका**चें उदाहरण आहे. १९. अभयदानरूप उदकातें. २०. अतिनम्रपणें प्रार्थना करून. [आनन पसरणें=तोंड पसरणें, तोंड वेंगाडणें.] २१. निवारण करी, दूर करी. २२. वृत्रासुररूप संकट. २३. हें स्तवन अ० ९ श्लो० २१-४५ यांत आहे. २४. अस्थिरूप चांगल्या शस्त्रानें. [दधीचि मुनीच्या हाडांचें विश्वकर्म्यानें एक चांगलें आयुध (वज्र) तयार करावें व त्या वज्राच्या योगानें वृत्राचें शिर इंद्रानें तोडावें व असें झालें म्हणजे इंद्राला निजपद पुनः प्राप्त होईल. अ० ९ श्लो० २५.] २५. दधीचि मुनि वाहेल. २६. शरीराकडे. २७. याचकांच्या मनाचा भंग. २८. दधीचि मुनीचें. २९. विष्णूनें.

न मुनि [1]मुनिस [2]दस्र म्हणति, 'भगवंता! तूं प्रसन्न हो, पावें, ।
[3]ब्रह्मोपदेशसदमृत आम्हां शरणागतांसि ओपावें.' ॥ ८९

[4]**मो** घमनोरथ न करी, दस्रांसि म्हणे दधीचि, 'मग या, हें ।
सांगेन तत्व मी, या समयीं कर्मांत गुंतलों आहें.' ॥ ९०

भ[5] वनातें मुनिस नमुनि गेले ते, तों दधीचिला शक्र ।
भेटोनि बहु [6]दटावी [7]अन्योत्कर्षासहिष्णु जो [8]वक्र. ॥ ९१

'[9]**गं** वें ज्ञानबळाच्या करितां भलतेंचि कर्म ठकवीतें, ।
विप्रा! दुराग्रहानें घडतो बहु घात कर्मठ कवीतें. ॥ ९२

व दसिल जरि सद्विद्या त्या [10]वैद्यांतें मदुक्ति मोडूनी, ।
शस्त्रें सहसा उडविन [11]विप्रा! त्वन्मस्तकासि तोडूनी.' ॥ ९३

ते [2]दस्र पुन्हा येतां शक्रोक्त तयां दधीचि तो कळवी, ।
परि [12]सोध्वस त्या सद्गुरुसच्छिष्यांच्या न सद्यशा मळवी. ॥ ९४

[13]**वा** डववरासि [14]वडवासुत म्हणती, 'ज्ञानिनायका! पावें, ।
युक्ति असे कीं, तव शिर न म्हणों देतांचि '[15]हाय' कापावें. ॥ ९५

सु ज्ञवरा! [16]मग मस्तक अश्वाचें तुज मुहूर्त जोडावें, ।
[17]तेणें उपदेशावें त्वां, तें शक्रें यथेष्ट तोडावें. ॥ ९६

[18]**दे** दीप्यमान जैसें आहे हें [19]शिर असेंचि [20]योजावें, ।
गुरुदक्षिणा समर्पुनि आम्ही मग करुनि तुज '[21]नमो' जावें.' ॥ ९७

---

१. दधीचिमुनीला. २. अश्विनीकुमार. ३. ब्रह्मविद्यारूप उत्तम अमृत. ४. व्यर्थ काम. ५. स्वगृहाला. ६. दहशत घाली. [हे मुने! तुम्ही अश्विनीकुमारांला विद्या शिकवूं नका; माझ्या आज्ञेचें उल्लंघन करून त्यांना उपदेश केल्यास मी तुमचा शिरच्छेद करीन—अशी इंद्रानें दधीचिमुनीला दहशत घातली.] ७. अन्य+उत्कर्ष+असहिष्णु=दुसऱ्याचा उत्कर्ष न साहणारा. ८. सरळ स्वभावाचा नव्हे असा. ९. हें इंद्राचें दधीचीपाशीं झालेलें भाषण आहे. १०. अश्विनीकुमारांतें. ११. हे मुने! १२. भय. १३. विप्रवर्याला (दधीचिला). १४. वडवा=अश्विनी. १५. हाय (दुःखोद्गार) न म्हणों देतांचि (मुखांतून बाहेर निघणार नाहींत अशा प्रकारानें) तव (तुझें) शिर (मस्तक) कापावें (कापून काढावें अशी) युक्ति असे. तुझ्या मुखांतून हाय! हाय! असा दुःखोद्गार बाहेर न पडूं देतां शिर कापावें. १६. तुझें शिर छिन्न केल्यावर. १७. त्या अश्वमुखानें त्वां आम्हांला ब्रह्मविद्या उपदेशावी. [ही विद्या घोड्याचे मुखानें मुनीनें उपदेशिली म्हणून तिला 'अश्वशिर' नांव पडलें.] १८. तेजस्वी. १९. तुझें मूळचें कापलेलें मस्तक. २०. जोडावें. २१. नमस्कार.

वा क्या या **द**स्रांच्या होय जसा क्षुधित पायसा[1] मान्य, ।
केलें तसेंचि राजा! तो गुरु तो शिष्य काय सामान्य?[2] ॥ ९८

[3]**य** वस तसें सर्वस्व ब्रह्मज्ञा ज्या **द**धीचिला तुच्छ, ।
तो वेढिला सुरांहीं, [4]मधुपांहीं [5]स्वर्द्रुचा जसा [6]गुच्छ. ॥ ९९

[7]**न** गवर [8]मंदरसा कीं शतगुण [9]तदधिक उदार तो [10]विप्र ।
[11]थोरांच्या [12]कार्यावरि [13]जड तें पडतें म्हणोनि दे [14]क्षिप्र. ॥ १००

[15]**मो** देंचि दिलें मुनिनें [16]वपु [17]विद्याव्रततपःसुकृतसार, ।
फार प्रहृष्ट झाले तत्सत्त्वें सकळ सुर [18]सपरिवार. ॥ १०१

[19]**भ** व्यप्रभ रचुनि [20]सुमुनिशुक्तींहीं वज्र **वि**[21]श्वकर्मा तें ।
दे **श**क्रा; गातें त्या अतुळा अद्यापि [22]विश्वें कर्मातें. ॥ १०२

[23]**ग** जराजीं **श**क्र चढे भगवत्तेजःप्रदीप्त [24]परंतेजा; ।
तृणसम गमति [25]असुरभट जे **वृ**त्रासुरसहाय [26]परं ते [27]ज्यां. ॥ १०३

[28]**व** ज्री [29]सामर सासुर **वृ**त्रासीं [30]**न**र्मदातटीं झगडे, ।
देवांच्या तेजांहीं दैत्यांचें तेज [31]संगरीं [32]रगडे. ॥ १०४

ते जस्वी **वृ**त्र [33]करी जरि [34]कीर्तिसुलोकहेतुहित बोध[35], ।

---

१. पायस=क्षीर. २. तो गुरु आणि तो शिष्य असामान्य (लोकोत्तर) होत–असा भाव. हें **प्रश्नाल**ंकाराचें उदाहरण समजावें. ३. तृण. ४. भ्रमरांनीं. ५. स्वर्+द्रुचा=स्वर्ग+वृक्षाचा=कल्पवृक्षाचा. येथें **उपमा** अलंकार 'जसा' या शब्दाचा प्रयोग केल्यानें झाला आहे. ६. झेंडू, पुष्पघोंस. ७. नग+वर=पर्वत+श्रेष्ठ=पर्वतवर्य. [न गच्छतीति नगः=अचलः.] ८. मंदर हा एक श्रेष्ठ पर्वत होय. चतुर्दश रत्नें काढण्यासाठीं सुरासुरांनीं समुद्रमंथनप्रसंगीं या पर्वताची रवि केली होती. ९. त्याहून अधिक, मंदर पर्वताच्या शंभरपटीनें ज्यास्त. १०. दधीचिमुनि. ११. श्रेष्ठांच्या (देवांच्या). १२. कार्यावरि पडणें=उपयोगीं पडणें, कामीं पडणें. १३. जड-शरीर. १४. त्वरित. १५. मोद=आनंद. १६. शरीर. १७. जें (वपु) विद्या, व्रत, तपस्या आणि पुण्य यांचें सार होय असें (वपु). १८. आपल्या परिजनांसह. १९. भव्य आहे प्रभा (कांति, तेज) ज्याची असें. २०. उत्तम मुनीच्या अस्थींनीं. २१. अध्याय १० श्लोक १२-१३ पहा. २२. सकल जगत् या अनुपम कृतीची प्रशंसा करतें. २३. ऐरावतावर. २४. उत्कृष्ट तेजस्वी. २५. दैत्यवीर, दैत्यसेनापति. २६. शत्रु. २७. ज्या शक्राला. २८. इंद्र. २९. अमरांसहित. ३०. नर्मदेच्या तीरावर देवांचें दैत्यांशीं भयंकर युद्ध झालें. [अ० १० श्लो० १६.] ३१. समरांत, युद्धांत. ३२. चुरे, चुराडा होऊन जाई. देवांनीं दैत्यांचा धुवा उडविला. ३३. वृत्रानें पळून जाणाऱ्या दैत्यांला हितप्रद उपदेश केला. ३४. कीर्ति (उत्तम यश)+सुलोक (उत्तम लोक, मोक्षलोक)+हेतु (कारण) आहे असा

तरि त्याचे[1] न परतले जे भग्न[2] त्रस्त[3] असुरवर योध. ॥ १०५

वा रुनि भग्नवधोद्यत[5] सुर धिक्कारूनि होय परवीर[6] ।

करवीर[7] जयश्रीचें, देवांकरवीं रणांत करवी र[8]. ॥ १०६

सु[9] र मथि, न भी परबळा[10], जैसें भ्यावें न अर्णवा[11] मकरें, ।

शक्रप्रहितगदेतें[12] धरि जैसें बर्हिपर्ण[13] वामकरें[14]. ॥ १०७

दे वेश्वरवाहनगज[15] त्याचि गदेनें रणांगणीं ताडी, ।

मागें सप्त[16] धनु सरे[17], कीं त्याच्या विकळ जाहल्या नाडी. ॥ १०८

वा सव जों सावध करि निजगज फिरवूनि अमृतमय[18] पाणी, ।

तों तो वृत्र व्यसनीं न गदा पुनरपि शचीपतिस[19] हाणी. ॥ १०९

य द्यपि असुर तदपि बहुधर्मन्यायैकसार[20][21] तो बोले, ।

जें ऐकुनि परमसुखें तद्धननोद्यत[22] सुरेंद्रही डोले. ॥ ११०

न[23] यधर्मश्रीभगवद्भक्तिरहस्यज्ञ विगतकुत्स[24] वदे, ।

'वज्रें वधिसिल, शंका[25] त्यज' ऐसें म्हणुनि हरिस[26] उत्सव दे. ॥ १११

(बोध) जो बोध कीर्तीच्या आणि उत्तम लोकाच्या प्राप्तीस कारण आहे असा (बोध) ३५. हा बोध अध्याय १० श्लोक ३१-३३ यांत आहे.

१. वृत्राचे योध (भट) न परतले (पाठीमागें फिरले नाहींत, जे पळाले ते पळालेच). २. हतधैर्य. ३. भयभीत. ४. वृत्र सुर वारुनि जयश्रीचें करवीर होय. ५. भग्न+वध+उद्यत=भग्न झालेल्यांच्या नाशाविषयीं उद्युक्त. ६. उत्कृष्ट वीर. ७. पुष्पविशेष. (कणेरीचें फूल.) ८. देवांकरवीं रणांत र करवी म्हणजे त्यांस रडवीं—असा भाव. ९. [वृत्रासुर] सुर (देव) मथि (संहारी). १०. शत्रुसैन्याला. ११. सागराला. १२. इंद्रानें (वृत्रासुराच्या आंगावर) फेंकलेल्या गदेतें. [अ० १० श्लो० ९.] १३. मयूरपिच्छ. १४. डाव्या हातानें. १५. ऐरावताला. वृत्रासुरानें गदा हातीं धरून ऐरावताच्या गंडस्थळावर प्रहार केला. [अ० १० श्लो० १०.] १६. सात धनुष्यें=अठ्ठावीस हात. १७. ऐरावत अठ्ठावीस हात मागें सरला. [श्लो० ११.] १८. अमृत पाझरणारा हात. १९. इंद्राला. वृत्रानें इंद्रावर प्रहार केला नाहीं हें वृत्राच्या औदार्याचें सूचक होय. २०. हें वृत्राचें भाषण अध्याय ११ श्लोक १३-२३ यांत आहे. इंद्रापाशीं यथान्याय भाषण करून वृत्रानें परमेश्वराची प्रार्थना केली. [अध्याय ११ श्लोक २४-२७.] २१. पुष्कळ धर्म आणि नीति यांचा उत्तम अंश ज्यामध्यें आहे असा (असुर), धर्मन्यायकोविद असा. २२. तत्+हनन+उद्यत=त्या वृत्रासुराच्या नाशाविषयीं उद्युक्त. २३. नीति, धर्म आणि परमेशभक्ति यांचें रहस्य जाणणारा (वृत्रासुर). २४. निंदारहित. २५. तूं मला वज्रानें मारण्यास समर्थ आहेस याविषयीं शंका धरूं नको. २६. इंद्राला.

मो[1] दाकर होउन मी, सत्पदलाभें[2] घडो रणीं मरण, ।
हो भलतें जन्म, असो तेथें भगवत्पदांबुजस्मरण.' ॥ ११२
भ क्त [3]परमपुरुषाचा तो **वृत्र** [4]भवांतरीं असें कळलें, ।
कीं ऐशा असुरपणीं ज्ञान तयांचें न लेशही मळलें. ॥ ११३
ग र्जुनि हरिवरि **वृत्र** प्रेषी अत्युग्र शूळ, [5]त्यासकट ।
वज्रें [6]तद्दक्षिणभुज तोडुनि करि शक्र विक्रम प्रकट. ॥ ११४
[7]व ज्र धरासि [8]कपोलीं [9]तदिभासहि एक भुजहि [10]परिघातें ।
[11]व्यापारुनि [12]तो ताडी, पाडी [13]पवि, [14]अधिक काय [15]हरिघातें? ॥ ११५
ते व्हां लाजे [16]हरि, पवि नुचली कीं गळुनि अरिपुढें पडला, ।
[17]वृत्र म्हणे, 'घे' परिभव कोणा [18]अजितेतरा नसे घडला? ॥ ११६
[19]बा हु असे एक तरि; त्यजिला म्यां संगरीं न [20]आंवांका, ।
तूं कां त्यजिसी? न [21]म्हणें वीरांतें युद्ध धर्म हा वांका?' ॥ ११७
सु रराज म्हणे, 'बापा! **वृ**त्रा! तरलासि **वि**ष्णुची [22]माया, ।
बा! [23]धन्य तूं, तुझ्या नयधर्मज्ञपणा नसेचि सीमा या.' ॥ ११८
दे[24] वेशावरि वृत्रें मग पुनरपि टाकिला [25]परिघ, राया! ।
[26]हरिला सांगुनि धाडुनि पवि सभुजा हानि ने परि घरा [27]याँ. ॥ ११९

---

१. मोद+आकर=आनंदाची खाण. २. उत्तम पदाचा लाभ होऊन. ३. विष्णूचा. ४. जन्मांतरीं. ५. त्या शूळासहित. ६. त्या वृत्राचा उजवा बाहु तोडून खालीं उतरला. [अ० १२ श्लो० ३.] ७. इंद्राला. ८. गालाचे ठायीं. ९. तत्+इभासहि=त्याच्या+गजालाही=इंद्राच्या ऐरावताला देखील. १०. एका हातानें परिघातें उचलून. ११. वावरूनि. १२. तो वृत्र. १३. वज्र. १४. हें **सप्रश्न अधिक** नामक अलंकाराचें उदाहरण जाणावें. १५. इंद्रघातें. १६. इंद्राला फार लाज वाटली, व गळून खालीं पडलेलें वज्र पुन: उचलून तो घेईना. १७. वृत्र म्हणाला:—घे (हे इंद्रा! वज्र उचलून घे), अजितेतरा (अजित+इतरा=परमेश्वर+अन्या) कोणा परिभव नसे घडला? (ईश्वराशिवाय अन्य कोणाला पराभव घडला नाहीं? ईश्वरावांचून सर्वांला पराभव सोसावा लागला आहे; नाहीं लागला असें नाहीं, तेव्हां लाज मानण्याचें कांहीं कारण नाहीं—असा भाव. अध्याय १२ श्लोक ६-७ पहा.) १८. अजित+इतर=ईश+अन्य. १९. माझा जरी एकच भुज आहे तरी. २०. धैर्य, उत्साह. [अ० १२ श्लो० १६.] २१. अध्याय १२ श्लोक १९-२२ पहा. २२. विष्णूची माया सकलांस मोह घालते, पण साधुपुरुषाचे आचार पाळून तूं त्या मायेला तरून गेलास. (श्लो० २०.) २३. कृतार्थ, सफलजीवित. २४. इंद्रावर. २५. श्लोक २४ पहा. २६. शक्रास. २७. परिघास.

वा *सुनि मग मुख केला विस्तीर्ण [1]रसातळापरीस गळा ।*
वृत्रें गिळिला तो त्या [2]वज्रधरासह [3]महाकरी सगळा. ॥ १२०
य द्यपि भ्यावें भ्याला [4]भगवत्तेजें न [5]कुक्षितिमिरासी, ।
[6]यावत्प्राण न सोडी वृत्र [7]समिति, जेंवि [8]कुक्षिति [9]मिरासी. ॥ १२१
[10]न गभित् चित्तीं चिंती मोहतमाच्याचि [11]कुक्षितमिं रवितें, ।
बालार्कतेज [12]कुक्षिक्षतजें होऊनि [13]उक्षित मिरवि तें. ॥ १२२
[14]मो ह तसा **वृ**त्राचा [15]कुक्षि, दृढ ज्ञान तेंवि वज्र, नृपा! ।
झाला मुक्त, [16]शतक्रतु, **जी**व, गुरु **द**धीचिमूर्ति, **वि**ष्णुकृपा. ॥ १२३
भ गवान् [17]हरि मग [18]वर्षे **वृ**त्राचा [19]अशनिनें गळा कापी, ।

---

१. पृथ्वीच्या पृष्ठभागासारखा विस्तीर्ण. २. वृत्रानें इंद्रासह ऐरावताला गिळिलें. [अ० १२ श्लो० ३१.] ३. मोठा हत्ती, ऐरावत. ४. भगवंताच्या तेजाच्या प्रभावानें. ५. उदरस्थ अज्ञानासि. ६. जोंपर्यंत प्राण होता तोंपर्यंत. ७. युद्ध. [समीति=संगर. 'अथ संगरे । संगे सभायां समितिः' इत्यमरः. 'समितिर्युधि संगमे । साम्ये सभायाम्' इति हेमचंद्रः.] ८. कुत्सितभूमि, क्षुद्र वतनवाडी. ९. वतनदार. १०. इंद्र. (अ० १२ श्लो० ३१.) ११. कुक्षितमिं (वृत्रासुराच्या उदरस्थ अंधकारांत) मोहतमाच्याचि रवितें (मोहरूप अंधकाराचाच सूर्य असा मोहहारक जो विष्णु त्यातें) नगभिद् (इंद्र) चित्तीं (आपल्या अंतःकरणांत) चिंती (आठवी-स्मरे) कुक्षिक्षतजें (वृत्रासुराच्या पोटांतील जखमेच्या रक्तानें) उक्षित (सिंचित, माखलेला असा) होऊनि तें (तत्संबंधीं) बालार्कतेज (प्रभातकालच्या सूर्याप्रमाणें ताम्रवर्ण तेज) मिरवि (धारण करी.) १२. कुशीसंबंधी रक्तानें. १३. सिंचित. १४. मोह (अज्ञान) [जसा] तसा वृत्राचा कुक्षि [होय]. [जेंवि] दृढ ज्ञान (अज्ञानाचें-मोहाचें-निरसन करणारें जसें ब्रह्मज्ञान-तत्त्वज्ञान) तेंवि (तसें) वज्र [होय.] शतक्रतु (इंद्र हाच) जीव (जन्ममरणाच्या फेऱ्यांत सांपडलेला नष्टज्ञान असा प्राणी) [होय.] दधीचिमूर्ति (दधीचि नामक मुनि ज्यानें कृपा करून आपल्या अस्थि इंद्राला वज्र करण्यासाठीं दिल्या तो) गुरु (तत्त्वज्ञानोपदेष्टा, ज्ञानोपदेशक) [होय] [यास्तव शतक्रतु] मुक्त (संकटांतून मुक्त, मोहरूप संसारांतून उत्तीर्ण) झाला. [हे] नृपा! (हे परीक्षिते!) [ही] विष्णुकृपा [होय] (हें सर्व फल विष्णुकृपेचें होय, विष्णुकृपेनें ही गोष्ट घडून आली. गुरुदर्शन होऊन ज्ञानप्राप्ति होऊन मोहापासून जीवाची मुक्ति होण्यास एक विष्णुकृपाच साधन होय-असें सांगण्याचें तात्पर्य.) १५. उदर. १६. शत (शंभर) क्रतु (यज्ञ), ज्यानें केलें तो (इंद्र). शंभर यज्ञ यथाविधि केल्यानें इंद्रपदलाभ होतो-असें पुराणवर्णन आहे. १७. [इंद्र वृत्राचें उदर वज्रानें फाडून बाहेर पडला-अ० १२ श्लो० ३२.] १८. वज्रानें वृत्राचा गळा कापण्यास इंद्राला एक वर्ष लागलें. [अ० १२ श्लो० ३३.] १९. वज्रानें.

[1]वज्रितनुच्छुरिकेला मरणार्थचि [2]वृत्रतनुबळाका [3]पी. ॥ १२४
ग ति बहु [4]बरवी घडली **वृत्रा** असुरासि आयका हो! ती, ।
श्री**भग**वंतीं शिरलें [5]तद्देहोत्थित सुनिर्मळ [6]ज्योती. ॥ १२५
व ध **वृ**त्राचा होतां झाला [7]सर्वामरांसि बहु तोष, ।
इंद्रचि फार तळमळे कीं तो घडला तयासि [8]अतिदोष. ॥ १२६
ते वृत्रहानि चित्तीं शतदा एका घडींत आठव दे, ।
त्या '[9]तिष्ठ तिष्ठ' ऐसें [10]हत्या घेउनि बळेंचि [11]पाठ वदे. ॥ १२७
वा सव पळोनि फार श्रमला, मग [12]**मा**नसा [13]सरा गेला, ।
[14]अवश अशांत म्हणुनियां तो बहु निज[15]मानसास रागेला. ॥ १२८
[16]**सु** टला श्री**ह**रितेजें, नच शिरुनि [17]सरोजनालतंतूंत, ।
[18]महदाश्रयाविना [19]पटु [20]भोग चुकविणार कोण [21] [22]जंतूंत? ॥ १२९
दे वेंद्र भोगवर्जित दीन [23]लपाला [24]सहस्रहायन गा! ।
त्यासि विपत्काळ म्हणवि जेंवि अनावृष्टिकाळ 'हाय' [25]नगा. ॥ १३०
वा स असा **श**क्र करी, तेव्हां [26]पाळी सुरां [27]**न**हुख पावे ।

---

१. इंद्रशरीररूप सुरीला. २. वृत्रासुराची शरीररूप बगळी ती. ३. प्राशी. हें **रूपक** आहे. ४. चांगली, उत्तम. ५. तत्+देह+उत्थित=त्या वृत्रासुराच्या देहापासून उत्पन्न असें. ६. वृत्राचें आत्मतेज भगवत्स्वरूपीं मिळालें. ७. सकल देवांला. ८. वृत्रवधरूप मोठें पाप, ब्रह्महत्यारूप महापाप. [ब्रह्महत्या चंडालीसारखें रूप धरून इंद्राच्या पाठीस लागली व तिनें तोंडानें 'थांब, उभा रहा' असा घोष चालविला होता. इंद्र एकसारखा पळत होता. अ० १३ श्लो० १२-१४.] ९. रहा, रहा. १०. ब्रह्महत्या. ११. पाठ घेऊन=पाठीस लागून. 'पाठ घेणें' हा शब्दसंप्रदाय कोशकारांचीं नमूद करण्यासारखा आहे. १२. इंद्र ईशान्य दिशेकडे मानससरोवरांत शिरला. १३. सरोवराला. १४. फार परस्वाधीन. १५. आपल्या मनाला. १६. विष्णूच्या तेजानें इंद्राची वृत्रहत्यारूप पापापासून मुक्तता झाली. विष्णुतेजानें पापराशीचें भस्म झालें. [अ० १३ श्लो० २०.] १७. सरोजनालतंतूंत=कमलांच्या नालाच्या तंतूंत प्रवेश करून सुटका झाली नाहीं. १८. थोरांच्या आश्रयाशिवाय. १९. समर्थ, कुशल. २०. दुःखभोग. २१. हा **काव्यार्थपत्तियुक्त अर्थांतरन्यास** अलंकार होय. २२. प्राण्यांत. २३. सहस्र वर्षेंपर्यंत कमलनालांत लपून होता. २४. हजार वर्षें. [हायन=वर्ष.] २५. वृक्षा. २६. तेव्हां (जेव्हां इंद्र लपला होता तेव्हां) नहुख (नहुष राजा) सुरां पावे (देवांस पावला, नहुषानें देवांवर कृपा केली) [आणि] पाळी (देवाचा प्रतिपाळ करी). [सदाशिवानें रामावर कृपा केली तर सदाशिव रामाला 'पावला' असें म्हणण्याचा संप्रदाय आहे. 'मला देव पावला' 'देव पावेल तर सर्व कांहीं होईल' असे प्रयोग नेहमीं बोलण्यांत आढळतात.]

परि त्याला मद झाला, जेणें गरळें तसे बहु खपावे. ॥ १३१
य[1] ति सत्कृतिच्या[2] तैसा **न**हुष **श**चीच्या[3] धरून कामातें, ।
होय पदभ्रष्ट[4], वरिति जरि कुमति म्हणे 'वरू नका मातें.' ॥ १३२
न हुष **श**चीनें सुरगुरुकथितोपायें[5] महर्षि[6] शिबिकेला[7] ।
योजवुनि तींत बसवुनि परमपदभ्रष्ट[8] जेधवां केला. ॥ १३३
मो ठे मोठे ज्ञानी ब्रह्मर्षि **म**रीचिमिश्र[9] जाणूनी ।
ज्ञानें गुप्तस्थितितें[10] **श**क्रातें स्वस्थळासि[11] आणूनी. ॥ १३४
भ गवंतातें सांगें[12] हयमेधें ते यथोक्त यजवूनी ।
हत्येपासुनि **श**क्रा सोडविती[13] **ह**रिजनासि भजवूनी. ॥ १३५
गं[14] जपुरनाथ पुसे, 'तो **ना**[15]रायणभक्त **वृ**[16]त्र असुर मला ।
नवल गमे, सांग गुरो[17]! **कृ**ष्णींच कसा, त्यजूनि असु[18], रमला?' १३६
व दला **शु**कमुनि, 'पूर्वी होता[19] नृप **चि**त्रकेतु मघवासा[20], ।

परि (परंतु) त्याला (त्या नहुषाला) मद झाला. जेणें (ज्या मदाच्या योगानें) गरळें तसे (विषाच्या योगानें जसे तसे) बहु (अनेक लोक) खपावे (नाशातें पावावे–शेंकडों गणती नष्ट व्हावे, मदानें नाश झाला नाहीं असा कोणी नाहीं–असें तात्पर्य.) २७. नहुष.

१. संन्यासी. २. सत्काराच्या. ३. इंद्रपत्नीच्या. ४. पदभ्रष्ट होय (नहुष इंद्रपदापासून भ्रष्ट झाला; नहुष शचीचा अभिलाष धरून इंद्रपदास मुकला.) 'मातें वरू नका' (माझा अंगीकार करूं नका, माझा स्वीकार जर कराल तर तुमचें अकल्याण होईल असें) कुमति (दुष्ट बुद्धि) जरि म्हणे (जरी म्हणते, लोकांस सांगते, उपदेश करते) [तरी देखील नहुषासारखे दुष्ट लोक] वरिति (कुमतीला वरतात, कुमतीचा अंगीकार करतात). ५. सुर+गुरु+कथित+उपाय=बृहस्पतीनें कथन केलेल्या उपायानें. ६. अगस्त्यादि महामुनि. ७. पालखीला. ८. इंद्रपदभ्रष्ट. ९. मिश्र (आर्य, पूज्य, सन्मान्य) हा शब्द पंडितांच्या अथवा मुनिजनांच्या नामाच्या अंतीं गौरवार्थ योजितात–असें आर्यमिश्र, मंडनमिश्र, वसिष्ठमिश्र इत्यादि. १०. इंद्राच्या गुप्त वसतिस्थानातें. ११. स्वर्गाला. १२. यथायोग्य, पूर्ण अंगसहित (अश्वमेधानें.) [ब्रह्मर्षिजनांनीं इंद्राकरवीं अश्वमेधाची यथासांग दीक्षा घेवविली व विष्णूची आराधना करविली.] १३. ब्रह्मर्षि शक्रा सोडविती–असा अन्वय. गीति १३४-१३५ यांचें अर्थसंबंधानें 'युग्म' आहे. [अ० १३ श्लो० २१.] १४. हस्तिनापुराचा स्वामी (परीक्षित्). १५. पुराणपुरुषभक्त. १६. वृत्र हा स्वभावतः तमोगुणी, रजोगुणी व पापी असून त्याची भक्ति नारायणावर जडली म्हणून परीक्षितीला आश्चर्य वाटलें. [अ० १४ श्लो० १-६.] १७. हे महामुने! शुकाचार्या! १८. असु (प्राण) त्यजूनि (टाकून) कृष्णींच (भगवंताच्या ठायीं) कसा रमला (रत झाला?)–असा अन्वय. १९. शूरसेनदेशांत चित्रकेतु राजा होता. [अ० १४ श्लो० १०.] २०. इंद्रसा.

[1]ज्या खळबळ भी, श्रीहरिपदतुळसीच्या जसेंचि [2]अघ वासा. ॥ १३७

ते णें केल्या होत्या भार्या [3]शुभरूपशीलनिधि [4]कोटी, ।
परि तो [5]अनपत्य, नृपा! बा! दैवाची असीच गति खोटी. ॥ १३८

[6]**वा** माक्षी त्या भार्या, [7]श्री [8]भू कांहींच त्या नृपा न [9]रुंचे, ।
[10]अनपत्या विभवाचे गुण अगुणचि, जेंवि निष्फळा [11]तरुचे. ॥ १३९

[12]**सु** कृतमय करी मंदिर लावुनियां [13]पाय [14]अंगिरा [15]यांचें, ।
[16]ज्येष्ठेसि एक सुत दे, मन [17]निववी [18]आधिसंगि रायाचें. ॥ १४०

दे उनि [19]यज्ञोच्छिष्ट ज्येष्ठस्त्रीतें, नृपास मुनिराय ।
'सुत एक [20]हर्षशोकप्रद होइल तुज,' असें म्हणुनि [21]जाय. ॥ १४१

वा ळक [22]सुप्रभ झाला, त्या पाहुनि **चित्र**केतु बहु हर्षे, ।
[23]अर्थिजनीं सर्वत्रहि तो [24]धन [25]घन [26]वनतसें विपुळ [27]वर्षे. ॥ १४२

---

१. ज्या चित्रकेतूला खळबळ (दुष्टांचें सैन्य) भी (भीत असे). २. पाप. श्रीविष्णुपादावरील तुळशीच्या वासाला जसें पाप भितें तसें दुष्ट सैन्य या राजाला भीत असे. ही **उपमा** आहे. ३. उत्तम सौंदर्य आणि स्वभाव यांचा सागर अशा. ४. दशसहस्र, एक कोट. ५. पुत्ररहित. जे मनुष्य निपुत्रिक असतात त्यांस मुक्ति नाहीं अशी समजूत आहे. 'अपुत्राणां किल न सन्ति लोकाः शुभाः' इत्यादि कादंबरीग्रंथांतील वर्णन पहा. [कादंबरी–पूर्वभाग–पृ० १२८ निर्णयसागर आवृत्ति. ६. सुंदरनयना. [वाम+अक्ष=सुंदर+नेत्र.] ७. लक्ष्मी, संपत्ति. ८. पृथ्वी. ९. अनपत्यतेमुळें संपत्ति रूपवती स्त्रिया आणि पृथ्वी यांनीं राजाला समाधान वाटलें नाहीं. १० जो अनपत्य (पुत्ररहित) आहे त्याला विभवाचे (ऐश्वर्याचे) गुण हे अगुणच असें वाटतें. अनपत्य पुरुषाला ऐश्वर्यापासून संतोष वाटत नाहीं. ११. तरुचे गुण (छाया इत्यादि) अगुणच होत. १२. पुण्यमय, मंगलप्रद. १३. 'पाय लावुनियां' हा सुप्रसिद्ध लोकप्रवादाचा अनुकार होय, म्हणून हा **लोकोक्ति**-नामक अलंकार समजावा. १४. अंगिरा मुनि याच्या घरीं आला असें सरळ वर्णन न करतां पर्यायानें वर्णन केलें आहे म्हणून **पर्यायोक्त** होय. १५. चित्रकेतूचें. [अ० १४ श्लो० १४.] १६. कृतद्युति नामक वडील राणीला अंगिरामुनीच्या प्रसादानें यज्ञांतील शेषभाग मिळाला व एक पुत्र होईल असा आशीर्वाद प्राप्त झाला. १७. शांत करी. १८ मनोव्यथेचे सोबती. १९. यज्ञांतील शेषभाग. २०. जन्मामुळें आनंद देणारा आणि मरणानें शोक देणारा असा. [अ० १४ श्लो० २९.] २१. आशीर्वाद देऊन अंगिरा निघून गेला. २२. तेजस्वी उत्कृष्ट प्रभा ज्याची असा. २३. याचकजनांवर. २४. सोनें, रुपें, वस्त्रें, अलंकार, गांव, घोडे, हत्ती इत्यादि संपत्ति राजानें याचकांस दिली. [अ० १४ श्लो० ३४.] २५. मेघ. २६. उदकसें. २७. 'वर्षे' क्रियापद देहलीदीपन्यायानें योजिलें पाहिजे.

यश संवतिचें[1] न सोसे, देति शिशुसि[2] पापमानसा[3] गैर[4] गा! ।
क्षोभुनि उपडिति वंशा जेंवि नगा[5] सापमान[6] सागरगा[7]. ॥ १४३

नगवर[8] वज्राघातें, सुतशोकें तेंवि[9] भूप[10] तो पडला, ।
राज्ञी कृतद्युति[11] जसी शतगुण बहु **चि**त्रकेतुही रडला[12]. ॥ १४४

मोह हराया त्यांचा[13] **ना**रदसह **अं**गिरा नृपा[14]! आला, ।
तत्सुतशोक[15] शमाया सांगति बहु सद्विवेक[16] ते त्याला. ॥ १४५

'[17]**भ**र शोकांचा[18] कां? हा[19] कोण तुझा? तूंहि काय गा! यांचा[20]? ।
गावा[21] श्रीहरिच, नव्हे लटिका; संबंध काय गायाचा? ॥ १४६

ग[22]णिति न बुध संबंधा, सम युक्तवियुक्तवाळुका[23] काय, ।

---

१. सपत्नीचें, कृतद्युतीचें. [सवतीची पुत्रसंतति पाहून इतर स्त्रिया मत्सरानें जळफळत असत. अ० १४ श्लो० ४२.] २. अर्भकाला. ३. पाप (दुष्ट) आहे मानस (चित्त) ज्यांचें अशा सवती. ४. विष. ५. वृक्षाला. [अ० १४ श्लो० ४३.] ६. स+अपमान= अवज्ञासहित. ७. सागर+गा=समुद्राप्रत जाणाऱ्या नद्या. नदी पूरानें आपल्या तटाला आणि तटावरील वृक्षांला ओढून नेते, म्हणूनच तिला 'कूलंकषा' अशी संज्ञा आहे. ८. नग+वर=पर्वत+श्रेष्ठ=मोठा पर्वत. ९. ही **उपमा** आहे. १०. चित्रकेतु. ११. राणीच्या पुत्रशोकनिमित्तविलापाचें वर्णन अध्याय १४ श्लोक ५३-५८ यांत आहे. १२. राजा, राणी आणि सेवकजन शोकातिवेगानें मूर्च्छा येऊन भूमीवर पडले. सर्व अंतःपुर निश्चेष्ट झालें. [अ० १४ श्लो० ६०.] १३. त्या चित्रकेतु राजाचा. १४. हे परीक्षित राजा! १५. तत्+सुत+शोक=त्याचा पुत्रशोक. १६. उत्तम विचार. १७. मुनींचें भाषण अध्याय १५ यांत आहे. १८. हे राजा! तूं कशासाठीं शोक करतोस? १९. हा मृत बालक. २०. मृतपुत्राचा. २१. [जो] लटिका (मिथ्या) नव्हे (जो सत्य आहे तो) श्रीहरिच गावा (त्या श्रीहरीचेंच भजन करावें, त्याचेंच ध्यान करावें); संबंध गायाचा काय? (संबंध गायाचा नव्हे, कारण तो लटिका आहे. या जगतांत कोणी कुणाचा नव्हे यास्तव संबंध (नातें) (मिथ्या समजून) गाऊं नये). २२. बुध (ज्ञातेजन, ज्ञानी पुरुष, ब्रह्मज्ञानी जन) संबंधा न गणिति (नातें मनांत आणीत नाहींत, ऐहिक परस्पर संबंधाचें महत्त्व मानीत नाहींत), [कारण] युक्तवियुक्त वाळुका सम (प्रवाहाचे योगानें वाळू एकत्र होते अथवा वेगळी होते त्यासारखा) काय (देह, नरदेह) [आहे]. [भागवत-स्कं० ६ अ० १५ श्लो० ३.] नात्याचा नियम नसे (नातें-संबंध-मिथ्या आहे, नातें हें अनित्य, अनिश्चित आहे. अ० १५ श्लो० २३]. त्याचा (त्या अनित्य व मिथ्या अशा संबंधाचा-नात्याचा) तूं सुज्ञ (ज्ञाता असून) आळुका काय (नादीं लागणारा, नाद-छंद-धरणारा कसा?) [आळ=ळळा, हट्ट, छंद. आळुका=छांदिष्ट पुरुष, नादी पुरुष, छंद लागलेला. भुकेचा अळका किंवा आळुका, झोंपेचा अळका, आळुका-असे प्रयोग भाषणव्यवहारांत आढळतात.] २३. वाळुकाकण संयोग अथवा वियोग स्रोतोवेगानें पावतात तसा. [अ० १५ श्लो० ३.]

नियम नसे नात्याचा, त्याचा तूं सुज्ञ आळका काय[1]?' ॥ १४७
वदले बहु; भूप पुसे, 'कोण तुम्हीं सदय बोधितां या[2] हें?' ।
त्यासि म्हणे मुनि, 'जो तुज पुत्रद मी तोचि **अं**गिरा आहें. ॥ १४८
तेजोनिधि हा दुसरा **ना**रदमुनिराज पूर्ण सुज्ञानें[3], ।
व्हावें संसारीं त्वां यासि[4] नमुनि धन्य तूर्ण सुज्ञानें[5]. ॥ १४९
वा! द्यावें ज्ञानचि तुज तेव्हां जनकें जसें सुता वित्त, ।
पुत्रचि दिधला म्यां, कीं पुत्रींच तुझें निविष्ट[6] बहु चित्त. ॥ १५०
सु[7]तवंताचा आतां अनुभविला कीं तुवां महाताप? ।
[8]तापद असेचि दारा[9]गेहादि पदार्थ सर्व हे सांप[10].' ॥ १५१
दे[11]वर्षि म्हणे, 'विद्या[12] देतों[13] जीणें मनीं न ताप रिघे, ।
आहे सुदुर्लभा हे बा! जेंवि जनीं सुधा नताप[14]परि घे.' ॥ १५२
वा[15]हुनि गत[16]जीवात्मा त्या सर्व सुहृज्जनासि तो दावी, ।
करि नवल, तया[17] वदवी, जें[18] साधुसभा स्मरोनि मोदावी. ॥ १५३
य[19]मदूतनीतही जो जीवात्मा प्रभु करूनि आज्ञा त्या ।
शिरवुनि शवीं म्हणे, 'वद, दे सुख पितृ[20]मानसास, बा! ज्ञात्या!' ॥ १५४
नयनें उघडुनि बैसे तो जीवात्मा म्हणे, '[21]तुम्हीं कोण? ।
मी कोण? कां सुजविले डोळे? केले रडोनि कां [22]शोण? ॥ १५५
[23]**मो**तीं सिंधुहि न रडे, जातें रज सत्व, तेंवि जायाचें, ।

---

१. प्रश्नार्थी अव्यय. २. या (मला—चित्रकेतूला, बोधितां (उपदेशितां). ३. उत्तम ज्ञात्यानें. ४. या नारदाला. [अ० १५ श्लो० १७-२६.] ५. उत्तम ज्ञात्यानें. ६. प्रविष्ट. ७. पुत्रवंताचा. ८. येथें 'दामयमक' आहे. ९. बायको. १०. सर्प. ११. नारद. १२. मंत्रोपनिषद्. १३. त्या विद्येचा (मंत्राचा) जप केला असतां ताप होत नाहीं. [अ० १५ श्लो० २७] व प्रभु संकर्षणाचें दर्शन होतें. १४. शरणागतापरी. १५. बोलावून. १६. मेलेल्या राजपुत्राच्या आत्म्याला. १७. 'तूं आपल्या शरीरांत प्रवेश करून उरलेल्या आयुष्यांत सुख घे' असें जीवात्म्याला नारदानें सांगतांच तो तसें करून बोलूं लागला. [अ० १६ श्लो० २-४.] १८. जें त्या मुलाचें भाषण. १९. यमदूतांनीं नेलेला. २०. बापाच्या मनाला. २१. आईबापांला म्हणाला 'तुम्ही कोण'. २२. आरक्त, लाल. २३. जनकादि संबंधामुळें रडें येतें असें म्हणावें तर तसेंही फारसें दिसत नाहीं, असें प्रतिपादन करीत पंत म्हणतात:—मोतीं न रडे [व] सिंधुहि [न रडे] (मोतीं आणि सागर यांचा जन्यजनकसंबंध असतांही त्यांचा वियोग होतो, तेव्हां मोतीं रडत नाहीं व सागरही रडत नाहीं,) सत्व [व] रज जातें (सत्वांश आणि रजोंश यांनीं बनलेलें जें लिंगशरीर तें नाश

जनसंबंध नसेचि स्थिर, शिकल्या तत्व, तें विजायाचें. ॥ १९६

भ[1] वमार्गीं भेटि जनां विरह त्यागूनि जो दया दे हा[2] ।
प्रिय कैसा? आपुलिया घ्या पावायासि मोद[3] या देहा. ॥ १९७

ग[4] गना तसें न आत्म्या येणें जाणें, म्हणोन कायातें ।
'शोचूं नकाचि जन! हो! कोणी 'साचा' म्हणों नका यातें[5].' ॥ १९८

व दुनि असें गेला तो जीव, मग त्यजिति शोक तज्ज्ञाती[6], ।
नृप चित्रकेतु विद्या घेता झाला नमूनि तज्ज्ञा ती[7]. ॥ १९९

ते मुनिवर[8] गेल्यावरि तो सेवुनि सप्तदिवस जंल[9] मात्र, ।
विद्याधराधिपत्या[10][11], विद्येतें धरुनि, होय नृप पात्र. ॥ १६०

पावतें, लिंगशरीर तमःप्रधान स्थूल शरीराला सोडून जातें) तेंवि (त्याप्रमाणें पुढेंही, हा क्रम चालू आहे त्याप्रमाणें पुढेंही) जायाचें (जावयाचें, जाणारच, प्रारब्ध संपतांच सूक्ष्म शरीर स्थूलशरीराला सोडून जावयाचेंच, तें कधीं टळावयाचें नाहीं); जनसंबंध स्थिर नसेचि (जगतांतील मनुष्यांचा अन्योन्यसंबंध हा शाश्वत म्हणून नाहींच); तत्व शिकल्या (तत्वज्ञान संपादन केलें तर मात्र) तें (रडें, विलापरोदन) विजायाचें (विझणारें आहे) शोकांतून मुक्त होण्यास तत्वज्ञानावांचून दुसरें साधन नाहीं, इतर साधनांनीं शोकानलाची शांति व्हावयाची नाहीं.

१. संसारमार्गीं. २. हा (देह) जो दया त्यागूनि (निर्दय होऊन) भवमार्गीं (संसारमार्गांत, या संसारांत) जनां (लोकांला) विरह (वियोग) भेटि दे (भेटवितो, विरहाची भेट करवितो) [तो देह] प्रिय कैसा ?(प्रिय कसा समजतां ?) [अज्ञानानें जर तुम्हांस तो देहच प्रिय वाटत असेल व त्यामुळें तुम्हाला आनंद होत असेल तर] मोद पावायासि (तुम्हास आनंद व्हावा म्हणून) या देहा (या शवाला–प्रेताला) आपुलिया (जो आपला संबंधी असें तुम्हांस वाटतें त्याला) घ्या (ग्रहण करा, तुम्ही जर देहासाठींच रडत असाल तर तो तुमच्यापाशींच आहे.) ३. आनंद, संतोष. ४. गगना (आकाश सर्वव्यापी असल्यामुळें त्याला) तसें (त्याप्रमाणेंच) आत्म्या (आत्म्याला) येणें जाणें (उत्पत्ति व नाश) न (नाहीं; आकाशाला किंवा आत्म्याला उत्पत्ति नाश नाहीं) म्हणोन (यास्तव) कायातें (देहातें, अशाश्वत देहातें) नश्वर (देहासाठीं) जन हो! (अहो जन हो!) शोचूं नकाचि (शोक करूं नका. आत्मा शाश्वत आहे पण देह अशाश्वत आहे, यास्तव त्याच्यासाठीं लोक हो! शोक करू नको, तो देह शोक करण्यास योग्य असा नाहीं) यातें (या देहातें) कोणी साचा (शाश्वत, सत्य) म्हणों नका (मानूं नका.) ५. अध्याय १६ श्लोक ४-११ पहा. ६. या देहातें. ७. तत्+ज्ञाति=त्याचे गोत्रज. ८. तत्+ज्ञा=ती शोक घालविणारी विद्या जाणते जे नारद, बृहस्पति त्यांला. ९. विद्या सांगून नारद अंगिरासह ब्रह्मलोकीं गेले. [अ० १६ श्लो० २६.] १०. सात दिवस केवळ उदकपानावर जीवन चालवून. ११. विद्येच्या योगें सात दिवसांच्या अखेरीस चित्रकेतूला विद्याधरांचें आधिपत्य मिळालें. (श्लो० २७.)

वा ढे तेज बहु महा विद्येनें, मग मनोज्ञवेषातें।
तो सिद्धवर्य वंदी जाउनि चरणासमीप **शे**षातें.॥ १६१
सु रवरनुत सुखमूर्ति प्रभु भक्तकृतस्तवें सुखी होय,।
तत्वज्ञान तया दे, देतो घन जेंवि चातका तोय.॥ १६२
दे उनि दर्शन शुद्धज्ञान प्रभु गुप्त होय मग, नमुनी।
वरदा स्वपदा ये नृप ज्या म्हणुनि 'उदार देवनग न' मुनी.॥ १६३
वा वरला संवत्सर लक्षांचें एकलक्ष तो योगी,।
जो गीष्पतिनुतसद्गुण दिव्य विषय विपुल **श**क्रसा भोगी.॥ १६४
थं क्षवराधिकभाग्यें प्राक्तनकर्में तयाहि मद नाशा।
झाला, निंदी प्रभुला पुरविलि जेणें न एक मदनाशा.॥ १६५
नें यनमनोहर भगवद्दत्तविमानीं बसोनि लोकांत।
फिरतां **म**हेश्वरातें पाहे जो भानु भक्तकोकांत.॥ १६६
मो ठ्या प्रेमें घेउनि अंकीं श्रितसानुकंप **दे**वीतें।
आलिंगुनि होता प्रभु, यद्ध्यान ज्ञानसंपदे वीतें.॥ १६७

---

१. सुंदर वेषधारण करणाऱ्यातें. २. तो विद्याधरवर्य चित्रकेतु. ३. सुर+वर+नुत=देव+श्रेष्ठ+स्तुत=सुरश्रेष्ठांनीं स्तविलेला. ४. देवाधिदेव शेष. ५. विद्याधरानें केलेल्या स्तवानें. [अ० १६ श्लो० ३३-४८.] ६. तत्वज्ञानाचा उपदेश केला. [अ० १६ श्लो० ४८-६३.] ७. कल्पवृक्ष. देवनग (कल्पवृक्ष) उदार न (खरोखर कल्पवृक्ष उदार नव्हे तर ज्ञानदाता जो प्रभु तोच खरा उदार होय असें) म्हणुनि [तो] मुनी नृप (साधु चित्रकेतु राजा) ज्या वरदा (वर देणाऱ्या प्रभुला) नमुनी स्वपदा ये (आपल्या स्थानीं येता झाला) [तो] प्रभु शुद्धज्ञान [व] दर्शन देउनि मग गुप्त होय. ८. चित्रकेतु लाखोंच्या लाखों वर्षें विहार करीत राहिला. ९. बृहस्पतीनें स्तविले उत्तम गुण ज्याचे असा. १०. विद्याधराच्या ऐश्वर्यानें. ११. त्या चित्रकेतूला त्याचा मद (गर्व) नाशा (नाशास कारण) झाला. १२. चित्रकेतु शंकराला सस्त्रीक पाहून हांसला आणि त्याची निंदा करूं लागला. [स० १७ श्लो० ६-८.] १३. मदन+आशा=कामाची इच्छा. ज्या शंकरानें एकट्या मदनाची आशा परिपूर्ण केली नाहीं, बाकी सर्वांचे मनोरथ परिपूर्ण केले अशा शंकराची निंदा केली. शंकरानें मदनाचा संहार केला या पुराणवृत्ताकडे कविकटाक्ष आहे. १४. नेत्र आणि मन यांस रिझविणारें असें. [विष्णूनें दिलेल्या तेजःपुंज विमानांत बसून फिरत असतां त्यानें शंकराला पाहिलें.] १५. भगवत्+दत्त+विमान=भगवंतानें दिलेल्या विमानीं. १६. शंकरातें. १७. सूर्य. १८. भक्तरूप चक्रवाकपक्ष्यांत. १९. वामांकावर. २०. आश्रितांचा दयाळू. आश्रितांची अनुकंपा (दया) ज्यास आहे तो. २१. सतीला. २२. यत्+ध्यान=ज्याचें ध्यान. २३. ज्या प्रभूच्या चिंतनानें ज्ञानसंपदा प्राप्त होते. २४. प्रसवतें.

भ क्त प्रभुचा तो त्या ज्ञानिसभेच्या समीप राहोनी, ।
मोठ्यानें हांसे हो! **शि**ववदन अनादरेंचि पाहोनी. ॥ १६८

ग र्हा[1] असी करी कीं, 'हा लोकगुरु[2] स्वयें वदे धर्म, ।
करितो तप, धरितो[3] जपमाळा, व्रत भस्मभर जटा[4] चर्म[5]. ॥ १६९

व नितेतें[6] आलिंगुनि बसला सन्मुनिसभेंत वित्रप[7] हा, ।
प्राकृतही जें न करी, करितो तें ज्ञानिनाथ चित्र[8] पहा.' ॥ १७०

ते निंदा प्रभु साहे, परि फार करी महासती[9] राग, ।
पावे वेतस[10][11] नम्र स्तब्ध, न पावे महास तीरांग[12]. ॥ १७१

'**वा** चाळा! ऐक' म्हणे[13], 'तूं शास्ता[14] काय रे! अरे! मत्ता[15]! ।
सत्ता[16] दाविसि, निंदिसि जो प्रभु बहु मान्य **ना**रदा दत्ता[17]. ॥ १७२

सु र चरणरेणु माथां धरिति **ब्र**ह्मादि सर्व भाटतसे, ।
ज्याचें सद्यश[18] गाती तो हा प्रभु तुज विनिंद्य वाटतसे? ॥ १७३

दे वांच्या देवाचा निंदक तूं खळचि, भाग्यमत्त[19], पहा ।
सद्यः स्वकृतफळ, म्हणों गुरुलंघन साहतां, न मत्तप 'हाँ[20]!' ॥ १७४

---

१. निंदा. २. लोकांचा गुरु (शंकर). ३. धरितो या क्रियापदाचा संबंध जपमाळा, व्रत, भस्मभर, जटा आणि चर्म यांजकडे आहे. ४. मस्तकावर जटा. ५. गजचर्म. ६. वनिता=स्त्री, सती. ७. निर्लज्ज. (त्रपा=लज्जा.) ८. आश्चर्य. ९. पार्वती. १०. वेत. ११. उत्सवास. १२. तीर+अग=तीरासंबंधी वृक्ष. [जो] नम्र [व] स्तब्ध (वाचाळपणा न करणारा जीभ आंवरून धरणारा, ढवळाढवळ न करणारा) [तो] महास (आनंदास) पावे (पावतो) आणि जो तसा नाहीं तो या जगांत नाश पावतो असें प्रतिपादन करीत पंत म्हणतातः—तीराग (तीरावरील वृक्ष) महास न पावे (आनंदाप्रत पावत नाहीं—प्रवाहानें वाहून जातात, पण) नम्र (लवलेला) [व] स्तब्ध (हालचाल न करणारा असा) वेतस (वेत) महास पावे (आनंदाचा अनुभव घेतो, प्रवाहानें वाहून न जातां जागच्या-जागीं—टिकाव धरून असतो.) वृक्षाप्रमाणें चित्रकेतूची स्थिति झाली—असें तात्पर्य. 'महापुरें झाडें जाती। तेथें लोहाळे वांचती॥' ही तुकारामोक्ति सुप्रसिद्ध आहे. १३. सती म्हणे. [अ० १७ श्लो० ११-१५.] १४. शासन करणारा. १५. हे दांडग्या! हे क्षत्रियाधमा! १६. आमच्यावर आपला अधिकार चालवितोस. १७. दत्तात्रेय हा विष्णूचा अंशावतार होय. हा अवतार भृगुऋषीच्या शापाच्या योगें झाला. याला तीन मस्तकें असून याच्या सहा हातांत विष्णु शिव इत्यादि त्रिमूर्तींचीं आयुधें असतात. १८. उत्तम यश. १९. ऐश्वर्यानें माजलेला. २०. हाय! थोर पुरुषांची निंदा ऐकून त्या निंदकास शासन करण्याचें सामर्थ्य असून ती निंदा मुकाट्यानें सहन केली असतां, सहन करणाराचें पुण्य नाश पावतें असें पार्वती म्हणतेः—सद्यः (आतांच) स्वकृतफळ (आपल्या कर्माचें फळ, आपल्या

[1]**वा** सासि तूं न समुचितसाधूंचा [2]हरिपदासमीप गडी, ।
[3]उडवितसें जे श्री हे तव उडवाया मदास मी पगडी. ॥ १७५
य श लंघिसी गुरूचें म्हणुनि म्हणों असुर पाप हो न कसें? ।
सोसावा त्वां शाप [4]स्वर्णें शुद्ध्यर्थ ताप हीनकसें?' ॥ १७६
[5]**नॅ** म्रपणें शापातें घेउनि, न धरूनि कंप, [6]दोघांतें ।
तो **चि**त्रकेतु वंदी त्यां [7]संश्रितसर्वसंपदोघांतें. ॥ १७७
[8]**मो** देंचि वदे, '**अं**बे! न तुवां हा [9]नियतिनें दिला शाप, ।
भ्रमतां [10]भवांत घडती आनंद जना जसे, तसे ताप. ॥ १७८
भ व हाचि भ्रम, येथें शाप [11]अनुग्रह तथा नरक [12]नाक ।
सुख दुःख काय? सत्यज्ञाता न [13]गुणाहिचा धरिल धाक. ॥ १७९
[14]**ग** जवरवरद [15]प्रभु निजमायेनें या [16]विचित्र विश्वास ।
[17]रचितो लीलार्थ, असे दृढ माझा तत्पदींच [18]विश्वास. ॥ १८०

निंदाकर्माचें फळ) पहा (तुला मिळो), गुरुलंघन साहतां (थोरांची अमर्यादा सहन केल्यानें) मत्तप (माझें तप, माझें तपोबळ) हा! (हाय हाय!) न म्हणों (माझ्या तपाला आपलें सामर्थ्य गेलें असें समजून दुःख न होवो, माझ्या तपःसामर्थ्यास दोष न लागो).

१. रहाण्यास. २. विष्णुचरणासमीप. ३. पगडी (पागोटें) घेणें=जय मिळविणें; पगडी दुसऱ्यास बांधणें=त्याचा सन्मान, गौरव करणें; दुसऱ्याची पगडी उडविणें=त्याचा अपमान करून त्याचें पारिपत्य करणें, असें 'पगडी'शब्दाचे प्रयोग. व्यवहारभाषणांत आढळतात. पगडी घेणें, पगडी फिरविणें, पगडी फेंकणें इत्यादि प्रयोग प्रायः बरेच आढळतात. पार्वती म्हणतेः—तव मदास उडवाया (तुझा गर्व उतरावा या हेतूनें) मी (पार्वती) [तुझी] श्री (ऐश्वर्यशोभा) हीच पगडी उडवितसें. (तुझें विद्याधराधिपत्य मी काढून घेतें म्हणजे तुझा मद उतरेल–असा भाव). ४. हीनकसें (हीणकस) स्वर्णें (सोन्यानें) शुद्ध्यर्थ (शुद्ध होण्यासाठीं ताप (अग्नीचा ताप) सोसला पाहिजे. तसा त्वां चित्रकेतूनें शाप सोसला पाहिजे. ['हेम्नः संलक्ष्यते ह्यग्नौ विशुद्धिः श्यामिकापि वा.' रघुवंश–सर्ग १ श्लो० १०. 'उपदेशं विदुः शुद्धं संतस्तमुपदेशिनः । श्यामायते न युष्मासु यः कांचनमिवाग्निषु ॥. मालविकाग्निमित्र–अंक २ श्लो० ९.] ५. मस्तक नम्र करून. ६. सती व शंकर यांतें. ७. संश्रित+सर्व+संपत्+ओघ=आश्रय करणाऱ्यांच्या सर्व संपत्तीचे प्रवाह अशांतें. ८. आनंदानें. ९. दैवानें. १०. संसारांत. [संसारांत सुख किंवा दुःख हें कोणाच्या स्वाधीन नसतें. हा संसार म्हणजे मायेच्या गुणाचा प्रवाह आहे. अ० १७ श्लो० १८-२४.] ११. कृपा, प्रसाद. १२. स्वर्ग. १३. दोरीरूप सर्पाचा. १४. हस्तिश्रेष्ठ जो गजेंद्र त्याला वर देणारा. १५. षड्गुणैश्वर्यसंपन्न परमेश्वर. १६. नानाप्रकारच्या जगाला. १७. भूतें उत्पन्न करतो. १८. निश्चय.

व दलों जें तें अनुचित मानुनि तूं कोपलीस तरि माते[1]! ।
नमितों, क्षमा करावी, न क्षोभे माय, बाळ जरि माते.[2]' ॥ १८१
ते ज असें शांत करुनि गेला[3] तो **चित्रकेतु**; **शिव** त्यातें ।
वर्णी **शिवे**जवळि[4] बहु, चंद्रातें जेंवि सिंधु शिवल्यातें[5]. ॥ १८२
वा खाणी **शिव** कीं, क्षम[6] परि न प्रतिशाप[7] दे, **विवरवाहें**[8] ।
स्वीकृत जन तो तत्सम न तशाप्रति शाप देवि! वर वाहें. ॥ १८३
सु रशत्रु **वृत्र** झाला[9][10] शापें तो **चित्रकेतु** गा! राजा! ।

---

१. हे आई. २. बाळ (मुलगा) जरि माते (उन्मत्त झाला, बालक जरी चुकला तरी) [त्याजवर] माय (माता) न क्षोभे (क्षुब्ध होत नाहीं; बालकाच्या हातून प्रमाद झाला तरी मातेला त्याचा राग न येतां त्याची दयाच येते). ३. माजे. ४. विमानांत बसून गेला. ५. रुद्राणीपाशीं. शिव त्यातें (त्या चित्रकेतूतें) शिवेजवळि (पार्वतीपाशीं) बहु वर्णी (फार स्तुति करी. शिवानें पार्वतीपाशीं चित्रकेतूची फार प्रशंसा केली. चित्रकेतूनें आपली अमर्यादा केली हें मनांत न आणतां शिवानें त्याची फार स्तुति केली.) जेंवि (ज्याप्रमाणें) सिंधु (सागर) शिवल्यातें (स्पर्श करणाऱ्या) चंद्रातें (चंद्राला स्तवितो त्याप्रमाणें) दररोज चंद्र सिंधूला स्पर्श करतो व क्षितिजाखालीं जातो पण सिंधु त्या चंद्रावर कधीं कोप करीत नाहीं, उलट सागराला चंद्रस्पर्शानें प्रेमाचें भरतें येतें, तसा चित्रकेतूचा प्रकार होय. पर्वणीवांचून इतर दिवसीं सागरास स्पर्श करणारास पाप लागतें व सागर त्याजवर रुष्ट होतो, पण चंद्र दररोज स्पर्श करीत असतांही सागर त्याजवर रुष्ट होत नाहीं. असाच प्रकार शिव आणि चित्रकेतु यांचा समजावा. ६. स्पर्शकर्त्यातें. ७. शिव (शंकर) [चित्रकेतूला] वाखाणी (स्तवी) कीं (असा कीं) क्षम (समर्थ, चित्रकेतु समर्थ होता) परि प्रतिशाप न दे (परंतु त्यानें पार्वतीला उलट शाप दिला नाहीं; तो उलट शाप देण्यास समर्थ होता, परंतु त्यानें प्रतिशाप दिला नाहीं ही त्याची मोठी शांति होय.) विवरवाहें (गरुडवाहनानें, गरुडवाहन जो विष्णु त्यानें) स्वीकृतजन (आदरिलेला जन, विष्णूनें ज्याचा स्वीकार केला असा विष्णुभक्त) [हा] तत्सम [होय] (त्या विष्णूसारखा पूज्य, विष्णुसम वंदनीय, शांत आणि समर्थ होय) [यास्तव हे] देवि! (पार्वति!) तशाप्रति (तशा विष्णुभक्ताला) शाप न वाहें (शाप देऊं नकोस, कधींही शापूं नकोस) [तर त्याला] वर वाहें (वर दे, प्रसन्न होऊन त्याला वर मात्र दे, तो विष्णुभक्त वर देण्यास योग्य होय, शाप देण्यास योग्य नाहीं). ८. समर्थ. ९. चित्रकेतु हा भगवद्भक्त असल्यामुळें सतीला प्रतिशाप (उलट शाप) देण्यास समर्थ होता, परंतु त्यानें उलट शाप दिला नाहीं. [अ० १७ श्लो० ३७.] १०. पक्षिश्रेष्ठ गरुड वाहन ज्याचें त्या विष्णूनें. ११. चित्रकेतु लष्ट्याच्या दक्षिणाग्नीमध्यें दानवस्वरूप स्वीकारून उत्पन्न झाला. ह्याचेंच नांव वृत्र होय.

[1]लाजत होत्या ज्वाला बाहिर तैशाचि आंत गारा ज्या. ॥ १८४

दे वद्वेष्टे [2]**दि**तिचे सुत दोघे, तत्प्रताप बहु कथिला, ।
ज्येष्ठ **हि**रण्यकशिपु सुत, अन्य **हि**रण्याक्ष **वि**ष्णुनें मथिला. ॥ १८५

[3]**वा** सववधार्थ मागे प्रार्थुनि सुत अमर [4]पतिस **दि**ति देवी, ।
मुनिहि [5]भिडेस पडुनि दे, तें [6]जाणुनि **श**क्र बहु तिला सेवी. ॥ १८६

[7]**थँ** किंचित् व्रतनियमीं चुकतां, योगें शिरे तिच्या पोटीं।
[8]हरि गर्भ [9]सप्तधा करि, देवचरित्रें म्हणों नये खोटीं. ॥ १८७

न मरति, रडति म्हणुनि ते केले एकैक [10]सप्तधा [11]पविनें, ।
केला प्रयत्न अद्भुत चुकवाया आत्मघात त्या [12]कविनें. ॥ १८८

[13]**मो** हे **दि**ति, **श**क्र म्हणे, 'गर्भा! रोदन करूं नको' [14]मारी. ।
जागी [15]झाली नाहीं, पोटीं गडबड जरी असी भारी. ॥ १८९

---

१. वृत्रासुर फार भयंकर होता. ज्या (वृत्रासुराला) बाहिर (बाहेरून, ज्याचें बाह्य स्वरूप पाहून ज्याला) ज्वाला (अग्नीच्या ज्वाला) लाजत होत्या (अग्निज्वालांपेक्षांही ज्याचें बाह्य स्वरूप भयंकर होतें) तैशाचि (त्याप्रमाणेंच) आंत (अंतःकरणांत) गारा (बर्फाचे तुकडे, ज्या (ज्या वृत्रासुराला) [लाजत होत्या. त्याचें अंतःकरण इतकें कोमळ, दयाळु, शीतल व शुद्ध होतें कीं त्याला गारांनीं लाजावें]. या उत्तरार्धांत **उपमा** अलंकार झाला आहे, कारण 'लाजत होत्या' हा शब्द सादृश्यसूचक आहे. **काव्यादर्शकार दंडी** म्हणतोः— 'आक्रोशत्यवजानाति कदर्थयति निंदति । विडंबयति संधत्ते हसतीर्ष्यत्यसूयति ॥ ६२ ॥' + + + 'तस्य चानुकरोतीति शब्दाः सादृश्यसूचकाः । उपमायामिमे प्रोक्ताः कवीनां बुद्धिसौख्यदाः ॥६५॥' [द्वितीय परिच्छेद–पृष्ठ १३३.] २. कश्यपापासून दितीला झालेले हिरण्यकशिपु आणि हिरण्याक्ष हे दोन पुत्र. ३. इंद्राचा वध करण्यासाठीं. [विष्णूकडून ज्यानें माझे पुत्र मारविले त्या इंद्राचा वध करण्यास समर्थ असा अमर पुत्र मला व्हावा असें दिति आपल्या पतीपाशीं वरदान मागे. अ० १८ श्लो० ३७.] ४. कश्यपास. ५. दितीच्या मर्जीस्तव. 'भिडेस पडणें' हा शब्दसमूह कोशकारांस उपयुक्त आहे. ६. दितीचें वरदानवृत्त जाणून इंद्र आपल्या सावत्र आईची अनेक प्रकारें आराधना करूं लागला. [अ० १८ श्लो० ५८.] तिच्या व्रतांत कमीपणा केव्हां होईल याची इंद्र वाट पाहत होता. ७. विष्णुव्रताच्या नियमांत थोडेंसें उणें पडतांच. [एके दिवशीं सती संध्याकाळीं न आंचवतां व पाय न धुतां झोंपीं गेली, इतकें उणें पडतांच इंद्र योगमायेनें तिच्या उदरांत शिरला. अ० १८ श्लो० ६१.] ८. इंद्र. ९. इंद्रानें वज्राच्या योगें तेजस्वी गर्भाचे सात तुकडे केले. १०. प्रत्येक तुकड्याचे सात भाग केले. एकंदर ४९ तुकडे झाले. हे मरुद्गण देव होत. [अ० १८ श्लो० ६२.] ११. वज्रानें. १२. इंद्रानें. १३. दितीला मोह पडला, तिला मूर्च्छा आली. १४. मारून टाकी. १५. दिति जागृत झाली नाहीं.

भ गवद्व्रतमहिमा हा अत्यद्भुत कीं अशाहि वक्राचें । [1][2]
झालें कल्याण, यश प्रख्यात जगत्रयांत शक्राचें. ॥ १९०
ग र्भविनाश न झाला पहिले एकोन तेंवि पन्नास, । [3][4][5]
जें वज्र परम दारुण घातक पीयूष तें विपन्नास. ॥ १९१ [6]
व ज्री बाहेर निघे घेउनि पन्नास आपणासकट, । [7]
मोहहि दितिहृदयांतुनि होय प्रेमा सुधांशुसा प्रकट. ॥ १९२ [8]
ते सुत दिति पाहे जों जागी होऊनि दृष्टिला उघडी, ।
भगवान् म्हणे, 'बिघडली माझी कारुण्यवृष्टि लावु घडी.' ॥ १९३ [9]
वा सव त्या भ्रात्यांसह वंदी दिति, त्या सुतां जवळ बाहे, । [10][11]
प्रेमें पुसे, 'असावा एक, बहु कसे सुधाकवळ वा! हे?' ॥ १९४
सु रपति यथार्थ सांगे, जोडुनि करयुग्म, आपुलें कर्म, । [12]
कीं 'सत्यचि धर्म परम' तेंचि तया होय संकटीं वर्म. ॥ १९५ [13]
दे वदया द्वेषातें द्रुत दवडुनि दूर बहु शुभ द्रव दे; । [14]
'नांदा एकत्र सुखें भ्राते' ऐसेंचि दिति सुभद्र वदे. ॥ १९६ [15]
'**वा** ढं' म्हणोनि नाकीं ने दितिचे शक्र ते मरुत्तनय, । [16][17][18]
शिकले गुरूक्त, जैसा श्रीसंवर्तोक्त तो मरुत्त नय. ॥ १९७ [19][20]

---

१. हा भगवंताच्या व्रताचा मोठेपणा होय. २. उदरांत शिरून गर्भाचे तुकडे करणाऱ्या वक्र (क्रूर) (शक्राचें). [वक्र=क्रूर, असरल. 'वक्रः शनैश्चरे क्रूरे पुटभेदे तथानृजौ' इति त्रिकांडशेषः.] ३. प्रथमचि. ४. एक+ऊन=एक+उणें. ५. मरुद्गण ४९ असें समजावें. ६. विपत्ति पावलेल्यास. ७. इंद्र. वज्र आहे (आयुध) ज्याचें तो वज्री. ८. चंद्रसा. ९. भगवान् म्हणेः—माझी कारुण्यवृष्टि बिघडली (बिघडलेली, दितीनें इंद्रावर कृपा केली ही बिघडलेली) घडी (योग्य योजना, घटना) लावु (पुनः जुळवो, माझ्या कारुण्यवृष्टीनें बिघडलेली घडी पुनः जुळवावी—असें भगवान् म्हणाला. १०. इंद्र. [वसवो देवा वसूनि रत्नान्यस्य वा संति । ज्योत्स्नादित्वात् (वा ५।२।१०३) अण् । वसोरपत्यमिति वा । दैत्यानां वासं वाति वा । 'वा गतिगंधनयोः.'] ११. बोलावी. १२. अध्याय १८ श्लो० ७१-७६ यांत इंद्राचें उत्तर आहे. १३. कवच. १४. देवदया (देवाची दया) द्वेषातें द्रुत दूर दवडुनि (द्वेषाला त्वरित फार लांब घालवून) बहु (पुष्कळ) शुभ (कल्याणकारक असा) द्रव (ओलावा) दे (दितीच्या अंतःकरणांत ओलावा—दया—उत्पन्न करी) दितीच्या अंतःकरणास पाझर फुटला, तिला द्रव आला. १५. उत्तम मंगल. १६. बहु वरें असें म्हणोनि. १७. मरुद्गणांसह इंद्र स्वर्गलोकीं गेला. [अ० १८ श्लो० ७७.] १८. मरुत्+तनय=मरुत्संज्ञक पुत्र. १९. श्री+संवर्त+उक्त=शोभणाऱ्या संवर्तऋषीनें सांगितलेला. (नय=न्यायमार्ग, नीतिमार्ग.) २०. नामविशेष (राजा).

य श अत्यद्भुत अमित प्रकटी सज्जनसुखार्थ [1]सकलेश, ।
वदला तोचि '**मयूरा**! तूंही हें गावयासि [2]सक लेश.' ॥ १९८

सप्तम स्कंध.

न [3]रहरिचरित **शुक** वदे **नारद** सांगे [4]युधिष्ठिराला जें, ।
[5]ज्याचे रसिक कवि म्हणति, 'अमृता! तूं [6]यापुढें जडा! लाजें.' ॥ १
मो ठा [7]कनककशिपुचा पुत्र **प्र**ऱ्हाद [8]भागवत पहिला, ।
जेणें न **चि**त्रगुप्ता लावुं दिला टांक आपुला [9]वहिला. ॥ २
भ क्तहि **क**नककशिपु [10]मुनिशापांत पडुनि करी [11]हरिद्वेष, ।
होय अभक्त, जसा [12]सितगारुडमणिमंदिरीं [13]हरिद्वेष. ॥ ३
[14]**ग** जयूथाधिप [15]हरिनें तेंवि **हि**[16]रण्याक्ष मारितां **ह**रिनें, ।
कनककशिपुनें [17]अनुजस्त्री**दि**ति समजाविल्या परोपरिनें. ॥ ४
व ध गोद्विजवर्यांचा, उच्छेद श्रुतिमखादिधर्मांचा, ।
[18]करवी [19]असुरभटांतें आज्ञापुनि नाश पुण्यकर्मांचा. ॥ ५
ते ज अतुळ मिळवाया, **क**नककशिपु दैत्य [20]**मं**दरा गेला, ।

---

१. परमेश्वर. २. समर्थ हो. ३. नरसिंहचरित. ४. राजसूय नामक महायज्ञ चालला असतां धर्मराजानें नारदाला प्रश्न केला, तेव्हां नारदानें सांगितलेलें नरहरीचें चरित्र. [अ० १ श्लो० १२.] ५. ज्या चरिताचा रस सेवणारे. (कवि=बुधजन.) ६. या नरहरिचरितामृतापुढें. ७. हिरण्यकशिपूचा. ८. भगवंताचा परम भक्त. ९. या प्रऱ्हादानें कधींही दुराचरण केलें नाहीं—असें तात्पर्य. यानें दुराचरण केलें असतें तर त्याची नोंद चित्रगुप्तानें आपल्या वहींत अवश्य केली असती. चित्रगुप्त हा यमलोकांतील एक पुरुष. हा लोकांचे गुणावगुण व पापपुण्यें एका वहींत लिहून ठेवितो व प्राणी यमलोकास गेला म्हणजे ती उघडून यमाला दाखवितो व प्रत्येकाला त्याच्या पापपुण्याचरणाप्रमाणें शासन अथवा बक्षिस मिळतें. चित्रगुप्त मनुष्याचीं पापपुण्यें एका वहींत लिहून ठेवतो—असा उल्लेख पंतांच्या व इतरांच्या काव्यांत अनेक स्थळीं आढळतो. [संशयरत्नमाला—१४; मुक्तेश्वर—आदिपर्व—अ० १६ ओं० १३९ पृ० १३०.] १०. ब्राह्मणशापांत. ११. हरि+द्वेष=परमेश्वराशीं वैर. १२. पांढऱ्या गरुडपाचमण्याच्या मंदिरांत. १३. हरित्+वेष—हिरवा वर्ण ज्याचा तो. १४. हत्तींच्या कळपाचा स्वामी. १५. सिंहानें. १६. विष्णूनें वराहरूप घेऊन हिरण्याक्षाचा वध केला. [अ० १ श्लो० ४०.] १७. अनुजाची (धाकटा भाऊ हिरण्याक्ष याची) स्त्री (पत्नी) [व] दिति (माता) यांची समजूत केली, त्यांचा शोक शमविला. [अ० २ श्लो० १७-६०.] १८. हिरण्यकशिपु वध, उच्छेद आणि नाश करवी—असा अन्वय. १९. दैत्यांला. [श्लो० १४-१६.] २०. मंदरपर्वताच्या पहाडांत जाऊन तप करूं लागला. [अ० ३ श्लो० २.]

तो श्रीहरिवरि शापें होऊनि [1]अशांत [2]मंद रागेला. ॥ ६
[3]वा रि [4]निषेधुनि, वातचि सेवुनि, तो ऊर्ध्वभुज गगनदृष्टी, ।
[5]पादांगुष्ठस्थित तप करि, तेजें तापवी बहुत [6]सृष्टी. ॥ ७
सु र भिउनि [7]कथिति विधितें, 'हरिल तव पदहि [8]तपोनि धीरचि तो, ।
सर्व करिल, हे शंका [9]अस्मच्चित्तीं तपोनिधी रचितो.' ॥ ८
[10]दे वज्येष्ठ प्रभु मग [11]सानुग येउनि तयासि जो पाहे, ।
[12]दितिज [13]पिपीलिकभक्षिततनु [14]वल्मीकांत झांकला आहे. ॥ ९
[15]वा रिजभव त्यासि म्हणे, 'वत्सा! कश्यपसुता! अगा! राहो ।
तप, ऊठ, पुरे, घे [16]वर, तूं वदता सुधृतिच्या [17]अगारा हो! ॥ १०
य मनियमयत्न भारी हा, रीति असी न जाणती अन्य, ।
भक्षिलि तनु [18]दंशांनीं तरि [19]असु अस्थींत वसति, तूं धन्य. ॥ ११
[20]न गसा निश्चळ [21]निरुदक तूं [22]तपें तपलासि [23]दिव्यशत वर्षें ।
झालासि सिद्ध; आलों मी [24]धाता द्यावयासि वर हर्षें.' ॥ १२
[25]मो दवुनि असें [26]त्यातें [27]प्रोक्षी स्वकमंडलुस्थतोयांहीं, ।

---

१. क्षुब्ध. २. मूर्ख. ३. उदक. ४. टाकून, पाण्याचा निषेध करून. ५. पाद+अंगुष्ठ+स्थित=पाय+आंगठा+उभा असलेला=पायांच्या आंगठ्यांवर उभा राहून. ६. पाताल, पृथ्वी आणि स्वर्ग. [अध्याय ३ श्लो० ४-५.] ७. अध्याय ३ श्लो० ६-१३ पहा. ८. तपस्या करून. ९. अस्मत्+चित्तीं–आमच्या मनांत. १०. देवांमध्यें श्रेष्ठ (ब्रह्मा) तो. ११. अनुचरांसह [भृगु दक्ष इत्यादिकांला बरोबर घेऊन ब्रह्मदेव दैत्याधिपाच्या आश्रमीं गेला. अ० ३ श्लो० १४.] १२. हिरण्यकशिपु. १३. पिपीलिक+भक्षित+तनु=मुंग्या+भक्षित+देह=मुंग्यांनीं भक्षिला देह ज्याचा असा. १४. वारुळांत. १५. कमलोद्भव धाता. १६. इष्ट वर मागून घे. [अ० ३ श्लो० १७.] १७. गृहा. १८. डांसांनीं. १९. डांसांनीं शरीर खाऊन टाकिलें तरी प्राण हाडांतच राहिले आहेत. '२०. वृक्ष किंवा पर्वत यासारिखा. २१. उदकहीन. २२. 'तप तपलासि' यांत 'तप' हें Cognate Accusative चें उदाहरण समजावें. जसें—He ran a race. अशीं उदाहरणें व्याकरणकारांनीं शोधून काढणें आणि संगृहीत करणें अत्यावश्यक आहे. २३. पाणी न पितां देवांचीं शंभर वर्षें तपश्चर्या केलीस. २४. ब्रह्मदेव. [अ० ३ श्लो० २०-२१.] २५. आनंदवून. २६. हिरण्यकशिपूला. २७. सिंचन करी. प्रोक्षण–सेचन. [धात्यानें आपल्या कमंडलूंतील दिव्य अमोघ उदक हिरण्यकशिपूवर शिंपलें, तेव्हां तो पुनः सुवर्णासारखा तेजस्वी झाला. 'अस्त्री कमंडलुः कुंडी' इत्यमरः । कस्य प्रजापतेर्जलस्य वा मंडः सारः । तं लाति लभते वा कमंडलुः । कस्य मंडं भूषां लाति वा.]

दिव्यस्वरूप झाला तत्काळ **हि**रण्यकशिपु तो [1]यांहीं. ॥ १३

भ[2] व्य विमानीं गगनीं पाहुनि गंहिवरुनि नमुनि [3]पणज्याला ।
[4]स्तवि, पावती सुखें, [5]तप बहु जरि महिवरुनि न मुनि [6]पण ज्याला.॥ १४

गं[7] र्जज्जलदा प्रार्थी [8]चातक, इच्छा धरूनि, [9]तोयाची, ।
तेंवि [10]**वि**धिस वांछित वर [11]**दि**तिसुत अंजलि करूनि तो याची. ॥ १५

'**व** रदा ! जीं [12]त्वन्निर्मित भूतें [13]व्यसु [14]सासु भूमिवर, देहा[15] ।
त्यांपासुनि मृत्यु नसो, न [16]नभीं रात्रिहि दिसाहि वर दे हा. ॥ १६

ते वींच नसेल तुवां लोकत्रितयांत निर्मिलें ज्यातें ।
[17]त्यांच्याही [18]शस्त्रांहीं मरण नसावें प्रभो! मला हातें. ॥ १७

वां[19] हेरहि न घडावा मृत्यु मला [20]आंतही नसावा, हो! ।
तुमचा [21]वरप्रसादामृतनद मजवरि सदा असा वाहो. ॥ १८

सु रवर्या! म्यां व्हावें [22]अप्रतिभट [23]संगरांत, जे देही ।
लोकप त्या सर्वांचा पति [24]जीस्तव शक्ति तूं मला दे ही. ॥ १९

दे महिमा जेंवि तुझा, [25]अणिमाद्यैश्वर्य सर्व ओपावें ।
वरदा! वर दासा या अभिमत हे, तूं प्रसन्न हो, पावें.' ॥ २०

---

१. तोयांहीं. २. उत्तम हंसविमानांत. ३. पणजा=आजाचा बाप. (ब्रह्मदेवाला.) ४. हिरण्यकशिपु पितामहाचा स्तव करूं लागला. (अ० ३ श्लो० २५-३८.) ५. तप बहु जरि न (तप जरी पदरीं पुष्कळ नाहीं) पण (परंतु) मुनि महिवरुनि (पृथ्वीतलावरून देखील) ज्याला (ज्या धाल्याला) सुखें (अनायासें, आनंदानें) पावती (पोंचतात), [त्या धाल्याला, पणज्याला] स्तवि. [तपाचे फार क्लेश न करतां देखील, मुनिलक्षणयुक्त जे आहेत ते या पृथ्वीतलावरून स्वल्पायासानें सत्यलोकीं ब्रह्मदेवाप्रत पावतात.] ६. परंतु. ७. गर्जना करणाऱ्या मेघाला. ८. चातकाचें जलदैकशरणत्व सुप्रसिद्ध आहे. [रघुवंश–स० ५ श्लो० १७ हेमाद्रि.] ९. उदकाची. १०. पितामहाला. ११. हिरण्यकशिपु. १२. त्वां उत्पन्न केलेलीं. १३. वि+असु=गत+प्राण. १४. सप्राण, सचेतन प्राणी. १५. त्या भूतांपासून माझ्या देहाला मरण नसावें. १६. आकाशांत. १७. तुझ्या सृष्टीव्यतिरिक्त व्यक्तीच्या हातानें. [अ० ३ श्लो० ३६.] १८. आयुधांच्या योगानें. १९. लोकत्रितयाच्या बाहेर. २०. लोकत्रयाच्या आंत. २१. वरप्रसादरूप अमृतनद. २२. युद्धांत ज्याच्या समोर उभा राहणारा कोणी नसावा असा योद्धा. २३. युद्धांत. २४. जीस्तव (ज्या शक्तीस्तव, ज्या शक्तीच्या योगानें) जे देही लोकप (जे देहधारी लोकपाळ) त्या सर्वांचा पति (नायक, अध्यक्ष) [मी व्हावें] ही (शक्ति) तूं (विधे!) मला दे. २५. अणिमा इत्यादि वैभव.

[1]**वा** रिजयोनि म्हणे, 'बा! दुर्लभ वर मागतोसि, पण तूतें ।
दिधले, 'माग' म्हणुनि मग कैसें स्वमुखें म्हणों 'न' पणतूतें.' ॥ २१
य द्यपि सुदुर्लभ तदपि वर देउनि जाय देव [1]लोकेश, ।
झाला अतिदु:खप्रद लोकत्रयलोचनांत तो केशें. ॥ २२
[3]**न** क्षत्रेशादिग्रहतारागणतेज जेंवि रवि हरितो, ।
शक्रादिलोकपतिसुरनि[4]करयशस्तेज तेंवि [5]कवि हरि तो. ॥ २३
मो ठा प्रताप त्या दितिपुत्रींच, तसा प[6]रीं असेना, कीं ।
त्रिभुवन जिंकुनि निर्भय तो [7]शतमखमंदिरीं वसे [8]नाकीं. ॥ २४
[9]**भ** जली जे सुरमुनिवर यांची सुज्ञानसिंधु [10]राजी जी ।
[11]भवविधिविष्णुनिराळेकरुनि, म्हणे [12]असुरसिंधुरा 'जी! जी!' ॥ २५
[13]**ग** ट करि आपणचि कनककशिपु प्रभु यज्ञभाग, दे खाया ।
लवहि न सुरांसि, लावी [14]घोंटाया लाळ, तोंड देखाया. ॥ २६
[15]**व** ज्रिप्रमुख सकळ सुर [16]पाळक चिरकाळ [17]उग्रदंडातें ।
सर्पातें मूषकसे भ्याले बहु, त्या अतीव [18]चंडातें. ॥ २७
ते मग [19]जगदीशातें गेले सुर शरण, चरण आठवुनी, ।
दीनाच्या बंधूतें श्रम कळविति चित्तदूत पाठवुनी. ॥ २८
वा तचि भोजन ज्यांला, ऐसी कष्टा दशा सुरां आली, ।
त्यांतें आश्वासाया प्रभुची [20]वाणी नभीं असी झाली. ॥ २९

---

१. ब्रह्मदेव. २. लोकत्रयाच्या डोळ्यांत तो दैत्य केंसाप्रमाणें सलूं लागला. ३. नक्षत्र+ईश+आदि+ग्रह+तारा+गण+तेज=अश्विनी इत्यादि नक्षत्रें+स्वामी (चंद्र)+प्रभृति+भौमादि ग्रह+अन्य ताराग्रह+समूह+कांति. ४. गण, समूह. ५. बुध (हिरण्यकशिपु) हरि (हरण करी) [यानें सर्वांचें तेज हरण करून त्यांस जिंकून टाकिलें. ब्रह्मदेव, विष्णु आणि शंकर या तिघांशिवाय सर्व याला नजराणे देऊन याची सेवा करूं लागले. [अ० ४ श्लो० १३.] ६. अन्यीं, दुसऱ्याचे ठायीं. ७. तो दैत्यराज इंद्राच्या मंदिरांत आनंदानें राहिला. ८. स्वर्गांत. ९. सेवा करूं लागली. १०. पंक्ति. ११. शंकर. १२. दैत्येंद्राला. [सिंधुर=गज, हत्ती.] जे सुरमुनिवर [होते] त्यांची जी सुज्ञानसिंधुराजि भजली [ती] भवविधिविष्णु निराळे करुनि, असुरसिंधुरा 'जी! जी! म्हणे—असा अन्वय. १३. खाऊन टाकी, गट करणें=गिळणें, खाऊन टाकणें. १४. लाळ घोटणें=इच्छा धरणें. [देवांचा हविर्भाग दैत्यराज आपणच स्वीकारीत असे. अ० ४ श्लो० १५.] १५. वज्री=इंद्र. १६. लोकपाल. १७. उग्र (भयंकर) दंड (शासन) ज्याचें अशा दैत्याला. १८. चंड=अत्यंत कोपन, तीव्र. १९. विष्णूला. २०. नभोवाणी, आकाशवाणी. [अ० ४ श्लो० २४-२८.]

'सु र! हो! श्रुतिविप्रादिद्वेष्टा पावेल कां न नाशाला? ।
करितो धर्मोच्छेदक खळ पितरांच्याचि कानना शाला. ॥ ३०
दे इल दुःख स्वसुता, मी नेइन तेधवांच विलयातें, ।
साधुद्वेषें मरणचि, गुरुहि न हयमेध वांचविल यातें.' ॥ ३१
वा क्यें प्रभुच्या 'मेला खळ' मानुनि सोडितीच उद्वेगा, ।
परम विचक्षण ते सुर झांकिति हृदयीं जपोनि मुद्वेगा. ॥ ३२
र्य क्षप जेंवि धनाचा, साधुत्वाचा तसाचि पति जो तो ।
प्रऱ्हाद असुरपतिसुत लज्जित ज्याच्या यशा शशी होतो. ॥ ३३
नं यकोविदा तयातें शंडामर्काख्य शुक्रसुत दोघे ।
पढविति म्हणति, 'सुबुद्धे! दंडनयाद्यखिल जनकसा हो, घे.' ॥ ३४
मो ठ्या प्रेमें अंकीं घेउनियां एकदा स्वतनयातें, ।
असुर पुसे, 'वद वत्सा! साधु' असें, तो वदे 'मत नया तें.' ॥ ३५

---

१. श्रुति (वेद)+विप्र (ब्राह्मण)+आदि (प्रभृति) यांचा द्वेष्टा (शत्रु) हिरण्यकशिपु. २. पितरांचें कानन=श्मशान. ['श्मशानं स्यात्पितृवनम्' इत्यमरः.] जो धर्माचा उच्छेद करतो त्याचें वसतिस्थान श्मशान होय, त्याचा नाश होतो–असा भाव. हें **पर्यायोक्त** आहे. यांत **अर्थांतरन्यास** अलंकारही झाला आहे. पूर्वार्धातील विशेष विधानाचें समर्थन उत्तरार्धातील सामान्य विधानानें केलें आहे. अथार्थांतरन्यासः— अप्रस्तुतविशेषार्थांतरन्यसनपूर्वकम् । सामान्यप्रस्तुतस्यार्थांतरन्यासः समर्थनम् ॥ प्राचीनम्—तादृशां तादृशैरेव संबंधो भुवि शोभते । विषाननपरिष्वंगो विषकंठस्य भूषणम् ॥ १६६ ॥ विशेषस्य प्रस्तुतस्य सामान्येन समर्थनम् । द्वितीयोऽर्थांतरन्यासः क्रियते प्रस्तुतेन चेत् ॥ अस्तमिते खरकिरणे तमसा कांतं जगत्तु बहुशोऽभूत् । निजशत्रोर्हि परोक्षे लोकः सर्वोऽपि वृद्धिमभियाति ॥ १६७ ॥ कार्यकारणभावेन प्रस्तुतार्थसमर्थनम् । तृतीयार्थांतरन्यासं केचिदूचुर्विपश्चितः ॥ प्राचीनम्—भूपाः प्रतापरुद्रस्य नता भवत नोन्नताः । उन्नतान्नमयत्येष नतानुन्नमयत्यपि॥१६८॥ मंदारमरंदचंपू–काव्यमाला–पृ० १४१-१४२.] ३. आपल्या पुत्राला (प्रऱ्हादाला). ४. मी त्याचा वध करीन. ५. अश्वमेध. ६. दैत्य मेलाच असें मानून. ७. मुद्+वेगा+आनंदाच्या वेगा. ८. कुबेर. ९. असुरपतिसुत (हिरण्यकशिपुपुत्र) प्रऱ्हाद, ज्याच्या यशा (यशाला) शशी (चंद्र) लज्जित होतो (लाजतो). १०. नीतिज्ञा. (प्रऱ्हादाला.) ११. त्या प्रऱ्हादातें. १२. शंड आणि अमर्क या नांवांचे शुक्राचार्यांचे दोघे पुत्र. १३. शुक्र हा दैत्यांचा आचार्य. १४. दंडनीति इत्यादि सर्व. १५. बापासारखा. १६. एका प्रसंगीं. १७. हे वत्सा! तुला कोणती गोष्ट चांगली (साधु) वाटते तें सांग. १८. न्यायास. [जें] नया (नीतीला) मत (मान्य, संमत) तें [साधु] असें तो (प्रऱ्हाद) वदे. [गीति ३६ पहा.]

[1]**भ** व्यमति म्हणे, 'राजा! मी म्हणतों [2]साधु हेंच—'सोडावें ।
मो[3]हावह गृह, जावें [4]गहनीं, हरिपादपद्म जो[5]डावें.' ॥ ३६

'**ग** हनीं हरिभजन' असें कानीं पडतांचि असुर तो हांसे, ।
वचके मनांत, जाणों [6]तो मृग [7]सद्वाक्यवर्ण ते फांसे. ॥ ३७

व दला दैत्य, '[8]जपावें गुरुंनीं, [9]शिष्यानयें घडे खेद, ।
केला असदुपदेशें [10]परपक्षें बाळबुद्धिचा भेद.' ॥ ३८

[11]**ते** गुरु पुसति तयातें, 'वद वत्सा! सत्य धर्म या वेद ।
स्मृति साधु म्हणति; [12]परकृत कीं तव हा स्वकृत बुद्धिचा भेद.' ॥ ३९

बा ल [13]अबालमति वदे, 'नमितों मी त्या प्रभूसि, [14]यन्माया ।
[15]मोहूनि हेतु गुरुसहि करिताहे स्वपरभेद जन्माया. ॥ ४०

सु ज्ञ प्रिय [16]हरि होतां अनुकूळ, [17]भ्रम झडे, घडे शुद्धी, ।
हा अन्य अन्य मी हे होय [18]अभिन्नात्मनिष्ठिता बुद्धी. ॥ ४१

---

१. गंभीरबुद्धि. (प्रऱ्हाद.) २. हेंच चांगलें—घर सोडणें व वनांत जाणें. ३. मोह उत्पन्न करणारें, बुद्धिभ्रंशकारक. ४. अरण्यांत. ५. सेवावें, संपादावें. [अ० ५ श्लो० ५.] ६. तो असुर दैत्येंद्र मृग होय. ही उत्प्रेक्षा आहे. ७. सत्+वाक्य+वर्ण=साधु+वचन+शब्द=साधूच्या भाषणांतील. अक्षरें. ८. दुराचरणादि जे व्यापार त्यांविषयीं जपावें. ९. शिष्याच्या अन्यायानें. १०. शत्रूच्या पक्षानें. गुरुगृहीं असणाऱ्या विष्णु-पक्षीय जनानें मुलाला भलताच उपदेश करून त्याची बुद्धि फिरविली. [अ० ५ श्लो० ७.] ११. ते गुरु (शुंडामर्क) तयातें (त्या प्रऱ्हादातें) पुसतिः—वत्सा! (प्रऱ्हादा!) वद (सांग) या (तूं सांगितलेल्या गोष्टीला) वेद (चार वेद), स्मृति (स्मृतिशास्त्रें) सत्यधर्म असें साधु (उत्तम) म्हणति (म्हणतात). हा तव बुद्धीचा भेद (हा वेदस्मृतिसत्यधर्मांचा तुझ्या बुद्धीला झालेला संस्कार परकृत (दुसऱ्या कोणी केलेला) कीं स्वकृत (आपणच केलेला). १२. तुझ्या बुद्धीचा भेद तुझ्याच ज्ञानानें झाला अथवा दुसऱ्याच्या उपदेशानें झाला? [अ० ५ श्लो० १०.] १३. प्रौढबुद्धि, परिणतमति. १४. ज्या प्रभूची माया. १५. यन्माया (ज्या प्रभूची माया) गुरुसहि मोहूनि (आपल्या स्वामीला मोह घालून) स्वपरभेद जन्माया (भेदरूप सृष्टीच्या उत्पत्तीला) हेतु करिताहे (कारणभूत करीत आहे). [मी जरी सर्व भूतांचा स्वामी आहें तरी आपल्या प्रकृतीचा आश्रय करून, आत्ममायेनें जन्म घेतों.—गीता–अ० ४ श्लो० ६. मी सर्व भूतांमध्यें असणारा आत्मा आहें—गीता–अ० १० श्लो० २० इत्यादि पहा.] १६. ईश्वर अनुकूल झाला असतां. १७. हा एक आणि मी वेगळा असा संसारविषयक बुद्धिभ्रम. १८. एक आत्मस्वरूपीं रत अशी.

[1]**दे** वा ज्या स्वपर म्हणति अविवेकी, [2]सत्यपाहि कविपतिला ।
मोह पडे, ज्या जाणों जातां, या तोचि भेदितो मतिला. ॥ ४२
[3]**बा** डव हो! [4]चुंबकमणिसंनिधि घडतां जसें [5]अय भ्रमतें, ।
हरिसंनिधिनें मम मन भेद तसें पावतें, [6]पदीं रमतें.' ॥ ४३
य द्यपि तें सूक्त अमृत, तरि [8]त्यांच्या मानिलें विष मनांहीं, ।
गुरुसुत कडकडुनि म्हणति, '[9]चवथाचि उपाय, या विषम नाहीं. ॥ ४४
न ष्टनय कसा झाला [10]दितिसुतचंदनवनांत हा बाळ? ।
कंटकतरु, व्हांयाला [11]तच्छेदक विष्णुपरशुला [12]नाळ.' ॥ ४५
मो ठें [13]तर्जन करिती, आणविती [14]भूमिदेव वेत्रास, ।
प्रऱ्हादा दाखविती भय, [15]ज्या [16]काळा न देववे [17]त्रास. ॥ ४६
भ य दाउनि [18]त्रिवर्गप्रतिपादक शास्त्र पढविती विप्र, ।
प्रऱ्हाद शिके, [19]सारी नियमी कटु वाढिलें जसें [20]क्षिप्रं. ॥ ४७
ग ति बरवी [21]राजनयीं झाली हें [22]कवितनूज जाणोनि ।
मातेनें [23]भूषविला सुत भेटविती [24]प्रभूसि आणोनी. ॥ ४८
व सवुनी अंकीं प्रेमें असुरेंद्र पुसे [25]निजांगजातातें ।

---

१. ज्या देवा (ज्या ईश्वराला) अविवेकी (अज्ञ जन) स्वपर (आपणाहून भिन्न असा, जीवेश्वरैक्य नाहीं असा) म्हणति [आणि] ज्या (ज्या ईश्वराला) जाणों जातां (जाणण्याचा यत्न करतां) कविपतिला (ज्ञात्यांत जो श्रेष्ठ त्याला) सत्यपाहि (सत्यलोकाचा स्वामी ब्रह्मदेव त्यालाही) मोह पडे (मोह पडतो), (तोचि ईश्वर) या मतिला (या माझ्या बुद्धीला) भेदितो (बोध करतो). २. सत्यलोकाचें पालन करणाऱ्या ब्रह्मदेवालाही. ३. ब्राह्मण हो! गुरुजी! ४. लोहचुंबक मण्याचें सान्निध्य. ५. अय=लोखंड. ६. विष्णुचरणीं लीन होऊन तेथेंच राहतें. ७. तें प्रऱ्हादाचें उत्तम भाषण अमृत होतें. ८. त्या गुरुसुतांच्या. ९. साम, दाम, भेद आणि दंड हे चार उपाय होत. [अ० ५ श्लो० १६.] येथें चवथा उपाय–दंड–याचाच उपयोग करणें योग्य आहे. हा उपाय विषम (अयोग्य, अननुरूप) नाहीं. [गीति ४६ पहा.] १०. दैत्यरूप चंदनवनांत हा बाळ प्रऱ्हाद कंटकवृक्ष कसा झाला? ११. दैत्यचंदनवनाचा संहारक जो विष्णूचा परशु त्याला हा दांडा होऊं पाहत आहे. १२. देंट, दांडा. १३. दटावणें. १४. ब्राह्मण. यांत **कारकदीपक** अलंकार झाला आहे. १५. ज्या प्रऱ्हादाला. १६. यमाला. १७. भय. १८. धर्मार्थकामप्रतिपादक. १९. खपवी. २०. नियमी (व्रतस्थ पुरुष) कटु वाढिलें (कडू वाढलेलें अन्न) जसें क्षिप्र (ज्याप्रमाणें त्वरित) सारी (खपवितो, त्याप्रमाणें प्रऱ्हाद त्वरित पढे). २१. राजनीतींत. २२. शुक्रपुत्र. २३. स्नान घालून अलंकारमंडित केलेला असा. २४. दैत्यराजाला. २५. स्वतनूजातें, स्वपुत्रातें.

'वद जें गुरुपासुनि तूं उत्तम शिकलासि किमपि ताता[1]! तें.' ॥ ४९
ते व्हां प्रह्लाद म्हणे, 'श्रीहरिचें श्रवण[2] कीर्तन स्मरण ।
स्वार्पण[3] सख्य समर्चन[4] पदसेवन दासता नमस्करण, ॥ ५०
बा पा! असी नवविधा भक्ति करावी समर्पिली हरितें, ।
उत्तम अध्ययन जनीं सर्वाध्ययनांत मानितों तरि तें.' ॥ ५१
सु ररिपु गुरुपुत्रातें[5] कोपूनि म्हणे, 'द्विजाधमा! मंदरे[6]! ।
अरिसीं मिळुनि शिकविलें शिशुसि अहित हें, असें कसें वद रे!' ५२
दे शिकपुत्र[7] म्हणे, 'हरिशत्रो[8]! आम्हां न अयश ओपावें, ।
याची सहजा[9] मति हे, त्वां सत्प्रभुनें वृथा न कोपावें.' ॥ ५३
वा[10] सवशत्रु म्हणे, 'हा गुरुसुत, जरि कुमति[11] शिकविली असती ।
म्हणता, 'चुकलों' अशिवा वद रे! [12]कोठूनि बुद्धि हे असती[13]?'॥ ५४
य मसम दैत्य खवळला, प्रह्लाद न भी, म्हणे तदपि त्यातें, ।
'कृष्णीं मति होणें जें दुर्लभ गेहव्रतां[14] पद पित्या! तें. ॥ ५५
न गुरूच्या उपदेशें, न परस्परभाषणें[15], स्वयेंही न, ।
कृष्णीं होय तयांची मति, सेविति [16]सेविलेंचि जे हीन. ॥ ५६
मो हित जे विषयांहीं, ते नेणति[17] विष्णुकीर्तिचा गंध, ।

---

१. हे बालका! ['तातस्तु जनकः पिता' अमरः । 'तातोऽनुकंप्ये पितरि' हेमचंद्रः।] २. कथाश्रवण. [अ० ५ श्लो० २३-२४.] ३. आत्मनिवेदन, आपलें शरीर ईश्वराला देणें. ४. पूजन. ५. शुक्राचार्यांच्या मुलांतें. (स्वपुत्राध्यापकांतें.) ६. मत्+अरे=हे माझ्या शत्रो. ७. गुरुपुत्र. ८. इंद्रशत्रो. ९. स्वाभाविक मति, उपजत बुद्धि, दुसऱ्यानें पढवून आलेली नव्हे अशी. १०. वासवाचा (इंद्राचा) शत्रु (द्वेषी, दैत्यराज). ११. जर गुरुसुतानें तुला कुबुद्धि शिकविली असती, तर हा गुरुसुत (गुरुपुत्र) चुकलों (माझ्या हातून चुक झाली असें) म्हणता. पण ही त्याची शिकवणूक नव्हे. तेव्हां हे प्रह्लादा! ही अशिवा [व] असती बुद्धि (अकल्याणप्रद दुष्ट बुद्धि) तुला कोठून प्राप्त झाली हें सांग. १२. ही दुर्बुद्धि तुला कशी उपजली? [अ० ५ श्लो० २९.] १३. दुष्टा. १४. गृहस्थाश्रम्यास. गृहस्थाश्रमी जनास विष्णूवर भक्ति जडणें अत्यंत अप्राप्य होय. १५. अ० ५ श्लो० ३० पहा. १६. चर्वितचर्वण केलेलें. जे हीन (अज्ञ जन, हलके लोक) सेविलेंचि सेविति (अनुभविलेलें विषयसुख पुनः पुनः सेवितात, परिणामीं दुःखप्रद असें वारंवार सेविलेलें विषयसुख पुनः अनुभवितात) तयांची मति (अशा जनांची बुद्धि) कृष्णीं (ईश्वरपर, ईश्वराच्या ठिकाणीं) [गुरूपदेशानें, परस्परभाषणानें, आणि स्वयंस्फूर्तीनें म्हणजे कोणत्याही प्रकारानें) न होय (होत नाहीं). ईश्वरपर बुद्धि होण्यास विषयविरक्ति झाली पाहिजे, असें तात्पर्य. १७. [illegible]

ऐशा विषयांधांला जे गुरु रुचती तसेचि ते अंध. ॥ ५७
[1]**भ** गवद्भक्तजनांच्या चरणरजांहीं घडे न जों स्नान ।
हरिचरणस्पर्श मतिस तों कैंचा? याविना वृथा ज्ञान.' ॥ ५८
ग जसा मदांध दैत्य क्रोधांधहि, रीति फार ती खोटी, ।
[2]कोटिज्ञानिस्तुत सुतरत्न [3]स्वांकावरूनि तो लोटी. ॥ ५९
[4]**वं** क्रप्रकृति सुनिर्दय असुरेश्वर तो म्हणे, 'अरे! भट हो! ।
[5]मंदहितदास [6]मंदहितचि, हा तुमच्या [7]शस्त्रमुद्गरा घट [8]'हो.' ॥ ६०
ते [9]उग्र भृत्य हाणिति व्हाया शत चूर्ण आयुधा त्याचें; ।
[10]खळ किति? न पुरेलचि [11]हरिजननाशीं पूर्ण आयु [12]धात्याचें. ॥ ६१
वा यां गेले [13]नानाशस्त्रप्रकरप्रहार ते श्रमले, ।
गमले निर्दै[14]वांचे [15]उद्यमसे विफळ खळ बहु भ्रमले. ॥ ६२
सु त न मरे यास्तव बहु [16]शंके, चिंता करी, वधा योजी ।
दिगि[17]भ [18]भुजग वि[19]ष [20]कृत्या तो, [21]धृतहरिकवच शिशु म्हणे, '[22]यो जी!'॥
दे वध्यानें न मरे गिरिशिखरावरुनि लोटिला तरि तो, ।
न [23]गळे हिमांत, न जळे [24]दहनांत, तदन्य काय [25]होकरितो. ॥ ६४

---

१. परमेश्वरभक्तांच्या पादधुळींत जोंपर्यंत स्नान झालें नाहीं तोंपर्यंत मनुष्याच्या बुद्धीला परमेश्वरचरणाचा स्पर्श व्हावयाचा नाहीं. [अ० ५ श्लो० ३२.] २. कोटिशः बुधांनीं स्तविलेलें उत्तम बालक. ३. आपल्या मांडीवरून भूमीवर ढकलून दिलें. [अ० ५ श्लो० ३४.] ४. वांकडा अथवा क्रूर स्वभाव ज्याचा तो. ५. मत्+अहित+दास=माझा शत्रु जो विष्णु त्याचा सेवक. ६. मत्+अहित=माझा शत्रु. ७. हा (प्रह्लाद) तुमच्या शस्त्ररूप मुद्गरास घट (भाजन) हो (होवो). या प्रह्लादावर तुमच्या शस्त्रांचा प्रहार होवो. ह्याचा शस्त्रांनीं वधच केला पाहिजे. ८. होवो. ९. भयंकर. १०. खळाचा पाड काय? खळाचें सामर्थ्य कितीसें? खळाला इतकें कोठचें सामर्थ्य? ११. भगवद्भक्तांच्या नाशाच्या कामीं. १२. ब्रह्मदेवाचें. [असुरवीरांचे शस्त्रप्रहार सर्व निष्फळ झाले. अ० ५ श्लो० ४१.] १३. नाना शस्त्रसमूहांचे प्रहार. १४. अभागी पुरुषांचे. १५. उद्योगासारखे. १६. शंका धरी, भय बाळगी. १७. दिक्+इभ=दिग्गज. दिग्गजाच्या पायीं बांधणें. १८. सर्प. आंगावर सर्प सोडणें. १९. विष चारणें. २०. कृत्या (राक्षसी) उत्पन्न करून पाठीस लावणें. २१. धृत (धरिलें आहे)+हरिकवच (हरिरूप कवच) ज्यानें असा शिशु (प्रह्लाद). २२. येवो. २३. [तो प्रह्लाद] हिमांत न गळे (बर्फांत, थंडींत, गळेना, हिमानें गळून जाईना), दहनांत न जळे (अग्नींत दग्ध होईना. असे अनेक प्राणघातक उपचार प्रह्लादानें सहन केले, पण त्याला मरण आलें नाहीं.) तदन्य (त्या प्रह्लादाखेरिज दुसरा कोणी) काय हो- करितो! (काय शब्दोच्चार करूं शकता, कसा जीवंत राहता) दुसरा कोणी असता तर

वा[1] रिधिमाजि बुडविला [2]गर्तींहि पुरूनि कोंडिला [3]सुचिर, ।
वरि गिरिहि पाडिले जरि उपवासी ठेविला तरी [4]रुचिर. ॥ ६५

य त्नशतेंही होतां पुत्राच्या वक्रपण न [5]लव [6]लोमीं, ।
असुर [7]म्हणे, 'भ्यालों या शिशुसि; बळी **श**क्र पण न लवलों मीं. ६६

[8]**न** कुतोभय शिशु पांचां वर्षांचाही [9]महाप्रभा वमला, ।
बहुधा नाश विरोधें [10]याँच्या, नच हा [11]महाप्रभाव मला.' ॥ ६७

मो रासि [12]भुजंग तैसा बहु शिशुला वचकला मनीं खळ तो, ।
त्याला [13]शुंक्रसुत म्हणति, 'अस्थिर बालस्वभाव तुज कळतो. ॥ ६८

भ य पावुनि न पळावा, [14]अहिपाशांनीं कुमार [15]आंवळुनी, ।
[16]गुरु ये तों रक्षावा, चिंता कां हित उपाय हा कळुनी?' ॥ ६९

ग मलें बरवें [17]तन्मत, मान्य करुनि, तो म्हणे, 'अहा! यास, ।
हित [18]राजधर्म शिकवा, शिशुच्या भ्रम बुद्धिला न [19]होयास.' ॥ ७०

खरोखर मरण पावला असता. चवथ्या चरणाचीं पदें–'तदन्य काय हो! करितो?' अशीं कोणी पाडतात. तदन्य (त्याहून अन्य पुरुष, प्रह्लादाशिवाय दुसरा पुरुष) काय हो! (अहो!) करितो (काय बरें करूं शकता? प्रह्लादाशिवाय इतराच्यानें काय बरें करवलें असतें? कांहीं करवलें नसतें, तो गळून गेला असता अथवा दग्ध झाला असता–असें अपेक्षित उत्तर या प्रश्नाचें जाणावें. २४. अग्नींत. २५. शब्द करितो.

१. सागरांत. २. खळग्यांतही. ३. पुष्कळ काळपर्यंत. ४. सुंदर, सतेज. ५. किंचित्. ६. केशीं. ७. हिरण्यकशिपु म्हणाला:–या शिशुसि (या प्रह्लाद बालकाला) भ्यालों (याची कृति पाहून मी भयग्रस्त झालों आहें). शक्र (इंद्र मोठा) बळी (बळवान्, प्रतापी, पराक्रमी आहे) पण (परंतु) मी (दैत्यराज त्या इंद्रापुढें) लवलों न (नम्र झालों नाहीं, त्याला शरण गेलों नाहीं.) पण या पोरापुढें हात टेंकले. ८. कुठूनही भय नाहीं ज्याला असा. नकुतोभय (अकुतोभय असा) शिशु (बाल प्रह्लाद) पांचां वर्षांचाही (पांच वर्षांचा असतांही) महाप्रभा (मोठें तेज) वमला (प्रकट करता झाला) हा महाप्रभाव (असा मोठा पराक्रम, असें मोठें प्रतापतेज) मला न (माझ्या ठायीं नाहीं, या हिरण्यकशिपूच्या आंगीं नाहीं) बहुधा याच्या विरोधें (या प्रह्लादाशीं विद्वेष केल्यानें) नाश (माझा नाश व्हावयाचा). ९. मोठें तेज. १०. याच्या विरोधें (विरोधानें–याच्याशीं विरोध केला असतां) मृत्यु येणार. [अ० ५ श्लो० ४७.] ११. मोठा पराक्रम. १२. मयूर-सर्पाचें स्वाभाविक वैर आहे. १३. शुंडामर्क. १४. सर्पपाशांनीं. १५. बांधून. १६. शुक्राचार्य. १७. गुरुपुत्रांचें मत. १८. राजांचे धर्म, राजनीति. १९. होण्याकरितां.

ब हु मानुनि तें[1] प्रभुवच पढविति ते अर्थधर्मकामगती,[2] ।
भागवतधर्मरुचि ज्या त्या देइल उक्ति शर्म कां मग ती? ॥ ७१

ते थुनि त्याचा गुरु तो जेव्हां अन्यत्र जाय कार्याला,[3] ।
क्रीडार्थ बाहाति[4] सखे[5] त्यासमयीं असुरबाळ आर्याला.[6] ॥ ७२

बा ळांचें प्रेम म्हणुनि हरिचिंतनपरहि तो दयालु वरा ।
त्यां दे निजबोध,[7] झटे हरिजनचि न परहितोदया,[8] लुबरा.[9] ॥ ७३

'सु ख विषयांत न कांहीं, हरिस भजा येधवांचि, 'बाळपण ।
सारुनि भजों' म्हणाल प्रियसख हो! वश नसेचि काळ पण.[10] ॥ ७४

दे वा हरिचेचि सदा व्हावेचि असुरकुमार हो! भक्त, ।

---

१. हिरण्यकशिपुवचन. २. अर्थ, धर्म व काम यांची गति (स्वरूप). ते (शुंडामर्क अध्यापक) तें प्रभुवच (तें दैत्याधीशाचें भाषण–प्रह्लादाला राजधर्म शिकवा–हें वचन) बहु मानुनि (शिरसावंद्य मानून [त्या प्रह्लादाला] अर्थधर्मकामगती (अर्थ, धर्म, काम यांची गति–स्वरूप) पढविति (शिकविति), [परंतु] ज्या (ज्या प्रह्लादाला) भागवतधर्माची आवड–गोडी–आहे) त्या (त्याला) ती उक्ति (ती अध्यापकाची शिक्षणपद्धति) मग (अनंतर) कां शर्म (सुख) देइल? (कशी सुखावह होईल? अर्थात् सुखप्रद होणार नाहीं). 'अर्थधर्मकामगति' या पदाचा अर्थ निराळा करून तें पद 'ते' याचें विशेषण करणें प्रशस्त होय. अर्थ, धर्म आणि काम हे तीनच आहेत गति (आधारस्थान) ज्यांची असे (शुंडामर्क), अर्थधर्मकाम या तीन गतींचीच अपेक्षा करणारे असे शुंडामर्क–प्रह्लादाला राजधर्म पढविती–असा अर्थ करणें प्रशस्त होय. भागवतधर्म=भगवद्भक्तांचा जो धर्म तो. भक्तांस इष्ट आणि प्रिय असा जो भक्तिमार्ग तो भागवतधर्म. ३. गृहस्थाश्रमसंबंधी कांहीं कामासाठीं दुसरीकडे गेला. [अ० ५ श्लो० ५४.] ४. बोलावती. ५. बरोबरीचे मित्र. (दैत्यपुत्र.) ६. पूजनीय प्रह्लादाला. ७. आत्मोपदेश. तो दयालु (तो दयाशील प्रह्लाद) हरिचिंतनपरहि (विष्णुचिंतनांत गढून गेलेला असूनही, (विष्णुध्यानपरायण असूनही) बाळांचें प्रेम म्हणुनि (लहान मुलांविषयीं स्वतःच्या मनांत प्रीति होती यास्तव, बालकांचें प्रेम असल्यामुळें) वरा निजबोध (उत्तम आत्मज्ञानाचा उपदेश) त्यां (दैत्यबालांला) दे (देता झाला) [कारण] परहितोदया (दुसऱ्याचे कल्याणासाठीं) हरिजनचि झटे (जो हरिभक्त आहे तोच झटतो) लुबरा (लुबरेपणा करणारा, पुढें पुढें नाचणारा, पुढें पुढें नाचून दुसऱ्याची मर्जी संपादणारा) न [झटें]=तसा झटत नाहीं. परहित करण्याचे कामीं हरिजनांवांचून इतर कोणी झटणारा नाहीं, सर्व स्वार्थपरायण असतात, हरिभक्त मात्र परार्थपरायण होत ८. पर+हित+उदय=दुसऱ्याच्या कल्याणाचा उदयासाठीं. ९. आपणास तादृश ज्ञान नसून लोकही निवारण करितात असें असूनही जो पुढें पुढें बोलायास धांवतो तो. १०. परंतु.

कीं हा या भूतांचा आत्मा[1] ईश्वर सुहृत्प्रिय व्यक्त[2]. ॥ ७५

वा टेल तुम्हांसि जरि श्रीकृष्णचि एक देव जोडावा, ।

तरि भोगोद्यम[3] सहसा आधीं कैसा समस्त सोडावा? ॥ ७६

थ त्यावांचुनि दैवें दुःख, तैसें[4] सुखहि देहयोगानें, ।

भोगोद्यमें[5] न आयुःक्षय भगवत्कीर्तिच्याचि हो! गानें. ॥ ७७

न घडेल भजन हरिचें, तरुणपणीं विषयसाधनीं भ्रमतां, ।

वृद्धपणींही दुःसहकामश्वासाद्युपद्रवें[6] श्रमतां. ॥ ७८

मो ह स्त्रीपुत्रांचा गेहीं, तैसीच अर्थतृष्णा[7] ते ।

दुस्त्यज[8] या सांपडला, प्राणी पावेल काय कृष्णातें? ॥ ७९

भ जतो अभिमाना जो[9] जन, बहुमत ज्यांस[10] कामसंगर, हा ।

बुडुनि बुडवितो, याचा त्यजुनि महामोहधाम संग रहा. ॥ ८०

ग[11] रुडध्वज सर्वांचा आत्मा आहेच सिद्ध हा, यास ।

भजनें प्रसन्न करितां दैत्यात्मज हो! नसेचि आयास. ॥ ८१

व सतो आत्मा, यास्तव सर्वां[12] भूतीं दया करा नमुनी, ।

---

१. विष्णु हा सर्व भूतांचा प्रिय आत्मा, हितकर्ता व ईश्वर (स्वामी) आहे. [अ० ६ श्लो० २.] २. स्पष्ट. ३. भोग+उद्यम=विषयभोगाचा उद्योग. ४. आपोआप दैवयोगानें दुःख प्राप्त होतें तसें इंद्रियजन्य सुखही देहसंबंधामुळें प्राप्त होतें. [अ० ६ श्लो० ३.] ५. भोगोद्यमें (सुखभोगासाठीं केलेल्या उद्योगानें, सुखप्राप्तिसाठीं उद्योग करून) आयुःक्षय न हो! (आयुष्याचा नाश करूं नका, आयुष्य संपवूं नका) भगवत्कीर्तिच्याचि गानें (भगवंताचे गुणानुवाद गाऊन) आयुःक्षय हो (आयुष्याचा व्यय करा, आपल्या जीविताचा सदुपयोग करा, दुरुपयोग करूं नका.) ६. काम+श्वास+इत्यादिक बाधेनें. ७. पैशाची तान, धनलालसा, धनलोभ. ८. त्याग करण्यास फार कठिण. ९. जो जन अभिमाना भजतो (जो पुरुष अभिमानाचा दास असतो) ज्यास कामसंगर बहुमत (जो वासनेच्या स्वाधीन, जो विषयवासनेचा मोठा भक्त) [तो] हा (पुरुष] बुडुनि (आपण स्वतः बुडतोच) [आणि] बुडवितो आपल्या संगतीं असणाऱ्यासही बुडवितो) याचा (अशा या पुरुषाचा महामोहधाम (महामोहाचें स्थान असा) संग (समागम) त्यजुनि (टाकून) [अहो असुरबालक!] रहा (असा) स्वतः आपण अभिमान व विषयवासना यांचा त्याग करावा इतकेंच नाहीं तर अभिमान आणि विषयवासना यांच्या नादीं लागलेल्या पुरुषांचाही त्याग करावा, त्यांच्या समागमीं राहूं नये—असें तात्पर्य. १०. ज्यास (ज्या पुरुषाला) कामसंगर (कामयुद्ध—रतिसंग्राम) बहुमत (अत्यंत मान्य). ११. गरुड आहे ध्वजीं ज्याच्या असा विष्णु. १२. सर्व प्राण्यांच्या ठिकाणीं दया व प्रेम ठेवा. [अ० ६ श्लो० २४.]

करिति उपाया इतरा[1] सुखवाया या दयाकरा[2] न मुनी. ॥ ८२

ते योग[3]याग रुचति न, भूत[4]दया हे जसी रुचे हरिला, ।

प्रभु तुष्ट इणें होतां, अर्थ कवण[5] जड जना! मनीं धरिला? ॥ ८३

वा[6] रिजनेत्रा भावें ध्यावें, गावें सदा यशाला हो! ।

आम्हां इतुकेंचि पुरे, धर्म इतर मोक्षही कशाला हो? ॥ ८४

सु[7] खहेतु भक्तिपथ हा श्री[8]नारायण सुरर्षि[9]ला बोधी, ।

तो मज[10], म्यांहि तुम्हांला, येणें[11] तुमचीहि हरिरता हो धी.' ॥ ८५

'**दे**[12] वर्षिसमागम तुज घडला कैसा?' असें मुलें[13] पुसती, ।

सांगे कथा त्यांतें[14] सत्प्रेमाचीच मूर्ति[15] ती नुसती. ॥ ८६

'**बा**[16] लक हो! ज्या काळीं सुतपोनियमांत मज्जन करीती ।

---

१. अन्य उपायाला, भूतदयेशिवाय इतर उपायाला. २. दया+आकरा=दयेच्या खाणीला. या दयाकरा (या कृपासागर विष्णूला) सुखवाया (संतुष्ट करण्यासाठीं) मुनी (ऋषिजन) इतरा उपाया (भूतदयेहून अन्य उपायाला) न करिति (करीत नाहींत, भूतदयेलाच करतात.) ३. यज्ञादिक कर्मप्रधान उपाय. ४. भूतदयेच्या योगानें हरि संतुष्ट व प्रसन्न होतो–असा भाव. ५. कवण (कोणता) अर्थ (काम, मनोरथ) मनीं धरिला (मनानें इच्छिलेला कोणता अर्थ) जना (पुरुषाला) जड (कठिण, दुर्लभ, मिळण्यास अवघड आहे?) आदिपुरुष प्रसन्न झाला असतां कोणता मनांत धरिलेला काम सफल होणार नाहीं? ६. कमलनयन विष्णूला. ७. सुखाला कारण असा. ८. नराचा सखा श्रीभगवन्नारायण. [अ० ६ श्लो० २७.] ९. नारदाला. १०. तो (सुरर्षि नारद) मज (मला प्रऱ्हादाला बोधी). ११. या बोधानें. १२. नारदाचा सहवास. १३. असुरबालकें. [अ० ७ श्लो० १.] दैत्यपुत्रांचे शुंडामर्क हे गुरु होते, या दोघांवांचून दुसरा गुरु यांस माहीत नव्हता, असें असतां, नारदाचा समागम कधीं व कोठें झाला अशा असुरबालांचा प्रश्न आहे. १४. त्या मुलांला. १५. ती (नारदोक्त कथा) नुसती (केवळ, निवळ) सत्प्रेमाचीच (साधुप्रेमाचीच) मूर्ति [होय]. १६. बालक हो! (अहो दैत्यपुत्र हो!) मंदरगिरिची जैशी (सागरांत मंदराचल बुडाला होता त्या प्रसंगींची रीति जशी तशी, मंदराचलाला रवि करून देवदैत्यांनीं समुद्रमंथन केलें त्यावेळच्या त्याच्या रीतिप्रमाणें, मंदराचलाच्या रीतीसारखी, मंदराचलाप्रमाणें सदां सागरांत बुडून असण्याच्या स्थितीसारखी) तैसीच (तशीच, तिजसारखी) सुतपोनियमांत (उत्तम तपश्चर्या आणि नियम आचरण्यांत) मज्जन (बुडणें, गढून जाणें) करीती (करणारी, कर्त्री, सुतपोनियमांत निमज्जन करणारी, उत्तम तप आणि नियम संपादण्यांत गढून गेलेली) [अशी] मज्जनकरीती मत्+जनक+रीती=माझा+बाप हिरण्यकशिपु+चाल, स्थिति, पद्धति, माझ्या बापाची रीती–स्थिती) ज्या काळीं होती [त्या काळीं मला देवर्षिसमागम घडला] ज्या काळीं माझा बाप हिरण्यकशिपु हा सागरांत निमग्न झालेल्या मं-

मंदरगिरिची जैसी होती तैसीच मज्जनकरीती. ॥ ८७
[1]**य** त्नें देवांनीं त्या रंध्रीं भंगूनि असुर [2]पळवीले, ।
लुटिलें [3]सर्वस्व, मुखीं [4]अयश:कज्जल लिंपूनि मळवीले. ॥ ८८
[5]**नें** ग भेत्ता प्रभु [6]माझ्या मातेला धरुनि ने, तया [7]वाटे ।
श्री**ना**रद भेटे, तें [8]अनुचित त्या [9]साधुनेतया वाटे. ॥ ८९
मो चन मन्मातेचें **श**क्रापासुनि करावयासि [10]कवी ।
'योग्य न तूं या कर्मा,' ऐसें अयशीं तरावया [11]सिकवी. ॥ ९०
[12]**भ** र्ता **पु**लोमजेचा वदला, 'जठरीं इच्या [13]अहित आहे, ।
[14]त्यां वधुनि इतें सोडिन, राहो जों [15]प्रसव तो वरिच बा! हे.' ॥ ९१
[16]**गं** जवाहना मुनि म्हणे, 'आला आहे [17]बळी इच्या पोटा, ।
न मरेलचि तव यत्नें, रे! हा [18]निर्दोष [19]भागवत मोठा.' ॥ ९२
व चनें मुनिच्या [20]वज्री माज्या मातेसि तत्क्षणीं सोडी, ।
[21]उजवी घालुनि, हस्तद्वय [22]भगवद्भक्त भक्तिनें जोडी. ॥ ९३
[23]**ते** जस्वीश्वर **ना**रद मज्जननीला निजा[24]श्रमीं रक्षी, ।
'[25]पति ये तों स्वस्थ रहा' ऐसें सांगे [26]सुतापणें लक्षी. ॥ ९४

दराचलाप्रमाणें तपश्चर्येंत आणि नियमांत निमग्न झाला होता त्याकाळीं मला नारदाचा समागम झाला—असें तात्पर्य.

१. प्रबळ प्रयत्नानें. २. दैत्यांना घाबरवून पळावयास लाविलें. ३. जयकांक्षी अमरांनीं राजाचें शिबिर लुटून फस्त केलें. [अ० ७ श्लो० ६.] ४. यशाचा रंग शुभ्र आणि अयशाचा काळा समजतात म्हणून अयशाला काजळ असें म्हटलें आहे. 'अयश:पापयोः कार्ष्ण्यस्य' [काव्यानुशासन—पृ० ९]. ५. पर्वत भेदणारा (इंद्र). ६. माझ्या प्रह्लादाच्या मातेला (राजपत्नीला). ७. मार्गीं. ८. पतिव्रता अशा परस्त्रीला अपराध नसतां नेणें हें अनुचित. ९. साधुनेतया=साधुनायकाला, मुनिनायक नारदाला. १०. नारदमुनि. ११. ऐसें शक्राला कवी (नारद) सिकवी. येथें 'शिकवी' असें पद पाहिजे पण स श यांत अभेद मानण्याचा कविसंप्रदाय आहे. 'रलयोर्डलयोश्चैव बवयोः शसयोर्न भित्' अलंकारशेखर—नियममरीचि १५—पृ० ५७] याप्रमाणें. १२. इंद्र, शचीपति. १३. शत्रु. १४. या राजपत्नीच्या उदरांत असणाऱ्या देवशत्रूला. [अ० ७ श्लो० ९.] १५. उत्पत्ति. १६. गज (ऐरावत हत्ती) आहे वाहन ज्याचें तो (इंद्र) त्याला. १७. बलाढ्य. १८. पापरहित. १९. महाभगवद्भक्त. २०. इंद्र. (वज्र आहे आयुध ज्याचें तो.] २१. प्रदक्षिणा घालून. २२. ईश्वरभक्त. (इंद्र.) २३. तेजस्वी+ईश्वर=तेजस्व्यांमध्यें श्रेष्ठ. २४. 'वत्से! पति परत येईपर्यंत माझ्या आश्रमांत रहा' असें नारदानें सांगितलें. [अ० ७ श्लो० १२.] २५. प्रह्लादपिता मंदर पर्वतावर तप करण्यास गेला होता. [गीति ८७ पहा.] २६. कन्यापणानें, कन्यात्वानें.

'[1]वा ! गर्भ क्षेम असो, पति आल्यावरि सुखें प्रसव हो.' हे ।
मागे वरद्वय, तिला मुनि दे, आंदण जसें दिजे [2]मोहें. ॥ ९५
[3]सु रमुनिवर तो मातें [4]उद्देशुनि तत्व सर्वधर्मांचें, ।
[5]ज्ञानहि [6]दे, ओखद जें कर्मांचें, हेतुं [7]नित्य [8]शर्मांचें. ॥ ९६
दे वर्षिदत्त [9]वयुन [10]स्त्रीत्वें झालें तिचें तिरोहित[11] [12]हो ! ।
[13]माझें तसेंचि आहे, [14]तुमचेंही यांत मन शिरो, हित [15]हो.' ॥ ९७
बा ळांसि असें [16]अभिमुख करुनि प्रल्हाद आपल्यासि कवी ।
ज्ञान तसें निववाया चित्ता त्यांच्याहि तापल्या सिकवी. ॥ ९८
य श हरिचें अमृताधिक जें, गाया लाविले [17]कुमारहि तें, ।
[18]यद्रुचिसत्कृतिरहितें व्हावें न, अजें जसें [19]कुमारहितें. ॥ ९९
[20]न ष्टधृति [21]त्रस्त [22]गुरु [23]प्रभुला, कळतांचि वृत्त तें, कळवी, ।
तो असुरेश्वर परम [24]क्रोधें वदना [25]येशासही मळवी. ॥ १००

---

१. वा ! (नारदा !). २. प्रेमानें, प्रीतीनें. ३. देव आणि ऋषि यांत श्रेष्ठ. (नारद.) ४. मजकडे लक्ष्य ठेवून, मला समजावें या उद्देशानें. ५. निर्मलज्ञान, आत्मानात्मविवेकज्ञान. ६. माझ्या मातेला उपदेशिलें. ७. 'हेतुर्ना कारणम्' इत्यमरः. हेतु सर्वत्र पुल्लिंगीं आहे. परंतु प्रस्तुतस्थलीं या शब्दाचा नपुंसकलिंगीं प्रयोग चिंत्य आहे. 'हेतु'शब्दाचे ऐवजीं 'बीज'शब्द घातला असतां सर्वदृष्ट्या सुसंगतता येईल. ८. सुखाचें. ९. ज्ञान. १०. स्त्रीस्वभावामुळें. ११. आच्छादित. स्त्रीस्वभावामुळें ती तें ज्ञान विसरून गेली. [अ० ७ श्लो० १६.] १२. अहो. १३. माझें ज्ञान तसेंच आहे. मजवर ऋषींचा अनुग्रह असल्यामुळें माझें त्या ज्ञानाचें स्मरण नष्ट झालें नाहीं. १४. असुरबालकांचें. १५. होवो. १६. संमुख. १७. दैत्यबालक. प्रल्हादानें केलेला उपदेश ऐकून सर्व दैत्यपुत्रांनीं भक्तिमार्ग स्वीकारला. प्रल्हादानें दैत्यपुत्रांस हरिचरित गावयास लाविलें. १८. यत्+रुचि+सत्कृति+रहितें=ज्या हरियशाच्या रुचीचा सत्कार ज्याला नाहीं त्यानें. सान्वयार्थ–जसें अजें (विष्णूनें) कु-मा-रहितें (पृथ्वी व लक्ष्मी यांखेरीज) [कधीं] न व्हावें [तसें कोणीही पुरुषानें] यद्रुचि-सत्कृतिरहितें न व्हावें. जसा पृथ्वी व लक्ष्मी यांचा व विष्णूचा नित्यसंबंध आहे तसा परमेश्वरयशोरुची व तत्संबंधी सत्कृति यांचा व भक्ताचा नित्यसंबंध असावा. ही गीतिकव्युक्ति आहे. १९. पृथ्वी आणि लक्ष्मी यांहीं करून रहित असा. २०. नष्ट आहे धृति (धैर्य) ज्याची असा (गुरु) भयग्रस्त (गुरु). २१. भय पावलेला. २२. गुरु=गुरुपुत्र, आचार्यसुत. [अ० ८ श्लो० २.] २३. दैत्यराजाला. (हिरण्यकशिपुला.) २४. कोपावेशानें. (पुत्राच्या अप्रिय वर्तनाच्या योगें आलेल्या रागानें.) २५. ही **सहोक्ति** आहे.

मो ठ्या क्षोभें **दि**[1]तिसुत पुनरपि [2]तद्वधचि मानसीं आणी, ।
त्या [3]साधुप्रऱ्हादा [4]श्रवणायोग्या असी वदे वाणी. ॥ १०१

भ स्म कराया पाहे [5]पादाहत [6]दृष्टिविष जसा साप, ।
बाप क्षोभे [7]अरिहुनि कोटिगुणें [8]कीं मनीं महा पाप. ॥ १०२

ग र्जोनि म्हणे, ‘[9]मंदा! [10]लंघिसि [11]मच्छासनस्वसेतूतें, ।
[12]कुलभेदकरा! अधमा! [13]अविनीता! कोण [14]बळ असे तूतें?’ ॥ १०३

ब[15]द्धांजलि साधु वदे, ‘माझेंचि नव्हे तुझेंहि बा! वळ तो, ।
ब्रह्मादि सर्वहि बळी कर जोडुनि [16]ज्या महेश्वरा वळतो. ॥ १०४

ते जस्वी [17]परमेश्वर सृष्टिस्थिति[18]विलय कौतुकें करितो, ।
बापा! [19]अजित तव मनचि तव [20]शत्रु, नव्हेचि निश्चयें हरि तो.॥ १०५

वा यांचि गर्व धरिती [21]किति, आपण [22]जिंकिल्या दिशा म्हणती, ।

---

१. दैत्य (हिरण्यकशिपु). २. त्याचा (पुत्राचा) वध. [त्यानें मुलाला मारण्याचा निश्चय केला.] ३. दांत आणि विनयसंपन्न. ४. श्रवण+अयोग्या=ऐकण्यास अनुचित अशी (वाणी). ५. पादानें (पायानें) आहत (ताडलेला, ढका लागलेला). ६. ज्याच्या दृष्टींत (नेत्रांत) विष आहे असा (साप). [‘हें तुज कोणीं कथिलें चक्षुर्विषनागपुच्छ तुडवाया’ या अर्धांतही दृष्टिविषनागाचाच उल्लेख आहे. काव्यसंग्रहग्रंथमाला-३. मोरोपंत वनपर्व-अध्याय ११ गी० १३ पृ० १५३.] ७. शत्रूहून कोटिपट ज्यास्त क्षुब्ध झाला. ८. कीं (कारण कीं) [त्याच्या] मनीं (मनांत) महा पाप (मोठें वाईट) होतें. ९. मूर्खा! १०. माझ्या आज्ञेचें उल्लंघन करतोस-असा भाव. [अ० ८ श्लो० ५-६.] ११. मत्+शासन+स्व+सेतु=माझी आज्ञारूप जी तुझी मर्यादा तीतें. १२. कुलघातका! १३. हे दांडग्या! हे धृष्टा! १४. कोणाच्या बळावर तूं माझें उल्लंघन करतोस? १५. बद्ध (जोडली) अंजलि (हस्तद्वय) ज्यानें तो. १६. ज्या महेश्वरा (परमेश्वराला) ब्रह्मादि (विधिप्रभृति) सर्व बळी (सकल बलाढ्य जन) कर जोडुनि (हात जोडून) वळतो (प्रणत होतो, वश होतो). १७. ‘परमेश्वर’या शब्दाचा विग्रह ‘रघुवंश’टीकाकार **वि**जयमणि असा करतो:-‘परा उत्कृष्टा मा शक्तिर्यस्यासौ परमः । ईष्टेऽसौ ईश्वरः । परमश्चासावीश्वरश्च परमेश्वरः । ‘ईशे एवाह मत्यर्थे न च मामीशते परे । ददामि च सदैश्वर्यमीश्वरस्तेन कीर्तितः ॥’ [गोपाळरघुनाथनंदर्गिकरप्रकाशित रघुवंश, तृतीयसंस्करण-पृ० २.] १८. संहार. प्रजापति, विष्णु आणि शिव या तीन रूपांनीं परमेश्वर जगताचा सर्गस्थितिनाशहेतु आहे असें वर्णन पुराणग्रंथांत आहे. [‘ब्रह्मत्वे सृजते लोकान् विष्णुत्वे पालयत्यपि । रुद्रत्वे संहरत्येव तिस्रोऽवस्थाः स्वयंभुवः ॥’ बाणकृत कादंबरी-प्रास्ताविक श्लोक १.] [अ० ८ श्लो० ९.] १९. न जिंकलेलें (असें) तव (तुझें) मनचि तव शत्रु (आहे). तुझ्या आज्ञेंत न राहणारें असें तुझें मन हेंच तुझा शत्रु होय. २०. येथें ‘शत्रु’ हा शब्द काकाक्षिगोलकन्यायानें उभयत्र योजिला पाहिजे. २१. अनेक राजे, कित्येक मंदबुद्धि नृप. २२. आम्हीं दहाही दिशा जिंकिल्या असें कित्येक म्हणतात.

न जिंणुनि[1] देहींचे[2] जे लाविति कामादि[3] चोर सा[4] खणती. ॥ १०६

सु ज्ञ जन जिंकितो मन, जो समं[5] सर्वत्र साधु लोकांत, ।
स्वाज्ञानकल्पित[6] अहित[7] 'कैंचे[8] त्या घालणार शोकांत?' ॥ १०७

दे[9]वारि म्हणे, 'मंदा! स्वच्छंदा! मरणकाम[10] तूं स्पष्ट, ।
कष्ट प्रार्थिसि, भलतें बडबडसी धर्मनयपथभ्रष्ट. ॥ १०८

वा क्यें अनन्वितें हीं दुष्टें आसन्नमरणसा[11] वदसी[12], ।
मद[13] [14]सीमातिग हो[15], या[16] तुजसह खाया[17] बळी असे मदसी[18]. ॥ १०९

य ज्ञांचा भोक्ता मी जगदीश्वर, मच्छिरीं पदन्यास[19] ।
करुनि, स्तविसी भजसी तूं ज्या जगदीश्वरा मदन्यास[20], ॥ ११०

---

१. जिंकून. २. देहींचे (आपल्या शरीरांत राहणारे, गुप्त ठिकाणीं असणारे नव्हेत, तरी आपल्या शरीरांत वास करणारे असे) कामादि (कामप्रमुख) सा चोर (असे सहा शत्रु) जे खणती लाविति (जे खणती लावून पाळें मुळें खणून काढणारे, जे समूळ नाश करणारे) [त्यांस] न जिणुनि (त्यांला न जिंकितां, त्यांचा पराभव न करून) आपण दिशा जिंकिल्या म्हणती (दिग्विजय केला असे म्हणतात—हें केवढें आश्चर्य होय.) स्वदेहांत असणाऱ्या व सर्वस्वी समूलघात करणाऱ्या अशा कामादिक सहा शत्रूंचा पराजय न करतां जे लोक—आम्ही दिग्विजय केला—अशी प्रौढि मिरवितात त्यांचें केवढें वेडपण होय!!! ३. काम, क्रोध, लोभ, मद, मोह, मत्सर हे सहा शत्रु. ४. सहा. ५. समदृष्टि, सारखी दृष्टि सर्वांवर ठेवणारा. ६. आपल्या अज्ञानामुळें कल्पिलेले. ७. शत्रु. ८. कोठून त्या सुज्ञजनाला शोक उत्पन्न करणार? अर्थात् शोक उत्पन्न करणार नाहींत असा अर्थ. म्हणून हा **प्रश्न** अलंकार होय. ९. देवशत्रु (हिरण्यकशिपु). १०. मरणेच्छु. ११. प्राप्त मरण ज्याला त्यासारिखा. १२. अध्याय ८ श्लो० १२ पहा. १३. गर्व. १४. सीमा+अतिग=मर्यादा+उल्लंघन करणारा. (अमर्याद, अतिशयित—असा भाव). १५. तुझा गर्व मर्यादेच्या बाहेर झाला. १६. या मदाला. १७. संहार कराया. १८. मत्+असि=माझा खड्ग. १९. पाय ठेवणें. २०. मत्+अन्य=माझ्याहून दुसऱ्यास. यज्ञांचा भोक्ता (देवांस अर्पण केलेल्या हविर्भागांचा अधिकारी मी हिरण्यकशिपु आहें. कारण यज्ञांच्या देवतांस जिंकून मी त्यांस स्थानभ्रष्ट केलें आहे) मी जगदीश्वर (अतएव मी जगताचा स्वामी होय) [मी यज्ञभोक्ता आणि जगन्नायक असतां] मच्छिरीं (माझ्या शिरावर, माझ्या मस्तकावर) पदन्यास करूनि (पाय ठेवून) मदन्यास (माझ्याहून अन्य पुरुषास, माझ्या खेरिज इतर पुरुषाला) ज्या जगदीश्वरा (मदन्य जो तोच खरा जगदीश असें मानून व मला जगदीश न मानून) तूं (प्रऱ्हाद) भजसी [आणि] स्तविसी, तो तुझा जगदीश कोठें आहे सांग. (गीति १११ पहा.)

[1]नष्टप्रज्ञा! वद रे! कोठें जगदीश तो तुझा आहे?' ।
प्रऱ्हाद म्हणे, 'मत्प्रभु सर्वत्र, [2]ज्ञानदृष्टि या पाहे.' ॥ १११
मोहांध म्हणे, 'तरि कां स्तंभीं न दिसे? भयें दडालाहे? ।
तो जगदीश्वर [3]काय? स्तवुनि कवण हित तशा जडा [4]लाहे?' ॥ ११२
[5]भक्त म्हणे, 'तव [6]गुरुगुरुगुरु करि ज्या यजनयाजनादिस तो ।
हा या स्तंभीं, करितां तत्स्मृति हें भजन, या जना दिसतो.' ॥ ११३
[8]गजसा गर्जोनि म्हणे, 'मी तव शिर सभवदीशमद [9]हरितों.' ।
[10]कलितासिमुष्टिनें तो ताडी स्तंभासि, गर्जला [11]हरि तों. ॥ ११४
वनदायुतकोटितडित्पद्मार्बुदगर्जनादिगुरुनादें ।
मानिति नि[12]जधामलया ब्रह्मादिहि तद्दयानदीयादें. ॥ ११५

---

१. हे नष्टमते! २. ज्याचें ज्ञान हीच दृष्टि तो मनुष्य. ३. काय कामाचा, तो व्यर्थ होय–असा भाव. ४. लाभे. ५. भक्त (प्रऱ्हाद) म्हणे (म्हणाला):–तव गुरुगुरुगुरु (तुझ्या बापाचा आजा, तुझा पणजा ब्रह्मदेव) यजनयाजनादिस (यजन=स्वतः यज्ञ करणें, याजन=आचार्य होऊन यजमानासाठीं यज्ञकर्म करणें व अशीं इतर कर्में) ज्या (ज्या जगदीश्वरासाठीं) करि (करिता झाला) तो (जगदीश) हा या स्तंभीं तत्स्मृति (त्याचें स्मरण) [व] हें भजन (त्या जगदीशाचें स्मरण व भजन] करितां (करीत असतां) या जना (या मला प्रऱ्हादाला) दिसतो (दिसत आहे). ६. तुझा गुरुगुरु जो ब्रह्मदेव त्याचा गुरु. ७. भजकाला. ८. गजसा गर्जोनि (हत्तीप्रमाणें गर्जना करून) [हिरण्यकशिपु प्रऱ्हादाला म्हणे (म्हणाला):–सभवदीशमद तव शिर (तुझ्या ईश्वराच्या मदासह तुझें शिर, तूं ज्याला जगदीश म्हणतोस त्याच्या मदासहवर्तमान तुझें शिर) मी हरितों (हरण करतों). स+भवत्+ईश+मद=सहित+तुझा+ईश्वर+गर्व=तुझ्या ईश्वराच्या मदासहित. ९. हरण करितो. १०. कलित+असिमुष्टि=धरिलेली+जी तलवारीची मूठ तिनें. ११. हरि (विष्णु) गर्जला (गर्जना करिता झाला). सिंहासारखा भयंकर ध्वनि उत्पन्न झाला. १२. आपल्या धामांचा (स्थानांचा) प्रलय (नाश) होत आहे असें ब्रह्मादिदेवांना वाटलें. [अ० ८ श्लो० १६-१७.] वनदायुतकोटितडित्पद्मार्बुदगर्जनादिगुरुनादें=वनद+अयुत+कोटि+तडित्+पद्म+अर्बुद+गर्जना+आदि+गुरु+नादें=मेघ+अयुतसंख्याक+कोटिशः+विजा+संख्याविशेष+संख्याविशेष+भयंकर आरोळी+प्रभृति+मोठा+गर्जनेनें (असंख्य मेघ, कोटिप्राय विजा, असंख्य निनाद इत्यादिकांच्या ही गर्जनेपेक्षां मोठ्या अशा नरसिंहाच्या गर्जनेनें) तद्दयानदीयादें (तत्+दया+नदी+यादें=त्या नरसिंहाच्या+दयारूप+नदींतील+जलचर प्राणी, विष्णुकृपेंत सदा राहणारे असे प्राणी, विष्णूचे अत्यंत भक्त) ब्रह्मादिहि (ब्रह्मदेवप्रभृति देव ही) निजधामलया मानिति (सत्यलोकादिक लोकांचा नाश होतो काय असें समजले, आपल्या स्थानांचा नाश होतो अशी भीति लोकपालांस वाटली) त्या नरसिंहाच्या अलौ-

ते व्हां सभेंत [1]न दिसे, तरि **दि**तिसुत तो चहूंकडे पाहे, ।
तों त्या [2]स्तंभींच **न** [3]नर न मृग असें तेज कोंदलें आहे. ॥ ११६
वा क्य त्रिजगामध्यें जगदीश करावया [4]स्वदासाचें ।
अत्यद्भुत रूप धरी स्वव्यापकपणहि, तो तदा साचें. ॥ ११७
सु ररिपु म्हणे, 'अहो ! हा **न** मृग न नर, काय हें विचित्र कसें ! ।
झालें स्तंभांतूनि प्रगट महानर मृगेंद्ररूप असें.' ॥ ११८
दे दीप्यमान [5]भीषणतम [6]नमदमरेंद्र [7]योगिवरगीत ।
[8]व्हीत जया **का**ळ अशा रूपा झाला न तो **दि**तिज भीत. ॥ ११९
बा [9]हुसहस्रधृताद्भुतचक्रकुलिशमुखमहायुधा त्यातें ।
पाहुनि [10]असुरबळ पळे, देत्या वरसुखमहायु **धा**त्या तें. ॥ १२०
य द्यपि तेज[11] सुदुःसह, तदपि म्हणे [12]असुरवर्य, '[13]मायावी ।
हा **ह**रि **न**रहरि झाला, विजयश्री मद्वधें न या [14]यांवी.' ॥ १२१
न रहरिवरि [15]अरि धांवे गरगर फिरवित महागदा, त्यातें ।

किक गर्जनेनें विष्णुकृपापात्र प्राण्यास आणि विधिप्रभृति लोकपालांस आपल्या स्थानांचा आतां नाश होतो अशी भीति वाटली.

१. त्या भयंकर गर्जनेचें उत्पत्तिस्थान दिसलें नाहीं. २. खांबांत. ३. नरहरितेज. ४. निजभक्ताचें (प्रऱ्हादाचें) वाक्य साचें करावया–असा अन्वय. येथें वाक्य आणि साचें हे शब्द गीतीच्या आद्य व अंतिम स्थानीं आहेत, पण ते समीप पाहिजे होते. हा दूरान्वय दोष समजला तरी चालेल.–प्रऱ्हादाचें वचनः–'भूतांच्या कार्यांत व महाभूतांमध्येंही भगवान् असतो.' [सप्तमस्कंध–अध्याय ६ श्लो० २०.] ५. अत्यंत भयंकर. ६. नमत्+अमरेंद्र=नमस्कार करिताहेत देवेंद्र ज्याला असें. ७. योगिश्रेष्ठांनीं गाइलेलें. ८. लज्जित. ९. हजार भुजांनीं धरिलीं आहेत अलौकिक चक्र (सुदर्शन) कुलिश (वज्र) मुख (प्रमुख) महा (मोठीं) आयुधें (शस्त्रें) ज्यानें अशा धात्या (नरहरीला). १०. दैत्यसैन्य. धात्या (विष्णुरूप अशा) वरसुखमहायु (श्रेष्ठ सुख, उत्सव आणि आयुष्य) देत्या (देणाऱ्याला) पाहुनि तें असुरबळ पळे. [वर+सुख+मह+आयु=श्रेष्ठ+सुख+आनंद, उत्सव+आयुष्य.] ११. नरसिंहाचें तेज. १२. असुरश्रेष्ठ. १३. कपटी. मायावी= माया, मेधा, स्रज् आणि अस् कारान्त नामांला 'विन्' प्रत्यय लागून विशेषणें होतात. उदाहरण–मायावी, मेधावी, तेजस्वी, तपस्वी, यशस्वी. यांचीं स्त्रीलिंगी रूपें 'विनी' लागून होतात–तमस्विनी (रात्र), पयस्विनी (दुधाळ गाय, नदी). १४. माझ्या वधानें याला विजयलक्ष्मी प्राप्त न व्हावी. [स्कंध ७ अ० ८ श्लो० २३.] १५. हिरण्यकशिपु.

प्रभुतेज लोपवी[1], बहुदात्याचें [2]जेंवि अल्पदात्यातें. ॥ १२२

मो ठा धृष्ट[3] महासुर, रविसहि न [4]जयाकडे पहावे, गा! ।
त्या प्रभुतें जवळि भिडुनि सहसा हाणी गदा महावेगा. ॥ १२३

भ गवान् **न**रहरि अरि तें धरि तेंवि, [5]खगाधिपति जसा [6]अहितें. ।
प्रभुच्या [7]हस्तापासुनि परि सोडुनि घेतलेंचि त्या [8]अहितें. ॥ १२४

ग रुडें [9]सुटला अहिसा, प्रभुनें [10]असिचर्मधर पुन्हा [11]धरिला; ।
चळबळ खळ जरि करि तरि **ह**रिनें बळवेग सर्वही हरिला. ॥ १२५

[12]**व** ज्राक्षतत्वचातें [13]द्वारीं दडपुनि [14]निजोरुवरि पाडी, ।
झाडी [15]मदगद, त्याचें प्रभु [16]नखरांहींच उग्र [17]उरें फाडी. ॥ १२६

ते [18]पविगुरु नख देती यश कृतफळदान कोविदा राया ! ।
प्रभुसि [19]परा उशिर जसा वाता [20]जलदा नको विदाराया. ॥ १२७

[21]**वा** रणयूथपतिच तो त्या **न**रहरिनें विदारिला पहिला, ।
मग [22]रदपदनखरांहीं [23]तद्यूथहि हर्षवावया महिला. ॥ १२८

[24]**सु** भट दिसेना, केला [25]क्रोधांच्या प्रसर फार आवेशें, ।

---

१. बहुदात्याचें तेज अल्पदात्यातें जेंवि लोपवी–असा अन्वय. दैत्य नृसिंहाच्या तेजांत लोपून गेला. २. यांत सुंदर **उपमा** आहे. ३. दांडगा, उन्मत्त. ४. ज्या प्रभूकडे. ५. गरुड. ६. सर्पातें. ७. दैत्यानें नृसिंहाच्या हातांतून आपली सुटका करून घेतली–असा भावार्थ. ८. शत्रूनें. ९. सुटलेला अहि (सर्प) जसा धरावा तसा. १०. असि+चर्म+धर=तलवार+ढाल+धरणारा=तलवार आणि ढाल धारण करणारा (हिरण्यकशिपु). ११. ईश्वराचा भयंकर शब्द कानीं पडतांच हिरण्यकशिपूनें डोळे मिटले, तेव्हां हरीनें त्याला धरिलें. [अ० ८ श्लो० २८.] १२. इंद्राच्या युद्धांत वज्रानें तुटली नाहीं त्वचा ज्याची अशा दैत्याला. १३. सभेच्या द्वारांत. १४. निज+ऊरुवरि=आपल्या मांडीवर. भूमीवर किंवा आकाशांत नव्हे. १५. गर्वरोग. १६. नखांहींच. १७. वक्षस्थळ. १८. वज्राचे गुरु किंवा वज्राहून गुरु (मोठे.) १९. शत्रूला. २०. मेघाला. २१. वारण+यूथ+पति=हत्ती+कळप+नायक=गजांच्या कळपाचा नायक. (हिरण्यकशिपु.) २२. रद (दांत)+पद (पाद)+नखरांहीं (नखांनीं) महिला (पृथ्वीला, पृथ्वीवरील लोकांला) हर्षवावया (आनंदित करण्यासाठीं) तद्यूथहि (त्या गजाचा–हिरण्यकशिपूचा–कळप देखील) विदारिला–असा सान्वय अर्थ. येथें 'विदारिला' या पदाचा प्रयोग दुसऱ्या अर्थातही केला पाहिजे. हिरण्यकशिपूच्या अनुचरांला दांतांनीं, पायांनीं आणि नखांनीं प्रहार करण्याचा सपाटा चालविला. [अ० ८ श्लो० ३१.] २३. तत्+यूथ=त्या हिरण्यकशिपूचा सेवकसमुदायही. दैत्यसैनिकही. २४. प्रतियोद्धा, उत्तम वीर. २५. क्रोधाचा आवेश फार पसरला.

ओवाळुनि सांडावे प्रभुच्या नेत्रांवरूनि आवे[1] शें[2]. ॥ १२९
दे व **नृ**सिंह प्रभु मग बसला सिंहासनीं स्वभक्ताच्या,[3] ।
तो अरुणवदनकेसर बिंदूंनीं निहतदैत्यरक्ताच्या.[4] ॥ १३०
[5]**वा** रिधि ज्याच्या[6] श्वासें खळबळले, सूर्य जरि महातेजा, ।
भासे निष्प्रभ, मानिति दिनहिमकर जन नभीं पहाते ज्या. ॥ १३१
य द्यपि भक्त, सकळ सुर भ्याले, प्रभुच्या पुढें नये कोणी, ।
श्री[7]दृष्टि म्हणे प्रीतिस, 'बसल्यें नेत्रांचिया सये! कोणीं[8]'. ॥ १३२
न रसिंहावरि करिती सुरकुसुमांच्या सुरस्त्रिया[9] वृष्टी, ।
विधि[10] **शि**व सरकति मागें, करि जेव्हां प्रभु तयांकडे दृष्टी. ॥ १३३

---

१. कुंभार इत्यादिकांनीं ज्या मडकें वगैरेच्या भट्या लाविल्या असतात त्या. आवा म्हणजे तापलेली, लाल झालेली भट्टी. प्रभूचे नेत्र क्रोधाच्या आवेशानें इतके लाल झाले होते कीं त्या नेत्रांवरून शेंकडो आवे ओंवाळून टाकावे. तशा शेंकडों आव्यांचा त्या प्रभुनेत्रांपुढें कांहींच मोठेपणा नाहीं—असा भाव. कासार कांकणें करण्यासाठीं कांच कढवितात त्या भट्टीसही 'आवा' म्हणतात. २. शेंकडों. ३. हिरण्यकशिपूच्या. जय आणि विजय हे विष्णुभक्त होते, त्यांचेच अवतार हिरण्यकशिपु आणि हिरण्याक्ष झाले. तेव्हां हिरण्यकशिपु हा भक्तच होय. ४. निहतदैत्यरक्ताच्या बिंदूंनीं अरुणवदनकेसर [असा] तो प्रभु स्वभक्ताच्या सिंहासनीं बसला—असा अन्वय. निहत+दैत्य+रक्ताच्या=मारलेल्या हिरण्यकशिपु दैत्याच्या रक्ताच्या बिंदूंनीं—लवांनीं, कणांनीं) अरुण (आरक्त, लाल) [झालें आहे] वदन (मुख) [व] केसर (सटा) [ज्याचे असा नरहरि प्रभु] स्वभक्ताच्या (हिरण्यकशिपूच्या) सिंहासनीं बसला. येथें 'निहतदैत्यरक्तबिंद्वरुणवदनकेसर' असें समस्त एक पद पाहिजे होतें. 'सापेक्षत्वेऽपि गमकत्वात्समासः' या आधारानें असे समास ग्रंथभाषारूढ झाले आहेत. ५. समुद्र. ज्याच्या (ज्या नरहरीच्या) श्वासें (श्वासवायूनें) वारिधि (सागर) खळबळले (क्षुब्ध झाले, उचंबळले), महातेजा (अत्यंत तेजस्वी) [असा] जरि सूर्य [तरी] निष्प्रभ भासे (निस्तेज दिसूं लागला) [निस्तेज इतका दिसला कीं] ज्या (ज्या सूर्याला) नभीं पहाते जन (आकाशांत पाहणारे लोक) दिनहिमकर (दिवसाचा चंद्र, दिवसाच्या चंद्रासारखा तेजोहीन असा) मानिति (समजती). ६. ज्या प्रभूच्या. ७. श्रीदृष्टि (लक्ष्मीची दृष्टि) प्रीतिस (विष्णूच्या ठिकाणीं लक्ष्मीची जी प्रीति होती तिला) म्हणे (म्हणाली):—सये! (हे सखि प्रीति! [मी दृष्टि] नेत्रांचिया कोणीं (नेत्रांच्या एका कोपऱ्यांत) बसल्यें. [डोळे भरून भगवंताचें स्वरूप दृष्टीनें पहावें अशी जरी प्रीतीची इच्छा होती, तरी भयामुळें दृष्टि पूर्ण स्वरूप पाहण्यास धजेना. भगवंताचें स्वरूप पाहण्याची मनांतून प्रीति असतांही तसें करण्यास लक्ष्मीची दृष्टि धजेना.] ८. कोंपऱ्यांत. ९. देवांगना. १०. ब्रह्मदेव. (अ० ८ श्लो० ३९-४२.)

मो ठा उत्सव सर्वा, वाजविलीं दानवारिंनीं[1] वाद्यें[2], ।
गाती नाचति दूरचि, कीं व्हावें सुप्रसन्न त्या आद्यें[3]. ॥ १३४
भ गवंतातें स्तविती ब्रह्मादि[4] समस्त, परि तयाजवळ ।
जाया[5] कोणी न शके, वाटे प्रभु करिल आपुला कवळ[6]. ॥ १३५
ग डबडली पाहोनि श्रीहि[7] अदृष्टश्रुतोग्ररूपातें[8], ।
प्रभुचें कोपप्रशमन सर्वांसि गमे अशक्य भूपा[9]! तें. ॥ १३६
व र भक्त प्रऱ्हाद स्वनिकट होता, तया म्हणे धाता, ।
'तव जनकावरि झाला क्षुब्ध प्रभु, शमिव[10] तूंचि जा ताता[11]!' ॥ १३७
ते व्हां प्रऱ्हाद महाभागवत हळूच हरिकडे जाय, ।
पाय प्रभुचे वंदी, हरिभय[12] हरिबालकासि[13] हो! काय? ॥ १३८
वा[14] त्सल्यें प्रभु उठवी, ठेवी प्रऱ्हादमस्तकीं पाणी[15], ।
काळ 'न पाहीन[16]' म्हणुनि सोडी घेऊनि हस्तकीं पाणी. ॥ १३९
सु[17] समाहित तो भावें श्रोतृजनमनीं नुरावया[18] खेद, ।

---

१. दानवांच्या (दैत्यांच्या) अरिंनीं (शत्रूंनीं)=देवांनीं. २. नगारे, नौबदी. ३. परमेश्वरानें, अजानें. ४. अ० ८ श्लो० ३९-५६ यांत विधि, रुद्र, इंद्र आणि सिद्ध विद्याधर इत्यादिकांनीं केलेली स्तुति आहे. ५. अ० ९ श्लो० १ पहा. ६. घांस. ७. लक्ष्मी ही उग्ररूप पाहून भयानें जवळ जाईना. [अ० ९ श्लो० २.] ८. अदृष्ट+श्रुत+उग्र+रूप=पाहिलें नाहीं, ऐकिलें नाहीं अशा भयंकर रूपातें. ९. हे परीक्षित्‌राजा! १०. शांत कर. तुझ्या पित्यावर रागावलेल्या प्रभूचें शमन कर. ११. हे प्रिय बालका! [तात=(१) पिता; (२) अनुकंप्य, पूज्य.] १२. सिंहभय. १३. सिंहाच्या मुलाला. १४. करुणेनें. [वत्सं हृदयं लाति गृण्हातीति वत्सलः । तस्य भावः वात्सल्यम्. 'वत्स' हा शब्द 'वद' धातूपासून उत्पन्न झाला आहे. वदतीति वत्सः. रघुवंश–स० ५ श्लो० ७ वल्लभटीका. १५. हात. १६. 'न पाहीन' (प्रऱ्हादाला मी काळ कधींही पाहणार नाहीं, प्रऱ्हादावर माझी दुष्ट दृष्टि कधीं जाऊं देणार नाहीं, प्रऱ्हादाकडे वांकड्या दृष्टीनें मी कधीं पाहणार नाहीं.) [असें] म्हणुनि (असा निश्चय करून, असा उद्गार काढून) हस्तकीं पाणी घेऊनि (आपल्या हातांत उदक घेऊन) काळ [तें उदक] सोडी (संकल्प करून सोडिता झाला). [प्रभूनें मस्तकीं हात ठेविल्यावर काळाच्यानें काय व्हावयाचें आहे? प्रऱ्हादाकडे वक्रदृष्टीनें पाहावयाचें नाहीं असा संकल्प करणेंच काळाला भाग होतें. पाणी सोडणें=कोणतेंही कार्य करावयाचा संकल्प करून तदनुरूप हातांत उदक घेऊन तें भूमीवर टाकणें. 'न पाहीन' ही काळाची उक्ति आहे. स्कंध ७ अ० ९ श्लो० ५.] १७. समाधानयुक्त. १८. न+उरावया=नुरावया. येथें अ+उ या दोन स्वरांबद्दल पुढील स्वर आला आहे. पररूपादेश झाला आहे. जसें—न+उठे=नुठे, न+उच्चारी=नुच्चारी, न+उघडी=नुघडी. या संधीला **पररूपसंधी** असें म्हणतात.

प्रभुसि महाभागवत प्रऱ्हाद कवि स्तवी[1] जसा वेद. ॥ १४०

दे व प्रसन्न झाला, निववाया 'स्वपदपद्मसद्रंते[2]! ।
'माग' म्हणे 'प्रिय वर मज, वत्स! प्रऱ्हाद! भद्र[3]! भद्रं[4] ते[5].' ॥ १४१

बा ळ प्रऱ्हाद वदे प्रार्थूनि, करून कोमळा वाणी, ।
'निष्कामा[6] कामवरें लोभवुनि करूं नको मला वाणी[7]. ॥ १४२

य ज्ञेशा! कामांचा[8] उद्भव चित्तीं नसो असा याला, ।
देणें तरि वर दे हा—वांछी पदांबुजीं[9] बसायाला.' ॥ १४३

न रहरि म्हणे, 'बुध[10] वरिति मुक्तिहि न त्यजुनि भक्तियोगातें, ।
तरि तूं असुरेश्वर हो, मन्वंतरमात्रभोग[11] भोगातें.' ॥ १४४

मो[12] क्षकरस्मरणातें प्रऱ्हाद म्हणे, 'प्रभूत्तमा! गमला ।
वरदानपात्र[13] जरि हा, म्हणसि स्वमुखें 'प्रभूत[14] माग' मला. ॥ १४५

भ क्ता यां[15] वर दे हा,—केली निंदा तुझीहि मत्तातें[16], ।
मज तव दासा छळिलें, पूत[17] करीं या अशाहि मत्तातें[18].' ॥ १४६

गं[19] जरिपुवदन वदे, 'बा! मी श्रितकल्पद्रु[20], काम हा[21] साधो[22], ।
त्वत्तात पूर्वजांसह[23] पूत न होईल कां महासाधो!? ॥ १४७

---

१. या स्तवाचें वर्णन अध्याय ९ श्लो० ८-५० यांत आहे. पंतांनीं येथें बराच वर्णनसंक्षेप केला आहे. २. स्व+पद+पद्म+सत्+रंते!=निज+पाद+कमल+उत्तम+प्रीते!=आपल्या पदाच्या ठायीं उत्तम प्रीति ज्याची अशा हे प्रऱ्हादा. रंति=आनंद, उत्साह, करमणूक, विसांवा. [अ० ९ श्लो० ५२.] ३. हे कल्याणरूप. ४. कल्याण. ५. तुझें. ६. कामरहित असा जो मी त्या मला. या निष्काम भक्ताला. [अ० १० श्लो० ६.] ७. कमताई. ८. 'माझ्या हृदयांत कामाचा अंकुर उद्भवूं नये' असा वर दे. ९. चरणकमलीं. १०. पंडित, निःसीम भक्तवर्य. ११. हें मन्वंतरपर्यंत येथें दैत्यराज होऊन त्याचे ऐश्वर्यभोग सेवीत रहा. [अ०१० श्लो० ११.] १२. ज्याचें स्मरण मोक्ष करणारें आहे त्या (प्रभूला) १३. वर देण्यास योग्य स्थान असा. १४. पुष्कळ. १५. या प्रऱ्हादाला. गीति १४५-१४६ यांचें अर्थाच्या संबंधानें युग्म आहे. १६. मत्+तातें=माझ्या बापें. [अ० १० श्लोक १५.] १७. पवित्र. १८. उन्मत्तातें. १९. सिंहाचें मुख ज्याला तो. (नरहरि). गजरिपु=सिंह. २०. आश्रितांचा कल्पवृक्ष आहे. [कल्पद्रु=कल्पद्रुम=द्रवंति ऊर्ध्वं गच्छंतीति द्रवः शाखास्ताः संत्यस्यासौ द्रुमः। 'द्रु'धातूपासून 'द्रुम' किंवा 'द्रु' शब्द झाला आहे. रघुवंश–सर्ग ५ श्लो० ५२ चारित्रवर्धन. पाणिनि ५-२-१०८. कल्पयति मनोरथं कल्पः स चासौ द्रुमश्च=कल्पद्रुमः रघुवंश–स० ६ श्लो० ६ हेमाद्रि.] २१. हा तुझा इष्टकाम. २२. सिद्ध होऊ. २३. एकवीस पूर्वजांसह. हिरण्यकशिपूचे पूर्वज काय ते तीनचः–कश्यप, मरीचि आणि ब्रह्मदेव. तथापि येथें पूर्वकल्पांतील पूर्वजांचें ग्रहण कर्तव्य आहे म्हणून मोघम 'पूर्वज' हें पद योजिलें आहे.

व पुला ज्याच्या माझा [1]स्पर्श असा त्यास काय गा! ताप? ।
बाप तुझा शुचि हें [2]किति? न उरेल जनीं तुझ्या यशें पाप.'॥१४८

ते जातें आवरुनि प्रभु [3]होतां सुप्रसन्न, [4]सुरस [5]हितें ।
प्रऱ्हादासीं वदतां, **ब्र**ह्मा विनवी तयासि [6]सुरसहित. ॥ १४९

'वा त्सल्य **प्र**ऱ्हादीं प्रभुनें केलें अनंत, [7]विश्वास ।
स्वपदीं अचळ बसविला दासांचा, तारिलेंचि [8]विश्वास. ॥ १५०

सु ररिपु [9]वरमत्त सुरां कां मारुनि हाक दापिना? मरता ।
न प्रभुवांचुनि, कळलें म्हणुं देसि न 'हा!' कदापि नामरता.'॥१५१

दे व म्हणे, 'ऐसें [10]वरपय पाजावें न [11]असुरसर्पातें, ।
[12]दर्पातें पावेना जो, त्या जें काय इष्ट अर्पा तें. ॥ १५२

---

१. अध्याय १० श्लो० २२ पहा. २. तुझ्या बापाला शुचिता देणें हें काम तर फारच अल्प आणि अत्यंत सुकर आहे. हें तर सहज अनायासें घडून येईल इतकेंच नव्हे, तर तुझ्या यशानें जगतांतील सर्व पाप भस्म होऊन जाईल. ३. होतां सुप्रसन्न=सुप्रसन्न झाला तेव्हां. [प्रभुनें आज्ञा **देतां** (दिली, तेव्हां) वंदुनि गेला स्वकीय सदनातें–मोरोपंत.] गोडबोलेकृत 'मराठी भाषेचें नवीन व्याकरण'–कलम ६८२ पहा. प्रऱ्हादासीं वदतां=प्रऱ्हादाशीं वदला, तेव्हां–असा अर्थ. ४. मधुर, रसभरित. ५. कल्याणप्रद. ६. देवांसहित. ७. निश्चय, भक्तिभाव. ८. जगास. ९. वरमत्त (वरानें उन्मत्त झालेला) सुररिपु (देवाचा शत्रु हिरण्यकशिपु) हाक मारूनि (दटावून, दरडावून, हटकून) सुरां (देवांला) कां दापिना? (देवांस कां दाबणार नाहीं? देवांस भयग्रस्त कां करणार नाहीं? अर्थात् तो दापीलच, कारण तो वरमत्त होता) [तो सुररिपु] प्रभुवांचुनि न मरता (प्रभूच्या हातून म्हणूनच तो मरण पावला, प्रभूशिवाय त्याचा वध करण्यास अन्य कोणी समर्थ नव्हता) [हे परेशा!] नामरता (तुझ्या नामीं जो आसक्त झाला त्याला, तुझ्या नामाची रति (गोडी) ज्याला लागली त्या स्वभक्ताला) कदापि (कधींही) 'हा!' (हाय! हाय! असा दुःखोद्गार) म्हणुं न देसि (उचारूं देत नाहींस, काढूं देत नाहींस, तुझें नाम जे घेतात त्यांस तूं दुःख देत नाहींस व त्यांची उपेक्षा करीत नाहींस) [असें] कळलें (सर्वांला तुझ्या चरितानें समजलें). गीति १५०-१५१ यांत विधिप्रमुख देवांची उक्ति आहे. १०. वररूप दुग्ध. [अ० १० श्लो० ३०.] ११. असुररूप सापाला. हिरण्यकशिपुरूप सापाला. येथें **सांग रूपक** नामक अलंकार झाला आहे. १२. जो (जो पुरुष) दर्पातें (उन्मत्तपणातें, अभिमानातें) पावेना (पोंचत नाहीं, जो पुरुष वरलाभानें अथवा इष्ट प्राप्तीनें उन्मत्त होणारा नाहीं) त्या (पुरुषाला) जें काय इष्ट (वांच्छित असेल, अभिप्रेत असेल) तें अर्पा (अर्पण करा. अयोग्य पुरुषाला वर देऊं नये–असें तात्पर्य.

वा र्ताही मत्तांच्या[1] सन्नयनांतेंहि करिति रोहितें[2] हो !' ।
ब्रह्मादिकांसि ऐसें हित शिकवुनि होय हरि[3] तिरोहित[4] हो ! ॥ १९३

य मवरुणधनदशक्रप्रमुख सकळलोकपाळसुरसिद्ध ।
त्यांसह **वि**धि अभिषेचुनि[5] करि त्या, अनळा[6] जसा अनिळ[7] इद्ध[8].॥ १९४

न रहरिभक्तासि सकळ पुसुनि तदर्चित[9] निजस्थळा गेले, ।
त्या सुयशोमृतनिधिचे[10] कण हे गोळा सुदुर्बळें[11] केले. ॥ १९५

मोठें भाग्य तुझें त्या **प्र**ऱ्हादाच्या परीसही, **धर्मा** ! ।
कीं त्वन्मातुलसुत[12] तो प्रभु वा ! या तव गृहीं करी कर्मा[13]. ॥ १९६

भ गवान् यासम[14] हाचि स्वाश्रितहृदयासि बहु करी मुदित, ।

---

१. मत्तांच्या (उन्मत्त झालेल्या पुरुषांच्या, दुष्ट खलांच्या) वार्ताही (कथा देखील) सन्नयनातें (साधूंच्या नेत्राला) हो ! (अहो !) रोहित (लाल, क्रोधानें लाल) करिति (करतात) मत्त पुरुषाचा प्रत्यक्षसंबंधच साधुजनास क्षुब्ध करतो असें नाहीं, तर त्यांच्याविषयीं कानीं पडणाऱ्या गोष्टीही साधुजनास तिटकारा आणि क्रोध आणण्यास पुऱ्या आहेत. दुष्टांच्या वार्ता ऐकून ही साधुजनास क्रोध येतो. २. आरक्त, लाल. ३. नरसिंह. ४. गुप्त. [तिरोहित=तिरस्+हित=हें 'तिरस्'उपसर्गपूर्वक 'धा'धातूचें भूतकालवाचक विशेषण आहे.] ५. दैत्यांच्या व दानवांच्या राज्यासनीं स्थापून. ६. अग्नीला. ७. वायु. ८. प्रदीप्त. ९. त्यानें (त्या प्रऱ्हादानें) अर्चित (पूजित). [अ० १० श्लो० ३४.] १०. उत्तम कीर्तिसुधासागराचे. ११. अत्यंत अशक्त अशा मोरोपंतानें. **पं**तांनीं येथें आपली दुर्बलता स्वमुखें कबूल करून प्रऱ्हादकथामहिमा व्यक्त केला आहे. ही लीनता **पं**तांस जितकी भूषविते तितकीच त्यांची ईश्वरभक्तांविषयीं सप्रेमादरबुद्धि दाखविते. [ही प्रऱ्हादकथा येथें फारच संक्षिप्त वर्णिली आहे. असा भावार्थ. ही कथा **पं**तांनीं '**प्रऱ्हा**दविजय' नामक काव्यांत विस्तारानें वर्णिली आहे.] १२. तुझ्या मामाचा मुलगा मामेभाऊ (परमेश भगवान् श्रीकृष्ण). १३. अनेक प्रकारचें काम. कृष्ण धर्माच्या गृहीं अनेक लहानसान सुद्धां कामें करी असें वर्णन **पं**तांच्या काव्यांत अनेक स्थळीं आढळतें. [अ० १० श्लो० ४८-५०.] (१) अर्जुनतुरंगमातें जो स्वकरानें करी खरारा जी । श्रीकृष्ण काय बहुधा निजपद दासासि जो खरा राजी ॥ (२) हरिजन हो ! हरि करितो आंगें तुमची बरीक सेवा जी । धुतले धनंजयाचे केवळ अश्लाघ्य परि कसे वाजी ॥ (महद्विज्ञापना.) (३) ज्याच्या श्रीपददास्यें पावे तोखा सदा रमा जाया । हरितो मना नराचा होउनि तो खासदार माजा या ॥ (द्रोणपर्व–अध्याय १०). १४. हें '**अनन्वय**' अलंकाराचें उदाहरण आहे. जेथें ज्याची त्यालाच उपमा दिली असते म्हणजे जेथें उपमानत्व आणि उपमेयत्व हीं दोन्हीं एकाच वस्तूवर असतात, तेथें हा अलंकार होतो. जसें:–गगन हें गगनासारखें आहे. रामरावण हे रामरावणोपम होत. याचें लक्षण व उदाहरण—'उपमानोपमेयत्वं यदेकस्यैव वस्तुनः । इंदुरिंदुरिव श्रीमानित्यादौ तदनन्वयः ॥ गगनं गगनाकारं सागरः साग-

रुद्रयश [1]मयें [2]हरिलें, केलें येणेंचि तें पुन्हा उदित. ॥ १५७

ग ति सर्वत्र [3]जयांची, [4]कनकरजतलोहमय पुरें तीन ।
रचिलीं **मयासुरानें**, केले [5]शक्रादि सर्वही दीन. ॥ १५८

[6]**व** सुरेत्यातें जाउनि शरण म्हणति, 'सर्वपाळका! पावें, ।
यश बुडविलें [7]परांनीं, अहिंनीं नच **गरुडबाळ** कांपावें.' ॥ १५९

ते सुर सर्व निववि‍ले **'[8]मा भैष्ट'** असें म्हणोनि, मग चापीं ।
जोडुनि अस्त्र त्रिपुरीं सोडी, तन्नाम [9]बुध जसा पापीं. ॥ १६०

बा णापासुनि बहु शर विविध निघुनि त्या पुरत्रयीं पडले, ।
रविमंडळांतुनि जसे [10]कर परमर्मस्थळींच ते जडले. ॥ १६१

रोपमः । रामरावणयोर्युद्धं रामरावणयोरिव ॥.' आणखी प्राकृत उदाहरणें:–(१) झाले बहु, होतिल बहु, आहेतहि बहु, परंतु यासम हा; । यास महादेवा! दे जय, पाहिन कधिं धनंजयास महा ॥ [मोरोपंत–विराटपर्व–अध्याय ४ गीति ७५; काव्यसंग्रह–पृ० ९६], (२) शक्र म्हणे, 'बा! तुजसम तूंचि भला विश्वमहिततरशील, । व्यसनातें बंधूंसह निर्दाळुनि सर्व अहित तरशील. ॥ [मोरोपंत–वनपर्व–अध्याय २ गीति ११४ काव्यसंग्रह–पृ० ९६], (३) श्रीरामरावणसमर होय श्रीरामरावणसमरसा । ते वृष्टि जसे न करिति तसि शुचि सशकार रावण समरसा. ॥ [वनपर्व–अध्याय १२ गीति ६६; काव्यसंग्रह–पृ० १७९], (४) होय रामराज्य रामराज्यसेंचि तोखद, व्याधि जो भवाख्य उग्र हें तयासि ओखद । कीं करी प्रकाशुनि स्वसन्महा निरंजन, श्रीश बुद्धिचें हरूनि जन्म हानि रंजन ॥ [मोरोपंत–पंचचामर रामायण–श्लोक ८१; सर्वसंग्रह–पृष्ठ ४०५], (५) यासम हाचि धनुर्धर म्हणतां उपमन्युसुरतरु रुसेना । रण विसरतिल रिपुचमू जेंवि हरिसमक्ष सुरत रुरुसेना. ॥ [मोरोपंत–कर्णपर्व–अध्याय ४० गीति ५९; सर्वसंग्रह–पृ० १६५].

१. मयासुरानें. २. मय नामक महामायावी दैत्यानें शंकराची कीर्ति नष्ट केली होती. [अ० १० श्लो० ५१.] ती ह्याच कृष्णानें पुनः विस्तृत केली. ३. ज्या पुरांची गति (गमन) सर्वत्र होती, तीं नगरें कामगामी होतीं. ४. कनक (सोनें)+रजत (रुपें)+लोह (लोखंड)+मय (युक्त)=एक सोन्याचें, एक रुप्याचें व एक लोखंडाचें अशीं तीन नगरें. हीं तीन नगरें मयासुरानें दैत्यांस दिलीं. यांत बसून दैत्य तिन्ही लोकांस त्रास देऊं लागले. ५. इंद्रादिक लोकपाळांचा धुवा उडविला. ६. वसु (द्रव्य) रेत (वीर्य) ज्याचें त्या महादेवातें. ७. शत्रूंनीं, दैत्यांनीं. ८. भिऊं नका. ९. बुध (पंडितजन) तन्नाम (त्याचें–महादेवाचें–नाम) जसा पापीं (पापाच्या ठिकाणीं) सोडी (सोडतो) तसा. पापावर शिवनामाक्षर मंत्राची योजना केली असतां पाप नाश पावतें. सापावर मंत्र सोडला, पिशाचावर मंत्र सोडला, शत्रूवर मंत्र सोडला या वाक्यांतील 'सोडला' या क्रियापदासारखा 'सोडी' या क्रियापदाचा जेथें प्रयोग जाणावा. १०. किरण.

सु रशत्रु **म**यासुर तो, व्यसु[1] पडले स्वप्रवीर[2] जे त्यांतें ।
सिद्धामृतरसकूपीं बुडवुनि उठवी अमर्त्यजेत्यांतें.[3] ॥ १६२

दे व वृषध्वज[4] होतां तें पाहुनि, खिन्न, ज्यासि[5] जग गाय[6] ।
वत्स विधि[7] करुनि, आपण होय श्रितसर्वकल्पनग[8] गाय. ॥ १६३

बा! पीतपट[9] प्रभु तो गोरूपें[10] जाय जेस्थळीं वापी[11] ।
पापी असुर न जाणति, नच वारिति[12], रस अशेष भूपा![13] पी. ॥ १६४

य[14] त न पुरतां, नेदी मान विवेका असा रसास मय, ।
असुरांसि सारसुगतिद, परि तो वाटे असारसा समय. ॥ १६५

---

१. वि+असु=विगत+प्राण=मृत. २. आपले बलाढ्य वीर. ३. मनुष्यव्यतिरिक्तांस जिंकिणारे. अमर्त्यांला (देवांला) जेत्यांतें (जिंकिणारातें). ४. शंकर. वृषो ध्वजचिन्हमस्य वृषध्वजः निरनिराळ्या देवांच्या ध्वजांवर निरनिराळीं चिन्हें असतात असें वर्णन प्राचीन ग्रंथांत आढळतें. मकरध्वज (काम,) कपिध्वज (अर्जुन,) मीनकेतन (काम,) गरुडध्वज (विष्णु,) इत्यादि. तें [दैत्याचें पुनरुज्जीवन, मयासुर अमृतकुंडांत दैत्यांला बुडवून पुनः सजीव करतो हें कृत्य] पाहुनि, देव वृषध्वज (शंकर) खिन्न (दुःखी) होतां (झाला, तेव्हां) ज्यासि जग गाय (ज्याला सकल विश्व स्तवितें तो विष्णु) विधि वत्स करुनि आपण श्रितसर्वकल्पनग गाय होय—असा अन्वय. ५. ज्या विष्णूला. ६. गातें ७. ब्रह्मदेवाला वत्स करून आपण (स्वतः विष्णु) गाय (धेनु) होय (झाला.) [अ० १० श्लो० ६२.] ८. आश्रितांचा सकल कल्पवृक्ष. ९. पीत (पिंवळा) आहे पट (वस्त्र) ज्याचा तो पीतांबरधारी भगवान् कृष्ण. १०. बाणरूपें. 'स्वर्गेषुपशुवाग्वज्रदिङ्नेत्रघृणिभूजले । लक्ष्यदृष्ट्या स्त्रियां पुंसि गौः' इत्यमरः. गच्छिति । गम्यते वा, अनेन वा । 'गमेर्डोः' (उ० २।६७) ॥ 'गौर्नादित्ये बलीवर्दे किरणक्रतुभेदयोः । स्त्री तु स्याद्दिशि भारत्यां भूमौ च सुरभावपि । नृस्त्रियोः स्वर्गवज्राम्बुरश्मिदृग्बाणलोमसु' इति केशवः ॥ 'गौः स्वर्गे च बलीवर्दे रश्मौ च कुलिशे पुमान् । स्त्री सौरभेयीदृग्बाणदिग्वाग्भूष्वप्सु भूम्नि च ॥' इति (मेदिनी) ॥ व्याख्यासुधा—पृ० ६८०. ११. तळी. अमृतरसाची वापी. २८. धडधडीत पाहत असतांही दैत्यांनीं धनूचें निवारण केलें नाहीं. १३. हे परिक्षित्. १४. यत्न न पुरतां (मयासुराचा यत्न पुरा पडला नाहीं तेव्हां, मयासुराचा यत्न व्यर्थ झाला त्यावेळीं) मय (मयासुर) रसास (सिद्धामृतरसाला—गीति १६२ पहा) मान नेदी (तुच्छ मानी, मान न राखी, त्या रसाविषयीं त्याला शोक झाला नाहीं कारण तो रस त्याला तुच्छ वाटला) असा (इतका) विवेका (विचाराला) [मान दे=विवेकाचा आदर केला). [प्रस्तुत समय] असुरांसि (असुरांला, दैत्यांला) सारसुगतिद (अत्यंत श्रेष्ठ अशी गति देणारा) [होता] परि (परंतु) तो समय [त्यांस] असारसा (सारभूत नव्हे असा, श्रेष्ठ नव्हे असा, तुच्छ असा) वाटे.

न वळ [1]महिरथादि सकळ [2]संगरसाहित्य करुनि, [3]जयशाली ।
केला शंभु [4]प्रभुनें, पिकवितसे हाचि [5]मुदिर [6]जयशाली. ॥ १६६
[7]मो क्षद धर्म कवि कथी, ज्यांहीं सुज्ञान भक्तिहि **श्री**शीं, ।
न सुधेसींहि वदे [8][9]सुरमुनिगी, बोलेल काय [10]मिश्रीशीं? ॥ १६७
[11]भ गवान् वेदमयहरि. स्मृति, तिसरी [12]तज्ज्ञसन्मनस्तुष्टी, ।
हें त्रिविध मूळ, येणें आहे स्थिति [13]धर्मपादपा पुष्टी. ॥ १६८
ग णिलीं सत्य दया तप इत्यादिक धर्मलक्षणें [14]तीस, ।
[15]शौच [16]तितिक्षा, युक्तायुक्तविचारहि रुचे [17]सुजनधीस. ॥ १६९
व र शम, दमहि, अहिंसा, [18]स्वाध्याय, ब्रह्मचर्यहि त्याग, ।
आर्जव, संतोष [19]महत्सेवा, येणें [20]प्रवृत्तिचा राग. ॥ १७०

---

१. भू, रथ, सारथी, ध्वज, अश्व इत्यादि. २. युद्धसामग्री. ३. जयानें शोभणारा, यशस्वी, कृतकृत्य. ४. प्रभूनें तीं दुर्भेद्य नगरें जाळून शंकराला जयश्री दिली [अ० १० श्लो० ६८-६९.]५. मेघ. ६. जयरूप धान्यविशेष. ७. कवि (पंडित नारद) मोक्षद धर्म (मोक्ष देणारे असे धर्म) कथी (धर्मराजाला सांगे,) ज्यांहीं (ज्या धर्मांनीं, ज्या धर्मांच्या योगानें, ज्या धर्मांच्या परिपालनानें) सुज्ञान (उत्तम ज्ञान मिळतें) [व] श्रीशीं (श्री+ईशीं=लक्ष्मी+रमणीं=विष्णूच्या ठायीं, श्रीपतीच्या ठायीं) भक्तिहि (प्रेम जडतें, भक्तिभाव उत्पन्न होते. 'यतो धर्मादनुष्ठितात् परं ज्ञानं भक्तिं च विंदति' अ० ११ श्लो० २२ टीका पहा.) सुरमुनिगी (नारदमुनिवाणी) सुधेसींहि न वदे [ती] मिश्रीशीं (खडेसाखरेशीं) बोलेल काय? (जी नारदवाणी अमृताशींही बोलणें तुच्छ समजते ती साखरेशीं कधीं तरी बोलेल काय? ज्या वाणीशीं बरोबरी अमृताच्यानें करवत नाहीं तिच्याशीं बिचारी साखर कोठून करणार? जीच्या पुढें अमृताला देखील जर मान नाहीं, तर तेथें साखरेचा पाड काय? यांत नारदवाणीमाधुर्याचें वर्णन आहे.) ८. नारद. ९.नारदवाणी. १०. खडीसाखरेशीं. ११. धर्माचे मूळ आधार तीनः— (१) भगवान् वेदमय हरि (२) धर्मज्ञमुनिप्रणीत स्मृति. (३) मनास संतोष देणारें आचरण १२. तत्+ज्ञ+सत्+मनस्+तुष्टि=भगवंताला जाणणाऱ्याच्या चित्ताचा संतोष. १३. या त्रिविध आधारानें धर्मरूप पादपाला (वृक्षाला) स्थिति (संरक्षण) [आणि] पुष्टि (वृद्धि, पोषण) होत आहे. १४. सत्य, दया, तप, शौच, तितिक्षा, ईक्षा (योग्यायोग्य विचार) शम, दम, अहिंसा, ब्रह्मचर्य, त्याग, स्वाधाय, आर्जव, संतोष, समदृक्सेवा, ग्राम्याचारत्याग (ग्राम्येहोपरम), कर्मावलोकन, मौन, आत्मविमर्शन, अन्नाचा विभाग प्राण्यांस देणें, आत्मदेवताबुद्धि, श्रवण, कीर्तन, स्मरण, सेवा, पूजन, वंदन, दास्य, सख्य आणि आत्मसमर्पण अशीं तीस लक्षणें. (अ० ११ श्लो० ८-११.) १५. शुद्धता. १६. सहनशीलता. १७. साधुजनांच्या मतीला. १८. उचित मंत्राचा जप. १९. साधूंची सेवा. २०. प्रवृत्ति मार्गांतील कर्माविषयीं क्रोध.

तें वीच पाहणें जें होती वि[1]फळा क्रिया जनीं त्यांचें, ।
व्यर्थ न वे[2]दणें, देहाहुनि आत्मा भिन्नजाणणें साचें. ॥ १७१

वा टुनि देणें अन्नादिक [3]भूतांकारणें, महाशुद्धी, ।
जेणें तसीच सर्वांभूतींही आत्मदेवताबुद्धी. ॥ १७२

सु खहेतु श्रवणादिक नव भक्ति मिळोनि लक्षणें तीस, ।
हा धर्म मनुष्यांचा, जी परमा सिद्धि दे पणें [4]तीस. ॥ १७३

दे ते जे सर्वाश्रमधर्म सुखें सेविल्या जना शुद्धी, ।
कथिले **ना**रदमुनिनें ज्यांहीं लागे स्वचिंतनीं बुद्धी. ॥ १७४

वा खाणावे किति ते [5]म्यां विस्तरभीरुनें? [6]जयां न मन ।
विसरे क्षणहि कवींचें, केलें साष्टांग हें तयां नमन. ॥ १७५

[7]**य** तिधर्म **प्र**ऱ्हादा कथिला अत्यंत सार [8]अवधूतें, ।
पावे भक्त **म**यूरश्रुति जें तेणें, प्रियेंहि न वधू तें. ॥ १७६

अष्टम स्कंध.

[9]**न** रनाथ! [10]**स्वा**यंभुव पहिला, [11]**स्वा**रोचिषाख्य **म**नु दुसरा, ।
तिसरा [12]उत्तम, [13]**ता**मस चवथा, [14]यद्यश [15]हंसे [16]सुधासुसरा. ॥ १

---

१. मनुष्याच्या निष्फळ कर्मांचें अवलोकन. २. निरर्थक भाषण न करणें. ३. जीवांसाठीं. ४. त्या सिद्धीस जी परमा (श्रेष्ठा) सिद्धि तीस (तिला) हा मनुष्यांचा धर्म पणें (प्रतिज्ञेनें, खात्रीनें) दे (देतो)–असा अन्वय. ५. वर्णनविस्ताराची ज्यास भीति वाटते अशा म्यां (मोरोपंतानें). ६. ज्या वर्णाश्रमधर्माला. ७. अध्याय १३ यांत यतिधर्मवर्णन आहे. ८. अवधूत=संन्यासी. विप्र, अजगरवृत्ति ब्राह्मण. [अ० १३ श्लो० २०-४५ यांत अजगरवृत्ति अवधूताचें प्रऱ्हादाशीं झालेलें भाषण आहे.] ९. हे परीक्षित राजा! १०. हा शतरूपेचा पति पहिला मनु होय. (अ० १ श्लो० ७.) ११. हा अग्नीचा पुत्र दुसरा मनु झाला. याचें नांव स्वारोचिष होतें १२. हा प्रियव्रताचा पुत्र. १३. हा उत्तमाचा भाऊ. १४. ज्याची कीर्ति. १५. हंसे=लाजवी, तुच्छ मानी. हंसणें ही क्रिया सादृश्यसूचक आहे म्हणून येथें **उपमा** झाली आहे. कारण 'हंसे' हा शब्द सादृश्यसूचक आहे. उपमेची प्रतीति अभिधालक्षणा आणि व्यंजना यांच्या द्वारें होते. **काव्यादर्शकार दंडी** म्हणतोः–आक्रोशत्यवजानाति कदर्थयति निंदति । विडंबयति संधत्ते हसतीर्ष्यत्यसूयति. ॥ ६२ ॥ तस्य मुष्णाति सौभाग्यं तस्य कांतिं विलुंपति । तेन सार्धं विगृण्हाति तुलां तेनाधिरोहति. ॥ ६३ ॥ + + तस्य चानुकरोतीति शब्दाः सादृश्यसूचकाः । उपमायामिमे प्रोक्ता कवीनां बुद्धिसौख्यदाः ॥ ६५ ॥ [दंडी–काव्यादर्श–द्वितीय परिच्छेद–पृ० १३३]. यशाचा व हास्याचा रंग शुक्र आहे असा कविसंकेत

मो [1]क्ष गजाचा [2]ग्राहापासुनि मन्वंतरा तया केला, ।
[3]श्रीहरि [4]अत्यार्ताच्या अतिसत्वर पावलाचि [5]हाकेला. ॥ २

भ व्य [6]क्षीरसमुद्रीं हेमरजतलोहशिखर रत्नमय ।
[7]नग [8]अयुतयोजनोच्छ्रय ज्यासि [9]लिहों न पटु, करुनि यत्न, **मय**. ॥ ३

ग जराज त्या त्रि[10]कूटीं होता, त्या [11]अद्रिची [12]महाद्रोणी ।
तेथें [13]ऋतुमन्नामक [14]जलनाथोद्यान शोभवी [15]क्षोणी. ॥ ४

व रुणाच्या उद्यानीं होतें शुभ [16]साधुहृदयसें [17]सुसर, ।
त्यांत क्रीडा करितां चरणीं त्या [18]करिवरा धरी [19]सुसर. ॥ ५

ते जस्वी [18]वारणवर झटला [20]दशशतसमा समग्रा हा, ।
बहु थकला, नच शकला झाडाया त्या [21]यमासम [22]ग्राहा. ॥ ६

[23]**वा** रणपतिस सराच्या तो ग्राह निघों नदेचि बाहेर, ।
त्या सर उत्साहप्रद, कन्याप्रेम्यासि जेंवि [24]माहेर. ॥ ७

सु टका व्हाया त्याची [25]गजगजिनीकलभयूथ तें झटलें, ।
[26]घटलें यत्नशत करुनि, मागें [27]तद्दळ तसेंचि तें [28]हटलें. ॥ ८

आहे. यास आधारः–तिमिरस्य तथा मुष्टिग्राह्यत्वं सूचिभेद्यता । शुक्लत्वं कीर्तिपुण्यादौ कार्ष्ण्यं चाकीर्त्यघादिषु. ॥ प्रतापे रक्ततोष्णत्वे रक्तत्वं क्रोधरागयोः । ज्योत्स्नापानं चकोराणां सेवालं सर्ववारिषु ॥ [केशवमिश्रकृत **अलंकारशेखर**--१५ मरीचि. पृ० ५५.] १६. अमृताच्या उत्तम सरोवराला.

१. मुक्ति, सुटका. २. नक्रापासून. ३. हरिमेधाची पत्नी हरिणी हिच्या पोटीं हा भगवंताचा 'हरि' नामक अवतार झाला. ४. अति+आर्त=अत्यंत पीडा पावलेल्याच्या. ५. प्रत्युत्तर दिलें. हाकेला पावणें=हांकेबरोबर 'ओ' म्हणणें, जबाब देणें, हांक मारल्याबरोबर साहाय्य देण्यास सिद्ध असणें. ६. क्षीरसागरांत ७. पर्वत. ८. अयुत योजन उच्छ्रय (उंची) आहे ज्याचा असा. ९. लिहों (लिहावयास) पटु (कुशल) मय (मयासुर) न (नाहीं). १०. पर्वतीं. ११. पर्वताची. १२. मोठी गुहा. १३. ऋतुमत्+नामक=ऋतुमत् या नांवाचें. १४. जलनाथ+उद्यान=वरुणाची बाग. १५. पृथ्वी. १६. साधूच्या हृदयासारखें स्वच्छ. १७. उत्तम सरोवर. १८. करि+वर=गज+श्रेष्ठ. १९. ग्राह. २०. हजार वर्षें. [समा=वर्षें.] २१. यमासारख्या. २२. ग्राह=सुसर. २३. गजवराला. २४. मातृगृह. २५. हत्ती, हत्तिणी आणि छावे यांचा समुदाय. २६. कमी झालें. गजेंद्राच्या सुटकेसाठीं शेंकडों उपाय करून तें सैन्य कमी झालें. २७. त्या गजाचें सैन्य (परिवार.) २८. निरुपाय होऊन मागें सरलें.

दे वार्तेंचि शरण तो जाय, म्हणे संकटांत सिंधुर[1] 'हा !'।
झाला दुर्बळ समरीं म्हणतां दिगिभासि[2] शक्तिसिंधु[3] 'रहा.'[4] ॥ ९
वा[5]रिज धरुनि, क[6]रातें कष्टें उचलूनि बैसतां झोले ।
'[7]भो ! अखिलगुरो ! **भ**गवन् ! **ना**रायण ! ते नमोऽस्तु' हें बोले.॥१०
य ववज्रांकुशजलजध्वजचिन्हित पादपद्म आठविलें, ।
तों ये आपणचि प्रभु पार्षदबळचक्रही न पाठविलें[8]. ॥ ११
न[9] भसंगमवर **ग**रुड त्यजुनि[10], प्रभुवर उडीच घाली, [11]हो ! ।
ऐसा सदय स्मरतां [12]भस्म जनाची न कां [13]अघाली हो ? ॥ १२
[14]**मो** लकरीसे लोकप[15], तातचि पाहुनि मुलास [16]कळकळतो, ।

---

१. हत्ती. २. दिक्+इभासि=दिग्गजास. ३. शक्तीचा समुद्र. ४. थांब. ५. कमल. ६. शुंडेतें. ७. भो अखिलगुरो, भो भगवन्, भो नारायण, ते नमः अस्तु=हे सर्वगुरो, हे भगवन्, हे नारायणा, तुला नमस्कार असो. ८. **'पाठवणें'** हा शब्द 'स्था' धातूच्या पूर्वी 'प्र' उपसर्ग लागून जसा 'प्रस्थापन' शब्द सिद्ध होतो, तसा 'स्था'चा अपभ्रंश जो 'ठ' त्याच्या पूर्वी 'प्र'चा अपभ्रंश जो 'पा' तो लागून आणि प्रयोजकत्वार्थक 'व' प्रत्यय होऊन सिद्ध झाला आहे. [मराठी व्याकरणावरील निबंध–पृष्ठ १२.] ९. नभसंगम +वर=पक्षी, विहंगम+श्रेष्ठ=पक्षिवर्य. [नभसा (विहायसा) गच्छतीति नभसंगमः.] १०. सोडून, गरुडाची वाट न पाहतां. ११. अहो. १२. जनाची पापपंक्ति जळून जाईल असें या प्रश्नाचें उत्तर आहे, म्हणून हा **प्रश्न** अलंकार समजावा. यालाच इंग्रजींत Question of appeal असें म्हणतात. 'प्रश्नालंकार म्हणून एक अलंकार आहे. त्याचें लक्षण असें, कीं बाहेरून वाक्य प्रश्नासारखें दिसावें; परंतु वास्तविक वक्त्यास त्या गोष्टीचा पक्का निश्चय असावा. जसें; 'कालिदासासारखा सुरस कवि दुसरा कोणता आहे?' ह्या वाक्यांत वक्त्यास दुसरा कोणी कवि आहे कीं काय, असा संशय नाहीं; तर दुसरा कोणी कवि कालिदासासारखा नाहीं; असा त्याचा निश्चय आहे. व हा दृढनिश्चय निर्भयपणें, प्रश्न विचारल्यावरून सिद्ध होता. तसेंचः—सकल ऐश्वर्य घेऊन भेटी । पद्मा आली पायें लोटी । तो सभाग्य कीं अभाग्य सृष्टी । काय म्हणिजे सांग पा?॥ [मुक्तेश्वर–शकुंतलाख्यान.]' [अनेकविद्यामूलतत्वसंग्रह–पृष्ठ २१७]. १३. अघ+आलि= पापपंक्ति. १४. कष्ट करणारे असे.१५. लोकप (इंद्रादिक लोकपाल) मोलकरीसे (मजूरदारासारखे होत, खरे कळकळीचे नव्हत, त्यांस खरी दया नाहीं) मुलास पाहुनि जैसा तातचि कळवळतो तैसा (दीनाविषयीं) कनवाळु) एक हरीच. यामुळेंच कवि म्हणति (ज्ञातेजन देवास म्हणतात कीं) देवा! प्रभो! सकळप्रेमा तुला कळतो! (खरा प्रेमा करण्याविषयीं ज्ञाता तूंच–माझा प्रेमाच आम्ही–संपादावा!) १६. हळहळतो.

तैसा हरिच कवि म्हणति, 'देवा! प्रेमा तुला सकळ कळतो.' ॥ १३
भगवान् उडीच घालुनि काढी बाहिर गजा अनुग्रा हा।
पायीं मिठी जयाची त्यासह त्याही महातनु ग्राहा. ॥ १४
गजचरण स्वकरें अरिपाटितनक्राननामधुनि काढी,।
त्या दोघांचाही करि उद्धार; प्रभुदया बहुत गाढी. ॥ १५
वररूप ग्राह धरी, हूहू गंधर्व तो, तया शाप।

---

१. कवि (पंडितजन) म्हणति (म्हणतात) तैसा (त्याप्रमाणें, बापाप्रमाणें) हरिच [आहे]. (ईश्वर हा दुःखापन्न भक्तास पाहून कळकळणारा आहे.) २. 'प्रेमा' हा शब्द पुंलिंगी आहे. मोरोपंत नेहमीं संस्कृत भाषेच्या लिंगनिर्देशास अनुसरतात, ह्याचीं उदाहरणें त्यांचीं काव्यें वाचीत असतांना जागोजाग आढळतात. उदाहरणार्थ, स्वप्न, विघ्न, दारा, मित्र, नयन, नेत्र इत्यादि शब्दांचीं लिंगें संस्कृतांत जीं आहेत तींच पंतांनीं आपल्या काव्यांत कायम ठेविलीं आहेत. प्रस्तुत 'प्रेमा' हा शब्द संस्कृतांत पुंलिंगी असून मराठींत त्याचें नपुंसकलिंग करण्याची वहिवाट आहे. पंतांनीं आपली नेहमींची वहिवाट सोडून 'प्रेम' शब्दाचें लिंग मराठी भाषेच्या वहिवाटीस अनुसरून नपुंसकलिंग क्वचित् ठेविलें आहे. प्रायः ह्या शब्दाचें लिंग संस्कृताप्रमाणेंच पुंलिंग योजिलें आहे. उदाहरण–'माझा प्रेमा सुदामा हरिसख दुबळा शब्दसंदोह जो हे' [कृष्णविजय–पूर्वार्ध–उपसंहार; 'प्रेमा कैसा किती हा पटु अपटु असे कीं नसे दंभगर्व' [कृष्णविजय–उत्तरार्ध–उपसंहार श्लो० ३.] ३. सौम्या. ४. ज्या नक्राची. ५. महा (मोठी)+तनु (देह) ज्याची तो. (ग्राह=नक्र.) ६. अरि+पाटित+नक्र+आनन+मधुनि=चक्रानें विदारिलेल्या सुसरीच्या मुखांतून. [अ० ३ श्लो० ३२-३३.] ७. मोठी, अगाध. ८. श्रेष्ठरूप. ९. गंधर्वनामविशेष. १०. शापाची कथा अशी आहे:–क्षीरसागरांत त्रिकूट नामक एक पर्वत होता. त्याच्या खालच्या तटावर वरुणाचें ऋतुमत् नामक उद्यान होतें आणि त्यांत एक अत्यंत रमणीय सरोवर होतें. तेथें उन्हानें संतप्त आणि तृषार्त असा एक गजेंद्र आपल्या कळपासह पाणी पिण्यासाठीं आला. तो सरोवरांत प्रवेश करून तेथील पाणी यथेच्छ पिऊन बाहेर येऊं लागला, तों त्याला एका सुसरानें पकडिलें. तेव्हां त्यानें नक्राच्या हातांतून सुटण्याचा होता तेवढा यत्न केला परंतु मगरमिठी सुटेना. त्याची सुटका करण्यासाठीं इतर गज, गजस्त्रिया, आणि कलभ (गजशावक) यांनींही पुष्कळ प्रयत्न केला, पण नक्रापुढें त्यांचेंही कांहीं चालेना. या उद्योगांत हजार वर्षें गेलीं आणि सर्व उपाय हरले. अखेरीस निरुपाय होऊन गजेंद्रानें हें प्राणसंकट टाळण्यासाठीं ईश्वराचा धांवा केला. (अ० ३ श्लो० २-२९.) 'मी ग्राहापासून मुक्त होऊन टाळण्याची इच्छा करीत नाहीं, तर अज्ञानमोक्षाची इच्छा करतों इत्यादि स्तोत्र ऐकून प्रसन्न होऊन श्रीभगवान् हरि प्रकट झाला. त्याला पाहतांच 'हे नारायणा! अखिलगुरो! भगवन्नमस्ते' असें दीनवाणीनें बोलून गजेंद्रानें सोंडेनें एक कमळ उपटून

देवलमुनिचा होता, भगवत्स्पर्शेंचि जाय तें पाप. ॥ १६
ते जितचक्रकरातें[1] वर्णुनि वंदूनि जाय निर्जलोका,[2] ।
देउनि सारूप्य[3] गजा कुरवाळी प्रभु, जसा जनक तोकां.[4] ॥ १७
वा द्यरवपुष्पवृष्टिस्तुति **वि**धिमुख[5] देव पितरजन करिती, ।
धरि ती सदयपणाची देवांहुनि[6] रीति इतरजनकरिती. ॥ १८
सु[7] कृती पहिला राजा तो **इं**द्रद्युम्न, राज्य सोडून, ।
आश्रम करुनि कुलनगीं[8] होता **ह**रिचीच भक्ति जोडून. ॥ १९
दे वातें पूजित जितचित्तेंद्रियवर्ग **पां**ड्य तो होता, ।
सुव्रतनियमीं जपतां दैवें दिधला तशासही गोता.[9] ॥ २०

भक्तिभावानें त्याच्या प्रीत्यर्थ वर आकाशांत फेंकून दिलें. तेव्हां त्या पीडिताला पाहून विष्णूला दया आली. त्यानें एकदम गरुडावरून उतरून सग्राह गजेंद्राला सरोवराच्या बाहेर काढून, चक्रानें नक्राचें तोंड कापून त्यास सोडविलें. (अ० ३ श्लो० ३३.) हा नक्र म्हणजे देवल ऋषीच्या शापानें नक्र झालेला हूहू नामक गंधर्व होय. यानें ईशस्तव केला तेव्हां हा शापमुक्त होऊन गंधर्वलोकास परत गेला. गजेंद्र हा पूर्वींचा द्रविडदेशाचा इंद्रद्युम्न नामक राजा होय. हा विष्णुव्रतपरायण असून मलयाचलावर तपश्चर्या करीत असतां, तेथें एकदां सशिष्य अगस्त्यमुनि आला. त्याचा यानें ध्यानस्थ असल्यामुळें प्रत्युत्थानादि आदरसत्कार केला नाहीं. तेव्हां मुनीला राग आला. 'हा असाधु दुरात्मा विप्रांचा अपमान करणारा गजासारखा स्तब्धमति आहे. तेव्हां हा गज होवो' असा त्यानें शाप दिला. (अ० ४ श्लो० १०.) परंतु मुनीची प्रार्थना केली तेव्हां त्यानें 'विष्णु तुझा उद्धार करील,' असा उःशाप देऊन समाधान केलें. नंतर इंद्रद्युम्न हा आत्मस्मृतिविनाशिनी अशा कुंजरयोनींत जन्म पावला. पुढें भगवत्स्पर्शानें अज्ञानबंधमुक्त होऊन भगवद्रूप झाला. (अ० ४ श्लो० ६.) [भागवत–स्कंध ८ अ० २-४.]

१. तीक्ष्ण केलेलें चक्र हातामध्यें ज्याच्या त्यातें. (कृष्णातें.) २. गंधर्वलोकाला. ३. सारूप्यमुक्ति. गजेंद्राला भगवंतासारखें चतुर्भुज रूप प्राप्त झालें. सलोकता, समीपता, सरूपता व सायुज्यता अशा चार मुक्ति आहेत. उपास्य देवतेच्या लोकीं राहणें ती सलोकता; उपास्य देवतेच्या सन्निध राहणें ती समीपता; उपास्य देवतेचें व आपलें स्वरूप व गुण सारखे होणें ती सरूपता; आणि उपास्य देवतेमध्यें (ब्रह्मीं) मिळून लीन होणें ती सायुज्यता. ४. बालक. ५. ब्रह्मदेवप्रमुख. ६. देवाहुनि (देवाखेरीज) इतरजनकरिती (देवाशिवाय इतर जे जनक बाप–त्यांची रिती (वर्तनपद्धति)=देवाव्यतिरिक्त जे इतर बाप त्यांची आचारसरणी) रीति (रिक्त, पोंकळ, व्यर्थ, निरर्थक अशी होय). ती [देवाची रीती] सदयपणाची धरि (दयाळुपणालाच धारण करिते; ती निवळ दयाळुपणालाच धरिते) देवासारखे इतर बाप दयाशील नसतात–असें तात्पर्य. ७. पुण्यशील. ८. कुलपर्वतावर, मलयपर्वतावर. (अ० ४ श्लो० ८.) ९. फेरा, वळसा.

वा[1] धिंप्राशन करिता [2]भगवान् ये त्या नृपासि देखाया, ।
जो [3]जनुपासुनि सुनिपुणगुण सुतनु [4]तपोनळासि दे खाया. ॥ २१
य मनियमैकपर नृप [5]प्रत्युत्थानादि सत्क्रिया चुकला, ।
‘[6]स्तब्धा ! मदांध [7]गज हो’–[8]घटज म्हणे, योगसिद्धिला मुकला. ॥ २२
न त होता प्रभुचरणीं, म्हणुनि [9]प्राणात्ययीं हरि स्मरला, ।
सरला शाप, [10]श्रीहरिपार्षद झाला, [11]भवार्णवीं तरला. ॥ २३
मो ठा प्रसाद करि हरि, ‘[12]तुज मज गाईल तो तरेल’ वदे, ।
म्हणुनि सुकवि म्हणति, ‘[13]तुझ्या कीर्तिसुधासिंधुचा [14]हरे ! लव दे’.॥२४
भ गवान् [15]शुभ्र विकुंठासुत तो वैकुंठ, जो हरी शोक, ।
[16]श्रीस्तव [17]कल्पी [18]स्वाभिध [19]रैवतें मन्वंतरीं [20]महालोक. ॥ २५
[21]**ग** रुडध्वज [22]संभूतीवैराजप्रभव तो अजितनामा ।
दे [23]अमृत, करि सुरांच्या [24]चाक्षुषमन्वंतरीं सफळ कामा. ॥ २६
ब हु [25]दुर्वासःक्षोभें झाले [26]निःश्रीक तीनही लोक, ।
[27]असुरहत सुर न उठती, इंद्रादि समस्त पावले शोक. ॥ २७

---

१. समुद्राचें प्राशन करणारा. २. अगस्त्य. ३. जन्मापासून. ४. तपरूप अनलाला (अग्नीला). ५. अभ्युत्थान देणें इत्यादि. ६. हे गर्विष्ठा. ७. अध्याय ४ श्लो० १० पहा. ८. कुंभयोनि अगस्त्य. ९. प्राण+अत्यय=मरणसमयीं. १०. श्रीहरीचा अनुगामी सेवक. ११. भवरूप अर्णवांत (सागरांत). १२. तुला गजेंद्राला. [अ० ४ श्लो० १७.] १३. हरीच्या, भगवंताच्या. १४. हे भगवन्. १५. शुभ्र आणि विकुंठा यांचा पुत्र. शुभ्राची पत्नी विकुंठा होय. यांच्या उदरीं भगवान् आपल्या अंशानें अवतीर्ण झाला. याचें नांव वैकुंठ होय. १६. लक्ष्मीसाठीं, रमादेवीचें कोड पुरविण्यासाठीं. [अ० ५ श्लो० ५.] १७. निर्माण करी. १८. स्व+अभिध=आपल्या नांवाचा. १९. तामसाचा भाऊ रैवत होय, त्याच्या मन्वंतरांत. २०. वैकुंठलोक. २१. गरुडध्वज जो विष्णु. २२. हें चाक्षुष नामक सहाव्या मनूचें वर्णन आहे. वैराज आणि त्याची पत्नी संभूती यांच्या उदरीं भगवान् अंशानें अवतीर्ण झाला, त्याचें नांव अजित् होय. २३. या अजितानें समुद्रमंथन करून देवांला अमृत दिलें. [अ० ५ श्लो० १०.] २४. चक्षूचा पुत्र जो सहावा मनु चाक्षुष त्याच्या वेळीं. २५. एके प्रसंगीं दुर्वास मुनींनीं आपल्या कंठांतील माळ इंद्राला दिली. ऐश्वर्याच्या मदानें त्यानें ती माळ ऐरावताच्या गंडस्थळावर फेंकून दिली. ऐरावतानें ती पायाखालीं चुरून विसकळित केली. तेव्हां दुर्वासाला राग येऊन त्यानें संतापून ‘तुझें व तुझ्या बरोबर त्रैलोक्याचेंही ऐश्वर्य नष्ट होईल’ असा इंद्राला शाप दिला. २६. गतवैभव, हीनैश्वर्य.२७. दैत्यांनीं मारलेले. (सुर=देव.) [अ० ४५ श्लो० १५.]

ते विधिला विनविति, मग जाय तयांसहचि तो [1]हरिपदा त्या, ।
जेथें सरूप होउनि [2]गातो या मुक्तिच्या [3]करिप दात्या. ॥ २८
वा रिजनाभ प्रभुतें कळवी [5]स्तुति करुनि बहु [4]विधाता [6]तें, ।
कीं शरण आलियांची हरिलीच विपत्ति बहुविधा तातें. ॥ २९
सु रपरिपालक भगवान् प्रकटे ब्रह्मादि जे [7]तदादिपती, ।
तों [8]विधिभवेतरांचीं प्रभुतेजें लोचनें तदा दिपती. ॥ ३०
दे वांतें देव म्हणे, ‘आहेंचि सहाय मी तुम्हां जाणा, ।
संधि [9]करा असुरांसीं [10]सर्पाखुन्याय मानसीं आणा. ॥ ३१
वा सुकिला [11]नेत्रं करा, क्षीरधिमथनार्थ [12]मंदरा [13]मंथा, ।
[14]ओषधि घाला, घुसळा ह्या अमृतप्राप्तिच्या धरा पंथा. ॥ ३२
य त्न सफळ करिन [15]जरामरणहर अमृत तुम्हांस पाजीन, ।
मी स्वजना [16]तेंवि जपे, न धना लोभी, [17]सुता न वा [18]जीन. ॥ ३३
न [19]विषा भ्यावें सुर हो! म्हणतिल जें असुर तेंचि [20]परिसा हो ! ।
तुमचें चित्त खवळतिल बहु कामक्रोध [21]लोभें [22]परि साहो. ॥ ३४
मो हुनि असुरांतें, मी तुमचेंचि करीन सर्वथा कार्य, ।

---

१. हरीच्या स्थानाला. २. मुक्तीच्या दात्या (हरीला) गातो (स्तवितो). ३. गजेंद्र. ४. ब्रह्मदेव. ५. ही स्तुति अ० ५ श्लो २०-५० यांत आहे. ६. संकट. ७. तत्+आदिपति=ब्रह्मादि जे देव त्यांचा मुख्याधीश. ८. विधि+भव+इतर=ब्रह्मदेव+महादेव+यांहून इतरांचीं [अ० ६ श्लो० ३.] ९. असुरांवर कालाची कृपादृष्टि आहे यास्तव तुमचे अभ्युदयाचे दिवस येत तोंपर्यंत त्यांच्याशीं संधि करा. १०. सर्प (साप)+आखु (मूषक, उंदीर)+न्याय (व्यवहार, वर्तन)=पेटींत कोंडून ठेविलेला साप बाहेर पडण्यासाठीं वाट मिळावी म्हणून प्रथम उंदराशीं सख्य ठेवितो व काम झालें कीं त्याला खाऊन टाकतो, तसा व्यवहार असुरांशीं ठेवा. ११. बंधनरज्जु. १२. मंदर पर्वताला अमृत उत्पन्न करण्यासाठीं मंथा (मंथनदंड) करा. १३. मंथनकाष्ठ. (माथ्या असें ज्याला म्हणतात तो.) १४. लता, वल्ली, तृणओषधी सागरांत टाका. १५. जरा आणि मरण यांचा नाश करणारें. १६. येथें **उपमा** आहे. १७. पुत्राला. [अ० ६ श्लो० २३.] १८. म्हातारा. १९. सागरापासून उत्पन्न होणाऱ्या कालकूट नामक विषाला. २०. ऐका, स्वस्थपणानें ऐकून घ्या. २१. कामक्रोधादिक तुमचें चित्त खवळतील (क्षुब्ध करतील). सागरांतून उत्पन्न होणाऱ्या वस्तूंविषयीं काम, लोभ, क्रोध इत्यादि दर्शवूं नका–असा भाव. २२. परि (परंतु) साहो (सहन करा, सोसून असा).

अमृतें तुम्हांसि सुयशें तर्पुनि बहु हर्षवीन मी आर्य.' ॥ ३५
भ गवान् यापरि शिकवुनि [1]अंतर्हित होय; [2]आत्मभू [3]शर्व ।
निजधामातें गेले, [4]बळिच्या भेटीस देव ते सर्व. ॥ ३६
ग ज पाहुनि सिंह तसे, उठुनि म्हणति, '[5]भाव कळिव [6]देवारी,' ।
[7]सुरकदनोद्युक्तासुरवीरातें नीति [8]बळि वदे [9]वारी. ॥ ३७
ब ळि सदना [10]आल्यातें बहु सत्कारी, न होय तो वक्र, ।
[11]असुरेंद्रासीं सख्य [12]प्रभुशिक्षितसन्नयें करी **शक्र**. ॥ ३८
ते सुर असुर मिळाले, मथन [13]क्षीराब्धिचें तयां रुचलें, ।
जे [14]**त्रि**पुरवासि **शं**बरइत्याद्यरि म्हणति 'हें भलें सुचलें.' ॥ ३९
वा हुनि **मं**दर नेतां मार्गी ते देव दैत्यही थकले, ।
[15]चुरले, पडला [16]नग मग [17]कनकमय न चालवावया शकले. ॥ ४०
[18]**सु** च्छदरथ ये एकें हस्तेंचि नग स्ववाहनावरि घे, ।
[19]गगनीं महार्णवीं अवलंबुनि जेंवि प्रवाह नाव रिघे. ॥ ४१
दे व क्षीरधितीरीं जाउनि उतरी सलील **मं**दर तो, ।
करि तो **ह**रि चरितामृत कीं विषयविष त्यजूनि मंद रतो. ॥ ४२
[20]**वा** सुकि वेढुनि गिरिला आरंभिति दुग्धराशिचें मथन, ।
झाला [21]मुखाकडे [22]प्रभु, यच्चरिताचें [23]हरी मना कथन. ॥ ४३
य द्यपि हित करि **ह**रि, तरि अरि [24]परिहरिती भुजंगपुच्छातें, ।

---

१. गुप्त. २. ब्रह्मदेव. ३. शंकर. ४. बलिराजाकडे. [अ० ६ श्लो० २७.] ५. अभिप्राय. ६. दैत्य. ७. सुर+कदन+उद्युक्त+असुर+वीर=देवनाशार्थ उद्युक्त जे दैत्य वीर त्यांतें. ८. विरोचनपुत्र. ९. दैत्यांचा निषेध करी. १०. आलेल्या देवांतें. ११. बळीशीं. १२. प्रभूनें उपदिष्ट केलेल्या न्यायानें (सर्पाखुन्यायानें). १३. क्षीरसागराचें. (क्षीर+अब्धीचें=दुग्ध+सागराचें). १४. तीन पुरांत राहणारे दैत्याधिपति, शंबर, अरिष्टनेमि इत्यादि दैत्यांला. [अ० ६ श्लो० ३१.] १५. अनेक देव व दैत्य नभभारानें चुरून पडले. [अ० ६ श्लो० ३५.] १६. पर्वत. १७. हा मंदरपर्वत सुवर्णमय होता. १८. सु+च्छद+रथ=उत्तम पक्ष ज्याला असा जो गरुड तो रथ ज्याचा तो (कृष्ण). १९. गरुडातें अवलंबुनि देव गगनीं रिघे, जसी प्रवाह अवलंबुनि समुद्रीं नौका तसी. २०. सर्पराज वासुकि याला घुसळण्याची दोरी करून, व ती पर्वताभोंवती गुंडाळून. २१. वासुकीच्या मुखाकडे. २२. कृष्ण (हरि). २३. रिझवी, संतोषवी, रंजवी. २४. सर्पाच्या पुच्छाला दैत्यांनीं सोडून दिलें. [पुच्छ हा शरीराचा अमंगळ भाग होय, तो आम्ही हातीं धरणार नाहीं—असें दैत्यांचें म्हणणें पडलें.]

होती मुखाकडेही, म्हणति, 'स्पर्शेल कोण [१]तुच्छातें?' ॥ ४४
[२]नें ग [३]मंथितां सिंधुतळीं जाय [४]निराधार तो महाभार, ।
त्या विघ्नें देव असुर सर्वहि ते खिन्न जाहले फार. ॥ ४५
मो ठाचि लक्षयोजनपृष्ठ असा [५]देवें होय [६]कच्छप हा, ।
पाठीवरि गिरि घे, हें चरित प्रभुचें अतीव [७]अच्छ पहा. ॥ ४६
[८]भ र गिरिचा घे पृष्ठीं उचली तो [९]विपुलकाय कासव [१०]त्यां, ।
[११]परिवर्तनकंडूयन [१२]वाटे [१३]त्रैलोक्यनायका [१४]सव [१५]त्यां. ॥ ४७
ग गनीं सहस्रबाहु प्रभु धरि **मं**दरशिरासि [१६]कवळून, ।
स्तविती, पुष्पें वर्षति, न [१७]ढळति मुनि भक्तराज जवळून. ॥ ४८
व ळ दे तेव्हां देवासुर**वा**सुकि**मं**दरासि [१८]तो मथनीं, ।
अत्यद्भुत प्रभुचरित वदतां सद्यश न [१९]मांय हे कथनीं. ॥ ४९
[२०]ते [२१]पर अहिविषदहनें हत, [२२]दवदहनें वनीं जसे [२३]सरळ, ।
[२४]सुरहि तसेचि, [२५]तयांवरि [२६]घन वर्षवि कीं नसोत ते [२७]तरळ. ॥ ५०

---

१. तुच्छ अशा पुच्छाला. यांत **प्रश्न** अलंकार झाला आहे. २. पर्वत. ३. समुद्राचें मंथन चाललें असतां. ४. आधाररहित. 'निराधार' हें विशेषण साभिप्राय आहे म्हणून हा **परिकर** अलंकार होय. ५. देवानें कांसवाचें रूप धरून पर्वत वर आणिला. [अ० ७ श्लो० ८.] ६. कांसव. ७. स्वच्छ. ८. भार. ९. मोठें शरीर ज्याचें असा. १०. पर्वतास. ११. फिरविण्यानें जी खाज उत्पन्न होते ती. परिवर्तन (पर्वताचें पाठीवर फिरणें) हें कंडूयन (आंग खाजविण्यासारखें). १२. भासे, वाटलें. १३. त्या त्रैलोक्यनायका (त्या कच्छपरूपधारी विष्णूला) परिवर्तनकंडूयन (मंथनप्रसंगीं मंदराचलाचें पुनः पुनः फिरणें, घुसळणें, घर्षण) यज्ञ वाटे (यज्ञाप्रमाणें संतोषप्रद वाटलें). १४. यज्ञ. यज्ञतुल्य संतोषदायक वाटे. १५. त्रैलोक्यनायका. १६. आकळून. १७. स्थिर होते. [अ० ७ श्लो० १२.] १८. तो (ईश्वर) देव+असुर (दैत्य)+वासुकि (सर्पराज)+मंदरासि (मंदरपर्वताला) मथनीं (समुद्रमथनाच्या कामीं) तेव्हां (त्या समयीं) बळ दे (सामर्थ्य देता झाला—परमेश्वरानें या सर्वांची शक्ति वृद्धिंगत केली—असा भाव.) १९. न मावे, न मावतें. २०. ते (दैत्य) पर (शत्रु) अहिविषदहनें (वासुकीच्या विषयुक्त श्वासरूप अग्नीनें) हत (नष्ट झाले होते). २१. शत्रु. २२. अरण्यसंबंधी अग्नीनें. २३. वृक्षविशेष. २४. सुरहि (देवही) तसेचि (दैत्याप्रमाणेंच नष्टतेज झाले). २५. त्या देवांवर परमेश्वरानें मेघांकरवीं वृष्टि करविली. २६. [तो विष्णु] घन वर्षवि (पर्जन्यवृष्टि करवी) कीं (अशासाठीं कीं) ते (मंथन करणारे) तरळ नसोत (चंचल, त्रस्त, नसावेत, स्थिर असोत, मंथनकार्याविषयीं स्थिरप्रयत्न असोत). २७. चंचळ.

वा[1] रिदनील प्रभु मग, अमृत न निघतां, स्वयेंचि मथन करी, ।
इतर धराया[2] याचा, सिंहाचा जेंवि योग्य पथ न [3]करी. ॥ ९१
सु भगतम श्रीमूर्ति प्रभुनें मथितांचि, धरुनियां [4]अहिला, ।
हालाहलनामक विषरस [5]लयदहनोग्र [6]जन्मला पहिला. ॥ ९२
'**दे** अभय' म्हणति जाउनि विश्वेशा **शं**भुला प्रजा शरण, ।
चरण [7]स्वांतीं माथां धरिती, ज्याचें भया [8]हरि स्मरण. ॥ ९३
वा त्सल्यें द्रवला प्रभु, **शं**भु **उ**मेला म्हणे, 'अहो! सुमती! ।
भीतों परदुःखा, [9]विषें पीतों, कवि न [10]व्रतंच्युता [11]पुंसती.' ॥ ९४
य तिपति परतर गुरु [12]उरुकीर्ति प्रभु सिद्ध होय विषपाना, ।
नाना काम पुरवितां भ्राता माता पिता सखा माना. ॥ ९५
न[13] गजा देवी [14]स्वधवात्यद्भुतरूपासखप्रभावज्ञा ।
अनुमोदन दे, करवे ज्याची न **य**मा [15]नखप्रभावज्ञा. ॥ ९६
मो ठें तेजें[16] कळविलें आणुनि [17]निजकरतळांत विषमहि तें, ।
सहसा [18]मह साधूंतें द्याया गिळिलें पळांत विष [19]महितें. ॥ ९७
भं[20] वकरतलगलितमहाविषकण तो [21]वृश्चिकादिकीं आहे, ।

---

१. मेघश्याम. २. याचा (प्रभूचा) पथ धराया (मार्ग स्वीकारायास) इतर (परमेश्वराहून अन्य) योग्य न (उचित नाहीं). ३. हत्ती. या चरणांत **उपमा** आहे. ४. सर्पाला. (वासुकीला.) ५. लय+दहन+उग्र=प्रलयकालच्या अग्नीसारिखा उग्र. ६. अध्याय ७ श्लो० ८ पहा. ७. चित्तीं. ८. हरण करी. ९. अध्याय ७ श्लो० ४० पहा. १०. स्वीकारलेल्या व्रतापासून (नियमापासून) भ्रष्ट झालेल्या (जनास). ११. मान देत नाहींत. १२. मोठी कीर्ति ज्याची असा. १३. पर्वतकन्या (पार्वती). १४. स्व+धव+अति+अद्भुत+रूप+असख+प्रभाव+ज्ञ= आपल्या पतीच्या अति अद्भुतरूपासारिखा दुसरा कोण नाहीं असा प्रभाव जाणणारी. १५. नख+प्रभा+अवज्ञा=नखांच्या तेजाचा अपमान. १६. आपलें सामर्थ्य, स्वप्रभाव. १७. आपल्या करतळावर घेऊन. १८. उत्साह. १९. महित=पूज्य. साधूंतें मह द्याया (साधुजनांस संतोषविण्यासाठीं, साधुजनांला उत्सव देण्यासाठीं) महितें (श्रेष्ठ अशा शंकरानें, पूज्यतम अशा महादेवानें) तें विषमहि (तें घातुक असेंही, तें घात करणारें) विष (हालाहल) निजकरतलांत आणुनि (आपल्या करतलाचे ठायीं घेऊन) पळांत सहसा (तात्काळ) गिळिलें (प्राशिलें) [आणि आपलें] मोठें तेज [जगास] कळविलें. २०. भव+कर+तल+गलित+महा+विष+कण=शंकर+हस्त+तळवा+पडलेला+मोठा+गरल+कण=शंकराच्या करतलावरून पडलेला भयंकर विषाचा बिंदु. २१. वृश्चिकादिकीं=विंचू, सर्प, विषवल्ली इत्यादिकांच्या ठायीं.

[1]या हे वेग, मग तया साहेसा कोण हो! दुजा आहे? ॥ ५८

गे[2] लनाल नीळ केलें प्रभुचें गरळें, स्ववीर्य दाखविलें, ।
राखविलें, [3]करुणेनें तेंचि जना अमृत करुनि चाखविलें. ॥ ५९

वे[4] रिचेवरि मग मथितां, [5]सुरभी [6]उच्चैःश्रवा [7]महावाजी, ।
[8]ऐरावत **कौ**[9]स्तुभमणि ज्यासि म्हणति भक्तजन 'पहावा जी!' ॥ ६०

ते सर्व हर्षवी बा! प्रकटुनि मग पारिजात [10]गुणधाम, ।
[11]तूं तैसा जो पुरवी [12]अर्थिजनाचे सदा सकळ [13]काम. ॥ ६१

[14]**वा** रांगना सुरांच्या बहु [15]सुभगा [16]अप्सरा मग निघाल्या, ।
[17]जाणों त्याच्या हृदयीं [18]क्षुब्धाब्धिप्रहित शक्तिच रिघाल्या. ॥ ६२

[19]**सु** गुणसुखनि [20]सुभगाचा आद्या **श्री** प्रगटली तिणें वरिला, ।

---

१. या विंचू, सर्प इत्यादिकांच्या विषाला हे वेग (हा असा वेग आहे, मोठा भयंकर वेग आहे.) मग (तरमग) तया (त्या हालाहलाला) साहेसा (सहन करण्यास समर्थ असा) (शंकरावांचून दुसरा) कोण हो! आहे? (अन्य कोणीही समर्थ नाहीं—असा भाव). २. शंकराला म्हणूनच 'नीलकंठ' अशी संज्ञा आहे. ३. करुणेनें राखविलें (जगाचें रक्षण शंकराकडून करविलें) तेंचि अमृत करुनि (तें परमेश्वराचें लीलारूप अमृत उत्पन्न करून, ज्या लीलामृताच्या प्राशनानें जन्ममरणांचा नाश होतो तें परमेशचरितामृत) जना (जगताला) चाखविलें (पाजिलें). ४. पुनः पुनः, वेगानें. ५. कामधेनु. ६. समुद्रमथनसमयीं निघालेल्या चौदा रत्नांपैकीं एक. उच्चैश्रवा. हा अत्युत्तम अश्व होता. याचे कान (श्रव) उच्च होते म्हणून याला उच्चैःश्रवा असें नांव पडलें. हा इंद्राचा अश्व होय. ७. मोठा घोडा. ८. इंद्राचा हत्ती. सुर+गज=देव+हत्ती=ऐरावत. इंद्राचा गज हा सर्व गजांचा राजा होय. याचा रंग शुभ्र आहे. 'वारशुभ्रमिंद्रस्य' [वाग्भटालंकार—परिच्छेद १ श्लोक १९—काव्यमाला—अंक १०५.] साधारणतः गजांचा वर्ण कृष्ण असतो, परंतु सुरेंद्राच्या गजाचा (ऐरावताचा) वर्ण शुभ्र आहे. ब्रह्मदेशांत मात्र शुभ्रवर्ण हत्ती आहेत व भोळे लोक पांढऱ्या हत्तीची पूजा करितात व त्यास पूज्य समजतात. ९. पद्मरागजातीचें रत्न. १०. गुणगृह, गुणांचें घर. ११. तुझ्या सारखा (परीक्षित राजासारखा) पारिजात हा याचकांची इच्छा पुरवितो. १२. याचकवर्गाचे. १३. मनोरथ. १४. वार+अंगना=समूह+स्त्री=अनेक जनांची स्त्री; वारस्य (वृंदस्य) अंगना (स्त्री) वारांगना; 'वारस्त्री गणिका वेश्या रूपाजीवा' इत्यमरः. १५. सुंदर. १६. मागें पृ० २३५ टीप ७ पहा. १७. ही **उत्प्रेक्षा** आहे. १८. क्षुब्ध+अब्धि+प्रहित=क्षोभलेल्या समुद्रानें पाठविलेल्या. १९. उत्तम गुणांची खाण. सुगुण+सुखनि=उत्तम गुण+उत्तम खाण. २०. सुभगाचा (सकलैश्वर्याचा) सुगुण (उत्तम गुणयुक्त) [असा] सुखनि (उत्तम खाण—असा श्रीविष्णु.)

निर्दोषगुण प्रभुवर तीस रुचे, [1]ती तसी न त्या [2]हरिला. ॥ ६३
दे वास श्रीहरि, मग दे [3]वासस्थान वरद वक्ष तिला, ।
दृष्टि सुधावृष्टि तिची करि नि[4]जजनदैन्यखरदवक्षतिला. ॥ ६४
वा [5]रुण्याख्या [6]देवी कन्या नवकमललोचना झाली, ।
विष्णुमतें वरुनि तिला असुरांची मंडळी [7]नृपा! [8]धाली. ॥ ६५
थं [9]ज्ञहविर्भोक्ता [10]ये धन्वंतरि, अमृतकलश आणून, ।
नेला [11]तो असुरांनीं, भ्याले सुर आत्मघात जाणून. ॥ ६६
न मुनि कथिति [12]सुर शोचिति [13]परहृतपीयूषसुरसकलशातें, ।
देव[14] म्हणे, 'स्वस्थ असा, पावाल समस्त सुर सकल [15]शातें.' ॥ ६७
मो ही [16]परांसि [17]होउनि तत्काळचि तो हरी [18]परमहेला, ।
अमृतकलश घे स्वकरीं, त्या [19]अहितांची करी परम हेलें[20]. ॥ ६८
भ क्तांसि सुधा पाजी, देणारी सेवि त्यांसि [21]भद्रा जी, ।
[22]परें भुलविले स्मि[23]तरसें, बसली घोंटीत [24]लाळ [25]तेंद्राजी. ॥ ६९

---

१. लक्ष्मी. २. परमेश्वराला. ३. रहाण्याला ठिकाण. ४. निज+जन+दैन्य+खर+दव+क्षतिला=स्वीय+लोक+दीनता+प्रखर+वणवा+नाशाला=आपल्या जनाचें जें दैन्य तोच प्रखर वणवा त्याच्या नाशाला. ५. वारुणी+आख्या=वारुणी या नांवाची. वारुणी आहे आख्या (नांव) जिची ती. ६. सुरा देवी. ७. हे परीक्षित् नृपा! ८. तृप्त झाली. ९. यज्ञांतील हवीचें सेवनकर्ता. १०. या धन्वंतरि पुरुषाच्या हातांत अमृतानें भरलेला कलश होता. [अ० ८ श्लो० ३३-३४.] ११. तो (अमृतकलश) असुरांनीं नेला. १२. देव. १३. पर+हृत+पीयूष+सुरस+कलशातें=शत्रु (दैत्य)+चोरलेला+अमृत+उत्तम रस+पात्रातें=दैत्यांनीं नेलेल्या उत्तम अमृतरसाच्या कलशातें. १४. भगवान् परमेश्वर. [अ० ८ श्लो० ३७.] १५. सुखातें. शात=सुख. ['स्यादानंदथुरानंदशर्मशातसुखानि च' इत्यमरः. 'शात' याचें 'सात' असें दंत्यरूपही आढळतें.] १६. दैत्यांला मोह घाली. १७. परमहेला होउनि तो हरि तत्काळचि परांसि मोही—असा अन्वय. १८. अतितेजस्विनी स्त्री. पर+महेला=श्रेष्ठ+महिला, स्त्री, वनिता. ['महिला फलिनीस्त्रियोः' इति मेदिनी. महस्योत्सवस्य इला भूमिः इति विग्रहे **महेला** अपि. महाची (उत्सवाची) इला (भूमि, जागा) असा विग्रह केला असतां **महेला** असें 'महिला'शब्दाचें रूप समजावें. 'परमहेलारतोऽप्यपारदारिकः' असा प्रयोग संस्कृतांत आढळतो.] १९. त्या शत्रूंची, दैत्यांची. २०. हेलना. २१. कल्याणा. २२. शत्रु (दैत्य). २३. हास्यरसें. २४. लाळ घोंटीत बसली=त्या मोहिनीची प्राप्ति होईल अशी आशा धरून वाट पाहत बसली, पण अखेरीस हताश झाली—असा अर्थ. लाळ घोंटणें, लाळ घोंटीत बसणें=अप्राप्य अशा वस्तूच्या प्राप्तीची आशा

ग[1]ट करितां अमृत, शिरुनि त्या सुरपंक्तींत राहु, विधु[2] तरणी[3]।
सुचविति[4], हरि[5] अरिनें[6] शिर करि अरि तो विजयिबाहु विधुत[7] रणीं. ७०
ब[8]ळिला असुर उठविती, खवळे तो शत्रुंनीं बहु च्छळिला, ।
कळिला[9] करि, परि हितकर युद्ध न, तें[10] काशकुसुम त्या अळिला[11].॥७१
ते असुर पात्र झाले होउनि गतगर्वसार[12] खेदास, ।
सुर[13] धन्य, विषम नच, हरि[14] सुरतरु, या सर्व सारखे दास. ॥ ७२

धरून तिच्या मिळण्याची वाट पाहून अखेरीस हताश होणें. २५. तत्+राजि+त्यांची+पंक्ति. त्या दैत्यांची मंडळी.

१. गट करणें=गिळणें, चटकन् खाणें. [मोरोपंत–सप्तशती–अध्याय ५ गीति २ हींतही 'गट करणें' याचा उपयोग केला आहे.] २. चंद्र. ३. सूर्य. [अ० ९ श्लो० २३-२५.] ४. परमेश्वराला सुचविती. विधु (चंद्र) [आणि] तरणी (सूर्य) [हे मोहिनीरूप धारण करणाऱ्या विष्णूला] सुचविति (खुणेनें कळविती) [तेव्हां जो] रणीं (समरांत) अरि (शत्रु) विधुत (कंपित) करि (करतो) [आणि, जो] विजयिबाहु (ज्याचे बाहु–भुज–विजयी–पराक्रमी–असा) तो [विष्णु] (जो शत्रुजनांला समरांगणांत कांपवितो व जो स्वबाहुबळानें समरांत जय मिळवितो तो विष्णु) अरिनें (चक्रानें, सुदर्शन नामक चक्रानें) [राहूचें] शिर हरि (तोडी). मोहिनीरूप धारण करून विष्णूनें दानवांपासून अमृत आणून देवांस प्राशनास दिलें. तेव्हां राहूनें देवरूप धरून अमृतपान केलें. तें त्याच्या कंठगत होत आहे इतक्यांत चंद्रसूर्यांच्या खुणेवरून विष्णूनें आपल्या चक्रानें राहूचें शिर छेदिलें. असा अमृताच्या योगें राहूचा घात झाला. (महाभारत–आदिपर्व–अध्याय १९ श्लो० ४-६.) पंतांनीं राहुशिरश्छेदाविषयीं अमृताला उद्देशून काय लिहिलें आहे तें पहा. 'झाले जे तृप्त भास्वत्कुलतिलकरघूत्तंसलीलारसानें, सारासारज्ञ साधु स्वमनिं अमृतही मानिती फार सानें; । पीयूषें सोदरेंदुक्षयहि न हरिला, त्यागिलेंही पित्याला, राहूचा घात केला विषसहजनिला कोण सेवील त्याला? ॥' [मोरोपंतकृत रामायणें–भाग १–पृ० २०७ श्लो० १०.] ५. हरण करी, तोडी. ६. चक्रानें. ७. कंपित. ८. विरोचनपुत्राला. ९. कलहाला. १०. 'युद्ध न तें केतकचि तया अळिला' असाही पाठ आहे. काश=दर्भविशेष, कुसुम=त्याचें पुष्प. ११. भ्रमराला. [तो बलिदैत्य] कळिला करि (कलह करता झाला). परि (परंतु) [तें] युद्ध (देवांशीं केलेलें युद्ध) त्या (त्या बळीला) हितकर न (लाभप्रद झालें नाहीं). तें (युद्ध) त्या अळिला (त्या बलिदैत्यरूप भ्रमराला) काशकुसुम (काशपुष्पाप्रमाणें निष्फळ, काशगवताच्या फुलाप्रमाणें मध न देणारें, निष्फळ) [होय] (काशाच्या फुलापासून भ्रमराला यथेच्छ मधु मिळण्याचा संभव नाहीं ही गोष्ट ध्यानांत असावी. भ्रमराला काशकुसुम जसें हितकर नाहीं तसें हें देवयुद्ध बळीला हितकर झालें नाहीं). १२. नष्टगर्वबल असे. १३. सुर (देव) धन्य (सुखी, संतुष्ट, श्लाघ्यजीवित झाले) [त्या सुरांस] विषम (संकट, दुःख) न [वाटलें] [कारण] हरि (विष्णु हा) सुरतरु (कल्पवृक्ष होय). या (या हरीला) सर्व (सकल) दास (भक्तजन) सारखे (समान होत). १४. विष्णु.

वा सवसहाय भगवान् मारी समरांत काळनेमीतें, ।
कैसाही प्रबळ असो, लंघूं न शकेचि **काळ** नेमी तें. ॥ ७३
सु खवी सुरांसि आश्रितवांछापरिपूर्तिदक्ष वनमाळी, ।
प्रभुचा प्रताप समरीं दवदहनचि होय कक्षवन माळी. ॥ ७४
दे ववररणीं कार्मुकवेदानें रक्षिलाचि न सुमाळी, ।
इंद्रक्षोभीं रक्षिल वृक्षाचे किति जपोनि असु माळी? ॥ ७५
वा रणवरसाचि महामत्तमदें माल्यवान् करी समर, ।
त्यातें ही लीलेनें हरिनें मारूनि सुखविले अमर. ॥ ७६
य तें वज्री वज्रें, वाग्युद्धीं बळि न आटतां, ताडी, ।
यानासकट तयातें तद्भटशोकाश्रुबिंदुसह पाडी. ॥ ७७
न गणुनि वज्रातेंही धांवे हरिवाह गुरुगदी जंभ, ।
ऐरावतासि पाडी, मोडी सत्यासि पळ जसा दंभ. ॥ ७८

---

१. वासव (इंद्र) आहे सहाय (सोबती) ज्याला. २. कालनेमि नामक दैत्याला. [अध्याय १० श्लोक ५५-५६]. ३. योजी. यांत **अर्थांतरन्यास** अलंकार आहे. "पंतांच्या आर्यांचीं उत्तरार्धें अशींच अलंकारमय आणि मनोहर असतात. कोणत्याही विषयाचें वर्णन करतांना प्रत्येक गोष्टीचें स्वरूप दृष्टांतादि अलंकारांनीं उत्कर्षेकरून दाखविण्याचा प्रत्येक पद्यांत **मोरोपंतानें** यत्न केलेला आढळतो. त्याच्या बहुत करून सर्व आर्यांचीं उत्तरार्धें अलंकारमय किंवा चमत्कारिक कल्पनामय असतात. कितीएक ठिकाणीं त्याच्या कल्पना इतक्या उज्वल व उदात्त आढळतात कीं, त्या कामांत तो नामांकित संस्कृत कवींची स्पर्धा करीत आहे कीं काय असा भास होतो." [हंसकृत मोरोपंतावरील निबंध–पृ० ११७-११८.] ४. आश्रित+वांछा+परिपूर्ति+दक्ष=भक्तजन, स्वदास+इच्छा, मनोरथ+संपादन, पूर्ण करणें+पटु, कुशल, चतुर=स्वभक्तांचे सकल मनोरथ परिपूर्ण करण्याविषयीं कुशल (असा वनमाळी). ५. विष्णु. वनमाळा धारण करणारा विष्णु. ६. समरीं प्रभुचा प्रताप दवदहनचि होय [आणि] माळी (दैत्य) कक्षवन [होय]–असा अन्वयार्थ. यांत **रूपक** अलंकार आहे. ७. गवत किंवा वल्ली यांचें अरण्य. ८. दैत्यविशेष. सुमाळी दैत्याचें संरक्षण कार्मुकवेदानें केलें नाहीं. त्याला धनुर्विद्या येत होती, पण ती त्याच्या उपयोगीं पडली नाहीं. ९. दैत्यविशेष. १०. वृक्षसंरक्षक. ११. एक दैत्य. १२. इंद्र. १३. 'विहायस' नामक कामगामी विमानासह. १४. त्या बलि दैत्याला. १५. तत्+भट+शोकाश्रु+बिंदु+सह=त्या बलिराजाचे+वीर योद्धे+विलापबाष्प+बिंदु+सहित. येथें **सहोक्ति** अलंकार झाला आहे. १६. हरि (सिंह) वाह (वाहन) ज्याचें असा. १७. मोठा गदाधारी. १८. एक दैत्य.

मो हें द्विरद[1] पडे, तों मातलि[2] तत्काल दिव्य रथ आणी, ।
हाणी शूळ तया[3] अरि, तोडी तन्मस्तकासि[4] पविपाणी[5]. ॥ ७९
भ गवान् नारद[6] सांगे क्षोभुनि तज्ज्ञाति[7] गाढिती हरिला, ।
बळ पाक वधुनि, मारी फेंसानें नमुचिनामका अरिला[8]. ॥ ८०
ग र्जुनि हरि[9] हरिणातें मागें लागोनि जेंवि लोळविती[10], ।
तेंवि अमर असुरांतें प्रेक्षकधार्मिकमनासि पोळविती[11]. ॥ ८१
व ध असुरांचा विधिनें जिष्णुकडे[12] नारदासि धाडून ।
राहविला, सुर मारित होते पळतांहि असुर झाडून[13]. ॥ ८२
ते सुर गेले स्वर्गा, बळिला घेऊनि असुर अस्तनगा[14] ।
शिवुनि[15] बळिस उठवि म्हणे, 'अमृत जड, तयासि' शुक्रहस्त[16] नगा. ॥ ८३
वा[17] डववर कवि[18] उठवी योजुनि संजीविनीस जेत्यांतें[19], ।
अविनष्टावयव[20] असुर होते समरीं परासु[21] जे त्यांतें. ॥ ८४
सु रमणि देवें[22] सुरमणीसह[23] जाय प्रभुकडे[24] म्हणे, 'कृष्णा! ।
अवतार देखिले बहु, आहे स्त्रीरूपदर्शनीं तृष्णा.' ॥ ८५
दे व म्हणे, 'प्रणतांच्या[25] कैसें सुरसत्तमा! न हाकेला ।
पावावें? मोहाया दैत्य स्त्रीवेष[26] रम्य हा केला. ॥ ८६
वा टे आपण तो स्त्रीवेष पहावा असें, महादेवा! ।
तरि कामिबहुमता[27] त्या कामोदयकारका[28] पहा देवा[29].' ॥ ८७

---

१. हत्ती. द्विरद=(द्वि+रद=दोन+दांत) ज्याला दोन दांत असतात तो द्विरद (हत्ती) होय. २. नामविशेष (इंद्राचा सारथी). ३. मातलिला. ४. त्या जंभाच्या मस्तकाला. [अ० ११ श्लो० १८.] ५. वज्र हातीं ज्याच्या (तो इंद्र). ६. जंभवधवार्ता नारदानें दैत्यांला सांगितली. ७. त्या जंभाची ज्ञाति. ८. 'नमुचि दानव शुष्क वस्तूच्या किंवा ओल्या पदार्थांच्या योगानें मरणार नाहीं' असा त्याला वर होता. तेव्हां इंद्रानें ध्यान केलें व ओला व कोरडा असा उभयरूप पदार्थ शोधून काढिला, तो पदार्थ पाण्याचा फेंस होय. [अ० ११ श्लो० ३८-३९.] इंद्रानें कोरडा नव्हे व ओलाही नव्हे अशा या फेंसानें नमुचीचें मस्तक हरण केलें. ९. सिंह. १०. मारतात. ११. तापविती. १२. देवाकडे. १३. एकूण-एक, समस्त. १४. अस्ताचलावर गेले. १५. बळीला स्पर्श करून. १६. शुक्राचार्यांचा कर. १७. ब्राह्मणश्रेष्ठ. १८. शुक्र. १९. जिंकणाऱ्यांतें. २०. नाश न पावलीं आंगें ज्यांचीं असे. २१. मृत, गतप्राण. २२. महादेव. २३. उत्तम स्त्रीसह. २४. विष्णूकडे. २५. शरणागतांच्या. २६. मोहिनीवेष. २७. कामुक पुरुषांला फार मान्य. २८. कामाचा उदय करणाऱ्या. [अ० १२ श्लोक १६.] २९. स्मराला, कामदेवाला.

य ज्ञपति असें बोलुनि तत्काळचि गुप्त होय, [1]हर पाहे ।
[2]स्त्री उपवनीं, म्हणे, क्षण वैराग्यादिसुगुणांसि हरपा [3]हे. ॥ ८८
न [4]शिवासंकोच [5]उरे, हृदयीं तैसें [6]स्वभानही न टिके, ।
घटिकेमाजि [7]अनीश्वरसा झाला, गुणहि सत्य ते लटिके. ॥ ८९
मो हुनि धांवोनि गळां त्या स्त्रीच्या [8]**का**मकाळही पडला, ।
[9]जड लागे पाठीला जैसा, दृष्टांतही तसा घडला. ॥ ९०
[10]**भ** वभुजबंधांतूनि [11]प्रभु निसटुनि तो पळावया लागे, ।
शंभु [12]म्हणे, 'भीरु! उभी, पुसतों त्वन्मत कळावयाला गे!' ॥ ९१
ग जराज तसा स्त्रीच्या मागें न गणूनि खेद **हर** लागे, ।
तीस म्हणे, 'तुजचिपुढें माझा [13]मंदिराक्षि! वेद हरला गे!' ॥ ९२
व सुधेवरि [14]वीर्य गळे जेथें जेथें [15]कुमारजनकाचें, ।

---

१. शंकर. २. उपवनीं (वागेंत) स्त्री (मोहिनी) हर (शंकर) पाहे. ३. हे (मोहिनी) वैराग्यादि गुणांस (शंकराच्या वैराग्य इत्यादि गुणांला) म्हणे (म्हणाली):–[अहो गुण हो!] क्षण (क्षणभर) हरपा (नाहींसे व्हा, शंकराला सोडून जा). ४. पार्वतीचा संकोच. ५. शंकराला उमेचा संकोच वाटला नाहीं. ६. देहभान. ७. पराधीनसा, स्वतःविषयीं असमर्थ असा, ईश्वर नव्हे असा. ८. कामाचा शत्रु (शंकर). ९. जैसा (ज्याप्रमाणें) जड (मूर्ख मनुष्य) पाठीला लागे (एखाद्या रूपवती स्त्रीच्या पाठीस लागतो, तिच्या गळां पडतो) तसा (त्याप्रमाणें) दृष्टांतही घडला (प्रत्यक्ष गोष्ट घडून आली). १०. शंकराच्या बाहुपाशांतून. ११. स्त्रीवेषधारी प्रभु (विष्णु). १२. शंभु म्हणे (म्हणाला):–भीरु! (हे भित्रे!) उभी (थांब), पुसतों (विचारतों) त्वन्मत (तुझें मत) कळावयाला (कळण्यासाठीं थांब). १३. मदिरा दृष्टिविशेषस्तद्युक्ते ईक्षणे यस्याः सा तत्संबुद्धौ मदिरेक्षणे इति. 'आघूर्णमानमध्या या क्षामा चांचितलोचना । दृष्टिर्विकासितापांगा मदिरा तरुणे मदे ॥' इति 'हरविजय'टीकायामलकराजानकः, तथा-संगीतकलिकायाम्—'स्निग्धार्धमुकुलीकांता लंभिता मदिरा तथा। पंचैवात्र परिज्ञाताः शौर्यादित्येन दृष्टयः ॥ सौष्ठवेनापरित्यक्ता स्मेरापांगमनोहरा । वेपमानांतरा दृष्टिर्मदिरा परिकीर्तिता॥ इति(१८७९ मितख्रिस्तसंवत्सरमुद्रित–विक्रमोर्वशीय-टिप्पणे ५२ पृष्ठे) शंकर-पांडुरंग-पंडितः. [लघुकाव्यमाला–द्वितीय गुच्छक पृ० ७६.] 'मदिराक्षी' या शब्दाचा सविग्रह अर्थ मल्लिनाथानें रघुवंशांत (सर्ग ८ श्लो० ६८) दिला आहे तो ठीक नसावा असें भासतें. मदिरेक्षणा, मदिरनयना, मदिरलोचना असे शब्द संस्कृत काव्यग्रंथांत वारंवार आढळतात. [मादयंति आभ्यां इति मदिरे ईक्षणे यस्याः सा, तत्संबुद्धिः हे मदिरेक्षणे ! । मदिराभिधं ईक्षणं दृष्टिर्यस्याः तत्संबोधनम् । असे सार्थ विग्रह आढळतात. १४. रेत. १५. कार्तिकस्वामीच्या बापाचें (महादेवाचें).

तेथें तेथें होय क्षेत्र रुप्याचें तसेंच कनकाचें.[1] ॥ ९३

ते ज हराया पाहत होता अरि **का**म[2] तो अवसरा ज्या ।
बहुधा करुनि स्वाश्रितकल्पद्रुम**वि**ष्णुला नवस, राजा[3]! ॥ ९४

वा[4] रिधि नद्या महागिरि आणि वनें उपवनें परम हर्षी[5] ।
ज्यातें चिंतुनि जेथें होते निजभक्त[6] जे परमहर्षी[7] ॥ ९५

सु[8] रमणि फणिमणिकुंडल[9] तेथें[10] त्या **मो**हिनीस अनुसरुन ।
गेला[11], मग उमजे **ह**रिमाया जातां, धरूनि हनु, सरुन. ॥ ९६

दे वांच्या देवाचा जगदात्म्याचा अगाध[12] महिमा तो ।
जाणुनि म्हणे **स**दाशिव, 'नेणुनि सुरतरु अगाधमहि[13] मातो[14].' ॥ ९७

वा[15] माद्यदेव जाणे त्या अपरिज्ञेयवीर्यजलधीतें[16], ।
स्वभ्रम अद्भुत न[17] मनी कधिंहि नुमजता तदन्य मळधीतें. ॥ ९८

य[18] तिपति तो स्वस्थ असें पाहुनि निजपुरुषरूप घेऊन, ।
देऊन **श्री**कंठा दर्शन बोले **मु**कुंद येऊन. ॥ ९९

'**न**[19] गजाकांता! शांता! तूं स्वप्रकृतीस[20] पावलास बरा, ।

---

१. सुवर्णाचें. [अध्याय १२ श्लो० ३३.] २. शंकराचा शत्रु काम शंकराचें तेज हरावयासाठीं अवसर (समय) पहात होता. ३. हे परीक्षित नृपा! ४. सागर. ५. हर्षयुक्त. ६. गीति ९५-९६ यांचें युग्म आहे. ७. मोठमोठे ऋषी. ८. महादेव. ९. सर्पश्रेष्ठ कुंडलें ज्याचीं असा महादेव. १०. वरच्या गीतींत (९५ व्या गीतींत) वर्णिलेल्या ठिकाणीं. ११. वर वर्णिलेल्या ठिकाणीं मोहिनीचें मागून शंकर गेला. मग (नंतर) हनु धरूनि (शंकराचे हनवटीस हात लावून, शंकराचे हनवटीस हात लावून त्याला बोध होऊं दिला अशी) हरिमाया (वैष्णवी माया) सरून जातां (दूर होतांच, मायेनें असला प्रभाव आटोपितांच) उमजे (शंकर उमजला ही सर्व हरिमाया आहे असें शंकरानें जाणिलें). १२. गंभीर. १३. अग+अधम+वृक्षामध्यें नीचही. १४. माजो. सुरतरु (कल्पवृक्षाला) नेणुनि (न जाणून) अगाधम हि (अग+अधम=तरु+नीच, नीच वृक्ष) मातो (माजो, गर्व धारण करो. कल्पवृक्षाची योग्यता न जाणतां एकला वृक्ष खुशाल स्वतःला मोठा असें समजो. जो नीच आहे तो सुरतरुसदृश अशा भगवंताची अगाध लीला न जाणून खुशाल मत्त होवो. जो भगवंताची लीला जाणतो तो उद्धत न होतां नम्रच होईल). १५. वाम+आद्य+देव=वाम शब्द आदी ज्याला असा देव (वामदेव) तो. १६. ईश्वरातें. १७. न गणी, न मानी. १८. विष्णु. १९. हे पार्वतीरमणा! २०. आपल्या मूळ रूपीं स्थिर झालास. [अ० १२ श्लो० ३८.]

त्या काय अश्विनीच्या इतरा धरितील पावला[1] सबरा[2] ? ॥ १००

मो हितहृदय **म**हेशा! केलासि[3] असाहि तूं नि[4]कामहि म्या, ।

कैसा स्वयेंचि सावध झालासि, सुपात्र या निका महिम्या ? ॥ १०१

भ य दाखविल **न** यावरि माझी तुज कविस असुतरा[5] माया[6], ।

मिथ्या ईला[7] समजला बुध जो, भ्रमहेतु न सुत रामा[8] या.' ॥ १०२

गं[9] रुडध्वजसत्कृत **शि**व **कै**लासीं ब्रह्मकथनयज्ञांत ।

'तत्त्व **ह**रि' असें सांगे देवीतें[10] आत्मपथनयज्ञांत. ॥ १०३

---

१. पाउलास. २. गर्भिणी. इतरा (अन्य घोड्या, ज्या गाभण नाहींत त्या घोड्या) त्या अश्विनीच्या (घोडीच्या) पावला (चालण्याच्या चालीला, चालण्याच्या पद्धतीला) त्या सबरा (त्या गाभण घोड्या) धरतील काय ? (धारण करतील काय ?) [गर्भधारणामुळें जड झालेली घोडी दुसऱ्या गाभण नसणाऱ्या घोडीप्रमाणें पाऊल टाकूं शकेल काय ? अर्थात् 'नाहीं' असें या प्रश्नाचें उत्तर आहे]. ३. तूं केलासि–हा प्रयोग स्मरणीय आहे. कर्मणि प्रयोगांत कर्मपद प्रथम किंवा द्वितीय पुरुषीं गद्यांत फारसें येत नाहीं, पण पद्यात्मक ग्रंथांत तशीं उदाहरणें कधीं कधीं आढळतात:.—(१) **वरिलासि** मत्सखीनें, म्यांही वरिलासि तूं मनें मातें. । पापापासुनि रक्षीं या माझ्या चालवूनि नेमातें. ॥, (२) जाउनि तो सूत म्हणे कृष्णे! द्यूतांत **तूं** स्वयें धर्में । **हारविलीस,** सुयोधनसदनाप्रति ये करावया कर्में. ॥, (३) प्रभु तिस म्हणे धुवावया **सोडविलीस (तूं)** यशास । जा, **त्यजिलीस** परकरगता व्हाविस मला कशास. ॥, (४) परमेशा! **तूं** मुनिनीं चित्तीं षडरिक्षयार्थ **धरिलास.** ।, (५) प्रद्युम्न म्हणे **केलों** पूर्वीं ऐसाचि **मी** हरें काय. ४. अत्यंत. ५. तरून जाण्यास कठीण अशी. ६. माझी त्रिगुणात्मक माया तुला मोह घालणार नाहीं. [अ० १२ श्लो० ४०.] ७. इला (या माझ्या मायेला) जो बुध (जो ज्ञानी पुरुष) मिथ्या समजला (खोटीं असें समजला, ज्यानें मायेचा खोटसाळपणा जाणला) या (अशा या ज्ञानी पुरुषाला) रामा (स्त्री) [किंवा] सुत (पुत्र, स्त्रीपुत्रादिक आप्तजन) भ्रम हेतु न (भ्रांतीला कारण नाहींत, त्याला मोहांत घालण्यास समर्थ नाहींत). ८. स्त्री. ९. गरुडध्वजसत्कृत (गरुडध्वजानें–विष्णूनें सत्कार केलेला, विष्णूनें सत्कारिलेला) शिव (शंकर शंकराचा सत्कार विष्णूनें केल्याचें वर्णन गीति १००-१०२ यांत आहे) कैलासीं (कैलास नामक स्वक्रीडापर्वतावर, .कैलास येथें आल्यावर) ब्रह्मकथनयज्ञांत (ब्रह्मोपदेशरूप यज्ञांत, ब्रह्मोपदेश करीत असतां) आत्मपथनयज्ञांत (आत्मपथ आणि नय जाणणाऱ्यांमध्यें, आत्मज्ञानमार्ग आणि नीति जाणणाऱ्या मुनिसमुदायांत, आत्मज्ञ आणि नीतिज्ञ अशा मुनिजनांच्या समक्ष) देवीतें (पार्वतीला) 'तत्त्व हरि' असें सांगे (भगवान् विष्णुच श्रेष्ठ तत्त्व आहे असें कथन करी). [अध्याय १२ श्लोक ४१-४४ पहा. प्रभुसत्कृत शंकरानें मायेचा जो चमत्कार पाहिला तो प्रेमानें भवानीला सांगितला आणि विष्णु हाच पुराण पुरुष होय असें निवेदन केलें]. १०. भवानीतें.

[1]वं तंत असे **[2]वि**वस्वत्सुत नामें **श्राद्ध**देव [3]सप्तम हा, ।
अवतार [4]यांत **वामन**, निववि यशें [5]श्रोतृजीव तप्त महा. ॥ १०४

ते कीर्तिकथा प्रभुची ऐसी [6]**भा**र्गव मुनींद्र तो [7]**ब**ळिला ।
तेज तपःसामर्थ्यें अद्भुत दे, [8]पद्म रस जसा अळिला. ॥ १०५

वा ढविलें बळ [9]**क**विनें **ब**ळिचें, [10]अनिळें जसेंचि अनळाचें, ।
कीं सुरस वाहणें तें [11]गुरुजलदाधीन [12]शिष्यपनळाचें. ॥ १०६

सु ज्ञ मुनीश्वर **भा**र्गव ते करवुनि [13]विश्वजिन्मख छळिला ।
[14]**श**क्रें, तत्पद ध्याया गुरु करिति [15]महाभिषेक त्या **ब**ळिला. ॥ १०७

दे वेंद्राच्या वेढी [16]**अ**मरावत्याख्य राजधानीतें, ।
[17]गुरु [18]हरिस [19]म्हणे, '**ब**ळिच्या न करिल कोणी प्रतापहानीतें. ॥ १०८

वा ढविला ज्या गुरुंनीं, त्यांचा जेव्हां करील अपमान, ।
तेव्हां बुडेल, **ब**ळिला तूं यातें मूर्त **शु**क्रतप मान. ॥ १०९

य ज्ञपतिप्रभुवांचुनि याचें कोणा न तेज आटावें, ।
सोडावें [20]स्वपद, [21]तुला संप्रति हित सत्य हेंचि वाटावें.' ॥ ११०

[22]न गभेत्ता [23]गुरुवचनें त्यजुनि श्रीसह [24]पुरीस, 'चोरा! हे ।
घे' म्हणुनि जाय, सुरसह योगबळें गुप्त होय तो राहे. ॥ १११

मो ठा तेजस्वी **ब**ळि [25]समधिष्ठुनि [26]सुरपुर, प्रतापानें ।

---

१. चालू आहे. [शुक्राचार्य परीक्षित् राजाला म्हणतो.] २. विवस्वत्+सुत=सूर्यपुत्र. ३. हा सातवा मनु होय. ४. या मन्वंतरांत भगवंतानें कश्यपापासून अदितीच्या उदरीं (वामनरूपधारी) अवतार घेतला. [अ० १३ श्लो० ६.] ५. श्रवण करणाऱ्यांचे प्राण. ६. भृगुकुलोत्पन्न शुक्राचार्य. ७. विरोचनपुत्राला. ८. पद्म (कमळ) जसा रस अळिला (भ्रमराला) [दे]. ९. शुक्रानें. १०. अनिळें (वायूनें) जसेंचि (ज्याप्रमाणें) अनळाचें (अग्नीचें) [वाढवावें]-असा अन्वयार्थ. यांत **उपमा** अलंकार आहे. ११. गुरुरूप जो मेघ त्याच्या स्वाधीन. १२. शिष्यरूप पन्हळाचें. यांत **रूपक** अलंकार आहे. १३. विश्वजित्+मख=विश्वजित् नामक यज्ञ. [अ० १५ श्लो० ४.] १४. शक्रें (इंद्रानें) छळिला (बळी ठकविला) तत्पद (त्या इंद्राचें पद, इंद्राचा अधिकार) ध्याया (काढून घेण्यासाठीं, इंद्रास पदभ्रष्ट करण्यासाठीं) गुरु त्या बळिला महाभिषेक करिति—असा अन्वयार्थ. १५. ऐंद्रमहाभिषेक. १६. अमरावति+आख्य+राजधानी=अमरावती नामक राजधानीतें. [अ० १५ श्लो० १०.] १७. बृहस्पति. १८. इंद्रास. १९. अध्याय १५ श्लो० २८-३१ पहा. २०. स्वर्गपद. २१. इंद्राला. २२. पर्वत फोडणारा (इंद्र). २३. बृहस्पतीच्या भाषणानें. २४. अमरावतीला. २५. वसवून, राहून. २६. देवनगरी.

वश करि जगत्रयातें, कविवृंदातेंहि [1]कीर्तिचापानें. ॥ ११२

भ क्ता बळिकरवीं शत [2]हेयमख **भा**र्गव मुनींद्र करवीती, ।
त्याची, प्रऱ्हादाची जैसी तैसीच, रीति बरवी ती. ॥ ११३

ग जबजली **अ**दिति सुतस्नेहें आलीं सुखें परां जितकीं ।
दुःखें त्यांला झालीं, नच दाखविती मुखें [4]पराजित कीं. ॥ ११४

व र मागे [5]पतिला [6]ती व्हाया [7]स्वपदस्थ **श**क्र सुरसहित, ।
कश्यप कथी, '[8]पयोव्रत, **वि**ष्णुभजन जें न वक्र सुरस हित.' ॥ ११५

ते **अ**दिति निववि‍ली [10]व्रतराजें, [11]जे सिद्धि कोटि नवसांनीं ।
अतिदुर्घटा घडविली, कीं भेटविलाचि **वि**ष्णु [12]अवसानीं. ॥ ११६

[13]**वा** रिजनेत्र [14]म्हणे, 'मी येतों चिंता हरावया पोटा, ।
प्रेमा जसा तुझा मजवरि माझाही तसा असे मोटा.' ॥ ११७

सु त होय [15]तिचा [16]वामन [17]वाम नवा मन हरावया महिमा ।

---

१. कीर्तिरूप धनुष्यानें. २. अश्वमेध. [अ० १५ श्लो० ३४.] ३. अदिति (देवमाता) सुतस्नेहें (मुलांच्या प्रेमानें, मुलांच्या कळवळयानें, देवांचा कळवळा येऊन) गजबजली (फार दुःखी झाली, गजबजून गेली, गोंधळली). परां (शत्रूंला, देवशत्रूंला) जितकीं सुखें आलीं [तितकीं तींच] त्यांला (देवांला, स्वसुतांला) दुःखें झालीं (दुःखरूप झालीं), कीं (कारण) पराजित (पराजय पावलेले इंद्रादिक देव) मुखें नच दाखविती (तोंड दुसऱ्यास दाखविण्यास लाजले, लज्जित झाले). ४. पराभव पावलेले. ५. कश्यपाला. ६. अदिति. (देवांची माता.) ७. स्वर्गाधिष्ठित इंद्रपदस्थ. ८. पयोव्रत=फाल्गुन महिन्याच्या शुक्लपक्षांत हें पयोव्रत पाळून बारा दिवस कमलनयन परमेश्वराची दुधानें स्नान घालून पूजा करावी व मनुष्यानें स्वतःही दुग्धपान करून असावें व ब्राह्मणास भोजन घालावें. [अ० १६ श्लो० ४०-५७.] ९. गोड, मधुर. १०. श्रेष्ठव्रतानें, पयोव्रतानें. ११. जे सिद्धि (इष्टार्थप्राप्ति) कोटि नवसांनीं (अनेक नवसांनीं) अतिदुर्घटा (घडून येण्यास फार कठिण) [ते] घडविली (घडवून आणिली, अदितीचा मनोरथ सफळ केला). १२. अंतीं, अखेरीस. १३. कमललोचन (विष्णु). १४. अध्याय १७ श्लो० ११-२० यांत भगवंताचें भाषण आहे. १५. तिचा (त्या अदितीचा) वामन (वामनरूप विष्णु) सुत होय (वामन अदितीचा पुत्र झाला). [आणि] मन हरावया (लोकांचें मन थक्क करण्यासाठीं, लोकांचें मन रंजविण्यासाठीं) वाम (सुंदर, चित्ताभिराम) नवा (नूतन, अपूर्वदृष्ट असा) महिमा (मोठेपणा, पराक्रम) प्रकटी (दाखवी). ज्याच्या (ज्या प्रभूच्या, ज्या वामनाच्या) कीर्तिसमा (कीर्तिसारखी, कीर्तिसारखी गोड आणि त्रिविधतापनाशक अशी) सुधा (अमृतही) मधुरा (गोड) न (नाहीं), वा (किंवा) मा हि न (लक्ष्मी देखील नाहीं.) १६. खुजा. १७. सुंदर.

प्रकटी, मधुरा ज्याच्या सत्कीर्तिसमा न वा सुधा न हि [1]मा. ॥ ११८

[2]**दे**व बळिकडे गेला **मायावामन** सुरम्यमूर्ति बटु ।
[3]पटु वक्ता मधुर असें बोले कीं ज्या पुढें सुधाहि कटु. ॥ ११९

[4]**वा**डववेषें भेटे होतां हयमेध शेवटिल **ब**ळिला, ।
बहुमान याचका त्या [5]वैरोचन, पद्म दे जसा [6]अळिला. ॥ १२०

यज्ञांत सुपात्र दिलें [7]ज्या प्रत्युत्थान अग्नींनीं येतां, ।
पूजुनि **ब**ळि काम पुसे हर्षें, [8]यत्तात आयुही देता. ॥ १२१

नवल करी, [9]प्रभु मागे [10]स्वपदत्रयपरिमिता [11]मही मात्र, ।
बळि हसुनि म्हणे, 'बहु घे, तूं न स्वल्पा [12]परिग्रहा पात्र.' ॥ १२२

मोक्षप्रद देव म्हणे, 'इतुक्याचि परिग्रहें [13]कृतार्थ असें.' ।
बळिराज 'अवश्य' [14]म्हणे 'घे, देतों तुज, बटो! [15]रुचेल तसें.' ॥ १२३

भगवन्मत त्यजुनि, [16]गुरु **ब**ळिस म्हणे, 'रे! न विप्र हा, **ह**रि तो ।
लोकत्रयहि [17]पदत्रयकपटें म्हणवावयासि '[18]हा!' [19]हरितो.' ॥ १२४

[20]**गं** रकटु गुरुवच लागे, दानोत्साहांत घालितां मोडा, ।
[21]**ब**ळि **क**विस म्हणे, '**ह**रि हा तरि, '[22]हां!' कां? या यशा नसे जोडा. १२५

---

१. मा=लक्ष्मी. अन्वयार्थः-ज्याच्या कीर्तीशीं तुल्य अमृत किंवा लक्ष्मी देखील नाहीं. २. मोरोपंत-अवतारमाला-गीति ८०-८४ पहा. ३. **व्य**तिरेकालंकार. ४. ब्राह्मणवेषें. ५. यांत **उपमा** अलंकार आहे. **पं**तांच्या आर्यांचीं उत्तरार्धें बहुधा उपमोत्प्रेक्षारूपकादि अलंकारांनीं मंडित असतात हें चतुर वाचकांच्या लक्षांत येऊन चुकलें असेल. ६. भ्रमराला. गीति १०५ पहा. ७. ज्या (वामनाला) यज्ञमंडपांत शिरतांच अग्नींनीं प्रत्युत्थान दिलें (अग्नि कुंडांतून उठून उभे राहिले व आदर करिते झाले). ८. यत्+तात=ज्याचा पिता. (विरोचन.) ९. बटु वामन. १०. आपल्या तीन पावलांइतकी. पुढील श्लोकांत ही गोष्ट सुरस वर्णिली आहेः-'कस्त्वं ब्रह्मन्नपूर्वः क च तव वसतिर्याखिला ब्रह्मसृष्टिः कस्ते नाथो ह्यनाथः क च तव जनको नैव तातं स्मरामि । किं तेऽभीष्टं ददामि त्रिपदपरिमिता भूमिरल्पं किमेतत्त्रैलोक्यं भावगर्भं बलिमिदमवदद्वामनो वः स पायात् ॥' [सुभाषितरत्नभांडागारम्-श्लो० ५६ पृ० ३०.] ११. पृथ्वी मात्र. [अ० १९ श्लो० १६.] १२. दानाच्या स्वीकाराला. १३. सुखी, सफलेच्छ. १४. या प्रसंगाचें चित्ताकर्षक वर्णन **क्षे**मेंद्रविरचित '**दशावतारचरित**' नामक काव्यांत आहे तें अवश्य पहावें. [दशावतारचरित-श्लो० १८९-२२३, पृ० ४०-४३-काव्यमाला २६.] १५. अध्याय १९ श्लो० २८ पहा. १६. शुक्राचार्य. १७. पदत्रयाच्या कपटानें, तीन पाद भूमीच्या निमित्तानें. १८. हाय. १९. हरण करतो. २०. विषासारखें कटु. २१. बळि कविस (शुक्राचार्यांस) म्हणे (बळि दैत्य शुक्राचार्यांस (म्हणतो):-हा हरि तरि (हा वामनरूपी बटुवेषधारी विष्णुच असेल तर) या

[1]ब ळि '[2]न' म्हणेल कसा? हो! आला होऊनि विप्र [3]याचाया ।
हरि हो, अरि हो, [4]गुरुजी! मी कामा पुरवितोंचि [5]याचा [6]या.' ॥ १२६
ते व्हां गुरु अपमानें क्षोभे, 'निःश्रीक हो'[7] असें शापी, ।
तरि बळि [8]सत्त्वें जोडी कीर्ति, हरी ताप, जी [9]सुधावापी. ॥ १२७
वा मनविभुच्या घाली भूदानाचें [10]सुपाणिवरि [11]पाणी, ।
वाटे त्रिविक्रम, क्षण मात्र न होतांचि, होय [12]अरिपाणी. ॥ १२८
सु ख झालें बहु, बहुधा दुर्लभ [13]सुवदान्य भेटतां फुगला, ।
[14]सात्त्विक भाव प्रकटे, [15]समयीं राहेल तो कसा उगला? ॥ १२९
दे व [16]पदयुगें सर्व व्यापुनि, मागे पदा भरून तिज्या, ।

यशा जोडा नसे (या आमुच्या भाग्यास उपमा नाहीं, मी मोठाच भाग्यशाली होय, माझें यश अनुपमेय होय) [मग] 'हा!' कां? (मग हायहाय कशास्तव? मग दुःख करण्याचें कारण काय? आपणास यांत खेदास कारण नाहीं–असा अन्वयार्थ.) २२. 'हा!' हें खेदार्थक अव्यय.

१. हें बळीचेंच भाषण स्वतःला उद्देशून तृतीय पुरुषीं आहे. यांत बळिराजानें याचकाला विमुख परत धाडावयाचा नाहीं असा आपला कृतसंकल्प आणि मनाचा पूर्ण निर्धार दर्शविला आहे. बळिराजासारखी औदार्यबुद्धि, याचककामपरिपूर्तिदक्षता, आणि अर्थिजनादरबुद्धि अत्यंत विरळ होत. अशीं उदाहरणें इतर प्राचीन देशांच्या पुराणेतिहासांत सांपडण्याची मारामारच दिसते. बळिराजाच्या उदात्त वर्तनाची स्तुति करावी तेवढी थोडीच आहे. 'हरि हो, अरि हो, गुरुजी!' इत्यादि उक्ति केवळ उदार-प्रकृति पुरुषाच्याच मुखांतून बाहेर पडणारी आहे. बळीचें सदुदाहरण हें उत्तम नीति-बोधानें भरलेलें आहे. भीष्म, बळी, कर्ण अशा उदात्तधी जनांचीं रसाळ चरित्रें आमच्या शाळांतील मुलांस वाचावयास अवश्य मिळालीं पाहिजेत. अशा नीतिबोधामृताचें आ-कंठ पान झालें असतां सुपरिणाम कां होणार नाहीं? २. नकार. प्रथमतः 'देतों' असें म्हटल्यावर आतां 'नाहीं' असें हा बळिराज कसें म्हणेल? याच्या मुखांतून नकाराचा उच्चार कसा होईल? [अ० २० श्लो० ३-५.] ३. मागाया, प्रार्थाया. ४. गुरुजी! [हा विप्र] हरि (विष्णु) हो (असो, किंवा) अरि (शत्रु) हो (असो). ५. या विप्राच्या. ६. या त्रिपादमितभूमिकामाला. ७. लक्ष्मीहीन हो, तुझी लक्ष्मी नष्ट होवो. [अ०२० श्लो० १५.] ८. धर्माचरणानें, सुकृतप्रभावानें, अभंगनीतिबळानें. ९. अमृताची तळी. १०. उत्तम हातांवर. ११. उदक. १२. चक्रपाणि. अरि (चक्र) पाणि (पाणीच्या ठायीं) ज्याच्या तो अरिपाणी. १३. उत्तम दाता. १४. सात्त्विक भाव म्हणजे स्तंभ, स्वेद, रोमांच, अश्रुपात, वेपथु इत्यादि विकार होय. [रसप्रबोध–पृ० ७-९.] १५. समयीं (योग्य प्रसंगीं) तो (सात्त्विक भाव) उगला (अप्रकट, अव्यक्त, अप्रकाशित) कसा राहेल? (कसा असेल? अर्थात् अप्रकट राहणार नाहीं. १६. दोन पदांनीं.

स्वशिर **ब**ळि करि पुढें त्या, भावें आम्हीं तुम्हीं करूं नति[१] ज्या. ॥ १३०

वा खाणी प्रभु **ब**ळिला, 'छळिला तरि सत्त्वसत्पदीं टिकला, ।
शिकला[२] आजापासीं[३], द्वारप **ह**रि तरिच तो जसा विकला. ॥ १३१

यँ[४] ज्ञ गुरुसि निरवुनियां, दे स्वयशोरूप सेवका सेला, ।
सुँतळीं[५] स्थापी, लावी आपुलिया त्यासि देव कासेला[६]. ॥ १३२

नँ[७] रपति पुसे, **शु**क तया सांगे मत्स्यावतारचरितातें[८], ।
मागिल निद्रांप्रलयीं[१०] झाला जँगदीश[११] रूप धरिता तें. ॥ १३३

मो[१२] हुनि **वि**धितें, दानवराज **ह**यग्रीव दे महाखेद, ।
कीं तो **वि**धिवदनांतुनि बाहिर निघतांचि हरुनि ने वेदें[१३]. ॥ १३४

भ गवान् **ह**रि तें दाँनवचेष्टित[१४] जाणोनि होय मीन[१५]; मुनी ।
सप्त, नृपति **स**त्यव्रत, यां तारी, कथिन हेंचि मी नमुनी. ॥ १३५

गँ[१६] रुडध्वजभक्त नृपति सँत्यव्रत[१७] बहुविरक्त, यश गाता, ।
या कल्पाच्या पूर्वीं जो, तोचि **श्रा**द्धदेव **म**नु आतां. ॥ १३६

वँ[१८] सुधापति तो तर्पण कृँतमालेच्या[१९] जलें करी, मीनें[२०] ।

---

१. नमस्कार. २. आजापाशीं शिकला (बळी प्रऱ्हादापाशीं शिकला, प्रऱ्हादानें बळीला सुशिक्षित केलें) तरिच (यास्तव, या शिक्षणास्तव) द्वारप (बळीचा द्वारपाळ) हरि (विष्णु) तो जसा विकला (जसें काय बळीनें विष्णूला खरेदी केलें, जसें काय देवानें आपल्याला बळीला विकून टाकलें). ३. प्रऱ्हादापाशीं. ४. बळिराजानें आरंभिलेला यज्ञ गुरुसि (शुक्राचार्याला) निरवुनियां (पूर्ण करण्यास सांगून, यज्ञानुष्ठान परिपूर्ण करावें असें शुक्राचार्याला सांगून), देव (वामन) सेवका (बळिभक्ताला) स्वयशोरूप सेला दे (देता झाला), [व] सुतळीं (पाताळांत) स्थापी (त्या बळीला राहण्यास आज्ञापी), त्यासि (त्या दैत्यराजाला) आपुलिया कासेला लावी–असा अन्वयार्थ. ५. अध्याय २२ श्लो० ३०-३२ पहा. ६. कासेला लावणें=आश्रयास लावणें, आश्रयास ठेवणें. ७. परीक्षित् राजा. ८. मत्स्यावतारलीला विचारी. [अ० २४ श्लो० १-३.] ९. विष्णूनें मत्स्याचें रूप घेऊन केलेल्या चरिताला.[मोरोपंत–अवतारमाला–गीति५९-६४.]१०. मागील कल्पाच्या शेवटीं ब्रह्मदेव निद्रा घेऊं लागला तेव्हां प्रलय झाला, ब्रह्मदेवाच्या मुखांतून वेद गळून पडले इत्यादि प्रलयसमयीं. ११. विष्णु मत्स्याचें रूप घेता झाला. [अ०२४ श्लो० ९.] १२. मोह घालून, भुलवून. १३. हयग्रीवानें वेदांचें हरण केलें. १४. वेदहरणरूप दैत्याचरण. १५. मासा. १६. विष्णुभक्त. १७. सत्यव्रत हा एक नारायणभक्त महान् राजर्षि होता. हा चालू कल्पांत विवस्वानाचा श्राद्धदेव नामक पुत्र होय. १८. भूपति (सत्यव्रत) द्रविडदेशाधिपति. १९. नदीविशेष, तिच्या. २०. एक मासा (शफरी) त्याच्या ओंजळींतील पाण्यांत आला.

ये अंजळींत, टाकी[1], नेणें, प्रभुही म्हणे, 'हरी मी न.' ॥ १३७
ते व्हां तो मीन म्हणे[2], 'खातिल मज, मजपरीस जे मोटे, ।
भ्यालों ज्ञातीपासुनि, भक्षिति तत्काळ लघुसि हे खोटे.' ॥ १३८
वा टे सत्य, दया ये, घे, स्वकमंडलुजलीं नृप स्थापी, ।
[3]कलशावकाश एका दिवशीं वाढोनि मीन तो व्यापी. ॥ १३९
सु खहेतु विपुल वसतिस्थान कमंडलुपरीस तो याची[4], ।
[5]मणिकीं स्थापी नृप कीं अवकाशाची समृद्धि तोयांची[6]. ॥ १४०
दे व [7]करत्रय वाढे एकमुहूर्तें म्हणे, 'नको मणिक, ।
[8]प्रांजल जळस्थळ असें योजीं, सत्कृपा नृपा! मला अणिक.' ॥ १४१
वा[9] रिचरातें तो [10]नृपसत्तम नेउनि सरोवरीं सोडी, ।
व्यापूनि म्हणे, 'बा! गा! जागा याही सरोवरीं थोडी.' ॥ १४२
य तें सोडी त्यातें **स**त्यव्रतभूप [11]अर्णवामाजी, ।
[12]हरिलीला बहु भुलवी, ती न धरि सुवर्णवर्ण [13]वामा जी. ॥ १४३
न रपतिस म्हणे मीन, 'ग्रासितिल मला पळांत हे मकर ।

---

१. राजा त्याला नदीप्रवाहांत टाकूं लागला. [राजा] नेणें (हा मत्स्य भगवंताचा अवतार आहे, हा हरि आहे असें राजाला कळलें नाहीं) 'हरी मी न' [असें] प्रभुही म्हणे (मी ईश्वर नव्हे, असें विष्णुही म्हणाला, मत्स्यानें राजापाशीं भाषण केलें कीं मी स्वरक्षण करण्यास समर्थ नाहीं.) २. अ० २४ श्लो० १३-१४ पहा. ३. कलश+अवकाश=घागरीसंबंधी अवकाश (पोकळी). ४. याची=मागे, प्रार्थी, पाहिजे असें म्हणे. ५. मडक्यांत. ६. उदकाची. ७. तीन हात. ८. निर्मल आणि संकोचरहित. ९. मत्स्यातें. १०. राजांमध्यें अत्यंत चांगला असा. ११. सागरामध्यें. [अर्णव=सागर. अर्णांसि (जलानि) अत्र संति स अर्णवः, ज्यांत जलें असतात तो अर्णव.] १२. ती हरिलीला बहु भुलवी (हरीची लीला अगम्य आणि अमृताहून ही गोड म्हणून ती जनाला मोहित करते). जी (लीला) सुवर्ण वर्ण [किंवा] वाम [वर्ण] न धरि=ती प्रभुलीला श्रेष्ठ वर्ण किंवा कनिष्ठ वर्ण अशा भेदाला मानीत नाहीं. श्रेष्ठ वर्णाचा असो अथवा कनिष्ठ वर्णाचा असो असा भेद न धरतां हरिलीला सर्व जीवाला मोहित करते). [तूं लीलेनें जे जे अवतार घेतोस ते सर्व प्राण्यांच्या हितास कारण होतात असें वर्णन मूळांत आहे. अ० २४ श्लो० २९.] मत्स्यावताराची समग्र कथा भागवत–स्कंध ८ अध्याय २४ यांत पहावी. १३. या स्कंधांतील कित्येक गीतींवरून पंतांची भगवद्भक्ति सुव्यक्त होते. पंत हे केवळ कविच होते असें नाहीं तर ते परमेश्वराचे प्रेमळ भक्त होते.

[1]तस्करसे, [2]अर्णव हा वनसा, [3]मी जेंवि पांथ [4]हेमकर.' ॥ १४४
मो हीं पडुनि नृप म्हणे, 'वद सत्कृपा [5]मीनसत्तमा! साच, ।
तूं भगवान् हरि तेजें, नव्हसी सामान्य मत्त मासाच. ॥ १४५
भ गवान् कसा नव्हसि तूं एक दिनीं वाढलासि [6]शत गावें ।
न तगावें तम [7]दासीं [8]त्वद्यश होउनि तुलाचि [9]नत, गावें.' ॥ १४६
ग रुडरथ म्हणे, 'राजा! वतदों मी तें बरें मनीं आण, ।
होणार आजपासुनि सप्तमदिवसीं [10]दिनप्रलय जाण. ॥ १४७
ब स नावेंत, तुजकडे धाडिन मी बसिव सप्तहि महर्षी, ।
मद्भक्त मला जैसा होतो पावोनि [11]तप्त [12]हिम [13]हर्षी. ॥ १४८
ते ऋषि [14]तम हरितिल घे बहु बीजांसह [15]सदोषधी [16]नाव, ।
तारिन मी जों [17]रजनी, [18]माजें जप तूं [19]अदोषधी नांव. ॥ १४९
वा रा सुटेल येइन, तूं माझ्या नाव बांध [20]शृंगासी, ।
मजसीं तुजसीं संगति, पुष्पासीं आणि जेंवि भृंगासी. ॥ १५०
[21]**सु** रसा सद्धर्मकथा तुज सुखवायासि आयकविन [22]मुनी, ।
[23]म्हणतील सुकृतसुरभी गुणवेत्ते ज्यांसि काय कवि नमुनी.' ॥ १५१
दे व असें सांगुनियां झाला तत्काळ गुप्त मग, राया! ।
तें सत्य करुनि दावी भक्त [24]मत [25]महाविभूतिनगरा या. ॥ १५२

---

१. चोरासारखे. २. हा अर्णव (सागर) वनसा (अरण्याप्रमाणें) आहे. ३. मी (मीन) हेमकर पांथ (वाटसरू, पथिक) जेंवि (जसा तसा आहें). ४. हेम (सुवर्ण) करीं (हातीं) ज्याच्या असा. ५. हे श्रेष्ठ मीना! ६. शत योजनें. ७. दासीं (तुझ्या दासाच्या–सेवकाच्या ठायीं) तम (अज्ञान) न तगावें (न रहावें, नष्ट व्हावें). ८. असा तुझा महिमा. ९. शरणागत. १०. कल्पांत, त्रैलोक्यप्रलय. ११. तापलेला (पुरुष). १२. थंडी, बर्फ. १३. हर्षयुक्त. १४. अंधकार. १५. सत्+ओषधि–उत्तम औषधि. १६. नौका. १७. ब्रह्मदेवाची रात्र असेल तोंपर्यंत मी ती नौका समुद्रांत ओढीत फिरेन, बुडूं देणार नाहीं. १८. माझें. १९. नाहीं दोषयुक्त बुद्धि ज्याची असा. २०. अध्याय २४ श्लोक ३६ पहा. २१. मधुर, रसाळ. २२. मुनि सुखवायासि तुज धर्मकथा ऐकविन. २३. 'ज्यांसि गुणवेत्ते कवि काय नमुनी सुकृतसुरभी म्हणतील, असा अन्वय.=ज्या सद्धर्मकथांपुढें गुणज्ञ असे कवि शरीराला नमून (झुकवून) सुकृतसुरभी असें म्हणतिल म्हणजे चांगल्या पुण्याईनें लाभणाऱ्या अशा कामधेनूच कीं काय असें म्हणतील. २४. बहुमान्य. २५. महाविभूतिनगरा (मोठ्या समृद्धीचा आकर) या (विष्णूला) मत (मान्य) [असा] भक्त (सत्यव्रत भूप) तें (देवोक्त) सत्य करुनि दावी–असा अन्वयार्थ करावा. भक्त (सत्यव्रत) [जें] या

वा रिधिमध्यें निज [1]गुंज कथिलें **सत्यव्रतास**; मीनवरा ।
नमुनि, सुधन तें जोडिल जो, तो मुक्तिस म्हणेल 'मी नवरा.' ॥ १९३
य दुपतिच्या चरणाब्जीं वाहियला स्कंध लेश अष्टम हा, ।
अल्पहि बहुफळ होतें [3]कृष्णार्पित चुकवितेंचि कष्ट महा. ॥ १९४

नवम स्कंध.

[4]**न** रपति [5]मनुवंश पुसे, **शुक** सांगे, '[6]पुरुषनाभिपद्मांत ।
[7]विधि झाला; [8]ज्याच्या [9]श्रुतिहरिमूर्तिनिवास हृदयसद्मांत. ॥ १
[10]**मो** हतमोर्क **म**रीचि प्रभु मानसपुत्र होय तो [11]**वि**धिला; ।
तो सुत [12]**क**श्यप मुनिवरपुत्र, **वि**[13]वस्वान् [14]तया तपोनिधिला. ॥ २
भ गवान् सूर्य प्रसवे [15]**म**नु नामें [16]**श्रा**द्धदेव तो, [17]यांचे ।
दश पुत्र, तत्कुलाचें भूषण, [18]सत्पद्म तेंवि तोयाचें. ॥ ३
[19]**ग** णनीयगुण [20]प्रथमज **इक्ष्वाकु**, तसाचि पुत्र **नृ**ग, तिसरा ।

महाविभूतिनगरा (विष्णूला) मत (मान्य) तें (उक्त) सत्य करुनि दावी–असाही अन्वयार्थ करावा.

१. अवतार कशाकरितां घेतला ही गुप्त गोष्ट सत्यव्रताला (द्रविडदेशाच्या राजाला) [विष्णूनें] समुद्रामध्यें सांगितली; [या] मीनवरा (विष्णूच्या मत्स्यावताराला) नमस्कार करून जो [पुरुष] हें सुधन जोडिल (हा इतिहास श्रवण करील) तो मुक्तिस हस्तगत करील. २. तत्त्वज्ञान. ३. कृष्णाला समर्पण केलेली वस्तु लहान जरी असेल तरी पुष्कळ फळ देते आणि मोठमोठीं संकटें चुकविते. ४. नरपति–परीक्षित् राजा. ५. मनूच्या वंशाची कथा, मनुवंशांतील पुरुषांची चरित्रकथा. ६. पुरुष+नाभि+पद्मांत (कमलांत)=परमपुरुष जो नारायण त्याच्या नाभिकमलामध्यें. ७. ब्रह्मदेव. [अ० १ श्लो० ९.] ८. ज्याच्या हृदयसद्मांत (हृदयगृहांत) श्रुतिहरिमूर्तिनिवास (वेद आणि हरिमूर्ति यांची वसति) [असे]–असा अन्वय. ९. वेद आणि हरिमूर्ति यांचा निवास. १०. मोहरूप अंधकाराचा नाश करणारा. (अर्क=सूर्य.) ११. विधीच्या मनापासून मरीचि हा पुत्र झाला. १२. कश्यप हा मरीचिपुत्र होय. १३. कश्यप+अदिति यांचा पुत्र विवस्वान् [अ० १ श्लो० १०]=सूर्य. १४. त्या कश्यप ऋषीला. १५. श्राद्धदेव नांवाचा मनु. १६. सूर्य+संज्ञा यांचा पुत्र श्राद्धदेव. १७. श्राद्धदेव मनूचे. श्राद्धदेव+श्रद्धा यांस इक्ष्वाकु, नृग, शर्याति, दिष्ट, धृष्ट, करूषक, नरिष्यंत, पृषध्र, नभग आणि कवि–असे दहा पुत्र झाले. १८. चांगलें सुवासिक कमल. ज्याप्रमाणें सुवासिक कमलानें कासाराला (तलावाला) शोभा येते. १९. वर्णनीय आहेत गुण ज्याचे असा. २०. अग्रज, पहिला.

शर्याति, दिष्ट, धृष्टहि ज्याचे गुण म्हणति '[1]अन्यगुण विसरा.' ॥ ४

व र्ण्य करूषक [2]सावा पुत्र, नरिष्यंत सातवा, राया! । ५
आणि पृषध्र, नभग, कवि, [3]अतिपटु जे आत्मघात वाराया. ॥

[4]ते हे नव्हते, तेव्हां [5]पुत्रार्थ वसिष्ठ [6]इष्टि करि उक्ता, । ६
[7]मनुची पत्नी [8]श्रद्धा तीच्या हृदया गमे [9]सुता युक्ता. ॥

[10]बां ळासी कळवी निजकन्यावांछा हळूच [11]होत्यातें, । ७
आहुति देतां हृदयीं आठवलें मानलेंहि हो! [12]त्यातें. ॥

सु त व्हावा तें चुकलें, श्रद्धेनें जाहली नृपा [13]कन्या, । ८
मनु [14]गुरुसि [15]बोल लावी, बीज वसिष्ठा कळे, न तें अन्या. ॥

[16]दे वप्रभुतें प्रार्थुनि करि पुरुष वसिष्ठ जी [17]इला दुहिता, । ९
[18]सुरभी हरिची सेना पावे साराहि रस इला [19]दुहितां. ॥

[20]वां हीं चढोनि मनुचा सुद्युम्न कुमार तो [21]वनीं गेला, । १०
तेणें मृगया करितां [22]मेरूपवनीं प्रवेश बा! केला. ॥

[23]यँ मसोदरसुत तेथें [24]स्त्रीपण शिरतांचि [25]सानुचर पावे, । ११
तैसी कुदशा येतां, 'हा!' म्हणतां कां न ओष्ठ करपावे? ॥

---

१. दुसऱ्याचे गुण. या चतुर्थ पादांत ह्याचे गुण अलौकिक होते व हा अद्वितीय होता असें कवीनें वर्णन केलें. २. सहावा. ३. परमदक्ष. ४. हे इक्ष्वाकुप्रभृति पुत्र होण्याचे पूर्वीं. श्राद्धदेव मनूला संतति नव्हती तेव्हां. ५. प्रजार्थ. ६. मित्रावरुणांची इष्टि. ७. श्राद्धदेव मनूची. ८. पतीनें केलेल्या यज्ञाच्या फलाची वांटेकरीण स्त्री. ९. कन्या, मुलगी. १०. मुलीप्रमाणें. ११. हवनकर्त्यातें. होता=षोडश ऋत्विजांपैकीं एक. १२. त्या होत्यातें. १३. इला नामक कन्या. [अ० १ श्लो० १६.] १४. वसिष्ठास. १५. दोष लावी. 'बोल' आणि 'शब्द' ह्यांचा 'दोष' या अर्थीं उपयोग करतात. १६. आदिपुरुषातें. १७. ही इलानामक कन्या नारायणाच्या वरानें पुरुषत्व पावून सुद्युम्न नांव पावली. [अ० १ श्लो० २०.] १८. इला (इजला) दुहितां (दोहन करून) [या मनूची] सेना (सकल लोक) सर्व रसांतें पावे; जणूं काय ही (इला) हरिची सुरभीच. १९. दोहन केलें असतां. २०. अश्वीं, घोड्यावर. वाह=घोडा. ['वाहोऽश्वभुजयोः पुमान्' इति दामोदरः 'वाजिवाहार्वगंधर्वहयसैंधव सप्तयः' इत्यमरः.] २१. पार्वतीशकेलीकाननांत. २२. मेरु+उपवनीं=मेरुपर्वताचे खालच्या प्रदेशांत. २३. मनुपुत्र सुद्युम्न. यमाचा सोदर (भाऊ) जो मनु त्याचा मुलगा सुद्युम्न. २४. जो कोणी या वनांत प्रवेश करील तो स्त्रीत्व पावेल, असा या वनाला शंकराचा शाप होता. [अ०१ श्लो० ३२.] २५. बरोबरच्या नोकरांसह. सुद्युम्न व त्याचे नोकर यांनाच स्त्रीत्व प्राप्त झालें एवढेंच नव्हे, तर त्याच्या (सुद्युम्नाच्या) घोड्यालाही प्राप्त झालें असें मूळांत वर्णिलें आहे. (अ० १ श्लो० २६-२७ पहा.)

न टळे विधि,[१] **सो**[२]मसुता भेटे, जसि शर्करा दुधा सुरसा, ।
झाला **पुरू**रवा सुत [३]तीच्या पोटीं तया **बु**धा [४]सुरसा. ॥ १२

मो हिं [५]स्मरे **व**सिष्ठा, [६]मुनि विनवी [७]प्रभुसि, त्यासि **ह**र पावे, ।
मास पुरुष मास स्त्री करि, [८]ज्या स्मरतांचि ताप [९]हरपावे. ॥ १३

भ गवान् **ह**र करि पूर्वीं त्या [१०]गहनीं [११]स्वप्रियेसह क्रीडा, ।
मुनि दर्शनार्थ येतां त्यांपाहुनि [१२]भगवती धरि व्रीडा[१३]. ॥ १४

ग[१४] णपतिच्या [१५]मातेच्या प्रीतिस्तव [१६]भव करी असी आज्ञा, ।
कीं, '[१७]याँ वनांत पुरुष स्त्री [१८]हो,' न करील काय ती प्राज्ञा ? ॥ १५

व सुधापति **सु**द्युम्न प्रतिपाळी स्वप्रजा [१९]प्रतिष्ठानीं, ।
[२०]त्याँ त्यासि न बहु [२१]मानिति, [२२]सुख कैंचें मग दुज्या [२३]प्रतिष्ठांनीं ? ॥ १६

ते णें [२४]वृद्धें स्वपदीं बैसविला [२५]सुत **पुरू**रवा, राया ! ।
जो मृगयेंत म्हणे, 'रे ! अनुचर हो ! मृदु [२६]रुरूर, वारा [२७]याँ.' ॥ १७

बा[२८] ळार्थ **ह**रिस भजला [२९]मनु शतवर्षें [३०]वरूनि **य**मुनेतें, ।
जो स्वयशासि म्हणे शिर अघमर्षणविवरधरुनियमुनेतें. ॥ १८

---

१. दैव. २. चंद्राचा मुलगा बुध त्याला. ३. इलेच्या. ४. देवसा, देवासारिखा. ५. सुद्युम्नानें वसिष्ठाचें स्मरण केलें. [अ० १ श्लो० ३६.] ६. वसिष्ठ ऋषि. ७. शंकरास. ८. ज्या (ज्या शंकराला) स्मरतांचि ताप (त्रिविध ताप) हरपावे (नष्ट व्हावे) [तो हर] (सुद्युम्नाला) मास (एक महिना) पुरुष [आणि] मास (एक महिना) स्त्री करि (करिता झाला). एक महिना पुरुष आणि एक महिना स्त्री होऊन सुद्युम्नानें पृथ्वीपालन करावें अशी व्यवस्था हरानें केली. [अ० १ श्लो० ३९.] ९. नाशास पावावे, नाहींसे व्हावे. १०. अरण्यांत. ११. उमेसह. १२. शंकराचे अंकावर बसलेली व वस्त्रहीन अशी पार्वती. अ० १ श्लो० २९-३९ पहा. १३. लाज. ['मंदाक्षं ऱ्हीस्त्रपा व्रीडा लज्जा' इत्यमरः.] १४. गणपतीची जन्मकथा 'हरचरितचिंतामणि' नामक संस्कृत काव्याच्या १८ व्या प्रकाशांत आहे. [पृ० १६५-१६८.] १५. पार्वतीच्या. १६. शंकर. १७. 'परपुरुष या वनांत' असा पाठ आहे. १८. होऊ. १९. प्रतिष्ठाननामक नगरींत. ज्याला हल्लीं 'झूंशी' म्हणतात त्या ठिकाणीं. 'झूंशी' हें गांव हल्लींच्या 'अलाहाबादे'जवळ' आहे. २०. प्रजा. २१. त्याचा आदर करीत नसत, त्याचें अभिवंदन करीत नसत. [अ० १ श्लो० ४०.] २२. त्या राजाला सुख कोठचें असणार ? २३. दुसऱ्या प्रकारच्या मोठेपणानें. २४. वृद्ध झालेल्या सुद्युम्नानें. २५. मुलगा. इतर मुलांचीं नांवें—उत्कल, गय व विमल. २६. रुरु+उर=नामविशेष मृग+त्याचें वक्षस्थळ. रुरुनामक जातीच्या हरिणाचें उर. २७. याला (मृदु अशा रुरूच्या उराला) वारा (रक्षण करा—सोडून द्या—मारूं नका), मृदु अशा या हरिणाला मारूं नका. २८. पुत्रप्राप्तीसाठीं. २९. श्राद्धदेव. ३०. स्वीकारून, यमुनेचे तीरीं राहून.

[1]**सु** रतरु **भ**गवान् फळला [2]इक्ष्वाकुप्रमुखपंक्तिपुत्रफळें, ।
भजतां, न [3]कल्पितांही, पडति गळां बहु फळें असींच बळें. ॥ १९
दे [4]शाप [5]**पृ**षध्रा गुरु 'हो शूद्र असाचि' कीं [6]निशा भारी, ।
व्याघ्र म्हणुनि [7]बभ्रुसि [8]शिर उडवुनि [9]तत्कर्णसहचि [10]तो मारी. ॥ २०
[11]**वा** ताशनादि उग्रव्रत धरुनि जपे [12]महातपा, याला ।
सद्गति घडे, शिरे [13]दवदहनीं, न म्हणे '[14]स्वं' हातपायाला. ॥ २१
[15]**तृ** णवसचि विषयसुख **क**विस हें, पावे **ह**रिस करुनियां [16]नवस, ।
[17]नवसरसिजनयन वसे [18]हृदयीं कामादिकां म्हणे 'न वस.' ॥ २२
न रनाथ [19]उत्तरापथपाळक [20]**का**रूष ते [21]**क**रूषाचे, ।
धृष्टाच्या वंशाचे [22]ब्राह्मण झाले तपोनिधी साचे. ॥ २३
मो घ न ज्यांचें भाषण बाळपणींही असे **नृ**गकुळांत ।
दात्यांत जे [23]जलदसे, शत्रूंत जसे [24]हरी मृगकुळांत. ॥ २४
भ व्यगुण [25]**न**रिष्यंतप्रभव [26]**सु**मति**चि**त्रसेनमुख सर्व ।
झाले अंतीं ब्राह्मण, [27]कुळविद्येचा जयां नसे गर्व. ॥ २५

---

१. कल्पतरु, भक्तांच्या सर्व इच्छा तृप्त करणारा. २. इक्ष्वाकु वगैरे. 'इक्ष्वाकुनृगशर्यातिदिष्टधृष्टकरूषकान् । नरिष्यंतं पृषध्रं च नभगं च कविं विदुः ॥' अ० १ श्लो० १२ पहा. ३. मनांत न आणतांही. ४. कुलाचार्यांनीं शाप दिला कीं तूं शूद्र होशील. [अ० २ श्लो० ९.] ५. गुरु वसिष्ठ यांचे आज्ञेवरून गाईचें रक्षण करणारा मनूचा आठवा मुलगा पृषध्र त्याला. ६. रात्र पाऊस पडत असतां एके दिवशीं काळोखी रात्र होती. ७. कपिला गाईला. ८. गाईचें शिर तोडून. ९. त्या वाघाच्या कानासह. १०. पृषध्र. ११. वात+अशन+आदि=वायु+भक्षण+पहिलें आहे ज्यांत असें उग्रव्रत. १२. 'महातपा (पृषध्रा)' वायुभक्षण पहिलें आहे ज्यांत असें उग्रव्रत धरुनि जप करी; दवदहनीं शिरे [व] हातपायाला स्व स्वकीय धन) न म्हणे [त्यामुळें] याला (पृषध्रा याला) सद्गति घडे–असा अन्वयार्थ. १३.वणव्यांत.१४.स्वकीय धन. १५. तृणचि. कविनामक पुत्राला विषयसुख हें तृणासारखें वाटत असे. १६. नवस करुनियां हरिस पावे. (स्वयंप्रकाश परमेश्वराची स्थापना चित्तांत करून ब्रह्मस्वरूपीं मिळाला.) [अ० २ श्लो० १५.] १७. नुकत्याच फुललेल्या कमलाप्रमाणें आहेत डोळे ज्याचे असा (हरि), उत्फुल्लकमललोचन (हरि). १८. [त्या कवीच्या] हृदयीं (चित्तांत) नवसरसिजनयन (हरि) वसे–असा अन्वय. १९. उत्तर देशाचें रक्षण करणारे. [अ० २ श्लो० १६.] २०. करूषाचे मुलगे. २१. करूष नामक राजाचे. २२. धृष्टाच्या वंशांत झालेले क्षत्रिय ब्राह्मणपणा पावले. यांला 'धार्ष्ट' असें नांव प्राप्त झालें. २३. मेघासारखे. २४. सिंह. २५. नरिष्यंतापासून झालेले. २६. सुमति हा नृगाचा पुत्र आणि चित्रसेन हा नरिष्यंताचा पुत्र होय. [अ० २ श्लो० १७-१८.] २७. क्षात्रविद्येचा.

ग र्वादिदोषवर्जित शिष्टसुमत [1]दिष्टजात जें कुळ तें ।
ज्यांतिल [2]मरुत्तनृपयश धवलपणें [3]अमृतरश्मिशीं तुळतें. ॥ २६
च नगत शर्याति नृप **च्यव**नाच्या आश्रमीं वनीं राहे ।
[4]त्याची सुता **सु**कन्या [5]तेजें [6]वल्मीकबिलगतें पाहे. ॥ २७
ते जें काय म्हणुनि ती कांत्यानें **च्यव**नलोचनें टोंची, ।
[7]तत्क्रोधें सेनेचा [8]मळमूत्रनिरोध जाहला [9]तोंची. ॥ २८
बा हुनि [10]शर्याति पुसे, 'सांगा घडलें असेल जें [11]आग ।
च्यवनाश्रम हा आला [12]स्वाश्रमपददूषणें तया राग. ॥ २९
सु सुता सांगे, 'फिरल्यें [13]विपिनीं घेऊनि आपल्या [14]आली ।
वल्मीकीं हें घडलें, स्मृति आतां सैन्य तापल्या आली.' ॥ ३०
दे खे नृप तों केला स्वसुतेनें **च्यवन** आंधळा कष्टी, ।
[15]तदनुग्रह संपादी, अर्पी त्याच्या करीं [16]सुतायष्टी. ॥ ३१
[17]**वा** चा अर्थासि तसी त्यासि **सु**कन्या कदापि सोडीना, ।
करुनी प्रसन्न घेती, पतिची आज्ञा कदापि मोडीना. ॥ ३२
य ज्ञहविर्भागार्थी भेटति [18]त्यां प्रसवली [19]जयां [20]वडवा ।
त्यांसि मुनि म्हणे, '[21]वय मज द्या, ईश्वर हो! दया करा, घडवा.' ॥ ३३

---

१. दिष्टापासून झालेलें. २. मरुत्त नामक राजाचें यश. यानें मोठा यज्ञ करून उत्तम यश मिळविलें. [अ० २ श्लो० २७-२८.] ३. चंद्राशीं. ४. शर्याति राजाची. ५. ज्योति. [अ० ३ श्लो० ३.] ६. वारुळाच्या विळांत चकाकणारीं. ७. त्या च्यवन मुनीच्या कोपानें. ८. सैन्यांतील लोकांचीं मळमूत्रें बंद झालीं. ९. लागलींच. १०. शर्याति (राजा) [स्वसैनिकांला आणि स्वकन्येला] वाहुनि (बोलावून) पुसे (विचारिता झाला). ११. अपराध. १२. स्व+आश्रम+पद+दूषणें=निज+आश्रम+स्थान+दोष लाविल्यानें, आपल्या आश्रमांत कांहीं दुष्ट कृत्य केल्यामुळें. १३. अरण्यांत. १४. सख्या. १५. तद्+अनुग्रह=त्याचा, त्या च्यवनाचा+प्रसाद, कृपा. राजानें मुनीला प्रसन्न करून त्याची कृपा संपादिली [अ० ३ श्लो० ८], आणि आपली कन्या अर्पण केली. १६. सुकन्या नामक कन्यारूपी काठी. १७. ही गीति वाचतांच संस्कृतज्ञ वाचकास रघुवंश काव्यांतील प्रथम सर्गाच्या पहिल्या श्लोकाचें स्मरण झाल्याशिवाय राहावयाचें नाहीं. 'वागर्थाविव संपृक्तौ' इत्यादि श्लोक पहा. तसेंच कुमारसंभव–सर्ग ६, 'तमर्थमिव भारत्याः' (श्लो० ७०) इत्यादि अवश्य पहा. १८. च्यवन ऋषीला. १९. ज्या अश्विनीकुमारांना. २०. घोडीचें रूप धारण केलेली सूर्यपत्नीसंज्ञा. २१. तारुण्य. [अ० ३ श्लो० ११.]

न वसिद्धरसीं डोहीं देती [1]त्यासकट ते स्वयेंहि बुडी ।
[2]स्वसम करिति, हरिति [3]कुडी, श्रीहरिहर देव जेंवि बुद्धि [4]कुडी. ॥ ३४

मो हें पतिस सुकन्या नेणें, मग शरण जाय, [5]नव दोघे ।
करिति [6]विवाहचि; म्हणती, 'हा [7]धव तव, हृदय 'हाय!' न वदो घे'. ॥ ३५

[8]**भ** वनातें गेले तों ये यज्ञ करावयासि शर्याती, ।
पाहे सुता [9]उपासी जी [10]अद्भुतरूपविप्रवर्या ती. ॥ ३६

[11]**गं** मली दुष्टा बोलुनि दावी; ही मग म्हणे सुकन्या [12]यां, ।
'जामाताचि तुझा हा, [13]लाविसि नुमजोनि बा! चुक न्याया.' ॥ ३७

व दली सविस्तर सती कारण ती [14]प्राप्तदिव्यरूपाचें ।
भेटे मुलिस प्रेमें, द्रवलें अतिमात्र हृदय [15]भूपाचें. ॥ ३८

ते जस्वी तो च्यवन प्रारंभी [16]श्वशुरसोमयागातें ।
[17]अघटितचि करी, साधु ब्राह्मणमंडळ ससोम या गातें. ॥ ३९

बा [18]सुरवैद्यांतें दे सोम[19], अतुल आयका यश, च्यवन ।
[20]करि [21]संपवि भुज स्तंभित तैं, घडतें [22]त्यांसि काय [23]शचिच्यवन? ॥ ४०

सु रपतिनें त्या समयीं नसतिल कां [24]शपथ वाहिले शतदा? ।
होउनि सुचकित विसरे सुमुनींचा जप [25]थवाहि [26]लेश तदा. ॥ ४१

दे वेंद्रातें शासुनि योग्य करी [27]दस्र सोमपानातें, ।

---

१. त्या च्यवनासह. २. आपल्याप्रमाणें सुंदर. ३. च्यवन ऋषीचें पहिलें जराग्रस्त शरीर. ४. वाईट, खोटी. ५. अनोळखी दोघेजण (अश्विनीकुमार). ६. सुकन्या च्यवन यांचा. ७. नवरा, पति. ८. च्यवनाच्या आश्रमीं. [अ० ३ श्लो० १७.] ९. भजे, उपासना करी. १०. अतिरूपसंपन्न ब्राह्मणश्रेष्ठ च्यवन याला. ११. शर्याति राजाला आपली कन्या सुकन्या जारिणी आहे असें वाटलें. अ० ३ श्लो० १९-२१ पहा. १२. शर्याति राजाला. १३. बा! (राजा!) न्याया (न्यायाला) चुक (दोष) नुमजोनि (न समजून) लाविसि (लावतोस)–असा अन्वयार्थ. १४. प्राप्त झालेल्या दिव्यरूपाचें. १५. शर्यातिराजाचें. १६. सासऱ्याच्या सोमयागातें, शर्यातिकडून होणाऱ्या सोमयोगातें. १७. अश्विनीकुमारांला यज्ञांत सोमाचा भाग मिळत नसे तो च्यवन मुनीनें आपल्या प्रभावानें दिला. [अ० ३ श्लो० २४.] १८. देवाचे वैद्य जे अश्विनीकुमार त्यांतें. १९. सोमरस. २०. अश्विनीकुमारास सोमरस मिळाला म्हणून इंद्र संतापला. त्यानें च्यवनाला मारण्यासाठीं वज्र उचलिलें, तेव्हां मुनीनें इंद्राचा हात वज्रासह हालेनासा केला. २१. वज्रासह. २२. इंद्रासि. २३. इंद्राणीचें रक्षण. २४. 'शपथ' हा शब्द संस्कृतांत पुल्लिंगी आहे म्हणून येथें 'वाहिले' असें क्रियापद योजिलें आहे. २५. समूह. २६. थोडा वेळ. २७. अश्विनीकुमार.

वेदीं जें सामर्थ्य श्री**च्यव**नींही तसेंचि माना तें. ॥ ४२
वा सवसा झाला या **श**र्यातिकुळीं [1]कुशस्थळीपाळ, ।
त्याचें नाम **क**कुद्मी, जो अरिचा [2]काळ साधुचा बाळ. ॥ ४३
य श त्याचें परिसा हो! अमृतचि म्हणतात रसिक ते जन या, ।
नवरा पुसावया तो गेला नेऊनि **वि**धिकडे [3]तनया. ॥ ४४
न वरा पुसावया [4]क्षण गांधर्वाचा प्रसंग पाहून, ।
राहून उगेंचि पुसे, मग [5]सच्चरणीं [6]शिरोब्ज वाहून. ॥ ४५
मो ह हरि, [7]प्रभु सांगे, 'आल्यास चतुर्युगें [8]अगारा या ।
[9]सत्ताविस गेलीं कीं, दे [10]बळदेवासि हे अगा! राया! ॥ ४६
भ र भूचा वाराया [11]अवतरला देवदेव नवरा हो! ।
म्यां कथिला हाचि करा योग्य असे हा विचार, नव राहो.' ॥ ४७
[12]**गं** दिगुरुवरा [10]बळाला कन्या देऊनि जाय [13]बदरीतें, ।
करि तप जेणें जाची गर्भाख्या दुःखहेतु न दरी तें. ॥ ४८
[14]**वं** रगुण **न**भग**म**नुतनुज [15]निपटेंचि अकपट, तयासि जे [16]भ्राते ।
म्हणती, 'बहु ठळक [17]तुला वांटा तातचि दिला' असें बा! ते. ॥ ४९
ते व्हां पुसे गुरुकुलागत, तों 'तातासि काय तूं वांटा?' ।
त्यासि **म**नु म्हणे, 'वत्सा! भ्रात्यांला भासतोसि तूं [18]कांटा. ॥ ५०
वा! हे **आं**गिरस करिति सत्र, तयामाजि किमपि चुकतात, ।
तें त्यांसि [19]सांग जा तूं, [20]जेणें स्वर्गा फळासि [21]मुकतात.' ॥ ५१
सु मति **न**भग तेंचि [22]करी, **आं**गिरसहि संपवूनि [23]सत्रास, ।

---

१. कुशस्थळी नगरीचा राजा. ही नगरी याचा (ककुद्मीचा) बाप रेवत यानें समुद्रांत निर्माण केली. अ० ३ श्लो०२ ७।२८ पहा. २. अंतक, नाश करणारा. ३. रेवती नांवाची मुलगी. ४. क्षणभर. ५. ब्रह्मदेवाचे पायांवर. ६. शिरःकमल. ७. ब्रह्मदेव. ८. या अगारा आल्यास–माझ्या या अगारा (गृहा–ब्रह्मलोकास) तूं आलास तितक्या वेळांत. ९. 'सत्तावीस' हें 'चतुर्युगें' या पदाचें विशेषण आहे. चतुर्युगाचीं नांवें–कृत, त्रेता, द्वापार व कलि. १०. श्रीकृष्णाचे वडील बंधु बलराम. ११. अ० ३ श्लो० ३४ पहा. १२. गदाधारण करणारांत श्रेष्ठ अशा. १३. नरनारायणाच्या बदरी नांवाच्या आश्रमास. १४. सद्गुणसंपन्न. १५. अगदीं. १६. भाऊ. १७. नभगाला. १८. वैरी. १९. विश्वेदेवांचीं सूक्तें त्यांना पढव. २०. ज्या सूक्तानें, ज्या सूक्ताच्या अज्ञानानें. २१. पावत नाहींत. २२. पढवी. २३. द्वादशाहनामक सत्राला (यज्ञाला).

स्वर्गा जातां देती त्या [1]सत्रोर्वरित वास्तु [2]सत्रास. ॥ ९२
दे उनि जें धन गेले **आं**गिरस, तयासि **न**भग करि गोळा, ।
तों उत्तरेकडुनि ये [3]पुरुष म्हणे, 'एकहि नं तुझा तोळा.' ॥ ९३
'**वा** स्तुक वसु हें माझें' **न**भग म्हणे, 'संपवूनि सत्रास, ।
गेले देउनि मुनि मज' अनृत करी कंपवूनि [4]सत्रास. ॥ ९४
'**य** ज्ञोर्वरित धन' म्हणे, 'कोणाचा भाग हें स्वतातातें ।
जा पूस चालवाया' धर्म [5]तुंजा आग्रहें स्वता तातें. ॥ ९५
न भग पित्यासि पुसे, तों सांगे, 'यज्ञात्रशिष्ट हा भाग ।
कोठें **रु**द्रासि असे, सर्वांही पात्र [6]तो महाभाग.' ॥ ९६
मो ठ्या वेगें येउनि सांगे तैसेंचि **न**भग [7]देवांस, ।
[8]सत्यें प्रसन्न होउनि तें [9]स्वधनहि निजपदींहि दे वास. ॥ ९७
भ गवत्प्रसादभाजन **न**भग, तयाच्या कुळांत **ह**रिदास ।
नृप **अं**बरीष होता तो बहुमत फार **ह**रिस [10]अंरिदास. ॥ ९८
[11]**गं** लिताभिमान तो नृप वर्षभरि [12]द्वादशीव्रतासि धरी, ।

---

१. यज्ञभूमीवर अवशेष राहिलेलें द्रव्य. वास्तु (वास्तुक) यज्ञभूमिगत धन. २. त्या त्रासयुक्ताला. ३. काळ्या वर्णाचा पुरुष, रुद्र. ४. त्रासयुक्त. ५. तुझा. ६. रुद्र. ७. रुद्राला. ८. सत्यवादिपणानें. ९. तें स्वधन (आपलें यज्ञावशिष्ट द्रव्य) हि, निजपदीं (आपल्या चरणारविंदीं) वास हि दे. या कथेंत नभग शब्द नभग पुत्र या अर्थी घेतला पाहिजे. अ० ४ श्लो० १-११ पहा. १०. सुदर्शन चक्र देणाऱ्या हरीस (विष्णूला). अ० ४ श्लो० २८ पहा. ११. गलित (गेला आहे) अभिमान (गर्व मीपणा) ज्याचा असा. १२. अंबरीष हा सूर्यवंशोत्पन्न नाभाग राजाचा पुत्र. हा मोठा दानशूर, पराक्रमी आणि भगवद्भक्त होता. एकदां द्वादशीच्या दिवशीं दुर्वास ऋषि याच्या घरीं अतिथि म्हणून आला. तेव्हां राजानें त्यास भोजनार्थ राहवून घेतलें. नंतर मुनि आपलें आन्हिक कर्म करण्यासाठीं नदीतीरीं गेला. या दिवशीं थोडी म्हणजे साधनद्वादशी होती. तेव्हां व्रतभंग होऊं नये म्हणून राजानें, तिथि संपली नाहीं तों देवास नैवेद्य समर्पण करून, भोजन न करतां देवाचें तीर्थ प्राशन करून पारणें सोडलें. हें जाणून मुनि संतप्त झाला. त्यानें आपल्या जटेंतील केंसापासून एक अक्राळविक्राळ कृत्या (राक्षसी) उत्पन्न करून राजावर सोडिली. तेव्हां विष्णूच्या सुदर्शन चक्रानें तिचा नाश केला आणि त्या मुनीचा पाठलाग केला. हें पाहून दुर्वास भीतिग्रस्त असा विष्णूस शरण गेला. विष्णूनें 'परत अंबरीषाकडे जा, तो निराहार आहे, त्याचें समाधान कर म्हणजे चक्र तुला सोडील' असें सांगितलें. त्यावरून निरुपाय होऊन तो अंबरीषाकडे परत आला. दुर्वासास पाहतांच राजास हर्ष झाला. त्यानें सुदर्शनाची स्तुति करून दुर्वासाला त्यापासून मुक्त केलें आणि यथेच्छ भोजन दिलें—अशी कथा आहे. (भागवत—नवम स्कंध—अध्याय ४-६.)

दे षष्टिकोटि विधिनें गो[1]दानें, सां[2]ग तें सुकर्म करी. ॥ ५९
[3]व र्षांतीं उद्यापन करुन सविधि [4]पारणा करूं लागे, ।
तों दुर्वासा मुनि ये, '[5]अशन किजे' हाचि वर तया मागे. ॥ ६०
ते णें स्नानीं केला बहु उशिर द्वादशी उरे थोडी, ।
[6]जळपारण करि, तों ये मुनि कोपे, भूप कर तया जोडी. ॥ ६१
[7]वा डव तो व्यर्थ करी क्रोध, नृपवधार्थ मग जटा तोडी, ।
कृत्या निर्मी, तीतें नृपरक्षक **वि**ष्णुचक्र तें [8]झोडी. ॥ ६२
[9]सु प्रथमदर्शन तयामागें लागे, पळे [10]मुनि त्रासें, ।
त्राणार्थ तो **वि**धिकडे **शं**भुकडे जाय दाटला श्वासें. ॥ ६३
दे ती अभय न कोणी, मग गेला **ह**रिकडे, म्हणे 'रक्ष.' ।
[11]प्रभुहि म्हणे, 'तोचि [12]प्रभु शरणागतरक्षणीं न मी दक्ष.' ॥ ६४
वा ताशन तो वाडव बा! तापें तापला, बहु भ्रमला, ।
गमला दीन पहातां त्याहुनि तो **अं**बरीषहि श्रमला. ॥ ६५
य ज्ञादिसुकृतदानें निववुनि चक्रासि साधु तो वारी, ।
तारी मुनिला भगवद्भक्त नृपति, कीर्ति साधुची भारी. ॥ ६६
न मुनि मुनिवरास मग प्रथम प्रार्थूनि नेववी हर्षें, ।
तो **अं**बरीष [13]त्यांच्या आज्ञेनें पारणा करी [14]वर्षें. ॥ ६७
मो ठें चरित परि तसें तें देवें थोडक्यांत [15]आटविलें, ।
कीं सुख तज्ज्ञजनाला काय श्री**वा**मनें न वाटविलें? ॥ ६८
भ गवद्विभूति **म**नु तों शिंके, तो होय दिव्य सुतरत्न ।
तो इक्ष्वाकु, तयाचे शत सुत, ज्यांचा यशीं बहू यत्न. ॥ ६९

---

१. गाईचीं दानें. २. यथासांग, यथाविधि. ३. वर्षांतीं, कार्त्तिकमासीं. ४. व्रतसमाप्ति. ५. भोजन. ६. 'अपोऽश्नाति तन्नैवाशितं नैवानशितम्' या श्रुतिवाक्याच्या आधारानें ब्राह्मणांनीं जलपारणा करायास सांगितल्यावरून राजानें जलपारणा केली तों. ७. वडवायां द्विजयोषिति (वडवा द्विजयोषितीति मेदिनी) जातः वाडवः ब्राह्मणः. ८. मारी. ९. सुदर्शन. सु आहे प्रथम ज्याच्या असें दर्शन=सुदर्शन. अशा कोट्या **पं**ताच्या काव्यांत वारंवार आढळतात. (मागें पृ० ३५ टी० १३ व पृ० ६९ पहा.) १०. दुर्वासऋषि. ११. विष्णु. १२. राजा अंबरीष. १३. दुर्वासऋषीच्या. १४. एका वर्षानें. दुर्वासऋषीच्या मागें सुदर्शन लागल्यापासून तों पुनः दुर्वासऋषि अंबरीष राजाला शरण येईपर्यंत एक वर्ष लोटलें. या अवधींत राजा फक्त पाणी पिऊन राहिला. १५. आटपलें.

ग णिले शतांत तीन ज्ये[1]ष्ठसुत **विकुक्षि**, **नि**मि दुजा, तिसरा ।
दंडकनामा, याचें शुचि य[2]श हांसे सुधेचियाहि स[3]रा. ॥ ७०

व चनें गु[4]रुच्या टा[5]कुनि इक्ष्वाकु **विकुक्षिला** वरि यशास, ।
कीं श्रा[6]द्धा आणविले मृग त्यांतिल खाय तो सु[7]त श[8]शास. ॥ ७१

ते णें 'श[9]शाद' ऐसें झालें त्याचें प्रसिद्ध मग नाम, ।
इक्ष्वाकुनृपामागें येउनि तो वसवि आपुलें धा[10]म. ॥ ७२

वा हन [11]हरि करि [12]तत्सुत वाटे जें **विष्णु**चेंचि माणीक, ।
होय [13]ककुत्स्थ **पुरं**जय, नाम तया इंद्रवाह आणीक. ॥ ७३

सु खबहुमत [14]तद्वंशीं झाला नृप **कुव**लयाश्व तो भारी, ।
[15]त्यां **धुंधु**मार म्हणती कीं असुरा **धुंधु**नामका [16]मारी. ॥ ७४

दे [17]मुनिहितार्थ [18]धुंधुश्वासाग्निस एकविस सहस्र सुत, ।
उरले [19]तिघेचि त्यांतुनि, झाले [20]त्यां पावकांत सर्व [21]हुत. ॥ ७५

वां[22] गविले दैवें जे तीन तयामाजि जो **दृ**ढाश्व कृती, ।
त्याच्या वंशीं झाला **युव**नाश्वमहीपती शुचिप्रकृती. ॥ ७६

य त्न करुनि तो थकला, होत्या त्या भूपतीस शत [23]भार्या, ।
तरि अनपत्य वनातें गेला, [24]आले दयाळु ऋषि कार्या. ॥ ७७

न[25] रनाथा सुत व्हाया [26]मुनिमखसदनांत [27]मंत्रिलें तोय ।
होतें, हो! तें प्याला सुतृषित युवनाश्व, [28]भावि तें होय. ॥ ७८

---

१. अध्याय ६ श्लो० ४ पहा. २. हे 'प्रतीप' नामक अलंकाराचें उदाहरण होय. ३. सरोवराला. ४. वसिष्ठाच्या. ५. देशाबाहेर घालवून. [अ० ६ श्लो० ९.] ६. अष्टका श्राद्धाला. ७. तो विकुक्षिनांवाचा मुलगा. ८. ससा. ९. ससा खाणारा. १०. गृह. ११. इंद्राला. १२. त्या शशादाचा पुत्र. (पुरंजय.) १३. दैत्यपुरस्य जयात् पुरंजयः। इंद्रो वाहो यस्येतींद्रवाहः। ककुदि स्थितत्वात्ककुत्स्थः। दैत्याचें पुर जिंकल्यामुळें पुरंजय, इंद्र वाहन झाल्यामुळें इंद्रवाह व वृषभरूपी इंद्रावर बसल्यामुळें ककुत्स्थ अशीं शशादाच्या मुलाचीं नांवें पडलीं. १४. त्या पुरंजयाच्या वंशांत. १५. कुवलयाश्वाला. १६. अध्याय ६ श्लो० २२ पहा. १७. उत्तंकऋषीच्या हितार्थ. १८. धुंधूच्या श्वासपावकाला. १९. दृढाश्व, कपिलाश्व व भद्राश्व. २०. धुंधु नांवाच्या राक्षसाच्या तोंडांतून उत्पन्न झालेल्या अग्नीत. २१. भस्म झाले. २२. वांचविले. २३. अध्याय ६ श्लो० २६ पहा. २४. कामीं पडले, उपयोगीं पडले. २५. युवनाश्व राजाला. २६. राजाला पुत्र व्हावा म्हणून पुत्रकामेष्टि करणाऱ्या ऋषींचे यज्ञमंडपांत. २७. मंत्रिलेलें पाणी. २८. होणारें. हें पाणी प्याल्यावर राजाला गर्भ राहिला.

मो ठें पोट नृपाचें जों जों तों तों प्रजेसि भय [1]मोटें, ।
[2]दक्षिण कुक्षि विदारुनि जन्मे शिशु साधु, यश नव्हे खोटें. ॥ ७९
भ गवान् [3]सुरपति शिशुच्या अमृतमयी [4]देशिनी मुखीं घाली, ।
अंगुलि चुरुचुरु चोखी, तत्पानें [5]तत्क्षुधा तृषा धाली. ॥ ८०
ग डबडुनि जों म्हणति मुनि '[6]कं धास्यति?' तोंचि इंद्र '[7]मां धाता,' ।
ऐसें प्रकटुनि वदला म्हणुनि म्हणति त्या नृपासि '**मां**धाता.' ॥ ८१
व र सुरमुनिवर्यसभा त्या **यु**वनाश्वासि वांचवीसा वी, ।
आपणचि माय बापहि पूजी तो भूप पांचवी सावी. ॥ ८२
ते जें त्याच्या झाले त्रस्त [9]दशमुखादि [10]दस्यु कीं [11]धाम ।
अद्भुत यास्तव **श**क्रें '[12]त्रसदस्यु' असेंहि ठेविलें नाम. ॥ ८३
[13]**वा** हत होते सप्तद्वीपस्थित लोक जे तदाज्ञा ते ।
त्या [14]चक्रवर्तिला 'जगदीश' असें वर्णिती तदा ज्ञाते. ॥ ८४
सु त [15]त्यांचे गुणनिधि **पु**रुकुत्स तथा **अं**बरीष **मु**चुकुंद, ।
यां त्यजुनि परकविस तरि अलिसहि नलिनापरीस सुचु कुंद. ॥ ८५
दे वी तशाचि होत्या **मां**धात्याला [16]शतार्ध ज्या कन्या, ।
एका [17]श्री**सौ**भरितें, रूपासि भुलोनि, वरिति त्या [18]धन्या. ॥ ८६
वा टे स्वसम समर्थ न कोणीच असे [19]पदभ्रमांधा त्या, ।
बहुतचि लाजवि **सौ**भरिमुनिचें वैभव [20]अदभ्र **मां**धात्या. ॥ ८७

---

१. येथें 'ठ'स्थानीं 'ट' योजिला आहे. २. उजवा कूस. ३. देवांचा राजा, इंद्र. ४. तर्जनी, आंगठ्याच्या जवळचें बोट. ५. त्याची भूक व तहान. ६. कोणाचे आंगावर पिईल. ७. मला पिईल. ८. हा इक्ष्वाकुकुलोत्पन्न युवनाश्वराजाचा पुत्र. हा पित्याच्या कुक्षींतून बाहेर आला, आणि दुग्धपानार्थ रडूं लागला. तेव्हां इंद्र म्हणाला, 'हा पुत्र मला पिईल (मां धास्यति).' यामुळें यास 'मांधाता' असें नांव पडलें. (द्रोणपर्व–अध्याय ६२.) ९. रावण वगैरे. १०. दुसऱ्यांना त्रास देणारे दुष्ट. ११. बल. १२. दस्यवः उद्विग्नाः संतः यस्मात् त्रसंतीति त्रसद्दस्युः. (अ० ६ श्लो० ३३.) १३. आज्ञा (शिरीं) वाहणें=आज्ञा पाळणें. १४. चक्रवर्ती पुरुषाचें लक्षण सामुद्रिक ग्रंथांत आहे तें:—'अतिरक्तः करो यस्य ग्रथितांगुलिको मृदुः । चापांकुशांकितः सोऽपि **चक्रवर्ती** भवेद्ध्रुवम् ॥' (राघवभट्टकृत 'अर्थद्योतनिका' नामक अभिज्ञानशाकुंतलटीका–अंक ७ श्लोक १६ पृष्ठ २४३.) चक्रवर्ती=चक्रे भूमंडले राजमंडले वा वर्तयितुं शीलमस्य। यद्वा चक्रं सैन्यं वर्तयितुं सर्वभूमौ चालयितुं शीलमस्य। अवश्यं वा चक्रं वर्तयति । असे या शब्दाचे विग्रह आढळतात. १५. मांधातानृपाचे. १६. पन्नास. १७. सौभरिनामक मुनीला. १८. अध्याय ६ श्लो० ३८ पहा. १९. राजत्वानें मत्त झालेल्या. २०. पुष्कळ, मोठें (वैभव). [दभ्र=अल्प, थोडें.] अध्याय ६ श्लो० ४७ पहा.

य श हरिचें गाउनि तो **सौ**भरि, होउनि विरक्त, तनु सोडी, ।
गोडी खरी **ह**रिगुणीं, कैची विषयांत ती? मृषा थोडी. ॥ ८८
न र्मांची देणारी निज[1]भगिनी न[2]र्मदा, तितें भ्राते[3] ।
पुरुकुत्साला देउनि, आर्जविती फार सर्वदा त्या तें[2]. ॥ ८९
मो हुनि फ[4]णिवरवचनें गंधर्ववधार्थ **न**र्मदा त्यातें[5], ।
नेती रसातळीं, अहि देति अ[6]भय सुकरशर्मदात्यातें. ॥ ९०
भ[7] गणीं भ[8]रूप दिसतो जो **गा**[9]धिजनीत शं[10]क्रपातित या, ।
वंशीं **त्रि**[11]शंकु सुयशा, कोण न गाईल साधु गाति तया? ॥ ९१
ग तिमत्पूज्यतम **ह**रिश्चंद्र अतियशा **त्रि**शंकुचा तनय, ।
सद्वैद्यें रोग तसा, जेणें नाहीं उरों दिला अनय. ॥ ९२
ब हु वर्षं ज्या[12]करितां जरिही **गा**धिज **व**सिष्ठ हे शुद्ध, ।
बुद्धख्यात तरि करिति आ[13]डीबकनाम ते महायुद्ध. ॥ ९३
ते णें **ना**रदवचनें व्हाया संतान नवसिला **व**रुण, ।
'सुत हो, पुत्रेंचि यजिन' यापरि दे पुत्र यासि तो क[14]रुण. ॥ ९४
बा ळक **रो**हित होतां, **व**रुण म्हणे, 'या सुतें मज यजावें.' ।
नृपति म्हणे, 'निर्दश[15] पशु शु[16]द्ध, अ[17]मेध्यें कसें तुज भजावें?' ॥ ९५
सु त निर्दश[15] होतां ये, **व**रुण म्हणे, 'या सुतें मज यजावें.' ।

---

१. आपली बहीण. २. 'नर्म ददाति द्यति वा' नर्मदा. [व्याख्यासुधा—अमरकोष.] ३. नाग, उरग. ४. सर्पराजाच्या प्रेरणेनें. ५. पुरुकुत्सातें. 'नेती'चे बद्दल 'नेई' पाहिजे. ६. सर्पांपासून भय नाहीं असा वर. ७. नक्षत्रगणीं. ८. नक्षत्ररूप. ९. विश्वामित्रानें तपोबलानें स्वर्गास पोंचविलेला. १०. इंद्रानें स्वर्गावरून पाडलेला. ११. त्रयः शंकव इव दुःखहेतवो दोषा यस्यासौ त्रिशंकुः । तदुक्तं हरिवंशे—'पितुश्चापरितोषेण गुरोर्दोग्धीवधेन च । अप्रोक्षितोपयोगाच्च त्रिविधस्ते व्यतिक्रमः ॥' इति. याला तीन शंकु (दोष घडले होते. ते असे—पित्याचा असंतोष, गुरुच्या गाईचा वध आणि प्रोक्षण केल्यावांचून असलेल्या पदार्थाचें भक्षण. या राजाला लग्न होत असतां एका ब्राह्मणकन्येचें हरण केल्यामुळें वसिष्ठानें रागावून 'चांडाल हो' म्हणून शाप दिला व त्यामुळें त्याला चांडालत्व प्राप्त झालें. १२. हरिश्चंद्राकरितां. १३. पूर्वीं विश्वामित्रानें राजसूय यज्ञाच्या दक्षिणामिषानें हरिश्चंद्राचें सर्वस्व हरण करून त्याला दुःख दिलें तें ऐकून रागावलेल्या वसिष्ठानें विश्वामित्राला, 'तूं आडी नांवाचा पक्षी हो,' असा शाप दिला; त्यानेंही वसिष्ठाला, 'तूं बक हो,' असा शाप दिला. नंतर त्या उभयतां ऋषींचें पक्षिरूपानें बहुत वर्षें युद्ध झालें. १४. दयाळु. [अ० ७ श्लो० ९.] १५. निर्गत दहा दिवस, जन्मून दहा दिवस झाले असा. १६. हें 'पशु'शब्दाचें विशेषण आहे. १७. अशुद्धें.

[1]भूप म्हणे, 'येऊं दे दंत, अमेध्यें कसें तुज भजावें?' ॥ ९६
दे येऊं दंत तया, **व**रुण म्हणे, 'या सुतें मज यजावें.' ।
राजा म्हणे, 'पडावे [2]प्रथम, अमेध्यें कसें तुज भजावें?' ॥ ९७
बा ळाचे [3]रद पडतां, **व**रुण म्हणे, 'या सुतें मज यजावें.' ।
'यावे पुन्हा रद' म्हणे नृपति, 'अमेध्यें कसें तुज भजावें?' ॥ ९८
य तें रद येतां ये, **व**रुण म्हणे, 'या सुतें मज यजावें.' ।
भूप म्हणे, 'व्हावा रणदक्ष, अमेध्यें कसें तुज भजावें?' ॥ ९९
[4]**न** रवर यापरि [5]पुत्रस्नेहें काळासि युक्तिनें [6]वंची, ।

[7]सुत [8]निसटे, नृपतिस धरि **व**रुण, [9]स्वार्थोद्यतीं दया [10]कंची? ॥ १००
मो ठें उदर [11]पित्याचें ऐकुनि **रो**हित पुरासि जों जाय, ।
इंद्र म्हणे, 'कर तीर्थें, कां जासी? वेड लागलें काय?' ॥ १०१
[12]**भ** गवान् [13]प्रत्यब्दीं ये वारी [14]जनशब्द वांचवायास, ।
रोहित वनींच होता, तों लोटे [15]अब्द पांचवा यास. ॥ १०२
[16]**ग** र्त पुढें, प्रथम **अजी**, ज्याच्या नामीं तयाकडे गेला, ।
[17]तन्मध्यमपुत्र विकत घेउनि **व**रुणार्थ [18]गुरुपुढें [19]ठेला. ॥ १०३
व रुणादि सुरांसि पुरुषमेधें यजि नृप [20]रिणें [21]अंजी [22]गर्त, ।
[23]पुत्र करि **शु**नःशेपा **गा**धिज, ज्यातें विकी **अ**जीगर्त. ॥ १०४
ते व्हां त्या नरमेधीं बहुतचि सत्कार [24]लाहला [25]होता, ।
परम प्रसन्न चित्तें श्री**वि**श्वामित्र जाहला होता. ॥ १०५
[26]**वा** रिद सुज्ञानाचा श्री**गा**धिज चातकीं नृपीं वळला, ।
त्याचें कारण परिसा, 'हरिसा सत्वें तयासि तो कळला. ॥ १०६

---

१. राजा हरिश्चंद्र. २. पहिले दांत, दूधदांत. ३. दांत. ४. हरिश्चंद्रराजा. ५. रोहित नांवाच्या पुत्राच्या प्रेमानें. ६. चुकवी, फसवी. ७. प्राण वांचविण्यासाठीं रोहित वनांत गेला. [अ० ७ श्लो० १६.] ८. सुटे. ९. आपला इष्ट हेतु सिद्धीस नेण्याकरितां तयार झालेल्या पुरुषाच्या ठिकाणीं. १०. कसली. ११. हरिश्चंद्राचें उदर जलोदररोगानें मोठें झालें असें ऐकून. १२. भगवान् इंद्र. १३. प्रति+अब्दीं=प्रत्येक+वर्षीं. १४. लोकापवाद टाळण्याकरितां. १५. वर्ष. संस्कृतांत 'अब्द' शब्द पुल्लिंगी आहे. 'अब्दौ जीमूतवत्सरौ' इत्यमरः. १६. अजीगर्त. १७. अजीगर्ताचा मधला मुलगा शुनःशेप. १८. बापापुढें. १९. उभा राहिला. २०. ऋणानें, वरुणाच्या ऋणानें. २१. अगदीं. २२. ग्रस्त झालेला (राजा हरिश्चंद्र). २३. आपला पुत्र मानी. २४. पावला. २५. हवनकर्ता विश्वामित्र. २६. मेघ. येथें **रूपक** आहे.

सु गति हरिश्चंद्राला घडली, **रो**हितकुळीं पुढें झाला ।
राजा **बा**हुक, अरिनीं [1]निजराष्ट्रांतूनि दवडिलें [2]त्याला. ॥ १०७

दे ह त्यागी [3]वृद्ध, ज्येष्ठा त्याची महासती भार्या ।
[4]सहगमनोत्का [5]और्वें गर्भवती म्हणुनि राहिली आर्या. ॥ १०८

[6]**वा** माचारा सवती देती गर्भा गळावयास [7]गर, ।
और्ववरें तो झाला नामें, पावुनि बळा वया, [8]सगर. ॥ १०९

य वन [9]विकृतवेष सकळ केले, किति मारिले [10]अहित **सगरें**, ।
या चक्रवर्तिचें यश बहु गाती [11]खेटें [12]खर्वटें नगरें. ॥ ११०

[13]**न** गरिपु अश्व शताव्या हयमेधाच्या छळें बळें चोरी, ।
कीं साहेना त्याला **स**गराच्या [14]पुण्यकीर्तिची [15]थोरी. ॥ १११

[16]**मो** घ न व्हावा केला संकल्प, म्हणोनि पुत्र **सगरानें** ।
आज्ञापिले हयास्तव शोधिति एकीकडूनि मग रानें. ॥ ११२

भ रले भरीं सुगतिचे, सुत साठसहस्र भूमिला खणिती, ।
तो हा **सागर** झाला, बलशाली [17]दृप्त ते श्रम न गणिती. ॥ ११३

[18]**ग** र्ते चहुंकडे केले गेले शोधित धरूनि [19]ईशांनी, ।
[20]त्यांनिकट हय पहाती, गावें ज्या श्रीमुनीस ईशांनीं. ॥ ११४

ब लमत्त **सगर**सुत ते [21]लंघिति मानूनि चोर **क**पिलातें, ।
न गमे अलंघ्य [22]चलदलनग दैवत जरिहि थोर [23]कपिला तें. ॥ ११५

[24]**ते** खळ षष्टिसहस्त्रहि जगदीश्वरलंघनात्मदोषानें,. ।

---

१. त्याच्या (बाहुकाच्या) राष्ट्रांतून. २. बाहुकाला. ३. वृद्ध (बाहुक). ४. मेलेल्या पतीबरोबर सहगमन करण्याविषयीं उत्कंठित अशी. ५. और्व ऋषीनें. ६. वाम+आचार=वांकडा+वर्तनक्रम=दुराचरणी. ७. विष. ८. गरेणैव सह संजात इति सगरः । अ० ८ श्लो० ४ पहा. ९. विलक्षण केला वेष ज्यांचा असे. कोणाची अर्धी हजामत केली, कोणाला केश मोकळे सोडायला सांगितले इ०. अ० ८ श्लो० ६।७ पहा. १०. शत्रु. ११. लहान खेडीं. १२. पर्वताच्या पायथ्याजवळचीं खेडीं. १३. पर्वताचा शत्रु, इंद्र. १४. शुद्ध (विमल) कीर्तीची. १५. थोरवी, मोठेपणा. १६. व्यर्थ, निष्फळ. १७. गर्विष्ट. १८. खळगे. १९. ईशानी दिशा. २०. त्या ऋषीचे जवळ, कपिलमुनीजवळ. २१. अनादर करिती. २२. चलदल (अश्वत्थ, पिंपळ)+नग(वृक्ष)=पिंपळाचा वृक्ष. श्रावणमासांत दर शनिवारीं या वृक्षाचें सूर्योदयाच्या पूर्वीं पूजन करण्याची चाल आहे. या दिवशीं प्रातःकाळीं श्रीविष्णु लक्ष्मीसह पिंपळावर वास करतात असें वर्णन आहे. [चलं दलमस्य स चलदलः.] २३. वानराला. २४. ते सगरपुत्र.

भस्म क्षणांत झाले, नच भगवत्कपिलविष्णुरोषानें. ॥ ११६

वा[1] जी शोधायाला पाठविला अंशुमान्[2] नृपें सगरें, ।
ज्याचा गुरु[3] असमंजस आठविला 'हाय!' म्हणुनि त्या नगरें[4]. ॥ ११७

सु त असमंजस सगरप्रभुचा जो संग[5] युक्तिनें उडवी[6], ।
कीं पौरबालकांतें[7] नेउनि सरयूंत खेळतां बुडवी. ॥ ११८

दे त्यासि निरोप पिता कीं करितो जो विघात कीनाश[8], ।
जावू स्वैर, न दावू मुख, पावो पौरघातकी नाश. ॥ ११९

वा रिगृहीं श्रीशरयूधात्रीस कथूनि मुदित[9] राखविले, ।
ते पुर सोडुनि जातां स्नात अलंकृत कुमार दाखविले[10]. ॥ १२०

य मसा आधीं दारुण, मग गमला मायबापसा लोकीं, ।
तो अंशुमान् तयाचा सुत सगरातें बुडों न दे शोकीं. ॥ १२१

न गरांतूनि निघुनि, हय शोधित जाऊनि पाहुनि तयातें, ।
कपिलातें नमुनि स्तवि[11], करि[12] जेणें प्रभुसि ये बहु दया तें. ॥ १२२

मो रासि घन तसा त्या निववी श्रीकपिलहरि म्हणे, '[13]हरि घे, ।
हे[14] दग्ध पितर तारिल [15]गंगोदक, इतर गुरु भरीं न रिघे.' ॥ १२३

भ[16] गवंतातें वंदुनि दे हय नेऊनि सगर राजाला, ।
क्रतु[17]शेष समाप्त करी बहु सुखवी अंशुमान् स्वआजाला[18]. ॥ १२४

---

१. अश्व. २. सगराला केशिनी नामक स्त्रीपासून झालेला असमंजस त्याचा पुत्र. ३. ज्याचा (ज्या अंशुमानाचा) पिता, बाप. ज्याला अज्ञ लोक असमंजस समजत असत, परंतु जो खरोखर पाहिलें असतां, समंजस होता. हा पूर्वजन्मीं योगी असून योगापासून भ्रष्ट झाल्यामुळें या जन्मीं राजकुलांत जन्मला. परंतु याला पूर्वजन्माचें स्मरण असल्यामुळें लोकांच्या संगतीचा त्याग घडावा म्हणून लोकांना न आवडणारीं कृत्यें करी व म्हणून ते त्याला असमंजस म्हणत. अध्याय ८ श्लो० १६।१७।१८ पहा. ४. नगरवासिजनांनीं. ५. ऐहिक मार्गावलंबी लोकांची संगति. ६. टाळी. ७. नागरिकांच्या मुलांना. ८. यम. ९. आनंदित. १०. असमंजस राजानें बुडविलेले मुलगे योगबळानें दाखविले. ११. अध्याय ८ श्लो० २२-२७ पहा. १२. '(अंशुमान्) तें करि जेणें (ज्यायोगें) प्रभुसि (प्रभुकपिलास) बहु दया ये'–असा अन्वय लावावा. १३. घोडा. १४. गंगोदक हे दग्धपितर (तुझे चुलते) तारिल, इतर गुरुभरीं (महापातकांत) न रिघे. महापातकाचें क्षालन गंगोदकानेंच होतें, इतर कशानेंही होणें अशक्य–असा भाव. १५. अ० ८ श्लो० २९ पहा. १६. भगवान् कपिलमुनि यातें. १७. राहिलेला यज्ञ. १८. सगराला.

ग ति बरवी [1]और्वाप्तें ज्ञानें तो **सगर** पावला आजा, ।
जैसा तसाचि झाला त्या मागें साधु **अंशुमान्** राजा. ॥ १२५

[2]**व** सुधेवरि **गंगेतें** आणाया तप करूनि [3]तो मेला, ।
तत्सुत **दिलीप** नृपही त्यास्तव तत्सुत **भगीरथहि** गेला. ॥ १२६

ते श्रीगंगा भेटे, जीचा सद्गति जना [4]कथासव दे, ।
'[5]वेगधर कोण? कोठें क्षाळुं [6]अघ?' हें **भगीरथास** वदे. ॥ १२७

'[7]**वा** मादिदेव वेगा धरिल.' **भगीरथ** म्हणे, 'अघहि **गंगे**! ।
हरितिल [8]हरिजन [9]त्याचें [10]हृदयस्थमुकुंदचिंतनें [11]भंगे. ॥ १२८

[12]**सु** रमणितें आराधी, धरि तीच्या तोहि देव वेगातें, ।
गंगा सगरसुतांतें पद दे, कोणा न देववे [13]गा! तें. ॥ १२९

दे वी **भगीरथाची** कन्या **भागीरथी** असें [14]म्हणते ।
[15]**गंगाप्रसादभाजन** होती, स्मरती तिला क्षणक्षण ते. ॥ १३०

[16]**वा** सवमान्यभगीरथवंशीं [17]**सौदास मित्रसह** [18]चारी, ।
मृगयेसि वनीं गेला तेथें एका [19]निशाचरा मारी. ॥ १३१

य त्तें **सौदासगृहीं** [20]तदनुज राहे करूनि [21]सूदपण, ।
सेवेसि जपे वाटी अर्धी उष्णचि भरूनि [22]मूद पण. ॥ १३२

न रमांस **वसिष्ठाला** वाढी तें त्यासि समजलें पाप, ।
न करुनि विचार 'राक्षस हो' ऐसा [23]मुनि [24]नृपासि दे शाप. ॥ १३३

मो ठा प्रमाद राक्षसकृत हें हा मजचि शब्द बा! राहो, ।
'[25]स्वल्पसमय शाप' म्हणे गुरुराज, '[26]पलाश [27]अब्द बारा हो.' ॥ १३४

---

१. और्वनामक गुरूपासून प्राप्त झालेल्या (ज्ञानानें). और्वोपदिष्ट ज्ञानानें. २. पृथ्वीवर. ३. अंशुमान् राजा. ४. कथारस. उदाहरणार्थ—गंगालहरी. ५. स्वर्गातून भूमीवर पडणारा माझा वेग धारण करणारा. ६. लोकांनीं माझ्या उदकांत क्षालन केलेलें पाप (मी) कोठें क्षाळूं. [अ० ९ श्लो० ४-५.] ७. वामदेव, महादेव. ८. परमेश्वराचे भक्त, संतजन. ९. यापुढें 'अघ'पद अध्याहृत समजावें. १०. हृदयांत वास करणाऱ्या मुकुंदाच्या चिंतनानें. ११. नाशे, नाश पावे. १२. महादेवातें. १३. अगा. १४. म्हणणारे. १५. गंगेच्या कृपेला पात्र. १६. इंद्राला मान्य असा जो भगीरथ त्याच्या वंशीं. १७. सौदासाचींच मित्रसह व कल्माषांघ्रि (कल्माषपाद) अशीं दुसरीं नांवें आहेत. १८. फिरतां फिरतां. १९. राक्षसाला. २०. त्या मारलेल्या राक्षसाचा धाकटा भाऊ. २१. स्वयंपाकीपणा. [अ० ९ श्लो० २०-२२.] २२. भाताची मूद. २३. वसिष्ठऋषि. २४. सौदास राजाला. २५. अल्पकालपर्यंत. २६. पल+अश=मांस खाणारा. (राक्षस.) २७. वर्षें. पहिल्यानें 'कायमचें

भ स्म गुरुसि करिन' म्हणुनि त्या **सौदासेंहि** घेतलें तोयं[1], ।
स्त्री[2] वारि, स्वपदीं घे, राक्षस 'कल्माषपाद' तो होय. ॥ १३५
गं[3] र्भाधानादृत ऋषिसुत [4]तो राक्षसपणांत धरि खाया, ।
तत्पत्नी[5] बहु विनवी निजपतिदानें वनांत हरिखाया[6]. ॥ १३६
व चनें करुणें[7] न गणी; व्याघ्र मृगा तेंवि खाय त्या[8] पापी, ।
'गर्भाधानीं मरसिल[9] तूंहि' असें त्यासि ती सती शापी. ॥ १३७
ते णें अनपत्य[10] नृपति, तत्प्रार्थित गुरु **वसिष्ठ** सुतपा[11] हे, ।
मदयंती गर्भवती शीघ्र म्हणें कल्मषांघ्रि सुत पाहे. ॥ १३८
वा ढुनि उदरीं तीच्या होता तो गर्भ सप्तमित[12] अब्द, ।
तदुदर उपळें[13] ताडी गुरु, लागों दे न निजयशा शब्द[14]. ॥ १३९
सु त मदयंतीचा तो अश्मकनामा[15] तदीयतनयातें[16], ।
'**नारीकवच**[17]' असें किति म्हणती, '**मूलक**' असेंहि जन यातें. ॥१४०
दे हावसान तोंवरि, देवांचें दों घडींत[18] निजकार्य, ।
हरिचिंतन करुनि तरे तो नृप **खट्वांग** या कुळीं आर्य. ॥ १४१

राक्षसत्व प्राप्त होवो,' असा शाप दिला, परंतु पुढें हें कृत्य राक्षसाचें आहे असें समजल्यावर 'बारा वर्षे राक्षस हो' म्हणून म्हणाले.

१. (शाप देण्याकरितां) पाणी. २. मदयंतीनामक. ३. स्त्रीशीं एकांतांत रममाण होत असतां. ४. तो (कल्माषपाद) राक्षसपणांत (राक्षस झाल्यावर) गर्भाधानादृत ऋषिसुत (मैथुनासक्त एका मुनिकुमाराला) खाया (खाण्यासाठीं) धरि (धरिता झाला). [अ० ९ श्लो० २५.] ५. त्या मुनिकुमाराची भार्या. ६. हर्षाया. ७. दीन. ८. तरुण ऋषिपुत्राला. ९. अध्याय ९ श्लोक ३५ पहा. १०. निपुत्रिक. ही कथा शिवलीलामृताचे ३ ऱ्या अध्यायांत आहे. ओं० १-४५ पहा. ११. महातपस्वी. १२. सात (वर्षें). १३. दगडानें. १४. कलंक. १५. अश्मानें (पाषाणानें) पोट ठेंचून याला बाहेर काढलें म्हणून याचें नांव 'अश्मक' असें ठेविलें. अ० ९ श्लो० ३९ पहा. १६. अश्मकाच्या पुत्रातें. १७. स्त्रीभिः संवेष्ट्य परशुरामात्परिरक्षितः, अतो नारीकवच इत्युक्तः । निःक्षत्रे सति क्षत्रवंशस्य मूलमभवत्, अतो मूलक इति चोक्तः ॥ (अध्याय ९ श्लो० ४०.) क्षत्रियांचा नाश करणाऱ्या परशुरामापासून स्त्रियांनीं सभोंवतीं उभें राहून याचें रक्षण केलें म्हणून 'नारीकवच' व हा जगला म्हणून पुढें क्षत्रियवंश राहिला म्हणून 'मूलक' अशीं नांवें पडलीं. १८. दैत्यांचा नाश केल्यावर देव प्रसन्न होऊन 'वर माग' असें म्हणाले असतां 'माझें आयुष्य किती राहिलें तें सांगा' असें खट्वांगराजा म्हणाला, व त्यांनीं 'तुझें आयुष्य एक मुहूर्त आहे' असें उत्तर केलें. या कथेला अनुलक्षून ही गीति आहे. [अ० ९ श्लो० ४१-४२.]

वा! या **खट्वांगा**चा जो सुत तो **दीर्घबाहु**नामा गा, ।
[1]त्याचाहि **रघु**, म्हणे जो, 'द्विज हो! धन काय बाहुना मागा.'॥ १४२

य श कवि गाती ज्याचें तो **रघुसुत अज** तयासि सुत झाला, ।
श्री**दशरथ** नृप ज्याच्या पोटा श्री**रामचंद्र** **ह**रि आला. ॥ १४३

नं[2] यनाभिरामरूप [3]श्री**राम** तसाचि **लक्ष्मण** व्यक्त, ।
भरतहि **शत्रुघ्न**हि हे एक, परि ज्येष्ठबंधुचे भक्त. ॥ १४४

मो ठा प्रताप [4]**गा**धिजमखरक्षण [5]**गौ**तमांगनोद्धार, ।
हरचापभंग जेणें बळशाली भूप गांजिले फार. ॥ १४५

भ क्ता **सीता** **लक्ष्मी** **जनकसुता** [6]तत्करग्रह, प्राज्य ।
मद [7]**रा**माचा हरिला, त्यजिलें [8]पितृसत्यरक्षणा राज्य. ॥ १४६

गं[9] मनागमना अडचण **शूर्पणखा**प्राणवायुची वारी, ।
खरदूषणादि देवासह्य चतुर्दश सहस्र खळ मारी. ॥ १४७

वं[10] सुधावत्साविरहीं रडुनि [11]स्त्रीपरजनासि वेडावी, ।
शबरीस बरी गति दे [12]तनुवेडी ईश्वरेंचि फेडावी. ॥ १४८

ते जस्वीही मथिला मित्र[13]**सु**कंठप्रियार्थ तो **वाळी**, ।
ज्याच्या पायांसि [14]मुकुटमणिदीपांहीं [15]अराति ओंवाळी. ॥ १४९

---

१. रघुवंशांत रघु दिलीपाचा मुलगा असें वर्णिलें आहे. २. डोळ्यांना आनंद देणारें रूप आहे ज्याचें असा. ३. राम वगैरे नांवाची व्युत्पत्ति येणेंप्रमाणें:–यस्मिन् रमंते मुनयो विद्ययाज्ञानविप्लवे । तं गुरुः प्राह रामेति रमणाद्राम इत्यपि ॥ ४० ॥ भरणाद्भरतो नाम लक्ष्मणं लक्षणान्वितम् । शत्रुघ्नं शत्रुहंतारमेवं गुरुरभाषत ॥ ४१ ॥ (अध्यात्म-रामायण–बालकांड–अध्याय) ३ पहा. ४. विश्वामित्राच्या यज्ञाचें रक्षण. ५. गौतमऋषीची स्त्री अहल्या तिचा उद्धार. ६. त्या सीतेचें पाणिग्रहण. ७. परशुरामाचा. रामाची लग्नाहून परत जातांना परशुरामाशीं गांठ पडली व त्या वेळीं क्षत्रियांचा नाश करणारा परशुराम याचे चापाला शर लावून त्याच्या मदाचें हरण केलें. अ० रा०–बा० का०–स० ७ श्लो० ११-१९ पहा. [अ० १० श्लो० ७.] ८. कैकेयीला दशरथानें दिलेल्या वरांचें सत्यत्व राखण्याकरितां. ९. गमनागमना (श्वासोच्छ्वासाविषयींची) शूर्पणखाप्राणवायुची अडचण (नाक कापून) वारी (दूर करी). १०. सीतेच्या विरहानें. ११. स्त्रैणास, स्त्रीलंपटास. १२. शरीररूप बेडी, जननमरण. १३. सुग्रीवाचे हिताकरितां. १४. मुकुटांत (खचिलेले) मणि (रत्नें) हेच कोणी दीप यांहीं. या पदानें वालीचें सार्वभौमत्व दाखविलें आहे. १५. शत्रु.

वा नरसेना मिळवुनि **सी**तेचा प्रथम आणवी शोध, ।
मग [1]दक्षिण वारिधिचें रोधी [2]निजबळपयोधिनें [3]रोध. ॥ १५०
[4]सु मनाप्रति [5]मधुप तसा निजचरणाप्रति निघोनि आला जो, ।
[6]अरिबंधु त्यास [7]पद दे, **राम** म्हणे, '[8]पंक्तितुंड या लाजो.' ॥ १५१
दे प्रथम मार्ग न वळे जलधी मग हो न **राम** कां [9]परसा, ।
क्षोभे प्रभु, सागर किति? पावे [10]सर्वसहाहि कांप [11]रसा. ॥ १५२
वा रिधि [12]रूपीं भेटे, प्रार्थी रघुनायका, 'यश [13]तगावें.' ।
[14]करिता लक्षहि गावें, फार नवल, सेतु [15]काय शत गावें? ॥ १५३
य म जीकडे न पाहे [16]कपिनीं ती **राम** कांपवी **लं**का, ।
गट गट [17]घटकर्ण गिळी, त्याची कोणी धरीचना शंका. ॥ १५४
[18]न गतरुधर कपि, [19]नानायुधधर राक्षस तशांचिया कोटी, ।
मरती घडींत शतशा, संग्रामख्याति ती जगीं मोठी. ॥ १५५
मो हाया बहु माया करिति **द**शमुखादि मत्त [20]मायावी, ।
भस्मचि व्हावी [21]ती जी भंगाया [22]राजसत्तमा [23]यावी! ॥ १५६
भ स्म प्रभुनें केला [24]सानुज [25]सात्मज ससैन्य [26]अहित रणीं, ।
[27]प्रभुचि पराचा करिती [28]भेकतमाचा न नाश [29]अहितरणी. ॥ १५७
ग रुडें अहि सिंहें गज मर्दावे, सिंह जेंवि [30]शरभानें, ।
प्रभुनें राक्षस तैसे, हरिति [31]परांचीं पळांत [32]शर [33]भानें. ॥ १५८

---

१. दक्षिणसमुद्राचें. २. आपल्या सेनासमुद्रानें. ३. तीर. ४. सुमन=पुष्प. ५. भ्रमर, ६. शत्रु जो रावण त्याचा भाऊ बिभीषण. ७. लंकेच्या राजाचें पद. ८. दशमुख. रावण. ९. शत्रुसा. १०. सर्व सहन करणारीही. ११. पृथ्वी. १२. मूर्तिमान्. १३. चिरकाल रहावें. १४. लक्षहि गावें (योजनें) [सेतु] करिता (करणारा) [असा राम होता]. १५. सेतु शत गावें (योजनें) काय? (काय मोठा झाला?) १६. वानरांकडून. १७. रावणबंधु कुंभकर्ण. १८. पर्वत व झाडें धरणारे. (पर्वत व झाडें ह्यांनीं लढणारे.) १९. नाना प्रकारचीं आयुधें धारण करणारे (राक्षस). २०. कपटी. २१. ती (माया). २२. नृपश्रेष्ठ रामाला. २३. माया यावी ही मोठी आश्चर्याची गोष्ट आहे. २४. धाकटा भाऊ जो कुंभकर्ण त्यासह. २५. इंद्रजित्-प्रभृति मुलांसह. २६. शत्रु (रावण). २७. या अर्थांत फक्त प्रभुच शत्रूंचा पूर्ण नाश करण्यास समर्थ आहे, इतर तसें करूं शकत नाहींत असें द्योतित केलें आहे. २८. भेकरूप काळोखाचा. येथें हें **रूपक** आहे. [भेक=बेडूक.] २९. सर्परूप सूर्य. ३०. प्राणिविशेष. हा प्राणी सिंहाचा प्राण घेतो. ३१. शत्रूंचीं (भानें). ३२. प्रभूचे शर. ३३. देहस्मृति.

व न्हींत शिरुनि कळवी शुचिता[1] उचिता पतिव्रता[2] पतिला, ।
प्रिय[3]विरहचि दे दुःसह तिळहि दहन[4] तो न तीव्र ताप तिला[5]. ॥ १५९

ते थुनि **पु**ष्पकयानीं बसुनि **बि**भीषण**सु**कंठसह तूर्ण, ।
आला **सा**केताला[6] **भ**रतमनोरथ करावया पूर्ण. ॥ १६०

वां[7] णी श्रीस[8] सुखास प्रभु राज्यांत प्रजेसि लव नाहीं, ।
भवनाहीं[9] स्वर्ग दिला स्मरुं **नं**दनही तसेंच न वनाहीं. ॥ १६१

सु ज्ञाची मर्यादा किति सांगों? भी जडाहि[10] परिटा[11] कीं, ।
अव लावी, **राम** म्हणे, '**सौ**मित्रे! हे सतीच परि टाकीं.' ॥ १६२

दे[12] वी **कुश लव** दोघे **वा**ल्मीक्याश्रमपदीं सुत प्रसवे, ।
दोघे दोघेचि तिघां[13], सोडुनि **रा**मासि पळ तयां[14] नसवे[15]. ॥ १६३

वा ल्मीकिगीत सेविल कोणी **श्रीरामचरित** जरि लवही, ।
तरि यम[16]धर्म तयाचें कर्म लिहाया करीं[17] न धरिल वही. ॥ १६४

य श बहु हें, वैकुंठा गेला पौराहि सकट कवि मानी, ।
येतां **सा**केताप्रति राम बसे जेंवि सैकटक[18] विमानीं[19]. ॥ १६५

न व राज्यें आंठांचीं[20] **कु**शवंशाकर प्रसिद्ध सन्महित[21], ।
ज्यांच्या सत्संततिच्या[22] गानें[23] श्रवणेंहि होय जन्महित[24]. ॥ १६६

मो ठा **नि**[25]मिही सत्रीं ऋत्विक् भावें वरी[26] **व**सिष्ठातें, ।
'शक्रमख करुनि येतों, तों थांब.' म्हणोनि जाय शिष्ठातें. ॥ १६७

---

१. शुद्धता, पवित्रता, अव्यभिचारिणीत्व. २. सीतासती. ३. रावणगृहीं असतांना रामापासून झालेला वियोग. ४. अग्नि. ५. सीतेला. ६. अयोध्येला. ७. कमताई. ८. संपत्तीची. ९. भवनांहीं (मंदिरांनीं, वाड्यांनीं) स्वर्ग स्मरूं दिला नाहीं, तसेंच वनांहीं (उपवनांनीं, बागांनीं) नंदनही (इंद्राची बाग) स्मरूं दिलें नाहीं. १०. अडाणी. ११. वरठी. १२. सीता. १३. लक्ष्मण, भरत व शत्रुघ्न यांच्या मुलांचीं नांवें अनुक्रमें अंगद-चित्रकेतु, तक्ष-पुष्कल, व सुबाहु-श्रुतसेन अशीं होतीं. १४. लक्ष्मण, भरत व शत्रुघ्न यांस. १५. न राहवे. १६. यमधर्म हा लोकांच्या पापपुण्याचा हिशोब ठेवितो आणि हें पापपुण्याचा जमाखर्च ठेवण्याचें जबाबदारीचें काम चित्रगुप्ताकरवीं करवितो-असा समज आहे. १७. हातांत. १८. सैन्यासहवर्तमान. १९. पुष्पक नांवाच्या विमानांत. २०. रामलक्ष्मणभरतशत्रुघ्न यांच्या आठ मुलांचीं. २१. साधुमान्य, सन्माननीय. २२. उत्तम पुत्रादिकांच्या. २३. कीर्तनानें व ऐकण्यानें. २४. जन्माचें सार्थक्य. २५. इक्ष्वाकूचा मुलगा निमिराजा. २६. ऋत्विक् होण्याकरितां प्रार्थी. [अ० १३ श्लो० १-१०.]

भ रंवसि याचें न कि[1]मपि, काळापासुनि न कोण सं[2]त्रास? ।
अन्य मुनि प्रार्थुनि तो **नि**मिराजा चालवी [3]स्वसत्रास. ॥ १६८
ग णुनि खळ मु[4]नी म्हणे, 'जन करुनि गु[5]रुमहत्वहानि मेला, हें ।
उमजो, तव देह पडो, शाप म्हणायासि '[6]हां! निमे! लाहें.' ॥ १६९
वं[7] मला शापविष **नि**मिहि, '[8]दोघांचे देह पावले पतन, ।
कुं[9]भीं **व**सिष्ठ उपजे, ऋषि **नि**मिदेहासि ठेविती [10]जंतन. ॥ १७०
ते ऋषि सुर सत्रांतीं आले जे त्यांसि म्हणति, 'हानि [11]मितें ।
अर्थें झाली, उठवा, तुमचें फेडील रीण हा **नि**मि तें.' ॥ १७१
[12]**वां** सवमुख सुर म्हणती 'बहु उत्तम.' तोंचि **नि**मि म्हणे, 'मजला ।
देहासीं योग नको, ज्ञाता [13]यांतें त्यजावया [14]सजला.' ॥ १७२
सु र देती त्या **नि**मिला प्राण्याच्या लोचनांत [15]थारा हो, ।
[16]तद्देह मथुनि केला सुत कीं न अराजकव्यथा राहो. ॥ १७३
दे वांनीं **मि**थिल **जनक वै**देह असीं दिलीं [17]तैया नावें, ।
याच्या वंशींचे नृप जे त्यां [18]गेहींच मुक्त मानावें. ॥ १७४
[19]**वां** ट मखाचा करितां [20]श्री**सी**ता सांपडे जया कन्या, ।
सीरध्वज **ज**नक असें म्हणती वंशज्ञ जन तया धन्या. ॥ १७५
य श अत्युत्तम याचें योगीश्वर **या**ज्ञवल्क्यसन्मुनितें ।
[21]समुपासुनि केलें जें आत्मविचारैककार्य जन्मुनि तें. ॥ १७६

---

१. कांहींही. जगांत कशाचाच भरंवसा नाहीं. हें शरीर अनित्य आहे. २. त्रासयुक्त.
३. आपल्या यज्ञास. ४. वसिष्ठऋषि. ५. गुरूच्या (कुलगुरूच्या अथवा वडिलांच्या) मोठे-
पणाचा नाश. गुरूचा मोठेपणा न राखल्यानें. ६. हाय! ७. 'तूझा ही देह पडो' असा नि-
मीनें शाप दिला. ८. वसिष्ठ-निमींचे. ९. कुंभांत. उर्वशीला पाहून स्खलित झालेलें
मित्रावरुणदेवाचें रेत ज्या कुंभांत ठेविलें होतें त्यांत. १०. जतन करून, काळजीपूर्वक.
११. मितें (अल्प) अर्थें (कारणास्तव). १२. इंद्रादि (देव). १३. देहातें. १४. तयार झाला.
[अ० १३ श्लो० ८.] १५. ठिकाण. उन्मेषनिमेषरूपांनीं लोचनांत असलेला असा. [अ० १३
श्लो० ११.] १६. निमीचा देह. १७. त्या निमीच्या देहापासून उत्पन्न झालेल्या मुलाला.
'जन्मना (असाधारणेन) जनकः सोऽभूद्वैदेहस्तु विदेहजः। मिथिलो मथनाज्जातो मिथिला
येन निर्मिता ॥' अ० १३ श्लो० १३ पहा. १८. घरीं असतांनाच. वनांत जाऊन तपश्चर्या
करून मुक्ति मिळविण्याची यांना जरूर नव्हती. १९. स्थान. २०. सीताग्रतः सीताकृत-
भूविवरात् जाता इति सीता. यज्ञभूमि तयार करीत असतां नांगराच्या लोखंडी अग्रानें
केलेल्या विवरांतून निघाली म्हणून सीता नांव पडलें. २१. पूजून, सेवा करून.

नं[1] लिननयननाभिनलिनभव [2]तत्सुत जो महर्षि **अत्रि**, तया ।
नेत्रां[3]पासुनि झाला [4]**सोम** [5]अमृतमूर्ति मत [6]जगत्रितया. ॥ १७७
मो ठा मद होय तया कीं केला [7]राजसूय [8]नक्षत्रें, ।
ब्राह्मण औषधि यांचा पति हा नमिजेल केंवि न [9]क्षत्रें? ॥ १७८
भं[10] व्यगुणा [11]**गु**रुभार्या **ता**रा नेली बळेंचि सोमानें, ।
गुरु मागे, बहुवार प्रार्थी, जरि तरि नदेचि तो मानें. ॥ १७९
गं[12] जवाह, [13]छात्र म्हणुनि [14]रुद्र मिळे गुरुसि [15]गुरुसुतस्नेहें, ।
संग्राम [16]तारकामय यांत गळालीं असंख्य बा! देहें. ॥ १८०
वँ[17] नतनुकडे [18]कवि मिळे गुरुच्या द्वेषामुळें असुरसहित, ।
कीं देवारीस तसा गमला सोमासही असुरस हित. ॥ १८१
ते व्हां हें वृत्त कथी **वि**धिला भेटोनि [19]**अं**गिरा [20]आंगें, ।
विनवुनि म्हणे, 'प्रभो! त्या **सो**माला धर्म तूं तरी सांगें.' ॥ १८२
वां[21] रिजभव सोमातें धिक्कारुनि गुरुसि दे स्वयें **ता**रा, ।
'[22]अहिताहित गर्भ कसा वाहसि होऊनि आमुची [23]दारा?' ॥ १८३
सु रगुरु असें म्हणे, तो पाठीसचि लागला, तिणें, 'गर्भ ।

१. नलिननयन (कमलनेत्र–विष्णु) नाभिनलिनभव (नाभिकमलापासून झालेला)= कमलनेत्र जो विष्णु त्याच्या नाभिकमलापासून झालेला ब्रह्मदेव. २. त्याचा (ब्रह्मदेवाचा) मुलगा. ३. अ० १४ श्लो० २ पहा. ४. चंद्र. ५. अमृतमय. आनंदाश्रुपासून झाला म्हणून अमृतमय. ६. तिन्ही जगांला नत (पूज्य). ७. राज्ञा लतात्मकः सोमः सूयतेऽत्र राजसूयम्. ८. चंद्राला 'ओषधीश' 'ओषधिनाथ' असें नांव आहे, कारण तो त्या ओषधींचें पोषण करतो. 'पुष्णामि चौषधीः सर्वाः सोमो भूत्वा रसात्मकः' (गीता–१५-१३)=मी रसमय सोम होऊन सर्व औषधींचें पोषण करतों–या प्राचीन समजुतीस अनुलक्षून हें वर्णन आहे. ९. क्षत्रियानें. क्षतात् (दुःखापासून) त्रायते (रक्षण करितो) (तो) क्षत्रः (क्षत्रिय). १०. सद्गुणसंपन्ना. ११. गुरु (बृहस्पति), त्याची भार्या (बायको). १२. इंद्र. १३. (बृहस्पतीचा) शिष्य. १४. हर. १५. गुरु अंगिरस यांचा मुलगा बृहस्पति याच्या स्नेहानें. श्रीमहादेव अंगिरसापासून विद्या शिकले. १६. तारकामय=तारका नक्षत्राणि सैनिकरूपाणि तत्प्रधानस्तारकामयः । यद्वा तारका तारा तदर्थं प्रवृत्तः इत्यर्थः । [अ० १४ श्लो० ७ टीका पहा.] रामायण–युद्धकांड–सर्ग ४ श्लो० ५४ टीका पहा. १७. चंद्राकडे. वनतनु शब्दाचा 'जलमय आहे शरीर ज्याचें असा' असा अर्थ आहे. वन (जल)+तनु (देह) ज्याची तो वनतनु. १८. शुक्र (राक्षसांचे गुरु). १९. बृहस्पतीचा बाप. २०. स्वतः. २१. ब्रह्मदेव. २२. अहित (शत्रु–सोम) यानें आहित (ठेवलेला), चंद्राचा पोटचा (गर्भ). २३. बायको. हें बृहस्पतीचें वचन आहे.

दु:प्रज्ञे ! [1]त्यज' म्हणतां, त्यजिला तो हा तसा जसा दर्भ. ॥ १८४
दे वांचा [2]गुरु पाहे, 'कनकनिभ कुमार' मग म्हणे '[3]माझा,' ।
'जा जा तुझा कसा हा ?' तो विप्रांचा असें म्हणे [4]राजा. ॥ १८५
'**[5]बा** ई ! हा कोणाचा'? ऐसें पुसती ऋषी, न ती सांगे, ।
[6]पुत्र म्हणे, 'दुर्वृत्ते ! मौन कशाला ? न सांगसी कां गे ?' ॥ १८६
य तें [7]**द्रु**हिण तिस पुसे, सांत्वुनि घालुनि शपथ [8]सोमाचा, ।
हळुच म्हणे, '[9]मामाजी ! पुसतां तरि सत्य तनय **सो**[10]मांचा.' ॥ १८७
[11]नें क्षत्रेशें नेला लावण्याद्भुतसुधासर कुमार, ।
विधि त्यासि म्हणे, 'पाहुनि तुजमागें बा ! **बु**धा ! [12]सरकु [13]मार.' ॥ १८८
मो दितमानस केला **सोम बु**धें, यास ती [14]इला लाहे, ।
तेंव्हां **पु**रूरवा [15]सुत [16]सन्मणि पुण्यर्धिनें मिळाला हे. ॥ १८९
भ रिला **पु**रूरवा तो [17]हृदयीं [18]देवर्षिगीतगुणपानें ।
उर्वशि म्हणे, 'भजावें त्या अविमुक्तासि या [19]स्वकुणपानें.' ॥ १९०
[20]गं रसा जाचित होता जो **मि**त्रावरुणशाप तोच [21]हित ।
वाटे, [22]ती वीज घना या वरि, देवांत पद जिचें महित. ॥ १९१
व सुधापति बहुमानी रोमांचित होय दर्शनें तीच्या ।
सर्वोत्कृष्टत्वाप्रति संगें देऊनि हर्ष [23]नेतीच्या. ॥ १९२
ते उर्वशी म्हणे, 'मी सेविन घृतमात्र, [24]उरणकप्राण ।
[25]सुरतींच नग्नदर्शन, या [26]समयाचें करीं परित्राण.' ॥ १९३

---

१. अ० १४ श्लो० ९-१० पहा. २ बृहस्पति. ३. माझा. ४. विप्रांचा राजा चंद्र (माझा मुलगा असें म्हणे). ५. बाई तारे. ६. बुध. ७. ब्रह्मदेव. ८. स+उमा. पार्वतीसह जो शिव त्याचा (शपथ). ९. हे ब्रह्मदेवा! ब्रह्मदेव चंद्राचे आजोबा म्हणून तारेचे ते आजेसासरे. सासऱ्याला मामा व सासूला मामी म्हणण्याची चाल आहे. १०. चंद्राचा. [अ० १४ श्लो० १३.] ११. चंद्रानें. १२. मागें जाऊ. बुधाचें लावण्य मदनाच्या लावण्यापेक्षां अधिक होतें–असा भाव. १३. मदन. १४. स्त्रीत्व पावलेला सुद्युम्ननामक मनुपुत्र. गी० ११-१२ पहा. १५. बुध+इला यांचा पुत्र पुरूरवा. [अ० १४ श्लो० १५]. १६. सज्जनांत श्रेष्ठ. १७. हृदयीं भरणें=मनास येणें, आवडणें. १८. देवर्षीनें (नारदानें) गायिलेले गुण ऐकून. १९. स्वशरीरानें. २०. विषसा. २१. हितकारक. २२. ती उर्वशीरूप वीज या पुरूरवारूप घना (ढगाला) वरि (नवरा करी). २३. नेणारीच्या. २४. मेंढे, मेष. (दोन.) हे दोन मेष निक्षेपरूप ठेव. २५. रतिकालींच, एकांतांत असतां. २६. प्रतिज्ञेचें, वचनाचें. [अ० १४ श्लो० २१-२२.]

वा हुनि आण म्हणे 'हें मान्य मला' तो **पुरूरवा** भूप,।
भुलवी तीचें त्याला अद्भुत त्याचेंहि तें तिला रूप. ॥ १९४

सु रतसुख **उर्वशी** दे राजा बहुतचि सुरूप हा तीतें ।
[1]लक्ष्मीशध्यानार्थी सुमिथुन सन्मुनि गुरू पहाती तें. ॥ १९५

[2]**दे** वेश म्हणे, 'नाहीं [3]श्री, नसतां **उर्वशी** सुरसभेला, ।
[4]सुरदृष्टिमक्षिकाला दाता गंधर्व हो! सुरस भेलीं[5].' ॥ १९६

वा सववचनें चोरिति [6]रात्रौ गंधर्व त्या उरणकांतें, ।
तो [7]क्लीब म्हणे राजा [8]देवीवच आणिना स्फुरण कां तें? ॥ १९७

[9]**यं** ष्टि तसी [10]खङ्गलता घे धांवे न गणि अंधकारा, ते ।
मेष त्यजिती पळती म्हणती, 'फळलासि [11]अंधकाराते!' ॥ १९८

[12]**न** ग्नचि गेला होता आवेशें सोडवूनि ते [13]उरण, ।
आला [14]समीप जों, तों झालें सहसा [15]तडिल्लतास्फुरण. ॥ १९९

मो हुनि [16]देवी [17]जातां, राजा उन्मत्तसा बहु [18]भ्रमला, ।
पाहे मग तीस **कुरुक्षेत्रीं** सुसरस्वतीतटीं श्रमला. ॥ २००

भ जुनि पुन्हाहि भजाया प्रार्थी प्रेमें तयासि ती देवी, ।
[19]स्त्रीहृदय उग्र कळवी, परि तो नृप तीवरीच मन ठेवी. ॥ २०१

ग र्भवती हें कळवी, भेटे तेथेंचि ती पुन्हा [20]वर्षें, ।
नृप एकरात्र तीसीं क्रीडे पहिला जसा तसा हर्षे. ॥ २०२

व सला त्या देवीच्या लोकीं, स्फुरल्या मनीं [21]त्रयी विधिनें ।
आराधुनियां **हरितें**, केला पूर्णेच्छ तो [22]दयानिधिनें. ॥ २०३

ते [23]उर्वशीतनूद्भव [24]सा त्यांत ज्येष्ठ पुत्र तो **आयु** ।
हा युद्धीं [25]अहितांतें मेधे[26] करुनि जाहला स्वयें वायु. ॥ २०४

---

१. विष्णूचें ध्यान करणारे. २. इंद्र. ३. शोभा. ४. देवाचे डोळे हेच माशा त्यांना. ५. गुळाचा भेला. नागपूर प्रांतांत गुळाच्या दोन दोन चार चार मणांच्या गोळ्याला भेला म्हणतात. ६. मध्यरात्रीं. ७. नपुंसक. ८. उर्वशीचें वचन. ९. अध्याय १४ श्लो० ३० पहा. १०. गंधर्व. ११. शिवा! १२. नागवा, वस्त्ररहित. १३. मेंढे. १४. (उर्वशीच्या)जवळ. १५. विजेचें स्फुरण. १६. उर्वशी. १७. भाषाभंगामुळें उर्वशी निघून गेली. १८. फिरला. १९. अध्याय १४ श्लो० ३६ पहा. २०. एका वर्षानें. २१. कर्मबोधक वेदत्रय. २२. दयासागरानें. २३. उर्वशीचे मुलगे. २४. सहा. [अ० १५ श्लो० १.] २५. शत्रूतें.

वा रिधिला [1]घटज तसा गंगेला जो [2]महातपा प्याला ।
जन्हु कुळींचा [3]यद्यश कर दे जातां वहात पाप्याला. ॥ २०५

[4]**सु** रसा सुगुण धरापति याचिकुळीं तो **कु**शांबसुत **गा**धी, ।
याची कन्या नामें **स**त्यवती तिस ऋचीकमुनि [5]साधी. ॥ २०६

'**दे**' म्हणतां **गा**धि म्हणे, 'पंक्ति[6]शत श्यामकर्ण दे [7]वाजी,' ।
हयदक्षिणा **व**रुण दे, सुखहेतु [8]ऋचीकभूमिदेवा जी. ॥ २०७

वा जिसहस्र समर्पुनि दावुनि सामर्थ्य वारिला [9]आधी, ।
सत्पात्रीं कन्यार्पण करवुनि [10]दांटूनि तारिला **गा**धी. ॥ २०८

[11]**य**मिवर्या त्या विनवी त्याची भार्या सुबुद्धि **स**त्यवती ।
तैसीच तिची माता आपण व्हायास [12]साध्व्यपत्यवती. ॥ २०९

न विफळ व्हाया प्रार्थी [13]दोघींचें [14]कल्पपूर्व तो तरु तें, ।
[15]भगवान् सिद्ध करि [16]उभयमंत्रांहीं कार्यसाधका [17]चरुतें. ॥ २१०

मो हें माता [18]कन्याचरुभागामाजि अधिक गुण लक्षी, ।
निजचरु [19]सुतेसि देउनि मागुनि घेउनि तदीय चरु भक्षी. ॥ २११

भ क्षितचरुचा व्यत्यय समजुनि भगवान् म्हणे, 'प्रिये! घोर ।
तुज सुत होइल, त्या तव मातेला साधु [20]सत्तपा थोर.' ॥ २१२

ग डबडुनि म्हणे, 'प्रभुजी! मजला तो घोर सुत नसो, फिरवा, ।
[21]जिरवा पोटीं, माझा अपराध [22]स्वाद्भुतक्षमा मिरवा.' ॥ २१३

व दला मुनि, '**स**त्यवती! प्रार्थिसि चुकल्येंच परि न कोपावें, ।
पौत्रीं[23] तरि तसा होइल घोर तनय म्हणसि जरि नको पावें.' ॥ २१४

---

१. घटापासून झालेला ऋषि, अगस्ति. २. महातपा. (मोठा तपस्वी जन्हु) यानें गंगेचें पान केलें. [अ० १५ श्लो० ३.] ३. ज्याचें (जन्हूचें) यश (कीर्ति) वहात जातां पाप्याला कर दे (हात दे, उद्धारी). ४. देवासारखा (देवाप्रमाणें) सुगुण (गुणसंपन्न). ५. प्राप्त करून घेई. ६. एक हजार, दहाशें. ७. घोडे. ८. ऋचीकनामक ब्राह्मणाला. ९. मानसिक चिंता दूर केली. १०. जबरीनें. ११. तापसश्रेष्ठाला. १२. साधु+अपत्यवती=उत्तम+पुत्रसहिता=सुपुत्रवती. १३. पत्नी आणि सासू यांचें इष्ट मनोगत. १४. 'कल्प' हें पद पूर्वी ज्याला असा 'तरु' (कल्पतरु), मनोवांछित देणारा. १५. ऋचीक मुनि. १६. ब्राह्म व क्षात्र मंत्रांनीं. १७. शिजलेल्या भातातें. १८. कन्येला (सत्यवतीला) दिलेल्या चरुभागामध्यें. १९. (आपला चरु) सत्यवतीला. [अ० १५ श्लो० ९.] २०. महातपस्वी, ब्रह्मवित्तम. २१. माफ करा. २२. आपली अलौकिक क्षमा. २३. नातू, मुलाचा मुलगा. तूं 'चुकल्यें' म्हणतेस तर तुझा मुलगा घोरकर्मा होणार नाहीं, परंतु नातू मात्र तसा होईल.

ते जसी **स**त्यवतीसुत **ज**मदग्नि प्रसिद्ध तो, आर्या ।
रेणुनृपाची कन्या त्या मुनिची **रे**णुका सती भार्या. ॥ २१५
[1]**वा** डववर**ज**मदग्निस पुत्र **व**सुमदादि शेवटिल [2]**रा**म, ।
ज्या ‘भगवदंश’ म्हणती, ज्याच्या बाहुद्वयीं अतुल [3]धाम. ॥ २१६
सु त **द**त्त **अ**त्रिचा जो त्या भगवंतासि भजुनि बलशाली, ।
[4]अर्जुन ज्या [5]परसेना भेद्या जसि [6]मुद्गरासि [7]कलशाली. ॥ २१७
दे[8] वासह्य [9]**द**शानन ज्या [10]वीरें **न**र्मदाऱ्हदीं क्रीडा ।
करितां धरिला, [11]हरिला मद **ह**रिला विक्रमें दिली [12]व्रीडा. ॥ २१८
बा हुसहस्र असे वर दुर्लभ पावे भजोनि जो **द**त्ता, ।
अतुल प्रताप लोकीं, ज्याची सर्वत्र सारिखी सत्ता. ॥ २१९
य क्षेश्वरसा **अ**र्जुन मृगयायोगें तपोवनीं जाय, ।
तो परमतपोनिधिचे श्रीम**ज्ज**मदग्निचे धरी पाय. ॥ २२०
[13]**न** रपतिस [14]बळासह दे भोजन, द्यावें जसें अमृत [15]शक्रें, ।
[16]बळ कामधेनुचें तें जाणुनि हरिली बळेंचि ती [17]वक्रें. ॥ २२१
मो डुनि सन्मर्यादा गेला घेऊनि [18]अग्निहोत्रीतें, ।
कळतां **रा**म न साहे, साहे **ज**मदग्नि [19]अग्निहोत्री तें. ॥ २२२
भ गवान् **रा**म [20]परश्वधकार्मुकधर सिंहसा उसळला, हो ! ।
अर्जुन काय? म्हणेना ‘ज्ञाता जय [21]पविपुढें मुसळ लाहो.’ ॥ २२३
ग रुडें जसा [22]महोरग परवीरांसकट तो खपविला हो ! ।
[23]जाणों **रा**म म्हणे, ‘[24]खलबलदलनें प्रकट तो[25]खें पविला [26]हो.’ ॥ २२४
व धिल्या एकें **रा**में सतरा अक्षौहिणी चमू क्रोधें ।
कदन सहस्रभुजांचें केलें द्विभुजेंचि त्या [27]महायोधें. ॥ २२५

---

१. ब्राह्मणश्रेष्ठ जमदग्नीला. २. परशुराम. ३. पराक्रम, बल. ४. हैहयाधिपति अर्जुन. श्रीदत्तात्रेयानें प्रसन्न होऊन याला हजार हात दिले. अ० १५ श्लोक १७, १९ पहा. ५. शत्रूंचें सैन्य. ६. शस्त्रविशेष. ७. घागरींची पंक्ति. ८. देवांना जो असह्य असा. ९. रावण. १०. अर्जुनानें. [नर्मदाजलांत स्त्रियांशीं क्रीडा करीत असतां. अ० १५ श्लो० २०.] ११. हरण केला. १२. लाज. व्रीडा दिली, लाजविलें. १३. अर्जुनास. १४. सैन्यासह. १५. इंद्रानें. १६. या आर्येत ‘बळ’शब्द तीन ठिकाणीं भिन्नार्थक योजिला आहे. १७. त्या दुराचरणी अर्जुनानें. १८. कामधेनूतें. १९. जमदग्निपुत्र परशुराम. २०. परश्वध+कार्मुक+धर=परशु+चाप+धरणारा. २१. वज्रापुढें. २२. मोठा साप. २३. ही **उत्प्रेक्षा** आहे. २४. खल जो अर्जुन त्याच्या सैन्याच्या संहारानें. २५. हर्ष. २६. होवो. २७. महावीर रामानें. (अ० १५ श्लो० ३४.)

ते व्हां अयुत [१]तदात्मज गेले [२]माहिष्मतीस सोडून, ।
गिरि करुनि [३]परशिरांचे ये, घेउनि धेनु, कीर्ति जोडून. ॥ २२६

[४]**बा** प म्हणे, 'अपराध स्वल्प, महादंड काय हा युक्त? ।
[५]राजवध ब्रह्मवधचि, हो आधी तीर्थसेवनें मुक्त.' ॥ २२७

[६]**सु** रधुन्यादि सुतीर्थें सेवाया एक लागला [७]अब्द, ।
मग राम आश्रमा ये ताताचा चालवूनियां शब्द. ॥ २२८

दे[८] वनदीप्रति गेली आणाया शीघ्र रेणुका तोय, ।
दर्शन [९]जलकेलिनिरतचित्ररथाचें [१०]सुरा तिला होय. ॥ २२९

[११]**वा** रि भरुनि [१२]होमसमय ढळल्यावरि [१३]भीत रेणुका आली, ।
होय पुढें घट ठेवुनि, काष्ठाच्या पुतळिची खरी [१४]आली. ॥ २३०

श मसम समर्थ दंडी शिवसा [१५]सर्वज्ञ मुनि म्हणे, '[१६]मळली, ।
गंधर्वीं चित्ररथीं झाली किंचित् [१७]स्पृहा तिची कळली.' ॥ २३१

'[१८]**न** गसा गुरुजन जो हा दुष्टे! त्वां आज रेणु केला गे!' ।
जमदग्नि म्हणे, 'मज तव [१९]असतीत्वें लाज रेणुके! लागे.' ॥ २३२

मो ठ्या क्षोभीं त्याचें रुद्राचें तेंवि दे [२०]वपु त्रास, ।
स्त्रीवध सांगे [२१]वसुमत्प्रमुखां तो [२२]भूमिदेव पुत्रांस. ॥ २३३

भ यविकळ सकळ झाले, चळचळ कांपोंचि लागले सुत ते, ।
असते [२३]तज्ज्ञ, निदेशें त्या चंद्रें सर्व [२४]सिंधुसे उतते. ॥ २३४

---

१. अर्जुनाचे मुलगे. २. अर्जुनाची नगरी. ३. शत्रूंच्या मस्तकांचे. ४. जमदग्नि. (परशुरामाचा बाप.) ५. अ० १५ श्लो० ४१ पहा. ६. गंगादि. ७. वर्ष. ८. पाणी. ९. अप्सरांसह जलक्रीडा करीत असलेल्या गंधर्वराज चित्ररथाचें दर्शन रेणुकेला सुरेसारखें भान नाहींसें करणारें झालें. त्यामुळें तिला पाणी घेऊन लवकर जाण्याचें भान राहिलें नाहीं. १०. मद्य झालें, मद्यासारखें मोहित करणारें झालें. ११. पाणी. १२. होम करण्याची वेळ. १३. जमदग्नि रागावतील म्हणून भीत भीत आली. मुनिशापशंकिता. १४. सखी. कांहीं न बोलतां उभी राहिली. १५. येथें 'सर्वज्ञ' हें पद साभिप्राय आहे. रेणुकेची व्यभिचारक्रिया मनानें समजली म्हणून 'सर्वज्ञ' हें पद योजिलें आहे. १६. (तिला–रेणुकेला) पाप घडलें. पापलिप्त झाली. १७. इच्छा. १८. जो हा (मी जमदग्नि) गुरुजन नगसा (पर्वतासारखा होतों त्या मला) गे! दुष्टे! त्वां आज रेणुकेला=तूं आपल्या दुष्ट कृत्यानें आज माझे मोठेपणाला कलंक लाविलास. १९. पातिव्रत्यभंगानें. २०. शरीर. २१. वसुमत् वगैरे मुलांना. २२. तो विप्र जमदग्नि. २३. जमदग्नीचा प्रभाव जाणणारे. २४. सागरासारखे उतास आले असते.

ग डबडला **राम** न तो, मान्या श्रुतिसीच ती [1]तदाज्ञा त्या; ।
भ्रात्यांसह [2]मातेतें मारी, सुखवी पित्या तदा ज्ञाल्या. ॥ २३५

व धितां वचनासरिसे सुत [3]दार, बहु प्रसन्न [4]मुनि होय; ।
अतितप्त परि निवालें त्या प्रभुचें हृदय तें, जसें तोय. ॥ २३६

ते व्हां **स**त्यवतीसुत 'वर माग' म्हणे तया नमुनि चरण; ।
राम म्हणे, 'उठवावे मृत सर्वहि, यां नसो [5]वधस्मरण.' ॥ २३७

[6]**वा** गमृतें मुनिच्या ते उठले निद्रेचिया जसे अंतीं, ।
जमदग्निराम यांचें अत्यद्भुत तेज वर्णिलें संतीं. ॥ २३८

सु त अयुत **अर्जुना**चे ते, नसतां **राम** आश्रमीं, आले; ।
[7]रेणुसुता विनवी, तरि **जमदग्नि**स दुष्ट मारिते झाले. ॥ २३९

दे हातें आलिंगुनि पतिच्या, करि शोक **रेणु**का भारी, ।
उर ताडुनि 'ये **रामा**!' यापरि हाका महासती मारी. ॥ २४०

वा णी कानीं शिरली जरि होता **राम** [8]काननीं दूर, ।
ये धांवुनि, पितृगतितें पाहुनि, करि फार शोक तो शूर. ॥ २४१

य मसा खवळे, [9]शवसह बंधूच्या करुनियां अधीन रडीं ।
उसळे, म्हणे, 'अरींचीं कापीन असींच मी कधीं नरडीं.' ॥ २४२

[10]**न** गरींत शिरे, क्रोधें [11]शत्रुशिरें परशु धरुनि [12]तो कापी; ।
उष्ण [13]क्षतज पिशाची पिउनि म्हणे पोट भरुनि [14]तोकों 'पी.' ॥ २४३

मो ठा प्रळयचि करि [15]अरिमूर्ध्यांच्या भीतिदायका ढीगा, ।
अयुतहि मारुनि [16]परिभवपंकांतुनि कीर्तिगाय काढी गा! ॥ २४४

भ गवान्-पितृशिर जोडी आणूनि, करावया [17]सव, धडास. ।

---

१. जमदग्नीची आज्ञा श्रुतिसीच (वेदाप्रमाणें) त्याला (रामाला) मान्य (झाली). २. (भावांसह) रेणुकेतें. ३. बायको. (रेणुका.) ४. तो विप्र जमदग्नि. ५. मारल्याची आठवण. ६. वाच्+अमृतें=वाणी+सुधेनें=वचनामृतानें. ७. जमदग्निस्त्री रेणुका. ८. अरण्यांत. ९. बापाचें प्रेत व बापाविषयींचा शोक हीं दोन्हीं भावांच्या स्वाधीन केलीं. राम बापाकरितां रडायाचें सोडून देऊन त्याचा वध करणारे जे अर्जुनपुत्र त्यांच्या नाशाच्या उद्योगास लागला. १०. माहिष्मतीनामक राजधानींत. ११. अर्जुनाच्या सहस्र पुत्रांचीं डोकीं. १२. परशुराम. १३. रक्त. १४. बालका, मुला. १५. शत्रूंच्या डोक्यांच्या. १६. परिभवरूप चिखलांतून कीर्तिरूप गाय काढी. १७. यज्ञ.

हा[1] प्रभुचि, अकरचरणहि अहि घेचि करावयास वध डास. ॥ २४५

ग[2] रदहनतसा पेटे, जाणों प्रभुला म्हणे, 'उठा रगडीं.' ।
करि एकवीसवेळां पृथिवी निःक्षत्रिया कुठारगडी. ॥ २४६

व धुनि खळ कुरुक्षेत्रीं[3] रक्तें ह्रद[4] नव भरी महावेशें; ।
रामींच[5] वीररस बा! हा सोडुनि अन्य कां पहावे शें? ॥ २४७

तें[6] जितकुठारपाणि प्रभुसा करणार अन्य न वध रणीं, ।
यज्ञांत हे[7] द्विजा[8] दे, निर्मी वासार्थ[9] अन्य नव धरणी[10]. ॥ २४८

वां[11] डव झाला मग तो श्री**वि**श्वामित्र **गा**धिसुत, राया! ।
यांचें[12] यश गाइल जो भववैतरणी[13] सदैव सुतराया[14]. ॥ २४९

सु त शत जे त्यांसि म्हणे, 'ज्येष्ठ शुनः[15]शेप बंधु मानावा'. ।
नैकति तयांसि शांपी[16], शेष[17] म्हणति, देवरात[18] वानावा.' ॥ २५०

दे[19] वीसुत **आयु** तया **न**[20]हुषादिक पांच पुत्र जे त्यांचे ।
भारी प्रताप जैसे **विष्णु**भुजांचे सुरारिजेत्यांचे[21]. ॥ २५१

वां[22] डववर **शौ**नकमुनि धन्वंतरि[23] देव नृप अलर्क[24] रजी, ।
ज्यांच्या कुळीं असे हे यांसि म्हणावें सुरेश्वरींहि[25] 'अजी[26]!' ॥ २५२

---

१. हा (परशुराम) तर प्रभुचि (कर्तुमकर्तुमन्यथाकर्तुं समर्थ असा) आहे (पण) अकरचरणहि (हस्तपादहीन असा) अहि (साप) वध करावयास (आपल्या शत्रूचा प्राण घेण्याकरितां) डास घेचि (दंश करीच, चावीच). २. विषाग्निसारखा. ३. मूळांत स्यमंतपंचक देशांत गेले म्हणून आहे. ४. डोह. ५. परशुरामाचे ठायीं. ६. तेजित (पाजळलेला, धार लावलेला) कुठार (परशु) हातामध्यें ज्याच्या असा. ७. ही पृथ्वी. ८. यज्ञांतील ऋत्विजांना. अ० १६ श्लो० २१-२२ पहा. ९. (आपल्याला) राहण्याकरितां. १०. भूमि. ११. ब्राह्मण. १२. विश्वामित्राचें. १३. संसाररूप वैतरणी नदी. वैतरणी ही नरकांतील नदी आहे. १४. तरण्यास सुलभ. विश्वामित्राचें यश गाइल्यानें मनुष्य पापमुक्त होतो—असा अर्थ. १५. अजीगर्तऋषीचा मुलगा. १६. 'म्लेच्छ व्हा' म्हणून शाप देई. १७. बाकीचे मुलगे, विश्वामित्राच्या म्हणण्यास रुकार देणारे मुलगे. १८. शुनःशेप. 'यो रातो देवयजने देवैर्गाधिषु तापसः । देवरात इति ख्यातः शुनःशेपः स भार्गवः ॥' अ० १६ श्लो० ३२. १९. उर्वशीपुत्र. इतर पांच मुलांचीं नांवें येणेप्रमाणें:—श्रुतायु, सत्यायु, रय, विजय व जय. २०. आयूचे पांच मुलगे:—१ नहुष, २ क्षत्रवृद्ध, ३ रजी, ४ रंभ आणि ५ अनेना. २१. देवाचे शत्रु जे राक्षस त्यांना जिंकणाऱ्यांचे. २२. ब्राह्मणश्रेष्ठ. २३. आयुर्वेदाचा प्रवर्तक. २४. नामविशेष. २५. इंद्रानेंहि. २६. अहो. इंद्रालाही मान्य होते—असा भाव.

य ति आणि **य**याति असे [1]**न**हुषतनुज [2]सा, तयांतहि **य**याती ।
मुख्य महाराज भजे श्री जी [3]लोकाधिपांप्रति जया ती. ॥ २५३
[4]**नँ** हुषतनूज **य**याती याची श्री[5]शुक्रकन्यका [6]भार्या, ।
आइक ऐसी झाली प्राप्ता [7]त्या क्षत्रियासि हे आर्या. ॥ २५४
मो ठा दैत्येश्वर **वृ**षपर्वा, दे **शु**क्र देव [8]या नीती, ! ।
[9]तत्कन्या **श**र्मिष्ठा, काव्यसुता होय **दे**वयानी ती. ॥ २५५
[10]**भं** व्यगुणा **श**र्मिष्ठा एकासमयीं [11]सखीसहस्रयुता ।
रम्योपवनीं क्रीडे, होती [12]तीसहचि तीहि **शु**क्रसुता. ॥ २५६
[13]**गँ** रगल पाहुनि कन्या गडबडल्या फार पावल्या [14]व्रीडा, ।
कीं त्या करीत होत्या, वस्त्रें ठेवुनि तटीं, जलक्रीडा. ॥ २५७
व स्त्र [15]गुरुसुतेचें ते राजसुता नेसली गडबडून, ।
दोघी पितृभाग्यमदें स्नेह बुडविती वृथा बडबडून. ॥ २५८
ते कविजा तीस म्हणे, 'सिंहीतें लंघिते [16]शिवा दासी.' ।
राजसुताहि म्हणे, 'कां करिसी तूं भिक्षुकी विवादासी?' ॥ २५९
[17]**वाँ** स [18]हिरुनि **श**र्मिष्ठा गेली ढकलुनि तीस [19]अंधूंत, ।
बहु गुणवती शतगुणें जी आवडली पित्यास बंधूंत. ॥ २६०
[20]**सुं** विधि अकस्मात् तेथें आणी त्या संकटीं **य**यातीतें, ।
दे [21]उत्तरीय, काढी धरुनि कर करूनि तो दया तीतें. ॥ २६१
'[22]**दे** वा! तूं [23]मद्भर्ता' ऐसें कविजा म्हणे **य**यातीस, ।
रुचला, [24]पुरुषोत्तमकचशापोक्ति गमे मनीं दया तीस. ॥ २६२
वा र्ता ऐकुनि आला, [25]तात तया रडत कळविलें कीं तें; ।
जाय निघुनि जाणों पुर रक्षाया दूर पळवि लेंकीतें. ॥ २६३

१. नहुषाचे मुलगे. २. सहा. त्यांचीं नांवें:–यति, ययाति, संयाति, आयति, वियति व कृति. ३. आठ दिशांचे अधिपति. 'इंद्रो वन्हिः पितृपतिर्नैऋतो वरुणो मरुत् । कुबेर ईशः पतयः पूर्वादीनां दिशां क्रमात् ॥'. ४. नहुषाचा मुलगा. ५. श्रीशुक्राचार्यांची मुलगी देवयानी. ६. स्त्री. ७. त्या क्षत्रियकुलोत्पन्न ययातिराजाला. ८. वृषपर्वाला शुक्रदेव नीति दे (शिकवी). ९. वृषपर्वाची मुलगी. १०. श्रेष्ठ गुणांनीं युक्त अशी. ११. एक हजार सखीसहवर्तमान. १२. शर्मिष्ठेसह. १३. विषकंठ. (महादेव.) १४. लाज. १५. देवयानीचें. १६. कोल्ही. १७. वस्त्र. १८. बळजबरीनें घेऊन. १९. विहिरींत. २०. सुदैव. २१. अंगावरचें वस्त्र. २२. ययातिराजा! २३. माझा पति. २४. पुरुषश्रेष्ठ बृहस्पतिपुत्र जो कच त्याचें शापवचन. २५.

य तें **वृ**षपर्वा तो गुरुतें [1]कवळूनि चरण [2]समजावी ।
'मी तुमचाचि,' कवि म्हणे, 'परि [3]हे अपमान मरणसम जावी.'॥ २६४

न मुनि [4]तिळें **वृ**षपर्वा प्रार्थी [5]**हि**मगिरिसुतेसि [6]**वा**सवसा, ।
'[7]विधुंच्या [8]पादांहीं [9]जलनिधि तुमच्या हा उते [10]शिवांस वसा.' ॥ २६५

मो ठा प्रताप दावी [11]श्रीगुरुकन्या म्हणे सखेदा ते, ।
'[12]यो [13]सानुगा मजकडे द्या तुम्हि [14]कल्पद्रुचे सखे दाते.' ॥ २६६

भ य तें असुरकुळाचें वाराया [15]ती [16]तिचे धरी पाय, ।
सेवी [13]सखीसहस्रासह न म्हणे श्रांत आपुला [17]काय. ॥ २६७

ग णपतिला जसि दूर्वा, तो कवि राजासि तेंवि ती [18]ओपी; ।
शर्मिष्ठेसि म्हणे, 'जा गाई तिकडेचि ज्या वनीं गोपी.' ॥ २६८

व सुधापतिस [19]कवि म्हणे, '[20]तल्पीं [21]ईतें कधीं न बसवावें, ।
हें मद्वचन **य**याते! स्वमनीं त्वां जागरूक वसवावें.' ॥ २६९

ते शर्मिष्ठा [22]गुरुजापुत्र विलोकूनि बहु मनीं रडली, ।
स्वसखीपति म्हणुनि गळां एकांतीं त्या **य**यातिच्या [23]पडली. ॥ २७०

बा ळक **यदु तुर्वसु** हे दोघे गुणसिंधु **दे**वयानीचे ।
द्रुह्यु अनु पूरु [24]तीचे ज्यां भुलले साधु देव [25]यानीचे. ॥ २७१

[26]**सु** णगुण निघतांचि, [27]नृपा! त्या **श**र्मिष्ठा**य**यातिसंगाची, ।
जाय [28]जनकसदना ती, अनिवार्या होय जेंवि गंगाची. ॥ २७२

'दे वि! क्षमस्व' ऐसें प्रार्थी जरिही चुरी पद **य**याती, ।

---

१. चरण (पाय) कवळूनि, पायां पडून. २. समजूत करी. ३. कवि (शुक्र) [वृषपर्व्यास] म्हणेः–'मी (शुक्र) तुमचाचि [असें], परि (परंतु) हे (तुझी मुलगी शर्मिष्ठा) [येथून–नवऱ्याच्या पासून] जावी [कारण] अपमान [हें] मरणसम (मरणासारखें) [आहे]. ४. देवयानीला. ५. हिमाचलकन्या पार्वती तिला. ६. इंद्राप्रमाणें. ७. चंद्राच्या. ८. किरणांनीं; पक्षीं, पायांनीं. ९. समुद्र. १०. कल्याणार्थ. ११. देवयानी. १२. येवो. १३. स+अनुगा=आपल्या सखीसहवर्तमान. १४. कल्पवृक्षाचे. १५. शर्मिष्ठा. १६. देवयानीचे. १७. देह, शरीर. १८. देई. १९. शुक्राचार्य. २०. शय्येवर (बिछान्यावर). २१. शर्मिष्ठेतें. २२. देवयानीचे मुलगे यदु व तुर्वसु यांना. २३. ययातीला आलिंगन दिलें, ययातीशीं रममाण झाली. २४. शर्मिष्ठेचे. २५. 'देवयानं विमानोऽस्त्री' इत्यमरः. देवयानीचे=विमानस्थ साधु ज्यां (शर्मिष्ठापुत्रांस पाहून) भुलले. इतके ते गुणवान् होते. २६. गुणगुण. २७. हे परीक्षित् राजा! २८. शुक्राचार्यांच्या घराला.

न करी [1]प्रसादभाजन करुनि हृदय आपुलें सदय, [2]या ती. ॥ २७३

‘**बा**[3] लिश! [4]विशतु [5]जरा [6]त्वां’ ऐसें कोपुनि वदे अविनयातें, ।
कन्येतेंचि प्रेमें बहु मानी तिळहि तो कवि न [7]यातें. ॥ २७४

य[8] दुतात म्हणे, ‘[9]ईची सेवनवांछा असेचि अद्यापी. ।
[10]अमृत पुरें कां? काढा [11]व्यसनी भुलतो तथापि मद्या पी.’ ॥ २७५

न[12] रपतिस [13]कवि म्हणे, ‘तुज [14]वय देइल जो सुखें [15]तनुज राहो, ।
त्यावरुनि काळ कांहीं दूर तुझी त्यजुनि हे तनु जरा हो.’ ॥ २७६

मो हें न करिति [16]चवघे, **पूरु** पितृप्रिय करी [17]वयोदानें, ।
तेणें तृप्त [18]पिता तो केला, चातक जसा [19]पयोदानें. ॥ २७७

भ जुनि प्रियविषयांतें बहुशतवर्षेंहि नृप न तो [20]धाला, ।
विषयत्यागींच असे सुख—ऐशा पात्र होय बोधाला. ॥ २७८

ग मन विरागें करितां, सांगे तो [21]कविसुतेसि [22]बस्तकथा, ।
भुलवी माया, वेश्या जेंवि म्हणुनि नाचवूनि हस्तक [23]था. ॥ २७९

व[24] य देउनि निज [25]पदें दे **पूरु**सुता, दिधलि ते जरा ज्याला. ।
[26]तदधीन [27]यदुमुखाग्रज, त्या ये ऐसेंचि तेज राजाला. ॥ २८०

ते जस्वी **पूरु**कुळीं राजा दुष्यंत तो करी मृगया, ।
[28]कण्वाश्रमांत घेउनि गेला बहु लोभवूनिया मृग [29]या. ॥ २८१

---

१. प्रसादपात्र. २. ययातीला. ती (देवयानी) या (ययातिपतिला) प्रसादभाजन (प्रसादपात्र) न करी, त्याच्या म्हणण्याला रुकार न देई. ३. हे मूर्खा! ४. प्रवेश करो. ५. वृद्धत्व. ६. तुजप्रत, तुझ्याठायीं. ७. ययातीतें. ८. ययाति. ९. देवयानीची. १०. अमृत पुरें काय म्हणून? हा व्यसनासक्त पुरुष मोहून जातो तसाच (=तथापि) मद्या (अमृताहून नीच) पितो–(त्यास) काढा=मुक्त करा, बाहेर काढा. पुरें कां–‘वसवा पुरें. पुरे कां?’ (सं० रत्नमाला). तथापि–‘मळला न हिरा तथापि सामान्य’ (कित्ता). ११. व्यसनासक्त पुरुष. १२. ययाति राजाला. १३. शुक्राचार्य. १४. तारुण्य. १५. पुत्र. १६. यदु, तुर्वसु, द्रुह्यु व अनु. १७. तारुण्यदानानें. १८. ययाति. १९. स्वातीनक्षत्रांतील मेघानें. २०. तृप्त झाला. २१. शुक्राच्या कन्येला, देवयानीला. २२. बोकडाची कथा. अ० १९ श्लो० ३-११ पहा. २३. सान्वयार्थ–जेंवि वेश्या ‘था’ म्हणुनि [व] हस्तक (हात) नाचवूनि (=आदा करून, हातवारे करून) [भुलवी तेंवि] माया भुलवी. था म्हणणें=तोम्, नोम्, तराणा इत्यादि सताल म्हणणें, मधुर गाणें. २४. पुरूचें तारुण्य पूरूला देऊन. २५. राजत्व, गादी. २६. पूरूच्या अधीन. २७. यदु, तुर्वसु, द्रुह्य व अनु हे चवघे वडील भाऊ. २८. कण्वऋषीच्या आश्रमांत. २९. दुष्यंताला.

बा[1] ळा कण्वाश्रमपदभूषा[2] सुमुखी शकुंतला पाहे, ।
'मन जाय'[3] म्हणे राजा 'बहुधा हे राजकन्यका[4] आहे.' ॥ २८२
सु मुखी पुसतां सांगे, 'मी गाधिजमेनकासमागमजा.'[5] ।
भूप म्हणे, 'सुमुखि! तरिच रुचलिस माझ्या मना, नसे भ्रम ज्या[6].॥ २८३
दे[7] हाचें दान मला दे, आहें पात्र मी स्वयें करिती ।
स्वहित क्षत्रियकन्या अनुरूप[8] वर स्वयंवरीं वरिती.' ॥ २८४
वा क्यातें अनुसरली वरिली गांधर्वनामकें विधिनें, ।
योगें त्या हर्ष जसा अधनजना[9] प्राप्त जाहल्या निधिनें[10]. ॥ २८५
य श पूरुच्या कुळाचें वाढाया धरि शकुंतला गर्भा, ।
राजा स्वपुरा गेला, कण्व जपे तत्सुता[11] जसा दर्भा. ॥ २८६
न वलचि तेज तयाचें, कीं बांधी करिहरीस[12] तो दमुनी, ।
'सर्वदमन' त्या म्हणती, पावुनि तद्विक्रमें[13] प्रमोद[14] मुनी. ॥ २८७
मो ह त्यजुनि पतिकडे[15] कण्वानें गौरवूनि पाठविली, ।
'तूं कोण?' म्हणे राजा[16], जरि ती शतदा[17] मनांत आठविली. ॥ २८८
'भ रत' असें नाम पडे कीं त्या गगनीं असी उठे वाणी, ।
'भरण[18] करीं स्वसुताचें, नच अवमानी शकुंतला राणी.' ॥ २८९
ग[19] गनोक्तिश्रवणेंचि प्रत्यय[20] आला जनासि, मग तीतें[21] ।
स्वीकारी, त्या भरता वृद्धपणीं दे नृपाल[22] जगतीतें. ॥ २९०
व[23] सुधेला भरत, तसे बहुधा रुचले न अन्य[24] ते तीस[25], ।

---

१. कुमारी. २. कण्वाश्रमाचें भूषण अशा (कुमारी शकुंतलेला). ३. (शकुंतलेवर) मन जाय=तिला पाहून राजा दुष्यंताचें मन लुब्ध झालें. ४. क्षत्रियकन्या. ५. विश्वामित्र व मेनका अप्सरा यांच्या पासून झालेली. ६. ज्या=ज्या माझ्या मनाला. (मूळांत 'नहि चेतः पौरवाणामधर्मे रमते क्वचित्' असें म्हटलें आहे.) ७. मला देहाचें दान दे. माझा पतित्वानें अंगीकार कर, माझी बायको हो. ८. योग्य. ९. दरिद्री मनुष्याला. १०. द्रव्यानें. ११. दुष्यंतपुत्र भरत त्याला. १२. हत्ती व सिंह यांस. १३. त्याच्या (सर्वदमनाच्या) विक्रमें (पराक्रमानें). १४. हर्ष, आनंद. १५. दुष्यंताकडे. १६. दुष्यंत. १७. शंभरदा. संख्यावाचकविशेषणाला 'दा' प्रत्यय लावल्यानें कालवाचक क्रियाविशेषणें होतात; जसें– एकदा, सर्वदा, सहस्रदा, इ०. १८. पोषण (करीं). 'भरस्व पुत्रं दुष्यंत' असें मूळांत आहे. १९. आकाशवाणी ऐकून. २०. विश्वास. २१. शकुंतलेला. २२. पृथ्वीतें. २३. वसुधा= पृथ्वी. २४. ते अन्य, इतर राजे. २५. पृथ्वीस.

करि [1]हयमेध [2]शतावरि अद्भुत तो परम धन्य तेतीस. ॥ २९१
ते णें दिधल्या गायी, त्यांच्या ब्राह्मण सहस्र [3]बद्धानें ।
वांटुनि घेती, गेला मद दात्यांचा समस्त [4]तद्ध्वानें. ॥ २९२
वा [5]रण कनकविभूषित वर दे विप्रांसि लक्ष चवदा, हो ! ।
दानीं ज्ञानीं शुद्धीं युद्धीं **भ**रतासि दक्षच वदा, हो ! ॥ २९३
सु यशा **भ**रतसुत [6]**वि**तथ तद्वंशीं **रं**तिदेव तो [7]करुण, ।
भूतदयेतें झाला वश, [8]तरुणीतें नृपा! जसा तरुण. ॥ २९४
दे जें अन्न मिळे तें अन्नार्थिप्राणियांसि सारेंच, ।
उतरी वैराग्यबळें [9]षडरींचा तो [10]दिसां दिसा रेंच. ॥ २९५
[11]**वा** रिहि पीतां, नाहीं अन्न म्हणुनि नमुनि [12]पुल्कसा दे [13]हां, ।
राबत्रि अर्थिजनाच्या [14]भजनांत [15]गृहीतशुल्कसा देहा. ॥ २९६
य द्यपि अठेचाळिस दिवस [16]उपोषित कुटुंबसह होता, ।

१. अश्वमेध. २. शतावरि तेतीस–एकशें तेतीस. ३. बद्ध १३०८४. शतुरशील्यधिकैस्त्रयोदशसहस्रैरेकं बद्धं भवति. एकंदर १३०८४००० गाई ब्राह्मणांना दिल्या. ४. तद्+ध्वान=तो+शब्द=दातृत्वाविषयींची कीर्ति. ५. सोन्याच्या अलंकारांनीं शृंगारलेले हत्ती. ६. वितथाच्या जन्माची कथा येणेंप्रमाणें:—एकदां बृहस्पति कामातुर होऊन आपला भाऊ जो उतथ्य याच्या गर्भार असलेल्या ममतानामक बायकोशीं चोरून रममाण झाला. या वेळीं तिच्या पोटांतल्या गर्भानें त्याला वारलें असतां त्याला (त्या गर्भांतील पुत्राला) 'अंध हो' म्हणून शाप देऊन मैथुन करिता झाला व त्या गर्भानें त्याचें (बृहस्पतीचें) वीर्य बाहेर सारून दिलें. त्यानंतर भूमीवर पडलेल्या वीर्यापासून पुत्र झाला. नवरा आपल्याला व्यभिचार केल्याबद्दल रागें भरून सोडून देईल अशा भीतीनें ममता त्या मुलाला टाकून जात असतां देवांनीं 'हे मूढे! तूं याचें पोषण कर, हे बृहस्पते! तूं पोषण कर' असें म्हटलें. परंतु दोघेंही पुत्राचा त्याग करून चालतीं झालीं. यावरून त्याचें 'भरद्वाज' असें नांव पडलें. पुढें मरुत् देवांनीं त्याचें पोषण केलें व भरताचा वंश वितथ होत असतां त्यांनीं तो ममताबृहस्पतींनीं वितथ (निरर्थक) मानलेला मुलगा भरताला कुलाच्या वृद्धीकरितां दिला. अ० २० श्लो० ३६-३९ पहा. ७. कृपाळु. ८. ही उपमा किती सरस आणि प्रत्ययावह आहे हें सहृदय वाचकांस सांगावयास नकोच. ९. काम, क्रोध, लोभ, मोह, मद आणि मत्सर यांचा. १०. दिवसें दिवस, प्रत्येक दिवशीं. ११. पाणी. जवळ असलेलें सर्व अन्न अतिथींना आदरपूर्वक समर्पण करून पाणी पीत असतां राजाकडे एक चांडाल आला व प्यायाला पाणी मागूं लागला. राजानें त्याला नम्रतापूर्वक पाणी दिलें व आपण अन्नापाण्यावांचून तसाच राहिला. १२. नामविशेष (अंत्यजांतील भेद) त्याला. १३. रंतिदेव (दे). १४. सेवेंत. १५. घेतलें आहे मोल ज्याणें तसा, नोकरासारखा, ज्याला वेतन मिळतें अशा चाकरासारखा. १६. अन्न खाल्ल्याशिवाय.

[1]क्षुधिता देचि मुखींचें, [2]देतो कवळूनि [3]खग जसा [4]पोतां. ॥ २९७
नैं[5] लिनभवादि [6]च्छळिती, 'माग' हि म्हणती प्रसन्न होऊन, ।
त्यांसि म्हणे, 'तो मज [7]भवशीतार्ता विष्णुभजन हो ऊन.' ॥ २९८
मो ठा [8]वितथ यशस्वी [9]तन्नंदन मन्युनाम [10]तत्तनय, ।
ख्यात बृहत्क्षत्र, प्रभु हस्ती [11]तत्पुत्र [12]शुद्धधी [13]सनय. ॥ २९९
भ व्यगुण हस्तिनापुर त्यापासुनि [14]नाकगर्व [15]साराया, ।
हस्तीचे पुरुमीढ द्विमीढ अजमीढ तीन गा! राया! ॥ ३००
[16]**गं** जपदसें ज्याचें यश त्या अजमीढाचिया कुळीं कांहीं ।
ब्राह्मण, कांहीं क्षत्रिय, केली धन्या निजप्रजा [17]यांहीं. ॥ ३०१
[18]**वं** सुधापति द्विमीढ प्रख्यात यवीनरादि [19]तद्वंशीं, ।
जो तत्प्रतापमहिमा नव्हता [20]ऐकींहि तो उणा [21]अंशीं. ॥ ३०२
ते जस्वी अजमीढ प्रभु हा याचीच बा! दुजी [22]भार्या. ।
[23]तद्वंशामाजि दिवोदास अहल्याहि [24]तदनुजा आर्या. ॥ ३०३
वा पुत्र अहल्येचा सुमति शतानंद, तत्कुळीं [25]झाला ।
साधु शरद्वान्नामा, मोही तत्काळ उर्वशी त्याला. ॥ ३०४

---

१. भुकेल्याला. २. आलिंगून, प्रेमानें. अ० २१ श्लो० ३-१४ पहा. ३. पक्षी. ४. पिलाला. ५. ब्रह्मदेवप्रमुख. ६. त्या रंतिदेवाकडे वरचेवर येती. ७. संसाररूप थंडीनें पीडित झालेल्या मला विष्णुभजन ऊन हो (होवो). जसें थंडीनें पीडिलेल्या मनुष्याला उनापासून सुख होतें तसें विष्णुभक्तीपासून मला सुख होवो. ८. वितथ नांवाचा राजा. ९. वितथाचा मुलगा. १०. मन्यूचा मुलगा. ११. बृहत्क्षत्राचा मुलगा. १२. विमलमति. १३. नीतिमान्. १४. स्वर्गाचा गर्व नाक (स्वर्ग) न कं सुखं अकं दुःखं तत् न विद्यते यस्मिन्। दुःख जेथें नाहीं तें. त्यापासुनि (हस्तीराजापासून) नाकगर्व (स्वर्गाचा गर्व) साराया (हरण करण्याकरितां) भव्यगुण असें हस्तिनापुर (हस्तिनापुर नगर) (झालें). हस्तीराजानें हस्तिनापुर नांवाचें शहर निर्माण केलें–असा भाव. १५. हरण करण्याकरितां. १६. हत्तीच्या पावलासारखें, विस्तृत, विशाल. १७. अजामीढकुलोत्पन्न ब्राह्मण क्षत्रिय यांनीं. १८. राजा द्विमीढ. १९. द्विमीढाच्या वंशांत (कुलांत). २०. 'एकीं' हें 'अंशीं' शब्दाचें विशेषण. २१. जो तत्प्रतापमहिमा (जो त्याच्या प्रतापाचा महिमा) तो एकींहि अंशीं (एकाहि अंशानें, यत्किंचित् देखील) उणा (कमी) नव्हता. २२. नलिनी नांवाची बायको. २३. नलिनीपासून झालेल्या नीलनामक अजमीढ पुत्राच्या वंशांत. २४. दिवोदासाची धाकटी वहीण. २५. अहल्येचे ठायीं गौतमापासून झालेल्या शतानंदाचे कुळीं.

सु टुनि[1] शरस्तंबीं[2] त्या सन्मुनिचें[3] रेत तत्क्षणीं पडलें, ।
घडलें तत्काळ मिथुन[4]; **शंतनु**च्या देखतां[5] मनीं जडलें. ॥ ३०५

दे वें **शंतनु**नें तें मिथुन प्रतिपाळिलें[6] सुता[7] धन्या, ।
म्हणति **कृपाचार्य** असें, भार्या **द्रोणा**सि ती **कृपी** कन्या. ॥ ३०६

बा ढगुण **दिवोदासा** **मित्रेयु**[8], तयाचिया कुळीं राजा ।
सोमक, शतपुत्र तया[9], ज्यांसि म्हणति साधु सद्यशें सांजा[10]. ॥ ३०७

य श बहु शतपुत्रांत ज्येष्ठाहुनिही[11] कनिष्ठ[12]**पृषता**चें, ।
तत्पुत्र[13] **द्रुपद**, सुता[14] त्याची **कृष्णा**[15] सुपुण्य तें साचें. ॥ ३०८

न रपति **अजमीढा**चा अन्य तनुज[16] बा! तया म्हणति **ऋक्ष**, ।
त्या[17] **संवरण**, तया[18] **कुरु** ज्यासि म्हणति सुकवि अर्थिसुरवृक्ष[19]. ॥ ३०९

मो ठा **कुरु**चा महिमा, सुत यांचा[20] **उपरिचरवसु** श्रेष्ठ; ।
त्याचा **बृहद्रथ** तनय, बंधूमध्यें गुणें वयें ज्येष्ठ. ॥ ३१०

भ व्यगुण अनुज यांचे[21] त्यांच्या वंशींच जाहले चैद्य[22], ।
गजसे[23] मदांध जे परि[24] त्यांच्या हरणार मदगदा[25] वैद्य. ॥ ३११

ग णपतिसांचि **बृहद्रथ** परविघ्नाचा[26] निवारिता, भर्ता[27] ।
यज्ञाचा मग आधी[28] दीनाच्या[29] कामतृप्तिचा कर्ता. ॥ ३१२

---

१. उर्वशी नांवाच्या अप्सरेला पाहिल्याबरोबर रेत चलित होऊन. २. दर्भाच्या बेटावर. ३. शरद्वान् नांवाच्या ऋषीचें. ४. जुळें. (एक मुलगा व एक मुलगी.) ५. पाहिल्यावर. ६. रक्षण केलें, पाळलें. ७. (त्यापैकीं) मुलाला. या मुलाचें नांव कृप (कृपाचार्य) ठेवलें व मुलीचें कृपी ठेवलें. ही कृपी पुढें द्रोणाचार्यांची बायको झाली. ८. दिवोदासाचा मुलगा मित्रेयु व मित्रेयूचे चौघे मुलगे च्यवन, सुदास, सहदेव व सोमक. ९. त्या सोमकाला. १०. शोभा. ११. सर्वांत वडील पुत्र जो जंतु त्याहून. १२. शंभर मुलांपैकीं धाकटा मुलगा जो पृषत त्याचें. १३. त्या पृषताचा. १४. मुलगी (द्रुपदाची). १५. द्रौपदी. १६. मुलगा. १७. ऋक्षाला. १८. संवरणाला. १९. अर्थि+सुरवृक्ष=याचक+कल्पवृक्ष, याचकाची इच्छा तृप्त करणारा. २०. कुरूच्या वंशांत उत्पन्न झालेल्या कृतीनामक राजाचा मुलगा उपरिचरवसु. येथें 'सुत'शब्द 'वंशीय'अर्थी घ्यावा. २१. याचे (उपरिचरवसुपुत्र जो बृहद्रथ त्याचे) अनुज (लहान मुलगे–कुशांब, मत्स्य, प्रत्यग्र, चेदिप वगैरे). २२. चेदिदेशाचे राजे. २३. हत्तीसारखे. २४. शत्रु. २५. गर्वरूपरोगाला. वैद्याप्रमाणें शत्रूंच्या गर्वरूपरोगाचें हरण करणारे (चैद्य) होते–असा भाव. २६. शत्रुरूपविघ्नाचा निवारिता (निवारण करणारा). २७. पृथ्वीपति, राजा. २८. अगोदर, पहिल्यानें. २९. दीनाच्या (दीन जनाच्या) कामतृप्तीचा (मनोरथाच्या तृप्तीचा) कर्ता (करणारा). यज्ञापेक्षां इष्टकामनासिद्धि करण्याविषयीं तो फार तत्पर होता.

व[1] निता दुसरी त्याची दैवें ती प्रसवली नृपा! [2]शकलें, ।
जडलींहि [3]जराहस्तें, [4]तेंचि असें ही करावया [5]शकलें. ॥ ३१३

ते जोनिधि **कुरु** [6]तत्सुत **ज**न्हु, [7]तयाच्या **प्र**तीप वंशांत; ।
तच्चक्षु [8]परांत तसें बा! जेंवि सधूम तेज [9]दंशांत. ॥ ३१४

वा ल्हीक **शं**तनु [10]तनुज, तिसरा गेला वनासि [11]देवापी; ।
[12]शंतनुतनु हर्ष शिवुनि पिउनि सुधेची मनास दे वापी. ॥ ३१५

सु त जो **बा**ल्हीकाचा तो नामें **सो**मदत्त, [13]तत्तनय ।
भूरिश्रवा प्रतापी, [14]ज्यां मत योग्यासि जेंवि [15]दत्त नय. ॥ ३१६

[16]**दे** वनदीच्या पोटीं **शं**तनुचा ज्येष्ठ पुत्र जो **भी**ष्म ।
ज्याचा प्रताप तापवि बाहिर आंतहि [17]परां जसा [18]ग्रीष्म. ॥ ३१७

[19]**बां** डवरूप [20]**श्री**श प्रकटे पोटीं जिच्या, प्रिया [21]दुसरी ।

---

१. स्त्री, बायको. २. खंडें. ३. जरानामक राक्षसीच्या हातानें. ४. दैवच. ५. समर्थ झालें. जरेच्या हातानें शकलें जोडलीं गेलीं म्हणून ह्या मुलाचें जरासंध असें नांव पडलें. ६. कुरुवंशीय, कुरूचे वंशांत जन्मलेला. ७. जन्हुच्या. ८. तच्चक्षु (प्रतीपाचा डोळा) परांत (शत्रूंचा नाश करणारें). ९. मक्षिकांतक, माशांचा अंत करणारें. अथवा माशांमध्यें जसा साग्निधूम (धूर) माशांत धांदल उडवून देतो तसा त्याचा डोळा शत्रूंची धांदल उडवितो—हा अर्थ. १०. मुलगा. प्रतीपराजाचे मुलगे तीन—देवापी, शंतनु व बाल्हीक. ११. ज्येष्ठ मुलगा देवापी हा बापाच्या (प्रतीपाच्या) राज्याचा त्याग करून वनास गेला व त्यामुळें त्याचा धाकटा भाऊ शंतनु हा गादीवर बसला. १२. शंतनु—तनु (शंतनूचें शरीर, शंतनूचे हात) शिवुनि (वृद्ध मनुष्याचे शरीरास स्पर्श करून (वृद्ध मनुष्याच्या) मनास हर्ष दे (जसा हर्ष) सुधेची (अमृताची) वापी पिउनि (प्याल्यावर) दे. ज्या वृद्ध मनुष्याला शंतनु स्पर्श करी त्याला तारुण्य व आरोग्य हीं प्राप्त होत म्हणून त्याला हें नांव प्राप्त झालें. पूर्वींचें याचें नांव महाभिष असें होतें. 'यं यं कराभ्यां स्पृशति जीर्णं यौवनमेति सः ॥ १३ ॥ शांतिमाप्नोति चैवाग्र्यां कर्मणा तेन शंतनुः । + + + ॥ १४ ॥ अध्याय २२ पहा. १३. सोमदत्ताचा मुलगा. सोमदत्ताचे मुलगे तीन—भूरि, भूरिश्रवा व शल. १४. ज्या (ज्या भूरिश्रव्याला) नय मत (मान्य) जेंवि योग्यासि (योगिपुरुषास) दत्त (दत्तात्रेय) (मत). १५. दत्तात्रेय. या योगिश्रेष्ठाचें अवतारचरित्र गुरुचरित्र नांवाच्या ग्रंथांत सविस्तर वर्णिलें आहे. १६. गंगेच्या. १७. शत्रूला. १८. ऋतुविशेष. ग्रसते रसानिति ग्रीष्मः. १९. ब्राह्मणरूप. २०. व्यास. २१. सत्यवती नांवाची.

त्या शंतनुराजाची, जीच्या [1]भगवत्परा कळा [2]कुसरी. ॥ ३१८

य श भीष्में मेळविलें मेळवुनि जिला अनंत लोकांत ।

ती सत्यवती प्रसवे [3]तोकद्वय पूज्य सर्वतोकांत. ॥ ३१९

न रपति विचित्रवीर्य स्वीकारी [4]काशिराजतनयांतें, ।

बहुराजसहस्रांतुनि [5]हरिता [6]भीष्मान्य कोण जन यांतें ? ॥ ३२०

मो ठी आसक्ति स्त्रीसंगीं क्षयरोग लागला खपवी, ।

[7]कर्मनगा भंगाया न शके पाहोनि लाग लाख पवी. ॥ ३२१

भ गवान् व्यास [8]अपुत्रभ्रातृक्षेत्रांत [9]भव्य [10]तनय तिघे ।

करि [11]मातेच्या वचनें, ज्याचे [12]सद्गुण [13]अशेष जन यति घे. ॥ ३२२

[14]ग जपुरपति धृतराष्ट्र ज्येष्ठ, दुजा पांडु नृप, तिजा विदुर, ।

[15]तो [16]कविवर वच ज्याचें [17]धर्मसुनयसंशयाद्रिचें [18]भिदुर. ॥ ३२३

[19]व निता धृतराष्ट्राची गांधारी प्रसवली [20]शत सुतांतें, ।

आधीं जे दुग्धाच्या, गरळांच्या हांसले मग उतांतें. ॥ ३२४

ते जोनिधि पांडुनृपति [21]मृगशापें होय मैथुनीं रुद्ध, ।

---

१. परमेश्वर. २. चतुरता. ३. पुत्रद्वय. दोन मुलगे चित्रांगद व विचित्रवीर्य. यांपैकीं चित्रांगद हा चित्रांगद नांवाच्या गंधर्वाच्या हातानें युद्धांत मरण पावला. ४. काशीराजाच्या मुली अंबिका व अंबालिका यांतें. ५. स्वयंवरांतून हरण करणारा (हरण करून आणणारा). ६. भीष्माशिवाय दुसरा (जन). ७. कर्मरूपपर्वताला. लाख पवी (इंद्राचीं वज्रें), लाग पाहोनि, कर्मनगा भंगाया न शके (समर्थ होत नाहींत). कर्म कोणाला सुटत नाहीं–असा भाव. ८. भावाच्या (विचित्रवीर्याच्या) निपुत्रिक स्त्रियांचे (अंबिका व अंबालिका यांच्या) ठायीं. 'अपतिरपत्यलिप्सुर्देवराद्गुरुप्रयुक्ता ऋतुमतीयात्' इत्यादि वचनाप्रमाणेंही श्रीव्यासानें विचित्रवीर्याचे मरणानंतर त्याचे स्त्रियांचे ठायीं पुत्र उत्पन्न केले. 'पुत्रप्राप्ति इच्छिणाऱ्या स्त्रीनें पतिमरणानंतर वडिलांच्या सांगण्यावरून दीरापासून पुत्रप्राप्ति करून घ्यावी' असा वरील वचनाचा अर्थ आहे. ९. रूपसंपन्न. १०. (तिघे) मुलगे–धृतराष्ट्र, पांडु व विदुर. ११. सत्यवतीच्या. १२. सद्गुण घे, प्रशंसा (स्तुति) करीत. १३. सर्व. १४. हस्तिनापुरचा राजा. १५. तो विदुर. १६. ज्ञान्यांमध्यें श्रेष्ठ. १७. धर्म व न्याय यासंबंधीचे जे संशय तेच कोणी अद्रि (पर्वत) त्यांचें. १८. वज्र. विदुराचें वचन संशयाचा भेद करणारें होतें–असा भाव. १९. स्त्री. २०. दुर्योधनादि शंभर मुलगे. २१. एकदां किंदमनामक ऋषि आपल्या पत्नीसह मृगरूपानें रमत असतां त्याला मृगया करणाऱ्या पांडुराजानें मारलें, त्यावरून 'तूं स्त्रीशीं मैथुन करण्यास प्रवृत्त झाला असतां मरशील' असा त्या मृगरूपी किंदमनामक ऋषीनें पांडूला शाप दिला.

[1]तज्ज्येष्ठा स्त्री कुंती जाणुनियां भाव बहु तिचा शुद्ध, ॥ ३२५

[2]बा ळपणीं दुर्वासा विद्या दे तीच होय बा! दूती, ।

[3]धर्मासी कुंतीसीं योग करी वाढवावया [4]भूती. ॥ ३२६

सु त कुंतीस युधिष्ठिर पहिला, दुसराहि भीम [5]पवनाचा, ।

जे साधूंतें वदले, देउनि आनंद नित्य [6]नव, 'नाचा.' ॥ ३२७

दे वेंद्रापासुनिही मग पावे अर्जुना [7]पृथा हो! ती; ।

देवद्विजपूजक जे त्यांचे [8]संकल्प कां वृथा होती ? ॥ ३२८

बा! दुसरी [9]पांडुस्त्री [10]दस्रांपासुनि तयाहि माद्रीतें ।

नकुल सहदेव, ज्यांची कीर्ति म्हणे [11]सित न या [12]हिमाद्रीतें. ॥ ३२९

[13]य दुपत्यनुजेपासुनि [14]विजयज अभिमन्यु [15]तव पिता वीर ।

जनमेजय पुत्र तुझा करिल पुढें सर्पसत्र हा धीर. ॥ ३३०

न रपतिययातिचा [16]तनुजनु अनु अनुरूप त्यासि [16]सुत झाला, ।

म्हणति सभानर ऐसें जे परम कुशळ कुळज्ञ [17]कवि त्याला. ॥ ३३१

मो ठा वंश तयाचा त्यामध्यें रोमपाद सुत, धन्या ।

ज्या [18]स्वसख्याला दशरथ दे शांता नाम आपुली कन्या. ॥ ३३२

[19]भ द्रगुणाकर अधिरथ याचि कुळीं, यासि सांपडे [20]कर्ण ।

जो कुंतीनें त्यजिला [21]वेल्लीनें वाळलें जसें [22]पर्ण. ॥ ३३३

[23]ग जमदहर सिंह तसे द्रुह्युकुळीं वीर शत्रुमद [24]हरिते ।

---

१. त्या पांडुराजाची मोठी बायको कुंती. २. गी० ३२५।३२६ युग्मक आहे. कुंतीनें विवाहाचे पूर्वीं आपल्या बापाचे घरीं दुर्वासऋषीची फार सेवा केली व ऋषीनें प्रसन्न होऊन इच्यावर पुढें असा प्रसंग येईल असें दिव्यदृष्टीनें जाणून तिला देवहूतीनामक विद्या शिकविली. ३. यमधर्मांशीं. ४. ऐश्वर्य. ५. वायूचा. ६. नवा. ७. कुंती. ८. मनोरथ. ९. माद्री. १०. अश्विनीकुमारांपासून. ११. शुभ्र. यांची कीर्ति फार शुद्ध होती–असा भाव. १२. हिमाचलातें, हिमालयातें. बर्फामुळें हा पर्वत अगदीं शुभ्र दिसतो. १३. यदुपति+अनुजा=कृष्णाची धाकटी बहिण (सुभद्रा) तीपासून. १४. अर्जुनापासून सुभद्रेचे ठायीं झालेला. १५. (हे परिक्षिति राजा!) तुझा. १६. तनु+जनु=शरीर+जन्म=मुलगा. १७. ज्ञाते. १८. आपल्या (रोमपादनामक) मित्राला. १९. भद्र+गुण+आकर=मंगल+गुण+खाण=सद्गुणनिधि, सद्गुणसंपन्न. २०. कुंतीचा कन्यावस्थेंत सूर्यापासून झालेला पुत्र, भारती युद्धांतला कौरवपक्षीय मोठा योद्धा. २१. वेलीनें. २२. पान. २३. हत्तीचा मद (गर्व) हरण करणारे. २४. हरण करणारे.

उत्तरदिशेंत झाले म्लेंच्छाधिप[1] राजसत्तमापरि ते. ॥ ३३४
व रगुण **तु**र्वसुवंशीं भूप **क**रंधम **म**रुत्त हे महित, ।
दान दिलें तेंचि गमे हितें[2] ज्याला संग्रहीं न हेमें[3] हितें. ॥ ३३५
ते जस्वी **य**दुवंश श्रवण करीं आदरूनि नैपुण्य ।
जेव्हां यापरि साचें सहजचि मिळतें अनंत तें पुण्य. ॥ ३३६
बा पा! **स**हस्रजित् सुत त्या **य**दुचा ज्येष्ठ, तत्कुळीं दत्ता[4] ।
आराधुनि अर्जुन[5] करि **ह**रिसा लोकत्रयीं स्वयें सत्ता. ॥ ३३७
सु त **म**धु त्याचा[6], त्याचा[7] शतपुत्रज्येष्ठ[8] **वृ**ष्णि या नावें, ।
यास्तव **या**दव[9] **मा**धव **वा**र्ष्णेय म्हणोनि यांसि वानावें[10]. ॥ ३३८
दे[11] वगुणसुत **क्रो**ष्टा[12] **य**दुचा, याच्या कुळांत **श**शबिंदु, ।
त्याचें जगदीशाचें जैसें तैसेंचि वदति यश विंदु[13]. ॥ ३३९
बा! गण त्या राजाच्या[14] धर्मपरा[15] दशसहस्र[16] ज्या भार्या ।
प्रत्येक लक्षलक्षचि सुत पतिपासूनि पावल्या आर्या[17]. ॥ ३४०
य श त्यांत सां[18] जणांचें, त्यांमध्यें जो **पृ**थुश्रवा राजा ।
तद्वंशीं[19] **ज्या**मघ जो स्वगुणांसि म्हणे, 'सुधेसि[20] वारा, जा.' ॥ ३४१
नें[21] वरी आणुनि नें[22] करी, जेव्हां[23] 'हे कोण?' हें पुसे शैब्या[24], ।
भिउनि[25] म्हणे 'सून[26] तुझी' पावे पतीपुढें अशा क्लैब्या[27]. ॥ ३४२
मो ठा तेजस्वी परि गडबडला राय[28], जाय आंवांका[29], ।

---

१. म्लेच्छराजे. ययातीच्या शापानें यांना म्लेच्छत्व प्राप्त झालें. २. हितकारक, कल्याण करणारें. ३. सोनें. संचय केलेल्या सोन्यापेक्षां तो दानाची किंमत अधिक मानी–असा भाव. ४. श्रीदत्तात्रेयाला. ५. सहस्रार्जुन. ६. सहस्रार्जुनाचा. ७. मधूचा. ८. शंभर मुलांपैकीं वडील. ९. यदुकुलोत्पन्न म्हणून यादव, मधुपुत्रोत्पन्न म्हणून माधव व वृष्ण्युत्पन्न म्हणून वार्ष्णेय. १०. वर्णावें. ११. देवाच्या गुणांसारखे आहेत गुण ज्याचे असा मुलगा. १२. यदूचे चौघे मुलगे–सहस्रजित्, क्रोष्टा, नल व रिपु. १३. ज्ञाते. १४. त्या शशबिंदुराजाच्या. १५. धर्मशील. १६. दहा हजार. १७. कुलशीलसंपन्ना. १८. सहा जणांचें. (पृथुश्रवा, पृथुयशा, पृथुकीर्ति वगैरेंचे.) १९. पृथुश्रवा राजाच्या वंशांत. २०. अमृतास. २१. (शत्रूंचा पराभव करून त्यांच्या घरून आपली लग्न लावण्याकरितां आणलेली भोज्या नांवाची) मुलगी. २२. तिला बायको न करी, तिच्याशीं लग्न न करी. २३. ज्यामघानें रथांत बसवून आणलेल्या भोज्येला पाहिलें असतां. २४. ज्यामघाची (वंध्या) स्त्री. २५. शैब्येला भिऊन. २६. पुत्राची वायको. २७. नपुंसकला. २८. राजा. (ज्यामघ.) २९. धैर्य.

जाणों हूं म्हणता जरि, म्हणति 'बसूंद्या करूनि आ, वांका.' ॥ ३४३
भ[1] य झालें जाणुनि ती हास्य करि, म्हणे, 'प्रसिद्ध मी वंध्या[2]. ।
पुत्रावांचुनि सून ब्राह्मण ज्याला नसेचि तो संध्या[3].' ॥ ३४४
ग डबडला हें पुसतां[4] **ज्या**मघ नृप तो कवि प्रसवसील[5] ।
सून म्हणे हे ज्यास्तव सति तूं कीं तो कवि प्रसवसील[6]. ॥ ३४५
वं[7] दनांतुनि हे वाणी निघतां[8] सुर[9] म्हणति 'बा! तथास्तु' तिला ।
झाला **वि**दर्भसुत तिसें[10], इतुकाचि ग्रंथ बहु कथास्तुतिला. ॥ ३४६
ते णें[11] रचिल्या वंशीं झाला सुपुरुष महोदय **द**शार्ह, ।
तैसाचि साधु **सा**त्वत **दे**वावृध तत्तनूज[12] सुदशार्ह[13]. ॥ ३४७
वा[14] खाणिति **दे**वावृध तन्नंदन **ब**भ्रु यासि सुज्ञाते, ।
जे यांपासुनि तरले ठळक पुरुष सासहस्र[15], सुज्ञा ते. ॥ ३४८
सु त अन्य[16] **सा**त्वताचा नाम तयाचें, नृपा! **म**हाभोज, ।
भोज तयाच्या[17] वंशीं ज्याचें वाखाणिलें महा ओर्ज[18]. ॥ ३४९

---

१. राजाला आपलें भय वाटलें असें जाणून. २. वांझ. ३. या चतुर्थ पादाचा पाठ अशुद्ध दिसतो. मूळ लेखीप्रत पाहून कोणी पाठ दुरुस्त करून पाठविल्यास उपकार होतील. हल्लींचा पाठ बरावर असल्यास असा अन्वय होतो:–'ज्याला संध्या (ब्राह्मणाचें नित्यकर्म) नसेचि तो ब्राह्मण' परंतु थोडा पाठभेद केल्यास अर्थ सुसंगत होतो. 'ब्राह्मण जीला नसेचि ती संध्या' असा पाठ असावा. या नूतन पाठाचा अर्थ:–'जशी ब्राह्मणावांचून संध्या (असंभव) तशी मुलग्यावांचून सून होय. चित्रकुड्य न्यायाचें उदाहरण. ४. (शैब्येनें) हें पुसतां (पुसलें असतां) तो कवि (शहाणा) गडबडला (गडबडलेला, गोंधळलेला) नृप ज्यामघ (तूं) प्रसवशील (प्रसूत होणें हा स्वभाव जीचा असी) (आहेस व) ज्यास्तव हे (ही भोज्या) सून (ज्या पुत्राची बायको झाल्यामुळें तुझी सून होणार) तो कवि (शहाणा) (पुत्र) तूं प्रसवशील (उत्पन्न करिसील) (असें) म्हणे. ५. प्रसूत होणें हा स्वभाव जीचा अशी. ६. उत्पन्न करिसील. ७. ज्यामघाचे तोंडांतून. ८. निघाली असतां. ९. (यापूर्वीं पुष्कळ काळपर्यंत त्यानें आराधिलेले) विश्वेदेव व पितृदेव. १०. शैब्येला. ११. तेणें विदर्भानें) रचिल्या (रचिलेल्या) वंशीं, त्याच्या वंशांत. १२. सात्वताचा मुलगा (देवावृध). १३. सु (चांगली) दशा (स्थिति) योग्य आहे ज्याला असा. १४. जे सुज्ञाते (चांगले पंडित) ठळक सा सहस्र (सहा हजार) पुरुष यांपासुनि (देवावृध व त्याचा मुलगा बभ्रु यांपासून यांच्या उपदेशानें) तरले (मोक्ष पावले) ते (सहा हजार पुरुष) (हे) सुज्ञा! देवावृध (व) तन्नंदन (देवावृधाचा मुलगा) बभ्रु यांसि वाखाणिति (वर्णितात). १५. मूळांत १४०६५ पुरुष मुक्ति पावले असें आहे. 'पुरुषाः पंचषष्टिश्च षट्सहस्राणि चाष्ट च । येऽमृतत्वमनुप्राप्ता बभ्रोर्देवावृधादपि ॥' अ० २४ श्लो० १०. १६. दुसरा. १७. महाभोजाच्या (वंशीं). १८. पराक्रम, प्रताप.

दे वसम युधाजित्सुत हा सात्वतपुत्र वृष्णि जो त्याचा, ।
हाही अनमित्राचा उत्पादक जेंवि सिंधु मोत्याचा. ॥ ३५०
वा रिधि गुणरत्नाचा गंभीर क्षोभ यन्मना कांहीं ।
दिव्यांहीं विषयांहीं स्वप्नावस्थेंतही कधीं नाहीं. ॥ ३५१
य ज्या अनमित्राचा निम्नहि, सत्राजित प्रसेन असे ।
निम्नाचे, दुसराही अनमित्राचा तनूज वृष्णि असे. ॥ ३५२
न यपटु त्यांचा सुत शिनि, त्यांचा सत्यक, तयासि सुत झाला ।
तो सात्यकि युयुधान ज्ञाता कवि शर्व तद्यशें धाला. ॥ ३५३
मो ठा वृष्णिकुळींच श्वफल्क तैसाचि चित्ररथ जाणा, ।
ज्येष्ठ श्वफल्कनंदन अक्रूर सुकवि असें मनीं आणा. ॥ ३५४
भ व्यप्रभाव सात्वतसुत अंधक तत्तनूज जो पहिला ।
तो कुकुर तया भीती परें, मूषकभेक हे जसे अहिला. ॥ ३५५
गं र्वादिदोषवर्जित कुकुरकुळामाजि दीर्घबाहु कवी ।
तो देवकोग्रसेनाभिध जे या दों सुतांसि आहुक बी. ॥ ३५६
व र्ण्यगुण देवक तया धृतदेवाप्रमुख सात ज्या कन्या ।
त्यां वसुदेवा दिधल्या, संसारामाजि जाहल्या धन्या. ॥ ३५७

१. हा देवसम (देवासारिखा) युधाजित्, सात्वतपुत्र (सात्वताचा मुलगा) जो वृष्णि (त्याचा सुत मुलगा) (होता). २. युधाजित्. ३. उत्पन्न करणारा. ४. समुद्र, सागर. ५. गुणरूप रत्नाचा. ६. ज्याच्या (युधाजित् राजाच्या) मनाला (चित्ताला). ७. स्वर्गातील वस्तूंनींहि. ८. यज्ञ करणारा. ९. याप्रकारचे. १०. पुत्र. ११. नयनिपुण. १२. अनमित्राचा. अनमित्राचे मुलगे तीन–निम्न, शिनि व वृष्णि. १३. शिनीचा. १४. सत्यकाला. १५. सत्यकाचा मुलगा (युयुधान). १६. शंकर. १७. त्याच्या (युयुधानाच्या) यशानें. १८. संतुष्ट झाला. १९. गांदिनीचे ठायीं झालेले वृष्णिपुत्र (श्वफल्क व चित्ररथ). २०. श्वफल्काचा मुलगा (अक्रूर). २१. सात्वताचा मुलगा. ह्याला सात मुलगे होते त्यांचीं नांवें येणेंप्रमाणें:–१ भजमान, २ भजि, ३ दिव्य, ४ वृष्णि, ५ देवावृध, ६ अंधक व ७ महाभोज. २२. अंधकाचा मुलगा. २३. नामविशेष (यादव). २४. शत्रु. २५. उंदीर व बेडूक. २६. सापाला. २७. गर्वादि (गर्व वगैरे) दोषरहित. २८. देवक व उग्रसेन नांवाचे. २९. नामविशेष (यादव). देवक व उग्रसेन यांचा बाप. ३० प्रसवे, जन्म दे. ३१. धृतदेवादि सात मुली होत्या, त्यांचीं नांवें:–धृतदेवा, शांतिदेवा, उपदेवा, श्रीदेवा, देवरक्षिता, सहदेवा आणि देवकी.

ते उग्रसेनसुत जे कंसादिक नव, तशाच ज्या दुहिता ।
कंसाप्रमुखा त्यां जे वसुदेवानुज तयां दिल्या सुहिता. ॥ ३५८
बा पा! चित्ररथ म्हणुनि कथिला म्या अनुज जो श्वफल्काचा, ।
त्याच्या कुळांत शूर, क्षय ज्याच्या कीर्तिनेंचि कल्काचा. ॥ ३५९
सु त दश त्या शूराचे, ज्या समयीं ज्येष्ठ होय वसुदेव, ।
आनकदुंदुभि ताडिति हर्षें आदित्य रुद्र वसु देव. ॥ ३६०
दे वी पृथा, दुजी श्रुतदेवा, श्रुतकीर्तिनामका अन्या, ।
चवथी श्रुतश्रवा हो, पांचवि राजाधिदेविका कन्या. ॥ ३६१
बा ळपणींच दिली जी परम सखा कुंतिभोज त्यासि पृथा, ।
मुनिविद्याप्राप्तार्कें कर्ण दिला, टाकिला भिवोनि वृथा. ॥ ३६२
गं क्षाधिपसा श्रीमान् प्रपितामह पांडु जो तुजा, राया! ।
त्याची ती कुंतिसुता कुंती पहिली पृथा सती जाया. ॥ ३६३
न रपा! जें श्रुतदेवाभिध कन्यारत्न वृद्धशर्मा तें ।
वरि, दंतवक्र तत्सुत, दे स्वजना तो प्रवृद्ध शर्मातें. ॥ ३६४

१. उग्रसेनाचे मुलगे नऊ. त्यांचीं नांवें:–कंस, सुनामा, न्यग्रोध, कंका, शंकु, सुहू, राष्ट्रपाल, सृष्टि व तुष्टिमान्. २. (कंसाप्रमुख पांच) मुली. त्यांचीं नांवें:–कंसा, कंसवती, कंक, शूरभू व राष्ट्रपालिका. ३. वसुदेवाचे देवभागादि धाकटे भाऊ. ४. धाकटा भाऊ. ५. नामविशेष. ६. पापाचा. ७. शूराचे मारिषानामक स्त्रीचे ठायीं झालेले दहा मुलगे. त्यांचीं नांवें:–वसुदेव, देवभाग, देवश्रवस्, आनक, सृंजय, श्यामक, कंक, शमीक, वत्सक व वृक. ८. वाद्यविशेष. वसुदेवाचे जन्मकालीं देवांनीं आनक व दुंदुभि नांवांचीं वाद्यें वाजविलीं म्हणून त्याचें आनकदुंदुभि नांव पडलें. ९. वसुदेवाच्या पृथा, श्रुतदेवा, श्रुतकीर्ति, श्रुतश्रवा व राजाधिदेवी अशा पांच मुली. १०. श्रुतकीर्तिनांवाची. ११. अपुत्र जो कुंतिभोजराजा त्याला. १२. मुनि (दुर्वासऋषि) त्यापासून प्राप्त झालेल्या (देवहूती नामक) विद्येच्या योगानें प्राप्त झालेल्या अर्कानें (सूर्यानें). दुर्वासऋषीपासून देवांना बोलावण्याची मंत्रविद्या (देवहूती) प्राप्त झाली ती खरी किंवा खोटी आहे हें पाहण्याकरितां सूर्याचें स्मरण करून कुंतीनें कन्यादशेंत असतां मंत्र जपला व त्यामुळें सूर्य लागलींच तिच्या पुढें येऊन उभे राहिले व त्यांपासून तिला कानीनपुत्र कर्ण झाला. १३. लोकापवादाला भिऊन. १४. कुबेराप्रमाणें. १५. बापाचा आजा, पणजा १६. कुंतिभोजाची मुलगी. १७. बायको. १८. श्रुतदेवा नांवाचें कन्यारत्न. १९. करूष देशाचा राजा वृद्धशर्मा. २०. पूर्वीं सनकादिक ऋषींनीं शापलेला श्रीविष्णूचा द्वारपाल विजय हा हिचे ठिकाणीं दंतवक्र या नांवानें उत्पन्न झाला. २१. विशेष कल्याणातें. [शर्म=कल्याण.]

मोठ्या प्रेमें त्या श्रुतकीर्तिस [1]कैकेय धृष्टकेतु वरी, ।
संतर्दनादि [2]तत्सुत पांच नि[3]जारातिमृगकुळांत [4]हरी. ॥ ३६५

भै[5]व्यगुणजयत्सेनें वरिली राजाधिदेविका भार्या, ।
[6]विंदानुविंदनामक सुत दोघे प्रसवली महा आर्या. ॥ ३६६

गमली सुधाचि चेदीश्वरदमघोषा श्रुतश्रवा [7]जाया, ।
प्रसवे [8]ती शिशुपाळा, त्या होय कुमार शाप [9]वाजाया. ॥ ३६७

वं[10]रशीला पुत्रवती वसुदेवाच्या महासती भार्या ।
कार्यासि रोहिणी कीं ये [11]क्षितिच्या फार देवकी आर्या. ॥ ३६८

ते[12]राम कृष्ण आले त्यांच्या पोटासि, [13]भाग्यअर्णव तें ।
न [14]चतुर्मुखासि वदवे, कैसें एका मुखासि वर्णवतें? ॥ ३६९

वाचा शुद्ध कराया थोडेंही [15]वर्णिलें [16]पुरे यश तें, ।
वर्णन सरेल [17]कल्पावधि करितां [18]आननाचिया न शतें. ॥ ३७०

सुत [19]कीर्तिमत्प्रमुख त्या सप्तम [20]बळ देवकीस, अष्टम [21]हा ।
भगवान् साक्षात् सन्मुनिधन, [22]यन्नामें [23]सरेचि कष्ट महा. ॥ ३७१

देवकिची जी [24]तनुजा सुमति सुभद्रा [25]मुरारिची [26]अनुजा, ।
तव [27]आजी ती [28]मनुजाधीशा [29]वरि म्हणति देवही [30]ननु [31]ज्या. ॥ ३७२

---

१. केकयदेशाचा राजा. २. श्रुतकीर्तीचे मुलगे. ३. आपल्या शत्रुरूप पशुसमूहांत. ४. सिंह. ५. मूळांत जयसेन असें आहे. ६. अवंतिदेशाचे विंद अनुविंद नामक दोन मुलगे. ७. बायको. ८. श्रुतश्रवा. ९. वाजणें. हें व्रज=जाणें, धातूचें अपभ्रष्ट मराठी रूप आहे. याचा प्रयोग जुन्या महाराष्ट्र काव्यांतून आढळतो. या चरणाचा अर्थ [या गीतिला] 'वाजाया,–जाण्याला, ही गति प्राप्त होण्यास'त्या'–शिशुपाळाला, 'कुमारशाप'–सनत्कुमाराचा शाप [कारण] 'होय'. (वर टीप २ पहा.) १०. उत्तम आहे शील ज्यांचें अशा. ११. पृथ्वीच्या कार्यासि ये=उपयोगीं पडे, कामीं पडे. १२. बलराम. १३. येथें भाग्यार्णव–असा समासघटित शब्द पाहिजे. समास इष्ट असून केला नाहीं अशा स्थळांपैकीं हें एक आहे. १४. ब्रह्मदेवाला. १५. वर्णिलेलें. १६. पुरेसें आहे. १७. कल्पपर्यंत. १८. शंभर तोंडांनीं. रामकृष्णांचे यशाचें पूर्णपणें वर्णन करणें अशक्य आहे असा भाव. १९. कीर्तिमदादि आठ मुलगे. त्यांचीं नांवें:–कीर्तिमान्, सुषेण, भद्रसेन, ऋजु, संमर्दन, भद्र, शेषाचा अवतार संकर्षण (बलराम) व श्रीकृष्ण. २०. बलराम. २१. भगवान् श्रीकृष्ण. २२. ज्याच्या (ज्या श्रीकृष्णाच्या) नांवानें. २३. नाश पावे. २४. मुलगी. २५. मुरनामक राक्षसाचा शत्रु, मुराचा अंतक जो श्रीकृष्ण त्याची. २६. धाकटी बहीण. २७. बापाची आई. २८. नृपतिला, राजा अर्जुनाला. २९. पति (नवरा) करी. ३०. खरोखर. ३१. ज्या अर्जुनाला.

वाराया भूमीचा [1]भर, [2]शरणागत अशेष ताराया, ।
माराया दैत्यांतें अवतरला [3]श्रीनिवास, बा! राया! ॥ ३७३

यश [4]इंदिरावराचें [5]इंदुचि, जे कवि तयां चकोरांतें ।
आपण [6]मुदिरचि सुखवुनि बहु नाचिवणार भक्तमोरांतें. ॥ ३७४



---

१. हराया. २. भार. ३. शरण आलेल्यांना. ४. श्रीकृष्ण. ५. इंदिरा+वराचें=लक्ष्मी+वल्लभाचें=लक्ष्मीपति जो कृष्णरूपी महाविष्णु त्याचें. या गीतीच्या पूर्वार्धात श्रीकृष्णाच्या यशाला चंद्राची व जे कवि (ज्ञाते) त्यांना चकोरांची उपमा दिली आहे; तसेंच उत्तरार्धांत श्रीकृष्णाला मुदिराची (मेघाची) व भक्ताला (भक्त जो मोरोपंत त्याला) मोराची उपमा दिली आहे. यावरून श्रीकृष्णाचें यश व श्रीकृष्णाचें नाम हीं दोन्हीं सुज्ञांना व भक्तांना फार आल्हादकारक आहेत–असा भाव. ६. चंद्र. ७. मुदिर=मेघ.

	किं.	ट. ख.
वृत्तरत्नाकर—केदारभट्ट- कृत, नारायणपण्डि- तकृत टीकेसहित, श्रुतबोध-कालिदास- कृत, व छन्दोमञ्जरी- गङ्गादासकृत ...	·।।।·	०–
वैदिककोश—भट्टभास्क- रकृत, निघंटु व चार परिशिष्टें यांसहित	·।।·	०–
वैराग्यशतक—भर्तृहरि- कृत, कृष्णशास्त्री म- हाबलकृत टीकेसहित	·।·।।	०॥
शब्दरूपावलि... ...	०–	०॥
शिवसहस्रनामावलि (साधी) ...	०–॥	०॥
,, (रेशमी पुठ्ठा)	०≡	०॥
शिवकवच	०।।।	०॥
शिवगीता (साधी)	·।·।	०–
,, (रेश० पु०)	·।=।	०–
,, लक्ष्मीनरहरिसू- नुकृत बालानंदि- नी टीका व शं- कराचार्यकृत काल- भैरवाष्टक यांसहित	१	०=
शिवतांडवस्तोत्र—दश- कंठकृत, माधवानंद- कृत टीकेसहित ...	०–	०॥
शिवमहिम्नस्तोत्र—पुष्प- दंतकृत ...	०।।।	०॥
शिवापराधक्षमापनस्तोत्र —शंकराचार्यकृत ...	०॥	०॥
शिशुपालवध काव्य— माघकृत, मल्लिनाथ- कृत सर्वंकषाटीकेस- हित	३	·।–
शृङ्गारशतक—भर्तृहरि- कृत, कृष्णशास्त्री म- हाबलकृत टीकेसहित	०≡॥	०॥
सत्यनारायणपूजा व कथा	०–	०॥

	किं.	ट. ख.
सप्तशती (चंडीपाठ), देवीसूक्त व तीन रहस्यें यांसहित (स्थू- लाक्षर रेशमी पुठ्ठा)	·।।।·	०=॥
सप्तशती (रे. पु. म.अ.)	·।=	०–
,, (साधी कागदी)	·।·	०–
(सूक्ष्माक्षर रे.पु.)	·।–	०॥
,, (स्थूलाक्षर सुटीं पत्रें)	·॥=	०=
समासचक्र	०।।।	०॥
सर्वपूजा	०–	०॥
सिद्धांतकौमुदी–भट्टोजी दीक्षितकृत, अष्टाध्या- यीसूत्रपाठ, गणपाठ, धातुपाठ, लिंगानुशा- सन, शिक्षा आणि सूत्रानुक्रमणी यांसहित	२	·।–
सुभाषितरत्नभांडागार	३॥	·।=
सूर्यसहस्रनामावलि	०–॥	०॥
,, (रे. पुठ्ठा)	०≡	०॥
स्वानुभवाष्टक—गोपी- नाथ दाधीचकृत, स्व- कृतसारबोधिनीटीका- सहित	०–	०॥
हर्षचरित—बाणभट्टकृत, शंकरकृत संकेतटीके- सहित	२	०=
हितोपदेश—नारायण- पंडितकृत	·।।·	०–
,, (इंग्रजी टिपांसहित)	१	०–॥
अभिधानसंग्रह—प्रथम भाग. यांत अमरसिं- हकृत नामलिंगानु- शासन, पुरुषोत्तमदे- वकृत त्रिकांडशेष, हारावली, एकाक्षर- कोश व द्विरूपको- श इतके कोश आले आहेत.	१	०–

काव्यमाला.

या नांवाचें संस्कृत मासिक पुस्तक, सन १८८६ चे जान्युआरी महिन्यापासून प्रसिद्ध होत आहे. यांत उत्तम उत्तम प्राचीन संस्कृत काव्यें, नाटकें, चंपु, भाण, प्रहसनें, छंद, अलंकार इत्यादिकांचा यथावकाश संग्रह होत असतो. फार प्राचीन आणि अत्यंत सुरस असेच ग्रंथ निवडून ते या मालेंत गुंफले जातात. **महामहोपाध्याय पंडित दुर्गाप्रसाद** या नांवाचे विद्वान्, बहुश्रुत आणि शोधक गृहस्थ जयपूरच्या महाराजांचे आश्रयास होते. त्यांनीं काश्मीर, पंजाब, बंगाला, राजपुताना, मध्यदेश, तैलंगण, वगैरे सर्व प्रदेश फिरून नानाप्रकारचे काव्यग्रंथ संपादित केले होते. त्यांतील कित्येक ग्रंथ तर ८०० किंबहुना १००० वर्षांच्याही पूर्वींचे होते. ते सर्व ग्रंथ **रा॰ रा॰ काशिनाथ पांडुरंग परब** यांनीं आह्मांस तपासून दिलेले या मालेंत येत जातात. या मालेचे अंक प्रतिमास एकदां प्रसिद्ध होतात. प्रत्येक अंकांत डेमी अष्टपत्री सांच्याचीं १०० पृष्ठें असतात. याची वर्षाची आगाऊ किंमत ६ रुपये, ट. ख ·॥· फुटकळ अंकाची किंमत ·॥= ट. ख. ८/

यांत आजपर्यंत ग्रंथ छापून तयार झाले आहेत, त्यांचीं नांवें:—

प्रथम गुच्छक—यांत (१) राघवचैतन्यविरचित महागणपतिस्तोत्र (सटीक,) (२) लङ्केश्वरविरचित शिवस्तुति, (३) कालिदासकृत श्यामलादण्डक, (४) कुलशेखरनृपतिविरचित मुकुन्दमाला, (५) जगन्नाथपण्डितराजविरचित सुधालहरी, (६) शंभुमहाकविविरचित राजेन्द्रकर्णपूर, (७) क्षेमेन्द्रविरचित कलाविलास, (८) जगन्नाथपण्डितराजविरचित प्राणाभरण (सटीक), (९) अप्पयदीक्षितविरचित वैराग्यशतक, (१०) जगन्नाथपण्डितराजविरचित अमृतलहरी, (११) रत्नाकरविरचित वक्रोक्तिपञ्चाशिका (सटीक), (१२) आणि क्षेमेन्द्रविरचित औचित्यविचारचर्चा, इतकीं काव्यें आलीं आहेत. किंमत १ रुपया. ट. ख. ८/॥

द्वितीय गुच्छक—यांत (१) शंकराचार्यकृत विष्णुपादादिकेशान्तवर्णनस्तोत्र (सटीक), (२) गुमानि कविप्रणीत उपदेशशतक, (३) क्षेमेन्द्रकृत सुवृत्ततिलक, (४) जगन्नाथपण्डितराजविरचित करुणालहरी, (५) शंभुमहाकविविरचित अन्योक्तिमुक्तालता, (६) क्षेमेन्द्रकृत सेव्यसेवकोपदेश, (७) विक्रमविरचित नेमिदूत (८) जगन्नाथपण्डितराजविरचित लक्ष्मीलहरी, (९) रुद्रकविकृत भावविलास, (१०) क्षेमेन्द्रकृत चारुचर्या, (११) मधुसूदनसरस्वतीविरचित आनन्दमन्दाकिनी, (१२) शंकराचार्यकृत अम्बाष्टक (सटीक) आणि (१३) मुकुन्दमुक्तावलि, इतकीं काव्यें आलीं आहेत. किंमत १ रुपया. ट. ख. ८/॥

तृतीय गुच्छक—यांत (१) गोकुलनाथविरचित शिवशतक, (२) पञ्चस्तवी, (३) दामोदरगुप्तप्रणीत कुट्टनीमत, (४) रुद्रभट्टकृत श्रृङ्गारतिलक व (५) माधवविरचित दानलीलाकाव्य, इतकीं काव्यें आलीं आहेत. किंमत १ रुपया. ट. ख. ८/॥

चतुर्थ गुच्छक—यांत (१) बाणभट्टविरचित चण्डीशतक (सटिप्पण), (२) नागराजप्रणीत भावशतक, (३) नारायणभट्टपादकृत स्वाहासुधाकर,